७८७५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
र. नं. ९७०

नि०

# समाजजीवन

REFBK-0006618

—रमाविनय

१५६२०

# समाजजीवन

लेखक

**रमातनय**

REFBK-0006618

शके १८६७

मूल्य ५ रुपये

सोल एजंट
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार
पुणें २

( १ ) पुढील आवृत्तीचे सर्व हक्क लेखकाकडे

प्रकाशक
गणेश गोविंद जोशी
मुकुंद प्रकाशन
मिरज

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

# समर्पण

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

मातृपितृचरणीं

# देशमुख आणि कंपनी

## यांचीं नवीं आकर्षणें

### शास्त्रीय

| | | |
|---|---|---|
| १ सौंदर्यशोध आणि आनंदबोध– | ( साहित्यशास्त्र ) | रा. श्री. जोग |
| २ आपलें आर्थिक नियोजन– | ( अर्थशास्त्र ) | ह. रा. महाजनी |
| ३ वर्धाशिक्षण योजना– | ( शिक्षणशास्त्र ) | आचार्य भागवत |
| ४ राज्यशास्त्र प्रवेश– | ( राज्यशास्त्र ) | हॅ. जे. लास्की |
| ५ समाजजीवन– | ( समाजशास्त्र ) | रमातनय |
| ६ प्रकृतिदर्शन– | ( आरोग्यशास्त्र ) | कृ. गो. किनरे. |

## ललितविभाग

| | |
|---|---|
| १ मंगलधाम– | गो. ग. तळवलकर |
| २ दोन तपें– | ग. त्र्यं. माडखोलकर |
| ३ निळापक्षी– | सानेगुरुजी |
| ४ आपली राहणी– | एम्. एल्. दांतवाला |
| ५ संध्या– | सानेगुरुजी |
| ६ कल्पलता– | वि. स. खांडेकर |
| ७ आत्मचरित्र– | कृष्णा हाथीसिंग |
| ८ मराठीचा नाट्यसंसार– | वि. स. खांडेकर |

अनुक्रम ........
दि. ता. ........
क्र. ........
नं. दि. ........

## हृद्गत

प्रस्तुत ग्रंथाचा प्रकाशन समारंभ बदलापूर येथें ती. वडिलांच्या मातोश्रींच्या श्राद्ध दिवशीं साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं प्रा. दत्तो वामन पोतदार होते. या प्रसंगीं प्रा. वा. ना. गोडबोले व श्री. चिं. ग. कर्वे यांचीं भाषणें झालीं. लेखकानेंहि आपली भूमिका समजावून देऊन ग्रंथाच्या कल्पनेचा इतिहास सांगितला. सुमारें १०–१५ वर्षें ती. वडिलांच्या ग्रंथांचें प्रकाशन होत असे; याच प्रसंगीं आपलाहि ग्रंथ प्रकाशित व्हावा ही इच्छा. भारदस्त ग्रंथांच्या पसाऱ्यांत व भारदस्त विद्वानांच्या सहवासांत सबंध बालपण गेलें. त्यामुळें मनाची एक विशिष्ट घडण घडली गेली. पुढें जाणत्या वयांत वरील वातावरणाचा परिणाम म्हणून तात्त्विक विषयांची गोडी लागली. आणि शेवटीं परिस्थितीचें निरीक्षण, गंभीर विषयावरील ग्रंथांचें वाचन आणि विद्वानांशीं चर्चा यांतून प्रस्तुत ग्रंथाची उत्पत्ति झाली.

ग्रंथांत सामाजिक विषयांचें विवेचन आल्यानें ग्रंथास समाजशास्त्रीय म्हणावें लागेल. परंतु सामाजिक विषयांचा निर्णय देण्यापेक्षां ते प्रश्न सोडवितांना जी मानसिक पार्श्वभूमि अवश्य आहे तिचेंच दिग्दर्शन अधिक झालें आहे. आणि तेंच पाहिजे आहे. ही तात्त्विक पार्श्वभूमिच महत्त्वाची आहे.

सबंध ग्रंथ लिहून झाल्यावर व त्या निमित्तानें कांहीं वाचन व चर्चा झाल्यावर प्रा. पोतदारांनीं आपल्या 'पुरस्कारां'त म्हटल्याप्रमाणें मनांत एक कल्पना आल्याशिवाय राहत नाहीं. भारतीय संस्कृतीचें मंडन करितांना केवळ जुने दाखले देऊन कोरडीं विधानें करण्यांत आतां अर्थ नाहीं. प्राचीन भारतीय संस्कृतीचें महत्त्व आधुनिक युगांतहि अबाधित राहावयास पाहिजे हें सिद्ध करण्याकरितां आम्ही एकत्र येऊन स्वतंत्रपणें संघटित स्वरूपांत शास्त्रीय संशोधन व अभ्यास करणें अत्यावश्यक आहे.

*रमातनय*

## कृतस्मरण

या ग्रंथाच्या हस्तलिखिताचे पहिले वाचक आणि पहिले उत्साहक प्रा. शं. दा. चितळे, एम्. ए., बी. टी. राष्ट्रभाषाविशारद्, प्रधानमंत्री–राष्ट्रभाषा प्रचार समिति यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत. यांनीं दिलेल्या उत्तेजनामुळेंच ग्रंथास आजचें स्वरूप प्राप्त होत आहे. केवळ स्नेहभावानें हस्तलिखित वाचून वेळोवेळीं सूचना देणारे माझे मित्र श्री. मो. स. जोशी, बी. ए. एक्साईज इन्स्पेक्टर, पाथर्डी यांच्याविषयीं कृतज्ञता मला व्यक्त केली पाहिजे. न्यायरत्न विनोद यांच्याशीं केलेल्या चर्चेचा मला बहुमोल उपयोग झाला. प्रो. वा. ना. गोडबोले एम. ए. यांच्याहि चर्चेचा मला फार उपयोग झाला. यांनीं सबंध हस्तलिखित चिकित्सकपणें वाचून काढलें.

श्री. रा. प्र. कानिटकर, एम्. ए., संपादक 'चित्रमयजगत्' आणि श्री. चिं. ग. कर्वे, बी. ए., संपादक 'महाराष्ट्र शब्दकोश' या दोघांचें प्रेमळ सहाय्य चिरंतन स्नेहास्पद आहे यांत शंका नाहीं. प्रा. पोतदारांशीं झालेली चर्चा मला फारच उद्बोधक वाटली. वेळांत वेळ काढून त्यांनीं 'समाजजीवना'ला 'पुरस्कार' ल्याबद्दल त्यांचा ऋणी राहिलों पाहिजे.

श्री. देशमूख–चालक देशमूख कंपनी यांच्यामुळेंच पुस्तक प्रसिद्ध करणें शक्य झालें. अत्यंत परिश्रमानें ग्रंथ छापून दिल्याबद्दल आर्यभूषणचे व्यवस्थापक व कामगार यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

शेवटीं उल्लेखित व अनुल्लेखित सर्व सहाय्यकांविषयीं पुन्हां एकदां कृतज्ञता व्यक्त करून वाचकांचा तूर्त निरोप घेतों.

बदलापूर<br>
कार्तिक वद्य ३ शके १८६७

रमातनय

# संदर्भ ग्रंथ

(यांपैकीं कांहीं ग्रंथांनीं नवीन माहिती पुरविली, कांहींनीं वैयक्तिक अनुभवांना व्यापकता आणली, कांहींनीं नवीन मतें बनवून दिलीं, कांहींनीं जुनीं संशयित, अस्पष्ट मतें दृढ केलीं, कांहीं विरोधी विचाराच्या ग्रंथांनीं जुनीं एकांगीं मतें तावून सुलाखून दिलीं, तर कांहीं ग्रंथांनीं मानसिक पार्श्वभूमि तयार केली.)


( १ ) In Tune with the Infinite.
( २ ) समाजनियंत्रण— ना. गो. चापेकर
( ३ ) भारतीय समाजशास्त्र— डॉ. श्री. व्यं. केतकर
( ४ ) Hindoo Social Institutions— Walawalkar.
( ५ ) Hindoo View of Life— Sir Radhakrishnan
( ६ ) गच्चीवरील गप्पा— ना. गो. चापेकर
( ७ ) Kalki or The Future of Civilisation —Sir Radhakrishnan.
( ८ ) Marriage and Morals.— Russel
( ९ ) Spirit of Indian Civilisation —Radhakumud Mukarji.
( १० ) स्त्रीजीवनविषयक कांहीं प्रश्न— सौ. कमलाबाई टिळक
( ११ ) पाश्चात्य देशांतील स्त्रीसमाज दर्शन— धत्ते दांपत्य
( १२ ) स्पेन्सरचें नीतिशास्त्र— धों. के कर्वे
( १३ ) मानसोपचार— ना. सी. फडके
( १४ ) History and Progress— Marvin.
( १५ ) पैसा— ना. गो. चापेकर
( १६ ) ज्ञानकोश— डॉ. केतकर
( १७ ) भारतीय चलनपद्धति— शं. ग. खांडेकर
( १८ ) सुलभ समाजवाद— पां. वा. गाडगीळ
( १९ ) कॅपिटल सारग्रंथ— पां. वा. गाडगीळ
( २० ) मार्क्सचा भौतिकवाद— ,,

(२१) भारतीय नाट्यशास्त्र— गोदुबाई केतकर
(२२) प्रतिभासाधन— ना. सी. फडके.
(२३) Ethical Theory of Kant— Abbot
(२४) Lectures on Humanism— Macanzee
(२५) Philosophy : What is it ?— F. B. Jevons.
(२६) Science and the Modern World— Whitehead.
(२७) गीतारहस्य— लोकमान्य टिळक
(२८) राजयोग— स्मामी विवेकानंद
(२९) स्वामी विवेकानंदांचीं व्याख्यानें
(३०) पूर्व आणि पश्चिम— स्वामी विवेकानंद
(३१) स्वामी रामतीर्थ यांचें चरित्र
(३२) History of India— Ramesh Chandra Dutta.
(३३) ईश्वरवाद— प्रि. दांडेकर
(३४) Sadhana— Dr. Ravi. Tagor.
(३५) Great Educators—
(३६) The Out Line of the History of the World —H. G. Wells
(३७) विज्ञानबोध— श्री. म. माटे
(३८) Social Functions of Sciences— J. D. Bernal
(३९) कौटिलीय अर्थशास्त्र

...ठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ६६७१९
ग्रंथ ... (ठाणे शहर)

## पुरस्कार

गेलीं पांचसात वर्षें जगांत जो महायुद्धाचा प्रचंड डोंब पेटला होता तो आतां नुकताच कोठें थंडावला आहे! या प्रचंड रणयज्ञांत लक्षावधि लोकांच्या आहुती पडल्या आणि कुटुंबेंच्या कुटुंबेंच काय, परंतु मोठमोठीं विस्तीर्ण आणि विशाल नगरें शब्दशः भस्मसात् झालीं! या युद्धाचा शेवट ज्या अग्न्यस्त्रानें झाला त्याच्या संहारक शक्तीनें त्याचे प्रेरकहि चिंताग्रस्त झाले आहेत. आमच्या पौराणिक अस्त्रविद्येंत अस्त्राचा उपक्रम आणि उपसंहार अशा दोन क्रिया वर्णिलेल्या आढळतात. उपक्रम विद्या म्हणजे अस्त्र शत्रूवर लागू करण्याची विद्या; आणि सोडलेलें अस्त्र परत आवरून घेण्याची जी विद्या, ती उपसंहार विद्या होय. सांप्रतच्या अणवस्त्रप्रयोगांत उपक्रमाची विद्या एका राष्ट्रानें साध्य केली आहे. परंतु या अणवस्त्राच्या उपसंहाराचा मंत्र अद्यापि कोणासच ज्ञात झाला नाहीं, त्यामुळें सर्वांना वाटत असलेली चिंता आणि भय हीं दुणावलीं आहेत! या युद्धाची झळ मुळींच लागली नाहीं असा देश विरळाच! कोणी या युद्धांत भाजून मेले, कोणी होरपळून गेले, आणि बाकीचे सारे कमी अधिक शेकून निघाले. पण या डोंबांतून सुटला असा कोणीच नाहीं!

आतां युद्धाचा वणवा शमला तेव्हां शांतीचे पाठ सुरू झाले आहेत. 'मोडलेलें' जग पुनः कसें 'मांडावयाचें' त्याचा विचार जोरानें चालू झाला आहे. एकामागून एक अशा अनेक योजना पुढें येत आहेत, आणि त्यांतच असाहि सूर

मधून मधून पण स्पष्टपणें ऐकूं येत आहे कीं ' तिसरें महायुद्ध ' झाल्याशिवाय राहात नाहीं. एका पुनर्रचनेच्या योजनेला दुसरा ढोंगीपणाची म्हणतो, तर तिसरा अपुरी म्हणतो. योजना करण्यापूर्वी ती टिकाऊ व्हावयाची तर आधीं कांहीं मूलभूत तत्त्वें सर्वमान्य झालीं पाहिजेत. एकमेकांना एकमेकांचा विश्वास वाटेल अशी परिस्थिति राष्ट्राराष्ट्रांत कशी निर्माण होईल आणि टिकेल याचाहि काळजीपर्वक विचार केला पाहिजे. यास्तव अशा मूलभूत तत्त्वांचीहि चर्चा चालू आहे.

युद्ध झालें त्यालाहि मूलभूत तत्त्वप्रणालींचा भेद कारण झाला असाहि पक्ष मांडण्यांत येतो. इटली-जर्मनी-जपान इत्यादि राष्ट्रांनीं आपली रचना ज्या पद्धतीनें विकसित केली त्याच्या बुडाशीं असलेलें तत्त्वज्ञान मुख्यतः ' फाशिष्ट ' म्हणजे लोकशाहीविरोधी म्हणून धिक्कारिलें जातें आणि स्वातंत्र्य, समता, आणि लोकशाही यांच्या रक्षणार्थ फाशिष्टांशीं लढल्याचा दावा सांगण्यांत येतो. जर्मनी किंवा रशिया या दोघांच्याहि गटांत भौतिक सुधारणांवर मात्र सारखाच जोर दिल्याचें दिसून येतें.

गेल्या तीनचारशें वर्षांत युरोपीय राष्ट्रांत नवीन भौतिक शास्त्रांचा मनस्वी उत्कर्ष साधण्यांत आला. धर्माचा आधार साधारणपणें सुटल्यासारखाच झाला. समाज धर्मपरायण होता तो भौतिक शास्त्रपरायण होऊं लागला. ' याचि देहीं याचि डोळां ' जें सुख भोगतां येईल तें भोगावें आणि त्या सुखांत प्रत्यहीं भर कशी पडेल असा अव्याहत प्रयत्न चालू ठेवावा हीच इतिकर्तव्यता मानण्यांत येऊं लागली. हा क्रम इतक्या वेगानें आणि यशस्वी रीतीनें चालू राहिला कीं, अखिल जगतावर त्याची छाप पडली. या नव्या भौतिक शास्त्रयुगांतील मनुष्य हा जणूं काय आपण या सृष्टीचे स्वामी, असा अहंकार मनांत वागवूं लागला. ज्यांनीं हा, भौतिक सुखाचा शास्त्रीय मार्ग स्वीकारला नव्हता ते समाज दुर्बळ व पराधीन झाले आणि मेलेलें जिणें जगूं लागले. युरोपीयांच्या मार्गानें गेलें तरच आपला उद्धार होईल एरवीं नाहीं असा विचार या जीवन्मृत समाजांत प्रबळ होऊं लागला. या जुनाट देशांपैकीं भारतवर्ष, चीन यांसारखे जे प्राचीन देश होते आणि ज्यांनीं एकेकाळीं जगतांत अग्रेसरत्वाचा मान मिळविला होता त्यांनाहि आतां आपले जुने मार्ग, आणि प्राचीन तत्त्वज्ञानें यांस चिकटून राहण्यांत तात्पर्य नाहीं असें वाटूं लागलें होतें.

पण जेव्हां गेल्या महायुद्धाचें होमकुंड धडकून पेटलें आणि त्यांत साऱ्या नव्या भौतिक शास्त्रीय संस्कृतीची होळी होण्याची पाळी आली तेव्हां त्या संस्कृतीच्या

उपासकांनाच तिच्या अकुंठितत्वाची, प्रागतिकतेची, आणि यशस्वितेची शंका येऊं लागली, मग इतरांची कथा काय! आपलें कोठें तरी चुकलें आहे खास, आपण यांत्रिक सुधारणा करून आकाशावरहि स्वारी केली खरी, परंतु शेजारच्या राष्ट्रांतहि आपल्याबद्दल प्रेम आणि विश्वास निर्माण करण्यांत आपणांस यश आलें नाहीं आणि आपापले राष्ट्रीय संसार युक्तीनें, सामोपचारानें परस्पर सहाय्यानें आणि शांतिमय मार्गानें आपणांस चालवितां आले नाहींत, मग आपण 'प्रगति' केली म्हणजे काय, आपण जगांत श्रेष्ठ म्हणून तोरा मिरवितों तो कितपत खरा, आणि आपसांत जर प्राणघेण्या लढाया खेळण्याचें आपणांस टाळतां आलें नाहीं आणि एकमेकांच्या नाशासाठीं आपण कंबर कसून उभे ठाकलों तर मग आपलें भविष्य पुढें कसें, आपण राहूं, जगूं किंवा मरूं, अशा शंकांनीं समस्त श्वेत जग व्याकुळ झालें!

या विचारकोलाहलांत एक गोष्ट सूर्यप्रकाशाहूनहि स्पष्ट आणि सर्वमान्य होती आणि ती ही कीं भौतिक शास्त्रांमुळेंच प्रस्तुतच्या युद्धाला असें भयंकर संहारक स्वरूप प्राप्त झालें. किंबहुना त्यामुळेंच सर्व जगावर तें वेगानें पसरलें आणि सारें जग युद्धाच्या खाईत लोटलें गेलें. कोणीच त्यापासून खराखुरा अलिप्त राहूं शकला नाहीं. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि सांप्रत आकाश या पांचहि भूतांवर माणसानें आतां या शास्त्रीय ज्ञानाचे बळावर आपली चांगलीच पकड बसविली आणि या शोधांतूनच अखेर अणुशक्तीचें ज्ञान होऊन अणुस्फोटकांतील अकल्पनीय सामर्थ्य प्रकट झालें.

मग ही अशी भयंकर संहारक शक्ति आणि तिची ओळख करून देणारीं जीं भौतिक शास्त्रें तीं शास्त्रेंच मुळांत नष्ट केलीं तर? हा भौतिकशास्त्र प्रगतीचा मार्गच सोडला आणि आपण मागें फिरलों तर......?

याच्या उलट विचारप्रवाहहि दिसून येतो तो असा—भौतिक शास्त्रांची कांहीं चूक नाहीं. शास्त्रज्ञांनीं शोध केले त्यांचीहि कांही चूक नाहीं. या शोधांचा उपयोग ज्या पद्धतीनें करण्यांत आला ती चुकीची आहे. दोष पद्धतींत आहे. भौतिक शोधांचें पोषण फायद्याचे लोभानें ज्यांनीं केलें त्यांनीं पैसा व भांडवल अपरंपार सांठविलें आणि त्याच्या जोरावर सर्व सत्ता काबीज केली. मनुष्यालाहि मजूर करून त्याचें रक्त शोषण्यास कमी केलें नाहीं. पैशानें सत्ता काबीज

केली, शास्त्रज्ञ देखील विकत घेतले, असा हा सारा पैशाचा खेळ आहे. जर रक्ताचे पाणी करणारे मजूर आणि बुद्धी विकणारे शास्त्रज्ञ जागे होतील तर हे पैशाचे चाळे सहज बंद करतां येतील.

याचा अर्थ असा कीं शास्त्र-मार्ग दोषी नसून समाजरचनाच दोषी आहे. समाज-रचनाच बदलली पाहिजे. शास्त्रज्ञांनीं शास्त्रविचार पुढें नेला पण समाज मागेंच राहिला. समाज शास्त्रांचा उपभोग घेत राहिला परंतु शास्त्रनिर्मितीचें नियमन आणि संयोजन यांकडे त्यानें सर्वस्वीं दुर्लक्ष केलें. उलटपक्षीं शास्त्रशोधक आणि शास्त्रसेवक हे केवळ एकलकोंडे, आपल्याच कामांत गर्क राहून समाजापासून सर्वथा अलिप्तपणें वावरत. शास्त्रज्ञाला एका अर्थानें असा अलिप्तपणा राखावाच लागतो. पण समाजाचा एक घटक या नात्यानें समाजसंघटनेकडे केवळ दुर्लक्ष करण्यानें तो अप्रत्यक्षपणें आपल्याच कार्याच्या हानीलाहि कारणीभूत होत असतो. शास्त्रांचा वापर करणारी सत्ता जें करील व ठरवील ती पूर्वदिशा हा प्रकार शास्त्राच्या प्रगतीला अंतीं मारक ठरल्याविना राहात नाहीं.

शिवाय समाजरचना हेंहि एक शास्त्रच नाहीं काय ? खरें पाहतां तें शास्त्रच नव्हे, **महाशास्त्र** आहे. पुष्कळ विद्या असली, किंवा धन असलें तरी त्याचा उपयोग कसा केला जातो यालाच खरें महत्त्व आहे. ‘योजकस्तत्र दुर्लभः’ हें आमच्या प्राचीन वैद्यकशास्त्रांतलें अनुभवाचें तत्त्व खरोखरच यथार्थ आहे. शास्त्र किंवा ज्ञान आपोआप कांहींच करूं शकत नाहीं. तें कर्त्यावरच अवलंबून असतें. तात्पर्य, समाज शास्त्रप्रवण असला पाहिजे तसेंच शास्त्रहि समाजप्रवण असलें किंवा केलें पाहिजे. असा उभयतांत मेळ पाहिजे. आज शास्त्रापुढें माणसाला मान वाकवावी लागत आहे; पण उद्या माणसापुढें शास्त्रानें मान वाकवावी असा काळ येईल. याचा अर्थ असा नव्हे कीं शास्त्र हें माणूस म्हणेल तसें बोलेल. शास्त्र हें सत्यच बोलेल आणि त्यानें सत्यच बोललें पाहिजे. पण शास्त्रानें सत्याबरोबरच ‘हित’ काय तेंहि बोललें पाहिजे. ‘सत्यं ब्रूयात् हितं ब्रूयात्’ असा शास्त्राचा दंडक असावयास पाहिजे.

केवळ गणित, रसायन, पदार्थ–विज्ञान–हीं किंवा असलींच तेवढीं शास्त्रें आणि जीव, मन इत्यादींचा विचार करणारीं शास्त्रें शास्त्रकोटींतलीं नव्हेत असें म्हणणें योग्य नाहीं उलट मन, जीव, इत्यादींविषयीं विचार करणारीं शास्त्रेंच अधिक महत्त्वाचीं होत.

कारण समाज आणि भौतिक शास्त्रें यांत जें महदंतर आज पडलेलें आहे आणि ज्यावरून भौतिक शास्त्रें आतां थांबतील तर बरें असा त्यांचा परिणाम पाहून सूर निघूं लागला आहे त्याचें वास्तविक कारण समाज म्हणजे काय, शास्त्र आणि समाज यांचा संबंध काय, समाजाला शास्त्रांचा उपयोग कसा करून घ्यावा, कोणची समाजव्यवस्था उत्तम गणतां येईल, समाजांत नांदणारी सत्ता कशी व कोठें वसते आणि तिचें केंद्रांतर कोठें आणि कसें करावें इत्यादि प्रश्नांची सोडवणूक करण्यास मदत करणारीं सामाजिक शास्त्रें मागें पडल्यामुळेंच झाला आहे. मानवी प्रगतीचा गाडा एकारल्यासारखा दिसतो याचें कारणहि हेंच आहे. विशेषेंकरून अणुशक्ती आणि अणुघटनेचा जसजसा परिचय होत गेला तसतसा शास्त्रज्ञांनाहि आजवर अवगत न झालेला प्रांत दिसूं लागला. डोळ्यालाहि न दिसणारा अणू तो काय आणि त्यांत विश्व कोलमडून पडेल अशी उलथापालथ करण्याची शक्ति गुप्तपणें लपलेली आढळावी हा केवढा विलक्षण चमत्कार होय ! शोधाची मजल एका बाजूनें येथवर पोंचल्यावर या अणुशक्तीच्या गूढाचा उलगडा करण्याच्या उद्योगांत न जाणों मानसिक सामर्थ्याचें आजवर अज्ञात असलेले पडदे खुले झाले तर ? तें कसेंहि असो, यापुढें समाज आणि शास्त्र यांनीं बरोबरीनें चाललें पाहिजे. समाजाबरोबर शास्त्रें आणि शास्त्रांच्या बरोबर समाज अशी जोडीनेंच चाल केली पाहिजे असा विचार वळावूं लागला. आणि सामाजिक शास्त्रांची आजवर केलेली हेटाळणी आणि हेळसांड थांबवून आपणांस विचारानेंच वागलें पाहिजे असे वारे वाहूं लागले.

'समाजजीवन' या विषयाचें महत्त्व याप्रमाणें परिस्थितीनेंच आज जगास पटत चाललें आहे. झाली येवढी उपेक्षा पुरे झाली या विचारानें समाजजीवनाकडे अभ्यासी आणि विचारी मंडळी अधिकाधिक वळूं लागली आहेत.

प्रस्तुत ग्रंथकर्त्याचें कौतुक कां करावें हें आतां निराळें सांगण्याचें कारण नाहीं. त्यानें याच महत्त्वाच्या विषयाला हात घातला आहे एवढेंच कारण देखील त्या कामीं पुरेसें व उचित ठरतें.

एकदां असें विचारचक्र डोक्यांत चालूं झालें म्हणजे आपली दृष्टि आपल्या पूर्वींच्या ऋषिप्रणीत विचारपरंपरेकडे वळली तर त्यांत नवल कांहींच नाहीं. भौतिक शास्त्रांचा जोर झाला आणि आपलें सारें जीवन त्यांनीं बांधून टाकलें.

त्यावेळीं आपलीं ऋषिप्रणीत शास्त्रें आपण जीर्ण म्हणून अडगळींत टाकून दिलीं होतीं. पण आतां जर मानवी कर्तव्याचा, समाजव्यवस्थेचा विचार आपणांस अगत्याचा वाटू लागला आणि तसा प्रत्ययहि मनांत ठसूं लागला तर मग घटकाभर पुनः एकदा 'मानवधर्मशास्त्रां' कडे आणि मनुप्रभृती त्या शास्त्रांच्या प्रणेत्यांकडे आपली दृष्टि कां न जावी? अलीकडील शास्त्रांनीं आपणांला अणूंची गूढ शक्ति दाखवून दिली तर मग पिंड आणि ब्रम्हांड यांत एकत्वाचा अनुभव पाहावयाला सांगणारीं आपलीं शास्त्रें म्हणतात तरी काय याची सूक्ष्म चिकित्सा आपण करावयास नको काय? आपलें असें झालें आहे कीं, नवीन भौतिक शास्त्रांचा प्रभाव पाहून आपण आपलीं जुनीं पुराणीं शास्त्रें वासनांत गुंडाळून ठेवून या नवीन शास्त्रांच्या द्वारें पाश्चिमात्यांनीं मिळविलेलें ज्ञान आत्मसात् करण्याच्या मार्गाला झपाट्यानें लागलों आहोंत. पण आतां पाश्चिमात्य मंडळच समाजजीवनाकडे आग्रहानें वळूं लागलें आहे तर आपणहि आपला मोर्चा तिकडे वळवावा यांत विपरीत कांहीं नाहीं.

आम्ही आमच्या ऋषींकडे वळलों तरी भौतिक शास्त्रांनीं आधुनिक काळांत जें प्रत्यक्ष काम केलें तें कांहीं आम्हांस विसरतां येणार नाहीं. तसें आम्ही करूं तर सत्याचाच अपमान आम्ही केल्यासारखें होईल आणि ही गोष्ट जुने शास्त्री किंवा नवे पंडित यांपैकीं कोणीच विहित मानीत नाहींत. तेव्हां आधुनिक प्रयोगसिद्ध ज्ञान हें मान्य करूनच आपणाला समाजजीवनाचा विचार करावयास हवा. ऋषींच्या अनुभवांकडे वळावयाचें तें एवढ्याकरतांच कीं आधुनिक ज्ञानाच्या कसोटीवर त्यांचे सिद्धान्त पुनः घासून पाहावयाचे. आम्हीं ज्यावेळीं आमच्या ऋषींचें ज्ञान अडगळींत टाकिलें त्यावेळीं आम्हीं स्वतः विचार काय केला होता? स्वतः कोणते अनुभव घेतले होते? कीं बाहेरून आलेल्या ज्ञानानें दिपून केवळ हताशपणानें आपण तसें करण्यास प्रवृत्त झालों? खरें पाहतां हजारों वर्षें अनुभवाच्या चाळणींतून चाळून निघालेले आमचे ऋषिप्रणीत सिद्धान्त नुकत्याच उदयास आलेल्या आणि त्यावेळीं तरी यशस्वीहि झालेल्या भौतिक शास्त्रांपुढें दिपून जाऊन आम्ही एकाएकीं सोडावयास नको होते. कांहीं घटनाच अशा असतात कीं त्यांचे बरेवाईट परिणाम पुष्कळ काळ लोटल्यावर अनुभवास येऊं लागतात म्हणून तात्कालिक परिणामांवरच सर्व मदार ठेवणें धोक्याचें असतें. मानवी जीवन अत्यंत गुंतागुंतीचें असून लहानमोठ्या, स्थूल, सूक्ष्म अनेक कारणपरंपरा त्यांतील कार्यांशीं निगडित असतात. वरवर पाहून किंवा

विचार करून बांधलेलीं अनुमानें पुष्कळदां फसवीं ठरतात. अधिक काळ, अधिक अनुभव आणि अधिक विचार यांची जोड मिळाली म्हणजे पूर्वीचीं कच्चीं अनुमानें टाकून द्यावीं लागतात आणि अधिक पक्कीं वाटणारीं अनुमानें स्वीकारावीं लागतात. आम्हीं आमच्या प्राचीन वैचारिक संपत्तीची सूक्ष्म आणि टिकाऊ परीक्षा केली असें निश्चयपूर्वक म्हणतां येणार नाहीं. कारण आमच्या संस्कृतीसंबंधीं पुढें अधिक परिचय आणि ज्ञान प्राप्त होतांच प्रत्यक्ष पाश्चिमात्यांनींच प्रशंसोद्गार काढून आमचें वैभव आम्हांस पुन: दाखविलें. आमच्या मनानें मग उलट खाण्यास प्रारंभ केला. नवी दृष्टि आम्हांस लाभली. आमची जुनी दृष्टि केवळ श्रद्धेची आणि अभिमानाची होती. डोळस, चिकित्सक आणि तौलनिक नव्हती. ही नवी दृष्टि पाश्चिमात्यांकडून आम्हांस प्राप्त झाली. आणि याप्रमाणें झालेल्या परीक्षेंत जें आमच्या संस्कृतीचें गुणदोष-मापन झालें तेंच आम्ही प्रमाणभूत मानलें.

स्वत:चा विचार चालवून जातीनें, आमच्या डोळयांनीं आणि बुद्धीनें अशी परीक्षा करणें आमचें कर्तव्य होतें. पण तें आम्हीं केलें किंवा पार पाडलें असें आम्हांस म्हणतां येणार नाहीं. पाश्चिमात्यांच्या परीक्षेंतून जो आमच्या गौरवाचा भाग आला त्यानें आकृष्ट होऊन आणि उत्तेजन पावून आमच्यांतील कित्येकांनीं आत्मविश्वासाची भाषा सुरू केली, उलटपक्षीं त्याच परीक्षेंतून जें दोषाविष्करण झालें होतें त्यावर जोर देऊन आमच्यांतील दुसऱ्या कित्येकांनीं आत्मनिंदेचा मारा समाजावर करणें अवश्य मानलें. असे दोन पक्ष झाले. पण या उभयपक्षांपैकीं एकाहि पक्षानें शांतपणें शोधपूर्वक, स्वबुद्धीनें चाळणा व सप्रमाण चिकित्सा करून यथार्थ सिद्धान्त पुढें मांडले नाहींत. आणि ती गोष्ट थोड्या वेळांत होण्यासारखीहि नव्हती. आमचे प्राचीन शिलालेख देखील आम्हांस वाचतां येईनासे झाले होते. पुदुक्कोटाई संस्थानांत, लिपि येत नाहीं सबब त्या जागेवरील जुना शिलालेख छिनून काढून नवीन भाषेंत नवा शिलालेख आपण खोदविला असें विजयनगरकाळीं स्वच्छ लिहून ठेवलेलें आढळतें. पण प्रमाणें व उदाहरणें देण्याचा व प्रतिपादन वाढविण्याचा येथें विचार नाहीं. प्राचीन लेखसंशोधन, मुद्रासंशोधन, ग्रंथसंशोधन, वियासंशोधन, हें सर्व नव्यानेंच करणें प्राप्त होतें. अर्थात् हें कांहीं पिढ्यांचेंच काम होतें—चारसहा महिन्यांत संपणारें नव्हतें. तरीहि आमचें नेतृत्व अधिक डोळस, बलवान, कार्यक्षम आणि स्वयंप्रज्ञ अशा द्रष्ट्या आणि समर्थ पुरुषांच्या हातीं असतें तर ज्याला शंभर वर्षें लागलीं तें काम आम्ही पंचवीस वर्षांत संपवूं शकलों असतों. शिवाय तें आमच्या भाषांच्या

आश्रयानें पुरें करून आमच्या समाजाच्या सर्व थरांत पेरून आणि पसरून दिलें असतें, निदान तसा पुष्कळ संभव तरी होता. ही इष्ट गोष्ट कांहीं घडून आली नाहीं. त्यामुळें स्तावक आणि निंदक असे दोन तट किंवा पक्ष आमच्यांत पडले.

स्तावक पक्षानें थोडीशी युक्ति, आणि भरीला पाश्चिमात्य पंडितांचीं अनुकूल मतें पुढें करून आपलें समर्थन केलें; याच्या उलट निंदक पक्षानेंहि थोडीशी युक्ति आणि पाश्चिमात्यांनीं दाखविलेले दोष यांचा पुरस्कार प्रत्यक्षांत घडून आलेल्या आमच्या पराभवाकडे आणि अधोगतीकडे बोटें दाखवून केला. पाश्चिमात्यांचा प्रभाव, भौतिक जय सारखा चढता वाढता राहिला त्यामुळें निंदकपक्षालाच हळूहळू प्रत्यक्षांत यश मिळल्यासारखें दिसूं लागलें. आपल्या घडून आलेल्या पराक्रमाची आणि अपयशाची मीमांसा स्तावकपक्षाला यथार्थपणें कधींहि पटवून देतां आली नाहीं. बोलण्यांत पटविण्यापेक्षां करण्यांत, जगाच्या व्यवहारांत ती कसाला उतरवून दाखविल्यानेंच हें कार्य खरेंखुरें होऊं शकेल.

प्रस्तुत ग्रंथकारानेंहि (प्रस्तावना पृ–३०।३१।३२) या प्रश्नास स्पर्श केला आहे. परंपरा टिकली नाहीं असें आमच्या अधोगतीचें कारण त्यानें दर्शविलें आहे. परंपरा कां टिकवितां आली नाहीं असा प्रश्न केला तर? आमच्या ऋषिमुनींना 'सूक्ष्म' तत्त्वाचें ज्ञान झालें होतें असें ग्रंथकार शेवटच्या. उभयसंस्कृतिमीमांसा प्रकरणांत जरा आवेशानें प्रतिपदितो. ग्रंथकाराचा ईश्वरी साक्षात्कार, योगसामर्थ्य यांवरहि विश्वास आहे. त्यानें पुनर्जन्माचें विवेचन केलेलें नाहीं. पण आमच्या प्राचीन विचार-परंपरेंत 'पुनर्जन्म' कल्पना मान्य केल्याशिवाय विचाराची साखळी नीट बसवितांच येणार नाहीं. 'चातुर्वर्ण्य' हि ग्रंथकाराला मान्य आहे आणि यद्यपि वर्णव्यवस्था, जन्मजात ठेवण्याची कल्पना सोडून द्यावी आणि ती लवचिक करावी अशा अर्थाचें दिग्दर्शन त्यानें केलें आहे, (पृ. ५६) तरी वर्णभेदास निश्चित स्वरूप क्रमानें यावें आणि येईल असाच त्याचा अभिप्राय आहे. ग्रंथकाराला वंशशुद्धिहि मान्य आहे (पृ. ५७) एतावता काय कीं, ही सर्व विचारपरंपरा मान्य केली कीं एकेकाळीं वंशशुद्ध, बीजशुद्ध, सम्यग्विभक्त, योगसंपन्न, सूक्ष्मज्ञानी असलेल्या समाजांत अधोगतीचें विष कोठून आणि कसें शिरलें आणि शेवटीं तें प्रभावी ठरून समाजाचा अधःपात कसा घडून आला याची तर्कसिद्ध आणि सोपपत्तिक मांडणी करून दाखविणें शक्यच होणार नाहीं!! विचाराची गाडी तेथें खचित अडेल, आणि अडली म्हणजे

ज्या मूळ गृहीत तत्त्वांचे आधारें आपण पाया रचला तीं तत्त्वेंहि सदोष, भ्रामक, अपूर्ण अतएव लंगडीं पडतील. असें असलें तरी जर तारतम्याचे हिशेबानें आपण विचार करूं लागलों तर आपणाला आपली बाजू सजविण्यांत पुष्कळ यश आलेलें दिसेल. राधाकृष्णन् यांच्या मांडणींत या तारतम्याचा कांहीं प्रभाव अवश्य दिसून येतो.

पण या महायुद्धानें विचारी लोकांना चांगलेंच भ्रमांत पाडलें आहे. एवढी सुधारणा, एवढी प्रगति आणि एवढा शहाणपणाचा टेंभा जगांत पाजळीत असतां, एकमेकांच्या संहाराची तहान एकमेकांस लागल्यासारखी गत जेव्हां होण्याची पाळी आली तेव्हां या जगबुडव्या आणि प्राणघेण्या सुधारणेला ' सुधारणा ' ' संस्कृति ' ' प्रगति ' इत्यादि शुभसूचक नांवांनीं संबोधणें कितपत प्रशस्त होईल अशी आशंका मनापुढें वारंवार उभी राहूं लागली. या महायुद्धाच्या पूर्वीच्या महायुद्धांत रशिया देशांत एक महान् क्रांति घडून आली. या क्रांतीच्या बुडाशीं एक तत्त्वज्ञान होतें. त्याचा द्रष्टा कार्ल मार्क्स. यानें इ. स. १८४८ त आपला एक जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. सामान्यतः तेव्हांपासून समाजवाद या नांवानें हें तत्त्वज्ञान जगापुढें येऊं लागलें आणि गेल्या पहिल्या महायुद्धांत या नवीन मार्क्सदर्शनानुसार रशियांत जुनी झारशाही अथवा राजशाही लोपून ' समाजशाही ' स्थापन झाली. ही क्रांति केवळ राजकीय नव्हती. तिचें सामाजिक आणि आर्थिक स्वरूप हेंहि अननुभूत आणि प्रचंड होतें. मार्क्स-दर्शन विश्वव्यापी बनण्याची किंवा करण्याचीहि भाषा बोलली जात होती. आणि ह्या महायुद्धानंतरच्या कालच्या महायुद्धापर्यंत मार्क्सदर्शनाचा जगभर कमीअधिक प्रभाव आणि प्रसार झालेला दिसून आला. मार्क्सदर्शनवादी तत्त्वज्ञानांतील ग्राह्य भाग स्वीकारून त्यांतील एकांगीपणावर प्रतिक्रियात्मक टीकाहि पुष्कळ झाली. असें आहे तथापि पाश्चिमात्य जगाचा युद्धपूर्वकालीं आणि आतां विशेषेण युद्धोत्तरकाळीं साधारणतः समाजवादाकडेच झुकता कल आहे हें स्पष्ट आहे. समाजवादी तर कल नव्हे आमच्या बाजूचाच कौल पडत आहे असा विश्वास व्यक्त करीत आहेत ! युद्धकालांत इंग्लंडांतील कित्येक प्रसिद्ध पुरुषांनीं ' अशी माझी श्रद्धा ' म्हणून (आय् बिलीव्ह) जे अभिप्राय मोकळ्या मनानें लिहिले आहेत त्यांतील बहुते-कांनीं समाजवादाचाच पक्ष कमी अधिक श्रद्धेनें स्वीकारल्याचें दिसून येते. ' सायन्स् 'चें संहारक स्वरूप स्वाभाविक नसून सायन्स आणि समाज याच्यांत फार अंतर राहिलें, ही जगाची चूक झाली पण यापुढें मानवता आणि भौतिक प्रगति यांची सांगड घालून आपण भावी जगताचें प्रेयस् आणि श्रेयस् खचित साधूं असा

आत्मविश्वास अनेकांनीं प्रगट केला आहे. यालाच 'सायन्टिफिक् ह्युमॅनिझम्' असें गोड नांव देण्यांत आलेलें आहे. युरोपीय ज्याला ज्ञानयुग म्हणतात त्याच्या उदय-काळीं रुसोचा 'सामाजिक करार' गाजला होता. आतां पुढील पायरी चढून आपण एक 'नवा सामाजिक करार'–'न्यू सोशल कॉन्ट्रॅक्ट'–पुकारूं अशा शब्दांत आपली श्रद्धा कोणेकांनीं प्रगट केली आहे.

अशा आशावादाचे पडसाद आणि मार्क्सदर्शनाचा अनुवाद आणि प्रसार आमच्या इकडे भारतवर्षांत निकरानें आणि उत्साहानें चालू झाला आहे. हा प्रगतिवाद आहे. पुरोगामी तत्त्वज्ञान या नांवानेंहि ही श्रद्धा वावरतांना दिसून येते.

या पुरोगामी–प्रगतिवादाच्याच समकालीन असा गांधीवाद म्हणून एक नवा वाद आणि नवें दर्शन भारतवर्षांत उदयास आलें आहे. सामाजिक पुनर्रचनेची आवश्यकता मार्क्सदर्शन आणि गांधीदर्शन या दोघांनाहि साधारणशी समजतां येईल. गांधीदर्शनांत 'चातुर्वर्ण्य' कल्पनाहि मधून मधून डोकावतांना दिसून येते. 'सर्वोदय' तत्त्वज्ञान या नांवानेंहि हें तत्त्वज्ञान प्रगट होत आहे. हीं दोनच तत्त्व-ज्ञानें किंवा दर्शनें आजच्या भारतवर्षांत अत्यंत प्रभावी होत असल्याचें दिसून येतें. या उभय दर्शनवाद्यांत कमीअधिक प्रतवारीचे उपपक्ष बहुत आढळून येतात. सनातनी–धर्मसुधारक–हिंदुत्ववादी–इस्लामवादी–ख्रिस्तवादी इत्यादि विविध नवीं जुनीं दर्शनें या देशांत आहेत. यांतच आर्यसमाज–ब्राह्मसमाज–अ–हार–बहाई वगैरेंचा समावेश केला असतां चालेल. असा 'मतामतांचा गलबला' सांप्रत चालू आहे आणि त्यांच्या त्यांच्या प्रवर्तकांपैकीं कित्येकांचे आवाज चढत आहेत तर कित्येक कण्हतकुंथत चालल्याचें दृष्टोत्पत्तीस येत आहे.

या कोलाहलांतून संवादी मधुर संगीत निर्माण होण्याची आशा आहे काय? उत्तर श्रद्धेवरच अवलंबून आहे. 'योयच्छ्रद्धः स एव सः हा भगवद्गीतेंतला सिद्धान्त ग्राह्य करणें प्राप्तच होतें. भारतवर्षाचें भविष्य उज्ज्वल होईल आणि जग पुनः नव्या पश्यंभद्र युगाचा अनुभव घेईल ही श्रद्धाच आपल्या भावी प्रयत्नांचा आधार होय. ज्यांचे ठिकाणीं अशी बळकट श्रद्धा नाहीं त्यांना 'समाजजीवन' ग्रंथासारख्या ग्रंथांची उठाठेव काय कामाची?

सर्व जग पुनः विचारांत पडलें आहे. आपल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक बैठकीची तपासणी करण्याची आवश्यकता सर्वांस तीव्रतेनें पटूं लागली

अनुक्रम
विभाग
पुरस्कार
क्रमांक

आहे. या वेळीं भारतवर्षासारख्या प्राचीन संस्कृतिवैभवसंपन्न देशांत जर अशा सर्वंकष परीक्षेची आवश्यकता ग्राह्य केली तर तें गैर ठरणार नाहीं खचित. आणि या कामीं केवळ अनुभववृद्ध आणि ज्ञानवृद्ध पुरुषांनींच लक्ष्य द्यावें असें म्हणून चालणार नाहीं. कारण या मंडळीच्या देखत देखत प्रस्तुतचा प्रलयसदृश संहार जगास भेडसावीत आहे. यास्तव नवीन पिढीनें या विषयाकडे लक्ष्य पुरविणें श्रेयस्कर ठरेल. प्रस्तुत ग्रंथकार अशा नवीन पिढींतील आहे. आणि आपल्या समाजशास्त्री विद्वान् पित्याच्या संगतींत त्याचें लक्ष समाजजीवनासारख्या विषयाकडे लागलें तर नवल नाहीं. संसाराच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवल्यापासून किंबहुना तो दारवंठांत दिसूं लागण्याच्या वेळेपासूनच या गहन विषयाचा विचार करणें सर्व तरुणतरुणींस इष्टच होईल. अकालप्रौढ म्हणून समवयस्कांनीं दुर्लक्षिलें तरी घटकाभर चालेल पण विचाराची वाट आपण निर्भयपणें चाललीच पाहिजे. चि. रमातनय यांचें स्वागत आम्ही तरी निःसंकोचपणें यासाठींच करण्यास प्रवृत्त झालों आहों.

या निमित्तानें संसार, स्त्री–पुरुषविवाह–कुटुंब, शिक्षण, समाजव्यवस्था, नीति, अनीति, उपभोग, संयम इत्यादि प्राप्त विषयांचा विचार केलाच पाहिजे. कांहीं तरी 'यद्वा तद्वा भविष्यति' होऊं नये ही दक्षता सर्व प्रपंच प्रविविक्षूंनीं घेतलीच पाहिजे. आपला ग्रंथ डोक्यांत चाललेल्या काहुराचें फळ होय अशी या तरुण ग्रंथकर्त्याची ग्वाही आहे. ही एकच गोष्ट लाख मोलाची आहे. आपल्या शक्तीप्रमाणें मनन करून सुचलेले विचार लोकांपुढें स्पष्टपणें मांडण्यास धैर्य असावें लागतें. अशा विषयावरील विचार सुस्पष्ट करून सांगणें हें काम सोपें नाहीं. रमातनय यांच्या मांडणींत तळमळ, स्वच्छता, आणि निर्भीडपणा आहे. एक प्रकारची उतावीळहि आहे. तिनें मूळच्या तळमळीला उठावच मिळाला आहे. पोक्त आणि प्रौढ विचार प्रगट करणारीं अनेक वाक्यें हा ग्रंथ वाचतांना आढळतात आणि तीं वाचून कोणीहि सहृदय वाचक ग्रंथकर्त्याची पाठ थोपटल्यावांचून राहणार नाहीं. पण ग्रंथकर्ता किंवा वाचक जर अपेक्षा करील कीं समाजजीवनाचें कोडें या ग्रंथांत उलगडलें गेलें आहे तर तो खचित फसेल. खरें जिवंत पाणी बारमाहीच्या पुरवठ्याचें पाहिजे असेल तर त्याला खोलच खणावें लागतें.

आतां या ग्रंथावर आणि त्यांतील प्रतिपादित मतांवर आपापल्या दृष्टिकोणांतून अनुकूल प्रतिकूल टीका प्रतिटीकांचा वर्षाव झाला तर त्यांत विपरीत कांहीं नाहीं.

झालें तर निर्णयाला त्यानें साहाय्यच होईल. आमच्या या तरुण ग्रंथकारानें आतां हा विषय हातीं घेतलाच आहे तर त्याचेंच चिंतन मनन त्यानें यापुढेंहि चालू ठेवावें, आणि आपल्या परिणत झालेल्या विचारांना मधून मधून वाट काढून द्यावी.

आमची मनांतली हुरहुर मात्र अशी आहे कीं भांवावलेल्या, आणि भेडसावून गेलेल्या, किंवा भडकलेल्या जगाला नव्या सर्वसमन्वयी तत्त्वदर्शनाचा साक्षात्कार भारतवर्षानें घडवावा. विश्वगुरुत्वाचा मान पुनः मिळवावा आणि पुनः एकाद्या मनूनें अभिमानानें 'स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः' असा आमच्याकडे अंगुलिनिर्देश करावा. मात्र हें ध्यानांत धरावें कीं हा साक्षात्कार घडवावयाचा म्हणजे लोखंडाचे चणे खावे लागतील ! न हून, दुसरीकडे विद्युत्-शक्तींचा शोध व्हावा, घरोघर सांजसकाळ त्या शक्तीचा प्रत्यय हरकोणी घ्यावा अशी योजना व्हावी आणि मग आम्ही आमच्या वेदशास्त्रांचे भारे विसकटावे आणि म्हणावें–'अरे, हें तर आमच्या ऋषिमुनींना ठाऊकच होतें' अथवा दुसरीकडे अणुशक्तीचा प्रभाव प्रत्यक्षांत व्यवहृत झालेला दिसावा आणि मग आम्ही थरारून जाऊन आमच्या षड्दर्शनांकडे वळून त्यांत त्याच तत्त्वांचें प्रतिबिंब पाहावें आणि आनंदानें किंवा उपहासानें हंसावें ! असें मात्र होऊं नये !! व्हावें तें याच्या उलट असें कीं येथें आम्हीं कांहीं नवीन निर्मिति अशी करून, आचरून, दाखवावी कीं जिच्या प्रभावानें अखिल जगत् प्रकाशमान्, सुखी आणि आनंदी झालेलें दिसेल. आणि अन्नमय कोशापासून तों आनंदमयकोशापर्यंत शब्दांनीं नव्हे, कल्पनेनें नव्हे, प्रत्यक्ष व्यवहारानें पोचलेलें दिसेल !

श्रीक्षेत्र चिदंबरम् अन्नामलाईनगर<br>मार्ग. वद्य १०।१८६७<br>२९।१२।४५

दत्तो वामन पोतदार

# ग्रंथसंक्षेप

**प्रस्तावना** २१
समाजांतील उद्वेगजनक परिस्थिति–
वैयक्तिक अनुभवांना व्यक्तता–
समाजाच्या मनोवृत्तींचा ठाव–
सामाजिक योजनांची अयशस्विता–
योजनेपेक्षां मन शुद्ध पाहिजे–
समाज आणि नीतितत्त्वें–
वैयक्तिक नीतिशिक्षण–
सामाजिक नीतिशिक्षण–
सौम्य नीतिनियम–
दृश्य जीवनाची दिशा बदलणारें अदृश्य ध्येय–
ध्येयाची सापेक्ष अगम्यता व सुलभता–
समाज म्हणजे मानवांचें क्रीडांगण–
शास्त्रोक्त आणि प्रतिक्रियात्मक समाज–रचना–
शास्त्रोक्त समाजरचना असलेल्या हिंदू समाजाच्या अधोगतीचें कारण -
प्रस्तुत ग्रंथासंबंधीं थोडें प्रास्ताविक–
ग्रंथाचा उद्देश–
तात्त्विक स्वरूप–
ग्रंथाचा मानसशास्त्रीय दृष्ट्या दृष्टिकोन –
**उपोद्घात** ३५
शिशुमनाची वाढ--
मनुष्य आणि इतर प्राणी यांमधील भेद-
प्रेमापोटीं धडपड–
ऐहिक सुख–
अप्राप्य सुखाच्या मागें–
सुखाची कल्पना–
परार्थी सुख–
समष्टि जीवन–
तत्त्वज्ञानाचा जन्म–
तत्त्वज्ञानाचा हेतु–
बुद्धि आणि भावना–
बुद्धीला वळण–
श्रद्धा कां हवी ?–
श्रद्धा हें हुकमी हत्यार आहे–
उच्च जीवितकार्य–
विश्वबंधुत्वाकडे–
**१ वर्णव्यवस्था**
**वर्णव्यवस्थेची पार्श्वभूमि** ४५
समाज आणि व्यक्ति–
समाज विस्कळित कां होतो ?–
खरी प्रगति कोणती–
समाजाचे अधारस्तंभ–
एका वर्णाचें वर्चस्व अनिष्ट कां ?–
हिंदुसमाजांतील वर्णव्यवस्था–
वर्णभेद–
वैश्यवृत्तीचें वर्चस्व–
**समाजांतील वर्णव्यवस्था** ५१
आधुनिक वर्णव्यवस्था–
वैश्यवर्ण–
विद्यालयांतून निवड–
ब्राह्मण–
सेना आणि शेती–
ब्राह्मण, वैश्य यांना शेती नको–
शूद्रवर्ण–
वर्ण जन्मानें नव्हे, कर्मानें–
वर्णाचें विशिष्टीकरण–
जातिभेद नैसर्गिक आहे–
**२ कुटुंब** ५७
भावनांचें नियमन–
विषयवासनेचें उदात्तीकरण–
कुटुंबाच्या पसंतीची वधू–
सावत्रपणा–
सावत्रपणाचा वणवा–

चोरून सावत्रपणा—
याची प्रतिक्रिया—
कुटुंबांत ठेवनाव—
एकत्र कुटुंबपद्धति कां हवी—
दोषांचें निराकरण—
मुलांचें संगोपन कुटुंबांतच—
कुटुंब संघटन—संस्था—
**३ स्त्री** ७०
**प्रचलित स्त्रीस्वातंत्र्याची मीमांसा**
हक्क आणि कर्तव्य—
सुसंस्कृत पाश्चिमात्यांचीं असंस्कृत लक्षणें—
हक्क—
हक्कासाठीं झगडावें लागलें नाहीं—
भिन्न मनोरचना—
समान हक्कांच्या भांडणांचा उगम—
श्रमविभाग—
व्यक्तिस्वातंत्र्याचा लढा—
"आर्थिक स्वातंत्र्या" वर एक उपाय—
आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनेचें मूळ—
स्वैरपणाचें स्वातंत्र्य—
याला कारण आजचें शिक्षण—
**कुटुंबांतील स्त्री** ७७
स्त्रीचें कार्यक्षेत्र—
स्त्रीच्या स्वतंत्र कार्यक्षेत्राचें महत्त्व—
स्त्रीच्या घातकी आर्थिक स्वातंत्र्यावर आधारलेली कुटुंबव्यवस्था—
कुटुंब नव्हे नोकरसंघ—
पति व पत्नी यांचे संबंध—
विवाहसंस्थेचा जन्म आणि मान—
पत्नी आणि कुटुंब—
'पायांतील वहाण पायांतच !' —
अस्तनींतले निखारे ! —
पत्नीचें कर्तव्य—
मातेची जबाबदारी—
मुलांचें मानससंगोपन—
मुलांचा काळ नीच कुटुंबें—
स्त्रिया आणि मानसशास्त्र—
गरोदरपणांतील दैनंदिनी—
प्रसूतीनंतर दैनंदिनी—
मातेचीं मुलीसंबंधीं कर्तव्यें—
गृहशिक्षण—
अपवाद पहिला, योगिनी स्त्रिया—
दुसरा अपवाद—
दोन प्रेमळ अंतःकरणांतील प्रेममय देवघेव—
प्रौढ कुमारिकांचा प्रश्न—
कुमारिका प्रौढ कां राहूं लागल्या ?—
संसर्गजन्य वृत्ति—
समाजावर घडणारे अनिष्ट परिणाम—
रक्षा—
प्रौढ कुमारिकांचा प्रश्न कसा सुटेल ?—
प्रौढ कुमारिकांच्या अधोगतीला जबाबदार कोण ?—
पश्चात्तप्त पतिव्रता—
नीच स्त्रियांचें मनोविश्लेषण—
एक उपाय—
पांढरपेशा वर्गांतील प्रौढ कुमारिका—
**कुमारी माता आणि त्यांची संतति** ९९
कुमारी मातांची प्राथमिक मनःस्थिति—
मातृपद स्वीकारण्याचें आणखी एक कारण-
तिसरा प्रकार—
पाप्याचें सज्जनांत रूपांतर—
**अशुद्ध संततीचा प्रश्न** १०२

पापोत्पन्न प्रजा –
कुलीनतेचें श्रेय कुणास ?–
पापोत्पन्न संततीचा स्वीकार–
ह्यांचा निराळा वर्ग नको–
समाजबाह्याकरितां सौम्य नीति–
समाजबाह्य वर्ग ही एक शक्ति आहे–
सज्जनांचें पाप्यांत रूपांतर–
दुर्वर्तनाची योग्य जाणीव दिली पाहिजे–
समाजांतील मिठाचे खडे विरघळून गेले पाहिजेत–
**विधवा** १०८
पुनर्विवाह–
सपुत्र विधवा–
विधुरांचें कर्तव्य–
व्रताचरणी स्त्रिया–
विधुर आणि विधवा, भिन्न मनोरचना–
विधवांचें कौटुंबिक कार्य–
सामाजिक कार्य–
**वारसाहक्क** ११३
वारसाहक्काचा कायदा–
परागतीचें लक्षण–
पोटगीचा कायदा–
अंतस्थ शत्रुत्वाचें बीज-
**वेश्या आणि वेश्यावृत्ति** ११४
तत्त्वज्ञानाचा जन्म–
निसर्गनिष्ठ भावना व तत्त्वनिष्ठ भावना–
निसर्गनिष्ठ भावना व नीति–
नीति–अनीतीच्या सीमा–
वेश्यावृत्तीची अनावरता–
विवाहसंस्था, विषयवासनेस मान्यता–
संयमन–
अविवाहितांचा प्रश्न–
विधुर–
वेश्यागमनाची सवलत–
वेश्येचें समाजांत स्थान–
वेश्यावृत्तीचें संयमन–
एक प्रयोग–
वेश्याव्यवसायाची कुचंबणा–
वेश्यागृहांची व्यवस्था–
**४ पुरुष** १२४
तीन अवस्था–
पुरुषमहति–
मुलांचें शिक्षण–
कर्तव्यक्षेत्रें–
गृहस्थाश्रमी–
वानप्रस्थाश्रम–
वानप्रस्थाश्रमांतील अडचणीं–
विधुरांची अडचण–
**५ शिक्षण**
**विद्यालय** १३२
विद्यालय कसें नको अर्थात् कसें आहे–
विद्याखात्याची शासनपद्धति–
विद्यालयांतील शिशूंचा आश्रम–
आश्रमांतील गुरु–
आश्रमांतील शिशु–
भावी अभ्यासाची पार्श्वभूमि--
तरुण विद्यागृह–
वसतिगृह–
व्यायामगृह–
योगासनें–
शारिरिक बरोबर मानसिक व्यायामाची आवश्यकता–
संरक्षण शिक्षण–
संरक्षक शिक्षण सांघिक हवें–
वरील शिक्षणांत लष्करी स्वयंसेवकी सेना--
स्वयंसेनेंतून नागरिक–

विद्यागृहांतील दिनचर्या–

**शिक्षणाची मानसिक पार्श्वभूमि १४२**

मुलांचें मन कोरें कीं भरलेलें ?–
उपजत प्रवृत्ति नैतिक कीं अनैतिक ?–
स्वार्थाकरितां धडपड–
पापाचें कारण प्रतिकूल परिस्थिति–
प्रतिकूल परिस्थितीचें मानसिक निराकरण शिक्षण–
बालांचें मानसशास्त्र व शिक्षण–
दुर्वर्तनाची मीमांसा–
लोकमतानें म्हटलेले सारेच लोक दुर्वर्तनी नसतात–
' दुर्वर्तन्यां ' चा वर्तनपालट–
दुर्वर्तन कीं दुर्वृत्ति ?–
दुर्वर्तन वर्तनांत नाहीं वृत्तींत आहे–
दुर्वर्तनास कुसंगति हें एक कारण–
दुसरें कारण जातिवन्त दुर्वृत्ति–
आदराचें उदात्तीकरण–
मूळ वृत्तीला वळण–
भिन्न स्वभावबीजें व त्यांवर होणारे संस्कार–
शिक्षणाचें मूळ–
बुद्धीला संस्कारांची आवश्यकता–
त्रिगुणात्मक बुद्धीचें मापन–
स्मरणशक्ति–
धारणाशक्ति–
कल्पना–
बुद्धि आणि तिचें कार्यक्षेत्र–
बुद्धिमत्तेचें मापन–
लहान मुलांच्या बुद्धिमत्तेचीं भिन्न कार्यक्षेत्रें–
आईबापांचें कर्तव्य–

**शिकविण्याचें शास्त्र १६०**

शिक्षकाचें कौशल्य–
शिक्षकाचें शिक्षण देण्याचे प्रकार आणि त्याचें कर्तव्य–
कठीण प्रश्न कसा शिकवावा–
सांस्कारिक शिक्षण–
शिक्षणाची अनुकरणपद्धति–
अनुकरण म्हणजे काय ?–
तामसीपणानें मन बदलतां येणार नाहीं–
स्वतःविषयींचा आदर निर्माण करणें–
अनुकरणपद्धतीचा पहिला धडा–
आदर मूर्तीचें रूपांतर–
दोन पद्धतीचें अनुकरण–
अनुकरणपद्धतीचें एक सूत्र–
शिक्षण बौद्धिक आणि मानसिक–
तात्त्विक व औद्योगिक शिक्षण–
शिशुविद्यालयांतून तरुण विद्यालयांत–
विद्यार्थ्यांच्या मनाचा कल–
सामान्य ज्ञान–
विद्येसाठीं विद्या–
राजसभेंत विद्वानांची योग्य संभावना–
सर्व शास्त्रांचा संशोधक अभ्यास–

**कांहीं विषयांचा अभ्यास १७३**

इतिहासाची पुनर्रचना–
जगाच्या इतिहासांत भारताचें स्थान–
इतिहासाच्या अभ्यासाची दिशा–
भाषाविषय-निबंधलेखन–
निबंधलेखनांतील पहिली अडचण–
विचारस्पष्टीकरणार्थ–
विद्यार्थ्यांची पारख–
चर्चात्मक–
निबंधलेखनाची पुढली पायरी–
लघुकथेचा अभ्यास–

प्रात्यक्षिक शिक्षण–
कलांचें शिक्षण–
**परीक्षा** १८१
परीक्षांचें स्वरूप–
परीक्षेंत सद्वर्तनास स्थान–
परीक्षा कर्मधर्मसंयोग होऊं नये–
परीक्षेचा विषय विद्यार्थ्यानें ठरवावा–
परीक्षेला यांत्रिक स्वरूप येऊं नये–
लेखी व तोंडी परीक्षा–
प्रात्यक्षिकांची परीक्षा–
परीक्षेंत वैयक्तिक लक्ष द्यावयास हवें–
**विद्यार्थी ते विद्यापति** १८३
विद्यालयाची घटना–
गुरुकुलाचा परस्परांशीं संबंध–
गुरुदक्षिणा–
विद्यार्थ्याचें शिक्षण–
गुरूची योग्यता–
गुरूचें कार्य, विद्येचें सातत्य टिकविणें–
शिक्षकास मानसशास्त्र अवगत पाहिजे–
शंकाकुल विद्यार्थी -
गुरूचे गुण–
गुरूंना शिकविणारें गुरुविद्यालय–
गुरूचा चरितार्थ
**स्त्रीशिक्षण** १९२
भिन्न शिक्षण कां हवें ?–
मुलामुलींच्या शीलाला जबाबदार शिक्षणदाते–
महिला विद्यालय–
लहान मुलींचें शिक्षण–
स्त्रियांच्या गुणांचा उपयोग–
प्रगतिरूप फायदा न मिळाल्याचा तोटा–
स्त्रियांना शास्त्रीय दृष्टि पाहिजे–
स्त्रियांची मौलिकता वाढली पाहिजे–
स्त्रियांनीं करावयाचा अभ्यास–
सौंदर्यलालसा आणि नटण्याची हौस–
सौंदर्याविषयीं उदासीनता–
सौंदर्य सात्त्विकतेंत आहे–
सौंदर्याची सगति आणि पार्श्वभूमि–
मनुष्याचें रूपसौंदर्य–
गोड स्वभावामुळें दिसणारें गोड रूप–
सौंदर्याची विपरीत कल्पना–
सौंदर्यदृष्टि श्रीमंतीवर अवलंबून नाहीं–
सौंदर्याचें जीवनांत स्थान–
रानटी अवस्थेंतून मनुष्य सुधारत कां गेला ?–
अनावश्यकतेंत संस्कृतीचा उगम–
सौंदर्यादि कलांचें महत्त्व–
स्त्रियांना व्यायामाचें शिक्षण–
सांघिक शिक्षण–

## ६ उद्योगधंदा व व्यापार

**व्यापाराचें जागतिक स्वरूप** २०८
"परस्पर मोबदल्यां" तून धनाच्या कल्पनेचा उगम–
धंद्याचें वाढतें स्वरूप–
जगावर व्यापारी वर्चस्व–
व्यापारी वामनाची त्रिपदी–
वाढत्या व्यापाराचे वाढते अनिष्ट परिणाम–
स्वैर व्यापाराचा जागतिक प्रश्न–
"जागतिक घटनेची" शक्याशक्यता–
फार मोठ्या संक्रमणावस्थेंत अस्वास्थ आहे–
घटनेचा आर्थिक पाया सदोष आहे–
संघटनेंत समशीलाचा अभाव–
मालक-मजुरांचा आगंतुक प्रश्न–
'जागतिक' आणि भारतीय प्रश्न–
जागतिक व्यापारवुद्धीनें जागतिक ऐक्य असाध्य आहे–
**ऐतिहासिकांना आर्थिक कारण** २१८

जीवनांत 'आर्थिक कारणां'चा अट्टाहास–
'धनोत्पादना' ची प्रचलित सदोष व्याख्या–
पैशाहून इतर अनेक गोष्टींची मनुष्याला उणीव भासते–
मनुष्य केवळ द्रव्याकरितां त्याग करीत नाहीं–
दोन्ही स्वार्थच पण भूमिका भिन्न–
धनपूर्व युगांत धनोत्पादन शक्य नाहीं–
'अर्थ' च नव्हता तर 'आर्थिक कारण कोठून !–
आथिक घटनांचें युग–

**व्यापाराचा अनिष्ट परिणाम २२३**

अतिस्वार्थांतून स्पर्धा, स्पर्धेतून विषमता
स्पर्धेतून हीन व अपायकारक उत्पादन–
जाहिरातीचा फाजील फैलाव–
खाजगी जीवनांत जाहिरातबाजीचा अनिष्ट परिणाम–
जाहिरातबाजीचें उदात्तीकरण–
विसाव्या शतकाचा एक विशेष, जाहिरातबाजी–
पोकळ कार्यपद्धतीचा सशास्त्र अभ्यास–
फाजील धनोत्पादनवृत्तींतून शिथिल नीति–
आर्थिक वर्चस्वाची कमाल–

**समाजाची मनोवृत्ति २३१**

नैसर्गिक "जड" वृत्ति–
धन नैसर्गिक 'जड' वृत्तीला कारणीभूत नाहीं पण साधनीभूत आहे–
अध्यात्मवृत्तीचा सहजगत्या लोप–
समाजाविषयींच्या घटकभावनेचा लोप घातक आहे–
वैयक्तिक हित आणि सामाजिक हित–
अध्यात्माची शिकवण परलोकतत्परतेहून परहिततत्पर अधिक आहे–
वाढतें शास्त्रोक्त धनोत्पादन-वाढती विषमता–
समाजाची आर्थिक आधारणी घातक होईल–
अर्थशास्त्राचें कार्यक्षेत्र–
अर्थशास्त्राचा ठसका समाजास लागेल–
अर्थशास्त्राची मर्यादा–

**विवेचनाचा निष्कर्ष २३८**

अर्थशास्त्राची लंगडी बाजू–
वैयक्तिक तत्त्व आणि सामाजिक तत्त्व–
धनोत्पादनाचें वैयक्तिक आणि सामाजिक स्वरूप–
धनोत्पादनाचा हव्यास आणि तदुत्पन्न अनिष्ट परिणाम–
व्यापार म्हणजे श्रमाचा योग्य मोबदला–
व्यापाराचा उदात्त उद्देश–मानवता–

**७ मनोरंजनाचीं कांहीं साधनें**

**मनोरंजनाची पार्श्वभूमि २४५**

आनंद भेदः 'बरें वाटणें' व 'आल्हाद होणें'–
मनोभावनांचा आविष्कार–
जीवनाच्या प्रतिबिंबांतून सादर्योत्पत्ति–
भावना व्यक्त करण्यास मनुष्य लाजतो–
अतृप्त भावनांचें पूर्णाविष्कृत स्वरूप–

**जीवनप्रतिबिंबांत मनोरंजन आहे २४९**

कलेंत जीवनांश प्रतीत झाला पाहिजे–
आनंद अनुभवांतल्यापेक्षां त्याच्या प्रतिबिंबांत आहे–
सौंदर्यांतून सर्व जीवन–दर्शन–
सुंदरतेच्या रूपांत जीवनाचा वाटाड्या–

**मनोरंजनाचीं कांहीं साधनें** २५३
नाट्यगंगेचा बहुरूपी उगम–
नाट्योत्पत्तीची मानसशास्त्रीय मीमांसा–
नाट्याचा वास्तवतेकडे कल–
नाटककाराचें दुटप्पी धोरण–
वर्णनापेक्षां त्याची पार्श्वभूमि व त्याचा शोक याला महत्त्व आहे–
नाटककाराचा हेतु स्पष्ट पाहिजे–
प्रेक्षकांवर नायकाचा परिणाम विशेष होतो–
वास्तववाद व ध्येयवाद यांचें चित्रीकरण-
नाटककार समाजाचा द्रष्टा पाहिजे–
रुचिहीन बहुजन समाज–
मनोरंजनांतून जीवनाला दिशा–
नाटककाराची अभिरुचि प्रेक्षकावलंबी नको–
समाजाचा धूर्त धनुर्धारी–
नाटककाराचे गुण–
गंगाजल पोंचविणारा समाजाचा पंड्या–
नटांचें समाजांत स्थान–
अभिनयासाठीं अभ्यासांची आवश्यकता–
अभिनयाचीं अंगें–
पौराणिक नाटकांत भावनोत्कटता हवी–
भूमिकेशीं समरसता–
नटाचें चारित्र्य–
नाट्यसंस्थेंतील दुराचार–
स्त्रिया आणि कला–
स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीं करणें–
तत्त्व आणि व्यवहार–
नाट्यकलेचा अधःपात कां होतो ?–
यावर उपाय–
**बोलपट** २७१
बोलपटांची छाप कां ?–
दिग्दर्शकाच्या हातांतील नटनटींचीं बाहुलीं–
**वाङ्मय** २७४
दोन मतें–
वाङ्मयाचा आरंभ–
वाङ्मयाची प्रगति–
वाङ्मयाचें समाजावरील वाढतें वर्चस्व–
वाङ्मय व समाज यांचा परस्पर संबंध–
आत्मचरित्रें–
चरित्रांतील मानसशास्त्र–

## ८ नीति

**समाजाची नैतिक पार्श्वभूमि** २८०
समाजाची प्रगति आणि समाजाचें स्वास्थ्य यांत भेद कां ?–
समाज नियंत्रणाची सदोष पद्धति–
कायदा आणि नीति–
**नीतीची तात्त्विक पार्श्वभूमि** २८२
कात्रींत सांपडलेलें मनुष्यजीवन–
नवीन नीति–
परिसीमांचें पुनरावलोकन–
व्यसन आणि व्यसनी–
सात्त्विक संग्राम–
समन्वयाची आवश्यकता–
नीतीचा उगम–
कायदा आणि नीति–
दारिद्र्यांतून अनीति कीं अनीतींतून दारिद्र्य–
हिंदुस्थान आणि युरप–
दरिद्री आणि श्रीमंत–
दारिद्र्याची व्यसनाधीन मनोवृत्ति–
**प्रचलित नीतिकल्पना** २९२
नीति विरुद्ध अनीति–
नीति आणि नैतिक आचार–
सामान्य नीतितत्त्वें आणि व्यावहारिक अडचणी–

आचारांचें आगंतुक पावित्र्य आणि विशुद्ध नीति–
आचारांचें सापेक्षत्व—
**समाजाचें नीतिशास्त्र** २९८
नीतीचें पृथक्करण–
आत्मिक नीति–
आत्मिक नीतीची आवश्यकता —
आत्मिक नीतीची भूमिका–
आत्मिक नीतीचें स्वरूप–
विजय आत्मिक कीं भौतिक–
आत्मिक सामर्थ्य–
आत्मिक नीति आणि औपचारिक शिष्टाचार–
स्वयंस्फूर्त सात्त्विक भावना–
भावनाशील मन विरुद्ध सदसद्विवेकबुद्धि–
मनोविकारांचें उदात्तीकरण—
**९ पाश्चात्यप्रगति आणि भारतीय संस्कृति** ३०७
**फळी फुटलेलें शूर सैन्य आणि सरांतील मणि फोडणारा बलवान मारुति**
मानवी प्रयत्नास निश्चित ध्येय नाहीं–
ध्येयहीन प्रयत्न निरर्थक आहे–
प्रयत्न केवळ औत्सुक्योद्भव आहे–
वस्तुजातांतील सार अजून कळलें नाहीं–
**प्रगति, प्रयत्न आणि बदल** ३१०
प्रगति म्हणजे काय ?–
दोन मानवीं ध्येयें–
प्रगति नव्हे, बदल–
मनुष्य आणि मनुष्येतर–
मानवाकडे जाणारें श्रेय–
प्रगतीची दिशाभूल–
प्रगति कां नाहीं ?–
**आधुनिक पाश्चात्य भौतिक शास्त्रांच्या प्रगतीला मागें खेंचणारें प्राचीन भारतीय योगशास्त्र** ३१५
बालरूप पाश्चात्य संस्कृति–
दोन उंच शिखरें–
योगशास्त्राचा पाया मानसिक शक्ति आहे–
मानसिक शक्तीचा अभ्यास–
मनःशक्तीचा अनुभव–
सूक्ष्मज्ञानाचें साधन प्राणायाम–
अध्यात्म व आधिभौतिक शास्त्रांचा शेवटीं सिद्धान्त एकच–
**प्राणशक्ति** ३२०
नियमित श्वासोच्छ्वासानें शरीरांत विद्युतप्रवाह–
जागृत कुंडलिनी–
योग्याचें कार्यक्षेत्र आणि सामान्य जनतेचें ध्येय—
**पाश्चात्यांच्या शास्त्रीय प्रगतींत समाजाचें अस्वास्थ्य तर भारतीयांच्या विद्येंत समाजस्वास्थ्य** ३२१
विद्येंत वाढ झाली पण समाजांतील अस्वास्थ्य कायम आहे–
प्राचीन भारतीय विद्या–
विद्येंत आम्ही मागें नाहीं, आमचा तत्त्वशोधनाचा मार्ग भिन्न आहे–
**उपसंहार** ३२८
**निष्कर्ष** ३३१

# प्रस्तावना

सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोंपेपर्यंत घरादारांत, शाळा–कॉलेजांत, रस्त्यावर वा अन्यत्र लहानमोठ्यांशीं, चांगल्यावाईटांशीं, शत्रुमित्रांशीं व तिऱ्हाईतांशीं लहान वा मोठे व्यवहार करतांना जे बरेवाईट अनुभव आले त्यांतील बरेचसे मनःपटलावरून पार पुसूनहि गेले. पण ते आणि जे चिरंतन स्वरूपांत हृदयांत कोरले गेले त्या सर्वांमुळें डोक्यांत अनंत विचार आले त्यांतूनच प्रस्तुत ग्रंथाचा उगम झाला.

## समाजांतील उद्वेगजनक परिस्थिति–

आपल्या भोंवतालीं कोठेंहि जरा नजर फिरविली तरी कोणाहि सूज्ञ मनुष्याच्या डोक्यांत विचारांना कांहींतरी चालना मिळाल्याशिवाय राहणार नाहीं अशीच एकंदर परिस्थिति आहे. आजच्या कुटुंबांची अवस्था समजून घेण्यासाठीं कोणालाहि दूरवर जाण्याची आवश्यकता भासणार नाहीं. प्रत्येकाला ती स्वतःच अनुभवास येत असते. फक्त डोळे उघडे ठेवावे लागतात एवढेंच. नवपरिचित वा चिरपरिचित मित्रांशीं, औपचारिक परिचितांशीं वा अगदीं परक्यांशीं वागतांना समाजांतील व्यक्तीव्यक्तींच्या मनाची घडण सहज आकलन होण्यासारखी आहे. शाळाकॉलेजां-तून शिकत असतां समाजाचा शैक्षणिक पैलू–तरुण–तरुणींची–प्रवृत्ति, सुशिक्षित प्रौढ

कुमारिकांची अवस्था, शिक्षकांची आर्थिक, शैक्षणिक आणि आत्मिक दैन्यावस्था आणि एकंदर विद्याखात्याचीच शैक्षणिक उदासीनता आणि आर्थिक उत्साह, इ. गोष्टी डोळ्यांत भरल्याशिवाय राहिल्या नाहींत. निरनिराळीं पुस्तकें, व वर्तमानपत्रें चाळीत असतां वाङ्मयाची व वाङ्मयीनांची वक्रगति चमत्कारिक वाटूं लागली. वस्तुतः संमाननीय अशा विद्वानांची व सज्जनांची वाईट स्थिति आणि नादान व्यक्तींचा वरचष्मा असलेला पाहण्याचा प्रसंग आला तेव्हां समाजाच्या हीनतेचा साक्षात्कार झाल्याचा भास झाला. कांहीं व्यापारी लोकांशीं संबंध आला असतां आणि निरनिराळ्या कारखान्यांचे उगम व चढउतार पाहात असतां, कर्मधर्मसंयोगानें कांहीं संस्थांची 'अंदर की बात' कळली आणि तदन्तर्गत व्यक्तींचे तद्विषयक व्यवहार लांबून पाहावयास मिळाले तेव्हां बहुतेक भारतीय उद्योगधंदे मत्सरांतून उगम पावले, स्वार्थांतून विकास पावले, तसेच मत्सरांतच विरून गेलें. पुन्हा त्यांतूनच नवीन कारखान्यांची उत्पत्ति झाली असेल असें वाटूं लागलें. नाटक–चित्रपट संस्थांच्या बाबतींतहि हेंच म्हणावें लागेल. नाट्य–पटोपासकांशीं परिचय होऊन रंगभूमीच्या सुवर्ण–रुपेरी पडद्यामागील बेगडी–कथली वातावरण पाहावयास मिळालें आणि या संस्था उदयास येऊन टिकल्या कां नाहींत आणि नवीन पाहिजे तशा निर्माण कां होऊं शकल्या नाहींत याचें कारण समजून आलें. प्रसंगोपात्त पाहण्यांत आलेली अबला स्त्रियांची कींव उत्पन्न करणारी कुचंवणा आणि पोरके नसून अनाथ झालेल्या मुलांची अनवस्था जशी हृदयांत कालवाकालव करी तशी स्वयंभूच वा प्रतिकूल अनुभवांची प्रतिक्रिया म्हणून व्यक्तींचा उद्दामपणा पाहून त्या उद्दामपणाबद्दल संताप येण्याचे आधीं त्या व्यक्तींच्या मानसशास्त्राच्या विचारचक्रानें डोकें अशांत होई. उदात्त तत्त्वांच्या नांवाखालीं नीच, स्वार्थी मनाचे चोज पुरविणाऱ्या लोकांच्या गोष्टी ऐकून व पाहून मन विटून गेलें.

वैयक्तिक अनुभवांना व्यापकता–

ह्या सर्व गोष्टी कानानें वा डोळ्यानें अनुभवीत असतां डोक्यांत अनंत विचारांचा गोंधळ होई, पेलवेल इतका तात्त्विक विचार होई, आणि थोड्याफार वाचनानें मनांतील विचारांना व्यापकता येई. परंतु हें सर्व लोकांपुढें मांडावें कसें हें कळेना. प्रत्येक अनुमानावर लघुकथा–कादंबरी लिहावी तर तशी शैली नाहीं. त्रोटक निबंध लिहून ते मासिकांतून द्यावेत तर कोणी छापणार नाहीं. लोकांशीं प्रत्यक्ष बोलावें तर

कोणी ऐकून घेण्यास तयार नाहीं. एखादाच असा निघाला तर त्याला पटवून देण्याइतकें वादपटुत्व नाहीं. त्यापेक्षां झाकलेली मूठ सव्वालाखाची ठेवावी हेंच बरें. स्वतःला वाटतें त्याप्रमाणें आचरणांत आणून पहावें तर तें अयशस्वी होणार हें निश्चितच.

समाजाच्या मनोवृत्तींचा ठाव–

जसजशी ही कुचंबणा वाढत चालली तसतसा विचारचक्राचा वेग जास्तच वाढूं लागला. शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं वरून भिन्न भिन्न दिसणाऱ्या ह्या नानाप्रकारच्या घटनांचें एक कोठें तरी मूळ असावें असा संशय उत्पन्न झाला. कुचंबणावस्थतेंच पुन्हां पुन्हां त्याच गोष्टींवर विचारांचे थरावर थर बसले आणि तेच तेच अनुभव पुढेंहि मिळत गेल्यानें पूर्वींचा संशय दृढावत गेला. समाजांतील कोणतेंहि क्षेत्र घ्या तेथें एकच मनोवृत्ति दिसून येते. कोणतीहि व्यक्ति घ्या तिच्याठायीं समाजांत अनेक क्षेत्रांत दिसून येणारी वृत्ति प्रसंगोपात वास करूं लागते. आणि कोणतीहि समाजांतील योजना तात्त्विक दृष्ट्या उत्तमांत उत्तम म्हणून जरी घेतली तरी शेवटीं प्रत्यक्षांत अवतीर्ण झाल्यावर एकाच प्रकारचा म्हणजे वाईटच अनुभव येतो. यावरून कारणमीमांसा लावतां प्रत्येक व्यक्तीच्या मनाची घडणच कच्च्या मातीनें घडविली जात आहे याविषयीं मन निश्चित होतें. मूळांतच मनोवृत्ति बिघडलेली. समाजाची घडण–जडण मूळांतच किडलेली. समाजरचनेचा पायाच चुकीच्या कल्पनांवर उभारलेला. त्याला बाह्यात्कारी मलमपट्टीनें कांहीं होणार नाहीं ही खात्री झाली.

सामाजिक योजनांची अयशस्विता–

मनुष्याच्या मनांतच कांहीं बिघाड असेल तर तेथें कोणाची मात्रा चालत नाहीं. समाजाच्या पुनर्घटनेचा विचार करितांना, सुधारणेचें कार्य हातीं घेतांना सुधारणेच्या घटनेच्या योजना कितीहि तर्कशुद्ध, व्यवहार्य, हितकारक आणि तात्त्विकदृष्ट्या उच्च प्रतीच्या असल्या तरी त्या योजनांचा अंमल मुख्यतः दोन गोष्टींवर अवलंबून आहे. एक म्हणजे ती प्रत्यक्ष योजना आणि तितक्याच महत्त्वाची दुसरी म्हणजे ती योजना ज्या व्यक्तींकरितां आंखली त्या व्यक्तींची मनोवृत्ति. योजना अंमलांत आणणाऱ्या व्यक्तीचें मन कार्याला अनुकूल नसलें–बाध आणणारें असलें तर ती योजना पूर्णपणें विफल झाली पाहिजेच. आजपर्यंत भारतीय राष्ट्रकारणांत, वा

समाजसुधारणेंत पुष्कळच योजना आंखल्या गेल्या. प्रत्यक्ष कार्यालाहि सुरवात झाली. पण अखेर त्या विफलच ठरल्या ! योजना अयशस्वी झाल्या याचा दोष प्रत्यक्ष योजनेंत तितकासा नसून त्या योजनेच्या कार्यकर्त्यांत आहे. भारतीयांचीं मनें तयार करावयास पाहिजे आहेत. योजना केव्हांहि तयार करतां येईल. मन तयार झाल्यावर योजनेला अवकाश नाहीं. याउलट योजना तयार असली, ती अंमलांत आली तर मनुष्याच्या कीर्तिलोलुप स्वभावामुळें योजनेची आरास उत्तम होईल यांत शंका नाहीं. जाहिरात होईल म्हणजे प्रसिद्धि पावेल, कागदपत्रांवर मोठी घटना मांडली जाईल; परंतु प्रत्यक्ष भरीव कार्य बाजूलाच राहील. बरेच संधिसाधू वाहत्या गंगेंत हात धुवून घेतील. हाच क्रम सर्वत्र चालू आहे.

योजनेपेक्षां मन शुद्ध पाहिजे–

याचें प्रत्यंतर आज आपणांस राष्ट्रकारणांत आणि समाजकारणांत दिसून येत आहे. जागतिक व्यवहारहि हेंच अनुभवीत आहे. समाजशासन हें योजनेपेक्षां योजकावर जास्त अवलंबून असतें. शासनयंत्रावर एकादें मर्कट आणून ठेवल्यास तें यंत्र कितीहि कार्यक्षम असलें तरी तें निरुपयोगीच होणार. उलट यंत्रकार सूज्ञ असेल, मन व बुद्धि जागृत असेल तर यंत्रांत असलेल्या उणीवा आपल्या बुद्धिवैभवानें तो भरून काढील. गंजलेल्या यंत्रास कार्यक्षम करील. मदार आहे ती मानवी इच्छाधिष्ठित बुद्धिमत्तेवर आहे. यंत्राच्या उत्तम पण निर्जीव घडणेवर नाहीं. हें लक्षांत घेऊनच प्रस्तुत ग्रंथाचा रोख समाजघटकाच्या मनोभूमिकेवर प्रथम आहे. गढुळलेल्या मनोजलानें प्रसंगीं कार्यतृष्णा शांत होत असली तरी ती अंतीं अपायकारकच ठरणार. यासाठीं समाजघटकाची मनोमूर्ति अगदीं बालपणापासूनच संस्कारांनीं घडवून आणली पाहिजे. अशी जी पिढी निर्माण होईल याच पिढीकडून समाजानें आशा करावी; या पिढीकडूनच ती सफल होणार आहे.

समाज आणि नीतितत्त्वें

सामाजिक विषयांचें विवेचन करतांना व त्याविषयीं निर्णय देतांना दोन गोष्टी प्रामुख्यानें लक्षांत ठेवाव्या लागतात. पहिली म्हणजे सामाजिक नियमांची–नीतितत्त्वांची तात्त्विक भूमिका आणि प्रत्यक्ष व्यवहारांत, समाजाच्या दृष्टीनें त्या तत्त्वांची शक्यता.

वैयक्तिक नीतिशिक्षण–

केवळ अत्युच्च तात्त्विक भूमिका घेतली तर ती जशीच्या तशी आचरणांत आणणें समाजाला शक्य नसतें. वैयक्तिकदृष्ट्या असा अट्टाहास एक वेळ यश देऊं शकेल. व्यक्तीला नीतितत्त्वें सांगतांना सांगणारा आणि ऐकणारा निकटत्वामुळें अंतःकरणानें एकमेकांच्या जवळ येत असतो. सांगणाऱ्याच्या मनाची छाप ऐकणाऱ्याच्या मनावर थोडीतरी पडतेच. ऐकणारा सांगणाऱ्याला एकदम झिडकारून देऊं शकत नाहीं, हें आपण रोजच्या व्यवहारांतहि पाहत असतों. हा एकत्र सहवासाचा परिणाम आहे. याचा फायदा सांगणाऱ्याला मिळतो. तो ऐकणाऱ्याचें मन आपल्याकडे ओढून घेतो. सहवासामुळें एकमेकांच्या मनांत एकमेकांबद्दल आपुलकी उत्पन्न होते. एका व्यक्तीला स्वतंत्रपणें शिकवीत असतां त्या व्यक्तीची वृत्ति व वर्तन शिकविणाऱ्याला सूक्ष्मपणें कळूं शकतें. साहचर्याचा फायदा घेऊन शिकविणारा त्या व्यक्तीचें चुकत असलेलें सुधारून हळुहळू त्याला आपल्या कक्षेंत आणतो. म्हणूनच व्यक्तीला नीति शिकवितांना नीतिमत्ता खालच्या पातळींत उतरविण्याचें कारण पडत नाहीं. एका व्यक्तीचा प्रश्न एकमार्गी, सुटसुटीत, एकांगी असल्यानें तेथें नीतितत्त्व जसेंच्या तसेंच लावणें तुलनेनें सोपें काम आहे. सामाजिक जागृति ही सार्वजनिक न करतां व्यक्तीव्यक्तीच्या हृदयाशीं जाऊन केल्यानें ती कार्यक्षम व यशस्वी होईल.

सामाजिक नीतिशिक्षण–

समाजाची गोष्ट व्यक्तीहून फार भिन्न आहे. व्यक्तींचा प्रश्न जितका सुटसुटित तितका समाजाचा गुंतागुंतीचा आहे. त्यांत एकाच वेळीं अनेक स्वभावांच्या व्यक्तीचा समावेश होत असतो. बुद्धिबळांतहि फार भेद असतो. सर्वांना समपातळींत आणून एक सामान्य नीतितत्त्व लागू करणें फार कठीण काम आहे. एका व्यक्तीकडे जितकें लक्ष पुरवितां येतें तितकें समष्टि शिक्षणांत पुरवितां येत नाहीं. करितां नीतितत्त्वांची उंची कमी करून जितकें क्षेत्र व्यापितां येईल तितकें लक्ष व्यापिणें भाग पडतें. व्यापक क्षेत्र आणि तात्त्विक उच्चता ह्या दोन्ही गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून एकत्र येऊं शकत नाहींत. कडक नीतिनियम सर्वांना सारखे लागू केल्यानें समाजांत अनीतीला वाव मिळतो. प्रत्येकाचें मनोबळ पुरेसें नसल्यानें तो तात्त्विक नीतीपर्यंत पोंचूं शकणार नाहीं. अर्थातूच सामान्य मनुष्याला एक अत्युच्च नीति

नाहीं तर एकदम अनीति हाच मार्ग शिल्लक राहतो. चुकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सार्वजनिक पद्धतींत व्यक्तिशः सुधारतां येत नाहीं. वैयक्तिक मार्गदर्शनाचे अभावीं नीतीमत्तेला ते मुकतात. कडक नीति आणि तिच्या नियमभंगाला कडक शिक्षा हें मूलतः त्याज्य आहे. समाजाला तें घातक आहे. कडक शिक्षेच्या भीतीनें मनुष्य नीतीकडे वळले, अनीतीपासून अलिप्त राहील ही कल्पना चुकीची आहे. कडक-शिक्षेच्या भीतीनें एकवेळ तात्पुरता आचार वदलेल पण मन नैतिक होणार नाहीं. उलटपक्षीं त्याच्याकडून नीतीचा तिरस्कारच होणें अधिक संभवनीय आहे. पुष्कळ वेळां विशेषतः मुलें चुकून वाईट संगतीनें अनीतीचीं कृत्यें करतात. वेळींच त्यांस मार्गदर्शन केलें तर त्या मार्गदर्शनाचा उपयोग होईल. ह्याच काळांत कडक शिक्षा केली असतां केवळ कुसंगतीनें अनीति करणारा मनानेंच अनीति करण्यास प्रवृत्त होतो. अशा ठिकाणीं त्यांना आपल्या सहवासांत घेऊन सहानुभूतीनें, प्रेमळपणें मार्गदर्शन केल्यास मुलें कायमचीं नीतिमान होतील. त्यांना अनीतीची शिसारी येईल, कारण अनीतीचा अनुभव त्यांनीं घेतलेला असतो. परंतु हें मुलांचें मानस-शास्त्र न कळल्यामुळें पुढें चांगलीं होणारीं मुलें विनाकारण अनीतीच्या मार्गास लागून राहतात. याला जबाबदार तीं मुलें नाहींत, त्यांची संगतिहि नाहीं, कडकशिक्षेचे भोक्ते त्यांचे अडाणी पालकच जबाबदार धरले पाहिजेत.

सौम्य नीतिनियम–

कलंकित वर्गांना समाजांत आत्मसात् करतांना नीतिनियम व्यापक व सहानुभूतीचे करावे लागतात. नैतिक वा कायद्याच्या शिक्षेचें प्रमाण कमी करणें अवश्य आहे. नीतिनियम सैल असणें, शिक्षा सौम्य करणें याचा अर्थ कोणीहि कांहींहि केलें तरी त्याकडे कानाडोळा करावा असा नाहीं. नीतिनियमांच्या सौम्यतेला एक विशिष्ट कार्य आहे. कांहीं अनीतिमान लोकांना नीतीकडे वळविण्याचें तें एक साधन आहे. ती सौम्यता तत्त्वज्ञान नाहीं. तिच्यामुळें अत्युच्च नीतितत्त्वांना बाध येण्याचें कारण नाहीं. त्या नीतिशिखरास पोंचण्याचा लुळ्यापांगळ्यांकरितां सुकर केलेला एक मार्ग आहे. साधकाकडे पाहून साधन ठरवावें लागतें. धट्ट्याकट्ट्यांनीं लुळ्यापांगळ्यांकरितां असलेला मार्ग स्वीकारल्यास ते मार्गावरील सौंदर्यानें लुब्ध होऊन तेथेंच रेंगाळत बसतील. या मार्गावर मनुष्य रेंगाळला कीं अधःपात झालाच. उच्च नीतितत्त्वांचें त्यांना कायमचें विस्मरण पडेल.

दृश्य जीवनाची दिशा बदलणारें अदृश्य ध्येय–

उच्च नीतितत्त्वें हीं कार्यक्षम व्यक्तीचें कार्यक्षेत्र असून वर वर्णन केलेल्या लोकांचें तें ध्येय आहे. ध्येय अगम्य म्हणून कल्पिलेलें असलें तरी त्याच ध्येयावर प्रत्यक्ष कार्याची दिशा अवलंबून राहणार. लक्ष बदललें म्हणजे दृष्टीचा कोन बदलावा लागतो. दृष्टिकोन वळला कीं कार्याची दिशा वळते. कार्याला निराळें वळण लागतें. त्या कार्यपद्धतीवरच मानवी जीवन अवलंबून आहे. ध्येय अगम्य व दूर, तरी त्या ध्येयाकडे जाणारा मार्ग अगदीं निकटवर्ती व प्रत्यक्ष व्यवहारांतहि आहे. प्रत्येक व्यक्ति भिन्न भिन्न पण एक विशिष्ट मार्ग आक्रमीत असते. इच्छित ध्येय तिला आधीन होतेंच असें नाहीं. परंतु ध्येयाकडे पाहून पावलें टाकीत चालल्यानें प्रत्येक मनुष्याची वागणूक, व्यवहार भिन्न भिन्न दिसत असतो. साध्या गोष्टींतहि हें आपणांस दिसून येतें. लहान मुलांच्या मनांत आपण पुढें काय व्हावें याविषयीं कांहींतरी एक कल्पना असते. त्यानुसार तें मूल आपला वेळ खर्च करीत असतें. चित्रकार व्हावेसें वाटल्यास त्याला चित्राचा नाद असतो. तें सुंदर चित्रें पाहाण्याची इच्छा करीत असतें. कारखानदार वा एंजीनीअर होण्याची आकांक्षा असल्यास त्या-प्रमाणें त्याचे खेळ चालू असतात. अखेर तें मूल त्याप्रमाणें होतें कीं नाहीं हा भाग निराळा. मोठेपणीं त्याचे विचार पालटतात किंवा परिस्थिति आड येते. ध्येय मिळ-विण्याचें बाजूलाच राहून जातें. परंतु कल्पनेंत असलेल्या त्या ध्येयाच्या अनुरोधानें लहानपणीं व्यवहार सुरू होत असतो. ध्येयभिन्नतेप्रमाणें मार्गभिन्नता व त्यानुसार जीवनावरला परिणाम लहान मुलांच्यांत हा असा दिसून येतो. मोठ्या माणसाचे बाबतींत असेंच होतें. समाजांतील व्यक्ती ज्याप्रकारचें ध्येय आपल्या डोळ्यांसमोर ठेवीत असतील त्याप्रकारचा त्यांचा जीवनकलह चालू असतो. अत्युच्च नीति हें ध्येय असलें म्हणजे मनुष्याचा जीवनमार्ग तदनुकारी असतो. उलटपक्षीं वाटेल ते व्यवहार करून कोठून तरी पोटाची खळगी भरणें हें ध्येय असलें कीं मनुष्य–तें ध्येय मिळो वा न मिळो–ध्येयसिद्धीकरतां वाटेल ते व्यवहार करण्यास प्रवृत्त होतो. याप्रमाणें ध्येयभिन्नतेमुळें जीवनभिन्नता प्रतीत होत असते.

ध्येयाची सापेक्ष अगम्यता व सुलभता–

ध्येय अगम्य कीं सुलभ ? ध्येय अगम्य आहे आणि सुलभहि आहे. परंतु निष्क्रिय मनुष्यास ती केवळ अंतराळांतील कल्पनाच आहे. कर्तृत्ववान् पुरुषास

ध्येय हें कार्यक्षेत्र आहे. तें त्याच्या हातांतील आहे. निःशक्तास तें अगम्य आहे. ध्येयाचे बाबतींत निष्क्रियांचा विचार करण्याचें कारणच नाहीं. निःशक्त व कर्तृत्ववान पुरुषांचें ध्येय नेहमीं अत्युच्च असावें लागतें. ध्येय अगम्य म्हणून निःशक्तांनीं त्यास डावलूं नये. जगांत कर्तृत्ववान पुरुष फारच थोडे असतात. निःशक्तांची संख्या अतिशय असते. तेव्हां, त्यांनीं ध्येयास गुंडाळून ठेवलें तर समाजजीवन अशक्य होईल. ध्येयहीन व्यक्तींचा व्यवहार वैयक्तिक आणि समष्टिजीवनास घातक असतो. व्यक्ति कर्तृत्ववान असो वा निःशक्त असो ती ध्येयवती असली म्हणजे कर्तव्यदक्ष राहते. कर्तव्यदक्षांना ओहोटी लागली कीं अर्थात्च अंदाधुंदी व्यवहार करणाऱ्यांची संख्या वळावते. व्यक्ति कर्तव्यदक्ष असणें हें सामाजिक जीवनाचें एक प्रमुख व अतिशय महत्त्वाचें अंग आहे. ध्येय गांठणें ही निराळी गोष्ट आहे. मनुष्याचें जीवन ध्येय नसून त्या ध्येयाकडे जाणारा मार्ग आहे. निःशक्त आत्मबलाच्या जाणीवेनें ध्येय गांठूं शकतात. त्यावेळीं त्यांना आपण कर्तृत्ववान् पुरुषांत गणतों. ध्येय सुलभ होतें तें या लोकांना. इतरेजनांना तें अगम्यच आहे. ध्येयाची अगम्यता व सुलभता ही मनुष्याचे कर्तृत्वशक्तीवर अवलंबून आहे. इच्छाशक्तिहि त्याला जबाबदार असते. ज्याचे अंगीं या दोनहि शक्तींचा अभाव आहे. त्याला कोणतीहि साधी व्यवहार्य गोष्ट ( Practical ) अगम्यच वाटणार. म्हणून समाजघटकांचीं वैयक्तिक वा सामाजिक ध्येयें ठरवितांना त्यांच्या मनाचा कल—लहर पाहून रुचेल पचेल तेवढेंच गळीं उतरवावें आणि त्यांना रोजच्या व्यवहारांतून जें सहज साधेल ( Practical ) तेंच कार्यक्षेत्र ध्येय ठरवून द्यावें असें करूं नये. असें केल्यानें व्यक्ती डोईजड होतात. त्यांच्या डोळ्यांपुढें उच्च ध्येय, आदर्श कांहीं राहत नाहीं. त्यामुळें त्यांचें जीवन तेथल्या तेथेंच घुटमळत राहतें. हें लक्षांत घेऊनच प्रस्तुत ग्रंथांत समाजाविषयीं फार उच्च अपेक्षा केल्या आहेत. प्रत्येक ठिकाणीं तात्त्विक भूमिकेवर जाऊन भर दिला आहे.

समाज म्हणजे मानवांचें क्रीडांगण—

मानवी जीवन-क्षेत्र हें अत्यंत विस्तीर्ण आहे. कोणती व्यक्ति कोणत्या क्षेत्रांत पाय रोवून बसेल याचा नियम सांगतां येणार नाहीं. या अफाट प्रांगणांत बिंदुसम मनुष्याचें मन खुशाल बागडत आहे. मन जेथें जाईल तेथील वातावरणाची छाप मनावर पडते. मन सन्मार्गी होतें. त्यांतूनच जीवनव्यवहार चालू असतो. एका व्यक्तीचें जीवन त्याच्याशीं समरस होतें. व्यक्ति समाजाचा घटक असल्यानें—अशा

एकेका व्यक्तीच्या जीवनाचा परिणाम एकंदर समाजाच्या जीवनावर अवश्य होतो. त्या अफाट प्रांगणांत व्यक्तींव्यक्तींनीं केलेल्या क्रीडा—विद्या व कला—यांनींच समाजाचें जीवन तयार होतें. क्रीडांचा परस्परांवर परिणाम होतो. आणि त्या सर्वांचा समाजजीवनावर परिणाम होतो. ती एकेक क्रीडा म्हणजे समाजजीवनाचा एकेक अवयव आहे. एकमेक एकमेकाला साथ करतात व सगळे मिळून समाजजीवन तयार करतात. इतका प्रत्येक क्रीडेचा दुसऱ्या क्रीडेशीं व समाजाशीं निकटचा संबंध आहे. नेमकी हीच जाणीव आज समाजांतून नष्ट झाल्यासारखी दिसत आहे. आपापल्या क्षेत्रांत काम करणारे लोक इतर क्षेत्रांतील कार्यकर्त्यांकडे सहानुभूतीनें व आपलेपणानें पाहतात असें दृश्य फारच थोडे वेळां दृष्टोत्पत्तीस येतें. आपल्या कार्यक्षेत्रास समाजांत कोणतें स्थान आहे हें तो कांहीं वेळा ओळखीत नाहीं. सर्व सामाजिक शास्त्रें यांना समाजांत कांहीं तरी विशिष्ट कार्य असतें. आणि तें कार्य प्रमाणबद्ध असतें. अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, भौतिक शास्त्रें यांचे आणि स्त्रीपुरुषांचे सामाजिक प्रश्न या प्रत्येकाचे परस्पर संबंध जिव्हाळ्याचे व प्रमाणशीर आहेत. जनावराचा एकच पाय जास्त लांब वा आखुड असेल तर त्याचा परिणाम बाकीच्या तिन्ही पायांवर हमखास होतो.

शास्त्रोक्त आणि प्रतिक्रियात्मक समाजरचना—

समाजशास्त्राच्या अभ्यासानें ही जाणीव उत्पन्न होते. समाजांतील विविधांगांची वाढ योग्य प्रमाणांत व परस्परांस पोषक होते. भारतीय संस्कृतीनें प्रत्येक शास्त्राचा व कलेचा समावेश धर्मांत केला आहे. त्यांना धर्माच्या एकछत्राखालीं आणण्याचा उद्देशहि हाच असावा. युरोपमध्यें आधुनिक युगांत इतर शास्त्रांच्या बरोबर समाजशास्त्राचीहि झपाट्यानें वाढ होत आहे. आमच्याकडे मात्र समाजशास्त्राचा अभ्यासक अजून निर्माण होत आहे. परंतु यालाहि कारण शोधून बघण्यासारखें आहे. प्राचीन काळापासून युरोपमध्यें कोणत्यातरी रूपांत समाजरचना अस्तित्वांत होती हें खरें असलें तथापि तिचें शास्त्र अस्तित्वांत आलें नव्हतें, तें शास्त्र युरोपीय आतां करूं पहात आहेत. युरोपमध्यें आजपर्यंत ज्या निरनिराळ्या अनेक समाज-रचना झाल्या त्या बुद्धिपुरस्सर वा शास्त्रोक्त नव्हत्या. प्रतिकूल परिस्थितीची प्रतिक्रिया असेंच त्या समाजरचनेस म्हणावें लागेल. आणि प्रतिक्रिया ही निसर्गनिर्मित आहे. तें एक सहजकार्य आहे. त्या प्रतिक्रियेनंतर समाजनेत्यांनीं समाजरचनेचा आराखडा तयार करून राजसाहाय्यानें तो अंमलांत आणण्याचा प्रयत्न केला व

राजानेंच प्रधानमंडळाच्या सल्ल्यानें समाजांत रचनेच्या दृष्टीनें सुधारणा घडवून आणल्या तर ती समाजरचना बुद्धिपुरस्सर होईल. युरोपीय समाजरचना शास्त्रोक्त नाहीं याचा अर्थ समाजरचनेचें शास्त्र निर्माण झालेलें नव्हतें. अस्तित्वांत असलेल्या समाजरचनेच्या मागें तत्त्वज्ञान नव्हतें व समाजरचनेसंबंधीं नियम नव्हते. त्या काळाला, त्या परिस्थितीला योग्य वाटतील ते त्या काळीं असलेल्या राजानें कायदे करणें याला समाजरचना शास्त्र म्हणत नाहींत. राजानें केलेले कायदे हे राजकीय दृष्टीनें केलेले असतात. त्यांत समाजकारणापेक्षां राजकारणच जास्त असतें. त्या कायद्यामागें समाजशास्त्राचें सनातन तत्त्वज्ञान नसतें; तात्कालिक परिस्थितीची प्रतिक्रिया असते. म्हणूनच राजा बदलला कीं समाजरचनेंत फरक पडे. युरोपीय समाजरचना वारंवार बदलते याला दुसरें कारण आहे. वर सांगितल्याप्रमाणें त्या सर्व समाजरचना प्रतिक्रियात्मक होत्या आणि त्या अजूनहि तशाच होत आहेत. प्रतिक्रियात्मक समाजरचनेचा पाया हा तात्कालिक असतो. उथळ मातींत म्हणजे खडकाळ जमिनीवर उगवलेल्या रोपट्याचा मोठा वृक्ष होणार नाहीं. जोंपर्यंत मुळें खालील खडकाला लागलीं नाहींत तोंपर्यंतच त्या रोपट्याचें वैभव वाढत असतें. परंतु मुळें जशीं वाढीस लागून खोल जमिनींत शिरूं पाहतात तेव्हां खडकाचा पायबंद बसून मूळ खुंटतें-रोपटें कांहीं दिवसांनीं मरून जातें असेंच प्रतिक्रियात्मक समाजरचनेचें होतें. भारतीय संस्कृतींत इतर शास्त्रांसमवेत समाजशास्त्राचीहि वाढ हजारों वर्षांमागें झालेली आहे. जवळ जवळ असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं आर्य-समाजासह आर्यांचें समाजरचनाशास्त्रहि जन्म पावलें होतें. आर्य भारतवासी झाल्यावर त्यांची समाजरचना शैशवांत होती-शिथिल होती. पुढें पुढें रचनाशास्त्र वाढीस लागून समाजहि त्यानुसार-स्थिरावत गेला. हिंदूंची वर्णाश्रमव्यवस्था, विवाहसंस्था, कुटुंब-संस्था हें त्याचें साक्षात् प्रत्यंतर आहे, हिंदूंचा चातुर्वर्ण्य तर समाजरचनाशास्त्राचा कळस आहे. धर्माच्या नांवाखालीं मोडणारे स्मृत्यादि अनेक ग्रंथ आमच्या शास्त्रोक्त समाजरचनेची साक्ष पटवून देतात. अनंत परचक्रें आदळूनहि हिंदूंची एकच समाज-रचना हजारों वर्षे स्वराज्य-परराज्य-निरपेक्ष टिकाव धरून आहे. याचें कारण ही समाजरचना प्रतिक्रियात्मक नाहीं, बुद्धिपुरस्सर आहे. शास्त्रोक्त आहे. खरें समाज-स्वास्थ्य प्रतिक्रियात्मक आणि एकवर्णाधिष्ठित समाजरचनेंत नाहीं हें जें तत्त्व युरोपीयांना यापूर्वी कधींहि समजलें नव्हतें व अजूनहि समजलें आहे असें वाटत नाहीं तें आमच्या भारतीय संस्कृतीनें हजारों वर्षांपूर्वीं ओळखून त्याप्रमाणें तें

आचरणांतहि आणून दाखविलें! आधुनिक युरोपीय समाज विद्येंत मध्ययुगापेक्षां पुढें गेलेला आहे. समृद्ध जीवन–साधनें उपभोगीत आहे परंतु त्यांत समाजस्वास्थ्य नांदत आहे असें म्हणवत नाहीं. समाजाच्या संस्कृतीचें मापन समाजस्वास्थ्यावर अवलंबून आहे, समाजस्वास्थ्य संस्कृतीवर आधारलेलें आहे. श्रीमंत बापाचा मुलगा ऐदी निघावा त्याप्रमाणेंच आमच्या श्रीमंत पूर्वजांनीं भरपूर मिळवून ठेवलेलें असल्यामुळें आम्हांला त्यांत लक्ष घालण्याची आवश्यकता वाटत नसावी.

शास्त्रोक्त समाजरचना असलेल्या हिंदुसमाजाच्या अधोगतीचें कारण–

हिंदूंचें समाजरचनाशास्त्र जर इतकें तत्त्वशुद्ध आहे तर हिंदुसमाजाची आधुनिक काळांत अशी अधोगति कां व्हावी असाहि कोणी प्रश्न करील. त्याचें म्हणणेंहि कांहीं वावगें नाहीं. परंतु एक गोष्ट ध्यानांत धरावयास पाहिजे. कोणत्याहि समाजाविषयीं बोलतांना व्यवहारांत क्षणिक आणि तत्काळ साकल्यानें दृष्टीस येणारी वस्तु आणि समाज यांची तुलना करूं नये. पण तेंच आपण करीत असतों. समाजाचें आयुष्य ब्रह्मदेवासारखें सुदीर्घ आहे. त्याचा जीवनव्यवहार हा तितकाच गुंतागुंतीचा, अफाट आणि विविध आहे. शिवाय तो आयुष्यक्रम तितक्याच भिन्नकाळच्या विविध व्यक्तींकडून पार पाडावयाचा असतो. त्या व्यक्तीहि समाजाला शेवटपर्यंत मिळत नाहीं. एका व्यक्तीचें आयुष्य ही समाजाच्या आयुष्यांतील एक घटका आहे. त्यामुळें समाजाच्या जन्मकाळापासून अंतकाळापर्यंतची सर्व साखळी तुटक तुटक आहे. ती जोडणेंच महा कठीण काम आहे व त्यांतच समाजनेत्यांचें खरें कौशल्य आहे. हजारों वर्षांपूर्वीं घालून दिलेला एक नियम घटकेघटकेनें बदलणाऱ्या हजारों व्यक्तींकडून व हजारों परचक्रांतून निभावून शेवटपर्यंत पोंचविण्यास त्या नियमाची केवळ तत्त्वशुद्धता अपुरी पडते. तो नियम एवढा मार्ग आक्रमीत असतां वाटेंत अनेक ठिकाणीं थकून जातो. तिला आधार देण्यासाठीं कांहीं कर्तृत्ववान पुरुषांची आवश्यकता असते. पण तें साहाय्य वेळेवर मिळत गेलें नाहीं तर तो नियम शेवटलें टोक गांठण्यास असमर्थ होतो. हिंदुसमाजांत हेंच होत गेलें आहे. अंतराअंतरानें वेळोवेळीं तत्त्वांस जो आधार मिळत जावयास पाहिजे होता तो मिळाला नाहीं. अर्थात् हीं तत्त्वें हा कालपर्यंत थकत थकत कशींबशीं आलीं. ही त्या तत्त्वनिर्मात्यांची पुण्याई आहे. पालखीला जसा एक दमल्याबरोबर लगेच दुसरा यावयास लागतो आणि हीच परंपरा पुढें चालवावी लागते तसेंच तत्त्वांचें आहे. आधार बेताचा

असला तरी हरकत नाहीं. परंतु तो वेळेवर सारखा बदलत गेला पाहिजे. आमच्याकडे थोडें निराळें होत गेलें. आमच्याकडे आधारस्तंभ झाले नाहींत असें नाहीं आणि ते श्रेष्ठ नव्हते असें तर मुळींच नाहीं. परंतु पालखीला वेळेवर आधार न मिळाल्यामुळें पहिला दमला, त्याच्या पश्चात् समाजाची पालखी खालीं पडली. ती वर उचलून मार्गाला लावतो न लावतो तोंच तो वर उचलणारा सर्वश्रेष्ठ वीर जगांतून नष्ट व्हावा. आणि परंपरेच्या अभावीं ती पालखी पुन्हां जमिनीवर कोसळावी. हा प्रकार आतांपर्यंत होत आला. आमच्या समाजांत जगद्वन्द्य सर्वश्रेष्ठ विभूती जन्मास आल्या पण त्यांच्या पश्चात् त्यांची परंपरा स्थगित होई. अगदीं याच्या उलट स्थिति इंग्लंडची आहे. इंग्लंड पहिल्यापासून शेवटपर्यंत सारखें प्रगत होत आहे याचें श्रेय त्याच्या वीरांना नसून वीरांच्या परंपरेला आहे. वस्तुतः त्यांच्या वीरांपेक्षां कितीतरी पटीनें श्रेष्ठ वीर आमच्या समाजांत होऊन गेले. पण आधार वेळेवर मिळत गेला म्हणजे तो थोडासाहि पुरतो.

### प्रस्तुत ग्रंथासंबंधीं थोडें प्रास्ताविक--

ग्रंथ लिहीत असतां ग्रंथाचें धोरण ठरून गेलेलें होतें. समाजांत वस्तुस्थिति काय आहे आणि ती काय परिणाम करते हें सामान्य लोकांस कळून यावयास पाहिजे. त्यांच्याकरितां विद्वानांच्या दृष्टीनें क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींचीं वर्णनें करून थोडा पाल्हाळ लावावा लागला. असें केल्यावांचून नुसत्या जड भाषेंतील तत्त्वज्ञानानें सामान्य लोकांना समाजांतील परिस्थिति आकलन होण्यासारखी नाहीं. सामान्य लोक याविषयीं अज्ञानी असले तर केवळ विद्वानांना तें कळण्यांत अर्थ नाहीं. या ग्रंथांत मांडलेल्या विचारांपासून जे अलिप्त आहेत त्यांना जवळ आणण्याच्या उद्देशानें विचारांचें स्पष्टीकरण केलेलें आहे. जे प्रथमच या विचारांशीं सहमत आहेत त्यांना पटवून देण्याची आवश्यकता नाहीं. लांबलचक स्पष्टीकरणाचें सार विचारवंतांकरितां आहे. हा ग्रंथ संपूर्णपणें स्वतंत्र आहे. यांतील विचार, सामान्य सिद्धांत, इत्यादि लेखकाला स्वतःला स्वतंत्रपणें सुचलेले आहेत. यांतील प्रत्येक विचार वा सिद्धान्त स्वतंत्र असला तरी नाविन्यपूर्ण असेल असें मात्र विधान करतां येत नाहीं. साम्य पुष्कळ ठिकाणीं असूं शकेल. परंतु त्यामुळें ग्रंथांतील विचारांच्या स्वतंत्रपणाला बाध येऊं शकत नाहीं. जे विचार स्वतःला सुचलेले आहेत तेच अन्यत्र कोठें आलेले असल्यास त्याची नोंद करणें अर्थयुक्त वाटत नाहीं. प्रस्तुत ग्रंथ निरनिराळ्या

१७६२० ... २१.१२ ... ८०० ...

विचारांचे व ज्ञानांचे पत्ते देण्याकरितां लिहिला नाहीं. वास्तव इतर ग्रंथांच्या वा व्यक्तींच्या सर्रास अनुल्लेखाचा उद्देश त्यांचा अवमान करण्याचा आहे असें समजूं नये. कोणताहि विचार संपूर्णपणें स्वतंत्र असूं शकत नाहीं. त्याचा उगम परिस्थिति, अनुभव व वाचन वा श्रवण यांतून झालेला असतो. परंतु त्या सर्वांची जंत्री येथें देण्याची आवश्यकता नाहीं. त्यांतूनहि विचारपुष्टयर्थ महत्त्वाच्या लेखकांचे कांहीं उतारे दिले आहेतच. उल्लेखनीय असा एक अपवाद आहे. रशिया, इंग्लंड यांतील शूद्र व वैश्य समाजाची कल्पना डॉ. केतकरांच्या 'भारतीयसमाजशास्त्रा'-वरून घेतलेली आहे. त्याचा येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. इतर ठिकाणीं कोणाचेंहि उक्तिग्रहणाचें ऋण न घेतल्यामुळें केवळ विचारसाम्य म्हणून किंवा विद्वत्तेचें प्रदर्शन करावें म्हणून विचारांचा उल्लेख करावा असें वाटत नाहीं. विचारांना पोषक असणाऱ्या थोर ग्रंथकारांचे उतारे दिले आहेत. त्या त्या ठिकाणीं त्यांच्या लेखकांचा नामनिर्देश केलेला आहे हें कृतज्ञतेनें येथें सांगत आहें. विचारांचें मोल व्यक्तींत नसून विचारांत आहे अशी माझी समजूत आहे. केव्हां केव्हां तर सुसंकृत मनुष्यांच्या डोक्यांत येणार नाहींत असे कांहीं विचार अडाणी, रानटी समजल्या जाणाऱ्या कुणबी, ठाकूर, इ. जातींच्या माणसांकडून मला ऐकावयास मिळाले! ही विचारांची उदात्तता मागासलेल्या अडाणी लोकांतहि वास करूं शकते हें पाहून त्या व्यक्तींबद्दल खरोखर धन्यता वाटली! प्रस्तुत ग्रंथ वाचण्यास मार्गदर्शन व्हावें म्हणून वाचकांसाठीं शेवटीं संदर्भ ग्रंथांची यादी दिली आहे.

ग्रंथाचा उद्देश–

समाजांतील विविधांगांचें विहंगमावलोकन करून समाजाचें स्वरूप साकल्यानें दाखविणें, सामाजिक अंगांची परस्परप्रमाणबद्धता स्पष्ट करणें आणि समाजघटकांच्या परावलंबी जीवनाचें निरीक्षण करणें हा या ग्रंथाचा एक उद्देश आहे. समाजांतील प्रत्येक शास्त्राची साग्र चर्चा येथें करावयाची नाहीं. त्या दृष्टीनें हा ग्रंथ अतिशय अपुरा आहे. तो जरी पुरा केला तरी केवळ तेवढ्यानें लेखकाचा इच्छित हेतु सिद्धीस जाणार नाहीं. प्रत्येक अंगाचें दुसऱ्या अंगाशीं असलेलें अवलंबन आणि त्याचा सर्व समाजावर होणारा परिणाम निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. सध्यां काय आहे आणि काय पाहिजे एवढाच अंगुलीनिर्देश करावयाचा आहे. प्रस्तुत ग्रंथ निरनिराळ्या सामाजिक विषयांवरील त्रोटक निबंधांचा संग्रह नसून हें एक सबंध पुस्तक आहे.

ग्रंथांतील सर्व विषय सुसूत्र असून समाजशास्त्र या मोठ्या विषयाचीं तीं प्रकरणें आहेत.

तात्त्विक स्वरूप

सामाजिक कार्यकर्त्यापेक्षां समाजशास्त्राच्या अभ्यासकाला हें पुस्तक अधिक उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे. कारण तात्त्विक विवेचनामुळें ग्रंथाचें स्वरूप तांत्रिक होण्यापेक्षां तात्त्विक झालें आहे.

ग्रंथाचा मानसशास्त्रीयदृष्ट्या दृष्टिकोन–

सबंध ग्रंथाची आधारणी म्हणजेच पर्यायानें नवीन समाजरचनेची आधारणी समाजघटकांच्या मनोवृत्तीवर उभारली आहे. समाजांतील प्रत्येक प्रवाह व्यक्तींव्यक्तींच्या अदृश्य असणाऱ्या मानससरोवरांतून सूक्ष्मस्वरूपांत उगम पावतो. हा सूक्ष्म उगम दुर्लक्षून चालणार नाहीं. म्हणून समाजांत कोणतेंहि कार्य घडवून आणण्याचे पूर्वी समाजघटकांची मनोभूमिका तयार करणें अवश्य आहे. अर्थात् या दृष्टीनें लिहिलेला हा ग्रंथ मानसशास्त्रीय वाटेल.

स्त्री प्रकरणांत स्त्रीसंबंधींचीं कर्तव्यें वा इतर कांहीं कार्यें सरकारकडून अपेक्षिलीं आहेत. त्यामुळें वाचक घोटाळ्यांत पडण्याचा संभव आहे. ही 'सरकार' ची कल्पना ग्रंथाच्या पुढील भागांत स्पष्ट होईल. पुष्कळ वेळां अपेक्षादर्शक विध्यर्थाचीं वा भविष्यकालाचीं क्रियापदें वापरलेलीं आहेत. उदा. 'हें असें होईलच;' 'त्यांनीं तसें करावें.' आदर्श समाजरचनेंत विद्यार्थ्यांनींच काम भागावें हें त्या समाजाला भूषणावह आहे. याप्रमाणेंच समाजाविषयीं कांहीं कल्पना दुर्घट झाल्या याचें कारण वर सांगितल्याप्रमाणें ग्रंथाचें स्वरूप तांत्रिक नसून तात्त्विक आहे. तात्त्विक चर्चेंत व्यवहार्य–प्रात्यक्षिकापेक्षां आदर्शत्वाकडेच अधिक लक्ष दिलें पाहिजे. आदर्शत्वाचें संपूर्ण चित्र मनश्चक्षूंपुढें चितारून तें ध्येय समजून तत्प्राप्तीसाठीं शनैः शनैः पदक्षेपन करावें हेंच योग्य वाटतें.

# उपोद्‌घात

समाजाच्या पुनर्घटनेचा विचार करतांना ज्या घटकांनीं मिळून तें महत्कार्य पार पाडावयाचें त्या घटकांचा म्हणजे व्यक्तींचा वैयक्तिक दृष्टया विचार करणें आवश्यक आहे. ज्या व्यक्तीकडून हें कार्य घडावयाचें आहे ती व्यक्तीच जर सामाजिक जीवना-विषयीं उदासीन असेल तर पुढील कार्य येथेंच विरघळून जाईल.

## शिशुमनाची वाढ–

मनुष्य जन्मास येतो; येतांना तो विचार करून येत नाहीं. आपल्या भावी आयुष्याचें सार्थक कशानें करावयाचें किंबहुना करावयाचें कीं नाहीं हें ठरवून येत नाहीं. त्याचें शिशुपण पराधीन असतें. ज्यांच्या ताब्यांत तें असतें तेहि या गोष्टीचा कधीं विचार करीत नाहींत; आणि त्याप्रमाणें शिशूच्या आयुष्याला दिशा लावीत नाहींत. या संस्कारांची कोणालाहि कल्पना नसल्यानें त्या शिशूकडून भोंवतालच्या थोरांचें अनुकरणहि तितकेंसें होत नाहीं. जें थोडेंफार होतें तें म्हणजे त्याच्या असंस्कृत जीवनावर त्याच्या स्वतःच्या तत्कालीन स्वार्थाचा नकळतपणें होणारा परिणाम होय. या लहान वयांत कोणत्याहि पाहिलेल्या वा ऐकलेल्या गोष्टीची कार्य-कारणमीमांसा करणें हें त्याच्या बुद्धीला अगम्य आहे. त्यामुळें त्या गोष्टीचें बौद्धिक ज्ञान त्याला होत नाहीं. लहान मुलांचें मन मात्र बुद्धीपेक्षां जास्त संस्कारक्षम असतें. मनावर फार लवकर परिणाम होतो. पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी मनःपटलावर बिंबून जातात. त्याचा ठसा उमटतांना कळत नाहीं. कारण मन लहान म्हणजे

अविकसित असतें. पण एकदां उमटल्यावर तो कायमचा बसतो. विशेष आश्चर्यकारक वाटणाऱ्या गोष्टी पाहत असतां 'हें असें कां ?' हें अपरिपक्व बुद्धीमुळें जाणून घेतां येत नाहीं. पण 'असें आहे हें !' असें मात्र मनावर एकदम ठसून जातें. मनःपटलावर ठसलेल्या या ठश्यांनींच पुढील आयुष्यांतील रचना बनून जाते. अर्थात् त्याप्रमाणें या शिशूचा प्रौढपणीं आचार असणार. असो. तेव्हां हे नकळतपणें मनावर झालेले संस्कार बालकाच्या भावी आयुष्याचीं गांठोडीं बांधीत असतात. आपल्याला भावी आयुष्यांत असेंच वागावें लागणार आहे, हें त्या बालकास हळूहळू वय वाढत जातें तसें समजून येत असतें.

चांगलें असेल तें स्वतःकरितां घेणें, आधीं स्वतःची तरतूद करणें, 'आपला तेवढा बाब्या (चांगला) दुसऱ्याचा तो कारटा' इ. अनेक गोष्टी तो जन्मल्यापासून दुसऱ्यांनीं केलेल्या पाहात असतो व करीत असतो. याचाच पुढें सुधार होऊन स्वतः व्यक्तीचा स्वार्थ आणि दुसऱ्या संबंधीं असूया या भावना त्याच्या ठिकाणीं दृढतर होऊन त्या 'हुकमी राणी' बनतात.

मनुष्य आणि इतर प्राणी यांमधील भेद–

मनुष्याचें आयुष्य अशा तऱ्हेनें लहानपणापासून मरेपर्यंत स्वतःचा वैयक्तिक स्वार्थ व दुसऱ्याविषयीं असूया यांनीं जास्त प्रमाणांत भरून जातें. लहानपणीं विद्याभ्यास म्हणून व मोठेपणीं संसार व नोकरी म्हणून स्वतःच्या जीवनापलीकडे पाहण्यास मनुष्याला वेळच होत नाहीं. ईश्वरानें दिलेलें एका जन्माचें आयुष्य त्यास पुरेसें होत नाहीं असें दिसतें. पण मनुष्याचा जन्म जर यांतच संपूं लागला तर पशुपक्ष्यांचें जीवनहि असेंच यांतच संपून जातें–मग सर्व प्राण्यांत उच्चप्रतीचा प्राणी म्हणवून घ्यावयास मनुष्यास काय अधिकार आहे ? मनुष्यानें ही सर्वोच्चतेची घमेंड कशाला मारावी ? ईश्वरानें मनुष्य व मनुष्येतर प्राणी यांत महत्त्वाचा भेद ठेवला आहे. तो सुंदर देहांत नाहीं. तो सुंदर बुद्धींत व अंतःकरणांत आहे. त्याची जाणीव त्याला वरचेवर झाली पाहिजे.

प्रेमापोटीं धडपड–

मनुष्याची धडपड सर्व आयुष्यभर सतत चालू असते. हाडांचीं काडें करून पैसा

जमवून तो घरांत आणतो. या कामांत कैक वेळेला आपल्या जीवाचीहि तो फिकीर करीत नाहीं. पण हा एवढा त्याग कशाकरितां ? तर आपल्या मुलांस खावयास मिळावें म्हणून. पण तें तरी कां ? एक प्रेम आहे म्हणून आणि तें प्रेम तरी काय इच्छितें ? त्यांना विद्याभ्यास यावा, मोठेपणीं चांगला पैसा मिळावा. तो पैसा कशासाठीं ? त्याचें व त्याच्या बायकामुलांचें पोट भरण्यासाठीं. त्या तरी बायकामुलांचें पोट कां भरावें ? प्रेमाकरितां. आणि हीच परंपरा पुढेंहि चालू राहाणार. सांगण्याचें तात्पर्य काय तर जगण्याकरितां धडपड व धडपडीकरितां जगणें. याशिवाय दुसरा कोणता अर्थ यांतून निघतो ?

ऐहिक सुख–

सामान्यतः मनुष्याची धडपड ऐहिक सुखाकरितांच असते. पारमार्थिक सुखाची तळमळ लागली आहे आणि त्याकरितां जन्मभर धडपडतो आहे असा कोणी हरीचा लाल पाहिला आहे का ? ही कल्पनाच कोणाच्या मनाला शिवत नाहीं. जर यदाकदाचित् शिवलीच तर थोतांड म्हणून तुच्छतेनें तिचा अव्हेर केला जातो. कारण पारमार्थिक सुख ही इतक्या दूरची गोष्ट आहे, शिवाय ही खरी आहे कीं नाहीं हें कळण्यास कांहीं मार्ग नाहीं. पुन्हां ऐहिक दुःख व अडचणी इतक्या असतात ( आणि त्यांची कधींच समाप्ति होत नाहीं ) कीं इतक्या लांब पल्ल्यावर असलेल्या गोष्टींचा विचार करण्यास त्यास वेळच मिळत नाहीं. सारा जन्म ऐहिक दुःखें व अडचणीच नष्ट करण्यांत संपून जातो. ऐहिक सुखें मिळालीं तरी त्यांचाहि उपभोग घेण्यास त्यास फुरसत नसते; लगेच पुढें येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरितां आतांपासूनच तयारीस लागावें लागतें.

अप्राप्य सुखाच्या मागें–

इतकें करूनहि मनास कांहीं काल समाधान मिळेल, चिंता कांहीं वेळ दूर होईल असें एखादें सौख्य लाभतें काय ? बेकाऱ्याला पोटाला अन्न नाहीं म्हणून चिंता असते. त्यास, समजा, नोकरी मिळाली व पोटाचा प्रश्न सध्यां भागला तर पुढें लग्नाची विवंचना. लग्नहि झालें, संसार वाढला, पण पगार पुरेनासा होतो. वाढत्या संसाराबरोबर वाढत्या अडचणीहि येतात हें कांहीं नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. पुढें मुलांच्या शिक्षणाची काळजी व मुलींच्या लग्नांची विवंचना ! यांतच त्या बिचाऱ्याचा एक दिवस अंत व्हावा ! प्रथमपासून या 'बेकाऱ्याला' पाहिजे होतें तें

मिळत गेलें. नोकरी नव्हती, नोकरी मिळाली; लग्न होत नव्हतें, लग्न झालें संसार वाढला; परंतु आगींत कितीहि तेल ओतलें तरी आगीचें समाधान झालें आहे काय? याला पैसा कमी पडला म्हणावें तर श्रीमंताला तरी समाधान मिळालें आहे का? हजाराचा दोन हजार पगार कसा होईल, दोहोंच्या चार मोटारी कशा होतील, मूल कसें होईल, सरकारांत पदवी केव्हां मिळेल, इ. अनेक काळज्या! शिवाय त्याच्या तिजोरीवर चोरांचें लक्ष असतें ती एक मोठीच विवंचना घर करून राहिलेली असते. देहयष्टि तरी दणगट असेल पण ती सुद्धां अशक्त, रोगांनीं पछाडलेली! अशा स्थितींत रत्नजडित मंचकावर दासदासींच्या सेवा उपभोगीत, मोठमोठया पदव्यांनीं संबोधणारे इष्ट जन सभोंवार उभे असतां, उच्चप्रतीचीं सुग्रास पक्वान्नें सुवर्णपात्रांत भरून येत असतां, उशापायाशीं मोठमोठे वैद्य यमदूतांना हटवण्यासाठीं सज्ज असतां या कुबेरपुत्रालाहि समाधान मिळालें असें कोण म्हणेल? त्याचीं सुखदुःखें तराजूंत वजन केलीं तर दुःखाचेंच पारडें खालीं जाईल यांत शंका नाहीं. मरतांना सुखासमाधानानें प्राण सोडला असे किती कुबेरपुत्र पाहावयास मिळतील? मरणसमयींची गोष्ट कशाला? त्यानें केव्हांहि आपल्या मंचकावर स्वस्थ पडून मागील जीवनाचा चित्रपट स्मृतिचक्षूपुढून नेला तर तो पाहत असतां त्याच्या मनास समाधान मिळेल काय? त्याचप्रमाणें आपल्या भावी आयुष्याचा चित्रपट पाहिला तर त्यास सुख होईल का दुःख होईल? खात्रीनें दुःख होईल; म्हणून तर त्यास भावी काळाची चिंता लागून राहिलेली असते. तात्पर्य इतकेंच कीं, मनुष्य ज्याकरितां आयुष्यांत इतकी यातायात करतो तें सुख व समाधान त्याला या जन्मांत तरी मिळत नाहीं.

मनुष्य श्रीमंत असो, गरीब असो, त्याची मनाची ठेवण एका बाबतींत सारखीच असते. नाहीं तें मिळविण्याची त्याची खटपट चालू असते. आहे त्यांत समाधान मानणें हा मनुष्यस्वभावच नाहीं. हाच स्वभाव मानवी प्रगतीला आणि परागतीला कारणीभूत झाला.

सुखाची कल्पना—

सुख कोणत्याहि बाह्य गोष्टींत नाहीं. ती एक मनाची अवस्था आहे. बाह्य गोष्टी मनाला, सुखाच्या अवस्थेंत आणल्यास कांहीं वेळां कारणीभूत होतात एवढेंच. पण

ही अवस्था सर्वस्वी त्या गोष्टीवर अवलंबून नाहीं. एकच वस्तु पण मनोभूमिका भिन्न असल्यामुळें सुखाची कल्पना भिन्न म्हणून मनाची अवस्थाहि भिन्न. सुसंस्कृत मनुष्याचें सुख वस्तुनिष्ठ असण्यापेक्षां भावनिष्ठ अधिक असतें. मनुष्य जितका मागासलेला तितकें त्याचें सुख अधिक वस्तुनिष्ठ. योग्याला तर सुख भोगण्यास वस्तूची आवश्यकताच भासत नाहीं. त्याचें मनच समाधानी असतें. उलट सुखलोलुप मनुष्याला कितीहि सुखसाधनें आणून दिलीं तरी त्याचें समाधान होत नाहीं. उलट त्याची सुखतृष्णा जास्तच वाढत जाते. सुख भोगण्याचा उद्देश मनःसमाधान-तृषा तृप्ति असून तृषावृद्धि नाहीं.

परार्थी सुख-

ही तृषावृद्धि वा तृषातृप्ति सर्वस्वीं मनःशक्तीवर अवलंबून आहे. हलक्या मनोवृत्तींतून सुखभोगजिज्ञासा उत्पन्न झाली असेल आणि मनांत कोणतीहि उच्च भावना न ठेवतां केवळ स्वार्थी बुद्धीनें आणि तामसी वृत्तीनें सुखाचा उपभोग घेतला असेल तर तृषा-वृद्धि होते. परंतु हें सुख दुसऱ्याकरितां -त्याला बरें वाटावें-या उच्च भावनेनें व परोपकारी सात्त्विक बुद्धीनें त्याचा घेतलेला उपभोग हा तृषातृप्ति करतो. शिवाय त्यांत सुखहि अधिक असतें. अर्थात् हें थोर मनाचें कार्य आहे. सुख हें नेहमीं परार्थी असावें; स्वार्थी नसावें. म्हणजे त्यांत आनंद अधिक होतो. एखादी रुचकर वस्तु मीं चोरून खाल्ली तर तिच्या गुणधर्मानुसार ती गोड लागेल. पण तीच जर मला अत्यंत प्रिय वाटणाऱ्या व्यक्तीनें आग्रहानें दिली तर त्यांत मला मिळणारें सुख हें निःसंशय अत्यंत उच्च प्रतीचें आहे. तीच वस्तु त्याच व्यक्तीला मला आग्रहानें देण्यांतहि तितकाच आनंद होईल. एवढ्याच करितां, मला वाटतें, आमच्या धर्मांत कोणतीहि गोष्ट प्रथम देवाला वाहून-त्याचें स्मरण करून नंतरच तीं आपण स्वीकारावयाची पद्धति आहे.

समष्टि जीवन-

एकंदरींत सुखाचें खरें अधिष्ठान सात्त्विक-उच्च भूमिकेंत आहे. अशा मनोभूमिकेंतून मिळणाऱ्या सुखानें जसा एक प्रकारचा अदृश्य, आत्मिक आनंद मिळतो तसा भौतिक स्वरूपाचा प्रत्यक्ष आनंदहि मिळतो. अशा प्रकारच्या मनोरचनेनें दोन व्यक्तींत नव्हे तर व्यक्तिसमुदायांत परस्पर संबंध जिव्हाळ्याचे राहून एकोपा

वाढतो. परघातकी स्वार्थी वृत्ति कमी कमी होत जाते. समाजांत स्वास्थ्य व शांतता राहते. दुसऱ्याच्या जीवनाकडे सहानुभूतिपूर्वक पाहण्याचा आरंभ येथून होतो. आपल्याप्रमाणेंच इतरांनाहि मानानें जगावयाचें असतें ही जाणीव उत्पन्न होते. अशा तऱ्हेनें समष्टि जीवन जगण्यामध्यें मनुष्य एकमेकांपासून पुष्कळ गोष्टी शिकत असतो. आपली आत्मिक उन्नति लोकांच्या बरोबरीनें करून घेतो.

तत्त्वज्ञानाचा जन्म

स्वार्थाच्या धडपडींत ज्याचें उभें आयुष्य गुरफटून गेलें आहे असा मनुष्य जर त्या जाळ्यांतून जरा बाहेर पडला तर वर सांगितल्याप्रमाणें तो शेजारच्या व्यक्तीकडे सहानुभूतिपूर्वक पाहून त्याच्याशीं आपला जिव्हाळ्याचा संबंध आणतो आणि एकदां असें झालें म्हणजे आपला औट हाताचा देह आणि त्याच्या आकांक्षा यांच्या पलीकडे कांहीं जग आहे ह्याची त्यास कल्पना येऊं लागते. आणि मग जरा वरच्या वातावरणांतील विचार त्याच्या मनांत येऊं लागतात. दुसऱ्याविषयीं सहानुभूतीचा विचार करतां करतां एकंदर मानवजातीसंबंधानें विचार आल्याशिवाय राहात नाहीं. जेव्हां अखिल मानवजात ही नेहमीं दुःखांतच खितपत पडलेली तो पाहतो तेव्हां तीं दुःखें नष्ट करण्याचे विधायक विचार त्याच्या मनांत येतातच. परंतु एकीकडे त्या दुःखांची मीमांसा त्याच्या मनांत सुरू झाल्याशिवाय राहत नाहीं. याच वेळीं तो मनुष्य तत्त्वज्ञानांत प्रवेश करतो. मनुष्य एकदां अशा प्रकारें तत्त्वज्ञानांत शिरला म्हणजे त्याची मनोवृत्ति तात्त्विक स्वरूपाची बनते. सर्व चराचर सृष्टीचें कारण काय असावें ? असंख्य मूकजीव निर्माण कसे झाले ? विश्वाचा व्यवहार सुव्यवस्थित चालतो कसा ? एक दुःखी तर दुसरा सुखी कां ? इत्यादि विचारमालिका त्याच्या डोक्यांत चालू राहते. कारण तत्त्वज्ञानाचा जन्म सहानुभूतीच्या पोटीं आहे.

तत्त्वज्ञानी विचार मनांत येणें हें सुसंस्कृत मनाचें लक्षण आहे. अडाणी मनुष्यास हे केव्हांहि सुचावयाचें नाहीं. त्यास वेळ मिळत नाहीं हें म्हणणें खोटें आहे. गोडी असली म्हणजे वेळेची अडचण भासत नाहीं. आपल्या कामधंद्याव्यतिरिक्त पुष्कळ व्यसनांची गोडी त्यास असते व त्याकरितां तो वेळच काय पण वाटेल तें खर्ची घालतो ना ? तेव्हां मन हीनप्रतीचें हेंच खरें.

तत्त्वज्ञानाचा हेतु–

एखाद्याला तत्त्वज्ञानाचें प्रत्यक्ष ज्ञान कांहीं नसलें आणि तें मिळवितांहि येणें

अशक्य वाटत असलें तरी चालेल. मनाला नुसती गोडी वाटणें ह्यानेंच मनोवृत्तींत फरक पडतो. या फरक पडलेल्या मनोवृत्तींत अंतःकरणाची विशालता असते आणि याचा परिणाम सर्व जीवनावर होऊन माणसाच्या प्रत्येक कृतीवर तिची छाप पडल्याशिवाय राहत नाहीं. एवढें झालें म्हणजे तत्त्वज्ञानाचें बरेंचसें सार्थक झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण मनुष्यास सुसंस्कृत आणि साहानुभविक करणें हाच सामान्य जनतेंत तत्त्वज्ञानाचा प्रमुख हेतु असतो. हा हेतु सिद्धीस गेला म्हणजे जगांतील बरींचशीं दुःखें कमी होतील.

बुद्धि आणि भावना–

मनुष्य व्यवहार करतो त्यांत विचार व भावना यांचें कमी अधिक प्रमाणांत संमिश्रण झालेलें असतें. कांहीं गोष्टी अशा असतात कीं, त्यांत विचार नसतो व भावनाहि नसते. त्या केवळ औपचारिक शिष्टाचार म्हणून कराव्या लागतात. परंतु मनुष्य हा बुद्धिप्रधान प्राणी आहे, त्याची प्रत्येक कृति तर्कशुद्ध असते, निदान असली पाहिजे; हें विधान चुकीचें आहे. मनुष्य बुद्धिप्रधान आहे. हें खरें असलें तरी केवळ बुद्धिमय नाहीं. बुद्धि, मन व शरीर या त्रयीनें मनुष्यप्राणी बनला आहे. यांपैकीं एक जरी साधन कमी पडलें तरी मनुष्य हा मनुष्य म्हणण्यास अपात्र होतो. जीवन यशस्वी होण्यास तें भावनाप्रधान असावें लागतें. मनुष्य जर केवळ बुद्धिप्रधान राहील आणि बुद्धीलाच सारथी करील तर फार अनर्थ होईल. भावनाविरहित बुद्धि हा दुर्गुण असून संहारी राक्षसाप्रमाणें आहे. चालू काळांतील युद्धांत चाललेली प्राणहानि, वाढत्या प्रमाणांतील दरवडे, खून, आत्महत्या इ. अपकृत्यें–यांतून दिसून येणाऱ्या अभिनव पद्धती, दरिद्र्यास पिळून काढण्याच्या कौशल्यपूर्ण आधुनिक तऱ्हा या गोष्टी वरील विधानाला पुष्टिदायक अशा आहेत. या बुद्धिप्रधान युगांत परहितता फक्त मुखांतच राहिली आहे. प्रत्यक्ष काम करणारे हात हे स्वतःच्या खिशांतच आहेत. सारांश, बुद्धीला भावनेची जोड नसली म्हणजे ती आपली शक्ति दुसऱ्याचा नाश करून स्वार्थ साधण्याकडे खर्च करते. उलट उच्च मनोभावनेनें प्रेरित झालेली बुद्धि लोककल्याण साधून आत्मोन्नति करते. बुद्धि हा एक प्रवाही द्रवपदार्थ आहे. त्यास मोकळा सोडला असतां जिकडे वाव मिळेल तिकडे तो धांव घेतो. स्वस्थ बसणें हा त्याचा धर्म नाहीं. धरणबंधारे बांधून पाण्याला योग्य वळण दिल्यास कल्याणकारी अफाट शक्ति निर्माण होते. नाहींतर त्याच्या पुरानें अचाट संहारहि होतो तसेंच बुद्धीचें आहे.

बुद्धीला वळण

रोजच्या व्यहारांतहि ही गोष्ट प्रत्यंतरास येते. दुष्ट स्वभावाचा मनुष्य बुद्धिमान असला म्हणजे तो अधिक कारस्थानी असून त्यापासून धोका अधिक असतो. परंतु तो जर बावळट असेल तर त्याची दुष्ट वासना मनांत राहील. क्वचित् कृतींत उतरल्यास ती कृति कधीं सफल होत नाहीं. ( हें जणूं पक्कें माहीतच असतें, म्हणून अशा माणसाच्या धमकावणीला कोणी भीकहि घालीत नाहीं. ) उलटपक्षीं सुस्वभावी बुद्धिमान मनुष्य एखाद्यावर संकट आलें असतां आपल्या अक्कलहुशारीनें नाना प्रकारांनीं त्या संकटांतून त्याचें निवारण करीत असतो. पूर्वींचा व आतांचा–दोघेहि बुद्धिमान परंतु स्वभावभिन्नतेमुळें केवढा फरक पाहा !

श्रद्धा कां हवी ?

यावरून बुद्धीच्या मुळाशीं सद्भावना आवश्यक आहे असें दिसतें. मनुष्य कितीहि बुद्धिवादी असला तरी त्याची श्रद्धा कुठेंना कुठेंतरी असतेच. 'श्रद्धामयोऽयं पुरुषः।' ( गीता ) भावनाप्रधान मनुष्य भावनावश होऊन झटकन् एकाद्या ठिकाणीं कांहीं विशिष्ट प्रसंगानें श्रद्धा धरील तर बुद्धिवादी अनेक अनुभव घेऊन, उलटा सुलटा विचार करून नंतर विचारानें ठरवील कीं या ठिकाणीं श्रद्धा धरावी. श्रद्धा ही सात्त्विक भावना ( श्रद्धा ही राजस व तामसहि असते–गीता–अ. १८ ) अशी आहे कीं, त्या ठिकाणीं मनुष्य अगदीं तन्मय होऊन जातो. त्यासाठीं स्वार्थत्याग करावयास तयार होतो. श्रद्धास्थान हें ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार व बुद्धिनुसार भिन्न असेल. मनुष्याचें मन मोठें करण्यास हें श्रद्धास्थान फार उपयोगी पडतें. श्रद्धास्थान प्रत्येक व्यक्तीस असणें आवश्यक व हितकारक आहे. परंतु तसें बहुतेकांना नसतें. याला कारण पुष्कळ अंशीं स्वतःविषयीं खोटा अभिमान हें असतें. श्रद्धा असणें हें भावनेचें कार्य आहे. भावनेनें घेतलेलें कार्य कधीं कमी पडावयाचें नाहीं व तें चिरकाल असतें. बुद्धीचा भरंवसा देतां येत नाहीं. श्रद्धा असणें हें सुद्धां सुशील मनाचें लक्षण आहे. दरवडेखोरांची आपल्या टोळीनायकावर श्रद्धा असते. तें सुद्धां मानसशास्त्रीय दृष्ट्या सुशील मन आहे. परंतु परिस्थितीमुळें म्हणा ( वा मनाच्या इतर रानटी गुणामुळें म्हणा ) ती श्रद्धा अस्थानीं पडते. मन शास्त्रीय दृष्ट्या सुशील असलें तरी तें सुसंस्कृत असणें अवश्य आहे. रानटी लोकांचें मन सुसंस्कृत नसतें. त्या भावनेचें उदात्तीकरण झाल्यास तेंच मन कल्याणकारी होईल.

श्रद्धा हें हुकमी हत्यार आहे–

समाजनेते प्रथम लोकांच्या मनांत श्रद्धा निर्माण करतात. समाजाचें असें सर्वांचें मिळून एक श्रद्धास्थान झालें तर वैयक्तिक व सामाजिक दृष्टया तें फार हितकर होईल. या श्रद्धेच्या जोरावर नेत्यांना सर्व समाज वाटेल तसा वळवितां येतो. सर्व समाजानें आपल्या श्रद्धादेवतेकडे एकरूपानें जावें यांत समाजाचें हित नाहीं असें कोण म्हणेल ? भौतिक शास्त्रीयदृष्टया ईश्वर असो वा नसो परंतु आमच्या प्राचीन समाजशास्त्र्यांना ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव लोकांना करवून द्यावी लागली याला तरी कारण हेंच असावें. श्रद्धेनें जें कार्य होतें तें बुद्धीनें होत नाहीं.

याकरितांच समाजांत उदात्त तत्त्वें व अवतार यांचा जन्म होतो. ज्यांना हें पटत नाहीं व पुराणें थोतांड म्हणून त्यांचा अव्हेर करतात त्यांना समाजाचें मानसशास्त्र कळत नाहीं असें म्हणावें लागतें. समाजांतील वरचा पांढरपेशा वर्ग कमी भावनाप्रधान असून अधिक बुद्धिवादी असतो. बहुजनसमाज बुद्धिप्रधान कमी असतो. त्यास तत्त्वज्ञान पटविण्यास गेलांत तर त्यास तें मुळींच पटावयाचें नाहीं.

उच्च जीवितकार्य–

व्यक्तीच्या जीवनाला वळण मिळण्यासाठीं एखादें उदात्त तत्त्व ध्येय म्हणून एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं पूज्यभाव–श्रद्धा अशा गोष्टी असणें महत्त्वाचें आहे. मनुष्याचा आदरभाव कोठें तरी व्यक्त झाला पाहिजे. हीन दर्जाच्या मनोवृत्तीच्या मनुष्यास कोणाविषयींहि आदर वाटत नाहीं. एखाद्याविषयीं आदर असणें, कांहींतरी कार्य जीवनाचें ध्येय म्हणून ठेवणें यामुळें जीवन उच्चमार्गी होत जातें. पाशवी वृत्ति डोकें वर काढीत नाहींत. मानवी अत्याचार कमी कमी होत जातात. मनुष्या–मनुष्यामधील सलोखा वाढत जातो. परजीवासंबंधीं आदर व आस्था वाढूं लागते. विश्वबंधुत्वाचें बीज यांत आहे. दुसऱ्या कोणत्याहि पायावर उभारलेलें विश्वबंधुत्व हें दशग्रंथी ब्राह्मणाच्या मुखांतील वेदोपनिषदांप्रमाणें मुखांतच राहतें. दोन अंतःकरणांत आपलेपणा वाढणें हा मुख्य भाग आहे आणि हें कार्य कोणत्याहि राज्यक्रांतीनें वा पैशाच्या सवयानें किंवा अन्य तऱ्हेच्या करारानें होणारें नाहीं. त्याला तीं दोन मनेंच सुशील असावीं लागतात.

विश्वबंधुत्वाकडे–

विश्वबंधुत्वाचा आत्मा प्रेमळ सहकार्य आहे. तथापि विश्वबंधुत्व ही कल्पना जितकी

व्यापक आहे तितकेंच प्रेमळ सहकार्य हें संकुचित क्षेत्रांत यशस्वी होतें. याकरितां Charity begins at home या म्हणीप्रमाणें प्रेमळ सहकार्य प्रथम अत्यंत संकुचित क्षेत्रांत आचरणांत आणून समोर विश्वबंधुत्वाच्या भोग्यावर दृष्टि ठेवावी आणि त्या प्रेमळ भावनेचें उदात्तीकरण करून हळूहळू लहानांतून मोठ्या क्षेत्रांत पदार्पण करणें श्रेयस्कर होईल. याची पहिली पायरी म्हणून समाजाचें वर्गीकरण करणें इष्ट आहे. खरें सहकार्य या सामाजिक वर्गांतून उत्पन्न होऊन त्याचेंच पुढें भव्य स्वरूप करावयाचें आहे. हें समाजाचें वर्गीकरण मुख्यतः चार प्रकारानें केलें पाहिजे. त्याच चतुर्वर्गाकडे आपण वळूं. त्याची समाजाच्या दृष्टीनें काय उपयुक्तता आहे तेंहि पाहूं.

## वर्णव्यवस्था



### वर्णव्यवस्थेची पार्श्वभूमि

समाजांत बेकारी वाढूं द्यावयाची नसेल, उद्योगधंद्यांची योग्य तऱ्हेनें वाढ व्हावयाची असेल, विद्येचें मोल राखावयाचें असेल, आनुवंशिक शुद्धता, जन्मजात गुणांचा विकास आणि सांस्कृतिक उन्नति करून घ्यावयाची असेल तर समाजव्यवहार सुरळित व सुनियंत्रित चालले पाहिजेत. समाजाचें रक्षण करण्याकरितां जातिवन्त योद्धे, संस्कृतिपोषक-रक्षक विद्वान्, समाजाचें आणि व्यक्तीचें ऐहिक वैभव वाढविणारे धनोत्पादक आणि ज्यांच्यावांचून पदोपदीं नडतें ते समाजसेवा करणारे कामकरी यांची जर निपज अव्याहतपणें व्हावयाची असेल तर त्यांचें कार्य त्यांच्या-कडे वंशपरंपराच चाललें पाहिजे. त्या त्या वर्गांतील व्यक्तींच्या अंगांत त्यांच्या त्यांच्या कर्तव्याचे धडे मुरल्याशिवाय आणि ते त्यांत तरबेज झाल्याशिवाय समाज सुरळित, व शांतपणें नांदणें कठीण आहे.

#### समाज आणि व्यक्ति–

चौकोनी ठोकळे सारखे ओळीनें चौकोनी पेटींत बसविले तर सर्व ठोकळे जागा शिल्लक न राहतां आणि गर्दी न होतां व्यवस्थित चपकल बसूं शकतात. पण तेच वाकडे तिकडे बसविले तर पेटींत जागा शिल्लक राहूनहि कांहीं ठोकळे जागेच्या

अभावीं बाहेरच राहतात. पेटींत बसलेले ठोकळेहि एकमेकांला अडचण न करतां व्यवस्थितपणें बसूं शकत नाहींत. एकाचा धक्का दुसऱ्याला पोंचतोच. समाजपेटीचीहि तीच गत आहे. सामाजिक व्यक्ति ही ठोकळा आहे. समाजांतील व्यक्तीव्यक्तींचीं, जागा, संबंध, व्यवहार व कर्तव्यें नियमित नसलीं म्हणजे कांहीं ठोकळे समाजाच्या बाहेर पडतात. म्हणजे समाजाचा त्यांना कांहीं फायदा होत नाहीं. समाजघटक म्हणून ते मानानें वावरूं शकत नाहींत. ते समाजांत अडगळ होत असतात. याचाच अर्थ त्यांना पोटाला पैसा आणि जगायला मान हीं पारखीं होतात. त्या व्यक्ती गुणी व समाजोपयोगी असल्या तरी समाजांत त्यांना स्थान मिळत नाहीं. त्यांना दारिद्र्यांत व अपमानांत खितपत पडावें लागतें. याच्या उलट समाजाच्या पेटींत बरीचशी जागा शिल्लक राहते. म्हणजे बरेचसे गुण शिल्लक राहतात. पण ते ज्यांत प्रवेश करतील अशा व्यक्तीच कमी पडतात. व्यक्तीशिवाय गुणांचा विकास नाहीं, गुणांशिवाय संस्कृतीची प्रगति नाहीं, संस्कृतीशिवाय समाजसुख नाहीं, समाजसुख नाहीं म्हणजे कांहीं नाहीं. समाजपेटींत दोन ठोकळ्यांमध्यें जागा शिल्लक राहणें म्हणजे त्या त्या ठोकळ्याच्या भोंवतालीं शिल्लक असलेली जागा–त्या त्या व्यक्तीच्या भोंवतालीं असलेले गुण तसेच अदृश्य रूपांत राहतात, त्या गुणांची वाढ होत नाहीं. त्यांना मूर्तस्वरूप येत नाहीं; किंबहुना ते गुण नष्टप्राय होत जातात. व्यक्तीवर अधिष्ठित असलेल्या गुणांचा लोप होऊं लागल्यावर त्या गुणांवर जगणारा–पुष्ट होणारा समाज मृतप्राय होतो. समाजांतील व्यक्ति हें समाजपुरुषाचें पार्थिव शरीर आणि त्या व्यक्तीच्या अंगीं असणारे अदृश्य गुण हे त्या पुरुषाचे वायुरूप प्राण आहेत. समाजाची धारणा आणि पोषण या प्राणांवरच अवलंबून आहे. समाजाला वैभव दाखविणारी संस्कृति म्हणजे गुणी व्यक्तींच्या गुणांचा प्रकट परिणाम आहे. समाजांतील व्यक्ति ज्या प्रमाणांत गुणी असतील, ज्या प्रकारानें आणि ज्या प्रकर्षानें आपले गुण त्यांनीं दाखविले असतील त्या मानानें त्यांच्या संस्कृतीची उच्चता अवलंबून राहील. परंतु हे गुणच जर समाजाच्या विस्कळितपणामुळें नष्ट होऊं लागले तर त्या समाजाला कसली आशाच नको.

## समाज विस्कळित कां होतो ?

एकीकडे समाजपेटींत जागा नाहीं म्हणून कांहीं व्यक्तींना समाजबाह्य व्हावें लागतें, तर समाजांत गुणावकाश आहे परंतु त्याला दृश्य–प्रत्यक्ष स्वरूप देण्याला

व्यक्तिच नाहींत. अशा या दोन भिन्न परिस्थितींत आणखी तिसरी चमत्कारिक स्थिति समाजांत निर्माण होते. त्यामुळेंहि समाजांत असाच हाहाःकार होतो. समाजपेटींत विस्कळितपणें जे ठोकळे बसलेले असतात, ते तरी कोठें सुखासमाधानानें नांदतात ? एकाचें दुसऱ्या ठोकळ्यावर ओझें बसून पहिला त्यामुळें दडपून जातो. अशीच सगळ्या ठोकळ्यांची स्थिति. एक जुलूम करणारा तर दुसरा त्याखालीं गुदमरून जाणारा. समाजव्यवस्था बिघडली म्हणजे असेंच होत असतें. बळी तो कान पिळी ही म्हण सार्थ होते. एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीच्या सत्तेच्या, पराक्रमाच्या दडपणाखालीं दडपली जाते. ज्या गुणांची मूर्तता झाली असेल त्यांना राक्षसी स्वरूप येऊन ते भोंवतालच्या वातावरणास असह्य होतात. अशा तऱ्हेनें विस्कळितपणामुळें एकाचें दुसऱ्यावर ओझें पडूं लागलें म्हणजे अस्वस्थता आणि बेबंदशाही निर्माण होते. कांहीं वस्तूंचा ढीग असावा; त्या वस्तू घेण्यासाठीं बरींचशीं मुलें तिकडे धांवावींत, सर्वांनीं गोंधळ करून भक्ष्य स्वतःला मिळावें म्हणून प्रत्येकानें त्या ढिगावर हल्ला करावा आणि मग मिळाल्या तर कोणाला भरपूर वस्तू मिळाव्यात, नाहींतर कोणी हात हालवीत मागें परतावें, तर बऱ्याचशा वस्तूंचा नाश व्हावा. अशाच प्रकारचा देखावा विस्कळित समाजांत नित्य दिसून येतो. प्रत्येकाचीं कर्तव्यें, अधिकार, कार्यक्षेत्र आणि प्राप्ति हीं वांटण्यांत शिस्त नसली म्हणजे वरील प्रकार अनुभवास येतो.

### खरी प्रगति कोणती ?

परंतु केव्हां केव्हां अशा प्रकारचाहि समाज पुढें गेलेला दिसून येतो, प्रगत होत असलेला दिसतो. त्याचें कारण ज्या मूठभर दैववान् लोकांना संधि मिळत जाते आणि हिचा लाभ घेतां येतो असेच लोक समाजाच्या आघाडीवर दिसतात. आणि म्हणूनच समाज प्रगत झाल्याचा प्रथमदर्शनीं दाट भास होतो. समाजाची प्रगति वा सुव्यवस्थितपणा मूठभर संधिसाधूंच्या सुखावर, विद्येवर व वैभवावर नसून समाजांतील दरिद्री, अडाणी आणि पशुवृत्तीच्या लोकांच्या किमान संख्येवर अवलंबून असतो. बाकीचे लोक अज्ञानांत असतांना एखादी व्यक्तिच पुढें गेलेली दिसली तर तें श्रेय निसर्गाला आहे, मानवी प्रगतीला नाहीं. प्रगतिगुण अवास्तव पसरलेले असतात. ते सृष्टीमध्यें कोणाच्या तरी वांट्याला येणारच. परंतु तेच गुण

जास्तींत जास्त लोकांना जास्तींत जास्त प्रमाणांत येऊं देणें यांत मानवी प्रयत्न आहे, पराक्रम आहे अर्थात् श्रेयहि आहे.

अशाकरितां समाज विस्कळित नसावा, समाजांतील व्यक्तीव्यक्तींचे संबंध नियमित असावेत, सामाजिक कर्तव्यें आणि आर्थिक व्यवहार शिस्तशीर सारख्या व योग्यप्रमाणांत ठरावेत म्हणजेच समाजांत वर्णव्यवस्था पाहिजे.

समाजाचे आधारस्तंभ–

संस्कृति, संपत्ति, संरक्षण, आणि सेवा हे समाजाचे चार आधारस्तंभ आहेत. या चतुष्टयांत कमी जास्त प्रमाण झालें तर त्यावर वसलेली समाजाची पातळी डगमगावयास लागते. शरीरांत वारा क्षार असतात त्यांचें शरिरांतील प्रमाण वदललें तर रोग उत्पन्न होतो, शरीर नादुरुस्त वाटल्यास मूळ वारा क्षारांतील प्रमाणांत विकृति झाली आहे हें निश्चित समजावें. अर्थात् त्यावरील उपाय क्षारांतील प्रमाण–स्थैर्य राखणें हाच होय. संस्कृति, संपत्ति, संरक्षण, आणि सेवा यांच्या प्रमाणांत विकृति झाल्यास समाजाला तें हितावह होत नाहीं.

एका वर्णाचें वर्चस्व अनिष्ट कां?

समाजांत ज्या वर्णाचें वर्चस्व असेल तो वर्ण आपली छाप सर्व समाजावर पाडून सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करतो. इंग्लंडमध्यें वैश्य समाजाचें वर्चस्व आहे. त्या प्रमाणें इंग्लंडमधील राज्यसूत्रें वैश्यांच्याच हातांत आहेत असें म्हणण्याला हरकत नाहीं. राज्याचें धोरणहि तेंच आहे. रशियांत शूद्र–सेवा वर्णाचें वर्चस्व आहे. त्याप्रमाणें त्या देशाचें धोरणहि शूद्रवर्णास उत्तेजक आहे. वर्चस्व गाजविणारा वर्ण नेहमीं आपल्याच वर्णाला प्राधान्य देत असतो. पूर्वीचें वर्चस्व असह्य झाल्यामुळें छळला गेलेला व त्यामुळें जागृत असणारा वर्ग आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याकरितां, लोकांवर छाप पडावी म्हणून उदात्त तत्त्वांची आधारकाठी घेऊन आपला मार्ग आक्रमीत असतो. तीं तत्त्वें स्वयंभू उदयास आलेलीं नसून विशिष्ट परिस्थितीचा तो आघात आहे एवढेंच. त्या क्रान्तिकाळांत एखाद्या पक्षास पुढें सरसावण्याकरितां उदात्त तत्त्वांचा नेहमीं उदय होत असतो. म्हणूनच युरोपांत आजपर्यंत निर्माण झालेल्या समाजरचना कांहीं काळ उगवून कालांतरानें मावळून गेल्या. पहिलीनंतर दुसरी येते ती त्रिकालाबाधित स्वयंभू तत्त्वांवर उभी न राहतां तत्पूर्व विशिष्ट

परिस्थितीचा तो परिणाम म्हणून नवीन समाजरचना अंमलांत येते. ती तत्पूर्वील एका टोंकाला गेलेल्या समाजरचनेची प्रतिक्रिया असते. प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेली कोणतीहि समाजरचना चिरकाल टिकत नाहीं व समाजाला हितावह होत नाहीं. चिरकालीन हितासाठीं लागणारे गुण त्या प्रकारच्या समाजरचनेंत असणेंच शक्य नाहीं. पूर्वी वर्चस्व असलेली समाजरचना एका टोंकाला जाऊन ती असह्य होत असल्यानें अगदीं तिच्या विरुद्ध गुणधर्माची रचना तात्काल प्रस्थापित होणें अवश्य आणि साहाजिक असतें. परंतु ती प्रतिक्रिया याच काळापुरती योग्य असते. समाज स्थिरस्थावर झाल्यावर समाजनेत्यांनीं दुसरी चिरकालीन समाजरचना अंमलांत आणणें अवश्य असतें. पण असा प्रयत्न अजून कोठेंच झालेला दिसून येत नाहीं. ही प्रतिक्रिया नेहमीं एकवर्णाधिष्ठित—एकांगी असते. त्यांत सर्व समाजाचा समावेश होत नाहीं; पण तो वर्ण सर्व समाज व्यापून टाकण्याचा प्रयत्न करीत असतो. असा प्रयत्न होऊं लागला म्हणजे समाजव्यवस्था बिघडूं लागते. सत्तेच्या जोरावर तो यशस्वी होऊं लागला तर इतर वर्णीयांची कुचंबणा होते. इतर वर्णांचे गुण लुप्त होऊं लागतात. गुण नष्ट होणें यासारखें समाजाचें दुसरें नुकसान नाहीं. इतर वर्णीय खुषीनें व परिस्थितीच्या सक्तीनें सत्ताधिष्ठित वर्णाचें अनुकरण करूं लागतात. त्यांच्यांत अस्वास्थ्य निर्माण होतें. अशा तऱ्हेनें असंतोषाचा अतिरेक झाला म्हणजे सत्ताधिष्ठितवर्णाच्या वर्चस्वाविरुद्ध प्रतिक्रिया सुरू होते. त्यामुळें जो अन्य वर्णाकडून पीडित होतो तो उचल खातो. जनतेची अनुकूलता मिळावी म्हणून उदात्त तत्त्वांचा आधार घेतो. लढा करून यशस्वी होतो. परंतु मागें सांगितल्याप्रमाणेंच सर्व चक्र पुन्हां सुरू होतें.

### हिंदुसमाजांतील वर्णव्यवस्था–

याप्रमाणें एकवर्णाधिष्ठित समाजरचना ही मुळांतच सदोष आहे. पण हें समाजशास्त्राचें मूलतत्त्व अजून एकाहि देशाला समजलेलें दिसत नाहीं. भारतीय समाजरचना आणि तदनुषंगानें राज्यव्यवस्थाहि समाजव्यापक आहे. त्यांत सर्व वर्णांना म्हणजे सर्व प्रकारच्या विद्यांना व उद्योगांना योग्य महत्त्व दिलेलें आहे. क्षत्रियांनीं संरक्षण करावें– राज्य राखावें, पण त्यांचें वर्चस्व होऊं न देतां ब्राह्मणांच्या सल्लयाशिवाय राज्यकारभार चालूं नये. राजानें ब्राह्मणाला आपल्याहून श्रेष्ठ मानावें. तरी ब्राह्मणांच्या हातांत पैसा राहतां कामा नये. म्हणून धनार्जन करणें

ब्राह्मणाला निषिद्ध आहे. धनोपासना वैश्यांनींच करावी. त्यांच्या हातांत धन विपुल असलें तरी सत्ता नाहीं. ब्राह्मण तर श्रेष्ठ मानला पाहिजे. धनावांचून राज्यकारभार चालणें शक्य नाहीं. म्हणून धनिक राज्यकर्ते येऊन चालणार नाहीं. ब्राह्मण हा सर्वश्रेष्ठ मानला गेला असला तरी शिरजोर होण्यास सत्ता व पैसा नाहीं. राज्याचे प्राण–रक्षण, कारभार आणि धन–विभागले गेल्याकारणानें समाजांत सर्व वर्णांचें सारखें हित होतें. तीनहि प्राण एकांतच न एकवटून एकच वर्ण शिरजोर होऊं शकत नाहीं. क्रूरांचा, अन्याय्यांचा सुळसुळाट माजणार नाहीं. मग रक्तपाती क्रान्त्यांचें कारणच उरत नाहीं. ज्या सुधारणा हव्या असतील त्यांना सर्व समाजाची संमति मिळते. एकाच वर्णाला वर्चस्वी स्वार्थ साधतां येत नाहीं. जुलुमाला कंटाळून, छळानें पीडित होऊन समाजांत अंदाधुंदी माजत नाहीं. प्रतिक्रियेला वावच मिळत नाहीं. अशा वेळीं प्रतिक्रियोत्पन्न एकवर्णाधिष्ठित समाजरचना अंमलांत येणार नाहीं.

वर्णभेद–

समाजांत वर्णव्यवस्था असावी हें तात्त्विक दृष्ट्या ठीक आहे. पण प्रत्यक्षांत उतरविणें आधुनिक युगांत महा कठिण काम आहे. त्यांत अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात. प्रथम म्हणजे वर्णव्यवस्था कोणत्या तत्त्वावर उभी करावयाची ? गुणकर्मानुसार कीं जन्मावरून ? असे वर्णभेद करण्यानें समाजांत जातिवैमनस्य वाढणें संभवनीय आहे. एकाला ब्राह्मण म्हणून पूज्य मानणार आणि दुसऱ्याला शूद्र म्हणून अकारण अस्पृश्य लेखणार. मग मानवी बंधुत्वाच्या गोष्टी कशाला ? वर्णभेद निश्चित झाल्यानें व्यक्तीच्या कर्तृत्वाचें कार्यक्षेत्र संकुचित होईल. पुष्कळांची कुचंबणा होईल.

वैश्यवृत्तीचें वर्चस्व–

आधुनिक भारतीय समाज वैश्यवर्णाच्या वर्चस्वाखालीं आहे. सर्व समाज वैश्य झाला आहे. एवढेंच नव्हे तर भारतीय धर्मसंस्था व समाजसंस्थाहि वैश्य झाल्या आहेत. त्यामुळें ब्राह्मणांची कुचंबणा होत आहे. ब्राम्हणांची म्हणजे ब्राह्मण गुणांची. ब्राह्मण म्हणजे विद्योपासक. विद्वान लोक द्रव्याभावीं समाजबाह्य झाले आहेत. समाजांत त्यांना स्थान नाहीं. विद्वानांच्या समवेत विद्येचीहि कुचंबणा किती होत आहे हें सहज समजण्यासारखें आहे. त्यामुळें समाजांत अज्ञान आणि अनीति यांचा जोरानें प्रसार होत आहे. आमच्यांतून क्षत्रियवृत्ति पार नष्ट होत गेली आहे. क्षात्रवृत्तीच्या अभावीं आम्ही आमचें रक्षण करण्यास असमर्थ झालों आहोंत. शौर्याचा

गंधहि आम्हांस नाहीं. आमच्या विद्येंत वणिग् वृत्तीनें प्रवेश केला हें सध्यांच्या विद्यालयानें सिद्ध होण्यासारखें आहे. क्षात्रवृत्ति ही द्रव्याचे आधीन झाली आहे. आधीं कोणांत क्षात्रतेज नाहींच; जर तें कोठे असेल तर त्याचें आम्हो प्रदर्शन करतों. आमच्या शौर्याचे खेळ करून त्यावर आम्ही पैसे मिळवितों. खालच्या वर्गातील लोकांच्या शौर्याचें रूपांतर दरवडे आणि बंडखोरी यांत झालें आहे. ब्राह्मण आणि क्षत्रिय नष्ट झाल्यावर सेवा करणाऱ्या शूद्रांनींच काय पाप केलें आहे ? मोल मजुरी करून कसें तरी पोट भागविणें हाच त्यांचा आयुष्यक्रम आहे. वैश्यवर्णांत इतर वर्णांचा भरणा होत असल्यानें वैश्यांच्या प्रगतीस अडथळा येणें अगदीं साहजिक आहे. द्रव्यलोभानें वाटेल तो वैश्य झाल्यानें व्यापारांत प्रगति होत नाहीं. सारांश, वैश्यवृत्तीचा दुरुपयोग होऊं लागला. ब्राह्मण आणि क्षत्रिय गुण नष्टप्राय झाले. याचें कारण सर्वांवर मात करूं पहाणारी आमची एकवर्णाधिष्ठित समाजरचना.

वैश्य वर्णाचें हें प्राबल्य अधिकाधिक वाढून इतरेजनांस असह्य झालें म्हणजे ब्राह्मण वा क्षत्रिय वर्ण उचल खाईल. प्रतिक्रिया म्हणून एक वर्ण पुढें सरसावेल. तो आपल्यासवें उदात्त तत्त्वें घेऊन येईल यांत शंका नाहीं. तो वर्ण तरी वर्चस्व गाजवील किंवा हे दोन्ही वर्ण अजून सुप्तावस्थतेंत असतील आणि अस्पृश्यांना जाच जास्त होत असेल तर शूद्रवर्गहि आघाडीवर येऊन समाजावर सत्ता गाजवील; परंतु ही सर्व प्रतिक्रियात्मक एकवर्णाधिष्ठित समाजरचना होणार. हा धडा आम्ही युरोपकडून शिकलों.

## समाजांतील वर्णव्यवस्था

आधुनिक वर्णव्यवस्था–

वरील विवेचनावरून सद्यःस्थितींतील भारतीय समाजांत वर्णांची व्यवस्था लावणें इष्ट होईल हें दिसून येतें. पूर्वकालीन चातुर्वर्ण्य जसेंच्या तसें अंमलांत आणणें शक्य नाहीं. हें कार्य थोड्या अवधींत होण्यासारखें नाहीं. पारतंत्र्याची तरवार मानेवर थरथरत असतां समाजाचे हातपाय लटपटणारच. ते स्थिरावणें शक्य नाहीं. म्हणून भारतीय स्वातंत्र्योत्तर कालांत राजसभेनें हें कार्य हळू हळू अंगावर घ्यावयास हवें आहे. वर्ण म्हटल्याबरोबर आपल्या मनश्चक्षूंसमोर पूर्वीची जन्मानें सिद्ध होणारी ‘चातुर्वर्ण्य’ व्यवस्था तात्काळ उभी राहते. त्यामुळें वर्णव्यवस्थेचा

बागुलबोवा जास्तच भेवडावूं लागतो. परंतु ती कल्पना सध्यांतरी आपण पूर्णपणें विस्मरून गेलों पाहिजे. वर्णांची व्यवस्था करतांना अशा तऱ्हेनें प्रारंभ करतां येईल—

वैश्यवर्ण–

प्रथमतः व्यापार नियमित केला पाहिजे. व्यापाराचें प्रमाण अवास्तव वाढल्यानें व्यापारप्रांतांत कोणाचाच पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाहीं. जो उठतो तो द्रव्यलोभानें नवीन शक्कल काढून जाहिरात करतो व आपला अभिनव माल खपवीत बसतो. व्यापारांतील खरें कौशल्य या परक्यांस अवगत नसतें. वाटेल तसा भरणा होऊं लागला म्हणजे व्यापारांत स्पर्धा वाढूं लागते. स्पर्धेचा परिणाम वाईट, दिखाऊ मालाच्या उत्पादनांत होतो. जाहिराती भडक होतात. त्यामुळें जनतेला वाईट परिणाम भोगावा लागतो. राष्ट्रांतर्गत व्यापारावर नियंत्रण घालणें स्वतंत्र राष्ट्राला अशक्य नाहीं. व्यापारी शिक्षणाचीं केंद्रें उघडलीं असतां व त्यांवर कडक नियंत्रण घातलें असतां व्यापारी लोकांची मर्यादा ठरेल, ती नियमित होईल. संख्या नियमित झाली म्हणजे व्यापारी मालावर व त्यांच्या मालकांवर नियंत्रण घालण्यास जड जाणार नाहीं. ते नियमित लोक चांगले सधन होतील. व्यापार ठराविक लोकांच्याच हातांत राहील. हा वैश्यवर्ण तयार झाला. नव्यानेंच धंदा करणाऱ्यांना व्यापारांतून बाहेर काढलें पाहिजे. ज्यांचे पिढीजात धंदे आहेत, ज्यांच्या कुटुंबांत व्यापारी कला भिनलेली आहे, ज्यांची कुलपरंपरा व्यापारी आहे, ज्यांच्या मुलांना वास्तविक दुसरीकडे अंग असून जे व्यापारांत पूर्णपणें विमनस्क आहेत परंतु बापाचा जम बसलेला धंदा लोकांकडे जाऊं नये म्हणून ज्यांना व्यापारांत पडावें लागतें अशी ज्यांची स्थिति नाहीं अशांनाच फक्त सरकारीव्यापारी परवाने द्यावेत. बाकीच्यांना व्यापारांतून मुक्त करणेंच चांगलें. उरलेले व्यापारी लोक नियमित संख्येनेंच असणार.

विद्यालयांतून निवड–

व्यापारांतून बऱ्याच लोकांचें उच्चाटन झाल्यानें समाजांत बेकारी वाढेल. ह्या बेकार लोकांचें वर्गीकरण केलें पाहिजे. कांहींना शिक्षणाची आवड असते, बौद्धिक ऐपत असते, परंतु आर्थिक संकोचामुळें शिक्षण साधत नाहीं. कांहींची विद्यालालसा त्यांना वाव न मिळाल्यामुळें सुप्तावस्थेंतच असते. योग्य ते श्रम घेतल्यास ती जागृत होईल. कांहींची शरीरप्रकृति व स्वभावधर्मानुसार क्षात्रवृत्ति स्पष्ट होईल. तर

कांहींना स्वतंत्र व्यापार करण्याची धमक नसते, विद्येंत बुद्धि चालत नाहीं व शौर्यहि नसतें. असे लोक मोठमोठ्या उद्योगधंद्यांतून मजूर म्हणून, लोहार म्हणून, सुतार, चांभार वा अन्य लहान लहान धंदे करण्यास व इतर ठिकाणीं मजुरी करण्याकरितां त्यांचा उपयोग होईल. प्रथम या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयांत कांहीं महिने ठेवून त्यांच्या परीक्षांवरून, त्यांच्या वर्तनावरून आणि त्यांच्या कुलपरंपरेवरून त्यांचें वर्गीकरण करावें. नंतर त्यांस त्या त्या प्रांतांत पाठवून द्यावें.

ब्राह्मण–

विद्येचें पुनरुज्जीवन व विद्यालयांची पुनर्घटना केल्यास बऱ्याच विद्याविलासांना आधार मिळेल. आपल्या विद्येचें चीज होत आहे हें पाहतांच नाइलाजानें व्यापारांत जागा पाहणारे वा आपल्या विद्येचा व्यापार करूं पाहणारे सगळे विद्यासेवक आनंदानें सहजपणें विद्यालयाकडे धांव घेतील, असा विश्वास वाटतो. द्रव्यलोभ्यांप्रमाणेंच विद्यालोभीहि असूं शकतात. परंतु अधोगतीचा तळ पाहणाऱ्या समाजास हे लोक दिसूं शकणार नाहींत. विद्याव्यासंगी आपल्या माहेरघरीं एकत्र जमल्यावर त्यांच्यापुढेंहि कमी कामें नाहींत. त्या लोकांतसुद्धां वर्गीकरण करावयास हवें. कांहींना व्यापारविद्या, यंत्रविद्या, इ. अनेक तांत्रिक विद्यांची आवड असते. परंतु धन मिळवून देणारी व्यापारी वृत्ति नसते. लोक व्यापारशाखांतून शिक्षकाचीं कामें करतील. कृषिवलाविषयींहि असेंच म्हणतां येईल. कांहींना तात्त्विक विद्यांची आवड असते. तर कांहीं बालचमूंतच रमून जातात; त्यांनाहि तीं तीं कामें करून त्यांचा समाजास उपयोग करून देतां येईल. ज्यांना मुलांची आवड आहे त्यांना वसतिगृहांवर नेमतां येईल. कांहीं लोक केवळ स्वतः विद्या शिकण्यासाठीं अभ्यास करीत असतात. स्वतःच्या मनाचें समाधान हाच त्यांच्या विद्यार्जनाचा हेतु असतो. आपली विद्या दुसऱ्यांना शिकविण्याची कला त्यांचेजवळ नसते. अशा विद्याजनांना विद्यालयानें संपूर्ण आश्रय देऊन चालती बोलती जिवन्त विद्या विद्याघरांत सांठवून ठेवली पाहिजे. विद्यालयांतील शिक्षकांची ती गंगाजळी आहे. कांहीं लोक यांच्या उलट असतात. त्यांचेजवळ विद्या बेताचीच असते. परंतु विद्यार्थ्यांना संभाळून घेण्याची व विषय समजून देण्याची हातोटी विशेष असते. अशा प्रकारें निरनिराळ्या प्रकारांनीं विद्यालयांतून कार्य करणाऱ्या विद्योपासकांस 'ब्राह्मण' हें नांव प्रथम मोघम रीतीनें देतां येईल. विद्यालयांत सर्व

वर्णाचे नागरीक सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणून बाहेर पडले पाहिजेत. विद्यालयांत विद्यार्थी म्हणून समाजांतील प्रत्येक लहान मोठ्या व्यक्तीला वाव असला तरी विद्यालयांत व विद्यालयाच्या बाहेरील समाजांत विद्येची निरनिराळ्या तऱ्हेनें सेवा करणाऱ्यांना नीट निरखून पाहूनच घेतलें जाईल- या निरीक्षण -परीक्षणांतूनच खरा ब्राह्मणवर्ग तयार होईल.

सेना आणि शेती

उदरनिर्वाहाची व्यवस्था व कर्तृत्वाचें कार्यक्षेत्र ठरून गेल्यावर समाजांत स्वास्थ्य लाभण्यास अडथळा येत नाहीं. वैश्याचें व्यापार हें कार्यक्षेत्र ठरून गेलें. आणि त्यांतूनच त्यांचा उदरनिर्वाह झाला. ब्राह्मणांचें आयुष्यांतील कर्तव्य त्याच्या त्याच्या विद्येंत आहे. त्याच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था वास्तविक समाजानें करावयाची आहे. परंतु प्रगतीच्या पहिल्याच पावलावर असलेल्या समाजांत व नवार्जित स्वतंत्र देशांत ही व्यवस्था प्रथम राजसभेनें आपल्या शिरावर घ्यावी. समाज जसा स्थिरावत जाईल त्या प्रमाणांत ही व्यवस्था समाजाकडे सोंपवावी. त्यावर राज-सभेची देखरेख असणें अवश्य आहेच. राज्यरक्षणासाठीं व अंतर्गत व्यवस्थेसाठीं निधड्या छातीचे, धाडसी आणि रणप्रेमी लोकांची आवश्यकता आहे. परचक्राला तोंड देण्यासाठीं एक सेना व अंतर्गत व्यवस्थेसाठीं एक असे सैन्याचे दोन भाग पाडतां येतील. संग्रामवृत्तीला पारतंत्र्यांत त्याचें चीज होत नसल्यानें नेहमींच दरवडे, मारामाऱ्या यांचें वाईट वळण लागणार; परंतु स्वतंत्र देशांत त्यांच्या अंगीं असलेल्या शौर्याचें उदात्तीकरण करून मवाली, गुंड म्हटल्या जाणाऱ्या लोकांचा सैन्यांत उपयोग करून घ्यावा. या सर्व सैनिकांची शांततेच्या काळांत आवश्यकता नाहीं. त्यांना पोसणें राजसभेस जड जाईल. याकरितां मध्यंतरींच्या काळांत त्यांनीं घरगुती धंदे करावेत. शस्त्रास्त्रांचें उत्पादन करावें. सैनिकांची शेती असावी. शेवटीं राहिलेल्या ज्या वर्णाचा आपण विचार करणार आहोंत, त्या शूद्रांनीं आणि सैनिकांनीं मिळून शेती संभाळावी. सैनिक युद्धावर गेला तरी त्याच्या घरच्या बायकांमुलांना शेतीचा उद्योग करतां येण्यासारखा आहे. भारतीय समाजव्यवस्थेंत व उद्योगधंद्यांत शेतीला प्राधान्य दिलें गेलें पाहिजे. सर्व शेती सैनिक, शूद्रांच्याच हातांत असावी. विद्यालयाकडे त्या त्या गांवीं थोडीफार शेती जाईल. परंतु तिला

औद्योगिक स्वरूप न राहतां शैक्षणिकच राहील. वरीलप्रमाणें सैनिकांचा व शूद्रांचा उदरनिर्वाह व कार्यक्षेत्रहि ठरलें.

ब्राह्मण, वैश्य यांना शेती नको–

वरील दोन वर्णांशिवाय ब्राह्मण व वैश्य यांस शेती मुळींच देऊं नये. प्रत्येकाला शेती असली म्हणजे उदरनिर्वाहाची कायमची व्यवस्था होते. कोणत्याहि अडचणींत शेतीचा जीवनाला आधार असतो. व्यक्तींच्या आर्थिक सुरक्षिततेसाठीं शेती आवश्यक आहे. असें जरी असलें तरी एकंदर समाजाच्या दृष्टीनें तें हितावह होणार नाहीं. उच्च वर्णीयांकडे शेती जाणें याचा अर्थ शेतीची मालकी–उत्पन्न जाणें. शेतावर मालक एकटा स्वतः कधींच राबत नसतो. पुष्कळ गरीब शेतकरी तेथें राबत असतात. त्यामुळें राबणारा शेतकरी व खाणारा मालक अशी विषमता निर्माण होईल. ब्राह्मणांनीं व वैश्यांनीं शेतीचा धंदा सुरू केल्यास वर्णानें ठरून गेलेल्या आपल्या कार्याकडे दुर्लक्ष होणारच. शेती शूद्र आणि सैनिक यांकडे गेली म्हणजे त्यांची आर्थिक स्थिति सुधारून जाईल. आपला बारीकसारीक घरगुती धंदा आणि या अस्थिर उदरनिर्वाहाला शेतीचा आधार याची जोड चांगली होईल. शेतावर श्रम करणाऱ्याला श्रेय मिळेल. व्यक्तीच्या आर्थिक अस्थिरतेला समाजव्यवस्था कारणीभूत होते. समाजांतील व्यक्तींचें कार्यक्षेत्र व उदरनिर्वाह नियमित नसला–स्वैर, अनियंत्रित असला म्हणजे प्रत्येकाला धडपड करून डोकें वर काढणें भाग पडतें. अवाढव्य व्यापाराच्या आर्थिक घडामोडींत टिकाव लागला तर नशीब ! परंतु समाज चातुर्वर्ण्यावर सुनियंत्रित असला म्हणजे नशिबावर अवलंबून असलेल्या धडपडी लटपटी कराव्या लागत नाहींत. प्रत्येक व्यक्तीचें जें कार्यक्षेत्र असेल त्याला योग्य वाव मिळतोच.

शूद्रवर्ण–

राहतां राहिला शूद्रवर्ण. मोठमोठ्या कारखान्यांच्या वाढीपेक्षां खेड्यांतील उद्योगधंद्याचें प्रमाण जितकें वाढेल तितकी समाजास स्थिरता येईल. हें काम शूद्रांकडे देणें इष्ट आहे. मोलमजुरी करणें, शेती करणें व लहान लहान उद्योगधंदे करणें हीं कामें शूद्रांचीं आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय वा वैश्य यांप्रमाणें शूद्र वर्ण निवडून निराळा काढतां येणार नाहीं. वरील तीन वर्णांतून अर्थात् उरलेले जे लोक ते शूद्रच समजले

पाहिजेत. परंतु शूद्रांतच एखादा बुद्धिमान, विद्याव्यासंगी वा लढवय्या निघाला तर त्याला त्या क्षेत्रांत वाव दिला पाहिजे. भंगी, चांभार, महार हे अतिशूद्रांत मोडतील.

वर्ण जन्मानें नव्हे, कर्मानें–

याप्रमाणें कार्याची विभागणी करून कोणती व्यक्ति व कोणतें कुटुंब कोणत्या क्षेत्रांत मोडतें तें परीक्षितांना सुरुवातीस जरा शिथिल वर्णव्यवस्था निर्माण होईल. सध्यांच्या काळीं ज्याप्रमाणें धान्यनियंत्रण करून प्रत्येकाचें रोजचें अन्न ठरवून दिलें आहे व प्रत्येक व्यक्तीस तेवढेंच धान्य मिळतें त्याप्रमाणें वर्णव्यवस्था करतांना व्यक्तीचें कार्यक्षेत्र ठरवितां येईल. वर्णव्यवस्थेची रूढावलेली धार्मिक मूर्ति प्रथम डोळ्यांसमोर आणूं नये. वर्ण हे जन्मजात करण्याची कल्पना सोडून द्यावी. आधुनिक युगांत प्रारंभीं तरी वर्णव्यवस्था याचा अर्थ उद्योगधंद्यांचें व इतर कार्यक्षेत्रांचें नियंत्रण करून कोणत्या व्यक्तीनें कोणत्या कार्यक्षेत्रांत पडावें व असे कार्यक्षेत्राचे वर्ग निश्चित पण लवचिक करणें असाच केला पाहिजे. हें नियंत्रण व वर्गवारी शिथिल स्वरूपांत कां होईना पण कांहीं वर्षें चालली म्हणजे समाजांत ती रूढावेल. एकदां ही व्यवस्था रूढावली म्हणजे तींत कडकपणा आपोआप येईल. या वर्णव्यवस्थेचा रूढ जातिभेदावर परिणाम होऊं नये. एखादा ब्राह्मणाचा मुलगा सैन्यांत गेला म्हणजे लगेच तो हलक्या जातीचा झाला असें समजूं नये. अथवा त्यानें ब्राह्मणाची स्त्री करूं नये असें नाहीं. जातींशीं या वर्णांचा कांहीं संबंध आणतां कामा नये. कालांतरानें या वर्णभेदास निश्चित स्वरूप सहज येईल. तोंपर्यंत समाजांतील लोकांचें मत त्या दृष्टीनें तयार होईल.

वर्णांचें विशिष्टीकरण–

वर्णव्यवस्थेचें खंडन करतांना कोणी असेंहि म्हणतील कीं, वर्णव्यवस्था म्हणजे नवीन काय केलें? तुमच्या वर्णव्यवस्थेंत जे वर्ण आहेत ते आमच्या समाजरचनेंत आहेतच. सैन्यावांचून लढाया होत नाहींत, विद्यार्थी–शिक्षकांशिवाय एवढालीं विद्यापीठें चालत नाहींत, व्यापारी असल्याशिवाय एवढा व्यापार चालत नाहीं, आणि हलकीं कामें करावयासहि समाजांत मजूर लोक नाहींत असें नाहीं. मग यांहून निराळें असें काय सांगितलें? नांवें बदललीं म्हणजे झाला तुमचा चातुर्वर्ण्य! परंतु या रूढ समाजरचनेला चातुर्वर्ण्य वा वर्णव्यवस्था म्हणतां येत नाहीं. वर्ण

तेच परंतु ते व्यवस्थित, नियंत्रित व नियमित असले म्हणजे त्याला वर्णव्यवस्था म्हणतात. चारी वर्णांचें योग्य प्रमाण पाहिजे. चारी वर्णांचें कार्यक्षेत्र नियमित पाहिजे. म्हणजे प्रत्येक वर्णाच्या गुणांचा परिपोष होतो. वर्णव्यवस्था लावणें म्हणजे समाजांतील प्रत्येक वर्णाचें कार्यक्षेत्र नियंत्रित करून त्याला वळण लावणें. संख्येंतल्या प्रमाणबद्धतेखेरीज त्या त्या वर्णाच्या विशिष्टीकरणानें ( specialisation ) वार्णिक कार्यक्षेत्र परंपरागत चालून त्या कार्यक्षेत्रांत जोरानें प्रगति होते. वर्णाचें विशिष्टीकरण करून ते परंपरागत चालविणें आणि त्यांतून प्रगतीला वाव देणें हें वर्णव्यवस्थेचें प्रमुख कार्य आहे.

## वर्णव्यवस्थेचें मंडन

### जातिभेद नैसर्गिक आहे–

वंशशुद्धि हा एक वर्णव्यवस्थेचा हेतु आहे. परंतु केवळ वर्णभेदानें वंशशुद्धि राहणार नाहीं. वर्णावर्णांतून ते ते आचार व नियम यांच्या कडक पालनानें वरील हेतु साध्य होईल. मात्र वंशशुद्धींतून तीव्र जातिभेद उत्पन्न होऊं नयेत. जातिभेदाचें सध्यांचें स्वरूप कितीहि त्याज्य असलें तरी त्याचें मूळ मात्र अटळ आणि नैसर्गिक आहे. त्या मौलिक जातिभेदाचें स्वरूप उदात्त आणि निरुपद्रवी ठेवण्यांतच समाजनेत्यांची आणि शास्त्रज्ञांची कसोटी आहे. जातिभेदाचें मूळ नैसर्गिक बुद्धिभेदांत आहे आणि अपरिहार्य परिस्थितिनुरूप भिन्न मनोरचनेंत आहे. पिढ्यानुपिढ्या चालत आलेलें हें भिन्नत्व नष्ट होणें अशक्यप्राय आहे. भारतीय समाजाची गोष्ट सोडून द्या. परंतु सुधारणेच्या शिखरावर चढू पाहणाऱ्या सर्व, साक्षर, चातुर्वर्ण्यविरहित, जातिभेदातीत समतेची व बंधुतेची ध्वजा उभारणाऱ्या युरोपीय समाजांत तरी काय पाहावयास मिळत आहे ? उच्च क्षेत्रांत व्यवसाय करणारा सुसंस्कृत सभ्यगृहस्थ चांभाराला, भंग्याला व असलेच उद्योग करणाऱ्या अन्य हलक्या जातींतील मनुष्यांना आपल्या बरोबरीच्या नात्यानें वागविण्यास कचरतोच कीं नाहीं ? क्षणभर रोटीव्यवहार सररासपणें करतो असें गृहीत धरलें तरी स्वतःची बेटी देतांना तो पाऊलभर मागेंच सरकतो. भंग्याच्या बरोबर टेबलावर जेवतांना त्याला त्यांत घाण वाटली नाहीं तर नवलच. सारांश हा भेदभाव निसर्गसिद्ध आहे. युरोपांत जरी हिंदूंच्या प्रमाणें वर्णभेदाचें धार्मिक बंधन नाहीं, तरी

ही स्थिति युरोपांत आहे ! म्हणजे जातिभेद हा नैसर्गिकच आहे. त्याचें पुढें भयाण रूप होऊं नये एवढी मात्र दक्षता घेतली पाहिजे.

समाजाची आधारणी वर्णव्यवस्थेवर म्हणजे आतांच विशद केलेल्या नवीन चातुर्वर्ण्यावर केली. तथापि ही व्यवस्था इतकी व्यापक स्वरूपाची आहे कीं, तेवढ्यानें समाजांत स्वस्थता नांदणें शक्य नसतें. त्या वर्णाचे पुन्हां लहान लहान घटक पाडणें अवश्य आहे. राज्यसंस्थेचे प्रांत, जिल्हा, तालुका, गांव याप्रमाणें समाजशास्त्रांतहि भागविभाग पाडणें श्रेयस्कर आहे. राज्यसंस्थेचा ज्याप्रमाणें ग्रामसंघटना हा शेवटला पण महत्त्वाचा घटक आहे, त्याप्रमाणें समाजाचा कुटुंब हा घटक आहे. त्या कुटुंबसंस्थेचें समाजांत महत्त्व काय, ती कशी आहे व कशी असावयास पाहिजे त्याचा आतां पुढील प्रकरणांत विचार करूं.

## कुटुंब

## २

कुटुंबसंस्थेचें मूळ विवाहसंस्थेंत आहे. विवाहसंस्था स्थिरावलेली व संयमित नसेल तर कुटुंबसंस्था मोडकळीस आलीच पाहिजे. मूळ युरोपांत हिंदुस्थानांतील कुटुंबांप्रमाणें स्थिरावलेलीं कुटुंबें नाहींत. याचें कारण त्यांची विवाहसंस्था हिंदूंच्या-पेक्षां शिथिल व स्वैर आहे. राष्ट्रोद्धार तरुण पिढीवर अवलंबून असून ती पिढी स्थिर व बळकट कुटुंबसंस्थेवर आहे हें कळून चुकल्यावर युरोपीय राष्ट्रें विवाहसंस्था संयमित करण्याचे प्रयत्न करूं लागलीं.

मानवी जीवन सुखानें चालविण्याकरितां मनुष्याला निसर्गदत्त साधनांचा योग्य तऱ्हेनें उपयोग करून घेऊन स्वतःच्या प्रयत्नांनीं नवीन साधनें उपलब्ध करून घ्यावीं लागतात. खाणींतील हिऱ्यास सोन्याच्या दागिन्यांत बसविण्याकरितां त्यांत बसेल त्याप्रमाणें हिऱ्याला योग्य आकार देऊन साफसूफ करून घेणें भाग आहे. निसर्ग-दत्त गोष्टीचेंहि असेंच आहे. निसर्गानें दिलेला प्रत्येक हिरा आपल्या जीवनांत ठीक बसेल अशा तऱ्हेचा कापून घासून तयार केलेला नाहीं. तो आपल्या सोयीप्रमाणें आपणच तयार करून घ्यावयास हवा आहे.

### भावनांचें नियमन–

'ही निसर्गदत्त वस्तु आहे तेथें मनुष्याचा नाइलाज आहे, ती आहे तशीच

वापरावी लागणार असें न केल्यास अनर्थ होईल.' असें म्हणून निसर्गदत्त मानवी भावना आपण जशाच्या तशाच उपयोगांत आणूं लागलों तर जगांत फार अनर्थ माजतील. व्यक्तिगत स्वार्थ ही अशीच एक मनोभावना आहे. ती जर तशीच वापरली तर समाजांत सौख्य व शांति कधीं लाभणेंच नाहीं. विषयवासना हीहि त्यांपैकींच आहे. पण त्याचा फाजील उपयोग केला तर आत्मनाशाप्रमाणें समाजाचाहि नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. पण या अशुद्ध हिऱ्यांबरोबरच त्यांना तासून ठीक करण्यासाठींच निसर्गानें सदसद्विवेकबुद्धीची कांचहि आपणांस दिली आहे, त्याचा उपयोग करणें आवश्यक आहे.

विषयवासनेचें उदात्तीकरण–

विवाहसंस्थेचा उगम मुख्यतः मनुष्याच्या विषयवासनेंतून झाला आहे. कामतृप्तीसाठीं स्त्री–पुरुषांनीं एकत्र येणें आवश्यक होतें. प्रथमावस्थेंत याला बंधनें अर्थात्च नव्हतीं. केवळ शरीरसुखासाठीं वाटेल त्या स्त्री–पुरुषांचा वाटेल तेव्हां संबंध येत असे. त्याचा परिणाम असा झाला कीं, संतति भराभर वाढूं लागली पण तिची योग्य काळजी कोणीच घेत नसे. त्यामुळें पुढील पिढी कमकुवत होऊं लागली. मनुष्यांत परस्पर आपलेपणा नष्ट होऊन प्रत्येकजण दुसऱ्याशीं बेफिकीरपणें वागूं लागला. स्त्रियांवरून तंटे सुरू झाले. याचा फायदा घेऊन इतर टोळ्यांनीं यांच्यावर हल्ले करण्यास सुरुवात केली. पण ते हल्ले परतवून स्वसंरक्षण करण्याइतकी ताकद या टोळींत राहिलेली नव्हती. कालांतरानें माणसामाणसांत बराच सहवास झाल्यानें मनुष्याचें मन प्रगत होऊं लागलें. तो नवीन नवीन गोष्टी शिकूं लागला. या सर्वांचा परिणाम चांगला होऊन हळुहळू मनुष्य आपल्यांत सुधारणा करूं लागला. प्रथम त्यानें स्त्रीपुरुषसंबंधाला नियम घालून दिले. त्यामुळें ही आपली स्त्री, हा आपला पुरुष असा आपलेपणाचा अधिकार एकमेकांस वाटूं लागला. नंतर त्याच स्त्रीपुरुषांनीं जन्मभर एकत्र राहावें असा नियम केल्यानें त्या दोघांस एकप्रकारचा आत्मविश्वास वाटून प्रेमवृद्धि होण्यास अवसर मिळूं लागला. त्यांच्यापासून झालेल्या संततीला ते 'आपली' म्हणून जपूं लागले. त्यामुळें त्या मुलांचें पोषण होऊन त्यांस 'आपल्या' आईबापांबद्दल कृतज्ञता वाटूं लागली. एकाच घरांत बालपणापासून एकाच आईबापांच्या अंगाखांद्यावर खेळल्यामुळें व अन्न घेतल्यामुळें परस्पर भावंडांतहि प्रेम

निर्माण होऊं लागलें. अशा तऱ्हेनें कुटुंब संस्थेस सुरुवात झाली. त्यामुळें माणसा-माणसासाठीं जगणें–मरणें या भावना सुरू झाल्या. म्हणजे संपूर्ण विषयवासनेला, थोडा त्रास सोसून, नियमित करतांच तीच प्रथम दुष्ट असलेली वासना नंतर उपकारक ठरूं लागली. विवाहसंस्था निर्माण करून व तिला पावित्र्याचा पोषाख देऊन आम्ही मूळच्या रानटी कामवासनेला मनुष्यसमाजांत घेऊन कांहीं नियम घालून तिला आमच्या जीवनांत मानाचें स्थान प्राप्त करून दिलें आहे. मूळच्या वांकड्या· तिकड्या हिऱ्याला आम्हीं उत्तम पैलू पाडले आहेत. त्यामुळें तो हिरा आतां आमच्या जीवनांत फार चांगला प्रकाश पाडून तें उज्ज्वल करीत आहे.

कुटुंबाच्या पसंतीची वधू–

म्हणून विवाहसंस्था दणगट असली म्हणजे कुटुंब चांगलें पोसलें जातें. विवाह करतांना वैयक्तिकप्रमाणेंच कौटुंबिक महत्त्वहि लक्षांत घेतलें पाहिजे. आपल्या कुटुंबास साजेल व शोभेल अशीच विवाहित स्त्री असावी. वधू पसंत करतांना स्वतःची किंवा कुटुंबाबाहेरील आपल्या मित्रांची फक्त संमति असूं नये. कुटुंबियांची संमति असणें अगदीं आवश्यक आहे. नाहीं तर कुटुंबियांची दृष्टि वधूकडे तितकीशी आपुलकीची नसणार हें निश्चित. जात्याच त्यांची दृष्टि नवीन सुनेकडे पुष्कळ वेळां सहानुभूतीची नसते.

नवविवाहित सून आणि इतर कुटुंबीय यांच्यांत वांकडें आलें म्हणजे कुटुंबाची त्यांतल्या त्यांत मुलांची फार हेळसांड होते. पतिपत्नीनें एकमेकांशीं कसें वागलें पाहिजे हें स्त्री प्रकरणांत पत्नीविषयीं सांगतांना आलेंच आहे. एकपत्नीकुटुंबांत सहसा हा बेबनाव होत नाहीं.

सावत्रपणा–

ज्या कुटुंबांत सापत्न नातें आहे त्यांत हा रोग हटकून घर करून बसतो. या सापत्नभावानेंच कुटुंबांतून विषप्रयोग, आत्महत्या यासाठीं केलेले इतर साळसूद उपाय फैलावतात. जे कुटुंबीय सावत्रपणांतहि तग धरून जगले आहेत त्यांबद्दल इतकेंच म्हणतां येईल कीं त्यांनीं आत्महत्याच करण्याची ठेवली आहे. समाजांत मालक–मजूर, सावकार–शेतकरी, श्रीमंत–गुलाम इ. अनेक प्रकारचे तंटे उत्पन्न होऊन एकमेकांचा जीव घेतील यांत नवल नाहीं. पण समाजांत जिवावर बेतणारे तंटे ज्या

कुटुंबांतून माजतात तें कुटुंब 'कुटुंब' या नांवासच नालायक आहे. पण मानसशास्त्रीयदृष्टया पाहूं लागलों तर वरील सर्व तंटे एकाच मुळांतून निघालेले आहेत. माणसाची वैयक्तिक स्वार्थ–असूया भावना स्वतःव्यतिरिक्त इतर कोठेंहि प्रकट होऊं शकते व ती थैमान घालूं शकते. मग त्यावेळीं तो 'आपला' व 'परका' हे भाव विसरून जातो.

सावत्रपणाच्या मुळाशीं हीच भावना आहे. यांतूनच दोन प्रकारच्या सावत्रपणाचा जन्म होतो. एकांत प्रथम पत्नी व तिच्यापासून झालेलीं मुलें हीं बापाला व इतर कुटुंबीयांना "आपलीं" वाटत असतात. या आपलेपणांत दोन कारणें आहेत. तो निर्भेळ प्रेमाचा आविष्कार नाहीं. एक कारण म्हणजे नवीन आलेल्या दुसऱ्या पत्नीपेक्षां 'पहिल्यां' चा सहवास अधिक असल्यानें साहजिकच 'पहिल्यां' चा थोडासा ओढा लागेल. पण मुख्य कारण म्हणजे नवीन पत्नीविषयीं वाटणाऱ्या द्वेषांतून या 'आपले' पणाचा जन्म झाला आहे. याच्याचमुळें प्रथमपत्नीच्या मुलांचें कौतुक व दुसरीच्या मुलांचा मत्सर या राहूकेतूंना सुरुवात होते. परंतु हा प्रकार क्वचित् ठिकाणींच आढळतो. दुसरा प्रकार सर्रास आहे. त्यांत नवपत्नी व तिची संतति यांवर त्यांचें दैव खुश असतें. या निर्माण झालेल्या नाविन्यामुळें प्रथमपत्नीचा संसार नकोसा वाटूं लागून तिच्या संततीवर गदा येते. मत्सराच्या पायावर आधारलेला आपलेपणा कोणालाहि अपायकारकच होतो.

पण या घातकी, संकुचित स्वार्थ–असूयेच्या दाट धुक्यांतून उदात्ततेची दूरदृष्टि कशी काम करणार ? समाज व कुटुंब यांचे परस्पर संबंध, नातें काय तें कळत नाहीं म्हणतों तें इथें. म्हणूनच आपल्या या पक्षपाती वागण्यानें समाजाची संपत्ति आपण पायाखालीं तुडवून जमीनदोस्त करतों याची जाणीव त्या बिचाऱ्यांना येत नाहीं.

सावत्रपणाचा वणवा–

पण एकदां पेट घेतलेला सावत्रपणाचा हा वणवा कांहीं केल्या विझणार नाहीं. बडेजावाचा पोकळ टेंभा मिरवून त्याच्या नांवाखालीं धूळफेक करून तो वणवा दडपून टाकण्याचा प्रयत्न केला तर आंतल्या आंत तो इतका धुमसेल कीं विझविण्याकरितां फेंकलेली धूळ सुद्धां तापून लाल होईल. तो झटकन विझविण्यासाठीं पाणी

ओताल तर त्या पाण्याचीच वाफ होऊन वणवा भडकला जाईल. तो विझविण्या-साठीं जें काय आंत टाकाल तें सर्व त्याच्या भक्ष्यस्थानीं पडेल.

याच भयंकर वणव्याखालीं मी मी म्हणणारीं आमच्याकडील वरींचशीं मोठमोठीं कुटुंबें बेचिराख झालीं आहेत. अशीं कुटुंबें स्वतः मरतातच पण मरतां मरतां समाजांत दुर्गुणांची परंपरा सुरू करून जातात. अशा कुटुंबांतून सद्‌गुणी मुलांची अपेक्षा करणें मूर्ख-पणाचें होईल. कारण त्या मुलांना शिक्षणच द्वेषबुद्धीनें वाईट दिलें जातें. अप्रत्यक्षपणेंहि त्यांच्या मनावर फार वाईट परिणाम झालेले असतात. तिरसटपणाचें बाळकडू तर लहान-पणींच दिलेलें असतें. लहानांनीं वागवावयाची नम्रता व मोठ्यांविषयीं आदरभाव या गोष्टी त्यांच्या गांवींहि नसतात. आदर्श प्रेमळ जीवनाचा नमुनाच त्यांच्यापुढें कधीं आलेला नसतो. मोठ्यांच्या भांडणाखालीं यांच्या शरीराची मारहाण व खाण्याची आबाळ होत असतेच. अशीं मुलें पुढें उत्तम नागरिक कशीं होणार ? दुर्गुणांचे पुतळे बनले नाहींत तरच नवल !

चोरून सावत्रपणा–

पण हा झाला उघड उघड सावत्रपणाचा परिणाम. याचा दुसरा प्रकार तर खरो-खर अमानुष आहे ! मोठ्या मोठ्या कीर्तिमंत कुटुंबांतून हा प्रकार विशेष आढळतो. अशा कुटुंबांना आपल्या अब्रूला जपावें लागतें. म्हणून त्यांतील सावत्रपणा फार हळुवारपणें हाताळला जातो. आंतील बिंग तर कोणास कळतां कामा नये. पण तेथें अक्षरशः सावत्रपणाचा छळ सुरू असतो. एवढ्या सर्व कारवाया करून 'सावत्र' हा शब्दहि तेथें ऐकूं येणार नाहीं. ज्यांना याची कांहींच माहिती नाहीं त्यांना तें कुटुंब सलखेंच वाटेल. ज्यांना त्यांची थोडीशी माहिती आहे ते, "किती एकोपा आहे, आणि आनंदाचें वातावरणहि कसें आहे !" असें म्हणून त्या कुटुंबाचें कौतुक करतील. पण सोनेरी बेगड लावून वाघ झालेल्या मुलालाच जीव गुदमरतो म्हणजे काय याची कल्पना असते. बाकीच्या चुकीच्या कल्पना भरवून दिलेल्या बघे लोकांना ती गंमतच वाटत असते.

छळ, आपपरभाव, मत्सर, सावत्रपणा इ. शब्द त्यांच्या शब्दकोशांतहि आढळाव-याचे नाहींत. उलटपक्षीं प्रेम, कौतुक, लौकिक इ. शब्दांचाच भरणा जास्त सांपडेल.

याच कोशाखालीं अनंत दुष्कृत्यें झांकलीं गेलेलीं असतात. हीं मत्सरी कृत्यें चोरून होत असतात. ज्यामुळें आपला वाईट हेतु लोकांस दिसून येईल असें कृत्य ते करीत नाहींत. चार लोकांत त्यांना प्रेमाचा पुळका येतो. पण तो लटका असतो हें सांगणें नकोच. ज्या ठिकाणीं दुसऱ्यास कळण्यास मार्ग नाहीं व कळलें तरी खरें वाटणार नाहीं अशाच नेमक्या ठिकाणीं चोरून आंतून दुष्टावा चाललेला असतो. आणि हा प्रयोग लहान मुलांच्यावर यशस्वी रीतीनें होत असल्यानें त्यांच्यावर जास्त प्रमाणांत केला जातो. बोलून चालून तीं मुलेंच असल्यानें त्यांच्या या 'घरभेद्या' अभद्र वाणीवर कोण विश्वास ठेवणार? लोक त्यांनाच दोष देणार. आपले होत असलेले हाल मुकाटयानें गिळून बसणें मुलांना भाग पडतें. सर्व पापें करून मोठीं माणसें मोठेपणाच्या नांवाखालीं उजळ माथ्यानें मिरवीतच असतात. हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार बिचाऱ्या लहानांस सहन करावा लागतो. त्यांनीं आपली फिर्याद कोणाकडे न्यावी? हे अस्तनींतील निखारेच फार भयंकर असतात!

याची प्रतिक्रिया–

अशा तऱ्हेनें लहान मुलांचा कोंडमारा होऊं लागला म्हणजे मुलें कुटुंबांतील स्वतःला शहाणे भासविणाऱ्या माणसांना पूर्णपणें ओळखून ठेवतात. अगदीं लहानपणीं बुद्धि प्रगत नसल्यामुळें एखाद्या गोष्टीचे कार्यकारणसंबंध लावतां येत नाहींत. पण पाहिलेली गोष्ट ही चमत्कारिक आहे हें त्यांच्या हृदयावर ठसल्याशिवाय राहात नाहीं. बुद्धि नाहीं म्हणून त्या गोष्टीवर टीका करतां येत नाहीं आणि दुसरें लहान म्हणून बाहेर बोलून दाखविण्याची चोरी. पण या सर्व गोष्टी मुलाच्या भावी आयुष्यांत मार्गदर्शन करीत असतात. पुढें मूल जरा मोठें झालें, समजूं लागलें म्हणजे त्या गोष्टीचा अर्थ बुद्धीनें बरोबर जाणतां येतो; त्यांतील वाईट हेतु आकलन होतो; पण त्याप्रमाणें प्रतिक्रिया करून दाखविण्याचें सामर्थ्य लहानपणामुळें नसतें. वडील (!) माणसांचें दडपण अजून मनावरून उडालेलें नसतें. ह्याचा फायदा घेऊन मोठीं माणसें मनसोक्त छळ करून घेत असतात. मुलगा वयांत येऊन त्यास व्यक्तित्व प्राप्त झालें म्हणजे तो हें सहन करूं शकत नाहीं. बालपणापासून आजपर्यंत अनुभवीत असलेला दुष्टावा त्याचें मन उद्विग्न करतो. मनांत आजपर्यंत दडून बसलेला मनस्वी संताप आतां स्फोट होऊन बाहेर पडल्याशिवाय राहत नाहीं!

मूल स्वभावानें गरीब असेल तर या वागण्याला कंटाळून जीवनांत निराश झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचें मन कुटुंबापासून व स्वतःच्याहि आयुष्यांतून वैतागानें विरक्त होऊन जाईल. तोंड दाबून बुक्क्यांच्या मारामुळें स्वभाव मनकुढा, एकलकोंडा, माणूसघाणा व सदा निरुत्साही होईल. मनाच्या आशाआकांक्षा कांहीं शिल्लक राहत नाहींत. मुलगा दणगट स्वभावाचा असेल तर निगरगट्ट, उद्धट व वाह्यात झाला नाहीं तरच नवल. सडेतोडपणें बोलून त्यांचा सूड उगवल्याशिवाय त्याला चैन पडणार नाहीं. अशा मुलांच्याकडून कोणती बरी अपेक्षा करणार ? त्यांना घरांत असेंच वागविलें जातें कीं, वर सांगितलेल्या दोन स्वभावांव्यतिरिक्त तिसरा जुळवून घेण्याचा स्वभावच बनणें शक्य नसतें. त्यास जर घरांत राहावयाचें झालें तर त्या मांजरानें दुष्ट लोकांच्या ताटाखालीं तरी बसावें; किंवा एकदम त्यांच्या नरडीचा तरी घोट घ्यावा. नाहीं पेक्षां आत्महत्याच केलेली काय वाईट ? कुटुंबाची अशी शोचनीय स्थिति समाजांत दिमाखानें मिरवीत आहे. पण यानें आपण समाजसंपत्तीचा नाश किती करतों हें त्या बिचाऱ्या पशुबुद्धींना कोठून कळणार ? हीं वडीं तत्त्वें दुसऱ्याला सांगण्याचीं आहेत. स्वतःकरितां नाहींत असें त्यांना वाटतें. दिव्याखालीं अंधार हीच सर्वत्र स्थिति आहे.

कुटुंबांत बेबनाव—

अशा तऱ्हेनें कुटुंबांत बेबनाव सुरू झाला म्हणजे कुटुंब चालण्यास अडथळा येतो. कुटुंबांतील रोजच्या व्यवहारांत अडचण ऊत्पन्न होते. लहान मुलांचा वडील माणसावरील विश्वास पार उडून जातो. घरांतील एखाद्या कार्यांत स्वेच्छेनें भाग घेण्याची सावत्रपणाचा सासुरवास सोसत असलेल्याची तयारी नसते. किंबहुना ते टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करतात. बेपर्वाईची तुटक वृत्ति निर्माण होते. यामुळें खेळीमेळीचें वातावरण तर राहत नाहींच पण घरांतील व्यवहार करणेंहि पुष्कळ वेळां अशक्य होतें. सहकार्याचा अभाव अर्थातच असतो. घरच्या खाण्यांत व सुख भोगण्यांत या सासुरवाश्यांना आपलेपणा वाटेनासा होतो. अंतःकरणाचा भरीव जिव्हाळा जाऊन औपचारिक, कृत्रिम व हृदयहीन शिष्टाचारांचा सुळसुळाट होतो. याच शिष्टाचाराला बाहेरचे लोक भुलतात. कुटुंबांत सतत धुसफूस व रागावणें, फुगणें, इ. गोष्टी धुमसत असतात. कुटुंबियांविरुद्ध आंतून गड्यामाणसांशीं व परक्यांशीं कारस्थानें निर्माण होऊं लागतात. इतकी स्थिति आल्यावर कुटुंबांचीं छकलें छकलें होण्यास एखादें बारीक निमित्तच पुरें असतें.

विधुराची द्वितीय पत्नी जहांबाज असेल तर ती आपल्या कठोर वागण्यानें इतरांचीं तोंडें बंद करून टाकील. व स्वतःचा होणारा छळ होऊं देणार नाहीं. खाष्ट असेल तर तीच पहिल्यांचा छळ सुरू करील. पण स्वभावानें अत्यंत गरीब, प्रेमळ व भोळी असेल तर याचा फायदा 'पहिले' लोक भरपूर घेत असतात. त्यांचा एक गटच निर्माण होत असतो. नवीन येणाऱ्या माणसांना तिच्या खोट्या चहाड्या सांगून आपल्या कंपूंत ते सामील करून घेतात. या द्वेषाचें विष इतकें रोमारोमांत भिनलेलें असतें कीं असा छळ करणें हा त्या घराचा शिष्टाचारच समजला जातो. घरांत एखादी शहाणी, समजूतदार व्यक्ति असेल तर अशा सासुरवाश्यांची योग्य बाजू न घेणें–त्यांच्याविरुद्ध जाणें हेंच त्यांची सदसद्विवेक बुद्धि त्यांना पटवून देत असते. उलट असें न केलें तर आपण चुकलों अशी त्यांची प्रामाणिक कल्पना असते. प्रथम पत्नीविषयींही हेंच म्हणतां येईल.

### एकत्र कुटुंबपद्धति कां हवी ?

एकत्र कुटुंबांतच हा प्रश्न जास्त दिसणार म्हणून एकत्र कुटुंबेंच नसावींत हें म्हणणें योग्य ठरणार नाहीं. खेळत्या एकत्र कुटुंबांत लहान मुलांस जें शिक्षण मिळतें व त्याचें संगोपन होतें, सहकार्याची जाणीव येते, एकोप्याची भावना निर्माण होते, द्रव्याची बचत होते, संस्कृतीची परंपरा गोडव्यानें नांदते, समाजोन्नतीस पोषक असे संस्कार घडतात, समाजाच्या व आत्मिक उत्कर्षास वाव मिळतो तें इतरत्र दुष्प्राप्य आहे. या सर्व गोष्टी एकत्र कुटुंबांशिवाय अन्यत्र होऊं शकणार नाहींत. विभक्त कुटुंबांत इतकें कोठून मिळणार ? विभक्त कुटुंबामुळें बेछूट वृत्ति, व समाजाविषयीं बेफिरपणा वाढत जातो. स्वार्थी, संकुचित वृत्ति बळावते व मनुष्याचें मन योग्य तऱ्हेनें पोसलें जात नाहीं.

### दोषांचें निराकरण–

एकत्र कुटुंबांतील दोष मात्र घालविणें आपल्या हातांत आहे. त्यांत आळशी, ऐतखाऊ लोकांचा भरणा होतां कामा नये. सर्वांनीं निरनिराळीं कामें वांटून घेऊन कुटुंबास मदत केली पाहिजे. स्वतःच्या पायावर उभे राहण्यास धमक असणाऱ्यांनीं शेफारून न जातां कुटुंबांतील मिताजेनी सहकाऱ्यांस साहाय्य करून त्यांच्याशीं बरोबरीनें वागलें पाहिजे. या गुणांची वाढ अन्यत्र होणार नाहीं. अशा एकत्र कुटुंबपद्धतीनें

समाजावरील अनाथ, पंगू इ. लोकांचा बोजा सहजच कमी होईल. एकत्र कुटुंबानें अशा पंगू नातेवाईकांस आपल्यांत घेतलें पाहिजे. समाजांत ही जबाबदारीची जाणीव व विशाल अंतःकरण सरकारनें उघडलेल्या वा सार्वजनिक अनाथालयांतून निर्माण होणार नाहीं. घरांत मत्सरभाव न आणणें आपल्या हातांत आहे. आपली वृत्तिच वाईट असेल तर आपण समाजांत कोठेंहि गेलों तरी ती प्रकट होणारच. करितां मूळांतच व्यक्तीनें आपलें मन मोठें करणें भाग आहे. विधूर, त्याची द्वितीय पत्नी, नणंदा, दीर, सासू याच व्यक्ती साधारणपणें भांडणास कारणीभूत होत असतात. यांनींच सावधगिरी बाळगली पाहिजे.

मुलांचें संगोपन कुटुंबांतच–

मुलें ही राष्ट्रीय संपत्ति आहे म्हणून मुलांचें संगोपन सार्वजनिक (वा सरकारी) संस्थांतून करणें योग्य होणार नाहीं. तेथें कांहीं झालें तरी पगारी नोकरांच्या हातांत हीं बालकें असतात. जन्मदात्या आईबापांना जो जिव्हाळा आपल्या मुलांबद्दल वाटतो तो पगारी नोकरास वाटणें कठीण आहे. तो नोकर कितीहि चांगला असला तरी मुलांस संभाळणें हें त्याचें ओढून ताणून बांधून घेतलेलें कर्तव्य केव्हांहि कृत्रिमच असणार. आई मुलांस संभाळते तें तिचें कर्तव्य म्हणून नसून तें मूल हाच तिचा स्वार्थ असतो. मूल हा आईबापांचा दुरावलेला त्यांच्याच शरीराचा एक अवयव आहे. ते आपल्या शरीराची जी काळजी घेतील तीच काळजी आपल्या मुलांची घेतात. दोन स्वार्थांचें तादात्म्य झालें म्हणजे तेथें अंतरींचा भरीव जिव्हाळा उत्पन्न होतो. सरकारी संस्थांत मुलें व नोकर यांचे स्वार्थ भिन्न असतात. अर्थात् जिव्हाळाहि तितकाच असतो. ती वस्तु हाच आपला स्वार्थ होऊन बसला पाहिजे. उसन्या आयांना हें प्रेम कोठून येणार ? दुसरें असें कीं लहान मुलांचें मन अनंत बारीक संस्कारांनीं तयार होत असतें. प्रत्यक्ष शिक्षणापेक्षां अप्रत्यक्ष शिक्षणानेंच त्याचें मन सुसंस्कृत होत असतें. हें शिक्षण आईबापांच्या कुटुंबाशिवाय इतरत्र कसें होणार ?

कुटुंब-संघटन संस्था–

कुटुंब ही समाजाची फार मोठी शक्ति आहे. कुटुंबें भरभराटीस आलीं तर समाज सुनियंत्रित चालण्यास त्यांच्याइतकें दुसरें कोणाचेंहि साहाय्य होणार नाहीं.

कुटुंबपद्धति लयाला गेली म्हणजे समाजाचें दिसणारें वैभव हें बेगडी वैभव आहे असें समजावें व त्याचें खरें विक्राळ रूप केव्हां तरी बाहेर पडेलच. कुटुंबा–कुटुंबांत घरोबा वाढत गेला म्हणजे सहकार्य व एकोपा यांचें क्षेत्र सहजच वाढत जातें. हें क्षेत्र जितकें वाढेल तितकें समाजास हितकारक आहे. पण सध्यां युरोपीयांच्या सहवासानें आमची कुटुंबपद्धति रसातळाला जाऊं पाहत आहे. आणि त्यापूर्वीं खरा घरोबा तर केव्हांच आमच्यांतून निघून गेला आहे. पाश्चात्यांच्या औपचारिक कृत्रिम शिष्टाचारानें आमच्यांत तुटकपणा निर्माण होऊन मोठें कुटुंब व घरोबा यांना आम्ही पारखे होत आहोंत.

राष्ट्र आणि कुटुंब विनाशकालांत एकमेकांशीं बरेंच साम्य दर्शवितात. कुटुंबांतील स्वाभिमानी आणि कर्तृत्ववान शूर पुरुषांचें राजद्रोही बंडखोरांत रूपांतर होतें. परतंत्र राष्ट्रांतील शौर्याचें दरवडेखोरींत नामांतर होतें. सात्त्विक व्यक्ती कुटुंबांत व राष्ट्रांत दोन्ही ठिकाणीं नेभळट व कर्तृत्वशून्य समजल्या जातात. सत्ताधारी वरिष्ठां-च्या पुढें पुढें करणाऱ्या नादान व्यक्ती प्रतिष्ठा पावतात व त्यांच्याच हातांत कुटुंबाचा व राष्ट्राचा कारभार जातो. या नादान सत्तेखालीं अवगुणांचें सहेतुक वा निर्हेतुक उद्धरण व सद्‌गुणांचें निराकरण वरिष्ठांच्या स्वार्थासाठीं वा पोकळ व घातकी डामडौलासाठीं केलें जातें. गरीब स्वभावी माणसांचा आडून वा उघडपणें छळ करून दुष्टांना सहेतुकपणें आधार दिला जातो. शेवटीं डबघाईस आलेलें, जुलमी सत्तेच्या जोरावर कांहीं काळ वैभवाचा आभास निर्माण केलेलें व अस्तापूर्वीं 'अंदर की बात' क्रान्तिबीजाच्या रूपानें प्रदर्शित होऊन शेवटीं चालू राजवटी बंद पडलेलें मोठें कुटुंब वा मोठें राष्ट्र छकलें छकलें उडून सर्व जगताला 'एवढ्या मोठ्या वैभवाचा नाश कसा झाला!' म्हणून (उगाचच) बोटें तोंडांत घालावयास लावतें.

अफाट सैन्यांतील सर्वांत लहान पण सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे आठ–आठ दहा–दहा शिपायांचा केलेला गट होय. या लहान गटावरच अवाढव्य सैन्याची संघटनाशक्ति अवलंबून असते. त्यांतील गटसंस्था जर विस्कळीत झाली तर सर्व सैन्याचा निरुपयोग होईल. या गटाचें महत्त्व जें सैन्यांत आहे तेंच कुटुंबाचें समाजांत आहे.

कुटुंबसंस्था मोडून समाज सुसंघटित करूं पाहणें म्हणजे बुंधा तोडून शेंडा जिवन्त उभा करण्यासारखें आहे. पण कुटुंबसंस्थेचें समाजांतील हें स्थान व्यक्तिगत घटकांना पूर्णपणें समजलें नाहीं. व्यक्तींना या बाबतींत अज्ञान असलें म्हणजे कुटुंब-संस्था सुरळीत चालण्यास अडथळा येतो. कुटुंब आणि समाज यांचें नातें न कळल्यामुळें कुटुंबांतील व्यवहारांचा वा चाली–रीतींचा परिणाम समाजावर होतो हेंहि सुज्ञ म्हणविणाऱ्या कौटुंबिकाला समजेनासें झालें आहे. युरोपांत समाजशास्त्राचा अभ्यास जसा जसा वाढूं लागला तसतसें त्यांना कुटुंबसंस्थेचें महत्त्व कळूं लागलें आहे.

ज्या कुटुंबसंस्थेवर सबंध समाज उभा आहे, त्याचें विवेचन आतां केलें. त्या कुटुंबाची फोड करून आंत कोणकोणते घटकावयव आहेत तें पाहूं. कुटुंबाची उत्पत्ति आणि वृद्धि करणाऱ्या स्त्रीविषयीं आतां विचार करूं. स्त्री कोणकोणत्या रूपांनीं समाजांत आणि कुटुंबांत नांदत असते, तिच्यामुळें कोणते प्रश्न उपस्थित होतात आणि ते कसे सुटतील तें पुढील प्रकरणांत येईल.

# स्त्री ३

## प्रचलित 'स्त्री स्वातंत्र्याची' मीमांसा

समाजांत स्त्री आणि पुरुष यांचीं भिन्न भिन्न कर्तव्यें आहेत. त्यामुळें दोघांचा दर्जाहि भिन्न स्वरूपाचा आहे. कोणत्याहि दोन गोष्टी एका स्थानावर अधिष्ठित व्हावयाच्या असतील; तर कोणास मान द्यावयाचा, कोण श्रेष्ठ याचा प्रश्न येतो. परंतु समाजांत स्त्रीला व पुरुषाला दोन अगदीं भिन्न स्थानें आहेत. कोणाचेंहि स्थान दुसऱ्यास लाजविणारें नाहीं. स्त्रीपुरुषांच्या समान दर्जासंबंधींचा तंटा सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेल्या युरोपियांकडून आम्हीं घेतलेला आहे.

### हक्क आणि कर्तव्य

आमच्याकडे स्त्रियांनीं आपले हक्क मिळविले आहेत; व आपला दर्जा पुरुषां-बरोबरचा आहे हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. असें विधान करितांना युरोपीय नागरिकास मोठा अभिमान वाटत असतो. पण त्या बिचाऱ्यास अशानें आपला रानटीपणा सिद्ध होतो हें कळण्याइतकी बुद्धि ईश्वरानें दिली नाहीं! एक तर स्त्रियांचा 'दर्जा' पुरुषांबरोबरचा नाहीं. कारण दोघांचे हक्क—आमच्या संस्कृतीच्या शब्दांत बोलावयाचें झाल्यास कर्तव्यें भिन्न आहेत.

‘सुसंस्कृत’ पाश्चिमात्यांचीं असंस्कृत लक्षणें

दुसरें असें कीं स्त्रियांनीं आपले हक्क मिळविले तेव्हां पुरुष काय करीत बसले होते? शिवाय स्त्रियांना हक्क भांडून मिळवावे लागले. त्यांचे योग्य (त्यांना वाटणारे) हक्क देण्याइतके पुरुष उदार मनाचे नव्हते. हेंच समाज मागासल्याचें प्रतीक होय. ज्या समाजांत लोकांना आपापले जन्मसिद्ध हक्क भांडून घ्यावे लागतात तो समाज सुधारलेला असें कसें म्हणतां येईल? जेथें उणेपणा आहे तेथें आपला तोटा करून भर घालणें यांत भलेपणा आहे. भांडून घ्यावें लागणें यांत मोठेपणा नाहीं. अन्याय झाला म्हणजे जनावरें सुद्धां आपले पंजे बाहेर काढतात! ज्याच्यावर अन्याय होतो त्याला तो सहन झाला नाहीं म्हणजे त्याची सूडवृत्ति जागृत होते.

हक्क–

आपला एखाद्या गोष्टीवर हक्क सांगणें हें मनाच्या सुसंस्कृतपणाचें लक्षण नाहीं. ‘हक्क’ या शब्दांत एक प्रकारच्या उद्दाम सत्तेचा अर्थ निघतो. एखाद्या गोष्टीवर उद्दामपणें सत्ता चालविणें हें आत्मिक उन्नतीचें लक्षण कोण म्हणेल? भाषेवरून माणसाची संस्कृति कळते. हक्क हा शब्द मराठी किंवा संस्कृत नाहीं, तो फारशी आहे. आमच्याकडे ‘कर्तव्य’, ‘धर्म’ असे सात्त्विक व मनाची उंची दाखविणारे शब्द आहेत. मुलांस आपल्या घरीं जेवावयास मिळणें हा त्यांचा हक्क नाहीं. मुलांस जेवूं घालणें हा मातापित्यांचा धर्म होय. मालकाचा नोकरावर हक्क नाहीं. अधिकार आहे. स्त्रीला समाजांत मानाचें स्थान असणें हा स्त्रीचा हक्क नाहीं. समाजाचें तें कर्तव्य आहे.

हक्कासाठीं झगडावें लागलें नाहीं–

आमच्या प्राचीन इतिहासांत वर सांगितलेल्या युरोपच्या उदाहरणांप्रमाणें उदाहरणें नाहींत. स्त्रियांना मान मिळण्यासाठीं समाजांत वाद–भांडणें काढावीं लागलीं नाहींत कीं क्रांत्या कराव्या लागल्या नाहींत. त्यांना तो मान आपोआपच मिळत गेला. कारण पुरुष–समाज असें करणें हें आपलें कर्तव्यकर्म समजत होता. स्मृतिकालापूर्वी स्त्रियांना वारसाहक्क मुळींच नसत. परंतु स्मृतिकालीं स्त्रियांना अभूतपूर्व हक्क देण्यांत आले. त्यांचा तपशील देण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु मनु व याज्ञवल्क्य यांच्या स्मृतींतील दायभाग प्रक-

रण वाचल्यास असें दिसून येईल कीं स्त्रियांना या स्मृतिकारांनीं पुष्कळ हक्क दिले आहेत. (Chap. X ; XI. Woman's property—Stridhan according to the Smrities, Commentories and Judicial Decisions. *etc.* pages 109-219. Hindoo Law by Mulla.) परंतु यापूर्वीं स्त्रियांनीं जोराच्या चळवळी करून सफ्रेजटि स्त्रियांप्रमाणें दंगल माजवून दिली असें इतिहास सांगत नाहीं. न्यायाच्याच भावनेनें या स्मृतिकारांनीं हे हक्क निर्माण केले यांत शंका नाहीं.

आधुनिक युगांत क्रांति करावी लागणें हेंच मोठेपणाचें लक्षण समजतात. कारण काय तर समाज जागरूक आहे, झोपीं गेलेला नाहीं हें त्यावरून समजतें! ह्यांतच गरीब बिचारे समाधान मानून घेतात. पुढील प्रत्यक्ष साध्य तर बाजूलाच राहिलें. आमच्यासारख्या त्यांच्यांत जर क्रान्तीविना सहज अशा गोष्टी घडल्या तर त्यांस इंद्रपद मिळाल्याचा आनंद होईल यांत काडीमात्र शंका नाहीं. आम्हांस मात्र अशा गोष्टींचें कांहींच आश्चर्य वाटत नाहीं. आमच्या सामाजिक इतिहासाचा प्राचीन काल लक्षांत घेतला आणि आधुनिक संस्कृतीची फुशारकी मारणाऱ्या युरोपीयांचा हा काल पाहिला म्हणजे युरोपीय लोक आमच्यापेक्षां किती तरी शतकें मागासलेले आहेत हें कळून चुकतें व त्यांच्या बालिश अहंपणाबद्दल हसूं आल्याशिवाय राहत नाहीं. दोन गृहस्थ होते. त्यांना घरें बांधावयाचीं होतीं. एकानें झटकन जागा वगैरे बघून त्यावर भव्य प्रासाद उभारला आणि फक्त त्या प्रासादावर शिखरच बांधावयाचें राहिलें होतें. दुसऱ्याचें अजून घर बांधण्यासाठीं जागा व इतर सामान जमविणेंच चाललें होतें. तें कांहीं लवकर जमत नाहीं असें पाहून लोकांनीं विचारलें कीं मोठ्या अभिनिवेशानें तो सांगे, "अहो, ती गोष्ट सोपी नाहीं. जागा बघण्यांत सुद्धां शास्त्र आहे. वाटेल त्या दगड विटा चालत नाहींत. त्यांचें शास्त्रीय संशोधन करून मगच त्या भिंतींत बसवावयाच्या" आणि इतक्यांत कोठें घाणेरडी जागा मिळावी तेवढ्यांत त्याला काय पण आवेश आला! बरोबर याच गृहस्थाचें उदाहरण युरोपीयांच्या शास्त्रीय दृष्टीचें व भौतिक प्रयत्नांचें योग्य कौतुक करूनहि त्यांना लागूं पडेल.

स्त्रीपुरुषांच्या शरीररचनेंत जशी भिन्नता तशी मनोरचनेंतहि भिन्नता आहे. आपापल्या देहरचनेस अनुरूप अशी त्यांची मनोरचना असते. हा भेद स्त्रीपुरुषांचें जीवनकार्य ठरवितांना लक्षांत न घेणें मूर्खपणाचें ठरेल.

भिन्न मनोरचना–

पुरुषाचें शरीर बळकट असून तो निधड्या छातीचा असतो. याला अनुसरून त्याचें मन कणखर, उदात्त, धैर्यशील असें असतें. उलट स्त्रीचें शरीर नाजूक, दुर्बल, देहव्यापारामुळें पुरुषासारखीं बाहेरील कामें करण्यास कमकुवत असतें. कारण स्त्रीधर्मानुसार कामांत व्यत्यय येतो. तिचें मनहि हळुवार, संकुचित पण भावनाशील असतें. पुरुषाचें मन सागराप्रमाणें विशाल असून ओढ्याप्रमाणें उथळ असतें. स्त्रीचें खोल विहिरीप्रमाणें अंतःकरणाशीं खोल जाऊन भिडणारें पण तसेंच संकुचित असतें. पुरुषाची प्रवृत्ति आक्रमक असून स्त्रीची संरक्षक वृत्ति असते. पुरुष बुद्धिप्रधान व जास्त तार्किक असतो, तर स्त्री भावनाप्रधान फार असते. पुरुषाची बुद्धि सर्व-व्यापी असून स्त्रीची एकमार्गी असते. पुरुष मोहाला लवकर बळी पडतो, तर स्त्री कर्तव्यनिष्ठ अधिक असते. हा भेद पाहिला असतां एकाचीं कामें दुसऱ्याला सात-त्यानें करतां येतील असें विधान करणें चुकीचें आहे हें लक्षांत येईल.

समान हक्कांच्या भांडणाचा उगम–

शिवाय ईश्वरदत्त कर्तव्यें दोघांचीं भिन्न आहेत, आणि तीं व्यवस्थितरीत्या पार पाडणें हें समाजाच्या दृष्टीनें व त्या दोघांच्या दृष्टीनें अतिशय हिताचें आहे. युरोपीय लोकांनीं आमच्यांत मानापमानाच्या भलत्या कल्पना पसरून दिल्या आहेत. मान कशांत आहे व कशांत नाहीं हें प्रथम ठरविलें पाहिजे. समाजांतील बहुतेक लोकांना विचार करण्याची संवय नसते. चार लोक काय करितात; विशेषतः फॅशनेबल लोक काय करितात त्याचें अंधानुकरण करणें एवढेंच त्यांना जमतें. फॅशन करणें हाच त्यांचा शिष्टाचार असतो. यांत शिकले सवरलेलेहि लोक असतात. किंबहुना नवीन फॅशनची लाट यांच्यावरच प्रथम आदळून ती पुढें खेडोपाडीं जाते. मानापमानाच्या कल्पना याच चाकोरींतून गेलेल्या आहेत. कर्तव्याशीं अप्रामाणिक राहून–नव्हे, त्याला झुगारून ऐटी मिरविणें या फॅशननें स्त्रियांच्या समान हक्कास जन्म दिला. अर्थातच चूल व मूल सांभाळणें यांत स्त्रियांना अपमान वाटूं लागला. पुरुष बाहेर शेखे मिरवितात, तसे यांना कांहीं मिरवितां येत नाहींत. तेव्हां समान हक्काची टूम निघणें अगदीं स्वाभाविक होतें. शिवाय साहेबाच्या देशांत असें आहे ना! मग तसें न करणें हा रानटीपणा होईल! नशीब, आम्हींच कां बाळंत व्हावें म्हणून स्त्रियांनीं अजून हट्ट

धरला नाहीं ! नाहीं तरी हल्लीं तीहि प्रवृत्ति थोडथोडी फैलावत चालली आहेच. बाळंत होण्याची कांहीं शिकलेल्या मुलींना आतां लाज वाटूं लागली आहे. आणि त्यावर तशी उपाययोजनाहि केव्हां केव्हां होते !

श्रमविभाग–

स्त्रियांनाच काय पण कोणालाहि आर्थिक स्वातंत्र्याची आवश्यकता भासावी आणि तें स्वातंत्र्य भांडून घ्यावें लागावें यासारखी गोष्ट सांस्कृतिक दृष्टया सुधारलेला म्हणवून घेणाऱ्या मनुष्याला लांछनास्पद आहे यांत शंका नाहीं. माझे पैसे मी मिळविणार, आणि इतर परके लोक राहोतच पण माझ्या जवळच्या कुटुंबियांस व मित्रांसहि त्याचा उपभोग घेऊं न देतां तो केवळ माझा हक्क आहे असें प्रतिपादणारा मनुष्यप्राणी रानटी कीं संस्कृतीच्या कळसास पोंचलेला ? पशूसुद्धां मारून आणलेली शिकार आपल्या कळपांतील वा कुटुंबांतील म्हणजे आपलीं पोरें यांस खावयास देतो. त्याला सहाय्य केलेल्याचीहि अशा वेळीं तो आठवण ठेवीत असेल ! ही पशूंची कृतज्ञता माणसानें उचलावयास नको काय ? कीं ही पाशवी घृत्ति म्हणून तिचा तिरस्कार करावा आणि आपण आणलेली मिळकत आपणच एकटयानें खात बसावी ? एकमेकांच्या संरक्षणाकरितां व मित्रत्वाच्या सहवासाच्या आनंदांत जीवन घालविण्याकरितां एकत्र आलेल्या मनुष्यप्राण्यांनीं 'हें तुझें, हें माझें' असा तुसडेपणा करणें त्याला कितपत शोभतें ? पण याचा विपर्यास करतां कामा नये. याचे टीकाकार म्हणतील, "तुमच्या विधानाचा अर्थ असा कीं एकानें कष्ट करावेत व त्यावर इतरांनीं मजा करावी. म्हणजे अवलांना लुबाडण्याचाच हा एक साळसूद प्रकार दिसतो" त्याला उत्तर असें कीं, त्या बिचाऱ्यांना माणसांमधील सलोख्याचे संबंध म्हणजे काय हें समजत नाहीं. अशा व्यवहारांत एकाला मिळकत मिळविण्याचे कष्ट होतील तर मिळवून आणणाऱ्याला वेळ मिळत नाहीं म्हणून त्याच्या तऱ्हेनें आपण होऊन स्वखुषीनें आपणांस झेपेल अशी कामाची विभागणी केली पाहिजे.

व्यक्तिस्वातंत्र्याचा लढा–

आपलें स्वातंत्र्य आपणच मागून घेण्याचा प्रसंग आला म्हणजे तें स्वातंत्र्य तर समाधानकारक मिळत नाहींच पण शिवाय हा लढाहि कधीं संपत नाहीं. कारण एकानें स्वातंत्र्याचा लढा पुकारला तर दुसऱ्याला तें लोकांचें स्वातंत्र्य त्यांना न देतां

आपणच बळकावून बसण्याची इच्छा प्रबळ होते. या परस्परविरोधी वासनांचा परिणाम सामाजिक अस्वास्थ्यांत होतो. कारण हा सामाजिक प्रश्न आहे. जरी समजा, स्त्रियांनीं आपलें स्वातंत्र्य मिळविलें तरी पराभूत झालेला पुरुषसमाज कालांतरानें खवळून जाऊन लढा करणार. म्हणजे समाजांत सारख्या क्रांत्या व लढे! असें होणें हें प्रगतीचें कीं परागतीचें लक्षण? लढा हें साधन आहे. तेवढ्यापुरतेंच लढ्याला महत्त्व आहे. लढ्याविना समाजस्वास्थ्य लाभलें तर लढ्याची आवश्यकता नाहीं. लढे वरचेवर निर्माण होणें याचा अर्थ असा कीं, माणसाला दुसऱ्याचा योग्य अधिकार मान्य होत नाहीं. तो त्याला नको असतो. ही मनाची संकुचित वृत्ति सुसंस्कृतपणा दाखविते कीं रानटीपणा?

तेव्हां स्त्रियांनीं आपल्या स्वातंत्र्याकरितां पुरुषांबरोबर तंटे करणें योग्य नसून पुरुषांनींच त्यांना योग्य ते अधिकार देणें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे. पुरुषांनीं जर आपलें कर्तव्य ओळखलें तर त्याचा शेवट गोड होऊन संसार सुखाचा होईल. स्त्रियांनीं जर आपला हक्क भांडून घेतला तर पुरुषानें नाईलाज म्हणून नाखुषीनें हक्क दिलेल्या स्त्रीशीं त्याचा सुखाचा संसार कसा होणार?

### 'आर्थिक स्वातंत्र्या' वर एक उपाय–

स्त्रियांच्या हक्कासंबंधीं व स्वातंत्र्याविषयीं फार विचित्र कल्पना समाजांत–स्त्रियांतसुद्धां–आहेत. कुटुंबवत्सल स्त्रीनें नवऱ्यापासून निराळी मिळकत करणें ह्याचे काय दुष्परिणाम होतात तें पूर्वीं सांगितलेंच आहे. पैशासंबंधानें असें म्हणतां येईल कीं, पुरुषानें आणलेली मिळकत बायकोनें संभाळावी. आणि हें सांभाळण्याचें काम पुरुषापेक्षां स्त्रीलाच अधिक चांगलें करितां येईल. म्हणजे येथें त्यांच्या आर्थिक 'हक्का'चा प्रश्न मिटला. नवऱ्यानें आणलेलें द्रव्य हें आपलेंच आहे असा प्रेमाचा अधिकार त्यावर स्त्रीचा असला पाहिजे. पुरुषानेंहि आपण आणलेली मिळकत ही दया म्हणून बायकोला पोटगी म्हणून देत आहों असा हीन भाव मनांत न बाळगततां ही मिळकत माझी एकट्याची नसून माझ्या बायकामुलांकरितांच आणलेली आहे, त्यांचा केव्हांहि त्यावर अधिकार असणार असा उदात्त व प्रेमळ भाव अंतःकरणांत ठेवला पाहिजे. म्हणजे कुटुंबांत वा समाजांत स्त्रियांचे आर्थिक तंटे माजणार नाहींत.

आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनेचें मूळ—

स्त्रियांना पुरुषांप्रमाणें बाहेरील समाजांत स्थान नाहीं हा आक्षेप कांहीं खोटा नाहीं. आजपर्यंत स्त्रियांचें चुलीच्यापलीकडे पाऊल न गेल्यामुळें बाहेरील सामान्य ज्ञान त्यांस अवगत नाहीं. स्त्रियांनीं चूल व मूल यापलीकडे कांहीं करूं नये व त्याशिवाय त्यांना कांहीं माहीत असूं नये ही खुळी चाल आमच्यांत पूर्वी बोकाळली होती. याचा परिणाम असा कीं, स्त्रिया निरक्षर राहिल्या. त्या अगदीं अडाणी बनल्या, याची दिक्कत आम्हां पुरुषांना नव्हती. याची प्रतिक्रिया म्हणून सुमारें पन्नास वर्षांपूर्वीपासून आमच्यांत सुधारक निघाले. त्यांच्या सुधारकार्यामुळें व युरोपीयांच्या सहवासामुळें आमच्यांत पालट झाला. स्त्रिया सर्रास शिकूं लागल्या. त्या शिकून जशा शहाण्या होऊं लागल्या तसें पुरुषांनाहि आपले हेके सोडणें भाग पडलें. पण शिक्षणांत मन सुसंस्कृत करण्याचे कांहींच धडे मिळत नसल्यामुळें या सर्व शिक्षणाच्या प्रसारानें आणि पुरुषांनींहि सैल सोडल्यामुळें कुटुंबसंस्था डगमगूं लागली. स्त्रियांना कौटुंबिक आवश्यक असें जें ज्ञान, त्याला त्या पारख्या होऊं लागल्या. स्वैर वृत्ति बळावली. व्यापारी तत्त्वावर उभारलेल्या शिक्षणाचें ध्येय लोकांस नोकरीस तयार करणें हें असल्यामुळें पुरुषांप्रमाणें स्त्रियांहि नोकऱ्या करूं लागल्या. स्त्रियांना आपल्या हक्कांची जी जाणीव झाली ती गोषामुळें होणाऱ्या त्रासापेक्षां वरीलप्रमाणें स्वैरवृत्तीला सोकावल्यामुळें झाली आहे हें विसरतां कामा नये.

स्वैरपणाचें स्वातंत्र्य—

या स्वैरवृत्तीला अप्रत्यक्षपणें उत्तेजन देणाऱ्या 'व्यापारी' शिक्षणानें समाजावर फार दुष्परिणाम झाले आहेत. आतां स्त्रिया या गोषांतीलहि राहिल्या नाहींत व आपले योग्य अधिकार समजावून घेऊन कुटुंबांत व समाजांत कर्तव्यजागृतीनें मानानें जगणाऱ्याहि राहिल्या नाहींत. त्या ध्येयहीन स्वच्छंदी बनल्या आहेत, त्याला शिक्षणानें आणखी पुष्टि दिली आहे. त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनेचा पाया यांत आहे. मनुष्याला कळूं लागलें व स्वैर वागण्यास मोकळीक मिळूं लागली म्हणजे आर्थिक अडचण त्याला फार भासते व अशांतूनच आर्थिक स्वातंत्र्याची कल्पना मनांत उद्भवल्यावांचून राहत नाहीं. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मुळींच नव्हतें व त्यांना दर्जाहि खालचा दिला होता हें पटतें व त्यानुसार त्यांच्याकडे

सहानुभूतीनें पाहून त्यांच्या सुधारणेकरितां आम्ही प्रवृत्तहि होतों; परंतु आतांची त्यांची जी ओरड आहे त्याला यत्किंचितहि थारा मिळणार नाहीं. कारण तें स्वातंत्र्य त्यांना स्वैर वृत्तीकरितां पाहिजे आहे. कुटुंबवत्सलतेकरितां नको आहे. पुरुषांपासून आपण वेगळें राहून स्वतंत्रपणें मानानें जगूं, संसार करूं (!) ही त्यांची उत्कट इच्छा आहे आणि हल्लीं देशभक्तीप्रमाणें, अस्पृश्यतेच्या उद्धाराप्रमाणें, ग्रामोद्धाराप्रमाणें स्त्रियांच्या हक्काचीहि पोकळ निष्क्रिय वतावणी करणें ही पद्धत निघाली आहे. स्त्रियांसंबंधीं खोल विचार कोणींच केलेला नसतो. या प्रश्नाचा साकल्यानें विचार केला असतां समाजावर काय परिणाम होतात हें त्यांस कधीं कळत नसतें. स्वतःच्या बायकोवर प्रसंग आला म्हणजे मात्र बायकोला स्वातंत्र्य देण्याला मनुष्य कचरतो. एखादाच असा हरीचा लाल निघाला आणि बायकोचे लाड करतां करतां तिला असें स्वातंत्र्य दिलें कीं, कुटुंबाचें वाटोळें झालेंच समजा. अशींहि उदाहरणें कांहीं थोडीं नाहींत.

याला कारण आजचें शिक्षण—

सुमारें ५० वर्षांपूर्वी स्त्रियांची अवस्था एका टोकाला होती तर आतां ती पार दुसऱ्या टोकाला गेली आहे. दोनहि टोकें तितकींच अनिष्ट. त्यांना जर योग्य वळणावर आणावयाचें असेल तर त्यांना आतां जें शिक्षण मिळत आहे तें प्रथम बंद केलें पाहिजे. या शिक्षणपद्धतीनें नसलेले वाद उत्पन्न होऊन समाज इतका बिघडेल, आणि तो सुद्धां नवीन नवीन वादांसह बिघडत चालला आहेच, कीं ज्याप्रमाणें रक्तदोष असलेल्या मनुष्याला जळवा लावून पहिलें रक्त नष्ट करावें लागतें त्याप्रमाणें समाजांतील पहिले स्त्रीपुरुष नष्ट केल्याशिवाय समाज सुधारणें शक्य दिसत नाहीं ! नाहीं तर त्यांची संतति तशीच निघणार आणि ही परंपरा पिढ्यान् पिढ्यां जगाच्या अंतापर्यंत चालू राहणार !

## कुटुंबांतील स्त्री

स्त्रीचें कार्यक्षेत्र—

खरा मान स्वाभिमानानें कर्तव्याला जागणें यांत आहे. मग लोक त्याची निंदा करोत वा स्तुति करोत. लोकांचे शब्द हे बिनबुडाचे असतात. त्यामागें विचार नसतो. तुम्हीं कांहींहि केलें तरी लोक हंसणारच. कारण त्यांना स्वतःला कांहींच करावयाचें नसतें. शेवटीं स्वतःच्या कर्तबगारीवरच तो मान वा अपमान ठरतो

असतो. तेव्हां स्त्रियांनीं हें ध्यानांत ठेवावयास हवें कीं, चूल-मूल सांभाळणें हें कमीपणाचें नसून फार मानाचें आहे. खरें समाजकार्य यांतच आहे. समाजांतील इतर कार्यक्षेत्रें त्यांच्याकरितां नाहींत. त्यांनीं तसें करणें म्हणजे एंजिनीअरनें न्यायासनावर जाऊन बसण्यासारखें आहे. प्रत्येकाचें कार्यक्षेत्र हें निराळें असतें. त्यांतच त्याचें कर्तृत्व चमकतें. दिवसा सूर्यानें उगवावें व रात्रीं चंद्रानें प्रकाश द्यावा यांतच लोकांचें हित आहे. पण दोघांनीं आपल्या वेळा बदलल्या, तर सर्वच अनर्थ होऊन जाईल !

स्त्रीच्या स्वतंत्र कार्यक्षेत्राचें महत्त्व-

कुटुंब ही समाजांतील सर्वांत लहान परंतु सर्वांत महत्त्वाची अशी संस्था आहे. सर्व समाजाचा भार हा त्या एकट्या संस्थेवर असतो. ही संस्था डळमळीत झाली म्हणजे समाज मोडकळीस आल्याची ती धोक्याची सूचना समजावी. कारण ज्या व्यक्तींनीं समाज बनत असतो त्या व्यक्तींचें व्यक्तित्व हें त्या कुटुंबांत तयार होत असतें. कुटुंबें डगमगावयास लागलीं म्हणजेत यांतील व्यक्ती निकामी होतात. त्यांस माणूसकी राहात नाहीं; कौटुंबिक व सामाजिक कर्तव्यास पारखीं होतात; व्यसनी बनतात. अशा व्यक्ती समाजांत राहण्यास नालायक होऊन प्रसंगीं समाजाला घातकहि ठरतात, आणि अशा व्यक्तींनींच जर सर्व समाज भरून गेला तर तो समाज उभा कसा राहणार ? तो खालीं कोसळलाच पाहिजे.

म्हणून व्यक्तींचें व्यक्तिमत्व तयार होण्यास चांगलीं कुटुंबें अस्तित्वांत असणं आवश्यक आहे. आणि हीं कुटुंबें स्त्रियांच्या जोरावरच उभीं राहूं शकतात. स्त्रीशिवाय कुटुंब चालणें अशक्य. कुटुंबाची सर्व जबाबदारी स्त्रीवर आहे. मुलांचें संगोपन करून त्यांस योग्य शिक्षण देणें हें स्त्रीशिवाय अशक्य आहे. मुलांस योग्य शिक्षण न मिळाल्यामुळें समाजाचा ऱ्हास कसा होतो तें आपण आतां पाहिलेंच आहे. बायको मेलेल्या नवऱ्याचीं मुलें संभाळतां संभाळतां कशी तारांबळ उडते तें आपण पाहतोंच. तरीसुद्धां पुरुषाला मुलांना चांगलें वळण लावतां आलें अशीं उदाहरणें किती असतील ? अशा नवऱ्याला दुसरें लग्न करणें भागच असतें. पुढील पिढी ही स्त्रीच्या पोटांत असते हें दोनहि अर्थांनीं सत्य आहे. स्त्रीनें मुलांचें पोषण करण्याचें नाकारिलें तर पुढील सर्व पिढी निकामी होईल. स्त्रीमध्यें सामर्थ्य काय आहे आणि तिची योग्यता काय तें आतां कळून येतें.

म्हणजे स्त्रीनें कुटुंबांत राहणें अगदीं आवश्यक आहे. तिचें सर्व लक्ष व सर्व शक्ति कुटुंबाकरितां खर्ची पडेल तरच त्याचा उपयोग. तिची शक्ति व लक्ष दुभागलें तर कुटुंबाची हेळसांड झाल्यावांचून राहत नाहीं. एवढ्याकरितां कौटुंबिक स्त्रियांनीं बाहेर नोकरी करणें वा पुरुषांसारखीं इतर कामें शिरावर घेणें हितकारक नाहीं. नोकऱ्या करून कुटुंब चालविणाऱ्या स्त्रियांची कशी धांवपळ होते आणि लहान मुलांच्याकडे कसें दुर्लक्ष करावें लागतें हें सर्वजण आपण पाहतोंच. स्त्री बाहेर कामास गेली म्हणजे घरांत मुलानें रडूं नये, आपल्याशिवाय घरांत खेळत राहावें म्हणून त्यास नोकराची संवय लावून ठेवायची. कारण त्याचा लळा लागेल असें पाहिजे असतें. मुलाला आईची माया सुटून नोकराबरोबर वेळ घालवावा लागतो. त्याच्या खाण्यापिण्याची काळजी पगारी नोकर काय घेणार तें माहीत आहेच. शिवाय आईच्या अपरोक्ष मूल वाटेल त्या संगतींत जाऊन शिक्षण वाईट मिळतें. आईच्या सहवासांतील अप्रत्यक्षपणें मिळणारें शिक्षण, कौटुंबिक आपलेपणा व व्यक्तित्व याला तें मूल मुकतें. दिवसभर आईच्यापासून दूर राहिल्यानें आई संध्याकाळीं घरीं आल्याबरोबर मुलाचे लाड सुरू होतात व मूल हट्टी व लाडावलेलें होतें. पत्नी बाहेर कामाला म्हणून घरांत नोकराचेंच राज्य. पति दिवसभर बाहेर. म्हणजे घर व मुलें नोकराच्या ताब्यांत. यांत दोघांना कौटुंबिक सुखाला मुकावें लागतें. नवरा व बायको स्वतंत्रपणें पैसे मिळवीत असल्यानें दोघांस परस्परविरुद्ध असा अहंपणाचा माद येतो. तुटकपणाला सुरुवात होते आणि प्रसंगीं, "मी माझे स्वतंत्र पैसे मिळवितें, तुमच्यावर माझें कांहीं अवलंबून नाहीं." असें स्त्री म्हणावयास लागते. आणि नवराबायकोंतील एकोपा–आपलेपणा हा नष्ट होऊन केवळ दोन नोकरदार शेजारीं शेजारीं राहावेत यापलीकडे त्यांत स्वारस्य राहत नाहीं. दोघांचे आर्थिक पायावर आधारलेले करार होतात व दोघेंहि एकमेकांला वचकून असतात. अशांचीं मुलेंहि कशीं निपजणार हें सांगावयास नकोच. येथें कुटुंबसंस्थेचा ऱ्हास झाला असें समजावें. या व्यतिरिक्त स्त्री बाहेर पुरुषी कामें करूं लागली म्हणजे स्त्रीजातीचें कौटुंबिक शिक्षण बाजूला राहतें. स्त्रियांचीं कामें तिला जमत नाहींत. शिवाय अशा स्त्रियांची प्रकृति अशक्त होत जाते. स्त्री अशक्त झाली म्हणजे तिचीं मुलेंहि अशक्त बनतात. कुटुंबाला खाणावळीचें स्वरूप येतें तें निराळेंच. एकदां पार्लमेंटांत, "इंग्लंडांत शंभर

वर्षे सुधारणा होत आहेत, त्यांत आम्हीं काय मिळविलें ?" असा प्रश्न विचारला असतां ग्लॅडस्टननें उत्तर दिलें, "आम्हीं घरें सोडून हॉटेलांत राहूं लागलों." या एका वाक्यांत स्त्रियांसंबंधीं सामाजिक सुधारणेची योग्यता सांठविली आहे.

कुटुंब नव्हे नोकरसंघ–

कुटुंबाची खाणावळ होऊं लागली म्हणजे आई, बाप व मुलें एकमेकांच्या खऱ्या प्रेमास पारखीं होतात. औपचारिक शिष्टाचाराव्यतिरिक्त त्यांच्यांत कसलेंहि नातें राहत नाहीं. कौटुंबिक वातावरणांत अशी कांहीं जादू आहे कीं, त्यामुळें कुटुंबांतील व्यक्तींत आपलेपणा, सहकारित्व, कर्तव्यदक्षता व व्यक्तित्वाची वाढ इतक्या गोष्टी नकळत होत असतात. खाणावळीचें रूपांतर झालेल्या कुटुंबांत परकेपणा, तुटकपणा, बेजबाबदारपणा, व्यसनाधीनता, असंस्कृतता इत्यादि दुर्गुणांची वाढ होते. हीं मुलें पुढें कशीं उत्तम नागरिक होणार ? पुढें मुलें मोठीं झाल्यावर तींहि पैसे मिळवावयास लागून आई, बाप व मुलें यांचीं प्रत्येकाचीं स्वतंत्र नवीन कुटुंबें–नव्हे नोकरदार-संघ निर्माण होऊं लागतात. आर्थिक पायावर आधारलेल्या कुटुंबाचा असा चुथडा होतो. एकत्र येण्यास मनांत सात्त्विक उच्च भावना व ध्येय कांहीं नसल्यामुळें व निव्वळ पैशाच्या आधारानें एकत्र आल्यानें आज जवळ राहत असलेलीं नवराबायको उद्यां तींच जवळ राहतील असा भरंवसा देतां येत नाहीं. तेरड्याचा रंग तीन दिवस आणि ढगांची लाली तीन क्षण !

कुटुंबांत पत्नी, माता व कन्या अशा तीन प्रमुख नात्यांनीं स्त्रीचा विचार करणें अवश्यक आहे. कारण या तीन नात्यांनीं स्त्रीला योग्य तऱ्हेचें शिक्षण मिळालें नाहीं व मन तयार झालें नाहीं तर स्त्रीमुळें कुटुंबाचें व पर्यायानें समाजाचें नुकसान होतें. या तीन अवस्थांतच तिच्यावर फार जबाबदारी असते.

कुटुंबांत पत्नीचें स्थान काय याविषयीं फारच थोड्यांना सम्यक् कल्पना आलेली दिसते. शेंकडा नव्वद लोक बायकोचें कौतुक करणारे किंवा तिच्या तंत्रानें चालणारे आढळतात. याउलट बायको म्हणजे बेअकली, कस्पटासमान याहि विचाराचे लोक समाजांत असतात.

पति व पत्नी यांचे संबंध–

वास्तविक पत्नीला कुटुंबांत फार महत्त्वाचें स्थान आहे. शारीरिक दृष्ट्या अपूर्ण

असलेला पुरुष जसा स्त्रीमुळें पूर्ण होतो; त्याचप्रमाणें एकट्या पुरुषाचें मनहि अपूर्ण असून त्याच्याविरुद्ध मनोवृत्ति असणाऱ्या स्त्रीमुळें तो मानसिक दृष्ट्या पूर्ण होतो. पत्नी ही इंग्लंडच्या राज्यपद्धतींतील राजाप्रमाणें आहे. इंग्लंडचा राजा हा त्या देशांत एक महनीय व्यक्ति असून तो राजकारणांत भाग कधींच घेत नसतो. पण त्यानें राजकारणाचें निरीक्षण करून पार्लमेंट विचारील तेव्हां निरपेक्ष सल्ला दिला पाहिजे. राजकारणापासून अलिप्त राहिल्यानें त्याचा सल्ला एकांगी न होतां कित्येक-वेळां नवी दृष्टि देणारा ठरतो. पत्नीनेंहि अगदीं असेंच वागावयाचें असतें. पतीच्या कामांतील भानगडींत तिनें कधींच ढवळाढवळ करावयाची नाहीं. पण जेवढें शक्य असेल तेवढ्याचें निरीक्षण मात्र तिनें करून ठेवायचें. पतीनेंहि तिला सर्व माहिती करून देऊन वेळप्रसंगीं आपल्या पत्नीस सल्ला विचारावयास हवा. पत्नीशिवाय प्रेमाचा, आंतला, तसाच निरपेक्ष व निर्भीड सल्ला दुसरा कोणी देऊं शकणार नाहीं. पण तिला अक्कलच नाहीं असें म्हणून आपण तिचा तिरस्कार करतों—झिडकारून देतों. अशानें एकादी शहाणी स्त्री सुद्धां खुळी व्हावयाची—नव्हे होतेच. दुसऱ्याच्या गुणांचा उपयोग करून घेणें ही सुद्धां एक कला आहे. ‘ पत्नीचें कौतुक करावयाचें नाहीं ’ याचा अर्थ ‘ पत्नीची निंदा करावयाची ’ असा होत नाहीं. पण हा भेद ते लोक पाळीत नाहींत. एकादा परका वा कुटुंबांतीलच मनुष्य आणि कांहीं वेळां स्वतः-चा नोकरसुद्धां आपल्या पत्नीची निंदा करूं लागतो. अशावेळीं आपण भिडेनें वा पत्नीचा कड घेतला जाईल या खुळचट कल्पनेनें जर तटस्थ राहिलों तर आपल्या मूक संमतीनें त्यांना फूस दिल्यासारखें होऊन ते लोक शेफारून जातील. अशानें सुद्धां निंदा केल्याचा किंवा निंदा करण्यास मदत केल्याचा आरोप लादणें कांहीं वावगें होणार नाहीं. अशा वागण्यानें आपण समाजशास्त्राच्या एका आद्य नियमाचा भंग करतों हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं.

विवाहसंस्थेचा जन्म आणि पत्नीचा मान—

मनुष्याच्या रानटी अवस्थेनंतरच्या प्रथमावस्थेंत स्त्री जन्मभर एकाच पुरुषा-जवळ राहूं लागली. यांतच पुढील काळांत फोफावलेल्या विवाहसंस्थेचें मूळ आहे. स्त्रीला स्वसंरक्षणाची आवश्यकता भासूं लागली. वाटेल त्या बेजबाबदार स्वार्थी पुरुषाबरोबर संबंध न ठेवतां एकाच पुरुषाला निवडून, जन्मभर त्याच्याजवळ राहून त्याच्याजवळ कायमचें संरक्षण मागितलें. अनेक वर्षें सहवास घडलेल्या

व्यक्तीच्या संरक्षणाची जी जबाबदारी मनाला वाटते ती रोज नव्या येणाऱ्या व्यक्तीविषयीं वाटणें शक्य नाहीं. ह्यांतूनच पुढें कुटुंबसंस्था निर्माण झाली. पत्नी ही केवळ एक उपभोग्य वस्तु किंवा बिनपगारी मोलकरीण न मानतां तिच्याशीं आपण विवाहबद्ध झाल्यानें उच्च भूमिकेवरून दिसणाऱ्या मानापमान, अब्रू इ. तिच्या नाजूक गोष्टींचें संरक्षण करण्याची जबाबदारी आपणावर पडते हें विस्मरून चालणार नाहीं. नाहीं तर अनाथ स्त्रीला राबवून त्याचें योग्य मोल न दिल्याचें पातक माथीं मारलें जाईल. पतिपत्नी ही एकच सबंध व्यक्ति आहे. अर्धनारी नटेश्वराच्या मूर्तीमागें हीच कल्पना आहे. पत्नीचा जो मान तो आपला मान आणि तिचा अपमान तो आपला अपमान याची जाणीव झाली पाहिजे.

पत्नी आणि कुटुंब–

कुटुंबांत पत्नी हा फार महत्त्वाचा घटक आहे. पत्नीला डावलून कुटुंबाचें नुकसान करून घेण्यांत अर्थ नाहीं. पत्नी जिवन्त असतां तिचें मत घेतल्याशिवाय इतर कुटुंबियांच्या सल्ल्यानें आपण संसाराचा गाडा सुरळितपणें हाकूं ही घमेंड व्यर्थ आहे. यामुळें कांहीं कार्यें साधतां येतील, नाहीं असें नाहीं. पण यामुळेच कालांतरानें आपल्या कुटुंबाचीं छकलें छकलें उडविण्यास आपण कारणीभूत होतों हें लक्षांत ठेवावें. आपली वंशवृद्धि कुटुंबांतील इतर कोणत्याहि व्यक्तीपासून न होतां आपल्या पत्नीपासूनच व्हावयाची असते. आणि त्या प्रजेस दडपून चालणार नाहीं. नाहीं तर गृहकलह माजणार हें निश्चित. हा जसा पत्नीची पर्वा न केल्यानें कलह माजतो तसा आपल्या बायकामुलांचे फाजील लाड केल्यानेंहि कलह माजतो.

एकसारखें बायकोचेंच कौतुक करून व आपल्या मुलांपुरतें पाहून जर सर्व शक्ति व पैसा त्यांच्याच हिताकरतां खर्च करूं लागलों तर अर्थातच कुटुंबांतील इतर लोकांस तें असह्य झाल्याविना राहणार नाहीं. म्हणून एकत्र कुटुंबांत आपली पत्नी व मुलें हीं बँडीसारखीं समजलीं पाहिजेत. त्यांची जर योग्य प्रमाणांत संभावना केली तर तें नक्कीच हितकारक होणार. पण त्याचा अतिरेक झाल्यास तो कौटुंबिक दृष्टया विषप्रयोग होईल.

'पायांतील वहाण पायांतच !'–

पत्नीला कुटुंबांत योग्य तोच मान दिला पाहिजे. पत्नीला तुच्छ मानणारे 'पायांतील वहाण पायांत ठेवली पाहिजे' असें प्रत्युत्तर करतात. पण त्यांच्यापैकीं

कांहीं तर ती पायांतहि न ठेवतां कचऱ्याच्या पेटींत फेकून देण्यास मागें पुढें पाहत नाहींत. आणि मग आपले पाय भाजूं लागले कीं त्या बिचाऱ्या वाहणेच्याच नांवानें ओरडतात ! पायांतीलच वहाण. पण तिची योग्य काळजी न घेतल्यास आपल्याच पायास तिचे खिळे टोचूं लागतात. पण हा दोष वहाणेचा नसून आपला आहे व आपल्या गैरवर्तनानेंच हा त्रास भोगावा लागतो हें पुष्कळांस समजत नाहीं. पत्नीशीं बेफिकीरपणें वागल्यास आपणच आपल्या कृत्यांनीं कुटुंबांत वखेडे निर्माण करतों.

अस्तनींतलि निखारे !

कारण साहजिकपणेंच घरांतील इतर लोकांची नवीन आलेल्या सुनेकडे सहानुभूतीची दृष्टि नसते. ते लोक या नव्या अनोळखी ठिकाणीं पडलेल्या मुलीचे दोष काढण्यासाठीं टपलेलेच असतात. आणि पति आपल्या पत्नीस कधीं झिडकारून देतो याची ते वाट पाहत असतात. हा मनाचा हीनपणा लहानमोठ्या सर्व कुटुंबांतून पूर्वींपासून थेट आजपर्यंत अव्याहत चालत आला आहे. असो. पतीची पत्नीविषयींची सहानुभूति कमी होत नाहीं असें दिसलें तर ते लोक स्वतः पत्नीच्याविरुद्ध खोट्या चहाड्या सांगून पतीचे कान भरून देण्यास कमी करीत नाहींत. अशावेळीं पतीनें आपला तोल संभाळून वागलें पाहिजे. आपल्या भावांबहिणींवर वा अन्य कुटुंबियांवर फाजील विश्वास ठेवतां कामा नये, कारण एकदां का त्याचें मन पत्नीविषयीं विटलें कीं मनुष्यस्वभावाप्रमाणें तिच्या कोणत्याहि कृत्यांत त्याला वाईट दिसूं लागून पत्नीवरील पतीचा विश्वास कायमचा उडून जातो. पण आपली डाळ येथें शिजत नाहीं असें कळलें म्हणजे नीच मनाचे कुटुंबीय पुन्हा या कृष्णकारस्थानांत पडण्याचें सहसा धारिष्ट्य करीत नाहींत. ‘जमलें तर पहावें’ अशीच वृत्ति बहुधा या लोकांची असते.

परंतु जर कांहीं विशिष्ट कारणांनीं सहेतुकपणें त्यांनीं विश्वामित्री व्रत घेतलेलें असेल तर अशीं एकत्र कुटुंबें वैयक्तिक तर आहेतच पण सामाजिक दृष्टीनेंहि फार धोक्याचीं होतात. पतीनें वा कुटुंबांतील कर्त्या पुरुषानें सडेतोडपणें व निर्भीड वृत्तीनें अशा गोष्टींचा तावडतोब निर्णय न लावतां जर प्रासंगिक तंट्यांना वा कुटुंबाच्या भावी वाईट परिणामांना भिऊन त्या त्या वेळेपुरतें तसेंच दडपून मिटवून टाकिलें तर वरील भीतीपेक्षां हा धोका फार भयंकर आहे, हें नीट ध्यानांत असूं द्यावें. अशा तोंडदाबण्यानें आपण जिवन्त असेपर्यंत फार तर कुटुंब एकत्र राहील.

तें सुद्धां वरून दिखाऊ व आंतून पोकळ होऊन आंतल्या आंत बिचाऱ्या मुलांची व गरीब पत्नीची तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी स्थिति होईल. या अस्तनींतील निखाऱ्यांना कंटाळून पत्नीनें व मुलांनीं आपल्या जिवाचें बरेंवाईट करून घेतलें नाहीं म्हणजे मिळविली. परंतु कर्त्या पुरुषाच्या पश्चात् हेच लोक कायमचे एकमेकांचे उघड उघड शत्रू होतील. दुसरें असें कीं, ह्याचा अत्यंत वाईट परिणाम लहान मुलांवर होतो. मोठ्या माणसांचीं बाहेरून दिसणारीं भांडणें हीं एकवेळ दडपून ठेवतां येतील पण त्याचा परिणाम वागणुकींतून चोरून बाहेर पडल्याशिवाय राहणें अपरिहार्य आहे. हा चोरीचा व्यवहार लहान मुलांना आंतून छळत असतो.

## पत्नीचें कर्तव्य–

वर सांगितल्याप्रमाणें पतीनें पत्नीची योग्य ती काळजी घेतली म्हणजे कुटुंब व्यवस्थित स्वरूपांत चालण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. पत्नीनेंहि आपली मर्यादा संभाळून कुटुंबांत वागलें पाहिजे. आपल्या पतीची सर्व प्रकारची काळजी व जबाबदारी वाहणें हें आपलेंच काम आहे, हें तिनें पक्कें ओळखलें पाहिजे. पतीचा तोल सांभाळणें तिचेंच काम आहे. बाहेरील जगांत पतीचा जास्त संबंध येत असल्यानें आपणांपेक्षां त्यास ज्ञान अधिक आहे म्हणून तें ज्ञान त्याच्याकडून मिळविण्याची जबाबदारी पत्नीवरच आहे. क्वचित्प्रसंगीं पत्नीलाहि पतीचा गुरु व्हावें लागतें, यावेळीं तिनें अत्यंत नम्रतेनें, गोड वाणीनें, आणि हळुवार अंतःकरणानें आपल्या पतीस शिकविलें पाहिजे. त्याच्या उणीवा स्वतःखेरीज दुसऱ्या कोणास कळणार नाहींत याची खबरदारी घेतली पाहिजे. पतीचें चुकत असेल तेथें शांतपणें मऊ शब्दांत, तो रागावणार नाहीं अशा रीतीनें त्याची चूक सुधारली पाहिजे. घरांत कोणतेंहि बारीक अथवा मोठें कार्य काढावयाचें असेल तर त्याची वर्दी प्रथम पतीस देणें इष्ट आहे. दोघांच्या संमतीवांचून घरांत कार्य होऊं नये. पतीतर पुरुषांशीं वागतांना फार मर्यादेनें वागलें पाहिजे. दुसऱ्याच्या मनांत आपल्याविषयीं सात्त्विक आदर निर्माण होईल अशा तऱ्हेनें आपलें बोलणें, चालणें पाहिजे. दुसऱ्याच्या मनाला वाईट वासनेचा स्पर्श होईल अशा तऱ्हेचें छचोर व अल्लड, लाडिकपणाचें वर्तन होऊं नये. आपल्या तोंडावर उठणाऱ्या भावनांच्या छटा या दुसऱ्याचे मनांत आदर वा तिरस्कार निर्माण करीत असतात. आपले अंगविक्षेप सभ्य, वाणींत पोक्तपणा, डोळ्यांत उदात्तता, व्यवहार मर्यादशील असें असेल तरच आपली छाप

दुसऱ्यावर पडून आपल्याविषयीं त्याच्या मनांत आदर निर्माण होईल. मग आपण बाहेर पुरुषांत कितीहि वावरलों तरी त्याच्या मनांत आपल्याबद्दल वाईट वासना येणार नाहीं. पुरुषांच्या मनांत कोणतीहि भावना यावयास आपलें रूप व शरीर यांपेक्षां आपलें वागणें व चेहऱ्यावरील छटा हींच जास्त कारणीभूत होतात; हें स्त्रीनें लक्षांत ठेविलें पाहिजे.

मातेची जबाबदारी–

पत्नी माता झाली म्हणजे तर तिच्यावरील जबाबदारी फारच वाढते. गरोदर असतांपासूनच स्त्रीनें याची काळजी घ्यावयास पाहिजे. मुलाचें शारीरिक त्या-प्रमाणेंच मानसिक संगोपन करावें लागतें त्याची जाणीव स्त्रियांनाच काय पण पुरुषांनाहि नसते. त्यामुळें याचें महत्त्व कोणासहि समजत नाहीं. लहानपणीं न समजतां जे मुलांच्या मनावर संस्कार घडत असतात त्यांचें पुढील आयुष्यांत वर्धन व दृढता होत असते. म्हणून लहानपणींच मुलांना वागवितांना योग्य काळजी घेणें आवश्यक आहे. याच्या अभावीं पुष्कळशीं चांगलीं मुलें फुकट जातात. व कांहीं दुर्गुणांचे पुतळे बनतात. मोठेपणीं मुलांत दिसणाऱ्या गुणांना पुष्कळ अंशीं त्याची आई व कांहीं अंशीं त्याचे कौटुंबिक लोक हे जबाबदार असतात. मुलगा वाईट निघाल्यास त्याला खरें कारण त्याचे आईबाप असतात. घराबाहेरील संस्कार, संगति व त्याचे विचार हें नैमित्तिक कारण होय. परंतु त्याची पार्श्वभूमि लहान-पणींच कुटुंबांतील वातावरणांत तयार झालेली असते.

मुलांचें मानससंगोपन–

म्हणून आईनें मुलाच्या शरीराइतकेंच त्याच्या मनाला जपलें पाहिजे. त्याच्या-समोर–मग तें मूल महिन्याचें असलें तरी भांडणतंटा, अपशब्द, क्रोध इत्यादिकांचें प्रदर्शन करूं नये. त्याला बारीकसारीक गोष्टीवरून तिरसटपणानें बोलूं नये वा डोक्यांत राख घालून त्याला मारूं नये. त्याच्या अंगावर एकदम खसकन् ओरडूं नये. याचा मुलांच्या मनावर फार परिणाम होतो. तीं अशींच तिरसट, हेकेखोर बनतात. मारून मारून लोचट होतात. मूल स्वभावानें दांडगें असेल तर तें निगर-गट्ट होईल व तेंच मूल पुढें आईला डोईजड झाल्याविना राहणार नाहीं. पण तें जर स्वभावानें गरीब असेल तर, तें मनकुढें, दुबळ्या मनाचें, एकलकोंडें असें होईल. मनांत कुढत बसण्याची संवय लागली, आणि वरील कारणांमुळें आत्मविश्वास

अजिबात नष्ट झाला म्हणजे तें मूल भावी आयुष्यांत निराशी, उद्विग्न, व एकंदरींत अयशस्वी होतें. नाविन्याची आवड व नवीन उपक्रम करण्यास लागणारा उत्साह व आशा यांच्या अभावीं त्याला जीवनांत गोडी वाटेनाशी होते. अशा माणसाचें जीवन तें काय कर्तृत्ववान् होणार ? या सर्व अनिष्ट व मोठ्या दिसणाऱ्या परिणामांचें बीज लहानपणींच वाईट वातावरणामुळें व त्याच्याशीं कुटुंबियांनीं वाईट बुद्धीनें वागल्यामुळें पेरलें गेलें आहे हें कोणास समजत नाहीं. भावी जीवनांतील आधिभौतिक घटना ह्या केवळ तात्कालिक निमित्त म्हणून असतात. मूल धैर्यवान् असेल तर त्याच घटनांना ओलांडून तें पुढें जातें हें आपण पाहतों.

मुलांचा काळ नीच कुटुंबें—

आपण मुलांशीं काळजीपूर्वक वागत असतां इतर लोक त्यांच्याशीं कशा तऱ्हेनें वागतात इकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. कुटुंबांत मत्सराग्नीचा होम सतत चालला असेल तर त्यांतील मुलें सद्गुणी निपजतील ही आशाच करणें मूर्खपणाचें आहे. तीं मुलें वाईट वागणूक मिळाल्यामुळें एक तर निगरगट्ट, बेजबाबदार, उद्धट व दुर्गुणी होतील किंवा याच्या उलट तीं पूर्वी वर्णन केलेल्या मुलांप्रमाणें जीवनांत पाप्याचे पितर बनतील. त्यांच्यापासून कोणतीहि आकांक्षा केलेली ही फोलच होणार. अशा दुष्ट कुटुंबांत एकटी विचारी आई असहाय आहे ! आणि त्यांतल्या त्यांत त्या कुटुंबाचा पोकळ डोलारा उभारलेला असेल तर त्या वाईटपणाची कल्पनाच करणें शक्य नाहीं. बाहेरून तर बडेजाव दिसला पाहिजे, पण आंतून मात्र जगणें शक्य नाहीं असा छळवाद सुरू असतो. हें बाहेरहि बिचाऱ्यांना बोलून दाखवितां येत नाहीं. कारण बडेजावाची जाहिरात होऊन त्याची अब्रू राखावयाची असते. असलीं नीच कुटुंबें बिचाऱ्या स्त्रियांमुलांच्या आत्महत्येस कारणीभूत होतात. तसें नाहीं तर निदान मरणाची वाट पहात हीं बापडीं जीवन कंठीत असतात. आपल्या वैयक्तिक स्वार्थी मत्सरानें समाजाचें आपण केवढें नुकसान करतों हें त्या पशुबुद्धींना कोठून कळणार ? अशा वेळीं छळ होत असलेल्या मातांनीं अतिशय सडेतोडपणें वागलें पाहिजे. त्यावांचून गत्यंतर नाहीं.

स्त्रिया आणि मानसशास्त्र—

माता म्हणून स्त्रियांना मानसशास्त्राचा अभ्यास वास्तविक किती आवश्यक आहे हें वरील विवेचनावरून दिसून येण्यासारखें आहे. माता या स्वतः बालमानसशास्त्रज्ञ

होऊं शकतील. मनांत आणलें तर त्यांच्याइतकी ही सोपी गोष्ट दुसऱ्या कोणास साध्य नाहीं. पण आम्हाला शास्त्रीय दृष्टि आहे कोठें? आमच्यांत तर साक्षात् अडाणीपणा पुरून उरलेला आहे. मानसशास्त्राला आवश्यक असें सहानुभूतीनें भरलेलें हृदय हें तर स्त्रियांना जात्याच असतें. स्त्रियांना बुद्धि असते पण कांहीं वेळां तिचा उपयोग करण्याचें माहीत नसतें. तेवढी विचार करण्याची संवय लागली म्हणजे मानसशास्त्रज्ञाला आवश्यक असणारे सर्व गुण त्यांच्या अंगांत असतात, असें म्हणण्यास प्रत्यवास दिसत नाहीं. त्यापेक्षांहि महत्त्वाचें अनुकूल साधन म्हणजे मुलांचा चोवीस तास निकटचा सहवास.

गरोदरपणांतील दैनंदिनी–

गरोदर राहिल्यापासून प्रसूत होईपर्यंत स्त्रियांनीं नऊ महिन्यांची रोजची सविस्तर दैनंदिनी लिहावी. त्यांत, आज आपण कोणत्या प्रकारचे पदार्थ खाल्ले, दिवसाची वागणूक कशी होती–म्हणजे भांडण झालें असल्यास तें वा कांहीं दानधर्म केला असल्यास वा काय काय वाचलें तें–तें कोणत्या विषयासंबंधीं होतें, आपली मनः-स्थिति आनंदी वा दुःखी वा क्रुद्ध इ., कोणकोणतीं माणसें भेटलीं होतीं–त्यांचा स्वभाव कसा होता, कोणकोणत्या वस्तूंची वा व्यक्तींची आपणावर छाप पडली किंवा त्यांबद्दल तिरस्कार वाटला, डोहाळे लागले असतां कोणत्या प्रकारचें अन्न खावेंसें वाटत होतें, कोणकोणत्या गोष्टींची आवड उत्पन्न होई, सारा दिवस कोठें व कसा घालविला, तेथील नैसर्गिक वा मानवी वातावरण कसें होतें; आपलें प्रत्येक स्वप्न सविस्तरपणें लिहिणें, मनांत कोणकोणते विचार आले इत्यादि सविस्तर माहिती प्रत्येक दिवसाची आपल्या दैनंदिनींत लिहिणें आवश्यक आहे. प्रसूतीनंतर त्या सर्वांचें वर्गीकरण करून प्रत्येक गोष्टीचें दुसऱ्याशीं प्रमाण काढावें. अधिक प्रमाण असलेल्या गोष्टी निराळ्या नमूद करून ठेवाव्यात. प्रसूतीपूर्वी थोडा वेळ वा प्रसूतीच्यावेळीं काय विचार आले तेहि नमूद करावेत. ही सर्व माहिती नीट जमली म्हणजे मुलावर गरोदरपणांतील आईच्या वागणुकीचा कितपत परिणाम होतो तें कळेल. मुलाची प्रवृत्ति ही केव्हां तयार होते तें समजेल, गरोदरपणींच त्याच्या मनाची रचना तशी होते कीं तान्हेपणीं संस्कारांनीं प्रवृत्ति तयार होते, असल्यास या दोहींत प्रमाण काय तें आजमावितां येईल.

प्रसूतीनंतर दैनंदिनी–

ही लिहावयाची ती आपल्याविषयीं विशेष नसून त्यांत मुलाच्या प्रत्येक बारीक

सारीक गोष्टीची नोंद व्हावयास पाहिजे. मुलाला भूक किती व कोणत्या वेळेस लागते, त्याला झोप केव्हां लागते, किती वेळ लागते, त्याची वघण्याची ढव कशी आहे, अंगविक्षेपांची लकब, डोळे, चेहऱ्यावर विशेषतः जिवणीजवळ कोणत्या छटा उमटतात; मूल प्रथम हसूं लागलें तो दिवस, हसूं केव्हां व कशानें येतें, रडण्याची वेळ, त्याला कारण, दिवसांतून किती वेळ हंसलें व रडलें; पुढें त्याच्या खेळण्याच्या संवयी, आवडीनिवडी, बोलण्याची ढव, त्याला किती वेळां रागें भरून घ्यावें लागतें, त्याच्या भोंवतालचीं माणसें त्याच्यासमोर कशीं वागतात, तो दिवसभर असतो तें वातावरण इ. अनेक बारीक सारीक गोष्टींची नोद आईजवळ पाहिजे. मूल मोठें झाल्यावर तेव्हांची वागणूक, प्रवृत्ति व वहींतील नोंद हीं पडताळून पहावींत. अशी माहिती प्रत्येक मुलाविषयीं लिहावी. १०।१० मुलें होणाऱ्या स्त्रिया अनेक आहेत. त्यांना हें फार सोपें जाईल. अभ्यास दोन मुलांशीं पडताळून पाहातां येईल. अशा तऱ्हेनें स्त्रिया स्वतः अभ्यास करूं लागल्या म्हणजे बालमानसशास्त्राची प्रगति फार झपाट्यानें होईल. मग वाईट मुलें सुधारतां येतील व कोरीं मुलें चांगलीं करतां येतील.

लहान मुलाची करमणूक करण्याकरितां आईजवळ गोष्टींचा भरपूर सांठा असावयास पाहिजे. त्याला शिकवून मनानें सुसंस्कृत करण्याकरितां आईजवळ ज्ञानसागर भरलेला पाहिजे. पुरुषांपेक्षां स्त्रियांना बंधनें अधिक पाहिजेत, कारण त्यांना भावी पिढी तयार करावयाची असते. त्याच जर ढिल्या होऊं लागल्या तर भावी पिढीला सुसंस्कृत कोण करणार ? पिढीची सर्व जबाबदारी एकट्या स्त्रीवर असते. पिढी तयार करणें हें पुरुषाचें काम नव्हे. शिकविणाऱ्याला लागणारे गुण त्यांच्या अंगीं नसतात. शिवाय कामाधंद्याकरितां तो नेहमीं बाहेर असणार. मुलांचें मन शिकत असतें; तें एक तासाच्या शिकवणीनें नसून चोवीस तासांच्या आईच्या अनुकरणीय वर्तनाच्या प्रेमळ सहवासांतून नकळत शिकत असतें. हें पुरुषाला कसें जमावें ? पण यांतच स्त्रियांचा गौरव आहे; हें त्या बिचाऱ्यांना समजत नाहीं !

मातेचीं मुलीसंबंधीं कर्तव्यें.–

कन्यावस्थेंत स्त्रियांनीं आपल्या भावी आयुष्याची पूर्वतयारी करून ठेवावयाची असते; इकडे मुलीच्या आईबापांनीं नीट लक्ष पुरविलें पाहिजे. लहानपणांत आई-बापांनीं योग्य वळण न लावल्यास आणि गुरूनें योग्य शिक्षण न दिल्यास त्याचा परिणाम बिचाऱ्या मुलीला परक्याच्या घरीं भोगावा लागतो. पत्नी

वा माता हीं वाईट निपजल्यास त्याचा दोष पर्यायानें आईबाप वा गुरु यांच्यावर येतो. भावी पिढी तयार करणाऱ्या मातेची सर्व जबाबदारी आई, बाप व गुरु यांच्यावर असते.

गुरूचें कर्तव्य काय तें 'शिक्षण' या प्रकरणांत येईलच. आईबापांनीं मुलीकरितां काय करावयास पाहिजे तें आतां पाहूं.

गृहशिक्षण–

लहानपणींच आईनें लहान–सहान कामें सांगून मुलीला घरगुती कामांची माहिती करून देणें इष्ट आहे. मुलापेक्षां मुलीला जास्त जपावें लागतें. कारण ती सासरीं जावयाची असते. आपली मुलगी उद्धट, बेफिकीर, बेजबाबदार वागणारी, अघळ-पघळ व्यवहार करणारी होत नाहीं याची काळजी घेतली पाहिजे. मुलांप्रमाणेंच मुलींच्याहि शरीरप्रकृतीकडे चांगलें लक्ष द्यावयास हवें, कारण आई अशक्त असेल तर मुलेंहि अशक्त होणार. मुलीनें रोज नियमितपणें व्यायाम व खाणें घेतलें पाहिजे. तिला खूप प्रकारचे खेळ यावयास पाहिजेत. खेळांनीं मनुष्याचें मन आनंदी राहून नेहमीं उत्साही राहतें. चिडका, एकलकोंडा व हेकेखोर स्वभाव होत नाहीं. मन-मिळाऊ व चार माणसांतील स्वभाव होतो. मन दिलदार ( Sportsman–spirit ) होतें. खेळांप्रमाणेंच मुलीला स्वयंपाकासंबंधीं सर्व कामें व पदार्थ येत असावेत. घर-गुती औषधें व उपचार यांची माहिती सहजपणें आईनें करून द्यावी. आपण स्वतः कोणतेंहि विशेषतः महत्त्वाचें व जबाबदारीचें काम करतांना मुलीला जवळ घ्यावें. तिला तें समजलें पाहिजे. केव्हां केव्हां आपल्या देखरेखीखालीं मुलीलाच तें काम करण्यास सांगावें. घरगुती कौटुंबिक वळण लावावें. सासरीं कसें वागावें, कोण माणसें कशीं असतील व त्यांच्याशीं आपण कसें वागावें इ. गोष्टींची कल्पना प्रथमच करून दिल्यास सासरीं गेल्यावर मुलीला एकदम बावचळल्यासारखें होणार नाहीं. काटकसर करण्यास शिकविणें तर फारच आवश्यक आहे. हें सर्व आईनें सौजन्यानें शिकविलें पाहिजे. म्हणजे मुलगीहि सौजन्मयुक्त होईल. मुलाला जसें जन्मभर अनेक गोष्टी शिकतां येतात तसें मुलीला शिकतां येईलच असें नाहीं. कौमार्यावस्थेंतच ज्या गोष्टी शिकण्याची आपणांस हौस आहे; त्या शिकून घेतल्या पाहिजेत. सासरीं ती हौस खात्रीनें पुरविली जाईल असें म्हणतां येणार नाहीं.

जमलें तर फारच उत्तम. सर्व कलाकौशल्याचीं कामें मुलीनें कौमार्यावस्थेंतच शिकून घेतलीं पाहिजेत. तिनें टापटीप व व्यवस्था या गुणांना पारखें होऊन चालणार नाहीं. आणि चांगलीं चांगलीं पुस्तकें वाचण्याचा नाद याच वयांत लागतो तो लावून घेतला पाहिजे. आपल्याला पुढें मूल व चूलच संभाळावयाचें आहे; तेव्हां या पुस्तकी ज्ञानाची कांहीं आवश्यकता नाहीं अशा खुळचट व अडाणीपणाच्या कल्पना तिनें मनाशीं बाळगूं नयेत.

अपवाद पहिला, योगिनी स्त्रिया–

आतांपर्यंत जें सांगितलें तें सर्व कुटुंबवत्सल स्त्रियांच्या बाबतींत होतें. ज्या स्त्रिया लग्नें करून संसार थाटतात; आणि सांसारिक स्त्री म्हणूनच जिची त्या कुटुंबांत आवश्यकता त्याच फक्त स्त्रियांनीं वरील कर्तव्यें पार पाडावयाचीं आहेत. परंतु ज्यांच्यामागें संसार नाहीं, कुटुंबाची जबाबदारी नाहीं, आणि एकट्या सड्या आहेत अशा; आणि ध्येयवादी एखादी कार्यकर्ती, जिनें आजन्म ब्रह्मचारी राहून सर्व आयुष्य लोककल्याणार्थ वाहून घ्यावयाचें, अशी जिची बलवत्तर निष्ठा आहे अशी योगिनी– या स्त्रिया पुरुषवजा समजल्या पाहिजेत, यांच्यामागें कुटुंबाची, संसाराची राखरांगोळी होणार नाहीं. पण हे अपवाद आहेत. हें जीवन सामान्य स्त्रीला जमणें शक्य नाहीं. त्याला व्यक्तिमत्वच विशेष असावें लागतें. अशा स्त्रियांनीं सार्वजनिक संस्थांतून वा अन्य ठिकाणीं आपला देह खुशाल लोककल्याणार्थ झिजवावा.

दुसरा अपवाद–

परंतु ज्या स्त्रियांची मनोवृत्ति अशी नाहीं–संसारी आहे तरी बिकट परिस्थिती-मुळें ज्यांना ही स्थिति प्राप्त झाली आहे त्यांनीं समाजांत वाटेल तेथें जाऊन पोट भरणें योग्य नाहीं. सरकारनें अशा स्त्रियांच्या संस्था उघडून त्यांत त्यांना कामें द्यावींत. अशा स्त्रियांचा संसारी कुटुंबांत समावेश होत नसल्यानें यांच्या-पासून कुटुंबसंस्थेस धोका पोंचण्याचें कारण नाहीं.

स्त्री कुटुंबव्यवहारांत गुरफटून गेलेली असली तरी तिला अडाणी म्हणून गोपांत राहण्याचें कारण नाहीं. तिला बाहेरच्या समाजांत केव्हांहि सन्माननीय स्थान आहे. तिनें अज्ञानाच्या अंधकारांत बुडून जाण्याचें कारण नाहीं. स्त्री जर अज्ञानी राहील तर भावी पिढीला शिशुपणांत सज्ञान कोण करणार ?

दोन प्रेमळ अंतःकरणांतील प्रेममय देवघेव–

पुरुषानें स्त्रीचें रक्षण दुर्बल म्हणून करावें यांत स्त्रीला कमीपणा नाहीं. आपलेपणानें एकत्र राहिलेल्या दोन सुहृदांनीं एकमेकांच्या उपयोगी पडावें यांत कोणालाहि अपमानास्पद नसून दोघांना भूषणावह आहे. नाहीं तर कृतघ्नतेचें पाप माथीं येईल. पुरुषानें मिळवून आणलेल्या धनाचें, त्याच्या संस्कृतीचें व कौटुंबिक इभ्रतीचें स्त्रीनें रक्षण करून स्त्रीच्या अब्रूचें रक्षण पुरुषानें करावें या परस्पर देवघेवींत कमीपणा येतो कोणाला ?

दोन अंतःकरणें आपलीं म्हणून जवळ आलेल्या व्यक्तींनीं एकमेकांवर अवलंबून राहावें, एकमेकांचीं कामें करावींत, वस्तू वापराव्यात व तो आपला अधिकार समजावा यांत दोघांचें सख्य वृद्धिंगत होतें; परस्पर जिव्हाळा वाढत जातो. या उलट दुसऱ्याचें कांहीं घ्यावयाचें नाहीं, त्यास कांहीं द्यावयाचें नाहीं अशा वृत्तीनें दोघांचा संबंध शक्य तितका कमी येत जातो. तुटकपणास सुरुवात होते. तुटकपणा, आपपरभाव उत्पन्न झाला कीं त्या दोन व्यक्ती आज ना उद्यां दूर होणार हें नक्की समजावें. परस्परांचा संबंध हा दोन हृदयांना जोडणारा दुवा आहे.

बाह्यात्कारी व्यवहार म्हणजे जरी साक्षात् प्रेम नव्हे तरी अमूर्त प्रेमभावनेस त्या व्यवहारानें गोंडस मूर्तिमंत रूप येतें. आणि कोणतीहि गोष्ट मूर्तिमंत आपल्या डोळ्यापुढें उभी राहिलेली पाहिली कीं, तीवरील आपली श्रद्धा दृढतर होते. म्हणून स्त्रीपुरुषांनीं परस्परांवर मित्रत्वाच्या नात्यानें अवलंबून राहणें परस्परांस भूषणावह असून हितकारक आहे.

प्रौढ कुमारिकांचा प्रश्न–

समाजांत प्रौढ कुमारिकांचें प्रमाण वाढूं लागलें म्हणजे तें अनिष्ट होतें. सामाजिक वादाचे पेंचप्रसंग निर्माण होऊं लागतात. प्रौढ सपत्नीक विवाहांचें प्रमाण वाढूं लागतें आणि मग प्रथम पत्नीच्या कुटुंबाचे साहजिकपणें हाल होऊन कुटुंबसंस्था डळमळूं लागते. कुमारी–मातांचा फैलाव होतो. त्यांच्या संततीचा प्रश्न समाजापुढें " आ ' वासून उभा राहतो. अशा स्त्रियांची समाजांत अवहेलना सुरू होते. विवाहा-वांचून स्त्रिया पुरुषाजवळ राहूं लागतात. उदरभरणासाठीं प्रौढ कुमारिकांस

नोकऱ्या कराव्या लागतात. त्याचा परिणाम स्त्रियांच्या शारीरिक व नैतिक बलावर वाईट होतोच पण त्यामुळें आणखी बेकारी वाढते. स्त्रिया लवकर लग्न करूं न लागल्या म्हणजे तरुणांची कुचंबणा होते. आर्थिक स्वातंत्र्य व समान हक्काचे वाद जास्त माजूं लागतात. अशा सर्व कारणांनीं समाजाचें स्वास्थ्य बिघडतें.

कुमारिका प्रौढ कां राहूं लागल्या?—

या आपत्तीला जबाबदार कोण? पर्यायानें सध्यांच्या शिक्षणपद्धतीलाच जबाबदार धरावें लागतें. स्त्रियांना सुशिक्षित करण्याकरितां त्यावेळच्या समाजसुधारकांनीं शिक्षणाच्या प्रचारार्थ चळवळ सुरू केली. त्यांत कांहीं दोष होते. कांहींहि करा पण प्रथम स्त्रियांना सुशिक्षित होऊं द्या या उतावीळ कल्पनेनें चालू असलेल्या शिक्षणाचा त्याच्या दृष्टीनें साधकबाधक विचार न करतां तेंच शिक्षण स्त्रियांना देण्यास सुरुवात झाली. त्याचा इतका प्रसार झाला तो इंग्रजांच्या सहवासानें आमच्यांत नवीन आचारविचार आले त्याचा परिणाम होय. पुढें तर सहशिक्षणाचा भलताच प्रसार होऊन त्यामुळें चालू काळचा तो एक शिष्टाचार होऊन बसला. मुलगी शाळा-कॉलेजांत जाऊं लागली म्हणजे तिच्या बापाला एक प्रकारची धन्यता वाटत असे. विद्यालयांतील एकत्र सहवासानें मुलांमुलींच्यांत फॅशनचें हळुहळू प्रस्थ माजूं लागलें. यांतच मुलांनीं बायकी गुण उचलले व मुलींच्यांत पुरुषी गुण उतरले. विद्यालयांतील या खुल्या वातावरणामुळें एक प्रकारची स्वैर वृत्ति उत्पन्न झाली. पूर्वीं जेथें कॉलेजांतील मुलीच्या फॅशनचें कौतुक बापाला वाटे तेथें आज त्या मुलीमुळें नसत्या काळज्या त्याला लागून राहिल्या. पुरुषांबरोबर शिक्षण घेतल्यामुळें त्यांच्याप्रमाणेंच कॉलेजांत पहिलें येणें, पदवी मिळविणें इत्यादि ईर्षा मुलींच्या मनांत साहजिकपणें उद्भवूं लागल्या. अभ्यासाच्या भरांत लग्न नकोसें होऊं लागलें. अर्थात् पदवी परीक्षेपर्यंत विवाह लांबविणें भाग पडलें. पुरुषांचेंच शिक्षण त्यांना मिळत असल्यानें त्यांचा उद्योगधंदा नोकरी सुशिक्षित स्त्रिया करूं लागल्या. स्वतः विद्यासंपन्न होऊन आणि नोकरी करून स्वतःच्या पायावर उभें राहण्याची धमक आल्यामुळें लग्नाची बेडी आपणच आपल्या पायांत घालून घेऊन आपल्या स्वातंत्र्याला व स्वाभिमानाला अडथळा आणणें सुशिक्षित स्त्रीला रुचेना. शिवाय मुली शिकूं लागल्याबरोबर विवाहेच्छु पदवीधरांसहि पदवीधर निदान सुशिक्षित सहचारिणी असावी असें वाटूं लागलें. अर्थातच मुलीला निदानपक्षीं मॅट्रिक करणें पण जमल्यास कॉलेजांत अगदीं

नाहीं म्हटलें तरी एक वर्ष घालणें मुलीच्या बापांना आवश्यक वाटूं लागलें. या सर्वांचा परिणाम—वर सांगितल्याप्रमाणें प्रौढ कुमारिकांचें प्रमाण समाजांत सपाटयानें वाढूं लागलें.

संसर्गजन्यवृत्ति—

शारीरिक रोगाप्रमाणें मनाच्या कांहीं वृत्ति या संसर्गजन्य असतात. एखादी मुलगी बराच काळपर्यंत अविवाहित राहिली, पदवीधर झाली व पैसे मिळवूं लागली तर त्या एकटीचें वर्तन समाजांस झळ लावूं शकत नाहीं. पण आतांच म्हटल्याप्रमाणें हा संसर्गजन्य रोग असल्यामुळें एकीचें पाहून दुसरी करते. तें त्यांच्या मित्रमंडळांत पसरतें. आणि तेथून त्याचा सर्वत्र फैलाव होतो. याचवेळीं सामाजिक प्रश्न म्हणून त्यास स्वरूप येऊन तो प्रश्न समाजशास्त्रज्ञांपुढें पेंच निर्माण करितो. म्हणून कोणतीहि बाब असली मग ती पूर्णपणें वैयक्तिक वाटणारी असली तरी सुद्धां त्याकडे मोठया दृष्टिकोनानें पाहावयास पाहिजे. वैयक्तिक तात्कालिक सुखाच्या आहारीं जाऊन समाजाचें चिरंतन सुख बिघडवूं नये. कोणतीहि गोष्ट करतांना मनांत असा विचार आणावा; हीच गोष्ट जर सर्वांनीं करूं म्हटलें तर एकंदर परिस्थिति काय होईल? ती गोष्ट आपल्या एकटयालाच करण्याचा काय म्हणून अधिकार? इतरांनाहि असें करावेंसें वाटत नाहीं कां? मग सर्वांनींच असें केलें तर समाजास तें हितकारक होणार नाहीं. असा प्रोक्त आणि दूरदृष्टीचा विचार जर प्रत्येकानें केला तर समाजाचें स्वास्थ्य बिघडण्याची काळजी नको.

वर सांगितल्याप्रमाणें शिक्षणामुळें कुमारिका वयानें प्रौढ होऊं लागल्या तशाच इतर कारणांनींहि स्त्रिया अविवाहित राहूं लागल्या.

समाजावर घडणारे अनिष्ट परिणाम—

स्त्रीपुरुषांत शिक्षणाचा फैलाव झाल्यामुळें समाजांत नवीन सुधारकी आचारविचारांना थारा मिळूं लागला. ज्या स्त्रियांना शिक्षण मिळालें नाहीं परंतु भोंवतालच्या सुधारकी वातावरणामुळें त्यांनीं नवीन चालीरीती व सुधारणा पटकन् उचलल्या, अशा स्त्रिया सुधारलेल्या वातावरणामुळें धीट होऊन नोकऱ्या वा स्वतंत्र धंदे करूं लागल्या. अर्थातच यांची विवाहमर्यादा लांबणीवर पडणें अपरिहार्य

होतें. अनाथ व असहाय एकटया स्त्रियांना वरील स्त्रियांनीं उदाहरण घालून दिलें. कारण अशा निराश्रित स्त्रियाहि नोकऱ्या करून आपल्या पोटापाण्याचा प्रश्न स्वतंत्रपणें सोडवूं लागल्या. पण कांहीं झालें तरी नैसर्गिक वासना ह्या अजिवात नष्ट होऊं शकत नाहींत. आणि त्या नष्ट होणें हा त्यांचा दोष समजतां कामा नये. निराश्रित स्त्रियांच्या विवाहाविषयीं कोण जबाबदारी घेणार ? त्यांची जबाबदारी आपणांवर घेऊन त्यांचा संसार थाटून देण्याइतका आपला समाज अजून शहाणा झाला नाहीं. मग त्या त्या स्त्रीनें आपापला प्रश्न सोडविल्यास त्यांत त्यांचा काय दोष ? समाजच त्याला दोषी आहे. निराश्रित स्त्रीचा फायदा घेऊन स्वार्थी कामी पुरुष खोटया प्रेमाचें आमिष दाखवून त्या बिचारीला फसवितात. आपण होऊन तिच्याशीं विवाहबद्ध होणारा उदात्त पुरुष विरळा. एका पुरुषानें फसविल्यावर साहजिकपणेंच दुसरा शोधावा लागतो. विषयवासनेखेरीज आपल्यामागें प्रेमाचा आधार आपल्या जीवनांत असावा हीहि इच्छा पुरुषांची असते; मग जात्याच अबला असणाऱ्या स्त्रीची नसणें कशी शक्य आहे ? अशी स्त्री प्रथमदर्शनीं आपुलकी दाखविणाऱ्या पुरुषाकडे ‘ आपला हा आधार होईल काय ? ’ अशा आशाळभूतपणें पाहात असते. परंतु यांत तिची निराशा झाल्यावर ती आपली फिर्याद कोणाकडे नेणार ? तिच्या वरीलप्रमाणें जीवनक्रमामुळें समाज तिला धुडकावून लावतो. नीच लोक स्वार्थी बुद्धीनें तिच्याकडे पाहात असतात; पण तें तिला नको असतें. लब्धप्रतिष्ठ उच्चकुटुंबीय सज्जन तिच्या या वर्तनाबद्दल तिची अवहेलना करितात. व आपली प्रतिष्ठा बिघडेल या भीतीनें तिच्याशीं उघड उघड व्यवहार ठेवण्यास कबूल नसतात. एखादा नीच प्रतिष्ठित तिच्याशीं वाईट वासनेनें चोरून व्यवहार ठेवण्याचा प्रयत्न करील पण चार लोकांत तिची उघडपणें निंदा करील. तिच्याशीं चार लोकांत बोलण्यासहि त्याला कमीपणा वाटेल.

रक्षा–

समाजांत असले दुष्ट सज्जन जन्मास आले म्हणजे तो समाज पापांचें व अत्याचारांचें–उघड नव्हे चोरटया अत्याचारांचें–माहेरघर बनतें. अशा स्त्रियांतहि सुशील स्त्रिया असूं शकतात. असहाय परिस्थितीमुळें वाईट वातावरणांत पडल्या हा काय त्यांचा दोष ? आणि शिष्टाचाराला शोभेल असा विवाह करणें अशक्य असल्यामुळें परपुरुषांजवळ राहिल्या म्हणून कांहीं त्या पतित होत नाहींत. त्या

पुरुषाजवळहि अनन्यभक्तिभावानें राहूं शकतात. शिष्ट कुटुंबांत कुलीनतेच्या आवरणाखालीं चोरून व्यवहार होतात आणि अशा स्त्रिया पुनः पतिव्रता म्हणून मिरवितात! अशा उच्च कुटुंबांतील नीच स्त्रियांपेक्षां नीच वातावरणांतील उच्च स्त्रिया या केव्हांहि थोर आहेत!

नीति जर नुसत्या देखाव्यांत–भपक्यांत सांठविली असेल तर प्रतिष्ठित चोर हेच नीतिमान समजले पाहिजेत. पण नीति नुसत्या वरच्या भपक्यांत नसून ती अंतःकरणांतील शुद्ध भावनेंत आहे. या दृष्टीनें परीक्षा करूं म्हटल्यास मोठे-पणाचा बडेजाव मिरविणारीं कांहीं कुटुंबें हीं तिरस्करणीय व त्याज्य वाटतील. पण बहुजनसमाजाला हा खोल सहानुभूतीचा विचार कोठून असणार? उच्चवर्णीय समाज या नीति–अनीतीचा विचार करण्यास तयार नाहीं. त्याला स्वतःची प्रतिष्ठा मिळवावयाची आहे. मग ती दुसऱ्याच्या कुचेष्टेनें साध्य झाली तरी पाहिजे आहे. किंबहुना परिस्थितीनें मनांत नसतांनाहि ज्यांना अनीति करावयास लावली अशांचीच कुचेष्टा केली म्हणजे आपली प्रतिष्ठा आपोआपच वाढेल अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे.

प्रौढ कुमारिकांचा प्रश्न कसा सुटेल ?–

पण प्रौढ कुमारिकांचा प्रश्न सोडवायचा असेल तर समाजकार्य म्हणून नसलें तरी साधी भूतदया म्हणून तरी त्यांच्याकडे शिष्ट कुटुंबांनीं सहानुभूतिपूर्वक दृष्टि वळविली पाहिजे. समाजांत प्रतिष्ठा असलेल्या विवाहेच्छू विधुरांनीं वा तरुणांनीं अशा सुशील स्त्रिया पाहून त्यांच्याशीं विवाहबद्ध झालें पाहिजे; तरच हा प्रश्न सुटण्यासारखा आहे. समाजानें अडाणीपणाच्या नीतिकल्पना आपल्या बदलल्या पाहिजेत. उच्च कुटुंबियांनीं अशा स्त्रियांना आपल्यांत घेऊन त्यांस आश्रय द्यावा आणि त्यांचीं लग्नें योग्य पुरुषांशीं लावून द्यावींत. त्यांचा संसार थाटून द्यावा. त्या स्त्रियांचें मन कलुषित असेल तर तें सुसंस्कृत करणें आपलें काम आहे. हीन समजल्या गेलेल्या तिरस्कृतांनाच जवळ घेऊन त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करणें यांतच खरा भलेपणा सांठविलेला आहे. त्यांच्यामुळें आपल्याला वाईटपणा येईल असें कमकुवत व्यक्तिमत्व असूं नये. जे लोक असा बहाणा करतात त्यांचें व्यक्तिमत्वच तसें कमकुवत समजलें पाहिजे. आपली नीति इतकी बलवत्तर पाहिजे

कीं, दुसऱ्याची कितीहि अनीति असली तरी तिनें आपण न बिघडतां त्यालाच आपण सुधारूं शकूं. असा दांडगा आत्मविश्वास आपल्या अंतःकरणांत पाहिजे.

प्रौढ कुमारिकांच्या अधोगतीला जबाबदार कोण ?–

अशा स्त्रियांना तुच्छ लेखून आपण वाळींत टाकिलें तर त्या आणखी बिघडत जातात. इच्छा असते म्हणून नाहीं तर आलेल्या अनुभवावरून त्यांची मनोवृत्ति तशी तयार होत जाते. म्हणून त्यांना चांगल्या वातावरणांत आणलें पाहिजे. पुरुषांनीं तिला फसविलें असेल. विवाहाच्या थापा मारून खोटचा प्रेमाचा डोलारा उभारून तिला संतति झाल्यावर तिचा विश्वासघात केला असेल,: आपण चांगल्या मनानें राहत असतांहि लोक आपल्याला पापी म्हणून बघतात; असा तिला अनुभव आला असेल, ज्या हितचिंती लोकांपासून बरी अपेक्षा करून ती फोल झाली असेल, जो पुरुष येतो तो तिच्याकडे सुलभ अशी उपभोग्य वस्तू म्हणून पाहात असेल तर जन्मभर अशा घेतलेल्या वाईट अनुभवांनीं तिचें मन जगाविषयीं विटून जाईल. जगांत कृतज्ञता, भलेपणा या गोष्टी भूलथापा असून कोणी कोणाकरितां उपयोगी पडत नाहीं, म्हणून तिची वृत्ति बेफिकीर बनते. चार माणसांत तिला गोड बोलावेंसें वाटत नाहीं. तुसडेपणा टळणें शक्य नाहीं. एवींतेवीं लोक पापीच समजतात, मग एखादवेळेस पाप करायलाहि कांहीं हरकत नाहीं, कारण जगामध्यें पापपुण्य या सर्व थापा आहेत असें तिच्या अनुभवावरून तिला पटलेलें असतें. कोणाहि-बद्दल तिची बेपर्वाई वृत्ति बळावते. कारण दुसऱ्यांची पर्वा करून स्वार्थ नाहीं व परमार्थहि मिळत नाहीं असें तिच्या अनंत अनुभवांनीं तिला शिकविलेलें असतें. पातिव्रत्य, कुटुंबवत्सलता, इत्यादि शब्द तिच्या हृत्पटलावरून पार पुसून गेलेले असतात. जगांत चांगुलपणाला किंमत नाहीं अतएव वाटेल तें करून आयुष्य सुरक्षितपणें जगावें हा धडा तिच्या अनुभवांनीं तिला घालून दिलेला असतो. अशा प्रकारें ती स्त्री समाजांत राहण्यास निरुपयोगी होत जाते. तिला तत्त्व शिकवायला गेलांत तर तिचे अनंत अनुभव सांगून ती तुम्हांला क्षणांत गप्प करून टाकील. आणि तिच्या दृष्टीनें तें अगदीं बरोबर आहे, कारण तिला अनुभव असे आलेले असतात कीं, जगांत चांगुलपणा असणें शक्य नाहीं असेंच कोणालाहि वाटेल.

पश्चात्तप्त पतिव्रता–

पण त्यांतहि कांहीं स्त्रिया अशा असूं शकतात कीं, त्यांना आपल्या पूर्वजीवनाचा तिटकारा व पश्चात्ताप होऊन आतां कुलीन कुटुंबांशीं संबंध यावा, चांगल्या कौटुंबिक वातावरणांत राहावें, असें त्यांना वाटूं लागतें. निदान अशा स्त्रियांना तरी कुलीनांनीं झिडकारून देऊं नये. त्यांच्या परिस्थितिजन्य वाईट पूर्वजीवनाची हेटाळणी करून ‘ ती बाईच तसल्या चालीची आहे ’ असें म्हणून त्या बिचारीला दूर लोटूं नये. तिच्यामुळें आपलें कुलीनत्व बिघडेल असली हलकट व दुष्ट कल्पना मनांतहि आणूं नये. पश्चात्ताप होऊन आपण होऊन सत्संगतीकरितां शरण आलेल्या पाप्याला खऱ्या साधूनें आपल्या साधुतेला बट्टा लागेल या भीतीनें दूर लोटून त्यास अस्पृश्य म्हणून मानावें यासारखी जगांत दुसरी भयंकर गोष्ट साधुतेच्या पोटीं वसत असेल असें वाटत नाहीं.

नीच स्त्रियांचें मनोविश्लेषण–

ज्या स्त्रियांना त्याच वाईट जीवनाची चटक लागलेली असते त्यांच्या बाबतींत कांहींच प्रश्न येत नाही. त्यांचा वर्गच नियमबाह्य समजला पाहिजे. एवढेंच कीं, त्यांनीं आपल्यासारख्या आणखी स्त्रियांना तयार करूं नये. भावी स्त्रियांची योग्य काळजी वाहणें हाच त्यावर उपाय आहे. प्रत्यक्ष त्याच स्त्रियांना वळविणें फार दुर्घट काम आहे. पण त्यांना त्याच जीवनाची चटक कां लागावी ? विवाह केल्यानें आर्थिक आणि इतर बाबतींत स्वातंत्र्य नष्ट होईल ही त्यांना भीति असते का ? कां त्यांची विषयवासनाच बलवत्तर असते ? एका पुरुषानें त्यांचें समाधान होण्यासारखें नसतें ? कीं यापैकीं कांहीच कारण नसून एकदां त्या स्थितींत पडल्यावर त्याचीच गोडी उत्पन्न होते ? कां मुळांतच त्यांची मनोवृत्ति छचोर व स्वच्छंदी असते ? आणि अनुकूल परिस्थिति मिळतांक्षणींच त्याचा फायदा घेतला जातो ?

खरें कारण काय तें नक्की सांगणें कठीण आहे. कदाचित् वरीलपैकीं कोणतेंहि कारण निरनिराळ्या स्त्रियांना लागू पडण्याचा अधिक संभव आहे. मानसशास्त्रीय अभ्यास करावयाचा झाल्यास अभ्यासूंनीं अशा स्त्रियांची मैत्री संपादन करून त्यांचा बालपणाचा इतिहास, त्यांचें कूल व त्यांची सख्यांची वागणूक यांचा चिकित्सेनें

अभ्यास करणें जरूर, आहे. म्हणजे मग या स्त्रियांची मनोवृत्ति जन्मतःच अशी आहे, कीं, संस्कारानें अशी झाली आहे, कीं, परिस्थितीनें या जाळ्यांत त्यांस पकडलें आहे तें कळून येईल. त्या त्या निदानाप्रमाणें ते ते निरनिराळे उपाय योजावयास पाहिजे आहेत. अशा स्त्रिया समाजांतील कोणत्या वर्गांतून येत असतात हें पाहणेंहि आवश्यक ठरेल. बहुधा समाजाच्या खालच्या थरांतून अशा स्त्रियांचा जास्त भरणा होत असावा. असें असेल तर ती जात सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. अनैतिक संबंधापासून झालेल्या समाजबाह्य संततींतूनहि अशा स्त्रिया येत असतील. स्वैर वृत्ति, विषयवासना व हीन कर्में करण्याचा मनाचा कल हीं अडाणीपणामुळें जास्त बळावतात. मन सुसंस्कृत झालें म्हणजे अशा वासना मनोबद्ध होऊन उच्च प्रकारच्या आचारविचारांची लालसा निर्माण होते.

पण हें सर्व पुढील पिढीसंबंधानें झालें. सध्यां ज्या स्त्रिया अशा जीवनांत पूर्णपणें मुरलेल्या आहेत त्यांचें काय करावयाचें ? त्यांना तसेंच राहूं द्यावें म्हणावें तर त्यांचें अनुकरण इतरहि कांहीं स्त्रिया करण्याचा संभव आहे. शिवाय अशा स्त्रियांचा वर्ग असणें हें समाजाला कमीपणाचें व हानिकारक नाहीं काय ? एकापेक्षां जास्त पुरुषांशीं संबंध ठेवणें हें बेकायदेशीर ठरवणें पण अगदींच अयशस्वी होईल. व्यक्तीच्या वैयक्तिक खासगी जीवनांत शिरल्यासारखें होईल. उघड धंदा करणाऱ्यांवर कायदेशीर इलाज करतां येईल. परंतु शिष्ट समाजांतून चोरून व्यवहार करणारे निरकुंश राहतील !

एक उपाय–

गांवोगांवीं राजसभेनें स्वतंत्र कार्यालयें उघडून राजसेवकांकरवीं प्रत्येक गांवाची इत्थंभूत माहिती सरकारी दप्तरांत जमा करून ठेवणें अवश्य आहे. त्या सरकारी नोंदेंत ज्या स्त्रिया निराश्रित वा एकट्या आहेत अशांचीं नांवें जाणारच आणि मग सरकार त्यांच्या पोटाची तशीच पतीची व्यवस्था लावीलच. पण तरी सुद्धां त्या स्त्रिया अशा बंधनांत राहिल्या पाहिजेत. एक शक्य आहे : सरकारी नोंदेंत गेलेल्या स्त्रियांना अर्थातच पूर्वीच्या त्यांच्या वातावरणापासून अलिप्त रहावें लागून सरकार त्यांना चांगल्या ठिकाणीं ठेवील. नोंद करतांना ही स्त्री या नोंदेंत कां आली याचा पूर्णपणें विचार केला जाईल. मग स्त्रियांना उगाचच अविवाहित

राहणें जमणार नाहीं. शिवाय लग्नें न होणाऱ्यांचीं लग्नें लावण्याची व्यवस्था गांवांतील सरकारनियुक्त एखाद्या शिष्टमंडळाकडे असावी. म्हणजे स्त्री ही एक कुटुंबांत तरी किंवा सरकारी सेवादलांत राहील. अन्यत्र राहणें शक्य नाहीं. अशी स्थिति आली म्हणजे वर वर्णन केलेली स्त्रियांची जात निर्माण होणार नाहीं........

.... नों. दि. ....

पांढरपेशा वर्गांतील प्रौढ कुमारिका—

वर वर्णन केलेल्या अशिक्षित व कांहीं प्रमाणांत खालच्या वर्गांतील प्रौढ कुमारिकांपेक्षा पांढरपेशा वर्गांतील सुशिक्षित पदवीधर प्रौढ कुमारिकांचा प्रश्न सोडविणें सोपें जाईल. पांढरपेशांतील सुशिक्षितांना प्रतिष्ठेची चाड असून त्या बुद्धिप्रधान असतात. अडाणी माणसाला समज लवकर येत नाहीं. त्याला बुद्धीनें पटवून देणें फार कठीण काम आहे. सुशिक्षितांना इच्छा व शक्ति दोनहि असतात. अशा स्त्रिया बहुधा समाजांत नवीन वारे वाहत असतात, त्यावरोबर जाणाऱ्या असतात. विचारशक्ति असूनहि त्या स्वतंत्रपणें विचार करीत नाहींत. तो त्यांना करावयास लाविला पाहिजे. त्यांच्यावर केलेल्या सक्तीचा उपयोग होण्यासारखा असतो. म्हणून सरकारनें त्यांची नोंद करण्यापूर्वी चौकशीच्या वेळीं ही माहिती करून घेऊन त्याप्रमाणें त्यांना कुटुंबवद्ध केलें पाहिजे.

पण ही सर्व व्यवस्था होते वेळीं ज्या स्त्रियांना कौमार्यावस्थेंतच मातृपद प्राप्त झालेलें असतें त्यांना डावलून भागणार नाहीं.

## कुमारी माता नि त्यांची संतति

कुमारीमातांची प्राथमिक मनःस्थिति—

शिक्षणाच्या नादीं लागून वा नोकरीच्या पायीं ज्या स्त्रियांचे विवाह योग्य वयांत होत नाहींत त्या स्त्रियांवर हा दुर्धरप्रसंग ओढवतो ! स्त्रिया साधारणपणें १४।१५ व्या वर्षी वयांत येतात. अगदीं तेव्हांपासून नसली तरी आणखी एकदोन वर्षांत त्यांची विषयवासना निसर्गानुसार बळावत जाते. तत्कालीन विशिष्ट परिस्थितींत त्यांचें मन दुसरीकडे एकाग्र पावल्यानें सहजच तात्पुरती विषयोत्सुकता कमी होणें

स्वाभाविक आहे. पण तो तवढ्यापुरतीच कमी होते हें स्त्रियांना समजत नाहीं. त्या विशिष्ट कालांत त्यांची अशी बलवत्तर कल्पना असते कीं आपण आयुष्यभर अविवाहित राहूं शकूं. निदान अजून १०।१५ वर्षे तरी विवाहाचा विचार करावयास नको. परंतु प्रत्येक गोष्टीचा एक विशिष्ट बहर असतो. तो ओसरून गेल्यावर नैसर्गिक प्रवृत्ति परत डोकें वर काढूं लागतात. अभ्यासाचा ऐन समय वा नोकरीचे पहिले आनंदाचे कांहीं दिवस निघून गेल्यावर कालांतरानें स्त्रियांची वासना परत उद्भवूं लागते.

यावेळीं मनाला ती वासना अनावर होते. पण पूर्वीच्या आपल्या वचनांनीं अशी परिस्थिति आपणच निर्माण करून ठेवतों कीं, आतां मात्र तिला विवाहस्थळें मिळूं शकत नाहींत. अर्थात् वासनातृप्तीकरितां इतर ठिकाणीं लक्ष ठेवणें भाग पडतें. बाहेरच्या पुरुषी समाजांत वावर असल्यामुळें अनेक तरुणांशीं ओळखी, मैत्री ही प्रथमच संपादन झालेली असते. पण त्या मैत्रीकडे आतां निराळ्या दृष्टीनें पाहून आतुर तरुणी त्यापासून कांहीं अपेक्षा करते. प्रथम प्रथम नुसत्या बोलक्या प्रेमाला सुरवात होते. व शेवटीं त्यांतच मोहास बळी पडून नकळत विवाहाचे पूर्वी स्त्रियांना मातृपद स्वीकारावें लागतें. केव्हां केव्हां पुत्रलाभाचीहि स्त्रियांची इच्छा असते त्यामुळें मातृपद सहेतुकहि स्वीकारलें जातें.

मातृपद स्वीकारण्याचें आणखी एक कारण—

याप्रमाणें कौमार्यांतील मातृपदाला जशा स्त्रिया आपणच कारणीभूत होतात त्याप्रमाणें परिस्थितिहि त्यांना कांहीं वेळेस अशा प्रसंगांना तोंड देण्यास लावते. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें अशिक्षित, स्वतः पैसे मिळविणाऱ्या व असहाय अशा स्त्रिया शेवटीं असें मातृपद स्वीकारतात. त्यांचा विवाह लावून देणारा कोणी नसतो. प्रत्यक्ष विवाह करणारा पुरुष भेटत नाहीं. अशा स्थितींत ज्यांचीं वयें विवाहमर्यादा ओलांडून गेलीं आहेत त्या अशरण होतात. दुसरें असें कीं हीन वातावरणांत राहिल्यानें विवाहविधीसारखे कांहीं औपचारिक शिष्टाचारयुक्त असे विधि करणें भाग असतें याचें त्यांना महत्त्व वाटत नाहीं. त्यांचें म्हणणें असें कीं, "आम्ही दोघें जर पतिपत्नी या नात्यानेंच मनोभावें एकत्र राहिलों तर विवाहविधींसारख्या औपचारिक गोष्टींची काय आवश्यकता आहे?

विवाहबद्ध होऊनहि कांहीं लोक चौर्यकर्मे करतातच कीं नाहीं ?" त्यांच्या दृष्टीनें त्यांचें म्हणणें कांहीं खोटें नसतें. पण समाजाच्या दृष्टीनें त्या कुमारिका असल्यामुळें अशा झालेल्या माता या कुमारी माता म्हणून ओळखल्या जातात आणि विवाहाचा विधि न झाल्यामुळें अर्थात् निरंकुश अशीं हीं मानीव पतिपत्नी मनाच्या बदलत्या लहरीनुसार कालांतरानें दुरावतात !

तिसरा प्रकार

याच्यापेक्षां तिसरा आणखी एक प्रकार म्हणजे ज्यांना प्रेमभावना नसते, पुत्र-लालसा नसते, परिस्थितीचें दडपणहि नसतें अशा स्त्रियाहि कुमारी माता होणें शक्य असतें. पाशवी वासनेला बळी पडून अविचारानें स्वच्छंदी कारभार करणाऱ्या स्त्रियांचा भरणा यांत अधिक असतो. कांहीं वेळेला तरुणी ही अविचारी असून मातृपदाला तीच जबाबदार असूं शकते, तर कांहीं वेळेस उतावळे अनाचारी तरुण भोळ्या भावनाप्रधान मुलींना फसवितात.

पाप्याचें सज्जनांत रूपांतर

पण कारणें कांहींहि असलीं तरी एखादी कुमारिका माता झाल्यावर तिच्याकडे लक्ष देणें हें समाजाचें कर्तव्य आहे. दोष कोणाचाहि असेल पण एकदां तो घडल्यावर मुलीचा तिरस्कार करून तिची अवहेलना करण्यांत काय अर्थ आहे ? एकदां घडलेली गोष्ट ती कांहीं परत जात नाहीं. त्या मुलीच्या चुकीनें ती गोष्ट घडली असल्यास अशा अवहेलनेनें ती शिष्ट समाजांतून बाहेर पडेल व समाजाला तुच्छ लेखून निर्लज्जपणें उघड उघड गैरवर्तन करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं. म्हणून मुलींना सुधारावयाचें असल्यास त्यांच्या चुकीची त्यांना समज देऊन क्षमा करावी—सहानुभूति दाखवावी. अशानें त्या मुलीला आपल्याच कृत्याची लाज वाटून ती पुन्हां तसें न करण्याची खबरदारी घेते. त्यानंतरचा सर्वांत उत्तम उपाय म्हणजे प्रथम तिचें लग्न जमवून देणें. दोषी माणसाला आपुलकीनें क्षमा करून विचारपूर्वक सहानुभूति दाखविली म्हणजे त्यालाच आपण केलेल्या कृत्याची निरतिशय लाज वाटते व त्याला आपल्या चांगल्या वातावरणांतुन—सहवासां-तून सोडलें नाहीं म्हणजे त्याची वृत्ति पापाकडे वळेनाशी होते. जर अशी उत्तम वागणूक गुन्हेगाराला दिली गेली तर ज्यानें पहिला गुन्हा केला असेल तोच पुढें

अशा चांगल्या वागणुकीनें थोर सज्जन होऊं शकेल. कारण पाप्याची स्थिति किती हीन असते हें त्याला स्वानुभवानें कळून चुकलेलें असतें. अननुभवी मनुष्य सज्जन राहिला तर त्यांत नवलहि नाहीं. व तसा तो पुढें राहील याची खात्रीहि देतां येणार नाहीं. ज्यानें स्त्रीच कधीं पाहिलेली नाहीं त्याला स्त्रीविषयीं मोह न वाटेल यांत आश्चर्य नाहीं. शिवाय ही त्याची विरक्तता स्त्री पाहिली नाहीं तोंपर्यंतची आहे. पाहिल्यावर काय होईल याची त्याला स्वतःला तरी खात्री देतां येईल काय ? परंतु ज्यानें चुकीनें मोहाला बळी पडून स्त्री अनुभवली आहे आणि मग त्याला पश्चात्ताप झाला तर त्याची विरक्तता केव्हांहि अढळ राहणार ! मग त्याच्यापुढें किती स्त्रिया आल्या तर त्यांच्याकडे पाहण्याचीहि इच्छा त्याला व्हावयाची नाहीं. आणि अशी झाली नाहीं म्हणजेच त्याचें मनोधैर्य कौतुकास्पद आहे. म्हणून मुलगी कितीहि चुकली असली तरी वाळींत न टाकतां तिला आपल्यांत घेऊन योग्य मार्गदर्शन करणें आपलें आद्य कर्तव्य आहे. ज्यानें एकदां पाप केलें असेल तोच पुढें संत होण्याची आशा आहे. ज्यानें पापच केलें नाहीं तो केवळ व्यवहार पाळणारा सभ्य गृहस्थ असून संधि आल्यास तो केव्हां पापी होईल याचा नियम नाहीं. कारण एकदां ज्यानें पाप केलें आहे; त्याला पश्चात्ताप झाला म्हणजे पापाविषयीं इतका तिटकारा व सदाचाराची तळमळ त्याच्या अंतःकरणांत उत्पन्न होते कीं, आपलें कृत्य सदाचारी होत आहेना इकडे त्याचें अंतःकरणपूर्वक लक्ष असतें. ही सदाचाराची लालसा व पापाचा तिटकारा अननुभवी सामान्य माणसांत नसतो. तो केवळ चार लोकांत चांगला दिसेल असाच व्यवहार करीत असतोच असें नाहीं. लोक काय म्हणतील हीच भीति त्याला जास्त असते; अंतःकरणाची तळमळ तितकीशी नसते.

## अशुद्ध संततीचा प्रश्न

पापोत्पन्न प्रजा–

एक वेळ कुमारीमातांना लोक घरांत घेतील पण त्यांच्या संततीची व्यवस्था करणें फार बिकट काम होऊन बसलें आहे. कुलीन कुटुंबांत असली संतति ठेवून देणार नाहींत. त्यांच्या कुलाला बट्टा लागेल। म्हणून बऱ्याचशा स्त्रिया गर्भपात

करितात वा अर्भकांस मारून टाकतात. वायफळ लोक-निंदेच्या भीतीनें बिचाऱ्या लहान मुलींना आपण असलीं घोर कर्मे करण्यास लावतों हें समाजाला कळत नाहीं !

लोकनिंदेचा भाग सोडून दिला तरी एखाद्यानें अशा संततीला मोठ्या उदारपणें आश्रय दिला तरी घरांतील लोक त्या संततीकडे वाईट दृष्टीनें बघत असतात. त्याला घरांत इतर माणसांबरोबर मान नसतो. खालीं मान घालून बिचाऱ्याला दिवस कंठावे लागतात. घरांतील मंडळी त्याचा आंतून वा बाहेरून जशी कुटुंबाची चाल असेल त्याप्रमाणें-द्वेष करण्यास प्रारंभ करितात. अशानें त्याचे बरेच हाल होतात. त्याला आईबापांप्रमाणें कोणी हक्काचा पालनकर्ता आधार नसतो. त्याची आई असली तरी ती लोकांच्या वजनास भिऊन आपल्या या संततीकडे मुलांप्रमाणें लक्ष देईलच असें नाहीं. कारण तिलाहि त्याच्यामुळें एक प्रकारचा कमीपणा त्या कुटुंबांत वाटतो.

अशा बेवारशी संततीकरितां जरी स्वतंत्र अनाथालयें उघडलीं तरी अशा अनाथालयांतून पाळलेलीं मुलें हीं केव्हांहि समाजांत तिरस्करणीय मानलीं जाणार. या भावी नागरिकांस समाज मानाचें स्थान देणार नाहीं. एवढेंच कीं त्यांच्या खाण्यापिण्याचे हाल न होतां पुढें पोटापाण्याचाहि प्रश्न सुटेल. तरी " हीं लग्नापूर्वी झालेलीं मुलें " म्हणून समाज त्यांस डिवचल्याशिवाय थोडाच राहणार आहे ?

कुलीनतेचें श्रेय कोणास ?-

पण समाजानें तरी आपलें मन मोठें करावयास नको काय ? या मुलांस अशा तऱ्हेनें जन्म मिळाला हा काय त्यांचा दोष ? आणि आम्ही उच्च, कुलीन घराण्यांत जन्मास आलों हा काय आमचा स्वतःचा गुण समजावयाचा ? जी गोष्ट माणसाच्या हातीं नाहीं त्याबद्दल एखाद्या माणसास दोष कां द्यावा ? . मनुष्याकडूनच पण चुकीनें प्रमाद घडला तरीसुद्धां त्याच्याकडे सहानुभूतीची दृष्टि फिरविली पाहिजे. आपण स्वतः मोठे असणें यांत खरा मोठेपणा नाहीं. कारण पुष्कळशा गोष्टी केवळ योगायोगानें जमून आलेल्या असतात. स्वकर्तृत्वाचा भाग त्यांत फारच थोडा असतो. पण स्वतः मोठे असलों तरी आपल्याप्रमाणें इतर

पतितांसहि मोठें करणें यांतच भलेपणा सांठविला आहे. याव्यतिरिक्त व्यक्तिगत मोठेपणा मिळविणें निव्वळ स्वार्थच समजला पाहिजे. समाजांत चांगल्याप्रमाणें वाईट लोकांचीहि तितकीच आवश्यकता आहे. कारण त्यांच्यामुळेंच सज्जनांना किंमत येते. ही विचारसरणी तर मानवी नीचपणाची कमाल समजली पाहिजे !

पापोत्पन्न संततीचा स्वीकार–

तरी असें न करतां समाजाला जी मनाची विशालता दाखवायची असेल ती येथें दाखवावी. ज्या मुलीला ही संतति झाली असेल त्या मुलीच्या पालकांनीं तें आपल्याच कुटुंबांतील एक मूल या दृष्टीनें त्याला आपल्या घरीं पोटच्या गोळ्या-प्रमाणें वाढवावें. त्याच्या जन्माची त्याला जाणीव करून देऊन त्याला दुखवूं नये. शक्य झाल्यास मोठेपणानें त्याच्या वडिलांचा शोध करून त्यांस बोलावून आणावें. त्या अविवाहित आईबापांचें लग्न होण्यासारखें असल्यास दिलदारपणें त्यांचें लग्न उरकून टाकावें. समाजानेंहि त्यास संपूर्ण मान्यता द्यावी. मुलीच्या अविवाहित पतीनेंहि कमीपणा न मानतां खुल्या दिलानें तिच्याशीं उघडपणें लग्न उरकून घ्यावें. लग्न झाल्यावर विवाहपूर्व संतति विवाहोत्तर संततीप्रमाणेंच मानली पाहिजे. तरुण–तरुणी समप्रतीच्या कुलांतील विवाह्य असतील, दोघांस एकमेकां-बद्दल प्रेम व विश्वास वाटत असेल, प्रत्येकाला स्वतःबद्दल पूर्ण आत्मविश्वास असेल तर त्यांना विवाहपूर्व एक संतति होण्यास कांहींच हरकत नसावी. मात्र तरुणी गरोदर असतांना किंवा प्रसूतीनंतर लागलीच दोघांचा विवाह अवश्य झाला पाहिजे. आणि असे विवाह समाजानें खुशाल शिष्टसंमत म्हणून मान्य करण्यास हरकत नसावी. पण तरुणतरुणींना एकमेकांबद्दल व स्वतःबद्दल आत्मविश्वास असतो कोठें ? नीतिमत्ता अतिशय बलवत्तर असणें व आपला साथीदार शोधतांना एवढा सारासार व दूरदृष्टीचा विचार असणें अत्यंत आवश्यक आहे. ही कोणाबद्दल खात्री देतां येत नाहीं म्हणून आमच्या शास्त्रकारांनीं असे विवाह त्याज्य समजले आहेत.

त्यांचा निराळा वर्ग नको–

विवाहपूर्व संततीकरितां अनाथालयें उघडलीं म्हणजे अशा मुलांचा म्हणजे पर्यायानें भावी स्त्रीपुरुषांचा एक निराळा वर्ग निर्माण होतो. किंबहुना कालां-

तरानें त्याला स्वतंत्र जातीचेंहि रूपांतर येण्यास हरकत दिसत नाहीं. पण हा एवढा वर्ग समाजांतून वहिष्कृत होणें हें त्यांचा इतिहास लक्षांत घेतला असतां नैतिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या बरें नव्हे. निराळीं मुलें ठेवण्यामुळें तीं समाजांत तितकीशीं समरस होऊं शकत नाहींत—समाज कमी लेखतो म्हणून. पण एक मूल त्या त्या कुटुंबांत गेलें म्हणजे त्याला आईबापांप्रमाणें मायेची पाखर मिळेल, शिवाय त्याचा जन्मेतिहास इतरांना माहीत नसल्यानें तो सरसकट लोकांच्याकडून त्या कुटुंबांत गणला जातो. अशा मुलाची वाच्यता करूं नये. मुलगा कुटुंबांशीं समरस झाला म्हणजे तो समाजांत मानानें वावरूं शकतो.

समाजबाह्यांकरितां सौम्य नीति–

समाजाचे नीतिनियम सौम्य करावे लागतात ते या ठिकाणीं. कुमारी माता व त्यांची संतति किंवा अशाच प्रकारें समाजांत समुदायरूपानें राहणाऱ्या दारुण परिस्थितीनें पछाडलेल्या इतर अनीतिमान लोक याकरितां करावे लागणारे नियम सौम्य व सवलतीचे असावे लागतात.

समाजबाह्य वर्ग ही एक शक्ति आहे–

समाजांत समुदाय करून राहणाऱ्या अशा प्रकारच्या लोकांचा प्रश्न डावलून चालणार नाहीं. तुच्छ समजून वाळींत टाकणें यांत समाजच आपलें नुकसान करीत असतो. समाजांतील असे वर्गच्या वर्ग समाजबाह्य होऊं लागले तर समाजाची शक्ति झपाट्यानें क्षीण होत जाईल. विवाहपूर्व संतति कोणत्याहि प्रकारानें उत्पन्न झालेली असली तरी एकदां जन्मास आल्यावर ती समाजाची उपकारक वा अपायकारक शक्ति होत असते. त्यांना वाळीत टाकल्यानें पुन्हां नवीन संतति मुळींच उपजणार नाहीं याची खात्री व्यक्तीचे बाबतींत एक वेळ देतां आली तरी समाजाचे बाबतींत कोणी देऊं शकणार नाहीं. सामाजिक वस्तुस्थितीच्या दृष्टीनें विचार केला असतां अशा संततीची परंपरा चिरकाल टिकणार, निदान ही परंपरा नष्ट होण्यास बराच काळ लागणार ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे. शिवाय एकदां जी संतति उपजली तिचे कालांतरानें समाजांत व्यवहार–परिवार सुरू होऊन ते वाढीस लागणार यांत काडीमात्र शंका नाहीं. चक्रवाढीनें वाढणाऱ्या या समुदायास

विचारवंत समाजशास्त्रज्ञांनीं विचारांत घेणें अत्यावश्य आहे. या वर्गास समाजानें दूर लोटण्यास सुरवात केली तर त्याची प्रतिक्रिया तिरस्कृत वर्गाकडून होणार हें निश्चित. ही प्रतिक्रिया समाजाचा नाश केल्यावांचून राहणार नाहीं. इतकी त्यांच्यांत शक्ति असूं शकते. या लोकांना आपल्याच समाजांतील समानशील वर्ग मिळतात आणि त्यावरच परकीयांची पोळी पिकते.

सज्जनाचें पाप्यांत रूपांतर—

अनीतिमान व्यक्तींना कडक शासन करून वाळींत टाकूं नये. कारण समाजाचा म्हणजे पर्यायानें आपलाच तोटा आहे हें स्वार्थी दृष्टीनें ठीक झालें. परंतु या वैयक्तिक आणि समष्टि स्वार्थाच्या पलीकडे जाऊनहि त्या प्रत्यक्ष व्यक्तीच्या दृष्टीनेंहि त्याचें फार नुकसान होत असतें हें आपण लक्षांत आणलें पाहिजे. मुलाला अनीतिमान म्हणून वाळींत टाकण्यानें ‘आपण पापी आहोंत’ ही जाणीव आपण त्याला करून देतों. ‘आपण दुर्वर्तनी मुलांत गणले जातों, तीच आपली जात’ ही जाणीव हानिकारक आहे. वाईट वर्तन केलेलाच काय पण सद्वर्तनी मनुष्यसुद्धां तो वाईट असल्याची त्याला जाणीव देऊन त्यापासून आपण अलिप्त राहिल्यानें त्याच्या मनावर परिणाम होत असतो. लोक वाईट म्हणूं लागले म्हणजे प्रथम त्या व्यक्तीला आपल्या वर्तनाविषयीं व वृत्तीविषयीं शंका उत्पन्न होते. शंका आली कीं सहेतुकपणें—जागरूकतेनें केलेल्या एखाद्या सद्वर्तनावरहि त्याचा विश्वास बसत नाहीं. चांगलेवाईट विचार कोणत्याहि मनुष्याचे मनांत येत असतात परंतु सद्वर्तनी मनुष्य त्या विचारांकडे दुर्लक्ष करतो. त्यांना तुच्छ लेखून ते मनांतून घालविण्याचा प्रयत्न करीत असतो. कृतींत आणणें तर दूरच. परंतु ज्याच्या मनांत स्वतःच्या वर्तनासंबंधीं वर सांगितल्याप्रमाणें संशय उत्पन्न झालेला आहे; त्याचें लक्ष मनांत येणाऱ्या वाईट विचारांवर विचार करण्याकडे अधिक लागतें. आपण याच विचारांच्या जातीचे आहोंत अशी निश्चिति लोकापवादामुळें दृढसंशयोत्तर होत जाते. हळुहळू चांगले विचार नष्टप्राय होत जातात. सद्विचारांची अडगळ निघून जात असतांच असद्विचारांची गोडी उत्पन्न होऊन त्याविषयीं मनांत उत्सुकता निर्माण होते. चोरी म्हणजे काय? ती करून तरी पाहूं अशी उत्सुकतात्मक इच्छा निर्माण होते. अर्थात् पुढें ती अनुकूल परिस्थितीमुळें कृतींत उतरतेच. एकदां दोनदां कुकर्म केल्यावर त्याची परंपरा राखण्या-

साठीं वर सांगितल्याप्रमाणें पार्श्वभूमि पूर्वीच तयार झालेली असते. त्या व्यक्तीच्या दृष्टीनें हें त्याचें केवढें नुकसान!

दुर्वर्तनाची योग्य जाणीव दिली पाहिजे–

हें लक्षांत घेऊन वाईटाला वाईटांच्या जातींत कधीं मोडूं नये. आपण चांगले आहोंत हीच जाणीव त्याला सतत पाहिजे. म्हणजे एखादे वेळेस केलेल्या कुकर्माची त्याची त्यालाच लाज वाटेल. जाणीव विशिष्ट तेवढ्याच वाईट कृत्याची दिली पाहिजे. त्याचा परिणाम सबंध वर्तनावर होतां कामा नये. परंतु व्यवहारांत उलट होतो. ज्या कृत्याबद्दल आपण एखाद्याला दोषी ठरवितों तो दोष त्याला कधींच समजत नाहीं. कारण आपण तो कधीं समजावून देतच नाहीं. आपण एकदम त्याच्या एकंदर वर्तनावर हल्ला करून त्याचें सबंध आयुष्य ' दुर्वर्तनी ' ठरवून त्याला वाळींत टाकल्याप्रमाणें वागवितों. त्याला वेळींच योग्य शिकवणूक दिल्यास त्यांतून सुधारण्याची आशा त्याची त्यालाच मिळेल. सद्वर्तनाची गोडी नष्ट होणार नाहीं.

समाजांतील मिठाचे खडे विरघळून गेले पाहिजेत–

कलंकित पण अटल वर्गाचा प्रश्न समाजांतील सामान्य वर्गाहून निराळ्या मार्गानें सोडवणें इष्ट आहे. मूळांतच अशा लोकांचा वर्ग निराळा पडूं देतां कामा नये. समुदायाला स्वतंत्र अस्तित्व दिलें कीं शक्ति एकवटते. करितां असे मिठाचे खडे समाजसागरांत पार विरघळून गेले पाहिजेत. समाजाशीं समरस होण्यानेंच त्यांना समाजाविषयीं आपलेपणा व अभिमान वाटेल. आहे त्यांतच जुळवून–सुधारून घेणें यांत मनाचा थोरपणा व कौशल्यहि आहे. आणि तेंच हितकर होत असतें. इमारतीचा एखादा कोपरा वाईट म्हणून पाडून—नष्ट करून नवीन उत्तम बांधूं असें म्हणण्याइतका वरीलप्रमाणें असणाऱ्या सामाजिक वर्गाचा प्रश्न सोपा नाहीं. पहिला वर्ग पार नष्ट करतां येणार नाहीं. आणि दुसरा पाहिजे तसा चुटकीसरशी बांधतां येणार नाहीं.

असे वर्ग व्यक्तीव्यक्तींनींच समाजांत विरून गेले म्हणजे हा प्रश्न अधिक सुगम होतो. त्या व्यक्तींना आपल्यांत घेऊन, आपल्या विश्वासांत घेऊन आपल्या वातावरणांत मुरूं देऊन–आपण त्यांच्यांत न मुरतां–त्यांच्या पूर्ववृत्तीचा त्यांना

हळूहळू विसर पडूं द्यावा. व्यक्ति वातावरणांत मुरूं लागली म्हणजे ती आपल्या कक्षेंत येऊं लागते. अशा प्रकारें त्या व्यक्ती अंतःकरणानें पालटून गेल्या नाहींत तरी त्यांच्या मनोवृत्तींचा व आचारांचा जोर कमी झाल्यावांचून राहणार नाहीं. उच्च वातावरणाची अभिरुचि त्यांच्यांत उत्पन्न होईल. निदान चक्रवाढीनें परंपरा वाढणार नाहीं हें तर निश्चितच, या मनोवृत्ती संसर्गजन्य असतात, त्यांना पायबंद बसेल.

## विधवा

विधवांचा विचार अनेक दृष्टीनें व्हावयास पाहिजे. त्यांचा प्रश्न सोडविणें गुंतागुंतीचें काम आहे. कारण विधवा स्त्रीचें क्षेत्र फार विविध आहे.

### पुनर्विवाह–

व्यवहारांत प्रत्येक विधवा स्त्रीला उदात्त व विरक्त आचरणानें राहतां येईल असें नाहीं. ज्या स्त्रीचा नाइलाज आहे तिला सोय म्हणूनच पुनर्विवाह अवश्य आहे. बालविधवांचा प्रश्नच उद्भवत नाहीं. त्यांनीं सरळ दुसरीं स्थळें बघून तावडतोब लग्न करून घ्यावें. पतिनिधनामुळें ज्या विधवा निराश्रित झाल्या आहेत, पहिली संतति नाहीं, आणि एक विवाह तरी करावा किंवा नोकरी करावी तरच पोटाचा प्रश्न मिटेल अशी ज्यांची परिस्थिति आहे अशा एकाकी असहाय विधवांनीं प्रथम पुनर्विवाह करणें भाग आहे. त्यांना समाजानें निषिद्ध मानतां कामा नये. त्यांनीं नोकरी करूं नये. सरकारनें अशांची सोय सेवादलांत करून घेऊंच नये. तिला स्वतःला आपला विवाह करणें शक्य नसेल तर सरकार ती व्यवस्था करील. अशा एकाकी स्त्रिया पुनर्विवाहानें नवीन प्रश्न उत्पन्न करीत नाहींत.

### सपुत्र विधवा–

पण ज्या विधवांना पहिली संतति आहे त्यांच्या बाबतींत पुनर्विवाह तितकासा हितकारक होईल असें सांगवत नाहीं. कारण नवीन येणारा पति हा आपल्या

सावत्र मुलांस चांगलें वागवील असा भरंवसा देतां येत नाहीं. जें सावत्र आईच्या बाबतींत तेंच सावत्र बापाच्या बाबतींत लागू पडतें. पुरुषाला वचनाची चाड स्त्रीपेक्षां कमी असते. आपणास आवडलें नाहीं तर स्त्री वचन देणार नाहीं. पण पुरुष स्त्रीच्या मोहांत पडून तिला वश करण्याकरितां ती सांगेल त्या गोष्टीला एकदम अविचारानें होकार देऊन वचनबद्ध होतो पण त्याला स्वतःच्या वचनापेक्षां स्त्रीच्या देहाची किंमत अधिक वाटते. बिचाऱ्या स्त्रीला आपली स्थिति ओळखून पुरुषाची मागणी मान्य करावी लागते. पुढें दोघांचा विवाह झाल्यावर आतां आपली विवाहबद्ध पत्नी आपल्याला सोडून जाणें शक्य नाहीं अशा हक्कानें पुरुष तिच्या अटींचा भंग करावयास लागतो. सपुत्र स्त्रीस दुसऱ्या कशाहिपेक्षां मुलांचें जास्त वाटत असतें. त्याच्याकरितां वाटेल तें करण्यास ती तयार होते. स्वार्थी पुरुष तिच्या या मनःस्थितीचा फायदा घेतात आणि विवाहा-पूर्वी दिलेलें तिच्या मुलांना चांगलें वागविण्याचें वचन धाब्यावर बसवितात. स्त्रीविषयीं त्यांना प्रेम असतें, तिच्या स्वतःकरितां ते त्याग करतील पण पहिल्या नवऱ्यापासून झालेलें मूल त्यांना नको असतें. ते त्याचा मत्सर करूं लागतात.

अशा वेळीं मात्र बिचाऱ्या सपुत्र पुनर्विवाहित पत्नीची कुचंबणा होत असते. भड मुलाची बाजू घेऊन नवऱ्याशीं भांडतां येत नाहीं व नवऱ्याची मर्जी संभाळून पोटच्या गोळ्याचे हाल करवत नाहींत. घरांत कर्त्री स्त्री तीच असल्यामुळें केवळ पतीच्या इच्छेकरितां स्वतःच्या हातानेंहि तिला मुलाचे हाल करावे लागतात. मुलांचें कौतुक करण्याचें राहूंदेच पण त्याच्या खाण्यापिण्याची आवश्यक तीहि काळजी त्या असहाय मातेला घेणें दुरापास्त होतें.

आमच्यांत पुनर्विवाहाची चाल शिष्टसंमत नाहीं याचें कारण हेंच असावें. जीवाची इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिति करून घेऊन आपल्या मुलाचेंहि मातेरें करून घेण्यांत काय अर्थ आहे? शिवाय नवीन पतीपासून संतति झाली म्हणजे त्या कुटुंबांत सावत्रभाव थैमान घातल्याखेरीज राहीलसें शक्य नाहीं. कांहीं वेळां बापाचीच त्याला फूस असते. सावत्रपणाच्या पिशाच्चानें पछाडलेल्या कुटुंबानें सर्व कुटुंबियांचा नाश न केला तरच नवल! म्हणून सपुत्र विधवांनीं पुनर्विवाह करणें धोक्याचें आहे.

विधुरांचें कर्तव्य–

पण गरजू विधुरांनीं तरी असहाय स्त्रीकडे सहानुभूतीनें पहावयास नको काय? तिच्या प्रथम संततीस स्वतःच्या संततीप्रमाणें त्यांनीं जपावयास पाहिजे. पालन-पोषण करावयास पाहिजे. आपलेपणाच्या नात्यानें जन्मभर एकत्र राहावयाचें तेथेंहि एखादा आपपरभाव करावयास लागला तर मनुष्याला एकोप्यानें—सुखानें कधीं नांदतांच येणार नाहीं. पुरुषांनीं स्वतःवरून अविवाहित स्त्रियांची स्थिति ओळखावयास पाहिजे. ज्या विधवेला विरक्त व्रताचरणानें राहणें शक्य नसतें, तिनें काय करावें? मुलाकरितां स्वतःच्या जीवाचें रान करावें कीं, स्वतःच्या शरीरसुखाकरितां मुलांस मुकावें? कोणतीहि गोष्ट तिनें पत्करली तरी तो मोठा त्यागच आहे, पण हा नसता त्रास कशाकरितां? यानें कोणतें उच्च ध्येय प्राप्त होणार आहे तर त्याकरितां मन एवढें कठोर करावें? कांहीं नाहीं, केवळ पुरुष स्वार्थी असतात म्हणून. पण मग पुरुषांनींच आपलें मन थोडें विशाल केलें तर? त्यांना स्त्रियांइतका कठोर त्याग करावा लागणार नाहीं खास!

व्रताचरणी स्त्रिया–

व्रताचरणानें राहणाऱ्या शांत विधवांचा आणखी एक वर्ग करावयास हवा. या विधवा समाजांत नवीन प्रश्न उपस्थित करून उपद्रव देत नाहींत. पण ही एक मोठी शक्ति आहे हें समजलें पाहिजे. समाजांत अशा विधवा जर जास्त प्रमाणांत निर्माण होऊं लागल्या—म्हणजे सौभाग्यवती गतधवा हाव्यात असें नाहीं. विधवांचेच जे आपण वरीलप्रमाणें प्रकार पाहिले ते निरनिराळे प्रकार नाहींसे होऊन आतां सांगितलेला व्रताचरणानें राहणारा विधवांचा वर्ग मोठा व्हावा, असें झालें आणि त्यांचा योग्य उपयोग करून घेतला तर फार मोठें समाजकार्य होईल यांत शंका नाहीं.

विधुर आणि विधवा, भिन्न मनोरचना–

स्त्रीला पुरुषापेक्षां बंधनें अधिक असतात आणि तीं आवश्यक असतात. याचें प्रतिपादन मागें एकदां आलेंच आहे. हीं बंधनें पाळणें स्त्रियांना पुरुषापेक्षां जास्त सुलभ जातें. कारण त्यांचा स्वभाव त्याला अनुकूल असतो. पुरुषाचें मन फार उतावीळ व चंचल असतें. उलटपक्षीं स्त्री मनानें धिम्या स्वभावाची असते. शांतपणा

व एक प्रकारची स्थिरता स्त्रीच्या मनाला जास्त लवकर येते. पुरुषांपेक्षां स्त्रीला जबाबदारीची जाणीव अधिक असते. म्हणून नियमांचें बंधन पाळणें स्त्रीला अधिक सुलभ असतें.

जात्याच स्त्री ही पुरुषापेक्षां पवित्र मानली गेली आहे. एकाद्या स्त्रीविषयीं मनामध्यें आदर व दाक्षिण्य उत्पन्न होतें तसें पुरुषाविषयीं एकदम होत नाहीं. निसर्गतः पुरुषाला स्त्री ही अत्यंत मोहक व तितकीच उपभोग्य आहे. जर सर्व प्रकारचें स्वातंत्र्य मिळालें तर पुरुषाच्या नैसर्गिक मनाला स्त्री पाहिल्याबरोबर ती उपभोगण्याची इच्छा होईल. म्हणूनच स्त्रीला दाक्षिण्य, पावित्र्य व देवत्व दिलें आहे. त्यामुळें वाटेल त्या स्त्रीची वाटेल तेव्हां अभिलाषा करणें सुसंस्कृत पुरुषाला पाप वाटतें. विषयवासना स्त्रीपुरुषांस सारखीच असली तरी स्त्रीच्या मनांतील भव्यपणा व पोक्तपणा पुरुषांत नसतो. पुरुष जास्त पोरकट असून मोहाला फार हळुवार आहे म्हणून पुरुषाला अविवाहित राहणें स्त्रीपेक्षां फार कठीण जातें. विधुरांना जर अविवाहित राहण्याचा दंडक घातला तर विधवांपेक्षां विधुर जास्त अनाचार माजवतील. शिवाय स्त्रीमधील आत्यंतिक निष्ठा पुरुषामध्यें तितकी नसते. या कारणानें विधवा जर अविवाहित राहिल्या तर विधुरांपेक्षां जास्त कौटुंबिक व समाजकार्य करूं शकतील. विधवा स्त्री–तिला पवित्र वाटणाऱ्या पतीच्या निधनामुळें व्रताचरणें करून पुढील आयुष्य अत्यंत साधेपणानें व विरक्ततेनें घालविते. याचा परिणाम तिच्या श्रद्धावान मनावर होऊन मनाच्या वासना कमी कमी होत जातात व तिचें आचरण शुद्ध ठेवीत असतात. यांतच तिला समाजकार्य करणें शक्य आहे. विधुरांना हें सर्व शक्य नाहीं. म्हणून तात्त्विक दृष्टीनें विधवांनीं आतां वर्णन केलेलें आचरण ठेवावें. ही पूर्णपणें तात्त्विक भूमिका आहे. याच हेतूनें शास्त्रांत पुनर्विवाह सांगितला नाहीं.

विधवांचें कौटुंबिक कार्य–

कौटुंबिक दृष्ट्या पाहावयाचें झाल्यास तेथेंहि त्यांचा उपयोग आहे. सर्व सुखांना विमुख होऊन अत्यंत साधी राहणी ठेवणाऱ्या आणि व्रताचरण आचरणाऱ्या या विधवा कुटुंबाला एक प्रकारचें स्थैर्य आणतात. सर्व कुटुंबियांना एकत्र येण्याचा ओढा लागावा असें केंद्र त्या बनूं शकतात. असें केंद्र असलें म्हणजे

कुटुंबाचा एकोपा वाढत जातो. वातावरण आनंदी व खेळीमेळीचें राहतें. कौटुंबिक सहकार्य वृद्धिंगत होऊन कुटुंबसंस्था सुनियंत्रित व सुव्यवस्थित राहील. कुटुंबांतील तरुण दांपत्यांच्या व इतर तरुणतरुणींच्या तारुण्यांतील अल्लड उन्मादाला व स्वैर वृत्तीला गोड आळा बसतो. पूर्वसंस्कृति पुढील पिढीस शिकवून संस्कृतीचें सातत्य त्या टिकवूं शकतात. गोड आळा म्हणण्याचें कारण जुनी सनातनी परंपरा व नवीन आचारविचार यांचा सांधा घरांतील विधवा व तरुण कुटुंबीय यांच्या परस्पर प्रेमामुळें शांतपणें व बाचाबाची न होतां सहजपणें जोडला जातो. या आळा घालण्यानें तरुणांना सक्ति वाटत नाहीं. शिवाय त्यांचाहि तारुण्यांतील अवखळ-पणा पाहण्यांत विधवांना म्हणजे पोक्त स्त्रियांना एक प्रकारचें कौतुक वाटत असतें. गृहव्यवस्थेला आवश्यक लागणारें ज्ञान हें तरुण दांपत्यांना अवगत नसतें. लहान मुलांचीं किरकोळ दुखणीं, मोठ्यांचे कांहीं आजार, त्यांचे उपचार, संसारांतील अनुभव इत्यादि आवश्यक लागणारें ज्ञान हें परंपरेनें अशा पोक्त स्त्रियांकडूनच पुढील पिढीस जात असतें. व कुटुंबियांनाहि त्यांचा एक प्रकारचा आधार वाटत असतो. या स्त्रियांना वैयक्तिक सुखाची वासना कांहींच उरली नसल्यामुळें आपली सर्व शक्ति व मन हीं आपल्या कुटुंबांत गुंतवून टाकतात.

सामाजिक कार्य–

सामाजिक दृष्ट्या तर अशा विधवांचें महत्त्व फार आहे. त्या योगिनीच होत. समाजकार्य जर कांहीं व्हावयाचें असेल तर अशा वैयक्तिक स्वार्थाला विन्मुख होऊन निरपेक्ष होऊन अंतःकरणाच्या, जिव्हाळा वाटणाऱ्या विधवांच्याच हातून होण्यासारखें आहे. स्त्रियांच्याकरितां उघडलेल्या संस्था त्यांनींच सरकारतर्फे चालवायच्या आहेत. प्रसूतिगृहासारख्या वरून परोपकारी दिसणाऱ्या संस्था उघडून त्यांनीं पैसा कमवूं नये. अशा संस्थांचें धंद्यांत रूपांतर होणें फार अनिष्ट आहे. विधवा स्त्रियांनीं केवळ सेवाधर्म म्हणूनच हीं कामें केलीं पाहिजेत. विधवांना अनेक बंधनें घालून व नाना तऱ्हेचीं व्रतें सांगून त्यांना संन्यासिनी बनविण्यांत आमच्या धर्मशास्त्रकारांच्या मनांत वरीलप्रमाणें गर्भित हेतु तर नसेल ना? अशा स्त्रिया केव्हांहि सड्या व एकट्या असणें म्हणजे त्यांना कुटुंबीय कोणी नसणें फार उत्तम. ज्यांना कुटुंब आहे, मायेचीं माणसें आहेत त्यांनीं पूर्वी सांगित-

प्रमाणें मुख्यतः कौटुंबिक कार्य करून जमल्यास घरबसल्या जेवढें करतां येईल तेवढें समाजकार्य करावें.

स्त्रियांच्या शिक्षणसंस्था, समाजाच्या खालच्या वर्गांतील स्त्रियांना साक्षर व सुसंस्कृत करणें, धार्मिक स्वरूपांत समाजपोषक प्रचार करणें आणि इतर स्त्रियांच्या संस्था हीं कामें सड्या विधवांना सोपा धर्म म्हणून करतां येण्यासारखीं आहेत. अर्थात् ही योजना सरकारकडेच असणार.

## वारसाहक्क

### वारसाहक्काचा कायदा—परागतीचें लक्षण—

कोणत्याहि गोष्टीचा कायदा करून सक्तीनें ती करवून घेणें आणि न केल्यास शिक्षा ठोठावणें हें मानवतेच्या हीनतेचें लक्षण आहे. आदर्श समाजांत कायद्याशिवाय व्यवहार चालावयास पाहिजे, इतकीं लोकांचीं मनें नीतिमान, सात्त्विक व्हावयास हवीं आहेत. कायद्याचें ध्येय कायद्याची आवश्यकताच लागणार नाहीं अशी परिस्थिति तयार करणें हें असलें पाहिजे. मानवाच्या जन्मसिद्ध अधिकारासाठीं शिक्षा ठेवून कायदे करावे लागणें हें निव्वळ रानटीपणाचेंच लक्षण समजलें पाहिजे. रानटी लोकांत अत्याचाराबद्दल आपापसांत जें घडतें तेंच समाजांतून तिऱ्हाईत वरिष्ठ समजल्या गेलेल्याकडून होत असतें एवढाच फरक.

स्त्रीसारखी अबला जात ! जिच्याशीं आपला जन्मभर जिव्हाळ्याचा संबंध येतो किंबहुना जिच्याव्यतिरिक्त पुरुषाचें जीवनच पूर्ण होत नाहीं अशा स्त्रीच्या पोटगीचा कायदा करावा लागणें याला सुधारणा कोण म्हणणार ? त्या त्या काळचे कायदे वा सामाजिक नियम हें त्या समाजाचें प्रतिबिंब आहे. सामाजिक चालीरीतीवरून व कायदेकानुवरून त्या वेळच्या समाजाची परिस्थिति जाणतां येते. कौमार्यांत पित्यानें रक्षण करावें, तारुण्यांत पतीनें व वार्धक्यांत पुत्रानें रक्षण करावें असें मनुस्मृति सांगते. हाच त्यावेळचा कायदा. वरील स्मृतींतील वचनावरून त्यावेळीं आमचा समाज किती उच्च नीतीला पोंचला होता हें कळतें. आधुनिक सुधारलेल्या म्हणविणाऱ्या युगांत बापानें वा नवऱ्यानें मुलांपासून वेगळी, स्त्रीची

स्वतंत्र पोटगीची व्यवस्था केली पाहिजे असा शिक्षा देणारा जबरदस्तीचा कायदा आतांच्या समाजाचें प्रतीक नाहीं असें कोण म्हणेल ?

पोटगीचा कायदा–अंतस्थ शत्रुत्वाचें बीज–

स्त्रीला कुटुंबांत कोणी विचारीनासें झालें आणि तिला जगणें अशक्य होऊं लागलें म्हणजे नाइलाजास्तव पोटगीचा कायदा करणें भाग आहे आणि तो केलाच पाहिजे. पण अशी स्थिति येऊं न देणें हें माणुसकीला शोभेल असें होईल. अशा प्रकारच्या कायद्यांनीं एकटयाच्या पोटाचा प्रश्न मिटवून कायद्यानें वांटणी होऊन मिळणाऱ्या इस्टेटीकरितां कुटुंबांत द्वेषाचीं बीजें रोवलीं जातात. आपण सर्व एक आहोंत, माझें तुझें निराळें नाहीं, सर्व कांहीं आपलें सर्वांचें आहे ही एकत्वाची भावना नष्ट होते. मुलांची, आईची, बहिणीची प्रत्येकाची वांटणी निराळी असल्यानें जो तो आपल्या भावी वांटणीकडे लक्ष देऊन त्या अनुरोधानें वेळ जवळ जवळ येत चालली म्हणजे त्याची काळजी घेतो व आपला हिस्सा चांगला मिळावा या हेतूनें त्याचे पुढील सर्व व्यवहार होत असतात. एकाच इस्टेटीच्या अनेक वांटण्या होणार असल्यानें प्रत्येकजण दुसऱ्याच्या वांटणीवर करडी नजर ठेवून टपलेला असतो. याचेंच परिपक्व फळ म्हणजे शेवटीं भाऊबंदकी होते. भाऊ–भाऊ, आई–मुलें उघडपणें कोर्टाच्या साहाय्यानें एकमेकांचे शत्रू बनतात. अर्थात् सर्व कुटुंबाचा ऱ्हास होतो. ही सफलता कर्त्या पुरुषाच्या मृत्यूनंतर होत असली तरी त्याचीं बीजें मुलें सज्ञान होऊन संसार करूं लागलीं म्हणजे पेरलीं जातात व बापाच्या वृद्धापकाळीं त्या बीजांचे अंकूर तयार होत असतात.

पण पोटगीचा कायदा करून कुटुंबांत फाटाफूट होण्यापेक्षां अशा स्त्रिया मागें सांगितल्याप्रमाणें सब्या समजून सरकारांत त्यांची नोंद व्हावी. त्यांनीं सेवादलांतून कामें करावींत म्हणजे पोटाचा प्रश्न मिटून मुलांशीं वा भावांशीं भांडण करण्याचें कारण उरणार नाहीं,

## वेश्या आणि वेश्यावृत्ति

तत्त्वज्ञानाचा जन्म–

तत्त्वज्ञान हें मनुष्यनिर्मित आहे. जीवन हें निसर्गनिर्मित आहे. तत्त्वज्ञानाचा

जन्म व आजपर्यंतचा इतिहास असें दर्शवितो कीं, जीवन हें निसर्गनिर्मित असलें तरी जीवनाला निसर्ग सर्वस्वीं अनुकूल नाहीं. किंबहुना निसर्गच जीवनाच्या मार्गांत धोंडे पसरून ठेवतो. त्याकरितां अनेक साधनें निसर्ग योजीत असतो. मनुष्य सर्वस्वीं निसर्गाच्या आहारीं गेला म्हणजे त्याचें जीवन यशस्वी होत नाहीं. उलट यश मिळूं लागल्यास त्यास मध्येंच निसर्ग अडथळे आणतो. या अनेक वर्षांच्या अनुभवानंतर निसर्गाला शह देण्याकरितां माणसानें तत्त्वज्ञानाला जन्म दिला.

निसर्गनिष्ठ भावना व तत्त्वनिष्ठ भावना–

परंतु या परस्परविरोधी शत्रूंनीं एकमेकाला शह देण्याकरितां केलेलीं दोन भिन्न अस्त्रें—त्यांच्या तडाख्यांत बिचारें मानवी जीवन सांपडून तें घायाळ होऊं लागलें. निसर्गनिष्ठ भावना व तत्त्वनिष्ठ भावना यांचा संग्राम होऊं लागला. निर्भेळ नैसर्गिक भावना आणि शुद्ध तात्त्विक भावना किंवा तत्त्वज्ञानाचें आवरण घातलेली नैसर्गिक भावना यांनाच लोक पुढें अनुक्रमें अनीति व नीति म्हणूं लागले. पण हें सुद्धां तत्त्वज्ञानच होतें. कारण प्रत्यक्ष व्यवहारांत हें उतरणें शक्य नव्हतें.

निसर्गनिष्ठ भावना आणि नीति–

मग तत्त्वज्ञानांतहि माणसानें फरक करण्यास सुरवात केली. तत्त्वज्ञान हें व्यवहारावर—जीवनावर अधिष्ठित आहे कीं तें स्वयंभूच उभें आहे? असें स्वयंभू तत्त्वज्ञान जीवनांत कितपत उतरणें शक्य आहे? पण जीवनावर उभें राहिलेलें तत्त्वज्ञान म्हटलें तर सर्वांच्याच जीवनांत अडचण उत्पन्न करणारी अनीति हीहि नीति होऊं शकेल. मनुष्य ही एक स्वतंत्र जात असल्यामुळें सर्व माणसांच्या पुष्कळशा अडचणी व भावना या सारख्या असणार. आणि या नैसर्गिक भावना होत. तेव्हां नैसर्गिक भावनांना नीति म्हणूं लागलों तर वर सांगितल्याप्रमाणें निसर्गानें निर्माण केलेले ते धोंडे आहेत. मग मानवी जीवन सुखावह कसें होणार?

नीति-अनीतीच्या सीमा–

स्वयंभू तत्त्वज्ञान हें सामान्य बहुजनसमाजांत यत्किंचितहि उतरणें शक्य नाहीं. फार तर तें लाखांत एक असलेल्या योग्याला उपयोगी पडेल. तेव्हां जीवना-

धिष्ठित तत्त्वज्ञानावरच यावें लागतें. या तत्त्वज्ञानाची नीति ठरवितांना स्वयंभू तत्त्वज्ञान व जीवनांतील अडचणी यांची तडजोड केली पाहिजे. ही तडजोड सर्वांना सारखी मान्य झाली तरच त्या नीतीला कांहीं अर्थ राहून कोणासही वाईट-पणा यावयाचा नाहीं. नाहींतर एखादी नड प्रखरतेनें जाणवणाऱ्या लोकांनीं एखादी नीति आवश्यक म्हणून ती आचरणांत आणावी तर ती नड अनावश्यक वाटणाऱ्या लोकांनीं त्यांना अनीति म्हणून हिणवावें.

वेश्यावृत्तीची अनावरता–

ही तडजोड कोणीच व केव्हांहि केली नाहीं आणि जी आपोआपच झाली ती सर्वमान्य झाली नाहीं. म्हणूनच वेश्याव्यवसायासारखे धंदे कांहीं लोकांस समाजाच्या दृष्टीनें आवश्यक वाटूनहि त्याची गरज नसलेले त्याला अनीति म्हणतात. त्यामुळें वेश्यांचा प्रश्न फार कठीण होऊन बसला आहे. सामाजिक दृष्ट्या वेश्यांची आवश्यकता प्रतिपादणारे वेश्यांना समाजांत इतर स्त्रियांच्या बरोबर मान देत नाहींत.

वेश्यांमुळेंच कुलीन स्त्रिया सुरक्षित राहूं शकतात असें सिसेरोचें म्हणणें आहे. हें जर खरें असेल तर कुलीनांचें पावित्र्य टिकविण्याचें महत्कार्य करणाऱ्या वेश्यांना समाजांत हीन स्थान कां असावें ? वेश्याव्यवसाय करणें हें तात्त्विकदृष्ट्या अनीतीचें समजलें गेलें आहे. पण व्यवहारांत त्याला कोण जुमानतो ?

अनादि कालापासून वेश्याव्यवसाय कोणत्याना कोणत्या रूपांत जगांतील प्रत्येक देशांत चालत आलेला आहे. श्रीमंत लोक विलासी म्हणून, गरीब थकल्या जीवाला तेवढेंच सुख मिळेल व द्रव्याभावीं लग्न करतां येत नाहीं म्हणून, मध्यमवर्गीय अब्रू राखून आडून चोरून, एवढेंच काय पण प्रथम पवित्र असणाऱ्या धार्मिक मठा-मठांतूनहि शेवटीं शेवटीं हेच धंदे चालतात हें आपण इतिहासावरून जाणूं शकतों. या सर्व ऐतिहासिक माहितीवरून आणि आजहि आपल्या डोळ्यांसमोर घडत असलेल्या अनेक प्रकारांवरून मनुष्याच्या मनावर वैषयिक भावनेचा जोर किती आहे हें सहज ओळखतां येण्यासारखें आहे.

विवाहसंस्था, विषयवासनेस मान्यता–

विषयसुख ही आवश्यक गोष्ट आहे कीं केवळ चैन आहे, या प्रश्नाचें एकतर्फी एकदम उत्तर देतां येणार नाहीं. सुख म्हणून ज्याला आपण म्हणतों तें दोन प्रकारचें असतें. पहिला प्रकार जीवनांत कांहीं तरी उणीव असणें व ती भरून निघणें किंवा दुःखभार कमी होणें किंवा जीवन चालविण्यास ज्या कांहीं गोष्टींची आवश्यकता आहे त्यांचा अभाव असणें व त्यामुळें जीवन पुढें चालविण्यास अडथळा येणें व तो नाहींसा होणें, यामुळें मिळणारें सुख. आणि जीवन सुखासमाधानांत चाललेलें आहे व कसलीहि नड नाहीं, कोणताहि अडथळा नाहीं तरीपण आहे त्यापेक्षां अधिक सुख मिळावें म्हणून जें सुख घेतों तें दुसऱ्या प्रकारचें सुख. या सुखावांचून जीवन सहज चालूं शकतें. विषयसुख कोणत्या प्रकारांत मोडतें? विषयसुखाचा प्रकार व्यक्तीवरच अवलंबून राहील. कोणाला ती नड भासेल तर कोणाला ती केवळ चैन असेल. कोणाला ती नड भासते म्हणूनच तर विवाहसंस्था जन्मास आली. आणि तिला मान्यता देऊन पवित्र समजली गेली. विवाहसंस्था शिष्टसंमत झाली याचा अर्थ मनुष्याच्या विषयवासनेला मान्यता दिली गेली.

संयमन–

विषयवासना कितीहि व्यक्तीची गरज असली तरी सपत्नीकांना ती नड असूं नये. सुखी सपत्नीकांच्या बाबतींत तें दुसऱ्या प्रकारचें सुख होईल. त्यांना वेश्या-व्यवसाय वर्ज्यच असला पाहिजे. सपत्नीक पुरुष वेश्येच्या घरीं जाऊं लागला म्हणजे पत्नीची त्यावरील श्रद्धा कमी होणार. एकंदर सामाजिक दृष्ट्या विचार करावयाचा झाल्यास जर पति पत्नीला सोडून दुसरीकडे जाऊं लागला तर त्याची पत्नीहि त्याला असा सवाल देऊं शकेल कीं, "मी असतांना तुम्ही दुसरीकडे जातां तर मग मलाहि दुसऱ्याकडे जाण्यास काय हरकत आहे?" या तिच्या सवालाला समाधानकारक उत्तर देणें कठीण आहे. कारण ज्याप्रमाणें पत्नीला मुलांची जबाबदारी त्याप्रमाणेंच पतीलाहि असते. अशा तऱ्हेनें पति व पत्नी दोघेहि बाहेर व्यवहार करूं लागले तर कुटुंबाचें मातेरें होईल हें कांहीं निराळें सांगावयास नको. पत्नीच्या अशा व्यवहारानें पतीला रोग जडणें शक्य आहेच पण त्यामुळें पत्नीलाहि रोग होणें अशक्य नाहीं. मग त्यांतून मुलें कशीं बचावतील? अशा

धिष्ठित तत्त्वज्ञानावरच यावें लागतें. या तत्त्वज्ञानाची नीति ठरवितांना स्वयंभू तत्त्वज्ञान व जीवनांतील अडचणी यांची तडजोड केली पाहिजे. ही तडजोड सर्वांना सारखी मान्य झाली तरच त्या नीतीला कांहीं अर्थ राहून कोणासही वाईटपणा यावयाचा नाहीं. नाहींतर एखादी नड प्रखरतेनें जाणवणाऱ्या लोकांनीं एखादी नीति आवश्यक म्हणून ती आचरणांत आणावी तर ती नड अनावश्यक वाटणाऱ्या लोकांनीं त्यांना अनीति म्हणून हिणवावें.

वेश्यावृत्तीची अनावरता–

ही तडजोड कोणीच व केव्हांहि केली नाहीं आणि जी आपोआपच झाली ती सर्वमान्य झाली नाहीं. म्हणूनच वेश्याव्यवसायासारखे धंदे कांहीं लोकांस समाजाच्या दृष्टीनें आवश्यक वाटूनहि त्याची गरज नसलेले त्याला अनीति म्हणतात. त्यामुळें वेश्यांचा प्रश्न फार कठीण होऊन बसला आहे. सामाजिक दृष्ट्या वेश्यांची आवश्यकता प्रतिपादणारे वेश्यांना समाजांत इतर स्त्रियांच्या बरोबर मान देत नाहींत.

वेश्यांमुळेंच कुलीन स्त्रिया सुरक्षित राहूं शकतात असें सिसेरोचें म्हणणें आहे. हें जर खरें असेल तर कुलीनांचें पावित्र्य टिकविण्याचें महत्कार्य करणाऱ्या वेश्यांना समाजांत हीन स्थान कां असावें ? वेश्याव्यवसाय करणें हें तात्त्विकदृष्ट्या अनीतीचें समजलें गेलें आहे. पण व्यवहारांत त्याला कोण जुमानतो ?

अनादि कालापासून वेश्याव्यवसाय कोणत्याना कोणत्या रूपांत जगांतील प्रत्येक देशांत चालत आलेला आहे. श्रीमंत लोक विलासी म्हणून, गरीब थकल्या जीवाला तेवढेंच सुख मिळेल व द्रव्याभावीं लग्न करतां येत नाहीं म्हणून, मध्यमवर्गीय अब्रू राखून आडून चोरून, एवढेंच काय पण प्रथम पवित्र असणाऱ्या धार्मिक मठामठांतूनहि शेवटीं शेवटीं हेच धंदे चालतात हें आपण इतिहासावरून जाणूं शकतों. या सर्व ऐतिहासिक माहितीवरून आणि आजहि आपल्या डोळ्यांसमोर घडत असलेल्या अनेक प्रकारांवरून मनुष्याच्या मनावर वैषयिक भावनेचा जोर किती आहे हें सहज ओळखतां येण्यासारखें आहे.

विवाहसंस्था, विषयवासनेस मान्यता—

विषयसुख ही आवश्यक गोष्ट आहे कीं केवळ चैन आहे, या प्रश्नाचें एकतर्फी एकदम उत्तर देतां येणार नाहीं. सुख म्हणून ज्याला आपण म्हणतों तें दोन प्रकारचें असतें. पहिला प्रकार जीवनांत कांहीं तरी उणीव असणें व ती भरून निघणें किंवा दुःखभार कमी होणें किंवा जीवन चालविण्यास ज्या कांहीं गोष्टींची आवश्यकता आहे त्यांचा अभाव असणें व त्यामुळें जीवन पुढें चालविण्यास अडथळा येणें व तो नाहींसा होणें, यामुळें मिळणारें सुख. आणि जीवन सुखासमाधानांत चाललेलें आहे व कसलीहि नड नाहीं, कोणताहि अडथळा नाहीं तरीपण आहे त्यापेक्षां अधिक सुख मिळावें म्हणून जें सुख घेतों तें दुसऱ्या प्रकारचें सुख. या सुखावांचून जीवन सहज चालूं शकतें. विषयसुख कोणत्या प्रकारांत मोडतें? विषयसुखाचा प्रकार व्यक्तीवरच अवलंबून राहील. कोणाला ती नड भासेल तर कोणाला ती केवळ चैन असेल. कोणाला ती नड भासते म्हणूनच तर विवाहसंस्था जन्मास आली. आणि तिला मान्यता देऊन पवित्र समजली गेली. विवाहसंस्था शिष्टसंमत झाली याचा अर्थ मनुष्याच्या विषयवासनेला मान्यता दिली गेली.

संयमन—

विषयवासना कितीहि व्यक्तीची गरज असली तरी सपत्नीकांना ती नड असूं नये. सुखी सपत्नीकांच्या बाबतींत तें दुसऱ्या प्रकारचें सुख होईल. त्यांना वेश्या-व्यवसाय वर्ज्यच असला पाहिजे. सपत्नीक पुरुष वेश्येच्या घरीं जाऊं लागला म्हणजे पत्नीची त्यावरील श्रद्धा कमी होणार. एकंदर सामाजिक दृष्ट्या विचार करावयाचा झाल्यास जर पति पत्नीला सोडून दुसरीकडे जाऊं लागला तर त्याची पत्नीहि त्याला असा सवाल देऊं शकेल कीं, "मी असतांना तुम्ही दुसरीकडे जातां तर मग मलाहि दुसऱ्याकडे जाण्यास काय हरकत आहे?" या तिच्या सवालाला समाधानकारक उत्तर देणें कठीण आहे. कारण ज्याप्रमाणें पत्नीला मुलांची जबाबदारी त्याप्रमाणेंच पतीलाहि असते. अशा तऱ्हेनें पति व पत्नी दोघेहि बाहेर व्यवहार करूं लागले तर कुटुंबाचें मातेरें होईल हें कांहीं निराळें सांगावयास नको. पत्नीच्या अशा व्यवहारानें पतीला रोग जडणें शक्य आहेच पण त्यामुळें पत्नीलाहि रोग होणें अशक्य नाहीं. मग त्यांतून मुलें कशीं बचावतील? अशा

बापावर मुलाची काय श्रद्धा बसणार ? तेहि व्यसनी बनावयास वेळ लागणार नाहीं.

वेश्याव्यवसायाच्या बाबतींत अविवाहित तरुणांचा प्रश्नच उद्भवत नाहीं. निदान तसा उद्भवूं नये. विवाह्य वयोमर्यादेपर्यंत तरुणांनीं संयम राखणें हेंच सर्वतोपरी हितावह आहे. संयम राखणें याची तत्त्वज्ञान म्हणून व्यवहारांत कितीहि अवहेलना केली तरी तेंच तत्त्वज्ञान प्रत्यक्षांत उतरल्याखेरीज तरणोपाय नाहीं. किंबहुना तें तत्त्वज्ञानच नाहीं. तो वास्तविक व्यवहार व्हावयास पाहिजे. प्रश्न आलाच तर तो प्रौढ अविवाहित तरुणांचा.

अविवाहितांचा प्रश्न–

विवाह्य वयस्सीमा उलटण्यास सामाजिक कारण प्रमुख असतें. वैयक्तिक असलें तरी त्याचेंहि मूळ सामाजिक कारणांतच असतें. सामाजिक परिस्थिती-मुळेंच वैयक्तिक परिस्थितीला रूप येत असतें. समाजाच्या शिक्षणविषयक आणि त्यासंगें सामाजिक दर्जा यांच्या समाजांत ज्या प्रकारच्या कल्पना असतील त्याप्रमाणें प्रत्येक तरुण आपल्या आयुष्याची दिशा आणि सामाजिक दर्जा ठरवीत असतो. पुष्कळ वेळां असें होतें कीं, समाज माणसाची किंमत भलत्याच गोष्टींवर करीत असतो. निरुपयोगी शिक्षणाचा वाटेल तसा टेंभा गाजवून अनेक तरुणांना समाज हतबल करीत असतो. अंगांत धमक असते, बुद्धि असते पण बऱ्याच वेळां वेळ साधत नसते. संधि मिळत नसते. त्यामुळें त्या एकाच शैक्षणिक दर्जा मिळविण्याच्या-मागें लागून पुष्कळ तरुण आपलें निम्में आयुष्य फुकट घालवीत असतात. शिवाय ज्यांना हा प्रयत्नहि करणें शक्य नाहीं ते तर समाजांत आपणांस किंमत नाहीं म्हणून निराश होऊन कसें तरी आयुष्य कंठीत असतात. समाजांत विशिष्ट दर्जा आल्याशिवाय ते विवाहास तयार होत नाहींत. समाजाच्या खुळचटपणामुळें बिचाऱ्या प्रौढ अविवाहितांची संख्या वाढत जाते.

पोटापाण्याचा प्रश्न हा त्याहून निराळा आहेच. सर्वांना एकाच साच्याचें निरु-पयोगी शिक्षण मिळूं लागलें म्हणजे उद्योगधंदे खुंटतात. सुशिक्षित कामधंद्यास निरुपयोगी होतात. विद्यालयांत मिळणाऱ्या शिक्षणाचा उपयोग होईल अशा ठिकाणीं अगदीं थोडे सुशिक्षित कामास लागतात. बाकीचे सर्व हरि हरि करीत

बसतात. त्यामुळें बेकारी वाढून त्यांतल्या त्यांत सुशिक्षित बेकार वाढून त्यांतूनच प्रौढ अविवाहितांची संख्या वाढत जाते. सामाजिक दर्जाच्या कल्पना, शिक्षण, उद्योग-व्यापार ह्यांचा वैयक्तिक जीवनावर परिणाम होऊन प्रत्येक तरुण त्या प्रमाणांत आपली विवाहमर्यादा ठरवीत असतो.

अशा तऱ्हेनें अविवाहित तरुण प्रौढ होऊं लागले म्हणजे त्यांची वैषयिक कुचंबणा होते. विवाह करण्यास सामाजिक दर्जा नाहीं, विवाह केल्यास पत्नीचें पोट भरण्याची सोय नाहीं. पण वय तर वाढत चाललें! अशा तऱ्हेनें इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिति होऊन हे विचारे तरुण वेश्यांच्या डवक्यांत पडले तर त्यांत सामाजिक दृष्ट्या कांहीं नवल नाहीं. याचा दोष समाजालाच देणें अधिक योग्य ठरेल. समाज जर इतका शहाणा झाला तर प्रौढ तरुणांचा प्रश्न आपणांस भेडसावणार नाहीं.

विधुर

विधुरांच्या विषयीं बोलावयाचें झाल्यास द्वितीय पत्नीला वा पुनर्विवाहाच्या पत्नीला आणि तिच्या प्रथमसंततीला कुटुंबांत समभावानें वागविण्याइतकें औदार्य विधुरांच्या अंगीं नसेल तर त्यांनीं प्रथमपत्नीच्या पश्चात् संयमानें राहून ब्रह्मचर्य पाळणें हें त्याच्या वैयक्तिक दृष्ट्या आणि कौटुंबिक दृष्ट्या हिताचें आहे. पण वेश्यागमन तर मनांतसुद्धां आणूं नये. जें विधवांचें महत्त्व मागें सांगितलें आहे तेंच विधुरांचें आहे.

वेश्यागमनाची सवलत –

मग समाजांत वेश्यांची आवश्यकता काय असा प्रश्न येतोच. परंतु वर सांगितलेले सपत्नीक, तरुण आणि विधुर यांशिवाय आणखीहि अनेक प्रकारचे लोक समाजांत असतात. ज्यांना विवाह करण्याची ऐपत नाहीं, विवाह होणेंच शक्य नाहीं, ज्यांना कुटुंब नाहीं आणि अविवाहित राहूं शकत नाहीं अशांना वेश्यागमनाशिवाय गत्यंतर नाहीं. त्यांना तसें करण्यास हरकत नाही. समाजांतील खालच्या वर्गांतील लोक ह्यांत मोडतात. जर त्यांनाहि वेश्याबंदी केली तर समाजावर मोठेंच संकट येईल. या लोकांची टोळधाड इतर

कौटुंबिक स्त्रियांच्यावर येईल. इतर स्त्रीपुरुषांचें जीवन शुद्ध वा सुखी ठेवण्याकरितां वर सांगितलेल्या विषयी लोकांनी वेश्यागमन करणें भाग आहे.

वेश्येचें समाजांत स्थान—

ह्या वेश्यांचें समाजांत स्थान काय? ज्यांच्यामुळें आपलें पावित्र्य टिकून राहिलें आहे आणि कुटुंबसुख स्थिरावलें आहे त्या स्त्रियांना जरी आदर दिला नाहीं, मान दिला नाहीं तरी त्यांच्याबद्दल कृतज्ञता ठेवून सहानुभूति दाखवावयास नको काय? मग त्या वेश्यांचा उल्लेख हीनतेनें करण्यांत काय अर्थ आहे? तुच्छपणाचें व हीनतेचें उपमेय म्हणून त्यांचा उपयोग कां करावा? त्यांच्या दृष्टीनेंहि आपणांस थोडा विचार केलाच पाहिजे. केवळ वीतभर पोटाची खळगी भरण्यासाठीं ज्यांना असा देहविक्रय करावा लागतो त्यांना जर तुम्हीं 'कां?' असा प्रश्न केलात तर त्या दुसरें कोणतें उत्तर देणार? 'आम्हाला तुम्ही कोरडें तत्त्वज्ञान शिकवितां. खायला तुम्ही कांहीं आणून घालीत नाहीं!' पैशाकरितां उच्चवर्णीयानें चांभाराचा धंदा करावा, कुटुंबाचा खर्च भागत नाहीं म्हणून घरमालकिणीनें घरांतील वस्तू विकावयास काढाव्यात, किंवा समाजांत प्रतिष्ठा मिळालेल्या एखाद्या अब्रूदार गृहस्थानें महिन्याच्याशेवटीं तोंडमिळवणी होत नाहीं म्हणून घरोघर दुधें घालण्याचा धंदा करावा त्याप्रमाणें दारिद्र्यांत खितपत पडलेल्या स्त्रियांनीं देहविक्रय करून पोट भागवावें ह्यांत काय दोषार्ह आहे? वर सांगितलेले उच्चवर्णीय कौटुंबिक स्त्री आणि अब्रूदार गृहस्थ हे जितके दोषास पात्र आहेत तितकीच वेश्याहि आहे. परंतु आपण वरील तीन व्यक्तींचा तिरस्कार न करतां त्यांची कींव करतों आणि त्याच सदरांत पडणाऱ्या वेश्येला वाळींत टाकतों!

कित्येक वेळां तर स्त्रियांना वेश्या करण्यास पुरुषच कारणीभूत असतात, हें आपण विसरतों. स्त्रियांचा अशा प्रकारें व्यापार करून धंदा करणाऱ्या टोळ्या याहि काळांत प्रतिष्ठित जगांत कांहीं कमी नाहींत. जातिवंत वेश्या तर आपल्याप्रमाणेंच इतर स्त्रियांना आपल्यांत फसवून ओढून नेतातच. स्वेच्छेनें पैसा मिळविण्याचे इतर मार्ग उपलब्ध असतांहि केवळ वेश्यापणाची हौस म्हणून धंदा करणाऱ्या स्त्रिया लाखांत निदान हजारांत एक सांपडेल. पण त्यांच्यामुळें इतर वेश्यांविषयीं वाटणाऱ्या सहानुभूतीला धक्का पोंचण्याचें कारण नाहीं.

कांहींहि असो, वेश्या ही समाजांत अढळ पण नडीची अडगळ आहे यांत शंका नाहीं. वैषयिक कुचंबणा होत असलेले, विवाहाविषयीं निराश, वैषयिक बाबतींत असहाय, थोडेफार रोगांनीं पछाडलेले अशांकरितां ही अडगळ समाजांत ठेवणें भाग आहे. कोंबड्या पाळणाऱ्याला आपल्या परसांत शेणखळा आणि दारा-अंगणांत अळ्या-किड्या राहूं द्यावयास पाहिजेत.

वेश्यावृत्तीचें संयमन–

वेश्याव्यवसाय कायद्यानें समूळ बंद होणें शक्य दिसत नाहीं. एक वेळ वेश्या-व्यवसाय नष्ट होईल पण वेश्यावृत्ति कायमच राहील. इंग्लंड आणि रशिया ह्यांतील समाजाचें अंतर्दर्शन घेतलें असतां (पाश्चात्य स्त्रीसमाजदर्शन–थत्ते दांपत्य) वरील विधानाची साक्ष पटेल. फार कशाला आपल्याच समाजांतून ह्याचा अनुभव रोज पहात असतों, वेश्यागृहाची पायरी न चढलेले परंतु सभ्य आणि प्रतिष्ठित कुटुंबांतील स्त्रीपुरुषांचे गुप्त संबंध असलेले असे कितीतरी लोक आपल्या पाहण्यांत येत असतात. परंतु स्वतःच्या सभ्यतेसाठीं ह्या गोष्टी गुप्त राखतो इतकेंच. वेश्यावृत्तीचें मूळ वैषयिक भावना आहे. वैषयिक भावना म्हणजे एक शारीरिक मोह आहे. कोणत्याहि मोहाच्या मूढावस्थेंत मन त्या विषयावर केंद्रित होतें. मनाला इतर व्यापार सुचत नाहींत. केव्हां ह्याच्या उलट होत असे. मनाला इतर व्यवहार नसला म्हणजे मन साहजिक आपल्या आवडत्या विषयाकडे ओढ घेतें, त्याविषयींचीं साधनें समीप नसतील तर अर्थातच विषयभावना मनाचें लक्ष वेधून घेते. कारण उघडच आहे. कारण कांहींहि असो. मन एकदां मोहावस्थेंत असलें म्हणजे त्यापासून दुरावण्यास मनाला तितक्याच शक्तीचा दुसरा मोह शह म्हणून आणणें भाग पडतें. असे शह निर्माण करून ठेवले म्हणजे अतिरिक्त विषयवासना कमी होईल.

एक प्रयोग–

वेश्यागमन वैयक्तिक नीतिमत्तेवर अवलंबून असलें तथापि वेश्याव्यवसायाची चलती वा पडती सामाजिक नीतिशास्त्राची उंची दर्शविल्यावांचून राहत नाहीं. समाजाची त्या दृष्टीनें नीतिमत्ता ठरविण्याकरितां एक प्रयोग करून बघण्यासारखा आहे. समाजाची वेश्यावृत्ति वेश्यागृहाबाहेरून समजण्यासारखी नाहीं. कारण

वेश्यागृहाबाहेर सर्वजण शुद्ध असतात. प्रत्येक वेश्येला तिच्याकडे रोज येणाऱ्या गिऱ्हाईकाची नोंद करून ठेवण्यास सांगितलें पाहिजे. म्हणजे समाजांतील कोणत्या वर्गांतील कोणत्या व्यवसायाचे लोक येतात, त्यांतील सपत्नीक, विधुर, तरुण यांचें वर्गीकरण करून सविस्तर इतिवृत्त तयार केल्यास समाजशास्त्राच्या दृष्टीनें तें उपयुक्त ठरेल. समाजाची खरी नीतिमत्ता कळून येईल.

वेश्याव्यवसायाची कुचंबणा—

वेश्याव्यवसाय समूळ कायद्यानें बंद करून समाजांत अनाचार माजवण्यापेक्षां त्या व्यवसायावर नियंत्रण घालून सुव्यवस्थित करणेंच हितावह ठरेल. युरोपांतील सुधारलेल्या देशांतून आपल्या देशांतील लोकांची नीतिमत्ता ओळखून तेथील सरकारनें थोर नीतिमत्तेचा अभिनिवेश न आणतां प्रथमच वेश्याव्यवसाय सुव्यस्थितपणें चालू दिला आहे. एवढेंच नव्हे तर वेश्यागृहांची सरकारी तपासणी होते. वैद्यकीय तपासणीकडे व स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिलें जातें. आमच्याकडील लोकांची स्थिति चमत्कारिक झाली आहे. प्राचीन काळच्या समाजाच्या नीतिमत्तेप्रमाणें तत्कालीन सरकारास वेश्याव्यवसायाचें स्वतंत्र खातें उघडण्याची आवश्यकता भासली नाहीं आणि समाजशास्त्रज्ञांस वेश्यावृत्तीला सर्रास मान्यता देण्याचीहि तितकीशी नड वाटली नाहीं. परंतु आतां काल बदलला आहे. युरोपीयांच्या सहवासानें आम्ही सुधारूं (!) लागलों आहोंत. त्यांच्या संस्कृतीशीं आमच्या संस्कृतीचा सुंदर (!) संगम होऊन आम्हीं आमची संस्कृतिहि सुधारली आहे. तेव्हां नव्या कालानुसार नव्या नीतीप्रमाणें नीतिशास्त्रहि बदललें पाहिजे. जुन्या नीतीचे संस्कार मनांत ठसल्यामुळें आणि आचार मात्र नवा करावासा वाटत असल्यामुळें आमची फार कुचंबणा होऊं लागली आहे. वेश्याव्यवसायाला जाहीरपणें मान्यता देणें आमच्या डोक्यांत रेंगाळत असलेल्या जुन्या नीतीला संमत नसल्यामुळें वेश्याव्यवसाय सर्वत्र चोरून होतो. वेश्यागृहें सुव्यवस्थित करणें म्हणजे त्यांस मान्यता दिल्यासारखें आहे. त्यामुळें हा व्यवसाय अत्यंत गलिच्छ व दूषित झालेला आहे.

वेश्यागृहांची व्यवस्था—

परंतु सर्रास होणाऱ्या ह्या चोरट्या व्यवसायाचा परिणाम समाजावर अत्यंत

घातक होतो. हिंदुस्थानांतील गुप्त रोगांचें प्रमाण इतर देशांच्या प्रमाणाशीं तुलना करून पाहिलें म्हणजे ह्याचें प्रत्यंतर येतें. हा संसर्गजन्य सामाजिक गुप्तरोग हळूहळू सर्व समाज सडून टाकतो कीं काय अशी आतां भीति वाटूं लागली आहे. ह्याकरितां वेश्यांचा एक स्वतंत्र नवा कायदा करणें अनाथ हिंदु स्त्रियांच्या कायद्या-इतकें महत्त्वाचें आहे.

प्रथम गिऱ्हाइकांवर नियंत्रण घालावयास हवें आहे. हें नियंत्रण यशस्वी होण्याकरतां वेश्यांना मासिक ठराविक वेतन देऊन त्यांवर सक्त पाहरा ठेवणें इष्ट आहे. गिऱ्हाइकांवर नियंत्रण घातलें म्हणजे मागें वर्णन केलेले तरुण, सपत्नीक व विधुर यांत शुद्धता राहून त्यांकडून होणारी समाजाची हानि थांबेल. वेश्यांना अभिज्ञापत्रें ( identity cards ) दिलीं म्हणजे स्त्रियांवरहि नियंत्रण पडून त्यांची स्थिति सुधारेल. वेश्यांची व गिऱ्हाइकांची कडक वैद्यकीय तपासणी व त्यांना वैद्यकीय सल्ला याविषयीं सरकारनें काळजी घेतली पाहिजे. वेश्यागृहांची स्वच्छता आणि प्रत्येक वेश्येचें स्वतंत्र गृह यांचे नियम केले पाहिजेत.

कुटुंबसंस्थेचा घटकावयव असणाऱ्या स्त्रीचा सर्व दृष्टीनें विचार केल्यावर कुटुंबाचा दुसरा घटकावयव पुरुष तेवढाच उरतो. कुटुंबाची उत्पत्ति या स्त्री आणि पुरुषामुळें झाली आहे. त्या दोघांमुळेंच कुटुंब जगतें. सामाजिक दृष्टीनेंहि पुरुष या घटकाला अत्यंत महत्त्व आहे. या दुहेरी महत्त्व असलेल्या पुरुषाचा पुढील प्रकरणांत आपण विचार करूं.

# पुरुष

# ४

## तीन अवस्था–

विज्ञानांत प्रत्येक वस्तूचा सर्वांत सूक्ष्म घटक म्हणजे Atom–अणु. त्या अणूचेहि Electrons आणि Protons असे दोन मुख्य भाग पडतात. समाज या वस्तूचेंहि असेंच आहे. त्याचा सर्वांत लहान घटक म्हणजे कुटुंब. हें कुटुंब स्त्री आणि पुरुष ह्या Electrons आणि Protnos नीं तयार झालेलें असतें. स्त्रीपुरुषांचीं समाजांत भिन्न कर्तव्यें असतात हें आपण मागें पाहिलेंच आहे. त्याप्रमाणें कुटुंबांतहि–किंबहुना समाजापेक्षांहि—अगदीं भिन्न कर्तव्यें असतात. स्त्री ज्याप्रमाणें कन्या, पत्नी आणि माता या तीन स्वरूपांत कुटुंबांत नांदते; त्याप्रमाणें पुरुष पुत्र, पति आणि पिता या स्वरूपांत नांदत असतो. योगिनी स्त्रियांप्रमाणें पुरुष विधुर या चवथ्या स्वरूपांत विधुर म्हणून नांदतोच असें नाहीं. पुरुषांत मुख्यत्वेंकरून ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रम हेच दोन आश्रम बहुधा दिसून येतात.

## पुरुषमहति–

सामाजिक दृष्टया पुरुषाची महती समाजांत फार आहे. किंबहुना समाजाला चालना मिळते किंवा त्याचें स्थित्यंतर होतें त्याला बहुशः कारणीभूत पुरुषच असतो. पुरुष हा समाजरथाचा सारथी आहे. समाजांतील कोणत्याहि प्रकारच्या

गतीचें कर्तृत्व पुरुषाकडे असतें. जगाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत जगांतील प्रत्येक लहानमोठ्या क्रांतीचें जनकत्व पुरुषाकडेच येतें अशी इतिहास साक्ष देतो. स्त्रीचें कर्तृत्व तिच्या सामाजिक महत्त्वास बाध न येतां पुरुषाच्या मानानें फार कमी आहे असेंहि इतिहास सिद्ध करून देतो. पुरुष असतांना समाजांत स्त्रीचें महत्त्व अतिशय आहे; परंतु पुरुष नसला तर समाजाचेंच अस्तित्व नष्ट होईल. स्त्रीला महत्त्व आहे तें पुरुषामुळें. समाजावर पुरुषाच्याच जीवनाचा परिणाम होत असतो. अमका समाज उद्योगधंद्यांनीं समृद्ध आहे किंवा तो शेतकीप्रधान आहे, दरिद्री आहे किंवा श्रीमंत आहे, सुसंस्कृत आहे वा रानटी आहे इत्यादि जेव्हां आपण समाजाविषयीं विधानें करतों त्यावेळीं त्या विधानांतील कर्तृत्व बव्हंशी पुरुषाकडेच जातें. त्यांत स्त्रीचा हातभार असल्यास तेथें त्याप्रमाणें आपण विशेष नमूद करतों. ब्रह्मदेशांत सर्व कामें स्त्रियाच करितात व त्याला स्त्रियांचें राज्य म्हणतात, यावरून समाजाचें कर्तृत्व पुरुषाकडेच आहे आणि समाजाच्या अवस्थेस बव्हंशीं पुरुषच जबाबदार असतो हें निसर्गसिद्ध आहे. या नियमाविरुद्ध ब्रह्मदेशांतील अपवाद असल्यानें त्याला विशिष्ट उल्लेख अवश्य लागतो. अमक्या समाजांत पुरुषांचें राज्य आहे किंवा तेथें पुरुषच सर्व कामें करतात असें विधान अजून कोठें ऐकावयास आलें नाहीं. याचा अर्थ समाजाचा 'कर्ता' पुरुष हें स्वयंसिद्धच आहे. तसें नसलें म्हणजे तें नवल समजून आपण त्याचा उल्लेख करतों. तात्पर्य काय, तर समाजाच्या कोणत्याहि घटनेस किंवा कुटुंबाच्या मुद्द्यां—पुरुषाला जबाबदार धरतात.

मुलाचें शिक्षण–

या दृष्टीनें पुरुषाचें आयुष्य अत्यंत महत्त्वाचें आहे. याची दक्षता लहान वयांतच घेणें इष्ट आहे. लहानपणीं रडणारें, हट्ट करणारें व पोरकटपणा करणारें मूल त्याच्या भावी आयुष्यांतील समाजाचा एक जबाबदार घटक आहे हें त्याचे आईबाप व शिक्षक विसरून जातात. तेथें त्या आईबापांचाच पोरकटपणा दिसून येतो. लहान मुलाकडे पोरकट म्हणून पाहणें किंवा त्याच्या भावी आयुष्याविषयीं हलगर्जीपणा दाखविणें यासारखा समाजाच्या दृष्टीनें मूर्खपणा नाहीं. पुत्रावस्थेंतील कर्तव्य पार पडायला त्याचे मातापिता जबाबदार आहेत. भावी नागरिक या दृष्टीनें त्याला शिक्षक जबाबदार आहेत. त्याच्या विद्यार्थीदशेचें वर्णन 'शिक्षण'

या प्रकरणांत आलेंच आहे. विद्यार्थीपूर्व दशा आईबापांवर अवलंबून आहे. मुलाच्या जन्मापासून विद्यालयीनप्रवेशपूर्व सहा वर्षांचें आयुष्य मातापित्यांनीं काळजीपूर्वक घालविलें पाहिजे. मातापित्यांचें घर हें कौटुंबिक शिक्षणाचें विद्यालय आहे. त्यांत माता ही गुरु असून पिता उपगुरु आहे. इतर कौटुंबिक जन विद्यालयांतील वातावरण शुद्ध व अनुकूल ठेवणारे विद्यालयांतील प्रतिष्ठित शिक्षक-वर्ग आहे. या कौटुंबिक विद्यालयांतून मुलगा बाहेर पडल्यावर शैक्षणिक विद्यालयांत प्रवेश करतो. कौटुंबिक विद्यालयांतील मुलांचें वर्णन ' बाल-संगोपन ' या उपप्रकरणांत आलेंच आहे. विद्यार्थी दशा ' शिक्षण ' प्रकरणांत वर्णिली आहे.

कर्तव्यक्षेत्रें—

विद्यालयांतून मुलगा घरीं परत येतो त्यावेळीं सुमारे वयाचीं चोवीस वर्षें त्यानें घालविलीं असतात. यावेळीं तो पूर्वीचा भावी नागरिक म्हणून लहान पोर नसून आतां प्रत्यक्ष नागरिकत्वास पोंचलेला असतो. स्वतःचें व्यक्तिमत्व सिद्ध करून देण्याची त्याची हीच वेळ असते. आपला समाज, धर्म व राष्ट्र यांसंबंधींच्या कर्तव्यांची त्याला पूर्ण जाणीव झालेली असते. जग व आपलें राष्ट्र, समाज व आपलें कुटुंब, आपलें कुटुंब व इतर समशील कुटुंबें आणि शेवटीं आपण स्वतः व समाजांतील इतर थोर गृहस्थ यांची त्याला तौलनिक दृष्टि आलेली असते. त्यांतूनच आपल्या हाताशीं आलेल्या ' भावी आयुष्याची ' दिशा तो ठरवीत असतो. त्याच्या विद्यालयीन शिक्षणक्रमानुसार, त्याच्या या वरील तौलनिक अभ्यासानुसार व स्वतः-च्या सामर्थ्यानुसार आपलें कार्यक्षेत्र ओळखून घेत असतो. समाजाप्रमाणेंच कुटुंबांतहि तो एक विशेष घटक म्हणून यावेळीं ओळखला जातो. समाजाप्रमाणेंच कुटुंबाच्याहि त्याच्याविषयीं कांहीं अपेक्षा असतात. कुटुंबाची धुरा त्याचे स्कंधावर आधार घेऊं पाहात असते. त्याला साथीदार म्हणून तो आपल्या जीवनाचा सवंगडी याचवेळीं निवडीत असतो. सहचारिणीची निवड करतांना त्याला शांत-चित्त राहिलें पाहिजे. आपल्या कुटुंबाचा दर्जा, स्वतःचा दर्जा व आकांक्षा या लक्षांत घेतल्या पाहिजेत. सारांश, आयुष्याची ही संक्रमणावस्था फार महत्त्वाची आहे.

गृहस्थाश्रमी–

पुरुषाच्या आयुष्यांतील यानंतरचा काळ म्हणजे गृहस्थाश्रम. या काळांत तारुण्यांतील अस्थिरता व खळखळाट शांत होत असतो. शरदृतूंतील नदीच्या पात्राची अस्थिरता आणि खळखळाट हेमन्तऋतूंत नाहींशी होतात. त्या पात्रास स्थिरता येऊन प्रवाह सौम्य व संथ होत असतो. पावसाळ्यांतील लालीहि नाहींशी होऊन नदी पोक्त व भारदस्त दिसूं लागते. मानवी जीवनांतहि असेच ऋतु असून त्याप्रमाणें पुरुषाच्या जीवनांतील लाली, तारुण्योचित उन्माद, इ. नष्ट होऊन त्याच्या हेमन्तऋतूंत त्याच्या जीवनाला पोक्तपणा, विचारीपणा व सर्वच दृष्टीनें स्थैर्य येत असतें. या कालांत तो विवाहबद्ध होऊन कुटुंबांतील प्रमुख म्हणून गणला जातो. तारुण्यांत ध्येय म्हणून मानलेल्याचा हा कार्यकाळ आहे. तारुण्यांतील कल्पनारम्य सृष्टीचें या काळांत सत्यसृष्टींत रूपांतर करावयाचें असतें. प्रजोत्पादन करून नवीन प्रजेला बालपणापासून शिक्षण देऊन आपल्या-प्रमाणेंच त्यांना नागरीक करण्याची जबाबदारी आपणांवर येऊन पडते. सामाजिक कार्य करण्यास हीच उत्तम संधि आहे. मात्र तें कौटुंबिक स्वरूपाचें आहे. उत्तम प्रजोत्पादन करणें आणि उत्तम कुटुंबव्यवस्था ठेवणें यासारखें समाजकार्य नाहीं. आपल्या शरीरावर असलेली भावी नागरिकांची जबाबदारी पार पडली, कुटुंबियांस प्रेमानें संभाळलें, दूरच्या दीन नातलगांचें पोषण केलें, शक्त्यनुसार अनाथांना आश्रय दिला, आपल्याच कुटुंबांतील विधवा स्त्रियांना मान देऊन त्यांचें पालन पोषण केलें म्हणजे समाजावरील केवढा तरी भार हलका होईल. प्रत्येक गृहस्थाश्रमीयानें हें कार्य कर्तव्य म्हणून दक्षतेनें पार पाडलें तर अनाथ स्त्रियांचा प्रश्न समाजाला भेडसावणार नाहीं, बेकारी 'आ' वासून उभी राहणार नाहीं, पंगू लोकांचा भार समाजाच्या शिरावर पडणार नाहीं, अनाथ मुलांची काळजी त्याला करावी लागणार नाहीं, शिक्षणक्षेत्राचें काम बरेंचसें हलकें होईल. एक गृहस्थाश्रमी मनुष्य जर अशा तऱ्हेनें कर्तव्यदक्ष राहील तर समाजाचा भार कितीतरी प्रकारांनीं हलका होईल. सामाजिक द्रव्याचा व शक्तीचा अपव्यय होणार नाहीं. प्रत्येक व्यक्ति कर्तव्यदक्ष राहील तर समाजकंटकांची संख्या घटत जाईल. समाजांतील संस्कृतिसंवर्धक विद्याकलांना चालना मिळेल.

वानप्रस्थाश्रम—

हिंदुधर्माच्या समाजशास्त्राप्रमाणें गृहस्थाश्रमानंतर वानप्रस्थाश्रम व संन्याशाश्रम सांगितला आहे. तात्विकदृष्ट्या हे आश्रम अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे आहेत, हें महत्त्व व्यवहारावरून प्राचीन काळीं सिद्ध करतां आलें असतें कीं नाहीं याची शंका वाटते. परंतु आज विसाव्या शतकांत जगांतील निरनिराळ्या लोकांचा अनुभव पाहिल्यावर हें तत्त्व व्यावहारिक दृष्ट्याहि सिद्ध करून देतां येण्यासारखें आहे. जगाचे इतिहास धुंडाळून पाहिले आणि निरनिराळ्या समाजांकडे त्यांच्या समाजशास्त्राच्या दृष्टीनें नजर फेकली म्हणजे असें दिसून येतें कीं, एक राजा फार दिवस गादीवर टिकत नाहीं. सुदैवानें (दुर्दैवानें ?) त्याला दीर्घायुष्य मिळालें तर त्याचाच मुलगा त्याचा खून करून वा कैदेंत घालून स्वत: राज्य बळकावून बसतो. अशीं उदाहरणें मोगलाईंत कितीतरी आहेत. सध्यांच्या म्हाताऱ्या संस्थानिकांच्या युवराजासंबंधीं अगदीं वरीलप्रमाणें उदाहरणें सर्रास घडत नसलीं तरी राजघराण्यांत गादीविषयीं तंटे, असंतोष व युवराजाच्या मनावर परिणाम झालेला दिसून येतो. पैसा न मिळविणाऱ्या म्हाताऱ्या बापाची अडगळ त्याच्या होतकरू मुलांना नेहमींच वाटत असते. ही स्थिति हिंदुस्थानांत तरी दिवसानुदिवस वाढत आहे. म्हाताऱ्या बापाची ही दैन्यावस्था किंवा त्याच्या वर्चस्वाबद्दल हेवा असलेला पाहून त्याची कींव आल्यावांचून राहत नाहीं. दीर्घायुष्य हें त्याचें भाग्य नसून दुर्दैवच म्हटलें पाहिजे. राजकीय पुढाऱ्यांविषयीं हेंच विधान करणें योग्य होईल. पुष्कळ दिवस पुढारीपण भोगलेल्याचा नवीन होतकरूंना नेहमींच हेवा वाटत असतो. समाजकारणांत किंवा राजकारणांत नवीन नवीन पंथ निघा-वयास जीं कारणें होतात त्यांपैकीं वरील एक कारण आहे. युरोपीय राज्यसंस्थांतून याहून कांहीं निराळा अनुभव येत नाहीं. सांगण्याचें कारण काय तर गृहस्थाश्रम किंवा कर्तृत्वाश्रम कांहीं मर्यादित स्वरूपांत पार पाडावयाचा असून नवीन येणाऱ्या काळाप्रमाणें आपण त्यांतून अंग काढून घेणेंच हितावह आहे. उत्तर वयांत कर्तृत्वशक्ति लयास गेल्यावर अतिलोभानें तेंच पद उपभोगण्यांत अर्थ नाहीं. नवीनांचा प्रवेश करूं देणें सर्वांच्याच दृष्टीनें इष्ट आहे. युरोपांतील एका अत्युत्तम नटाची अशी गोष्ट सांगतात कीं त्यानें आपलें नांव गाजवून कीर्ति पूर्णपणें उपभोगल्यावर शहाणपणानें आपल्या अंगांत अभिनय पहिल्याप्रमाणें राहिला नाहीं

त्र राहणार नाहीं हें ओळखून आपला शेवटला खेळ जाहीर करून त्यानें रंगभूमीला कायमचा रामराम दिला. त्यामुळें त्याची कीर्ति अबाधित राहून नवीनांना जीवन मिळालें. हा शहाणपणा जर समाजांत सर्वत्र आला तर समाजाचा फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं.

गृहस्थाश्रमांतील आपलें कर्तृत्व संपवून आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारणें यांत कुटुंबाचें व समाजाचेंहि हित आहे. वानप्रस्थाश्रमांत आपण समाजाला व कुटुंबाला अन्य तऱ्हेनें फार उपयोगी पडत असतों. आपल्या वार्धक्यामुळें आलेल्या अनेक अनुभवांचें ज्ञान आपण पुढील पिढीला देऊं शकतों. कुटुंबाची कुलपरंपरा युवराजाकडून पुढें चालवूं शकतों. आपण काम करीत असतां अचानक मृत्यु आल्यास ही परंपरा पुढें टिकविणें व जुन्याच्या माहितीवरून नवीन आंखणें अशक्य होतें. योगिनी स्त्रियांचें जें कार्य तेंच या वृद्ध पुरुषांचें कार्य आहे. समाजकार्यास हे लोक चांगले उपयोगी पडतील.

वानप्रस्थाश्रमांतील अडचणी—

गृहिण्याश्रमोत्तर योगिन्याश्रम स्त्रियांना सुलभ आहे. त्याप्रमाणें गृहस्थाश्रमोत्तर वानप्रस्थाश्रम पुरुषांना सुलभ नाहीं. याचीं कारणें विधवा स्त्रियांचें विवेचन करतांना दिलींच आहेत. वृद्ध पुरुषांत दोन भेद करतां येतील. एक सपत्नीक वृद्ध व दुसरे विधुर. पैकीं सपत्नीक वृद्धांना एकवेळ वानप्रस्थाश्रम सुलभ होईल. पत्नीच्या अस्तित्वामुळें त्यांची विषयवासना उच्छृंखल होणें कठीण आहे. वयस्कर पत्नीच पतीला बरेच वेळां पावित्र्य आणून देते. या पतिपत्नींनीं कुटुंबांत स्वस्थ राहावें व समाजसेवा करावी. तथापि वृद्ध पुरुषाला विषयवासनेची अडचण नसली तरी इतर वासना त्याच्या विरून जात नाहींत. द्रव्याची लोलुपता नष्ट होत नाहीं, कीर्तीची हांव वाढतच असते. इतरांवर वर्चस्व गाजवावें ही तर कांहींच्यांत बलिष्ट भावना असते. त्यामुळें निरिच्छ मनानें व ईश्वरचिंतनांत काळ घालवावा हें त्यांस जमत नाहीं. हें ज्यास जमलें नाहीं त्याला समाजसेवा आणि कुटुंबसेवा कधीं जमणार नाहीं. वानप्रस्थाश्रमांत सर्व प्रकारच्या मोहांचा त्याग करावा लागतो. संसारांत आकांक्षा रेंगाळत बसतां कामा नयेत. या वानप्रस्थाश्रमांत

वृद्धांनीं ज्ञानार्जन करावें, तरुणांच्यावर सौम्य देखरेख करावी आणि होईल तितकी समाजसेवा करावी हाच मार्ग उत्तम वाटतो.

विधुरांची-अडचण–

विधुरांचा प्रश्न बराच विचार करण्यासारखा आहे. हा प्रश्न सहजासहजीं सुटणें शक्य नाहीं. त्यांनीं कुटुंबांत व समाजांत फार जपून वागावयास पाहिजे. म्हणजे नवीन सामाजिक प्रश्न उपस्थित होण्याचें कारण नाहीं. परंतु त्यांच्यामुळेंच कुटुंबांत सापत्नभाव आणि समाजाच्या दृष्टीनें सावत्र कुटुंबांची अनास्था, वृद्ध पतीच्या तरुण पत्नीचे प्रश्न, यासारखे इतर लहान मोठे प्रश्न उपस्थित होतात. विधुरांनीं दुसरा विवाह केला तर कुटुंबांत सावत्रभाव उत्पन्न न होऊं देण्याइतकी धमक फारच थोडयांत किंबहुना जवळ जवळ कोणांतच नसते. परंतु विषारी वृक्षाचा विचार न करतां तात्कालिक अडचणींना वा वैयक्तिक विषयवासनेला बळी पडून दुसरा विवाह मोठया उत्साहानें करण्यांत येतो. त्यावेळीं भविष्यत् कालाचा विचार करणारा हजारांत एकादाच असेल. या नसणाऱ्या लोकांत अडाण्यापासून तों थेट विद्वानांपर्यंत सर्व जातीचे लोक असतात. विवाह केला तर कुटुंबस्वास्थ्य टिकविण्याचें अंगांत सामर्थ्य नाहीं. न केला तर पत्नीच्या पश्चात् ब्रह्मचारी राहण्याची कुवत नसते. असे हे विधुर समाजांत बरेच वेळां अत्यंत वाईट परिणाम घडवून आणतात. सध्यां तर क्वचित् वेळां वृद्ध गृहस्थ तरुणांच्यावरहि मात करतात ! त्यामुळें कुटुंबांत धाक कमी राहतो. समाजांत मान व कर्तृत्वशक्ति कमी होते. सर्व लोक या 'वृद्ध तरुणांची' किंमत ओळखून असतात. वानप्रस्थाश्रमाची कल्पना आमच्यांतून नष्टप्राय होत आहे. त्याचें हें प्रत्यंतर आहे. वरील कारणांमुळें या उच्छृंखल विधुरांचा प्रश्न सोडवणें कठीण होत आहे. परंतु वानप्रस्थाश्रम याशिवाय त्याला दुसरा उपाय दिसत नाहीं.

एकंदरींत पुरुषाचे अवतार समाजांत तीन आहेत. पुत्र, पति व पिता. किंवा त्यालाच सामाजिकदृष्टया ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम असें म्हणतां येईल. समाजाला जबाबदार पुरुष आहे हें आपण पाहिलें. पुरुषाप्रमाणें स्त्रीसुद्धां त्रिमूर्तीत संचार करीत असते. कन्या, पत्नी आणि माता.

पुरुषाच्या आणि स्त्रीच्या या तीन अवस्थांतील कर्तव्यें प्रत्येकाला चांगलीं अवगत पाहिजेत. त्याकरितां त्यांना शिक्षणाची आवश्यकता आहे. स्त्रीपुरुषांना योग्य शिक्षण दिलें तर स्त्रीपुरुषांचा बौद्धिक व आत्मिक विकास होऊन त्यांच्यावर जगणाऱ्या संस्कृतीचें पोषण होईल. शिक्षणावांचून वैयक्तिक विकास नाहीं आणि वैयक्तिक विकासावांचून सांस्कृतिक विकास नाहीं. अर्थात् आतां शिक्षणाचाच विचार करावयास हवा.

## शिक्षण ५

### विद्यालय

समाजाची उभारणी बरीचशी शिक्षणक्षेत्रावर अवलंबून असते. समाजांत शिक्षणाइतकें महत्त्व दुसऱ्या कोणत्या क्षेत्रास असेल असें वाटत नाहीं. तसें असेल तर तो समाजाचा दोष म्हटला पाहिजे. विद्यालय इतकें पवित्र पाहिजे कीं, अट्टल मवाल्याचाहि हृदयपालट त्यामुळें झाला पाहिजे. विद्यालय इतकें व्यापक पाहिजे कीं समाजास अवश्य असणारी प्रत्येक तऱ्हेची व्यक्ति त्यांत तयार होऊन बाहेर पडली पाहिजे. विद्यालयाचा मान इतका आहे कीं, समाजांत राजाचाहि अधिकार अधिपतीच्या खालीं असावा. विद्येचें कार्यक्षेत्र इतकें व्यापक व उच्च भूमिकेनें प्रेरित पाहिजे कीं, प्रत्यक्ष राजा त्या विद्यालयांतून तयार होऊन मगच गादीवर बसावा. अधिकाऱ्याशीं राजापासून तों थेट समाजाच्या कोणत्याहि व्यक्तीपर्यंत प्रत्येकानें नम्र वागावें. विद्याधिपति म्हणजे प्राचीन भारतांतील ते ऋषीच असावयास पाहिजेत. सर्व समाजाचीं खरीं सूत्रें विद्यालयांतून चाललीं पाहिजेत. राजा व त्याचे कारभारी हें दिखाऊ शिखर आहे. विद्याधिपति हाच खरोखरीचा राजा पाहिजे. सर्व प्रजाजन हे विद्याधिपतीचे शिष्य असावेत. मग समाजवैभवास कसा पोचणार नाहीं ?

१७६८० शिक्षण
ता. १०
२८० :
७७७/४
नों. दि.

पण वस्तुस्थिति पाहिली म्हणजे हें सर्व स्वप्नच ठरतें. प्राचीन भारतांत मात्र वरील आकांक्षा जवळजवळ पूर्णपणें सफल झाल्या होत्या.

विद्यालय कसें नको अर्थात् विद्यालय कसें आहे–

विद्यालयाच्या मागें विद्यादानाचा व समाजकल्याणाचा सात्त्विक हेतु आहे हें विसरतां कामा नये. हा पोटाचा धंदा नाहीं. पोटभरूंना विद्यालयांत स्थान नाहीं. बेकारी नष्ट करण्याचा तो एक उपाय म्हणून तें आर्थिक उत्पादनाचें साधन नाहीं. विद्यालयांतील कामाला नोकऱ्यांचें स्वरूप आलें म्हणजे विद्येची हत्त्या झालीच म्हणून समजा. शिक्षक पोटाचा धंदा म्हणून विद्यालयांना इतर महत्त्व देत नाहीं. शिकवितांना कळकळ व आत्मीयता लागते ती पगारी नोकरदारांना कधींहि येणें शक्य नाहीं, विद्यार्थ्यांचें जीवन आपल्या हातांत आहे. भावी पिढी आपल्यावर अवलंबून आहे. या भव्य कल्पना त्याच्या संकुचित पोटांत मावत नाहींत. त्याच्या पोटांत फक्त महिन्याचा पगार मावतो. विद्यालय पैशावर उभारलेलें असलें म्हणजे त्याला व्यापारी महत्त्व येतें. दोन विद्यालयांत व्यापारी चढाओढ लागते. बाजारभावाप्रमाणें विद्यालयाच्या विद्याविक्रीचे भाव विद्यार्थ्यांच्या संख्येवर चढतउतरत असतात. बाजारांतील जिनसांप्रमाणें विद्यालयाच्या रसभरित जाहिराती फडकूं लागतात. परीक्षेंत अधिकाधिक विद्यार्थी उत्तीर्ण होणें हें विद्यालयाला आर्थिकदृष्ट्या नफ्यांत पडतें. त्यावरच विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची कक्षा अवलंबून असते. परीक्षा जास्त ठेवणें हेंहि फायदेशीर असतें. मग परीक्षा हेंहि विद्यार्थ्यांत व शिक्षकांत तंत्र होऊन बसतें. या सर्व व्यापारांत प्रत्यक्ष विद्या बाजूलाच राहते. विद्यादान हें विद्यालयाचें ध्येय व उद्देश जाऊन त्या जागीं तो एक किफायतशीर धंदा व नोकरीसाठीं लोक तयार करण्याचा कारखाना हेंच ध्येय राहतें. अशा तऱ्हेनें विद्यालयें बेजबाबदार लोकांच्या हातांत गेलीं म्हणजे पुढील सर्व पिढी निकामी होते.

म्हणून खासगी विद्यालयें असतां कामा नये. ज्यांना विद्यालयांत राहून समाजसेवा करावयाची असेल त्यांनीं सरकारी विद्यालयांत राहून सेवा करावी.

विद्याखात्याची शासनपद्धति–

सर्व देशांत एकच प्रमुख विद्यालय राजधानींत असावें. विद्याखात्याचें मुख्य कार्यालय तेथेंच पाहिजे. सर्वोच्च परीक्षा तेथेंच व्हाव्यात. लोकांच्या सोयीसाठीं देशांत प्रांताच्या ठिकाणीं याच्या शाखा असाव्यात. प्रत्येक जिल्ह्यांत, तालुक्यांत व गांवांत विद्यालयें पाहिजेत. यांचे संबंध राज्यशासनपद्धतीप्रमाणें असावेत. शिशु-विद्यालय व तरुण-विद्यालय असे दोन भाग स्वतंत्र असावेत.

विद्यालयांतील शिशूंचा आश्रम–

लहान मुलांकरितां निराळे, मुद्दाम तयार केलेले गुरूंचे आश्रम पाहिजेत. गांवांतील वाटेल त्या लोकांचा संपर्क त्यांस पोंचूं नये. आश्रमाभोंवतालची बरीचशी जागा आश्रमाच्या आवारानें व्यापून टाकिली पाहिजे. आश्रमांतील वातावरण हें कांहीं निराळेंच असलें पाहिजे. तेथें जातांक्षणींच मनाला पावित्र्य वाटलें पाहिजे. आश्रमांत गुरु, मुलें व मुलांचे सेवक यांपेक्षां चौथ्या प्रकारचा मनुष्य सहसा आढळूं नये. गुरूनें आपली दिनचर्या आदर्श ठेवली पाहिजे. आश्रमांतील वागणूकहि अनुकरणीय पाहिजे. मुलांशीं वागतांना फार निराळ्या भूमिकेवरून वागावयास पाहिजे. आपल्या प्रत्येक वागणुकीचा व आश्रमांत घडत असलेल्या बारीकसारीक गोष्टीच्या संस्कारांचा परिणाम मुलांच्या मनावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें होत असतो हें विसरून चालणार नाहीं.

आश्रमांतील गुरु–

या आश्रमांतील गुरु हे तितक्याच योग्यतेचे असावयास पाहिजेत. येथें गुरु होणें हा पोटाचा धंदा नाहीं. गुरुवाजीवर पैसे कमवावयाचे नाहींत. हा व्यापार नव्हे. उलटपक्षीं इतर ठिकाणीं पोटाकरितां काम करीत असलेले जे सज्जन व विद्वान् गुरु होण्यास लायक आहेत असें सरकारला वाटेल त्यांना आज्ञा होतांच आपला पोटाचा धंदा सोडून इकडे यावें लागेल. गुरु होणें ही अत्यंत मानाची जागा आहे. त्याचा उदरनिर्वाह होईल इतकेंच जीवनाचें साधन त्यास मिळेल. अशा गुरूशीं समाजांतील कोणत्याहि वरिष्ठ अधिकाऱ्यानें अतिशय आदरभावानें वागलें पाहिजे. हा गुरु अत्यंत निःस्वार्थी, विद्याव्यासंगी व सात्त्विक मनोवृत्तीचा असला पाहिजे. अशीं

माणसें निवडून काढलीं कीं, त्यांस आश्रमाचें तांत्रिक शिक्षण दिलें जाईल. मुलांस शिकवावें कसें, त्यांना सुधारावें कसें, त्यांचें मानसशास्त्र काय इत्यादि गोष्टी होतकरू गुरूला शिकवाव्या लागतील. प्रथम प्रथम असेच गुरु मुद्दाम शिकवून तयार करावे लागणार. पुढें हीच परंपरा विद्यार्थ्यांकडून चालविली जाईल. मात्र गुरूचें संपूर्ण शिक्षण घेतल्याशिवाय कोणाहि गृहस्थाला ' गुरु ' ही पदवी मिळणार नाहीं.

आश्रमांतील शिशु–

आतां प्रत्यक्ष आश्रमाकडे वळूं. आश्रमाचें आवार मोठें लागेल. आवारांत एक सुंदर बाग हवी. खेळण्याकरितां मोठीं पटांगणेंहि लागतील. पुष्कळ प्रकारचे पशुपक्षी बागेंत मुद्दाम पाळलेले पाहिजेत. शिवाय मुलांना मातीशीं, वाळूशीं खेळ-ण्याकरितां आणखी एक जागा राखून ठेवण्यास हवी. तेथें मातीचे किल्ले, बंगले, निरनिराळीं चित्रें, पुतळे इ. तयार करतां यावेत. प्रत्यक्ष आश्रम भव्य व मनो-वेधक असावा. आंत वरीच चित्रें, नकाशे, मोठमोठ्या लोकांचीं छायाचित्रें हीं लाविलेलीं पाहिजेत. धुळाक्षरें व प्राथमिक शिक्षणाकरितां लागणाऱ्या सर्व प्रकारचें प्राथमिक साहित्य पाहिजे. सर्व विषयांवरील सोपीं, सचित्र व लहान अशीं पुस्तकें भरपूर पाहिजेत. त्यांच्यापेक्षां जरा कठीण अशीं पुस्तकें पुष्कळ असणें आवश्यक आहे. प्रत्येक विषयाचा एकएक स्वतंत्र विभाग पाडावा. खेळण्याचीं साधनें तर अनंत प्रकारचीं असावींत. वरील सर्व सामग्री वाटेल त्या मुलास वाटेल तेव्हां हाताळण्यास मुभा असावी. म्हणजे मुलाचा कल कोणत्या बाजूला आहे तें समजेल व त्याप्रमाणें त्या विषयांतील आणखी जास्त साधनें त्याला देऊन तो कल निश्चित करतां येईल व त्याप्रमाणें नंतर उच्च शिक्षण त्यास द्यावें.

आश्रमामध्यें मुलांना कशाचीहि कमतरता पडतां कामा नये. वेळेवर पौष्टिक खाणें, व्यायाम, अभ्यास, विश्रांतिहि योग्य प्रमाणांत झाली पाहिजे. त्यांचे सेवकहि अतिशय प्रेमळ, हळुवार अंतःकरणाचे असावेत. ते विद्वान् नसले तरी चालतील. पण त्यांनीं मुलांना पोटच्या गोळ्याप्रमाणें वाढविलें पाहिजे. जे सज्जन वृत्तीचे निराश्रित असतील त्यांनाच हीं कामें द्यावींत. मुलांना वरचेवर आपल्या आईबापांस भेटविलें पाहिजे. आश्रमांत एक औषधालय असणें अत्यंत आवश्यक आहे.

भावी अभ्यासाची पार्श्वभूमि–

हें सर्व करितांना मुलें आपल्या आईबापांस पारखीं होतील, मुलांना त्यांच्या-बद्दल कांहींच आपलेपणा वाटणार नाहीं अशी स्थिति येत नाहीं, इकडे दक्षता दाखविणें जरुरीचें आहे. असो. संस्कार हे एका विशिष्ट वयांतच घडल्यास त्यांचा उपयोग मुलांच्या मनाला होतो म्हणून या लहान वयांतील मुख्य शिक्षण म्हणजे संस्कार होय. संस्कारांनींच या वयांत मुलांच्या मनाची व बुद्धीची वाढ होत असते. फक्त त्यांची प्रवृत्ति हेरून ठेवून त्याप्रमाणें त्यांना उपकरणीं देणें एवढेंच आपलें काम. एकदां कल कळल्यावर त्याचीच गोडी मुलाला या वयांत लावावयाची असते. मोठेपणीं समजूं लागलें म्हणजे प्रत्यक्ष त्या विषयाचा अभ्यास सुरू करावा. पुढील अभ्यासाची पार्श्वभूमि लहान वयांतच असते. लहान वयांत मन व बुद्धि कोंवळी असल्यानें जशी ती वांकवूं तशी ती वांकत असते. एकदां वांकलेलें हें रोपटें मोठेपणांत सरळ करणें अठीण जातें; म्हणून तारुण्यावस्थेपेक्षां शैशवांत संस्काराचें महत्त्व फार आहे.

तरुण विद्यागृह–

विद्यालय गांवाबाहेर पण गांवाजवळ असावें. विद्यागृहाभोंवतीं फार मोठें पटांगण पाहिजे. त्या पटांगणांत शिशुविद्यालयाप्रमाणेंच मोठी बाग, प्राणि-संग्रहालय, क्रीडांगण व मातीचे जिन्नस तयार करण्याकरितां माती व योग्य अशी त्याला जागा. विद्यालयांत गोशाळा असणें हितावह होईल.

वसतिगृह–

विद्यार्थ्यांचें वसतिगृह शेजारींच हवें. वसतिगृह हवेशीर, भव्य व मनाल्हाददायक असावें. प्रत्येक मोठ्या खोलींत तीन विद्यार्थी ठेवावेत. विद्यार्थ्यांनीं शक्य तों आपापलीं कामें स्वतः करावींत. आपण येथें अभ्यासाकरितां येतों–जिवाची चैन करण्याकरितां नव्हे–हें विद्यार्थ्यांनीं विसरून चालणार नाहीं. गुरूनें त्याच वसति-गृहांत विद्यार्थ्यांत राहिलें पाहिजे. वसतिगृहांतील वातावरण खेळतें, प्रेमळ, अभ्यासू, सात्त्विक व उत्साही असलें पाहिजे. गुरूनें विद्यार्थ्यांशीं तन्मयतेनें वागलें पाहिजे. आपण त्यांच्यावरील एक हुकमी अधिकारी नसून त्यांच्या

आईबापांच्या जागीं आपण आहोंत हें सदैव गुरूच्या मनश्चक्षूंपुढें असावयास पाहिजे. विद्यार्थ्यांपेक्षां आपण कोणीतरी निराळे आहोंत असें त्यास वाटतां कामा नये. विद्यार्थ्यांना आपल्यावर देखरेख करणाऱ्या गुरूची भीति न वाटतां आदर-युक्त जिव्हाळा वाटला पाहिजे. गुरूनेंहि आपला अधिकार गाजविण्याचें साधन म्हणून विद्यार्थ्यांकडे न पाहतां त्यांच्याबद्दल त्याचे मनांत वात्सल्य निर्माण व्हावें. विद्यालयांतील शिक्षण हें विषयाभ्यासी असून वसतिगृहांत मिळणारें शिक्षण संस्कार व अनुकरणपद्धति यांचें आहे. विद्यालयांतील शिक्षणापेक्षां वसति-गृहांतील शिक्षण अधिक महत्त्वाचें आहे. वसतिगृहांतील शिक्षणाचा परिणाम सबंध आयुष्यावर होत असतो. पुढील आयुष्य कसें जाणार तें याच शिक्षणावर अव-लंबून असतें. विद्यालयांतील शिक्षण प्रत्यक्ष असून वसतिगृहांतील बऱ्हंशीं अप्रत्यक्षच असतें.

व्यायामगृह–

वसतिगृहाला लागूनच व्यायामगृह असणें अगदीं आवश्यक आहे. व्यायामगृहांत सर्व प्रकारचीं आसनें व व्यायामपद्धती यांचे सचित्र व स्पष्टीकरणासह तक्ते भिंतीस लावून ठेवावेत. व्यायामाचा एकएक योग त्याचें चित्र व त्याचें खालीं लगेच तें स्पष्टीकरण–त्यायोगानें कोणत्या स्नायूला व्यायाम होतो, जास्त चांगला ताण पडण्याकरितां कशा पद्धतीनें योग करावयाचा. व्यायामाचे दोन प्रकार—एक स्नायूंना व दुसरा मज्जातंतूंना पुष्ट करणारे व्यायाम. उदा० : जोर, बैठका यांनीं फक्त स्नायू तयार होतात. पण नमस्कारांनीं स्नायूंच्याबरोबर मज्जातंतूंनाहि व्यायाम होत असतो. व्यायामानें शरीरास निरनिराळ्या कालांतरानें निरनिराळे परिणाम घडत असतात. त्याचें पृथक्करण, कोणता व्यायाम कोणत्या वेळेस, कोणत्या ऋतूंत, किती वेळ करावा, त्याला खुराक काय असावा, विशिष्ट व्यायामानें शरीरप्रकृतीवर काय परिणाम होतो इ. सर्व माहिती थोडक्यांत तक्त्यांत द्यावी. त्याबरोबर कोणत्या व्यायामानें कोणता योग वा दुखणें नष्ट होतें तेंहि देणें इष्ट आहे. ही सर्व माहिती तक्त्यांत अगदीं थोडक्यांत देण्याचें कारण विद्यार्थ्यांना तेथल्या तेथें मार्गदर्शन व शंकानिरसन तत्काळ व्हावें. ह्याखेरीज व्यायामावरील पुस्तकांचें वाचनालय व्यायामगृहांतच पाहिजे. वाचनालयांतून तात्त्विक चर्चा वाचावयास मिळेल तर तक्त्यावरून नित्याच्या व्यवहारास उपयोगी

अशा पुष्कळ आवश्यक गोष्टी जाणणें सुलभ होईल. व्यायामगृहांत व्यायामाचें सशास्त्र शिक्षण देण्याकरितां एक अधिकारी असावा. व्यायामाचीं साधनेंहि भरपूर असावींत. अन्नाचा आणखी एक दुसरा तक्ता तयार करून लावावा. त्यांत कोणत्या अन्नांत कोणतीं व किती जीवनसत्त्वें असतात, तीं शरीरास कोणत्या दृष्टीनें पोषक ठरतात, वर्ज्य अन्न कोणतें व पोषक कोणतें, अन्न केव्हां व किती वेळा घ्यावें, इत्यादि माहिती त्यांत असणें आवश्यक आहे. या सर्वांखेरीज व्यायामोत्तेजक चित्रें लावणें हें निराळें सांगावयास नको.

योगासनें–

व्यायामपद्धतींत योगशास्त्राचा शिरकाव करणें योग्य होईल. योगासनांचा अभ्यास विद्यार्थ्यांस शिकविणें हितकारक आहे. नमस्कार हें एक प्रकारचें योगासनच आहे. इतर व्यायामांपेक्षां योगासनें अधिक महत्त्वाचीं आहेत. योगासनांत प्रत्येक स्नायूला स्वतंत्रपणें भरपूर व्यायाम मिळून तो सर्व स्नायूंना सारखा होत असतो. इतर व्यायामपद्धतींत हें दिसून येत नाहीं. दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे योगासनांचा ज्ञानतंतूंवर फार चांगला परिणाम होतो. त्यांनीं बुद्धि तरतरीत होते. मानसिक शक्ति वाढते. इतर व्यायामांनीं म्हणजे जोर, बैठका इ. नीं बुद्धिमांद्य येतें. शरीर स्थूल होऊन बऱ्याच व्यायामानंतर सुस्ती येते. शरीर चपळ रहात नाहीं. योगासनांनीं अगदीं याच्याउलट परिणाम होतो. योगेतर व्यायामानें येणाऱ्या शक्तीमुळें माणसाची वृत्ति तामसी बनत जाते. उलट योगासनें माणसास नेभळट न बनवितां सात्त्विक करतात. अंगांत शक्तिहि भरपूर येते. योगाचा पाया सात्त्विक वृत्ति हाच आहे. योगासनांचा अभ्यास जितका अधिक होईल तितकी तरुणपिढी सशक्त बनून पुन्हां सात्त्विक होईल. शक्तीमुळें अंगांत येणारा तामसी मद लोप पावतो. पण त्याबरोबरच मानसिक शक्ति वाढत असल्यानें मनुष्य दुबळा न होतां कणखरच होतो. त्यामुळें समाजाची प्रतिकारशक्ति वाढून मवालगिरी पुष्कळशी कमी होण्याचा संभव आहे.

शारीरिकबरोबर मानसिक व्यायामाची आवश्यकता–

बुद्धीप्रमाणेंच शक्तीचें आहे. नुसत्या शक्तीचा उपयोग तसा दुरुपयोगहि करतां येतो. हा सदुपयोग वा दुरुपयोग शक्तिमान पुरुषाच्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे.

सदाचारी माणसानें शक्ति कमावली तर त्याचा स्वतःप्रमाणें समाजासहि अत्यंत उपयोग होतो. या ठिकाणीं शक्ति ही समाजाच्या कल्याणास कारणीभूत होते. मवाल्याच्या तावडींत सांपडलेल्या अबलेला सोडविण्याकरितां, दुबळ्या माणसावर हल्ला करणाऱ्या चोरदरोडेखोरांचा प्रतिकार करण्याकरितां व शेजाऱ्यापाजाऱ्यांस संकटकाळीं आत्मविश्वास वाटण्याकडे सदाचारी माणसाचा निःसंशय उपयोग होतो. पण याउलट अनाचारी माणसाची कमावलेली शक्ति कोणत्या कारणाकरितां खर्च होईल? त्याच्यापासून स्त्रियांना व दुर्बलांना, मुलांना व सज्जनांना भय निर्माण होऊन त्यांचें आयुष्य बिनधोकपणें जाणार नाहीं. दरोडे, खून यांना उत्तेजन मिळेल. सामाजिक दंग्यांना प्रोत्साहन मिळेल. पांढरपेशा वर्गांतील अशीं मुलें वाह्यात व अनाचारी निपजतील. दुसऱ्याचें बळकावून बसण्याची संहारी वृत्ति डोकें वर काढील. दोन परस्परविरोधी परिणाम करणारी शक्ति एक असली तरी प्रत्येकीमागील मनोवृत्ति फार भिन्न स्वरूपाची आहे. म्हणून केवळ तालमी व व्यायामशाळा काढून तालमींचा प्रसार करणें हितावह ठरणार नाहीं. शरीरसंगोपनाबरोबरच मनःसंगोपनाची व्यवस्था करावयास हवी. म्हणजे कमावलेल्या शक्तीचा समाजास उपद्रव न होतां उपयोग होईल. हीन वृत्तीच्या माणसानें कमावलेली शक्ति समाजांतील घातकी वृत्तींना चेतवेल तर थोर वृत्तीच्या माणसांनीं कमावलेली शक्ति समाजांतील उपकारक वृत्तीला उत्तेजन देऊन समाजास सुखानें नांदूं देईल.

### संरक्षक शिक्षण—

विद्यालयांत म्हणजे नवीन पिढी उत्तम नागरिक म्हणून तयार करण्याच्या कारखान्यांत संरक्षक शिक्षण न दिलें तर सर्वोत्तम शिक्षणांत ती एक उणीव भासेल.

संरक्षक विभागाचा हेतु आत्मसंरक्षण व देशसंरक्षण करतां यावें हा आहे. यांपैकीं कोणत्याहि संरक्षणाची जबाबदारी घेण्यास आपण नालायक असलों तर आपणांस आदर्श समाजाचा घटक म्हणून मानानें जगतां येणार नाहीं, आपलें संरक्षण करण्यास दुसऱ्याची आवश्यकता लागते ही परावलंबी वृत्ति ज्या समाजाच्या घटकामध्यें आहे तो समाज प्रतिकारक्षम ठरत नाहीं. तो दुर्बल होऊन नामशेष होतो. आपलें संरक्षण आपण स्वतः केलें पाहिजे. लोकांत संरक्षणक्षमता पूर्णपणें असली म्हणजे समाजावरील हल्ले सामाजिक रीत्या परतविणें अतिशय सोपें जातें. पगारी

सैन्य सर्व बाजूंनीं परचक्र आल्यास पुरेनासें होतें, सैन्य वाढवावें म्हटलें तर राजसभेस खर्च अतोनात येतो. पुन्हां आयत्यावेळीं घाईनें तयार केलेलें सैन्य हीन दर्जाचेंच असणार. परंतु सर्वत्र संरक्षक संघ स्थापून संरक्षक शिक्षण दिलें तर तरुण पिढींत सहकारिता निर्माण होते. समाजाविषयीं आपुलकीची भावना येऊन त्याच्या संरक्षणाच्या जबाबदारीची जाणीव उत्पन्न होते. पगारी नोकरदार सैन्यापेक्षां हे स्वयंसेवक देशाचें काम आत्मीयतेनें करीत असतात. त्यांची त्यागबुद्धि जागृत झाल्यानें राजसभेस काम हलकें होतें.

संरक्षकशिक्षण सांघिक हवें–

देशाच्या दृष्टीनें या व्यापक विचाराखेरीज आपल्या भोंवतालच्या मंडळींत संरक्षणविद्येचा उपयोग पुष्कळ वेळां होत असतो.

व्यायामगृहांतून प्रत्येकजण वैयक्तिकदृष्ट्या व्यायाम घेऊन स्वतःचें शरीर कमावीत असतो. परंतु त्या शक्तीचा उपयोग करून सामुदायिक हल्ल्याचें सामुदायिक रीत्या कसें निरसन करावें हें ज्ञान त्याला नसतें. म्हणून व्यायामगृहाची वेळ सकाळीं ठेवून सायंकाळीं एक तास संरक्षक संघ सुरू करावा. त्यांत देशप्रेम वाढविण्याचे उपाय योजावेत. सांघिक रीत्या कांहीं खेळ वा लाठीसम इतर शस्त्रें चालविण्यास शिकवावींत. हल्लाफोड कशी करावी तें शिक्षण द्यावें. सांघिक मर्दानी खेळाडू वृत्तीचें पोषण व सहकार्याची जाणीव सांघिक व्यायाम, खेळ व वृत्तिचेतना यांनींच होते.

वरील शिक्षणांत लष्करी स्वयंसेवकी सेना–

समाजांतील प्रत्येक व्यक्तीला वर सांगितल्याप्रमाणें संरक्षक शिक्षण दिल्यानें समाजांतील नेभळी वृत्ति नष्ट होते. समाजांतील उणीवांचा गैरफायदा परकीय घेऊं शकत नाहींत. सैन्याचा खर्च बराच वांचतो. संरक्षक शिक्षण लष्करी पद्धतीनें दिलें म्हणजे प्रत्येक व्यक्तीला शिस्तीची आवड उत्पन्न होईल. ह्या योगानें बेशिस्त व बेजबाबदार लोक नष्ट होतील. ते सुनियंत्रित व एकसूत्रित असले म्हणजे समाजयंत्र सुव्यवस्थित चालतें. बारीक सारीक संस्थांतील गबाळेपणा लयास जाऊन त्या संस्था लोकहितवादी बनतात. समाजावर परचक्र येतें, तेव्हां तर या लष्करी शिक्षणाचा उपयोग अत्यंत होतो.

स्वयंसेनेंतून नागरिक–

या संघांतून समाजनिष्ठेचे धडे द्यावेत. तरुण पिढीस समाजनिष्ठ बनविण्याची व धर्माभिमानी–केवळ धर्मपालक नव्हे–तयार करण्याची हीच उत्तम संधि आहे. सबंध दिवसाच्या तात्त्विक व सांस्कारिक शिक्षणांतून धर्मपालनाची दक्षता घ्यावी व संघांतून धर्मरक्षणाची दक्षता घ्यावी, अशा प्रकारें सर्वांगी उत्तम शिक्षण मिळालें म्हणजे विद्यार्थी हा आदर्श नागरिक होण्यास कोणती अडचण आहे ?

विद्यागृहांतील दिनचर्या–

वसतिगृहांत विद्यार्थ्यांची दिनचर्या नियमित पाहिजे. चोविस तासांतील कार्यक्रमानें विद्यार्थी सारखा बांधलेला पाहिजे. बरेचसे संस्कार दिनचर्येवर अवलंबून असतात. तरुणवयांत दिनचर्या नियमित असली म्हणजे भावी आयुष्यांत आपल्या मनाला एक प्रकारची शिस्त लागून मनाला वळण लागतें. या लहान गोष्टींतूनच जबाबदारीची जाणीव निर्माण होत असते. कोणत्याहि गोष्टीविषयीं बेफिकीरी स्वभाव रहात नाहीं. कामाचें महत्त्व जाणून तें वेळेवर करण्याची संवय लागते.

पहाटे उठणें आरोग्याच्या दृष्टीनें हितावह असतें. तसेंच अभ्यासाच्या व इतर कामांच्या दृष्टीनेंहि फार उपयोगी असतें. पहाटेच्या शांत वेळीं व ताज्यातवान्या मानसिक स्थितींत केलेला अभ्यास चटकन् समजतो व लक्षांत राहतो. अभ्यास करतांना मांडी घालून ताठ बसावें, म्हणजे पाठीच्या कण्यास पोक येत नाहीं. कण्यांतून जाणारा मज्जारज्जू सरळ उभ्या स्थितींत कार्यतत्पर होतो. म्हणून बुद्धीचें काम अशाच स्थितींत बसून केलें असतां त्यावेळीं बुद्धि तरतरीत व चलाख राहते. स्नान झाल्यानंतर व्यायामगृहांत जाऊन व्यायाम घ्यावा. दूध व थोडासा खुराक खाल्ल्यावर थोडें धार्मिकविषयक वाचन करणें आवश्यक आहे. या धार्मिक शिक्षणांतून धर्मशास्त्र, धर्माचा इतिहास, धर्माचें तत्त्वज्ञान, नीति व धर्माभिमान या गोष्टी शिकवाव्यात. मात्र हें फार वेळ चालतां कामा नये; अर्धा तास पुरे. नाहींतर विद्यार्थी कंटाळून जाऊन यावरील त्यांची गोडी राहणार नाहीं. नंतर उन्हाचा चटका बसत नाहीं इतकावेळपर्यंत म्हणजे सुमारें तीन तासपर्यंत विद्या-

लयीन शिक्षण व्हावें. हें तात्त्विकच फक्त असावें. नंतर मध्यंतरीं तासभर मोकळिक देऊन एक तासानंतर भोजनाची वेळ असावी. भोजन फार उशीरां करूं नये. भोजनोत्तर दोन तास विश्रांति घेऊन प्रात्यक्षिक शिक्षणास सुरवात करावी. प्रात्यक्षिक शिक्षण हें दुपारीं सावलींत द्यावें. तें सुमारें तीन तास झाल्यावर शिक्षणास सुट्टी द्यावी. या वेळीं विद्यार्थ्यांस दुपारचें खाणें द्यावें. सायंकाळीं संरक्षक शिक्षण व खेळ, फिरणें इ. घ्यावें. रात्रींचींहि जेवणें उशीरां करूं नयेत. भोजनोत्तर अर्ध्या तासानंतर तासभर कांहींतरी सोपे विषय घ्यावेत. आठवड्यांतून एक दिवस करमणूक करावी. हा स्थूलमानानें दिनकार्यक्रम दिला.

## शिक्षणाची मानसिक व बौद्धिक पार्श्वभूमि.

### मुलांचें मन कोरें कीं भरलेलें ?

जन्मास येतेवेळीं मानवी देहाची पूर्तता जगण्यास आवश्यक इतकी झालेली असते तशी पूर्तता जर मनाची व बुद्धीची जन्मतःच झाली असती तर शिक्षणशास्त्र पुष्कळसें कमी झालें असतें. मनुष्याचें मन शैशवांत पूर्णपणें कोरें असतें कीं जन्मतः त्याची प्रवृत्ति गुणावगुणाकडे असते ? कांहीं शास्त्रज्ञ मन कोरें असतें म्हणतात. त्याच्या मनावर जो संस्कार घडेल त्याचे पडसाद त्याच्या मनःपटलावर चटकन् उठतात. ते संस्कार ग्रहण करण्याची शक्ति लहान मुलांच्या मनांत अधिक असते. कारण मनाची पेटी बरीचशी मोकळी असल्यानें बाहेरील नवीन गोष्टी भराभर आंत मावूं शकतात. मोठ्या माणसाचें मन अनंत संस्कार व अनुभव यांनीं भरलेलें असल्यानें नवीन वस्तूंना आंत प्रवेश करणें सुकर नसतें. दुसरें असें कीं लहान मूल स्वतः नवीन उपक्रम करीत नाहीं. दुसऱ्याचें पाहतो तेव्हांच त्यास सुचतें. मन जर प्रथमच भरलेलें असेल तर त्याच्या मनांतून कांहीं तरी स्वतंत्र उपक्रम व्हावयास पाहिजे. पण असें कधीं आढळून येत नाहीं.

### उपजत प्रवृत्ति नैतिक कीं अनैतिक ?—

हें जर खरें मानिलें तर त्याच्याकडून गुणावगुणनिरपेक्ष अशींच कृत्यें घडलीं पाहिजेत. परंतु असेंहि निश्चितपणें दिसून येत नाहीं. आत्मसंरक्षणार्थ करावा

लागणारा मनोव्यापार त्याला स्वतंत्रपणें सुचूं शकतो. अशा प्रसंगीं कसें वागावें याचा मनाला अजून संस्कार झालेला नसला तरी त्याचें त्यावांचून नडत नाहीं, ‘ आतां कोणाचें अनुकरण करूं ? हा धडा मला मिळाला नाहीं.’ म्हणून त्यास कधीं पंचाईत पडली नाही. कांहीं चोरून खाल्ल्यास त्यास जर त्याबद्दल जाब विचारला तर तो ‘ नाहीं ’ म्हणूनच प्रथम खोटें सांगतो आणि बव्हंशीं हेंच होतें. जर त्याचें मन गुणावगुणनिरपेक्ष असें कोरें असेल तर मग अशा वेळीं खरें बोलण्याची प्रवृत्ति एकदांहि कां होऊं नये ? मुलें खरें काय तें सर्वांना सांगून टाकतात हें मान्य आहे पण त्यावेळीं त्यांच्या मनांत कोणतीच भावना नसते. त्यांस काय बोलावें व काय नाहीं हें समजत नसल्यानें कधीं खोटें तर कधीं खरें असें त्यांचें सांगणें असतें. तें अगदीं निर्हेतुक असतें. केवळ दुसरा विचारतो त्याला उत्तर द्यावयाचें एवढेंच त्यास कळत असतें. म्हणून एवढ्यावरून खोट्याप्रमाणें सत्याचीहि त्यास कल्पना असते हें म्हणणें योग्य नव्हे. वर सांगितल्याप्रमाणें जेव्हां तो खोटें बोलतो तेव्हां त्याच्या मनांत आत्मसंरक्षणाचा सबळ हेतु असतो. आणि आत्मसंरक्षण सत्यानें होत नाहीं, खोटें बोललें तरच होईल याची त्याला पूर्णपणें जाणीव असते. म्हणून अशावेळीं मात्र खरें न बोलतां मुद्दाम तो खोटें बोलतो. पापाची जाणीव ही अशाप्रकारें नकळत येते.

म्हणजे खोटें बोलण्याची प्रवृत्ति जशी उपजत व सहेतुक होते तशी सत्याची होत नाहीं. ( असत्य हें साधन म्हणून मुलाकडून वापरलें जातें. त्यामुळें असत्य बोलण्याला मुळांतच विशिष्ट कार्य आहे. त्याचें फळ कल्पनेप्रमाणें तत्काळ मिळूं शकतें. असत्य नडींतून उत्पन्न झालें आहे. सत्याची तशी नड जाणवत नाहीं. आणि कार्यहि असत नाहीं. त्यामुळें असत्याप्रमाणें सत्य सहजस्फूर्त येत नसावें. ) याप्रमाणेंच इतर बाबतींतहि स्वार्थाकरितां नीति सोडून अनितीकडे प्रवृत्ति होते. जन्मतः अनीतीकडेच प्रवृत्ति असते असें म्हणण्याचें कारण—जरी नीति व अनीति या दोनहि वृत्ती मुलाचे ठायीं दिसून आल्या तरी मुलाचा सहजपणें जसा अनीतीकडे कल व त्या अनीतीचा उपयोगहि सहेतुकपणें होतो त्याप्रमाणें नीतीचें नसतें. नीतीला मुद्दाम संस्कार करावे लागतात. अनीतीला त्याची आवश्यकता भासत नाहीं. सहेतुक नैतिक कृत्य संस्काराशिवाय स्वतंत्रपणें मुलास सुचत नाहीं. जर नैतिक कृत्य झालें तर तें सहेतुक होत नाहीं.

मुलाला समजत नसतें म्हणून तें घडतें. अनीति करीत असतां जसा, 'यापासून आपला फायदा आहे. हेंच करावयास पाहिजे.' हा विचार त्याच्या मनांत येतो. तसा नीति करितांना येत नाहीं. नीतीपासून फायदा आहे हें त्यास समजत नाहीं. ( नीतीपासून मिळणारा फायदा बौद्धिक, चिरंतन व दूरचा आहे. लहान मुलाच्या बालबुद्धीस हें अगम्य म्हणून तत्काळ व प्रत्यक्षांत दिसणारा अनीतीपासून मिळणारा फायदा लवकर कळत असावा. ) अज्ञानानें करण्याचा उद्देश नसतां, चुकून एखादें कृत्य त्याच्या हातून घडलें व तें नैतिक निघालें तर त्याचें श्रेय त्या मुलास देऊन त्यानें नीति केली असें कसें म्हणतां येईल ?

स्वार्थाकरितां धडपड–

आपल्या हातांतील खाऊ जवळ बसलेल्या बाळास द्यावा हें शिकवावें लागतें. दुसऱ्याच्या हातांतील खाऊ हिसकून घ्यावा हें शिकविण्याची जरूर पडत नाहीं. दुसऱ्या बाळाला ओरबाडणें—चावणें या क्रिया सहजगत्या घडून येतात. त्याला आपल्याजवळ बसवून घ्यावें, त्याच्यावर हळूवारपणें हात फिरवावा, गोडपणें वागवावें, हें शिकवावें लागतें. आईबापांच्या अडचणी ध्यानांत न घेतां केवळ इच्छित वस्तूकरतां हट्ट धरून आकाशपाताळ एक करावें ही वृत्ति उपजत असते. अडचण आहे, असा हट्ट धरूं नये. हें मुद्दाम सांगावें लागतें. दिसेल ती वस्तु आपल्याला पाहिजे व त्याकरितां वाटेल ती धडपड करावी हें कधीं शिकवावें लागलें आहे काय ?

सारांश, निसर्गनिर्मित अडचणींतून जीवन जगण्याकरितां आवश्यक म्हणून जन्मतःच पापवृत्ति मनुष्यामध्यें ईश्वरानें निर्माण करून ठेविली आहे. म्हणूनच इच्छित साधण्याकरितां आवश्यक लागणारें पापी बुद्धिबल मनुष्यांत आहे. कारण इच्छित वस्तु नीतीपेक्षां अनीतीच्या मार्गानें झटकन् व भौतिकदृष्ट्या समाधानकारक मिळते. यासाठीं लहानपणापासून माणसाची प्रवृत्ति पापाकडे अधिक असते.

पापाचें कारण प्रतिकूल परिस्थिति–

परंतु ही पापप्रवृत्ति आपण होऊन मुद्दाम पुढें सरसावत नाहीं. परिस्थितीमुळें मुलांस पाप करावें लागतें एवढेंच. ( शास्त्रीयदृष्ट्या पाहिल्यास तें पापच नव्हे.

कारण हेतु पापी नसतो, संरक्षणाचा असतो. प्रसंग आला असतां तो निभावण्या-करितां पापमार्गाचा स्वीकार करावा लागतो इतकेंच ). ही परिस्थिति म्हणजे भय निर्माण होणें, भूक लागली असतां खाद्यवस्तु न मिळणें किंवा एखाद्या गोष्टीची इच्छा झाली असतां तिचा अभाव असणें यामुळेंच मुलांचें मन पापाकडे वळतें. इच्छित वस्तु सहज मिळाली तर त्याकरितां करावें लागणारें पाप तो करणार नाहीं. कारण मग त्याची जरूरीच नसते.

मनुष्याच्या मनांत मूलतः कांहींच संस्कार नसतात. मोठेपणीं प्रतीत होणारा त्याचा स्वभाव शैशवांत बीजरूपानें वसत असतो. मूळ बीज कोणत्याहि मनो-वृत्तीचें असलें तरी कालांतरानें संस्कारानें त्याला वरीचशी कलाटणी मिळते. जीवनास प्रतिकूल परिस्थिति येत चालली म्हणजे बीजरूपांत असणाऱ्या स्वभावा-वर निसर्गनिर्मित पापी प्रवृत्तींचा परिणाम होतो. बीजरूप स्वभावाव्यतिरिक्त स्वसंर-क्षणार्थ पापी प्रवृत्तीचाहि उगम जन्मतःच माणसामध्यें होत असतो. पण प्रतिकूल परिस्थितिच येऊं दिली नाहीं म्हणजे पापी वृत्ति लयास जाऊन मूळ स्वभाव तसाच्या तसाच वाढत जातो. कारण पापीवृत्ति हें निसर्गानें दिलेलें एक शस्त्र आहे. मनुष्याचें संकटांतून रक्षण करणें एवढेंच त्याचें काम. मुलाचें मन कोरें असतें, तें अनुभव व संस्कार ह्यांच्या दृष्टीनें. ह्याच कप्प्यांत नवीन गोष्टींचा समावेश होतो.

## प्रतिकूल परिस्थितीचें मानसिक निराकरण शिक्षण–

लहान मुलांना प्रतिकूल परिस्थिति येऊं न देणें हेंच महत्त्वाचें होय. यालाच बालमनसंगोपन म्हणतात. उच्च वातावरण त्याच्याभोंवतीं ठेवावयाचें तें एवढ्या-करितां. यालाच मुलांच्या मनावर चांगले संस्कार करणें म्हणतात. प्रतिकूल परिस्थितीनेंच पापी वृत्ति फोफावून मुलें बिघडतात. ह्याचकरितां लहान मुलांस शिक्षण देणें आवश्यक आहे.

मुलांच्या मनांत भय उत्पन्न झालें म्हणजे त्यांची स्वसंरक्षणार्थ असलेली प्रति-कारिणी वृत्ति बळावते. स्वसंरक्षणाकरितां क्रोध व इतर सुलभ साधनें यांचा त्यांना उपयोग करावा लागतो. वडील माणसें सारखीं कंटाळत असतील किंवा मारीत असतील वा इतर मुलें त्याच्यावर आक्रमण करीत असतील आणि हेंच

सारखें चालत राहिलें तर मुलाची प्रतिकारिणी वृत्ति इतकी वळावत जाते कीं तिचें संरक्षणात्मक रूप जाऊन आक्रमक स्वरूप येत जातें. दुसऱ्याला मारणें, त्याची वस्तु हिसकावून घेणें, तिरसटपणें बोलणें याचीच संवय जडूं लागते. वेळेवर पोटभर खावयास मिळत नसलें म्हणजे चोरून वा मिळेल तेथें, लोकाकडे जाऊन जें तें मागण्याची वाईट संवय लागते. चोरून खाल्ल्यावर त्याला जोरानें दटावलें तर तें स्वसंरक्षणार्थ खोटें बोलेल व अशीच धमकावणी नित्य होत गेली म्हणजे खोटें बोलण्याचीच संवय लागेल. अपराध झाल्यावर दटावूं नये व मारूं तर मुळींच नये. गोडीनें समजावून सांगितलें असतां त्यास भय वाटणार नाहीं. आणि तो भोळेपणानें खरें सांगून टाकतो. खोटें बोलणें ही गोष्टच त्यास माहीत करूं देऊं नये. अशा तऱ्हेनें प्रतिकूल परिस्थिति निर्माण होऊं दिली नाहीं व वाईट संस्कार जडविले नाहींत तर मूल सद्‌गुणी होईल.

बालांचें मानसशास्त्र व शिक्षण–

स्वसंरक्षणार्थ वसत असलेली पापी वृत्ति सोडून दिली तर केवळ मूळचा स्वभाव इतक्या लहान बीजरूपांत असतो कीं त्याचा परिणाम मुलांच्या वागण्यांत दिसून येणें शक्य नाहीं. आपण होऊन प्रत्यक्ष कृतींत उतरण्याइतकें सामर्थ्य त्या बीज-स्वभावांत नसतें. याचाच फायदा घेऊन प्रतिकूल परिस्थिति निर्माण करून पापी वृत्तींना चालना न देतां मूळचें बीज सद्‌गुणी असेल तर त्याची वाढ, आणि दुर्गुणी असेल तर त्याची सुधारणा चांगल्या वातावरणानें, संस्कारानें व शिक्षणानें करावयास पाहिजे. लहान मुलांस मुद्दाम असें शिक्षण वा संस्कार दिले नाहींत तर तीं भोंवतालच्या जगाचें अनुकरण करून ते संस्कार मनावर करून घेतात. तें स्वाभाविक वातावरण जसें असेल त्याप्रमाणें त्याचा स्वभाव बनत जाईल. बीजरूपांतील सत्प्रवृत्ती लयास जातील. दुर्वृत्तींना चालना मिळेल. नाहींतर केवळ दुर्लक्ष केलें म्हणूनच भावी उत्तम नागरिक वाया जातात. कदाचित् याच मुलांत दिव्य-पुरुषाचें सामर्थ्य बीजरूपानें वसण्याचा संभव आहे. आपल्या अडाणीपणामुळें व हलगर्जीपणामुळें अशा भावी थोर विभूतीस आपण मुकतों हें समाजानें ध्यानांत घेऊन शिक्षणाकडे विशेषतः बालकांच्या मनःपोषणाकडे विशेष लक्ष द्यावयास हवें आहे.

दुर्वर्तनाची मीमांसा–

दुर्वर्तनी मुलें सुधारण्याकरतां त्यांच्या दुर्वर्तनाची मीमांसा करणें जरूर आहे. वाईट संवय लागण्याचीं कारणें अनेक असतात. सर्वांना सारखेच उपाय योजून भागणार नाही. तें कधींहि सफल होणें शक्य नाहीं.

पण दुर्वर्तन म्हणजे काय ? चार लोकांनीं शिक्का मारला कीं तें दुर्वर्तन होतें किंवा लोकांत चांगलें गणलें जाऊनहि मनालाच वाईट दिसतें म्हणून दुर्वर्तन होतें ? दुर्वर्तन म्हणजे वाईट वर्तन. परंतु हें वर्तन वाईट कशावर ठरवावयाचें ? पुन्हां, एकदां जें दुर्वर्तन म्हणून चार शिष्टांनीं ठरविलें तें एखाद्याच्या हातून घडलें ( मग तें कोणत्याहि कारणानें कां होईना ) म्हणजे लगेच तो मुलगा खरोखर दुर्वर्तनी होतो का ?

लोकमतानें म्हटलेलें सारेच लोक दुर्वर्तनी नसतात.

बहुधा समाजांत दुर्वर्तनी म्हणून जे लोक गणले जातात त्याचें मूळ शेवटीं दिलेल्या कारणांतच आहे. चुकून वा परिस्थितीचा नाईलाज होतो म्हणून घडलेलें वाईट वर्तन त्या मुलाला लगेच दुर्वर्तनी ठरवितें हा समाजाचा दोष आहे. त्यामुळें पुष्कळ वेळां चांगलीं मुलें वाळींत टाकलीं जाऊन जन्माचीं वाईट बनतात. पण त्यांची फिकीर समाज करीत नाहीं. समाजांतील प्रत्येक व्यक्ति आपल्या नीतीपेक्षां आपल्या अब्रूलाच जास्त जपत असते. अब्रू राखून अनीति साधली तर व्यक्ति खुशाल साधून घेते. पण दुसऱ्यामुळें स्वतःची अब्रू जाईल म्हणून चुकून वा परिस्थितीनें मनाच्या विरुद्ध अनीति कराव्या लागणाऱ्या माणसाला ते लोक तुच्छतेनें दूर लोटीत असतात. दुर्वर्तनी म्हणून समजल्या गेलेल्या लोकांत अशाच वाळींत टाकलेल्या बिचाऱ्यांचा भरणा अधिक असतो.

'दुर्वर्तन्यां 'चा वर्तनपालट–

अशा लोकांना सन्मार्गावर आणणें सोपें असतें. कारण त्यांचं मन शुद्ध असतें. फक्त लोकांनींच वाईट म्हटल्यानें त्याला वाईट कृत्यें करावीं लागतात. एकदां याची संवय लागली म्हणजे समाजांतील कुलीनतेवर, सभ्यपणावर व सज्जनतेवरील त्यांचा विश्वास उडून जातो. त्यांना मायेची पाखर मिळत नाहीं. सहानु-

भूतीचा शब्द नाहीं आणि निवाऱ्याला आसरा नाहीं, अशी त्यांची स्थिति होते. अशा वेळीं त्यांनीं समाजाची काय म्हणून कदर करावी ? या सर्व कल्पना गुरूनें परत त्यांच्या मनांत आणून द्यावयाच्या असतात. ही सद्विचारांची स्थापना त्यांना नीतीचे कोरडे धडे देऊन जमणार नाहीं. एकच करावयास पाहिजे तें म्हणजे आपण स्वतः सद्वर्तनी राहून त्या लोकांस आपल्यांत घेऊन अत्यंत ममतेनें वागविलें पाहिजे. आणि स्वतःच्या वर्तनानें जगांत आदरणीय वस्तु असूं शकते हें त्यांस पटवून दिलें पाहिजे. मुलांच्या पहिल्या दुष्ट अनुभवावर हे विरुद्ध अनुभव आले तर त्यांच्या मनाची खात्री पटून मनःपालट होण्यास वेळ लागणार नाहीं.

दुर्वर्तन कीं दुर्वृत्ति ?–

पण खरें दुर्वर्तन म्हणजे काय ? तें तसें केव्हां म्हणतां येईल ? वास्तविक दुर्वर्तन हा शब्दप्रयोगच चूक आहे. दुर्वृत्ति म्हणावें किंवा कुप्रवृत्ति म्हणावें. कारण, वाईटपणा कृत्यांत नसून कृत्यामागील हेतूंत म्हणजे मनाच्या प्रवृत्तींत आहे. आमच्या समाजांत मुलांनीं विडी ओढणें हें वाईट समजलें गेलें आहे. विडी ओढणारा मुलगा वाह्यात झाला असें समजतात. पण पाश्चात्य देशांत अठराव्या वर्षानंतर सर्वच मुलें सर्रासपणें विड्या ओढावयास लागतात; तथापि त्या देशांत हीं मुलें अनीतिमान गणलीं जात नाहींत याचें कारण काय ? विडी ओढणें हें पाप नव्हे. ज्या भावनेनें विडी ओढली ती भावना पापी आहे. आपल्याकडे विडी ओढणें वाईट समजल्यानें मुलास जेव्हां विडी ओढावीशी वाटते त्यावेळीं त्याच्या मनांत मोहाव्यतिरिक्त आपण वाईट कृत्यें करीत असतों ही एक आतूर जाणीव असते. आपण करतों हें पाप आहे हें त्याला समजत असतें. पण मोहानें त्याचें तो समर्थन करूं लागतो. गोष्ट वाईट आहे म्हणूनच ती त्याला चोरून करावी लागते. शिक्षेची भीति ही खरी भीति नव्हे. ज्याच्या मनाला विडी ओढणें हें चांगलें आहे—वाईट नाहीं असें पूर्णपणें पटलेलें असतें तो सर्वांदेखत विडी ओढण्यास कमी करणार नाहीं. तितकें मनोधैर्य नसल्यास निदान आपलें स्वतंत्र मत धिटाईचें प्रतिपादन करील. वस्तूला चांगलेपणा वा वाईटपणा हा मनुष्यानें आपल्या सोयीप्रमाणें लावलेला आहे. मुळांत वस्तु सदसत्‌निरपेक्ष असते. म्हणून पाश्चात्य देशांत विडी ओढणें त्यांच्या सोयीप्रमाणें चांगलें समजलें

गेल्यामुळें मुलाला विडी ओढतांना आपण पाप करतों ही धागधूग मनांत नसते. दुसरें असें कीं, जें कृत्य आपण प्रथम करतों तें ज्या प्रतीचें समजलें गेलें असेल त्या विशिष्ट वातावरणामुळें त्याच प्रतीचें दुसरें कृत्य करण्यास मनाची प्रवृत्ति होत असते. आपल्याकडे विडी ओढणें हें वाईट समजल्यामुळें एकदां चोरून विडी ओढली कीं त्या प्रतीचीं म्हणजेच वाईट समजलीं गेलेलीं दुसरीं कृत्यें करण्यास मनुष्याचें मन धांव घेतें. त्यामुळें एकदां चोरून ओढलेल्या विडीवर हें थांबत नाहीं. आणि त्या मुलाची पुढील कृत्यें पापी होतात. उलटपक्षीं पाश्चात्य मुलाला विडी ओढतांना पापाची भावना नसल्यामुळें व विडी ओढणें हें चांगलें समजलें गेल्यामुळें त्या मुलाची प्रवृत्ति आमच्याकडील मुलाप्रमाणें पापी कृत्यांकडे न वळतां त्या विडी ओढण्याचा परिणाम मुलगा सद्वर्तनी राहण्याकडे होतो. आमच्याकडे विडी ओढतांना सत्प्रवृत्ति नसते; त्यांच्याकडे ती असते हा फरक.

दुर्वर्तन वर्तनांत नाहीं वृत्तींत आहे–

म्हणजे दुर्वर्तन हें त्या वर्तनांत नसून त्यामागील वृत्तींत आहे हें सिद्ध होतें. यास्तव मुलाला दुर्वर्तनी ठरवितांना त्या वर्तनावर भर न देतां त्याची सर्वसाधारण प्रवृत्ति कोणत्या प्रकारची आहे ती पाहावी. गोष्ट एकच असली तरी ती करण्याचे हेतु भिन्न असूं शकतात. प्रवृत्तीच वाईट असून सहेतुकपणें वाईट वासनेनें कृत्य झालेलें असल्यास त्या माणसाला दुर्वर्तनी म्हणावें. कारण तें कृत्य करण्यामागें त्याच्या मनःप्रवृत्तीचा इतिहास वाईट असतो. आणि एक दुष्कृत्य केल्यावर आणखीं दुष्कृत्यें करण्याकरितां पहिल्या कृत्याच्या समाधानाचें उत्तेजन मिळत असतें. असा मनुष्य लवकर सुधारण्याची आशा नसते. उलटपक्षीं ज्याच्या हातून चुकून वा परिस्थितीमुळें दुष्कृत्य झालें आहे त्याची मनोभूमिकाहि कांहीं वेळ चांगली असूं शकते. शिवाय दुष्कृत्य झाल्यावर केलेल्याचा पश्चात्ताप होऊन मनाला सारखी टोचणी लागते. व पुन्हां असलें कृत्य होऊं नये अशी त्याची प्रवृत्ति बनते. अशा तऱ्हेचा मनुष्य दुसऱ्याच्या क्षमेची मनांत याचना करीत असतो. दुसऱ्यानें आपणांस संभाळून घ्यावें. झालेलें विसरून जावें अशी त्याची प्रामाणिक इच्छा असूं शकते. परंतु ही भावना गुप्त असते एवढेंच. म्हणजे तो सुधारण्याच्या मार्गाची इच्छा करीत असतो. याच्या हातून, याला संभाळून घेतल्यास पुन्हां दुष्कृत्य सहेतुकपणें होण्याची शक्यता नसते. पण आपला समाज

चमत्कारिकच आहे.अशा माणसाला तो झिडकारून देत असतो. आणि अनीति करून श्रीमंतीच्या वा प्रतिष्ठेच्या नांवाखालीं तें पाप झांकून टाकणाऱ्या भोंदूंना तो जवळ करीत असतो. त्यांचीं दुष्कृत्यें तो विसरण्यास एका पायावर तयार असतो.

दुर्वर्तनाम कुसंगति हें एक कारण–

यानंतर वाईट संगतीमुळें मुलें दुर्वर्तनी बनतात. त्यांची अनीति ही बहुधा उसनी असते; जातिवंत नसते. मूळ स्वभावबीज चांगलें असेल परंतु वाईट संगतीच्या संस्कारामुळें मनाचा कल त्या बाजूला अधिक झुकलेला असतो. या मुलांस सद्वर्तनाची चवच माहित नसते. त्याचे संस्कारच त्यांच्या मनावर कधीं झालेले नसण्याची शक्यता आहे. त्यामुळें सत्संगति लागतांच तिचा परिणाम त्यांच्या मनावर झटकन् होतो. त्यांच्या वृत्तींना एकदम नवीन दिशा दिसूं लागते. व या नव्या वृत्तीचें त्यांना एक प्रकारें कुतूहल वाटत असतें. अशांना सत्संगतीचीच आवश्यकता अधिक असते. त्यांना आजपर्यंत कोणी मार्गदर्शक भेटलेला नसतो. सारा जन्म एकाच वाईट वातावरणांत गेलेला असतो.

दुसरें कारण जातिवन्त दुर्वृत्ति–

दुर्वर्तनी मुलांचा शेवटला व सर्वांत वाईट प्रकार म्हणजे हीं मुलें जातिवंत दुष्ट असतात. त्यांचें मूळ स्वभावबीज वाईट प्रवृत्तीचेंच असतें. अशा मुलांचे पाय लहानपणींच पाळण्यांत दिसत असतात. तान्हेपणीं कोणत्याहि प्रकारचा वाईट संस्कार नसतांहि त्यांच्या डोळ्यांतून त्यांच्या दुरात्म्याचें प्रतिबिंब दिसत असतें. त्यांचा खेळ, दुसऱ्या माणसाशीं वागण्याची पद्धति व साध्या बोलण्याओरडण्यांतहि एक प्रकारची निराळी ढब दिसून येते. अशा तऱ्हेचीं मुलें जे अनेक प्रकारचे त्यांच्या मनावर संस्कार घडतात त्यांपैकीं वाईट संस्कार ग्रहण लवकर करतात. वाईट गोष्टी ऐकण्याचा व पाहण्याचा नाद लागतो. त्याच गोष्टींत त्यांचें मन रमतें. अशा स्वभावाला अनुकूल वातावरण मिळालें तर ती पुढील आयुष्यांत दुराचरणाचा पुतळा बनतात. पण उच्च वातावरणांत चांगल्या संगतींत बालपण गेलें तर केवळ व्यवहार, प्रतिष्ठेचें दडपण इ. गोष्टींनीं त्यांचा स्वभाव उघडपणें प्रतीत होणार नाहीं. पण त्यांच्या प्रत्येक कृत्यांत तो आंतून व्यक्त झाल्याशिवाय राहणार नाहीं. पुष्कळ वेळां प्रसिद्धीस आलेले मोठेमोठे लोक

वा संस्थानिक हे दुराचरणी व क्रूर दिसतात व स्वभावानें 'सुशिक्षित क्रूरपणा' धारण केलेला असतो. ते लोक मूळ याच वर्गांतील होत. परंतु केवळ उच्च वातावरण, उच्च शिक्षण व सोनेरी संधि यामुळें त्यांचा मूळ स्वभाव प्रकट होत नाहीं. पण त्यांच्या जीवनांत तो सूक्ष्मपणें प्रतिबिंबित झाल्याशिवाय मात्र राहत नाहीं.

आदराचें उदात्तीकरण–

मनुष्य जितका रानटी वृत्तीचा असतो तितकी त्याच्या मनांत आदर ही भावना अधिक असते. दरवडेखोरांच्या टोळी नायकाला जिवास जीव देणारे अनुयायी भेटतात व आपल्या सुशिक्षित पुढाऱ्यांस अशा अनुयायांचीच वाण पडते. याचें कारण हेंच आहे. मनुष्य जितका सुशिक्षित बनत जातो तितका त्याच्या भावनेचा जोर कमी कमी होत जातो. दुष्टपणा हा रानटीपणाच आहे. त्यांच्यांत 'आदर' ही भावना निःसंशय असते. पण तिचे अडाणीपणामुळें उदात्तीकरण झालेलें नसतें; तेंच व्हावयास हवें आहे. व तीच उणीव आहे.

मूळ वृत्तीला वळण–

पूर्वी सांगितलेल्या जातिवंत दुर्जनांची 'आदर' भावना उदात्तीकरण करून तिचा उपयोग योग्य मार्गानें करून घेतला पाहिजे. म्हणजे मग अनुकरण पद्धतीनें त्यांना हळू हळू सन्मार्गाला लावितां येईल. पण याहिपेक्षां उत्तम मार्ग म्हणजे मूल तान्हें असतांच त्याच्या हावभावावरून त्याची वृत्ति ओळखून त्याप्रमाणें त्याला प्रथमच काळजीपूर्वक निराळें शिक्षण देणें आवश्यक आहे.

भिन्न स्वभावबीजें व त्यांवर होणारे संस्कार–

शिक्षणानें मागाहून सद्गुण प्राप्त होत असले तरी त्यांचें बीज कांहीं वेळां लहान मुलांत प्रथमतःच दडून बसलेलें असतें. प्रत्येकाच्या मनाचा कल, आवड कर्तृत्वाचें क्षेत्र हीं जन्मतःच मनांत निर्माण होत असतात. कोणत्याहि प्रकारचा अडथळा न करतां, बंधन न ठेवतां लहान मुलांस सर्वत्र हिंडण्याची, खेळण्याची पूर्णपणें मुभा दिली तर अनेक साधनें जवळ असूनहि विशिष्ट मुलांचा ओढा विशिष्ट

गोष्टींकडेच अधिक लागतो. आपणांस पाहिजे असलेला खेळ इतर सर्व खेळ बाजूस सारून त्याकडेच तो धांव घेतो. त्याच विशिष्ट खेळांत वा वस्तूंत त्याचें मन रमून जातें. एखादें तान्हें मूल लहान मुलाजवळ दिलें व त्यास सर्व प्रकारची मोकळीक दिली तर प्रत्येक मुलाची त्या बाळास वागविण्याची पद्धति वेगळी असते. कोणी त्याला ओरबाडील, चिमटे घेईल वा त्याच्या अंगावर ओरडेल तर कोणीं त्याला हळूच हात लावील व प्रश्नार्थक मुद्रेनें हुंकार देईल, तर आणखी कांहीं मुलें त्याला बघूनच भिऊन रडूं लागतील. दुसरा मोठा मनुष्य त्याच्या-जवळ कांहीं बोलावयास गेला वा त्यानें त्यास कांहीं विचारलें किंवा त्याच्याजवळील वस्तु मागितली तर प्रत्येक मुलाची वागणूक यावेळीं निराळी असते. कोणी उद्धटपणें उडवून लावील तर कोणी गोड बोलेल. एखादीं मुलें आपल्याजवळील वस्तु दुसऱ्यानें मागितली असतां चटकन् देतील किंवा कोणी ती वस्तु दुसऱ्यास न देतां त्यानें घेऊं नये म्हणून लपवून ठेवतील. या सर्व प्रकारच्या वागणुकींत फरक दिसून येतो तो अप्रत्यक्ष व प्रत्यक्षपणें घडलेल्या संस्कारामुळें असला तरी मुलांच्या मनावर सर्व प्रकारचे संस्कार घडत असतात.. कोणताहि संस्कार हेतुपुरस्सर नसतो. असें असतां विशिष्ट संस्काराचेंच ग्रहण मुलांकडून होतें; तें कां ? मूळ बीज ज्या स्वभावाचें असेल त्या प्रकारचे संस्कार तो ग्रहण करीत असतो. एकाच जमिनींत शेजारी शेजारी लिंबूचें व चिकूचें अशीं झाडें लाविलीं तर दोन झाडांना दोन निरनिराळ्या रुचींचीं फळें येतात. एकाच जमिनींत अनेक प्रकारचे क्षार असतात. परंतु चिकूचें झाड आपणांस आवश्यक तेच क्षार उचलतें व लिंबाच्या झाडाचेंहि असेंच असतें. ही निवड करण्याची तऱ्हा—यांतच त्या झाडाचा विशिष्ट स्वभाव दिसून येतो. मुलाचे मनावर अनेक प्रकारचे संस्कार केले तरी त्याच्या स्वभावबीजास पोषक व अनुकूल असेच संस्कार त्याच्या मनावर प्रथम व अधिक परिणाम करूं शकतात. म्हणून वर सांगितलेला वागणुकींतील फरक संस्कारामुळें नसून त्याचें श्रेय मूळ स्वभाव–बीजा-लाच दिलें पाहिजे.

शिक्षणाचें मूळ–

लहान मुलांच्या मनाचा हा विशिष्ट गुणधर्म लक्षांत घेऊनच शिक्षणाचें तंत्र बसवावयास पाहिजे आहे. वस्तुतः शिक्षणाचा प्रारंभ सहाव्या वर्षीं शाळेंत

घातल्यापासून होत नसून मूल जन्मल्याबरोबरच त्याचें शिक्षण सुरू होतें. शिक्षण देतांनाहि मुलांच्या मनाला विशिष्ट प्रकारचे निरनिराळे कल असतात हें लक्षांत घेतलें पाहिजे. प्रत्येक मुलास त्याच्या कलाप्रमाणें वेगळें शिक्षण देणें जरूर आहे. अगदीं बालपणांत मुलाची प्रवृत्ति कोणीकडे आहे तें समजावून घेतलें पाहिजे व त्याप्रमाणें त्यास वाव दिला पाहिजे.

बुद्धीला संस्कारांची आवश्यकता–

बुद्धीच्या मोत्याला संस्काररूपी सोन्याचें वेष्टण असल्याशिवाय तिचें तेज पडत नाहीं. स्वयंभू बुद्धिमत्तेस वाव देऊन तिची लहानपणींच जोपासना केली गेली तर या अंकुराचा पुढें वटवृक्षासारखा उपयुक्त होणारा प्रचंड विस्तार होईल. नाहीं तर ती बुद्धि उन्हाळ्यांत सुकून गेलेल्या झुडपाप्रमाणें शुष्क आणि खुरटलेलीच राहील किंवा तिची वाढ झालीच तर लहान लहान झाडांवर सावट आणून त्यांना मारून टाकणाऱ्या एखाद्या फोफावलेल्या वृक्षाप्रमाणें ती लोकांस अपायकारक होईल. खुरटलेली बुद्धि लहानशा चांदणीप्रमाणें दुसऱ्याचें मन कधीं आकर्षून घेत नाहीं. चांदण्यांत चकाकत असणाऱ्या झाडावरील एखाद्या पानाप्रमाणें खुरटलेली बुद्धि आपल्या मिणमिण तेजानें दुसऱ्यांना दिपवूं शकत नाहीं. ती आपल्यापरीनें चकाकत असते, पण लोक त्यांनीं चकित होत नाहींत. ती बुद्धि आपलें डोकें वर काढण्याचा वेळोवेळीं प्रयत्न करते, पण कुचंबणा आणि पहिल्यापासून पुरेसें खाद्य न मिळाल्यामुळें दुसऱ्याचें कठिण हृत्पटल छेदून आंत शिरण्याइतकें तिच्यांत सामर्थ्य राहिलेलें नसतें.

त्रिगुणात्मक बुद्धीचें मापन–

बुद्धि म्हणजे काय ? आणि तिचें मापन कसें करावयाचें ? स्मरणशक्ति, धारणाशक्ति ( Grasping power ), आणि कल्पनाशक्ति ( Imagination) ह्या त्रिगुणात्मक शक्ती बुद्धींत सांठविलेल्या आहेत.

स्मरणशक्ति–

स्मरणशक्ति दांडगी असणें हें एक बुद्धिमत्तेचें लक्षण आहे. कांहीं विशिष्ट सीमेपर्यंत स्मरणशक्ति ही प्रत्येक मनुष्यांत सारखी आहे. ही सीमारेषा म्हणजे मनु-

घ्याची खूण असें समजण्यास हरकत नाहीं. या सीमेच्या खालीं उभे राहणारे लोक सर्वसाधारण माणसांत जमा धरावयाचे नाहींत. सीमोल्लंघन करणारे ते असामान्य प्रतीचे आणि या लोकांतच अनुक्रम लावावयाचे. स्मरणशक्ति व्यासंगानें वाढवितां येते. मग असल्या मुद्दाम वाढविलेल्या स्मरणशक्तींत क्रम तो कसला लावावयाचा ? मूळांत शक्ति किती होती तें कसें कळणार ? पुष्कळांची स्मरणशक्ति अशीच वाढलेली असते. असे दहा लोक घेतले व त्यांनीं व्यासंगानें आपली स्मरणशक्ति वाढविली तर त्यांत अनुक्रम कसे लागणार ? कीं व्यासंगापूर्वी ज्याची स्मरणशक्ति चांगली होती तो पहिला ? पण तरी सुद्धां रोजच्या व्यवहारांत नकळत कमीअधिक प्रमाणांत व्यासंग हा घडलेलाच असतो. किंवा ज्याला अभ्यास कमी करावा लागला तो पहिला ? म्हणजे स्मरणशक्तीचें मापन व्यासंगावर कीं जन्मजात ईश्वरी देणगीवर ? कोणत्याहि गुणाचें मापन निसर्गदत्त देणगी आणि मानवी प्रयत्न या दोहोंवरच झालें पाहिजे. मानवी प्रयत्नानें वाढविलेली शक्ति ही मूळांत नसलेली ओढून आणली म्हणून जरा कमी प्रतीची वाटली तरी त्यांत व्यक्तीची गुणलालसा दिसून येते. ह्या गुणांचें श्रेय त्या प्रयत्नांना म्हणजे त्या व्यक्तीला आहे. ईश्वरी देणगीनें एखादा दोष जन्मजात असला तर त्यांत त्या व्यक्तीचा अपराध नाहीं. त्याप्रमाणें जन्मजात असलेल्या गुणांचें श्रेय व्यक्तीकडे जात नाहीं.

धारणाशक्ति–

बुद्धिमत्तेचें दुसरें अंग धारणाशक्ति. स्मरणशक्ति मनुष्येतर प्राण्यांतहि कांहीं विशिष्ट प्रमाणांत दिसून येते. तर धारणाशक्ति कांहीं अपवाद म्हणून सोडले तर इतर प्राण्यांत तितकीशी आढळून येत नाहीं. नवीन संशोधनांतून गाढव व हत्ती या प्राण्यांना धारणाशक्तिहि चांगली असते, असें आतां सिद्ध झालें आहे. एखादी नवीन गुंतागुंतीची गोष्ट—गणित वा अवघड वस्तु आपण होऊन समजावून घेणें किंवा दुसऱ्यानें समजावून देऊन ती चटकन् ध्यानांत येणें याला धारणाशक्ति म्हणतां येईल. हें ध्यानांत येणें मनुष्याला समज ( Understanding ) असेल त्यावर अवलंबून असते. जनावरांस समज ( Understanding ) कमी जवळ जवळ नाहींच म्हणून त्यांना नवीन गोष्ट समजावून देतां येत नाहीं. एखादी नवीन गोष्ट घडवून घेतल्यानें त्यांच्याकडून ती केली जाते. म्हणजे त्यांच्याकडून बौद्धिक ( Intellectual Work ) कार्य न घडतां परिश्रम

( labour ) किंवा यांत्रिक ( mechanical ) पद्धतीनें काम केलें जातें. मनुष्यांतहि थोडयाफार प्रमाणांत असेंच चालतें. उदा० गणितांतील एक अवघड उदहरण आहे. तें ज्याला एकदां-दोनदां सांगून समजेल त्याची धारणाशक्ति उत्तम. ४।५ वेळां सांगून समजेल तो मध्यम. पण इतके वेळां समजावून देऊन यासारखीं इतर बरींच उदाहरणें घेतलीं म्हणजे मग ज्याला हें उदाहरण स्पष्ट होतें तो कनिष्ठ. आणि तरीहि ज्याला याचा गंध नाहीं परंतु जो घोटून घोटून तंतोतंत त्या जातीचीं शेकडों उदाहरणें करून घेऊन मग हें उदाहरण यंत्राप्रमाणें सोडवूं शकतो अशा माणसाला यांत्रिक ( Mechanical ) म्हणूं. हे असे क्रम लावतां येतात ह्याचें कारण सर्वांना सारखी समज नसते. एखादा कठीण विषय आपण नीट समजावून देतों याचा अर्थ त्या मनुष्यास प्रत्यक्ष विषयासंबंधींची बाह्य ओळख करून देऊन, प्रथम बाहेरील तत्सम उदाहरणें देऊन, नंतर हळूहळू प्रस्तुत विषयाचें वातावरण निर्माण करतों. इतक्या स्थितींत तो आल्यावर त्यास नित्याच्या व्यवहारांतील सोपीं उदाहरणें देऊन सावकाशपणें नियोजित विषयाच्या जवळ जवळ नेतों व शेवटीं त्यास समजेल असा वर्णिलेला विषय व प्रस्तुत विषय यांत साम्य दाखविल्यावर प्रथम कठीण वाटणारा विषय त्यास पटकन् समजतो. ही एवढी खटपट कशाकरितां, तर त्याची प्रस्तुत विषयासंबंधींची समज वाढावी म्हणून. समजावून देणें याचा अर्थ समज वाढविणें. योग्य ती समज आल्यावर विषय कळण्यास कठीण जात नाहीं. जगाचा अधिक अधिक अनुभव आणि सामान्य व्यवहार मनुष्याला कळूं लागला म्हणजे आपोआपच त्याचें व्यवहारज्ञान वाढून शिवाय ‘ समज ’हि ( Understanding power ) वृद्धिंगत झालेली असते. ज्या प्रमाणांत समज वाढलेली असेल त्या प्रमाणांत धारणाशक्तिहि थोडीफार वाढते. अशा तऱ्हेनें धारणाशक्ति ( Grasping power ) कांहीं विशिष्ट प्रयत्नांनीं, स्मरणशक्ति इतकी नसली तरी, कांहीं थोडयाफार प्रमाणांत वाढवितां येईल.

अगदीं लहानपणासून ज्यांना विशिष्ट पद्धतीनें शिक्षण ( training ) मिळालेलें आहे, त्यांची धारणाशक्ति वयानुपरत्वें वाढत जाऊन मोठेपणीं तलख राहते. परंतु ज्यांना असें शिक्षण मिळालेलें नाहीं, उलटपक्षीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें ज्यांच्या बुद्धीला दाबून टाकण्याचा प्रयत्न झालेला असतो, म्हणजे चार माणसें एकत्र बसलीं

असतां तेथें किंवा नवख्या माणसाजवळ मोकळेपणानें बोलणार नाहीं; अनेक प्रश्न विचारणार नाहीं, किंबहुना तो अशा ठिकाणीं येण्यास धजणार नाहीं व गरीब मुद्रेनें वावरून दूर जाऊन बसेल, जिज्ञासा दाबली जाईल, तुच्छ लेखला जाईल अशा तऱ्हेची वागणूक ( treatment ) त्यांना घरच्या मत्सरामुळें व इतर कारणास्तव भोंवतालील माणसांकडून मिळते आणि जन्मजात प्रवृत्तींना दडपून टाकून मुलांच्या मनांत हीनगंड निर्माण केला जातो अशा बालकांची बुद्धि ( स्मरण, धारणा व कल्पना ) ही वर सांगितल्याप्रमाणें खुरटलेली राहते. त्यांचा चेहरा निरुत्साही, बावळट व निस्तेज होतो; कीं ज्यामुळें विनाकारणच तो लोकांकडून उपेक्षिला जातो.

कल्पना–

बुद्धीचें तिसरें अंग कल्पना. कल्पना करणें म्हणजे सध्यां अस्तित्वांत नाहीं ती वस्तु मनामध्यें चितारणें, अनुमान काढणें म्हणजे कल्पना करणेंच होय. एखाद्या वस्तुस्थितीवर पायरीपायरीनें जाऊन पहिल्या अवस्थेनंतर लगेच दुसरी शक्य कोटींतील कोणती अवस्था येईल तिचें मनांत चितरण करणें यालाच आपण अनुमान करणें असें म्हणतों. मनुष्येतर प्राण्यांना कल्पनाशक्ति फारच थोड्या प्रमाणांत असते. कुत्र्यासारख्या कांहीं विशिष्ट प्राण्यांना मात्र अनुमानें काढतां येतात. अनुमान काढतांना कल्पनेला भूमीवरील पाय सरून चालत नाहीं. नवीन येणारी कल्पनेची पायरी ही सत्यसृष्टींत शक्य आहे हें गृहीत असतें. केवळ कल्पनाविलासाला हें बंधन आवश्यक नसतें. अनुमानाची पहिली पायरी डोळ्यासमोरील एक वस्तुस्थिति असते. त्यावर पुढील मनोरे बांधले जातात. कल्पनाविलासाचा पाया बहुधा काल्पनिकच असतो. फार तर ‘ हें सत्यसृष्टींत उतरूं शकेल ’ अशी मनाची समजूत असूं शकेल.

अनुमानपद्धतींतील सत्यसृष्टींत उतरणाऱ्या पायऱ्या क्रमाक्रमानें प्रत्यक्षांत दाखविल्या, अशा तऱ्हेनें अनेक अनुमानांचें प्रात्यक्षिक डोळ्यांखालून गेलें म्हणजे कोणत्याहि प्रकारच्या अनुमानांत पाठीमागें शक्य कोटीचा एकच धागा असतो आणि प्रत्येक वेळेस त्याचा आधार कसा घ्यावयाचा हें कळून येईल. याच्याच पारायणानें अनुमानशक्ति वाढवितां येणें शक्य आहे. किंवा कल्पनाशक्ति वाढविण्यास असें करावें : एक वस्तुस्थिति घ्यावी. तिच्यावर काय वाटेल तें मनांत आणण्यास

सांगावें. तें सर्व टिपून ठेवावें. असा अभ्यास चालू ठेवावा. त्या वस्तूवर मनांत काय येईल तें वरळण्यास मोकळीक द्यावी. म्हणजे मेंदूच्या घोड्याला कल्पनेच्या मैदानांत किती फिरूं, कोठें फिरूं, कोठें बागडूं असें झालें पाहिजे. यामुळें त्याची प्रथम केव्हां कुचंबणा झालेली असेल ती पार नष्ट होईल. सैरावैरा धावण्यास त्याचें मन उत्साहपूर्ण होईल. एकदां कुचंबणेची लगाम सुटली म्हणजे मेंदूचा घोडा चारहि खुरांवर मनसोक्त धावूं शकतो. इतकी स्थिति प्राप्त झाली म्हणजे त्यास झांपडें लावून वळण देण्याचें काम शिक्षकाचें राहतें. अशानें कल्पनाशक्तिहि वाढविण्यास हरकत दिसत नाहीं.

कोणत्याहि कलेला किंवा विद्येला कल्पनाशक्ति अत्यावश्यक आहे. गणितांतील एकादें उदाहरण सोडवावयाचें झाल्यास त्यास कोणती रीत उपयोगी पडेल हें अनुमानानेंच ताडावें लागतें. वैज्ञानिक संशोधनांत तर प्रथम कल्पना व अनुमानें काढावीं लागतात. कवि तर जणूं कल्पनेवरच जगतो. चित्रकारासहि आपली कल्पनाशक्ति लढविल्याशिवाय पुष्कळ वेळां चालत नाहीं. एवढेंच काय पण व्यवहारांतहि ज्याला अनुमान काढतां येत नाहीं तो मनुष्य निकामी ठरतो.

प्रत्येक ठिकाणीं मूळाशीं कल्पनाशक्ति आहे. कल्पनाशक्ति असणें हें एक मेंदूचें वैशिष्ट्य आहे. नुसत्या एकसारख्या थापा मारणें यालासुद्धां कल्पनेची भरारी असावी लागते. थापा मारणें चांगलें कीं वाईट हा प्रश्न निराळा. ज्याला बुद्धिमत्ता आहे त्यालाच थापांवर थापा मारणें जमेल. वाटेल त्याला हें साधावयाचें नाहीं.

बुद्धि आणि तिचें कार्यक्षेत्र–

मनुष्य वाटेल त्या क्षेत्रांत असो, तो जर त्यांत प्रवीण असेल तर तो बुद्धिमानच समजला पाहिजे. त्याचें कार्यक्षेत्र हलक्या दर्जाचें असेल तर तो दोष बुद्धीचा नसून त्याच्या मनःप्रवृत्तीचा आहे. आणि मनःप्रवृत्तिहि भोंवतालच्या परिस्थितीवर, संस्कारावर अवलंबून आहे. लहानपणीं बुद्धि लहान रोपट्याप्रमाणें असते. रोपट्यास ज्या दिशेकडे वळवाल त्या दिशेकडे तें वांकेल व तसेंच बांधून ठेविलें तर जन्मभर तें तसेंच वांकडें राहील. बुद्धीला ज्या दिशेनें कल द्याल त्या दिशेला ती कलेल. गणितांतील साधी बेरीजवजाबाकी सुद्धां एकादा कवि चिनचूक करील

याची खात्री देतां येणार नाहीं. पण हेंहि तितकेंच खरें कीं, रोज दिसणाऱ्या साध्या प्रसंगांतून हृदयांची उलथापालथ करणारें कल्पनारम्य काव्य—नव्हे-सार्वेच वर्णन गणिती करील याची आशा कोणीं केली नाहीं. ज्या रंगांनीं आपण इतकीं सुंदर चित्रें काढतों, ते रंग कसे तयार केले आहेत याचा चित्रकारास गंधहि नसेल तर बाटल्याबाटल्यांतून शेकडों द्रव्यांची ओनाओत करून क्षणाक्षणाला त्याचे रंग बदलून दाखविणाऱ्या रसायनशास्त्रज्ञालाहि आपण तयार केलेल्या रंगांनीं इतकीं सुंदर चित्रें काढतां येतात हें कदाचित् माहीत नसेल !

बुद्धिमत्तेचें मापन–

सामान्यतः व्यवहारांत वर सांगितलेल्या त्रिगुणात्मक बुद्धीचें मापन योग्य तऱ्हेनें केलेलें आढळून येत नाहीं. लहान मुलांच्या बाबतींत हा अनुभव प्रामुख्यानें जाणवतो. तथापि त्याला व्यावहारिक कारणेंहि तशींच असतात. बुद्धीचा परीक्षा बरोबर करितां न आल्यामुळें पुष्कळ मुलांचें अर्थात् पर्यायानें प्रौढ व्यक्तींचें नुकसान होतें. याला जबाबदार समाजांतील रूढिजन्य खुळया कल्पना आणि परस्परांतील गुप्त वा व्यक्त मत्सरभाव. याहून तिसरें निराळें कारण म्हणजे परि. स्थितिजन्य बौद्धिक संकोच. बुद्धिमत्तेचें त्रिवार पृथक्करण करून निरनिराळें विवरण करण्यांत उद्देश आहे. एखाद्याची बुद्धि रोजच्या व्यवहारांतून मोजली जाते तें चूक असून प्रयत्न केल्यास निर्बुद्ध समजला गेलेला मनुष्यसुद्धां सुबुद्ध होऊं शकतो. व्यवसायावरून पुष्कळ वेळां एखाद्याच्या बुद्धीची किंमत करतात तेंहि अयोग्य आहे. हीन व्यवसाय हा त्याचा दोष नसून परिस्थितीचा आहे. वाह्यात समजलीं जाणारीं मुलें पुष्कळ वेळां बुद्धिमान असून त्यांच्यावर फक्त संस्कारांची आवश्यकता असते.

लहान मुलांच्या बुद्धिमत्तेचीं भिन्न कार्यक्षेत्रें–

कांहीं मुलांना हातांत येईल त्याची मोडतोड करण्याची संवय असते. कोणतीहि वस्तु आहे तशीच जपून ठेवणें त्यांस साधत नाहीं. जवळ कांहींच नसलें, तर धडपड करून कांहींतरी वस्तु शोधून काढतील व तिची मोडतोड करतील. उलट-पक्षीं कांहीं मुलें तर त्यांच्या हातांत कोणतीहि वस्तु आली असतां ती फार उत्तम तऱ्हेनें जपून ठेवीत असतात. कांहींना गोष्टी सांगण्याचा व ऐकण्याचा फार नाद

असतो, तर कांहींना संगीताची विशेष गोडी असते. कांहीं मुलांना भीति ही चीजच माहीत नसते. तीं फार धाडशी असतात. कांहींना अतोनात चौकसबुद्धि असते, तर कांहीं एकलकोंडीं असून आपणच एकटें हातांत कांहींतरी घेऊन त्याच्याशीं खेळत बसतात. प्रत्येक गोष्ट स्वतः करण्याची हौस पुष्कळ मुलांना असते. असे अनेक प्रकारचे स्वभाव लहान मुलांत दिसून येतात. त्यांच्या संवयीहि पाहण्यासारख्या असतात. मुलें ५-७ वर्षांचीं झालीं म्हणजे कांहींना अक्षरओळखीचा—वाचण्याचा—नाद लागतो. कांहीं मुलांना मातीचीं वा कागदाचीं चित्रें करण्याचा छंद लागतो. कांहीं निरनिराळ्या वस्तु जमविण्याच्या मागें लागतात. फुलपांखरांची व फुलांची आवडहि कांहींना असलेली दिसते, तर कांहीं कुत्रीं, मांजरें, पक्षी इ० प्राण्यांचीं शौकी असतात. कांहीं मुलें झाडांरोपटांशीं खेळत बसतात; बागेंत कांहींतरी लावण्याचा त्यांना नाद असतो. चित्रादि हस्तव्यवसायाचीहि हौस बऱ्याच जणांना असते. अशा प्रकारें लहान मुलांत दिसून येणारे भिन्न भिन्न स्वभाव व संवयी यांचा योग्य तऱ्हेनें उपयोग करून घेऊन त्याच संवयींना पोषक व अनुकूल असें शिक्षण दिलें म्हणजे त्या क्षेत्रांत तीं पुढें निपुण होतात.

आईबापांचें कर्तव्य—

पण हें ज्ञान शिक्षकांना व घरांतील पालकांना नसतें. मुलाच्या नादिष्टपणाचें उदात्तीकरण करून त्यास त्याच क्षेत्रांतील उपकरणीं आणून दिल्यास तेथेंच त्या मुलाची बुद्धि प्रगत होत असते व मन रमतें. अडाणी आईबाप मुलाला भलतेंच शिकवूं लागतात. त्याचा कल तिकडे नसल्यानें तो तें शिकत नाहीं. आपलाच उद्योग तो करूं लागतो. तेव्हां आईबाप त्याला उनाड म्हणतात. 'अभ्यासाची गोडी नाहीं त्याला' असें ठरवितात. पण तोच मुलगा एखाद्या मानसशास्त्रज्ञाच्या हाताखालीं दिल्यास तो त्या मुलाला उत्तम शिक्षण देऊन चांगला तयार करील. उनाडपणा मुलांत नसतो पण अडाणीपणा मात्र आईबापांत असतो. मुलाच्या मनाचा कल समजावून न घेतां व्यावहारिक आणि रूढीला भलतेंच महत्त्व देऊन सरसकट चार लोक ज्याप्रकारचें शिक्षण मुलास देतात त्याच प्रकारचें शिक्षण आईबाप आपल्या मुलास देत असतात. ज्या विषयांत त्याचें मन रमतें तो न देतां भलताच विषय त्याच्या माथीं मारल्यानें तो विषय तर त्याकडून नीट होत नाहींच पण हट्टी

आणि उनाड–मंदबुद्धीचा इ. विशेषणें त्यास घ्यावीं लागतात. असें करण्यानें मुलें विनाकारण 'ढ' म्हणून गणलीं जातात आणि सर्व आयुष्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. ज्या विषयाकडे मुलाचा कल नाहीं तो विषय सक्तीनें करावयास लावल्यानें त्यांत मुलगा प्रवीण होणें शक्य नाहीं. भावी आयुष्यांत प्रत्यक्ष व्यवहारांत त्या विषयाचा उपयोग तो करूं शकत नाहीं. त्या ठिकाणीं त्याची बुद्धि चालत नसते. असा मुलगा केव्हांहि निर्बुद्ध म्हणून समजला जातो आणि तसा तो होतोहि. बुद्धीचा प्रवाह मुख्यतः एकाच मार्गानें शेवटपर्यंत जाऊं शकतो हें कोणास समजत नाहीं. मानसिक भूमिकेवर बुद्धीच्या प्रवाहाची दिशा अवलंबून असते. प्रवाहाला वाटेंत वरींच वळणें लागतील हें खरें आहे. परंतु शेवटीं त्या सर्व वळणांचा एकाच बिंदूकडे रोख जातो. हा बिंदु ज्याला बरोबर समजला व तसें उचित शिक्षण ज्याला मिळालें तो मनुष्य त्या क्षेत्रांत चमकतो परंतु तितक्याच बुद्धिमत्तेचा दुसरा मनुष्य भलत्याच क्षेत्रांत पडला तर सामान्य बुद्धीच्या माणसाहूनहि त्याची वाईटच स्थिति होते. म्हणून एकाच प्रकारचें शिक्षण सरसकट सर्वांना देणें योग्य नाहीं.

## शिकविण्याचें शास्त्र आणि कला

### शिक्षकाचें कौशल्य–

शिक्षणाच्या बाबतींत दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना शिकवितांना आवश्यक लागणारी काळजी. शिकवीत असतां शिक्षकाचें मन अतिशय शांत पाहिजे. विद्यार्थ्याकडे सहानुभूतीनें लक्ष द्यावयास हवें. एखादी गोष्ट तो चुकला तर त्याच्या अंगावर ओरडून त्याला गांगरून सोडूं नये. ( Teaching must follow the path of development and not that of dogmatic exposition—Pestalozzi ) विषय समजला नाहीं तर त्याला निर्बुद्ध म्हणून तिरस्कारूं नये. निदान त्याच्या तोंडावर तर मुळींच असें करूं नये. या दोन गोष्टींनीं मुलाचें मन गोंधळून जाऊन अगदीं साधी गोष्टहि त्यास समजेनाशी होते. यावेळीं तर शिक्षकाचा पारा फारच चढतो आणि यावरच तो मुलाची बुद्धिमत्ता जाणून घेतो. पण हें अगदीं अशास्त्रीय आहे. मुलास समजलें

नाहीं म्हणून त्याला रागें भरून व गप्प करून आपलेंच चऱ्हाट लावूं नये. विद्यार्थ्यास अधिकाधिक बोलावयास लावून त्याला त्याचे विचार प्रकट करण्यास पूर्ण मुभा द्यावी. एखाद्या विषयांत त्याचा गोंधळ होऊं लागला तर शिक्षकानें शिकविणें एकदम बंद केलें पाहिजे. नंतर बऱ्याच वेळानें पूर्वीचा गोंधळ निघून गेल्यावर तो मुलगा ताजातवाना झाला म्हणजे अतिशय हळुवारपणें एक एक गोष्ट गोडीनें व शांतपणें त्यास सोदाहरण समजावून द्यावी. गोंधळ आपण करतों. आपल्यालाच विषयाचें सोपें पृथक्करण करतां आलें नाहीं म्हणजे विषय क्रमाक्रमानें उलगडून सांगतां येत नाहीं. हा दोष आपला असतो, आपल्यालाच विषय नीट न समजतां तो सोपा करून उलगडा करून सांगतां येत नाहीं आणि मग विद्यार्थ्याचे मनांत गोंधळ झाला कीं तो 'ढ' होतो! मुलाला रागावलों म्हणजे मुलाचें मन मोकळें होत नाहीं. असलेल्या शंका विचारण्यास तो धजत नाहीं. कारण एवढेंहि समजत नाहीं!' म्हणून बोलून घ्यावें लागेल आणि कांहीं गोष्टी न समजतांच भयानें 'समजलें' म्हणून खोटें सांगेल. मुलाला समजूत कितीहि कमी असली तरी आपला शांतपणा व सहानुभूति यत्किंचितहि ढळतां कामा नये. मुलास तुसडेपणानें न बोलतां गोडीनें, आपलेपणानें, तन्मयतेनें समजावून दिलें म्हणजे शिकविणें यशस्वी झालेंच पाहिजे.

### शिक्षकाचें शिक्षण देण्याचे प्रकार आणि त्याचें कर्तव्य—

शिक्षण देण्याचे अनेक प्रकार आहेत. विषयाचा अभ्यास करावयाचा झाल्यास फक्त तोंडपाटीलकी करण्यापेक्षां ज्या वस्तूचा अभ्यास चालला असेल ती प्रत्यक्ष दाखविणें सर्वांत उत्तम. शिकविणें म्हणजे आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन करणें नव्हे. पुष्कळ शिक्षक विद्यार्थ्यांवर आपली छाप पाडण्याकरितां सतरा पुस्तकांतून पाठ केलेले उतारे व जमविलेली माहिती यांनीं आपलें वक्तृत्व खुलवून टाकतात. शिकविणें म्हणजे मुलांस भुलवून दणदणीत वक्तृत्व करणें नव्हे हें दुसरें लक्षांत ठेविलें पाहिजे. अशा वक्तृत्वांत एकादा शिक्षक कठीण प्रश्न सोडवूं शकत नाहीं. अवांतर बरीच माहिती सांगून त्याखालीं मुलांना फसविणें हें त्यांचें काम असतें. कठीण प्रश्न उलगडून सोपा करतां येत नाहीं असे शिक्षक वक्तृत्वानें आपली बाजू सांवरून धरतात, अशा वक्तृत्वाला कठीण प्रश्न समजावून देण्यापेक्षां कमी बुद्धिमत्ता लागते. मुख्य मुद्दा म्हणजे तो प्रश्नच कांहीं वेळेला स्वतः

शिक्षकास सुटलेला नसतो. ही व्याख्यानबाजी एकांगी असते. शिक्षक जें बरळेल तें विद्यार्थ्यांनीं फक्त श्रवण करावें. त्यावरील शंका प्रश्न निघून चर्चा होत नाहीं. शिकविणें म्हणजे विद्यार्थ्यांशीं चर्चा करून त्यांच्याचकडून विषयाचा उलगडा करवून घेणें होय. उलगडा आपण स्वतः न करतां तो विद्यार्थ्यांस करण्यास मार्ग दाखवून त्यांस असे अनेक प्रश्न उलगडण्यास प्रवृत्त करणें हें महत्त्वाचें व कठीण असतें; एखादा प्रश्न आपण सोडवून आपली बुद्धिमत्ता दाखविण्यापेक्षां विद्यार्थ्यांत प्रश्न सोडविण्याची स्वयंभू प्रवृत्ति व शक्ति येईल असें करणें हें शिक्षकाचें खरें कर्तव्य आहे. अनेक प्रयोगाअन्तीं पेस्टॉलेझीचें असें मत झालें कीं, "... The first development of thought in the Child is very much disturbed by a wordy system of teaching, which is not adopted either to his faculties or the circumstances of his life. According to my experience, success depends upon whether what is taught to children commends itself to them as true through being closely connected with their own observation.

कठीण प्रश्न कसा शिकवावा–

ज्या विषयांतील कठीण प्रश्न आपणांस सोडवावयाचा असेल त्या विषयाच्या वातावरणांत मुलांस प्रथम आणणें इष्ट आहे. ही प्रस्तावना करून विषयाला अनुकूल अशी मनोभूमिका विद्यार्थ्यांची तयार करावी. विषयाचें वातावरण निर्माण करावयाचें. जो विषय असेल त्याच्या अनुरोधानें त्याच्याशीं संबंध असलेल्या गोष्टी सांगाव्यात. व्यवहारांतील क्षुल्लक गोष्टींचीं सूचक उदाहरणें देऊन व गोष्टी सांगून प्रत्यक्ष विषयांचा व त्यांचा कसा निकटचा संबंध आहे हें दाखवावें. कोणतीहि कठीण गोष्ट व्यावहारिक भाषेंत व्यवहाराच्या उदाहरणांनीं सांगितली असतां मनांत चटकन् भरते. अशा प्रकारें विषयाची पार्श्वभूमि तयार केल्यावर जो नियुक्त कठीण प्रश्न असेल त्याचें विषयांत एकंदर साकल्यानें दिसणारें स्वरूप सांगावें. म्हणजे त्या प्रश्नाचें विषयांत काय स्थान आहे व त्याचा संदर्भ लागला असतां प्रश्न कळण्यास सोपा जातो. प्रत्यक्ष कठीण प्रश्नाला हात घालण्याचें पूर्वी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. प्रश्नाचें काठिण्य मुलांस

कधीं सांगू नये. आपलें बोलणें व चेहरा गंभीर व विचारमग्न करून मुलांस अधिकाधिक लक्ष देण्यास वेळोवेळीं बजावून त्यांस घाबरवून सोडूं नये. प्रथमच आपण प्रश्नाचा बाऊ करतों त्यामुळें मुलांच्या मनांत प्रश्नाचें मूलतः नसलेलें काठिण्य व त्या विषयाची भीति निर्माण होते. मनःस्थिति अशा प्रकारची असली तर विषय कितीहि सोपा असला तरी तो चटकन् समजत नाहीं. उलट त्यांत सतरा प्रकारचीं गुंतागुंत निर्माण होते. मुलांस अत्यंत सहजपणें व्यावहारिक भाषेत त्यांच्या मोकळ्या मनःस्थितींत शिकवावें. प्रतिपाद्य प्रश्नाचें प्रथम त्या विषयांतील तात्त्विक भाषेंतून व स्वरूपांतून व्यवहारांत रूपांतर करावें. हें रूपांतर व्यावहारिक अनुभव सांगून केलें म्हणजे बुद्धीला फार लवकर पटतें. एवढें झाल्यावर त्या रूपांतराचें व प्रश्नाचें साम्य दाखवून हा प्रश्न अगदीं असाच आहे हें बिंबवावें. आणि नंतर प्रत्यक्ष प्रश्न तात्त्विक रूपांत सांगावा. यावेळीं प्रथम प्रथम पारिभाषिक शब्दांची फोड करून त्यांचा खोल अर्थ सांगावा. व हा शब्द येथें कां लावला तें स्पष्ट करावें. नाहीं तर प्रश्न स्पष्ट झाला असला तरी पारिभाषिक शब्दाचा अर्थ बरोबर न कळल्यामुळें प्रत्यक्ष तपशील व त्याचें पारिभाषिक नांव यांत गोंधळ होऊन सुसंगति लागत नाहीं. मुलाच्या मनांत विषयाबद्दल खात्री नसते. व कांहीं तरी गुंतागुंतीच्या अस्पष्ट कल्पना असतात त्याला कारण पुष्कळ वेळां हेंच असतें. शिकविणें यशस्वी झालें हें कोणी व केव्हां ठरवायचें हें पुष्कळांस समजत नाहीं. हा प्रश्न विद्यार्थ्यांवरच सोपवून ते मोकळे होतात. मुलाला कळलें म्हणजे झालें, अशी त्यांची समजूत असते, परंतु ती चुकीची असते. मुलाला कळलें या कल्पनेवर ते जातात पण शेवटीं त्यांच्या मनांत अनेक शंका राहिलेल्या आढळून येतात. स्पष्ट न झालेले असे बरेच प्रश्न त्यांच्या मनांत असतात. मुलांना, चांगलें शिकविणें म्हणजे काय हें कळत नसतें. वर सांगितलेल्या व्याख्यानबाजी करणाऱ्या शिक्षकास ‘ फार चांगलें समजावून देतो ’ असें ते म्हणतात. पण त्यांपैकीं एका मुलालाच शिक्षकानें शिकविलेल्या विषयांतील विचारलें तर मात्र त्याला गप्प बसावें लागतें. शिकविणें यशस्वी झालें हें आदर्श शिक्षकानें ठरवावयाचें असतें. आणि जो विषय शिकविला असेल तो खांचाखोचासहित विद्यार्थ्यास दुसऱ्याला समजावून देतां आला म्हणजे विद्यार्थ्याला चांगलें समजलें असें समजावें. शिकविल्यानंतर त्या आदर्श शिक्षकाचें समाधान झालें पाहिजे. जो विषय शिकवावयाचा असतो तो विद्यार्थ्यांना पूर्णपणें

अज्ञात असतो. त्याची वरवर माहिती असली तरी आंतील खांचाखोचा त्यास माहीस नसतात. शिक्षकाला हें सर्व नीट समजलेलें असतें; आणि तसें नसेल तर वस्ताद शिक्षक आपल्या पोकळ वक्तृत्वानें महत्त्वाचा कठीण प्रश्न झांकून दडपून टाकतात. पण आपल्या कुवतीप्रमाणें वर सांगितल्याप्रमाणें त्यास साग्र समजावून दिलें म्हणजे त्याची परीक्षा विद्यार्थ्याकडून करून घेऊन त्यांच्या उत्तरांवरून स्वतः ठरवावयाचें कीं त्यांना विषयाचें आकलन कितपत झालें आहे. आपण सोडविलेला प्रश्न विद्यार्थ्यांस सोडविण्यास सांगावा. शिकविण्याची हातोटी नसल्यानें विद्यार्थ्यास तो सफाईदारपणें समजावून सांगतां येणार नाहीं. पण त्याच्या बोलण्यावरून त्याला काय म्हणावयाचें आहे तें आपण ताडावयास पाहिजे. तो अडखळला तर त्याचें म्हणणें आपण पुरें करून तें त्याला कितपत पटतें तें पाहावें. जर खरोखर त्याला नीट समजलेलें असेल तर त्याच्या तोंडावर एकदम निराळी छटा दिसते. पण असें नसेल तर त्याला आपलें म्हणणें पूर्णपणें पटणार नाहीं; व साशंक मुद्रेनें तो कांहीं तरी पुटपुटेल. मुलांचें म्हणणें ऐकून घेऊन तें आपल्याशीं पडताळून पाहावे जर तंतोतंत जमलें तर मुलांस समजलें आहे असें समजावें. शिकविण्याची यशस्विता मुलांच्यावर नसून विषयावर मापन करावयाची आहे. वास्तविक विषय किती शिकवावयाचा आहे व आपण किती शिकविलें हें पडताळून पाहिलें पाहिजे. विषयाचा एखादा तुटक भाग शिकवून बाकी जर वक्तृत्वानें भारून टाकलें तर तें अपूर्ण होय. विषयाची प्रत्येक खोंचन्‌खोच आपण उलगडून सांगितली कीं नाहीं हें पाहणें आवश्यक आहे. जेवढें शिकविलें तेवढें कदाचित् मुलांना समजलें असेल पण वास्तविक किती शिकवावयास हवें होतें हें तो विषयच ठरविणार.

शिकविणें एकांगी होऊं नये म्हणजे शिक्षकानेंच सर्व वेळ बोलत राहूं नये. असें केल्यानें मुलांना विषय तर नीट समजत नाहींच; परंतु मुलांचें लक्ष शिक्षकाच्या बोलण्यावरून उडून जातें. मुलें कंटाळतात. शिक्षक बोलणारा चांगला असेल तर फार तर पुराण ऐकल्याप्रमाणें मुलें गोडीनें ऐकतील; पण हें सर्व वक्तृत्व निष्फळ ठरेल. कारण मुख्य प्रश्न त्यांना सुटणें बाजूलाच राहील. म्हणून शिक्षकानें नेहमीं मुलांस बोलावयास लावून आपण त्यांच्याबरोबर भाग घेतला पाहिजे. यामुळें मुलांचें मन विषयांत गुंतून तें कार्यक्षम राहतें.

विषयाचा अभ्यास करितांना ज्या पद्धतीनें शिकवावें लागतें तो शिक्षणाचा पहिला प्रकार आतांपर्यंत विवेचन करून झाला. संस्कार हा सुद्धां शिक्षण देण्याचा एक प्रकार आहे.

सांस्कारिक शिक्षण–

संस्कारानें अखिल आयुष्याला एक निराळेंच वळण लागत असतें. पुढील आयुष्य हें लहानपणीं जडलेल्या संस्कारांनीं तयार झालेल्या मनोभूमिकेवर अवलंबून असतें. संस्कारांचा अप्रत्यक्ष परिणाम किती होतो हें सामान्य लोकांस कळत नाहीं. क्वचित् कोणास कळलें तरी तें वळत नाहीं. मोठ्या माणसांच्या या अज्ञानामुळेंच पुष्कळ चांगलीं मुलें वायां जातात–नव्हे वाईट मार्गाला लागतात. एकदां संस्कार होऊन मनाची घडण बसली म्हणजे ती सुधारणें अत्यंत दुरापास्त होतें. हें संस्काराचें शिक्षण जन्मापासून सुरू होतें.

संस्कार करतांना दोन महत्त्वाच्या मुद्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. एक म्हणजे मुळांतच वाईट गोष्टींचें ज्ञान मुलांस न होईल याची काळजी घेणें व संस्कार करूं ते सन्मार्गींच असतील ही दक्षता बाळगणें. मुलांस वाईट गोष्टींचें ज्ञान होतें तें आपोआप सहसा कधींहि होत नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें परिस्थितिच तशी निर्माण झाली तर तींतून निभावण्याकरितां निश्चितपणें मूल पाप करतें. तेव्हां अशी परिस्थितिच निर्माण होऊं देतां कामा नये. नीति आणि अनीति यांतील फरक सहसा अजाणतेपणीं मुलास कळूं नये. ‘ हें वाईट आहे, हें तूं करूं नकोस–असें करूं नये ’ असें म्हटलें म्हणजे हटकून तेंच करून पाहाण्याची उत्सुकता मुलांत निर्माण होत असते. अजाणतेपणीं चांगलें आणि वाईट यांतील फरक कळूं लागला म्हणजे पापाकडे वृत्ति वळते. समजूं लागल्यावर लहानपणापासून केलेल्या पाहिलेल्या गोष्टींपेक्षां ही चमत्कारिक आहे म्हणून मन ती गोष्ट करण्यास धजत नाहीं. असा जेव्हां प्रसंग येतो तेव्हांच चांगल्या वाईटांतील फरक सदसद्-विवेकबुद्धीनें मुलानें जाणून घ्यावयास पाहिजे. इतकें शिक्षण शास्त्रीय रीतीनें द्यावयास हवें आहे. अशा तऱ्हेनें संस्कारांनीं शिक्षण देणें कठीण असलें तरी तें अगत्याचें आहे. सर्व समाजच नीतिमान झाला तर या शिक्षणासारखी सहज व सोपी गोष्ट दुसरी नाहीं. पण आडांतच नीति उरली नसेल तर पोहऱ्यांत येणें

कठीणच जाणार. मुलांशीं वागतांना आईबापांनीं व घरांतील इतर मंडळींनीं अतिशय जपून वागणें आवश्यक आहे. पण अगदीं या उलट स्थिति सध्यां आपल्या समाजांत आहे. लहान मुलांच्या शरीर व मनःसंगोपनाची आबाळ आपल्या इतकी दुसऱ्या समाजांतून होत असेल असें वाटत नाहीं. जो समाज लहान मुलांकडे दुर्लक्ष करतो त्याला भावी उत्कर्षाची आशा बाळगण्याचें कारण नाहीं. ज्या ज्या समाजांनीं लहान मुलांचें योग्य महत्त्व ओळखलें तेच समाज आज उत्कर्षास पोंचलेले दिसत आहेत. आमच्या धर्मांत लहान मुलांनाच धार्मिक क्रिया व संस्कार जास्त सांगितले याचें कारणहि दुसरें कोणतें असणार ?

घरामध्यें मुलावर होणाऱ्या संस्कारांची इतकी सूक्ष्म काळजी घेणें व्यवहारांत शक्य नाहीं. म्हणून मूल ४-५ वर्षांचें झालें असतां त्याला गुरूकडे निराळ्या शाळेंत ठेवणें भाग आहे.

शिक्षणाची अनुकरणपद्धति–

शिक्षणाचा तिसरा प्रकार म्हणजे अनुकरण. त्याचें विवेचन करूं. शैशवांत संस्कारांचें जें महत्त्व तें तारुण्यांत अनुकरणाचें आहे. बालपणांत स्वतंत्र विचार-शक्ति नसते. तारुण्यांत ती आलेली असते. म्हणून पाहिलेल्या गोष्टींवर विचार करणें व त्यांची योग्यायोग्यता ठरविणें हें त्या काळीं जमतें. त्या वयांत मनाला एक प्रकारची नवीन पालवी फुटत असते. जें पहातों तेंच चांगलें वाटून तसें करण्याचा मोह मनाला होत असतो. शैशवांतहि अनुकरण होत असतें, पण तें मनोविहीन असून त्याप्रमाणें भावना नसते. तें केवळ यांत्रिक असतें. तारुण्यांत मनाला कांहीं तरी वाटतें. म्हणून सहेतुकपणें पाहिलेलें करावेंसें वाटत असतें. एकदां केलें म्हणजे त्याचीच चटक लागून शेवटीं त्यांतच गोडी लागते. शिशूंच्या संस्कारक्षम नाजूक मनाप्रमाणें तरुण मनाच्या या वृत्तीचा फायदा घ्यावयास पाहिजे. तशी काळजी घ्यावयास हवी. अनुकरणीय गोष्ट वाईट असल्यास तिचीच संवय लागते. पण तीच चांगली असल्यास त्यांतच जन्मभर गोडी उत्पन्न होते. म्हणून तरुणांपुढें अनुकरणीय वस्तु ठेवतांना ती विचार करून ठेवावयास पाहिजे.

अनुकरणपद्धतीनें साधीं मुलें चांगल्या मार्गाला लागतील यांत नवल नाहीं. पण पूर्णपणें दुर्वर्तनी मुलेंहि अनुकरणपद्धतीनें सद्वर्तनी बनतात.

अनुकरण म्हणजे काय ?–

अनुकरणपद्धतीच्यामागें फार मोठें मानसशास्त्र आहे. पेस्टॉलेझीच्या शिक्षण-शास्त्रांत अनुकरणपद्धतीला फार महत्त्व आहे. ती अमलांत आणणेंहि तितकेंच कठीण आहे. अनुकरण करणें याचाच अर्थ एक गोष्ट पाहिल्यावर आपल्या मनांत कांहीं तरी भावना तिच्याविषयीं निर्माण होऊन आपण स्वतः करावीशी वाटणें ही जी भावना असते यांतच अनुकरणपद्धतीचें सर्वस्व सांठविलेलें आहे. ज्या गोष्टीचें आपल्याला अनुकरण करावेंसें वाटतें त्या गोष्टीसंबंधानें आपल्या मनांत थोडासा आपलेपणा व चांगला भाव उत्पन्न होतो. ज्या गोष्टीविषयीं आपणांस तिटकारा आहे तिचें अनुकरण करण्याचा मोह आपणांस कदापि होणार नाहीं. दुर्वर्तनी मुलें दुर्वर्तनी असतात. याचें कारण त्यांनीं तसलें वर्तन कोणाचें तरी पाहिलेलें असतें व त्यांविषयीं त्यांच्या मनांत आपलेपणा व गोडी निर्माण होते, तेव्हांच तिचें अनुकरण त्या मुलांकडून केलें जातें. म्हणजे मुलें दुर्वर्तनी असलीं तरी कोणत्या-तरी गोष्टींविषयीं त्यांच्या मनांत आदरभाव व आपलेपणा असतोच असतो. गुरूचें काम एवढेंच कीं हा आदरभाव भलतीकडे गेला आहे तो योग्य ठिकाणीं वळविणें. म्हणजे मग अनुकरणपद्धतीनें मुलगा सुधारूं लागतो. मुख्य गोष्ट असेल तर ती ही. दुर्वर्तनी मुलाचे मनांतील अधिष्ठात्री देवता बदलली पाहिजे.

तामसीपणानें मन बदलतां येणार नाहीं–

ही देवता बदलणें सोपें काम नाहीं. दुर्वर्तनी मुलांस रागें भरून त्यांची निर्भर्त्सना करून वा अन्य तामसी मार्गानें हें काम होण्यासारखें नाहीं. मुलांतील ही तामसी वृत्ति सात्त्विकतेनेंच नष्ट करावयाची आहे. आपल्या उच्चतम सात्त्विक वृत्तीनें त्यांचीं हृदयें आकर्षण करून घ्यावयास पाहिजेत. मारून मुटकून जुल-मानें दुसऱ्यांकडून आपला कार्यभाग साधूं शकूं ही भ्रामक कल्पना आहे. अशानें फार तर तेवढें काम तो आपल्यासाठीं करेल हें खरें पण या जुलमामुळेंच तो कायमचा आपल्याला दुरावेल हा पुढील सावकाश पण निश्चितपणें प्रत्ययास येणारा दुष्परिणाम आपल्या ध्यानांत येत नाहीं. दुसऱ्याचें मन जिंकण्याऐवजीं आपल्या-विषयीं त्याच्या मनांत असणारा पहिला चांगला भाव हा नष्ट होत जातो.

स्वतःविषयींचा आदर निर्माण करणें-

दुसऱ्यांचीं मनें, विशेषतः मर्यादेबाहेर गेलेल्यांचीं मनें आपल्याकडे ओढून घ्यावयाचीं तीं त्यांच्याशीं लघळपणा करून नव्हे. व त्यांना वाईट म्हणून तिरस्कार करून तर नाहींच नाहीं, दुसऱ्याला आपली ओढ लागणें हें त्यांच्या व आपल्या मनःसंबंधावर तितकेसें नसून स्वतःच्या उदात्त आचरणावर आहे. दुसऱ्यांशीं आपला संबंध तितका दाट जिव्हाळ्याचा आला नाहीं तरी आपल्या उदात्त हृदयानें हा संबंध न येतांहि दुसरा मनुष्य आंतून आपल्याकडे ओढला जातो. अधिक स्पष्ट करावयाचें झाल्यास आपल्याबद्दल दुरूनच त्यांच्या मनांत आदरभाव उत्पन्न होतो. स्वतःच्या आचरणानें हा आदरभाव प्रथम निर्माण करणें हें गुरूचें पहिलें कर्तव्य. नंतर त्यांच्या आदरभावाची आपल्याला पूर्णपणें खात्री पटली म्हणजे त्यांच्यावर आपलें एक प्रकारचें आत्मिक वजन पडत असतें. यावेळीं आपणांस पाहिजे असलेली गोष्ट प्रत्यक्ष त्याच्याजवळ न मागतां आपली अडचण व इच्छा त्यास कळेल अशी दर्शविली गेली म्हणजे त्या दुर्वर्तनी मुलालाच आपल्याबद्दल एकप्रकारची सहानुभूति निर्माण होऊन तो आपण होऊन हवी असलेली गोष्ट साध्य करून देईल.

अनुकरणपद्धतीचा पहिला धडा-

अनुकरण पद्धति वरील तत्त्वावरच आधारलेली आहे. दुर्वर्तनी मुलांस सन्मार्गाचे प्रत्यक्ष धडे कधींच शिकवूं नये. आणि पूर्वी सांगितल्याप्रमाणें आपल्याविषयीं त्यांच्या मनांत आदर वसत नसेल तर तीं मुलें सुधारण्यापेक्षां आपलीच चेष्टा करतील. एक महत्त्वाची काळजी ही घेतली पाहिजे कीं त्यांच्यांत आपली चेष्टा व टिंगल होईल असें कधींच करूं नये. त्यांच्या मंडळांत त्यांच्याशीं मनमिळाऊपणानें व प्रेमळपणानें वागूनहि आपली भूमिका फार वरच्या दर्जाची ठेवली पाहिजे. अनुकरणपद्धतीचा पहिला धडा म्हणजे आपलें वर्तन अत्यंत उच्च प्रतीचें ठेवून आपल्याविषयीं त्यांच्या मनांत आदर उत्पन्न करणें.

आदरमूर्तींचें रूपांतर-

दुर्वर्तनी मुलांत आदरादि-उच्च भावना नसतात ही कल्पना चुकीची आहे. ते प्रेमळपणें व सत्यानें दुसऱ्याशीं वागणार नाहींत ही गोष्ट खरी; पण एखाद्याविषयीं

आदर नसणें हें शक्यच नाहीं. तो फारतर तें बाहेर दाखवीत नाहींत. त्यांच्या टोळीं-तील नायकाबद्दल त्यांचा आदर व्यक्त असतोच. एवढेंच त्यांत कमी आहे कीं ही आदरमूर्ति अयोग्य असते तिचें फक्त आपण रूपांतर करावयाचें आहे.

दोन पद्धतीचें अनुकरण–

अनुकरण दोन पद्धतीनें होत असतें. एक म्हणजे प्रत्यक्ष अनुकरणीय गोष्ट आपल्या मनांत भरते म्हणून स्वतःकरितां अनुकरण करीत असतों. व यापेक्षां वरची पायरी म्हणजे आपणांस अत्यंत आदरणीय वाटणारी व्यक्ति—जर तिनें करूं नयें तें भलतेंच काम केलें म्हणजे तें काम स्वतःला आवडत नसलें तरी ती व्यक्ति तें करतें. हें त्या मुलांना पाहावत नाहीं. व निदान त्या व्यक्तीकरितां म्हणून––तिनें असलीं कामें करणें योग्य नव्हे हें जाणून त्याच्या हातांतील काम ओढून घेऊन तें आपण करण्याची सात्त्विक इच्छा उत्पन्न होते. समाजांत दुर्वर्तनी लोकाची संख्या वाढत जाते याचें कारण त्यांची अनीति नसून त्यांना ज्याच्याबद्दल आदर वाटावा अशा नीतिमान सात्त्विक व्यक्तीच नष्टप्राय होऊं लागतात. दुर्वर्तन्यांच्या अनीतीचें कारण त्यांची विकारवशता हे तितकेंसें खरें नसून नीतिमान सज्जनांच्या नीतीचें बळ कमी होत जातें हेंच समजावें.

अनुकरण पद्धतीचें एक सूत्र–

आपल्या वर्तनानें दुसऱ्यांचीं वर्तनें सुधारणें हें अनुकरण पद्धतीचें सूत्र आहे. दुर्वर्तनी व तामसी वृत्तीच्या मुलांशीं वागतांना गुरूनें आपली शांति चळूं दिली व त्यांच्यापेक्षां आपली सात्त्विक भूमिका उच्चासनावर राखून ठेवली तर या वृत्तीपुढें त्या मुलांचें उद्धट मन व सर्व तामसीपणा थंडावतो. मात्र गुरूच्या अंगीं तितकी चिकाटी असावी लागते. हा परिणाम एकदम घडून येणार नाहीं. पण घडल्याशिवाय मात्र राहणार नाहीं. असें गुरूचें वर्तन पाहून मुलें मनांतल्या मनांत खजील होणें अपरिहार्य आहे. गुरूनें एवढें यश मिळविलें कीं त्याचें काम जवळ-जवळ संपल्यासाखें आहे. पुढील राहिलेलें काम सोपें आहे. गुरूनें स्वतः हातां-तील केरसुणी घेऊन शाळागृह झाडावयास सुरुवात केली म्हणजे त्याच्या दुर्वर्तनी विद्यार्थ्यांना त्याची लाज वाटल्यावांचून राहणार नाहीं. ते आपल्या सर्व सवंग-

गड्यांना बोलावून आणतील आणि गुरूच्या हातांतील केरसुणी घेऊन सर्वजण आपण होऊन झाडावयास लागतील (पेस्टॉलेझी). याच्या उलट गुरु जर आपण कांहीं न करतां नुसती मुलांच्यावर हुकूमशाही गाजवूं लागला किंवा नीतीचें प्रवचन करूं लागला तर त्याला अशा मुलांत राहणें एक क्षणभरहि शक्य नाहीं. मग मुलांना सुधारण्याची गोष्ट तर दूरच राहिली. गुरूच्या अंगीं मोठेपणा पाहिजे तो ह्यासाटीं. आपला मानापमान अशा तऱ्हेनें गुरूनें मुलांमध्यें आपलें वजन ठेवून राखावयाचा असतो. आपलें वर्तन उदात्त व निगर्वी ठेविलें तर दुर्वर्तनीं मुलें सुधारण्याची आशा करण्यास हरकत पाहीं. गुरूनें 'आत्मिक' नीतीचें आचरण ठेवणें अवश्य आहे. त्याची तात्त्विक भूमिका त्याच्या प्रत्येक कृतींत उतरावयास पाहिजे.

शिक्षण बौद्धिक आणि मानसिक–

प्रथम मुलांना कोणत्या प्रकारें शिक्षण द्यावयाचें तें पाहूं. शिक्षण हें बुद्धी-प्रमाणें मनालाहि द्यावयाचें असतें. बुद्धि व मन या दोन्हींवर चांगले संस्कार करणें यालाच शिक्षण देणें असें म्हणतां येईल. पण सर्वसामान्य समजूत फार निराळी आहे. बुद्धीलाच विशिष्ट विद्येचे संस्कार करणें यालाच लोक शिक्षण समजतात. परंतु यानें फक्त बुद्धिसंवर्धन होतें. अलीकडे हाच प्रकार सर्वत्र रूढावला असल्यामुळें प्रचलित शिक्षणानें लोक कितीहि पदवीधर वा सुशिक्षित झाले तर एकंदर समाजांत प्रगति नाहींच पण बरेच वेळां अधोगति चालली आहे असें दिसतें. सुशिक्षितानें एकादा गुन्हा केला म्हणजे लोकांस आश्चर्य वाटतें. पण खरें पाहिलें असतां यांत आश्चर्यकारक असें कांहींच नाहीं; कारण गुन्ह्यांचा उगम बुद्धींत नसून मनांत आहे. बुद्धि तीव्र असल्यास त्या मनाची बुद्धि ही सारथी बनते. प्रचलित शिक्षणानें मनावर संस्कार केले जात नाहींत. तो त्याचा उद्देशच नाहीं असें दिसतें. परंतु याचा परिणाम असा झाला कीं, गुन्ह्यां-तील रानटी पद्धति जाऊन तेच गुन्हे नवीन नवीन सशास्त्रपद्धतीनें, उघडपणें वा चोरून समाजांत निराळें पांघरूण घेऊन फैलावूं लागले. जगाची प्रगति होत आहे कीं अधोगति होत आहे हा इतिहासकारांना मोठा प्रश्न पडतो. याचें कारण वरील प्रकारच्या एकांगी शिक्षणांत आहे. नैसर्गिकदृष्ट्या, साधनांनीं मानवप्राणी खरोखर सुधारलेला आहे. पण त्याच्या बुद्धीसह मनाला सुसंस्कृत न केल्यामुळें मूळ पाशवी वृत्ति निराळ्या स्वरूपांत मनुष्यांत तशीच राहूं लागली. त्यामुळें बुद्धि-

मत्तेच्या जोरावर नवीन उपकरणीं निर्माण करणारा मानव त्या साधनांचा सदुपयोग करण्याऐवजीं दुरुपयोग करूं लागला. त्यामुळें समाजाचें सौख्य दुरावत चाललें व त्यावर घातकी परिणाम होऊं लागले. म्हणून मनुष्य त्याच्या जडस्वरूपांत प्रगत होत चालला व आत्मिक शक्तींत म्हणजेच पर्यायानें सामाजिक गुणांचे बाबतींत अधोगतीला चालला.

गतकालांतील इतिहासाचा आढावा घेऊन आपण सध्यां कोणत्या स्थितींत आहोंत हें समजून घेऊन व पूर्वी झालेल्या चुका दुरुस्त करून पाऊल पुढें टाकावयाचें असें म्हटल्यास शिक्षणक्षेत्रांत आपणांस हा धडा घेतां येईल कीं बुद्धीबरोबर मनासहि शिक्षण देणें अत्यावश्यक आहे. त्यावांचून केवळ बुद्धि ही प्रसंगीं मानवी विनाशासहि कारणीभूत होईल.

## तात्त्विक व औद्योगिक शिक्षण–

शिक्षणामध्यें पुन्हां दोन भेद करणें भाग आहे. एक तात्त्विक व दुसरें औद्योगिक. हे दोन भाग पाडले नाहींत तर विद्यार्थी भावी आयुष्यांत निरुपयोगी होतात. बेकारी वाढण्यास अवसर मिळतो. उद्योगधंद्यांची वाढ होत नाहीं आणि विद्येची सखोलताहि नष्ट होते. विद्यार्थी विद्याव्यासंगीहि होत नाहींत व व्यवहारीहि बनत नाहींत. सुशिक्षित तरुणांचा एक प्रकारचा नवीन वर्ग निर्माण होतो. विश्वविद्यालयीन सुखी राहणीमुळें व्यावहारिक जीवन थोडें उच्च राहतें. खालच्या वर्गाशीं समरस होतां येत नाहीं. पण पदवीधराला मिळणाऱ्या थोड्याशा पगारावर त्यास उच्च राहणी परवडत नाहीं. पोकळ मानगंड निर्माण होतो. परंतु त्याप्रमाणें वर्तन करण्याचें सामर्थ्य अंगांत नसतें. याकरितां शिक्षणाचें निश्चित ध्येय व कार्यक्षेत्र ठरविलें पाहिजे.

## शिशुविद्यालयांतून तरुण विद्यालयांत–

शिशुविद्यालयांतून विद्यार्थी तरुणविद्यालयांत आला म्हणजे त्याचा शिशुविद्यालयांतील साग्र वृत्तांत तरुणविद्यालयांत धाडला पाहिजे. मुलाच्या मनाची वृत्ति व त्याच्या बुद्धीचा कल कोणत्या विषयाकडे आहे, तो तात्त्विक शिक्षणास योग्य आहे कीं औद्योगिक शिक्षणास योग्य आहे,

त्याच्यावर कोणत्या प्रकारची विशेष नजर वा काळजी घ्यावयास हवी इ० गोष्टी शिशुशिक्षणांत निश्चित होत असतात. तरुण विद्यालयांत आल्यावर तेथील गुरूनें या वृत्तान्ताप्रमाणें मुलाच्या वर्तनाचें निरीक्षण करून त्याला त्या त्या सूचनेप्रमाणें शिक्षण द्यावयास हवें. मुलगा तात्त्विक शिक्षणास योग्य असेल तर त्याचा आतांचा कल कोणत्या विषयाकडे आहे तें पाहावें. त्याला ग्रंथालयांत मोकळें सोडून द्यावें. त्याच्या आवडीचा विषय तो त्यांतून निवडेल. थोडयाच दिवसांत विषया-संबंधानें निश्चिति झाल्यावर त्या विषयाच्या अभ्यासास सुरवात केली पाहिजे.

### विद्यार्थ्यांच्या मनाचा कल–

मुलगा औद्योगिक शिक्षणास योग्य असला तर औद्योगिक विभागांत त्यास कांहीं दिवस नेऊन ठेवावें. तेथें निरनिराळ्या प्रकारचीं उपकरणें निरनिराळ्या क्षेत्रांतील असावींत. अगदीं लहान मुलांच्या हातांत देण्याजोगीं व त्यांना खेळतां येण्याजोगीं साधनें त्यांच्या हातांत द्यावींत. त्याला वाटेल तिकडे जाऊन वाटेल तें हाताळण्यास प्रथम कांहीं दिवस पूर्ण मोकळीक द्यावी. मात्र त्याच्यावर एकादा मोठा मनुष्य देखरेखीला असला म्हणजे मोडतोड वा अपघात ह्यांची भीति उरणार नाहीं. मुलास आवडेल त्या धंद्याचीं उपकरणीं घेऊन त्याच्या साहाय्यानें तो कांहीं तरी करून बघण्याचा प्रयत्न करील. थोडया दिवसांत त्याचा कल निश्चित झाला म्हणजे त्याच धंद्यांतील नियमित शिक्षणास प्रारंभ करावा.

### सामान्य ज्ञान–

ह्याबरोबरच प्रथम एक वर्षभर दोनहि जातीच्या मुलांस व्यावहारिक दृष्ट्या आवश्यक असें सामान्य शिक्षण त्या सर्वांस एकत्र द्यावें. म्हणजे व्यवहारांत अडचण पडणार नाहीं.

### विद्येसाठीं विद्या–

तात्त्विक विभागांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विद्याव्यासंगाची अपेक्षा आहे. शिकून टीचभर पोटाची खळगी भरण्यास मदत होईल ही अपेक्षाच मुळांत चूक आहे. ज्याला ही अपेक्षा असेल त्यानें धंदेशिक्षणांत जाणें बरें. धंदेशिक्षणाचा हेतुच चार लोकांची सोय करून स्वतःचा निर्वाह चालवावा हा आहे. तात्त्विक विभागांत

विद्या शिकण्यासाठीं आहे, विक्रीसाठीं नाहीं हें विसरून चालणार नाहीं. विद्येचा उपयोग पैसे मिळविण्याकडे करूं लागलों म्हणजे विद्येची प्रतिष्ठा कमी होते. पोटा-करितां शिकलेल्या विद्येंत खरी विद्या नसते. तें विद्येचें विडंबन होतें. याखेरीज जे खरे विद्याव्यासंगी विद्वान् असतील त्यांना या बाजारांत किंमत नसते. बिचारे दारिद्र्याखालीं खितपत पडलेले असतात. विद्यासेवकांची अशी दीन स्थिति झाली म्हणजे विद्येची प्रगति खुंटते. खरी विद्या व खरे विद्वान् जमिनींत गाडले जाऊन पोटभरू तुटपुंज्या विद्येचा फैलाव होऊं लागतो. आणि उथळ बुद्धीच्या, कीर्तिलोलुप व छक्केपंजेगिरी करणाऱ्यांचा बाजारांत भाव चढतो.

राजसभेंत विद्वानांची योग्य संभावना–

विद्याव्यासंग हेंच आपल्या आयुष्याचें कार्यक्षेत्र ठरविणाऱ्या सज्जन विद्यार्थ्यांना सरकारकडून पोटाकरितां पुरेसें सहाय्य मिळेल. सरकार आपल्या राजसभेंत असल्या विद्वानांची योग्य ती संभावना केल्याविना राहणार नाहीं.

सर्व शास्त्रांचा संशोधक अभ्यास–

तात्त्विक विभागांत सर्व प्रकारच्या विषयांचा अभ्यास व्हावयास पाहिजे. आधि-भौतिक सर्व शस्त्रें––पदार्थविज्ञान, रसायन शास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पति, स्थापत्य, मानवशास्त्र, भूस्तर, समाजशास्त्र, खगोल, आयुर्वेद इ० जडशास्त्रें आणि इतिहास, अर्थशास्त्र, गणित, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र, साहित्य, मानसशास्त्र इत्यादि सर्व प्रकारचीं शास्त्रें यांचा अंतर्भाव झाला पाहिजे. पूर्वी सांगि-तल्याप्रमाणें तात्त्विक भूमिकेवर विद्यार्जन केलें म्हणजे निरनिराळ्या शास्त्रांत प्रगति होत जाईल. शास्त्रीय संशोधनासहि चांगला वाव दिला पाहिजे. तात्त्विक विभागांत अर्थातच सर्व विद्यार्थी संशोधक होणार. एवढयाचकरितां तर विद्यार्जनाची तात्त्विक भूमिका पाहिजे.

## कांहीं विषयांचा अभ्यास

इतिहासाची पुनररचना–

इतिहासांत फारच बदल करावयास पाहिजे. प्रचलित इतिहास विषयाला

कांहीं पद्धतिच नाहीं. याहूनहि, बराचसा इतिहास चुकीचा शिकविला जातो. अर्थात् हा पारतंत्र्याचा परिणाम असणें अगदीं शक्य आहे. पण तो समाजहिताच्या दृष्टीनें बदलून टाकला पाहिजे. इतिहासाची रचनाच कांहीं विचित्र करण्यांत आली आहे. त्यामागें कांहीं तत्त्वज्ञान नाहीं. सबंध देशाचा इतिहास म्हणजे ज्यावेळीं सबंध देश एका छत्राखालीं होता त्या राज्याचा इतिहास. तदनंतर प्रत्येक प्रांताचा इतिहास लिहिणें आवश्यक आहे. सध्यां हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे मुख्यत्वें दिल्लीचे बरेचसे राजे व महाराष्ट्र आणि तदनुषंगानें इतर प्रांतांचा इतिहास. हा इतिहास संगतवार जुळविला गेला नाहीं, धड कालमाना-प्रमाणेंहि जुळवणी नाहीं आणि धड राजवटीप्रमाणेंहि नाहीं. एकाचा इतिहास चालू असतां मध्येंच दुसऱ्या राजाचा इतिहास येतो. इतिहासलेखनावर व संशोधनावर पारतंत्र्याची दाट छाया पसरलेली स्पष्ट दिसते. ती नेभळी, अपमानास्पद भाषा, अनुक्रम पद्धति, खरी व खोटी माहिती इ० प्रकार सोडून नवा इतिहास सुधारून पुन्हां लिहिण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

जगाच्या इतिहासांत भारताचें स्थान–

जगाच्या इतिहाससंबंधीं तीच अवस्था आहे. जगाच्या इतिहासांत प्राचीन भारताचें नांव कोठें कोपऱ्यांतच येऊन गेलें आहे. इतकेंच नव्हे तर भारतीय संस्कृतीचें प्राचीनत्व, तिचें श्रेष्ठ वैशिष्टच, चिकित्सक अभ्यास इत्यादि बाबतींत जगाच्या इतिहासांत दुर्लक्ष केलें गेलें आहे. पाश्चात्य पंडितांचा व पाश्चात्यांशीं नमतें घेणाऱ्या पौर्वात्य पंडितांचा पक्षपातीपणा येथें मुद्दां अडथळा आणतो याचें आश्चर्य वाटतें. सर्व मौलिक इतिहासकार पाश्चात्य झाले आहेत. त्यांनीं लिहिलेला इतिहास हाच प्रमाण व सर्वमान्य समजण्यांत येतो. जणूं कांहीं ते सज्जन निरपेक्ष भूमिकेवरच उभे आहेत! पौर्वात्य पंडितांनीं त्या इतिहासांचें भाषांतर, रूपांतर केलें आहे. फार तर त्यांच्याच इतिहासावर त्यांच्या विधान स्पष्टीकरणार्थ टीका लिहिल्या आहेत. पाश्चात्य पंडितांचा आधार दिला म्हणजे तो वेदवचनच होय. कारण आमच्याकडे स्वतंत्र संशोधन करून मौलिक ग्रंथरचना करणें या हवेस मानवत नाहीं! भारतेतर लहान वा मोठ्या देशांकरितां पुस्तकेंच्या पुस्तकें इतिहासांत खर्चिलीं आहेत. त्यांत भारताचा नुसता संक्षेपानें सारांशच पाहावयास मिळतो. उदा० " Historian's History of the world " मध्यें हिंदुस्थानास पुरीं

पंचवीसहि पानें दिलीं नाहींत. आणि याच इतिहासावरून मानव जातीसंबंधानें व संस्कृतीचीं अनुमानें काढतात आणि तींच सव्यंग अनुमानें भारताच्या इतिहासास लावतात. पण भारताची स्थिति जगांतील कोणत्याहि देशापेक्षां फार भिन्न आहे. त्याप्रमाणें त्याचा इतिहासहि जगाच्या इतिहासापेक्षां पुष्कळच निराळा किंवा विरुद्ध असणें अगदीं संभवनीय आहे. म्हणून जगाचीं अनुमानें भारताला लावून भारताची उंची कमी होते. शिवाय एतद्देशीय परिस्थितीला व मनुष्यस्वभावाला प्रतिकूल असे सिद्धांत लावतात. एवढेंच नव्हे तर ते प्रत्यक्ष कृतींत आणण्याचा प्रयत्न होतो. भारतीय समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र हें धर्म व नीतिशास्त्रांप्रमाणें निराळेंच आहे. त्याचा स्वतंत्र, सखोल अभ्यास करून स्वतंत्र अनुमानें काढून उपाय योजावयास पाहिजेत.

इतिहासाच्या अभ्यासाची दिशा—

इतिहास शिकवितांना त्याचे दोन भाग पाडणें आवश्यक आहे. एक प्रत्यक्ष ऐतिहासिक भौतिक घटना व दुसरा म्हणजे इतिहासाची तात्त्विक भूमिका. यांपैकीं फक्त ऐतिहासिक राजकीय घटनांचाच अभ्यास बहुधा होत असतो. आणि तोहि सुसंगत व तौलनिक नाहीं. इतिहासाच्या तात्त्विक भूमिकेवर सखोल अभ्यास होत नाहीं. केवळ वरवर दृष्टि फेकली जाते. त्यास तितकें महत्त्वहि दिलें जात नाहीं. वास्तविक पाहतां इतिहासाची तात्त्विक भूमिका हाच खरा इतिहासाचा अभ्यास होय. ऐतिहासिक घटना या केवळ त्याचीं साधनें ( data ) होत. त्य साधनांवरून इतिहासशास्त्राचा अभ्यास करून अनुमानें ( principles ) काढाव. याचीं असतात. वस्तुतः इतिहास म्हणजे भूतकालीन समाजशास्त्रच होय. वर्तमानांतील समाजाची घडी बसवितांना व समाजशास्त्राचा अभ्यास करितांना भूतकालीन घटनांचा साकल्यानें विचार करणें अवश्य आहे. त्यावरच मानवसमाजाचा स्वभावधर्म ओळखून नवीन समाजसुधारणा वा त्याचें शास्त्र बनवावयाचें असतें. म्हणून इतिहास म्हणजे केवळ राजांच्या राजवटी व वंशावळी पाठ करणें नव्हे. खऱ्या इतिहासांत, तत्कालीन राजकारण, लढायांचें स्वरूप, सामाजिक स्थिति, धर्म, वाङ्मय इ० अनेकविध मनुष्याच्या आयुष्याशीं निगडित असलेल्या गोष्टींचा अभ्यास करणें भाग पडतें.

एका प्रांताचा वा देशाचा इतिहास शिकवितांना त्याच्या भोंवतालच्या देशांची व इतर जगाची स्थिति काय होती याची थोडक्यांत कल्पना आणून द्यावी. अशा तौलनिक अभ्यासानें विषय चांगला तयार होतो. विद्यार्थ्यांस सर्व विषयाचें आकलन साकल्यानें करतां येतें आणि चिकित्सक बुद्धीला वाव मिळतो.

भाषाविषय–निबंधलेखन–

सामान्य ज्ञानभांडार वाढून विचारांना खरी चालना कशानें मिळत असेल तर ती मातृभाषा शिकण्यानें. परभाषा शिकतांना शब्दांना अधिक महत्त्व असतें. मातृभाषा शिकतांना शब्दांमागील विचारांना अधिक महत्त्व येतें. खरें ज्ञान मातृभाषेंतूनच मिळत असतें.

भाषाविषय शिकवितांना विशेष म्हणजे निबंधरचना कशी करावयाची हें शिकविणें फार कठीण व महत्त्वाचें काम असतें. परंतु हें शिकविलेंच जात नाहीं. मुलांना एकदम निबंध लिहिण्यास सांगतात. ही मोठी चूक आहे. यानें मुलांना कधींच सुसंगत व सुबोध लिहितां येत नाहीं. एकादाच स्वयंभू लेखक लेखनकला शिकविल्याशिवाय ग्रहण करूं शकेल. परंतु दुसरेहि असे कित्येक विद्यार्थी असतात कीं, त्यांना फक्त मार्गदर्शन पाहिजे असतें. किंवा लेखन कसें लिहावें, त्याची किल्ली व साचा काय हेंच माहीत नसतें. तें एकदां माहीत झालें म्हणजे त्यांची सुप्त लेखनकला जागृत होऊन चलनवलन करूं लागते. असे कित्येक भावी लेखक अशा वाईट शिक्षणामुळें दडपले गेले असतील.

निबंधलेखनांतील पहिली अडचण–

निबंध लिहितांना मुख्य व पहिली अडचण ही असते कीं, मनांतील विचार उतरावे कोणते व कशा पद्धतीनें. हें असें होतें याचें कारण मनाला एखादा विचार वा भावना सुचलेली असते. परंतु ती स्वतःलाच स्पष्ट होत नाहीं. मनांतल्या-मनांत स्पष्ट करून घेण्याची संवय व माहिती नसते. त्यामुळें आपल्याला काय वाटतें तें जरी मनाला निश्चित माहीत असलें तरी काय म्हणायचें आहे तें त्या मुलांस समजत नाहीं. मनांतील विचार वा भावना या नेहमीं अमूर्त असतात. अमूर्त असूनहि त्यांचें अस्तित्व मनाला वा बुद्धीला जाणवत

असतें. पण तें कसें जाणवतें तें मात्र शब्दांत सांगतां येत नाहीं. अमूर्त विचारांना शब्दांनीं मूर्त रूप द्यावयाचें असतें. पण हें रूप शब्दांनीं देतां येत नाहीं; म्हणजे ती भावना स्पष्ट करण्याकरितां कोणत्या शब्दांची कशी मांडणी करावी हें समजत नाहीं. याचें कारण मनांत जेव्हां भावना येते तेव्हां ती मनांत गोंधळ करीत असते. ती भावना वा विचार कधींहि सुटसुटीत एकत्र येत नसतो. आपल्या-बरोबर अनेक तऱ्हेचें लचांड ते घेऊन येत असतात. आणि विद्यार्थ्यांस प्रत्येक विचाराला अलग करून सुटसुटीत करण्याची ताकद नसते. उत्तम लेखकांत हाच गुण असावा लागतो. आपल्या मनांतील विचारांचें भारूड वा भावनांचा गोंधळ हें सर्व नाहींसें करून प्रत्येक त्याच्या कमीअधिक महत्त्वाप्रमाणें त्याच्या स्थानावर बसविणें आणि नंतर एकामागून एक असे सुटसुटीत एकटे विचारांना बाहेर सोडा-वयाचें असतें. म्हणजेच त्यांना शब्दांत घालून मूर्त करावयाचें असतें. जणू कांहीं या अमूर्त भावना त्यांना मूर्त स्वरूप येण्यासाठीं हपापलेल्या असतात. आणि नंतर त्या सर्व एकदम आपणांस सतावून सोडीत असतात. परंतु आपण गांगरून न जातां एक एक भावना आस्ते आस्तेच बाहेर सोडली—शब्दांत मांडली तर भावनेला स्वतंत्र सुस्वरूप मूर्ति मिळूं शकते.

## विचारस्पष्टीकरणार्थ—

लेखनकलेच्या मागील हें मूलभूत तत्त्व एकदां समजलें म्हणजे मग पुढील सर्व कृति सोपी आहे.— शिकविण्यास आणि शिकण्यासहि. गुरूनें प्रथम मुलांसमोर एकच बारीकशी घटना करून दाखवावी. उदा०— गुरूनें खडू जमिनीवर टाकावा. तो एका मुलानें उठून उचलावा. व गुरूच्याजवळ नेऊन द्यावा. एवढीच घटना. ही विद्यार्थ्यांसमोर, विद्यार्थ्यांस पूर्णपणें लक्ष ठेवण्यास सांगून करून दाखवावी. नंतर विद्यार्थ्यांना तीच घटना वहीवर लिहावयास सांगावी. ती अशी होईल.— गुरुजींनीं खडू जमिनीवर टाकला. एका विद्यार्थ्यानें तो टाक-लेला पाहिला. लगेच त्यानें खडू उचलला व गुरुजींना परत नेऊन दिला. एवढें विद्यार्थ्यांस नीटपणें लिहितां आलें म्हणजे गुरूला उत्साह येण्यास हरकत नाहीं. गुरूनें नंतर घटना काय झाली? तुम्हाला लिहावयास काय सांगितलें होतें तें विचारावें. मुलांना तें सांगतां येईल. या सांगण्यांतील व लिहिण्यांतील फरक

त्यांना समजावून सांगावा. सांगतांना घडलेली घटना वाटेल तशी अस्ताव्यस्त व अपूर्ण वाक्यांत सांगितली गेली असेल. हा विचार होय. लिहिलेली घटना अमूर्त विचाराला मिळालेलें मूर्त स्वरूप होय. अशाच प्रकारचे प्रात्यक्षिक धडे घेऊन विद्यार्थ्यांस साधलेला हा नवीन धडा दृढ करून घ्यावा. नंतर घटना पायरीपायरीनें अधिकाधिक गुंतागुंतीच्या करून घ्याव्यात. त्या साधल्या व दृढ झाल्या म्हणजे हें प्राथमिक शिक्षण बंद करावें. शिक्षण सर्रास सर्व विद्यार्थ्यांस सारखेंच हिताचें आहे. व्यवहारांत पत्रें लिहितांना व अन्य ठिकाणीं याचा चांगला उपयोग होईल.

विद्यार्थ्यांची पारख–

याच्यापुढें शिकवितांना विद्यार्थ्यांची परीक्षा गुरूला झाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीवर व बुद्धिमत्तेवर हें ठरवावयाचें असलें तरी प्रत्येक बुद्धिमान मनुष्याला लेखक होतां येईलच असें नाहीं. लेखकांत दोन वर्ग कल्पिले पाहिजेत. एक म्हणजे बुद्धिप्रधान ग्रंथकार व दुसरा भावनाप्रधान ललितलेखक. विद्यार्थी कोणत्या प्रकारांत मोडतो हें जाणतां आलें पाहिजे. असे निवडक विद्यार्थी घेऊनच त्यांस पुढील निबंधरचना शिकवावी.

वरील योजनेप्रमाणें विद्यार्थ्याला आपल्या मनांतील विचार सुबोधपणें शब्दांत मांडतां आला व हें पक्कें झालें म्हणजे त्या विद्यार्थ्याला विचार करण्याचें एक प्रकारचें वळण लागतें. शिक्षित विद्यार्थी विचार करतांनाच सुसंगतपणें विचार करून प्रथम आपल्या मनांत तो स्पष्ट करून घेतो. मनांत विचारांचें पृथक्करण करतां आलें पाहिजे. ही संवय उत्तम प्रकारें दृढ होऊन अंगांत बसली म्हणजे मग गुरूनें पुढील शिक्षणास आरंभ करावा.

चर्चात्मक–

या पुढील पायरी म्हणजे गुरूनें एखादा प्रश्न घेऊन त्यावर विद्यार्थ्यांशीं चर्चा करावी. चर्चा संपूर्ण व्हावी. चर्चेंत काय ठरलें, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष काय वगैरे पुन्हां एकदां चांगली उजळणी करून घ्यावी. चर्चेंत विचारांचा गोंधळ माजतो, तो

शेवटीं दूर करून सुटसुटीत विचार विद्यार्थ्यास सांगावा. नंतर तो त्यांस लिहून काढण्यास सांगावें. आतां तो निबंध चांगला झाला पाहिजे.

या वेळीं मनामध्यें विचार करण्याच्या पद्धतींत फरक पडलेला असतो. निबंध चांगला होतो याचें कारण हा फरक होय. म्हणजे विचारपद्धतींत सुधारणा घडणें होय. आपले विचार स्पष्टपणें मांडतां येत नाहींत याचें खरें कारण शब्ददारिद्र्यापेक्षां विचार करण्यांत पद्धति नाहीं, वळण नाहीं हेंच होय. शब्ददारिद्र्यामुळें फार तर निबंधाची भाषा सुशोभित होणार नाहीं. पण साध्याच शब्दांत मुद्दे स्पष्ट झाल्याशिवाय राहणार नाहींत.

निबंधलेखनाची पुढली पायरी—

आपला विचार स्पष्टपणें मांडतां आला कीं तेवढ्यानें त्या विषयावरील निबंध पुरा होत नाहीं. एखाद्याला नवीन गोष्ट समजावून सांगायची झाली तर केवळ विचाराला आवश्यक तेवढे शब्द मांडून दुसऱ्यास तें तितकेंसें पटत नाहीं. मनुष्य केव्हांहि गोष्टीशीं एकदम समरस होऊं शकत नाहीं. आणि समरस नसतांना जर त्यास ती गोष्ट सांगितली तर तो आपल्याकडे दुर्लक्ष करतो वा ती गोष्ट त्याच्या लक्षांतच प्रथम येत नाहीं. म्हणून केव्हांहि प्रथमतः नियोजित विषयाची पार्श्वभूमि तयार करावी लागते. त्याची ओळख करून वाचकांस आपल्या विषयाच्या वातावरणांत आणून सोडणें हें पहिलें काम आहे. त्याच वातावरणांत असतां एखाद्याच मुद्यावर वाचकांस उत्सुकता लागली पाहिजे. नंतर त्या विचारबिंदूच्या स्पष्टीकरणार्थ कांहीं ओळी खर्च कराव्या लागतात. आपल्या विचारांना पोषक अशीं उदाहरणें व अवतरणें द्यावींत. यामुळें वाचकांच्या मनाला ती गोष्ट चटकन् पटते. सर्व स्पष्टीकरण झाल्यावर एवढें मंथन करून शेवटीं निष्पन्न काय झालें हें शेवटच्या भागांत सांगावें. नाहीं तर आपलें स्पष्टीकरण इतकें विस्तृत आणि चारीकसारीक मुद्यांचा कीस काढीत असतें कीं ते लहान लहान मुद्दे वाचकाला कळूं शकतात पण हें एवढें कशाकरितां सांगितलें हें साकल्यानें त्यास ताडतां येत नाहीं. म्हणून त्याच्या सोयीकरितां आतांपर्यंत केलेल्या विषयाच्या सविस्तर स्पष्टीकरणांत थोडक्यांत तात्पर्य द्यावें. सबंध प्रश्नाचें विहंगमावलोकन करावें म्हणजे मग सर्व विषय वाचकाला पूर्णपणें कळतो.

निबंधरचना विद्यार्थ्यांना आणखी स्पष्ट होण्याकरितां निबंधाचा एखादा उत्तम नमुना पृथक्करण करून तो निरनिराळ्या भागांनीं कसा तयार झाला आहे हें समजून द्यावें; पुन्हां त्याच धर्तीवर तेच नियम घेऊन एखाद्या विषयावर विद्यार्थ्यांच्या समवेत गुरूनें एक निबंध तयार करून दाखवावा. त्याचे निरनिराळे भाग कसे पाडावयाचे इ० सर्व विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावें. एवढें झाल्यावरच विद्यार्थ्यांस निबंध चांगला लिहितां येऊं लागेल.

लघुकथेचा अभ्यास–

लघुकथाहि अशाच धर्तीवर शिकवावयास पाहिजेत. मुळांत एकच कल्पना सुटसुटीत असून त्याचीच सजावट अधिक केलेली असते. निबंधाचे कांहीं नियम कथेलाहि लागू पडतात. निबंधाप्रमाणें कथेंतहि कल्पनेचें वातावरण तयार करून वाचकाची मनोभूमिका आपणांस पाहिजे तशी अनुकूल करून घ्यावयाची असते. कल्पनेची पार्श्वभूमि सजवावी लागते. निबंध बुद्धीनें लिहावयाचा व बुद्धीनें समजून घ्यावयाचा असतो. कथा भावनेनें लिहून भावनेनेंच जाणावयाची असते. म्हणून निबंधांतील प्रत्येक वाक्य बुद्धिप्रधान असून कथेंतील भावनाप्रधान असतें.

एखादी उत्तम कथा उलगडून तिचा प्रत्येक धागादोरा बाहेर काढून ते कसे विणले होते हें दाखवावें. प्रारंभींचें वाक्य वा परिच्छेद मनाची पकड घेईल अशा तऱ्हेचें असतें. मुख्य कल्पना केव्हां सांगितली, कोणत्या रूपांत सांगितली व ती अशी किती मोठी होती हें पाहण्यासारखें आहे. आरंभींच्या परिच्छेदानंतर कल्पनेची पार्श्वभूमि, तिची सजावट अगदीं विच्छेदन करून स्पष्ट करावी. नंतर कथेचा शेवट कसा चटकदार केला आहे तोहि ध्यानांत धरण्यासारखा असतो. अशा तऱ्हेनें कथेचें शवविच्छेदन करून ती अभ्यासणें श्रेयस्कर आहे. याच्या उलट एखादी कल्पना घेऊन तिची लघुकथा विद्यार्थ्यांच्या साहाय्यानें तयार करावी. म्हणजे लघुकथेंतील सर्व खांचाखोचा विद्यार्थ्यांच्या लक्षांत येतील.

प्रात्यक्षिक शिक्षण–

इतर विषय शिकवितांनाहि वर सांगितलेले नियम सामान्यतः स्थूलमानानें उपयोगी पडणारे आहेत. शिक्षणशास्त्रांतील प्रमुख गोष्ट लक्षांत ठेवावयास

पाहिजे ती ही कीं, ज्या वस्तूचा आपण अभ्यास करतां ती शक्य तर प्रत्यक्ष पहावयास मिळावी. हें प्रात्यक्षिक वा अनुभविक शिक्षण अधिक लवकर ध्यानांत येतें व ग्रहण होतें. केवळ पुस्तकें वाचून शब्दांत ती वस्तु बसविण्याचा प्रयत्न करूं नये. प्रात्यक्षिकानंतर मात्र हेंच करणें श्रेयस्कर होईल.

कलांचें शिक्षण–

तात्त्विक व औद्योगिक शिक्षणाबरोबर कलाकौशल्याचें शिक्षण तितकेंच नडीचें आहे. चित्रकला, शिल्पकला, नखचित्रें, संगीत इत्यादि नानाप्रकारच्या कला विद्यार्थ्यांस शिकविण्याची सोय पाहिजे. तात्त्विक व औद्योगिक भागाइतकेंच महत्त्व कलाविभागास द्यावयास पाहिजे.

विद्यालयांतील सर्व प्रकारच्या शिक्षणानें विद्यार्थी कार्यनिपुण झाले पाहिजेत. विद्यालयांतील कामें विद्यार्थ्यांनींच स्वतः करावींत. विद्यागृहाची बांधणी व सुधारणा विद्यालयांत तयार झालेल्या विद्यार्थ्यांनीं केली पाहिजे. बगीचा, क्रीडांगण त्यांनींच तयार करावयाचें. विद्यागृहाची शोभा वाढविण्याचें काम तेथीलच कलावन्त विद्यार्थ्यांचें आहे. अशा तऱ्हेनें स्वतः तयार केलेल्या विद्यागृहाविषयीं विद्यार्थ्यांना आपलेपणा वाटून त्यांत ते मन रमवितील.

## परीक्षा

परीक्षांचें स्वरूप–

विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षांचें स्वरूप पार बदलून टाकलें पाहिजे. परीक्षांना भलतेंच महत्त्व देऊन त्यांत तांत्रिकता निर्माण करूं नये. परीक्षेचा उद्देश विद्यार्थ्यांची विद्येंत कितपत प्रगति झाली आहे, त्याची योग्यता काय हें समजावून घेणें हा आहे. परीक्षेंत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यास शिकविलेली विद्या त्याला पूर्णपणें अवगत असली पाहिजे. शिकविलेल्या विद्येचा अंदाज घेण्याकरितां परीक्षा असतात. परीक्षेकरितां विद्या नाहीं. विद्येच्या मागोमाग विद्येच्या अनुरोधानें परीक्षेनें नाचलें पाहिजे. परीक्षेच्या मागोमाग विद्येनें नाचूं नये.

विद्येला सोडून परीक्षेस भलतेंच महत्त्व प्राप्त झालें म्हणजे तें एक तंत्र बनतें. परीक्षेच्या प्रश्नांचा व उत्तरांचा सांचा ठरला जातो. आणि मग मूळ विद्या कांहीं आली नाहीं तरी परीक्षेचें तंत्र बरोबर ध्यानांत घेऊन नेमकें अपेक्षित प्रश्नांचींच उत्तरें तेवढीं तयार करून विद्यार्थी परीक्षेंत उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण होत असतात. पण मूळ विद्येच्या नांवानें पूज्य ! परीक्षा ही एक कला होऊन बसते. असें झालें म्हणजे बुद्धिमान व उत्तम शिक्षित प्रत्येक विद्यार्थी ती कला साधूं शकतोच असें नाहीं. उलटपक्षीं मूळ विद्येपेक्षां परीक्षेचें तंत्र सोपें व यांत्रिक असल्यानें बरींचशीं नालायक मुलें आपली डाळ शिजवून घेतात. पण यामुळें खऱ्या विद्येचा व विद्वानांचा अतोनात तोटा होत असतो हें कोणाच्या ध्यानांत येत नाहीं. विद्यार्थी परीक्षेकरितां तुटपुंजी तांत्रिक तयारी करतात व परीक्षा झाल्यावर ज्या विषयाची परीक्षा दिली त्यांतील त्यांना कांहीं येत नसतें. परंतु यामुळें विद्येची हानि होत असते व अयोग्य माणसांची वर्णी लागते. अयोग्य माणसें कार्य करूं लागलीं तर कार्याला यशाची आशा नसते. समाजसंस्थेंत अशीं मूर्ख माणसें कामास लागलीं म्हणजे समाजसंस्थेची घडी विस्कटूं लागते. यासाठीं प्रचलित परीक्षा-पद्धति, तिचा हेतु हीं समूळ नष्ट करून टाकणें इष्ट आहे.

परीक्षेंत सद्वर्तनास स्थान–

विद्येची परीक्षा घेतांना वर्तनाची परीक्षा घेणें अवश्य आहे. म्हणजे समाजांत विद्वान व सज्जन माणसेंच कामास लागतील. दुराचारी माणसें केवळ क्षणेक परीक्षेंत उत्तीर्ण होऊन समाजकार्यांत पडूं लागलीं म्हणजे समाजांतील स्वास्थ्य मोडण्यास मदत होत असते. समाजांतील कार्यकर्ते जर दुर्वर्तनी निघाले तर समाजव्यवस्थेचें यंत्र आंतून गंजून जाईल व लवकरच अशी एक वेळ येईल कीं सर्व समाज धुळीस मिळाला आहे म्हणून विद्येप्रमाणेंच नैतिक आचरणाकडे परीक्षकांनीं दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

परीक्षा कर्मधर्मसंयोग होऊं नये–

परीक्षा ही कधीं एकाच वेळीं घेऊन मोकळें होऊं नये. कारण हा वेळेचा प्रश्न आहे. सुदैवानें एखाद्या विद्यार्थ्यास विषयाचा अभ्यास संपूर्ण झाला नसतांहि

नेमका एकच प्रश्न येत असतो. तोच आला म्हणजे त्याचें कार्य होतें. तेवढ्यावर तो श्रेष्ठ समजला जातो. परीक्षेच्या वहींत जें दिसेल तेंच त्याचें ज्ञान व तीच त्याची बुद्धिमत्ता ! ती परीक्षा म्हणजे केवळ कर्मधर्मसंयोगाचा योगायोग आहे. याच्या उलटहि कांहीं विद्यार्थ्यांची स्थिति होते. त्यांचा अभ्यास तयार असतो, परंतु एखादाच प्रश्न येत नसल्यास वा आयत्यावेळीं न आठवल्यास किंवा त्यांना परीक्षेची कलाच अवगत नसल्यानें बिचारे परीक्षेंत अयशस्वी होतात ! जणूं कांहीं परीक्षेच्या वहीच्या बाहेर त्यांना कांहींच बुद्धिमत्ता नसते. यासाठीं अशी परीक्षा ही निवळ योगायोग असून त्यांत विद्यार्थ्यांची खरी लायकी दिसून येत नाहीं. परीक्षेंत मुलाच्या दैवाची परीक्षा घ्यावयाची नसून त्याच्या अभ्यासाची असते हें विसरतां कामा नये.

परीक्षेचा विषय विद्यार्थ्यानें ठरवावा—

परीक्षेला विषयाचा जो विभाग नेमावयाचा त्याची निवड परीक्षकानें न करतां विद्यार्थ्यानेंच करावी. जो विभाग तयार आहे असें विद्यार्थ्यास वाटेल व त्याचा त्यानें अभ्यास केला असेल त्याचीच परीक्षा घेणें इष्ट आहे. विषय तयार झाला असें जेव्हां विद्यार्थी म्हणतो तेव्हां त्यावेळीं विषयाची तयारी म्हणजे काय, विषयासंबंधानें आपलें असलेलें ज्ञान तसेंच अज्ञान व त्यावरील त्याचा स्वतःचा आत्मविश्वास या सर्वांची परीक्षा होत असते आणि हेंच महत्त्वाचें आहे. आपल्याला समजलें असें विद्यार्थी केव्हां म्हणूं शकतो व काय कारणानें म्हणतो तेंहि परीक्षण्यासारखें असतें.

परीक्षेला यांत्रिक स्वरूप येऊं नये—

नियोजित विषय संपूर्ण तयार झाला व आतां परीक्षा घेण्यास हरकत नाहीं असें विद्यार्थ्यानें सांगितलें म्हणजे मगच परीक्षकानें परीक्षेस सुरवात करावी. अशा रीतीनें परीक्षा घेतल्यास त्या गटागटानें घ्याव्या लागतील. परीक्षा आजपासून सुरू आहे एवढें मात्र विद्यार्थ्यास सांगावें. परंतु प्रत्यक्ष परीक्षा केव्हां घेणार हें सांगूं नये, परीक्षेची वेळ व दिवस ठराविक नसावा. परीक्षा बरेच दिवस चालली पाहिजे. त्यांतच विद्यार्थ्याचें खरें अंतरंग कळून येतें.

परीक्षा अंतरंगाची असते; बाहेरील दिखाऊ पोकळ भपक्याची नसते. परीक्षेच्या विचारांत परीक्षापूर्व अभ्यास व वर्तन हीं लक्षांत घेणें तितकेंच महत्त्वाचें आहे. नियोजित विषयासंबंधानें प्रश्न वाटेल तेव्हां आडून नडून विचारावेत. उलटसुलट व सर्वांगी प्रश्न असावेत. विषयाचे तात्त्विक व व औद्योगिक वा व्यावहारिक उपयोग आणि महत्त्व विचारलें पाहिजे. प्रस्तुत विषय व्यवहारांतील असल्यास त्यांतील तत्त्व व व्यवहार यांची सांगड घालून तो प्रत्यक्ष व्यवहारांत कसा उतरावयाचा तें कसून विचारलें पाहिजे. नाहीं तर परीक्षा केवळ पुस्तकी तत्त्वाची घेतल्यानें विद्यार्थी पोपटपंची करतील. त्याचा व्यवहारांत होणारा उपयोग माहीत नसल्यानें ते पढतमूर्ख बनतील. अशानें विद्यार्थी निरुपयोगी होतात. विषयांतील ठराविक यांत्रिक प्रश्न सहसा विचारूं नयेत. विषयाचा साकल्यानें विचार करतां आला पाहिजे. त्याचें समाजव्यवस्थेंतील स्थान ओळखतां आलें पाहिजे. विद्यार्थ्यानें दिलेल्या उत्तरांतून त्याचा यांत्रिक पढीकपणा दिसून येत नाहीं इकडे लक्ष पाहिंजे. उत्तरांत त्याची स्वतःची स्वतंत्रबुद्धि तो कितपत उपयोगांत आणतो तें पहावें. केवळ उत्तर अक्षरशः बरोबर आहे म्हणून सोडून देऊं नये. विषयावर स्वतःचीं स्वतंत्र मतें त्याला आहेत कीं नाहींत, असल्यास त्यांचें प्रतिपादन कसें करतो हें कसोशीनें पहावें. परीक्षेंतून त्याचा सखोल अभ्यास दिसून आला पाहिजे. तसाच तो तुटपुंजी पोपटपंची असतां कामा नये. विषयाचें ज्ञान त्यानें चिरंतन स्वरूपाचें करून घेतलें आहे याची खात्री करून घ्यावी. प्रश्नाला उत्तर बरोबर शब्दांत कायदेशीर देणें म्हणजे विषय समजला असें होत नाहीं.

### लेखी व तोंडी परीक्षा–

अकल्पितपणें चांचणी घेतली असतां ती खरी परीक्षा होते. बुद्धीला नीट समजलें असेल व मनावर ठसलें असेल असें चिरंतन स्वरूपाचें ज्ञान त्याचवेळीं विद्यार्थ्यांच्या तोंडून बाहेर पडतें. लेखी व तोंडी अशा दोनहि स्वरूपाच्या परीक्षा सारख्याच महत्त्वानें घेतल्या पाहिजे. जी चांचणी एकांत होत नाहीं ती दुसऱ्यांत होते. तोंडी परीक्षेनें हजरजबाबीपणा, वरिष्ठांशीं बोलण्याची शैली इ. गोष्टी कळून येतात. लेखींत अक्षर, लेखनशैली, सविस्तर ज्ञान, मतप्रतिपादन, खंडनमंडन या गोष्टी परीक्षकाला समजत असतात. याखेरीज दोनहि परीक्षा घेतल्यानें

त्यांत विद्यार्थ्यांचाहि फायदा होतो. ज्याला स्मरण कमी आहे वा हजरजबाबी-पणा नाहीं, त्याला लेखी परीक्षेंत आपले इतर गुण व्यक्त करतां येतात. पण ज्या विद्यार्थ्यांना लिहितां येत नाहीं, जे प्रश्नपत्रिका पाहून घाबरून जातात, ज्यांना आत्मविश्वास नसतो अशा विद्यार्थ्यांना तोंडी परीक्षेचा निःसंशय फायदा होईल. परीक्षकानें त्याला घाबरवून न सोडतां धीर देत देत उत्तरें काढून घ्यावींत. खेळीमेळीनें वागलें म्हणजे विद्यार्थी घाबरून जात नाहीं. त्याला उत्तरें माहीत असतात. पण गांगरून गेल्यामुळें तीं त्याला आयत्यावेळीं सुचत नाहींत.

प्रात्यक्षिकांची परीक्षा–

औद्योगिक विभागांत प्रात्यक्षिकांची परीक्षा घेतांना तीच दृष्टि ठेवणें अवश्य आहे. तात्त्विक विभागांत प्रात्यक्षिकें असलीं तरी तीं तात्त्विक स्वरूपाचींच असतात. त्यांचा व्यवहारांत उपयोग होतोच असें नाहीं. विषयांचीं तत्त्वें उत्तम समजावींत हाच त्यांतील प्रधान हेतु असतो. परंतु औद्योगिक विभागांत प्रात्यक्षिकांवरच पुढील आयुष्य अवलंबून असतें. प्रात्यक्षिकाला त्या विषयाच्या तात्त्विक अभ्यासाची जोड मिळाली तर औद्योगिक क्षेत्र अधिक अधिक कार्यक्षम झाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून औद्यो-गिक विभागांत परीक्षेच्यावेळीं तात्त्विकप्रमाणें प्रात्यक्षिकालाहि तितकेंच महत्त्व देणें केव्हांहि इष्ट आहे. त्यांतल्या त्यांत प्रात्यक्षिकाची परीक्षा सुरू असतां अतिशय बारकाईनें नजर ठेवावयास पाहिजे. हत्यारांची दुरुस्ती करणें, त्यांचा योग्य उपयोग करणें, साधनें उपलब्ध नसतांहि आहे त्यांत भागवून काम करून दाखविणें इ. गोष्टी विद्यार्थ्यांना येणें अवश्य आहे. वेळ, पैसा व शक्ति यांची शक्य तो बचत करून जास्तींत जास्त सुंदर काम करणें यांत कौशल्य लागतें तशी त्याची नडहि कित्येक वेळां भासते.

परीक्षेंत वैयक्तिक लक्ष द्यावयास हवें–

सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा एकदम सुरू करूं नये. जितके जास्त विद्यार्थी परी-क्षेला असतील तितकें जास्त दुर्लक्ष त्यांच्याकडे होत असतें. म्हणून विद्या-र्थ्यांच्या सोयीप्रमाणें एकेकाची परीक्षा घेणें विद्यार्थ्यांच्या हिताचें आहे.

# विद्यार्थी ते विद्यापति

विद्यालयाची घटना—

आतां विद्यालयाची घटना कशी असावी त्याचा विचार करूं. विद्याभ्यासासाठीं मदत व वर्तनावर देखरेख याकरितां गुरूचा सहवास विद्यार्थ्यास जितका अधिक मिळेल तितका अवश्य आहे. म्हणून प्रत्येक गुरूच्या हाताखालीं फक्त दहाच विद्यार्थी असावेत. एका गुरूकडे एका विभागांतील एकच विषय शिकवावयास असावा. दहा विद्यार्थी म्हणजे सुमारें वसतिगृहांतील तीन खोल्या एका गुरूकडे आल्या. याप्रमाणें प्रत्येक विषयांतील दहा विद्यार्थी या हिशेबानें जितके विषय तितके हे गट पडतील. एका विषयांत एकच गट असावा. सर्व विषयांचे मिळून जितके गट होतील त्या सर्वांना एक वर्ग म्हणावा. या वर्गात तात्त्विक व औद्योगिक सर्व प्रकारच्या विषयांचे गट असले पाहिजेत. ह्या वर्गावर एक गुरु प्रमुख असावा. त्याच्याकडे या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साधनपूर्तीची जबाबदारी राहील. विद्यार्थ्यांची वैयक्तिक जबाबदारी त्याच्यावरच आणि गटगुरूंच्यावर देखरेख करणारा तोच. वसतिगृहांतील खोल्यांची मांडणी या गटाप्रमाणें असावी. वर्गाच्या गुरुप्रमुखाची वसति या खोल्यांना लागूनच पाहिजे. अशा दहा वर्गांचें एक कुल असावें. त्या कुलाचा प्रमुख कुलगुरु रहावा. कुलगुरूचा मदतनीस म्हणून उपकुलगुरु आवश्यक आहे. या दोघांनीं आपणाकडे गट वा वर्ग घेऊं नये. आपल्या कुलांत उत्तम व्यवस्था चालली आहे याकडे सतत डोळ्यांत तेल घालून लक्ष दिलें पाहिजे. वसतिगृहाची व्यवस्था वर्गवार असावी. असें कुल लहान गांवांत एक असावें. गांवाची संख्या तेवढी नसल्यास आसपासचीं जवळचीं खेडीं मिळून एक मध्यवर्ति कुल स्थापन करावें. मोठ्या शहरांतून एक-दोन-तीन पर्यंतच कुलांची संख्या जावी. प्रत्येक खेडोंपाडीं कुलांची व्यवस्था झाली तर शहरांतून गर्दी होणार नाहीं. अशी विद्यार्थ्यांची भरमसाट गर्दी होऊं नये हें शिक्षणशास्त्राच्या दृष्टीनें हितावह आहे. तालुक्यांतील कुलांचा एक कुलनायक असावा. याप्रमाणें जिल्हा, प्रांत यांचे असावेत. सर्व देशांतील कुलांचा प्रमुख विद्याकुलपति हा देशांतील राजधानींत राहणारा सर्वश्रेष्ठ शिक्षणाधिकारी समजावा. त्याच्यावर राजसभेंत प्रतिनिधि म्हणून विद्यापति हा असावा.

हा, राजा व विद्याखातें यांतील दुवा होय. विद्याकुलपति हा देशांतील सर्व कुलांची व्यवस्था पाहणारा अधिकारी होय. यानें विद्याखात्यांत राजाकडून जी मदत वा सुधारणा हवी असेल ती राजसभेंतील त्यांचा प्रतिनिधि विद्यापति यांचे मार्फत करावी.

गुरुकुलांचा परस्परांशीं संबंध–

कुलाकुलांतील भिन्नवर्गांमध्यें सहकार्य असावें. एकाचा दुसऱ्याशीं संबंध दोन घरोब्याच्या कुटुंबाप्रमाणें पाहिजे. शिक्षणाच्या उपकरणाबाबत दोघांनीं एकमेकांच्या सोयीप्रमाणें त्यांचा उपयोग करून घ्यावा. दोन वर्गांत व दोन कुलांत वैरभाव उत्पन्न होऊं नये. द्वेषाच्या पायावर उभारलेल्या चढाओढी होण्याचें कारण नाहीं. या दोन स्वतंत्र खासगी संस्था नसल्यामुळें बाजारभाव चढण्याउतरण्याचा व वैमनस्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. एक दुसऱ्यास खाण्याकरितां नसून तीं एकमेकांस पूरक आहेत. दोन कुलांनीं एकमेकांस नेहमीं भेटी द्याव्यात.

गटाचा गुरु व विद्याकुलपति हे दोघे मानानें सारखेच आहेत. वृत्तीनें व विद्येनें दोघांत कांहीं फरक नाहीं. केवळ शिक्षणाच्या सोयीकरितां असे व्यवस्थापनेच्या दृष्टीनें भेद पाडले आहेत.

गुरुदक्षिणा–

विद्यालयाच्या शुल्काची सक्ति नसावी. गोरगरिबांस मोफत शिक्षण द्यावें. ज्याची जशी ऐपत असेल त्याप्रमाणें शिक्षण संपवून विद्यालय सोडतांना गुरूच्या हातावर दक्षिणा ठेवावी. गुरूनें ती विद्यालयाचा अधिकारी या नात्यानें तिचा स्वीकार करून आलेली दक्षिणा विद्यालयाच्या आर्थिक खात्याकडे पोंचती करावी.

विद्यार्थ्यांचें शिक्षण–

विद्यार्थी शिशुविद्यालयांतून तरुण विद्यालयांत सुमारें आठ वर्षांचा असतांना येईल. तेव्हांपासून वयाच्या चोवीस वर्षांपर्यंत विद्यालयांत राहून आपला विद्याभ्यास करावा आणि भावी आयुष्यांत स्वतःच्या पायावर उभें राहतां येईल इतकी पूर्व-

तयारी करावी. विद्यालयांतील शेवटच्या दिवसांत गुरूनें जाणाऱ्या विद्यार्थ्यास विवाहविषयक शिक्षण द्यावें. त्यांत लैंगिक शिक्षण, विवाहाचें महत्त्व, त्याची जबाबदारी, वधू कशी पसंत करावी, पतिपत्नींचें नातें, पत्नीसमवेत संसारांत लोकांशीं कसें वागावें, कुटुंबाची जबाबदारी, इ० गोष्टी विद्यार्थ्याला माहीत असणें भाग आहे. म्हणजे विवाहसौख्य मिळून अयोग्य विवाहामुळें समाजांत होणारा तरुणतरुणींचा व कुटुंबांचा ऱ्हास या अनिष्ट गोष्टींना आळा बसेल. कुटुंबें भरभराटीस येतील.

शिशुविद्यालयांतून मुलगा अगदीं प्राथमिक शिक्षण घेऊन नियंत्रित शिक्षणास योग्य असा होऊन तरुण–विद्यालयांत येतो. त्यानंतर सर्व शिक्षण एकाच गटांत व एकाच गुरूच्या हाताखालीं होणें इष्ट आहे. अनेक वर्षांच्या सहवासानें आपलेपणा निर्माण होतो व मानसशास्त्रीयदृष्ट्या गुरूला शिक्षण देणें फार सोपें जातें. उच्च शिक्षण तेथेंच व्हावें. गुरुच तसा विद्वान् पाहिजे. अथपासून इतिपर्यंत सर्व शिक्षण त्यास देतां आलें पाहिजे.

उत्तम शिक्षण देऊन नवी पिढी जर आदर्शभूत तयार करावयाची असेल तर त्या पिढीला तयार करणाऱ्या शिक्षकांना तयार करणें आदिकर्तव्य ठरतें. तपश्चर्येशिवाय खरा शिक्षक नाहीं.

गुरूची योग्यता–

अशा शिक्षकांचे म्हणजे आदर्श गुरूच्या अंगीं मुख्यतः विद्वत्ता, शिकविण्याची शैली आणि उदात्त आचरण हे तीन गुण अगदीं आवश्यक आहेत. त्यावांचून तो 'गुरु' या पदवीस अपात्र आहे.

गुरु म्हणजे साक्षात् विद्यासागरच असला पाहिजे. सरस्वती त्याच्यापुढें हात जोडून त्याच्या आज्ञेची वाट पाहात उभी राहिली पाहिजे. यावर तर गुरूची सर्व भिस्त आहे. वाह्यात मुलांनींहि त्याच्यापुढें गप्प बसावें अशी त्याची विद्वत्ता हवी. तरच या वाह्यात मुलांच्या पुढें त्याचा निभाव लागण्यास आशा आहे. विद्वत्तेच्या जोरावरच आपलें वजन सर्वत्र राखतां येईल. पण याखेरीज गुरु या शब्दांतच विद्वत्तेचें माहेरघर म्हणून प्रतीत होतें. जें शिकवावयाचें तेंच जर पूर्णपणें माहीत नसेल तर शिकविणार काय? गुरु आपापल्या शाखेंत तज्ज्ञ पाहिजे. तसें नसल्यास गुरु–विद्यालयांत ही उणीव भरून काढली जाईल.

गुरूचें कार्य, विद्येचें सातत्य टिकविणें-

परंतु स्वतःजवळ पुष्कळ असलें तरी जर तें दुसऱ्यास अर्पण देऊं शकलों नाहीं तर त्याचा काय उपयोग ? गुरूची व्याख्याच ही कीं, जो आपली विद्या दुसऱ्यास नीट समजावून देऊं शकतो. विद्येची ज्योत परंपरेनें सतत तेवत ठेवणें हेंच तर खऱ्या गुरूचें जीवितकार्य. तेव्हां विद्वत्तेबरोबर शिकविण्याची कला पूर्णपणें अवगत असणें तितकेंच महत्त्वाचें आहे. शिकवावें कसें, शिकवितांना काळजी कोणती घ्यावयाची, इ० गोष्टी मागेंच सांगून झाल्या आहेत; त्याची पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं. शिकवितांना शांत स्वभाव, सहानुभूति व कल्पनेची स्पष्टता हे तीन गुण प्रथम पाहिजेत. एकदम कठीण प्रश्नाला हात घालूं नये. विद्यार्थ्यांची विषयानुकूल मनोभूमिका तयार करून साध्या व्यवहारांतून हवें असलेलें तत्त्वज्ञान काढून दाखवावें, म्हणजे तत्त्वज्ञानाचा त्या कठीण प्रश्नाचा बाऊ वाटत नाहीं. विषय मातृभाषेतून शिकविणें अभिमान म्हणून आवश्यक असलें तरी शिक्षकाच्या समजावून देण्याच्या दृष्टीनें व विद्यार्थ्यांच्या समजून घेण्याच्या दृष्टीनें मातृभाषाच सर्वांत सोयीची आहे. शिकवितांना नेहमीं नाविन्य दिसावें. नाविन्यामुळें विद्यार्थ्यांच्या मनांत उत्सुकता, गोडी व एकाग्रता निर्माण होते; कंटाळा येत नाहीं. विषयाकडे दुर्लक्ष केलें जात नाहीं. एखाद्या विषयांतील नेमलेला भाग समजावून देण्यापेक्षां त्या विषयाची विद्यार्थ्यांना गोडी लावणें हें अधिक महत्त्वाचें कार्य आहे.

शिक्षकास मानसशास्त्र अवगत पाहिजे.-

शिक्षकाला मानसशास्त्र अवगत असणें अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या मनाची पकड त्यास घेतां आली पाहिजे. त्याच्या जन्मतः प्रवृत्ती ओळखून त्यांना योग्य वळण देणें शिक्षकाला जमलें पाहिजे. शिकवितांना विद्यार्थ्यांची मनःस्थिति लक्षांत घ्यावयास पाहिजे. मन आनंदी व मोकळें नसल्यास—मनाला त्रास झालेला असल्यास वा अन्य कारणानें मन दुखावलें गेलें असल्यास किंवा मनांत दुसरा कोणता तरी विचार सारखा घोळत असल्यानें मन अस्वस्थ झालें असल्यास त्या विद्यार्थ्याच्या डोक्यांत कांहींच प्रकाश पडणार नाहीं. याकरितां दुसऱ्याची मनःस्थिति ओळखून ती वळणावर आणण्यासाठीं मानसशास्त्राचें ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थी मनानें वा शरीरानें थकलेला वा त्रासलेला असेल तर

त्यावेळीं त्यास शिकविण्याचा अट्टाहास धरूं नये. त्यास सहानुभूति दाखवून त्याच्या मनाला दुःख हलकें होऊन बरें वाटेल असें करावें. विद्यार्थी रागावला असल्यास गोडीनें राग घालविण्याचेंहि कौशल्य शिक्षकास साधलें पाहिजे. आपल्या-वर तो रागावेल असा प्रसंग तर शिक्षकानें कधींच आणतां कामा नये. विद्यार्थी कितीहि आपल्यावर रागावला तरी आपली उच्चभूमिका न सोडतां त्याला त्याची चूक समजावून देऊन त्याचें मन वळवावें.

शंकाकुल विद्यार्थी–

विद्यार्थ्याचें जीवन शंकाकुल असतें. ज्या विद्यार्थ्याला शंका व जिज्ञासा या दोन गोष्टी माहीत नाहींत तो विद्यार्थीच नव्हे. शिक्षकानें नेमून दिलेला विषय बळेनें त्याच्या डोक्यांत शिरविण्यापेक्षां त्या विद्यार्थ्यालाच नियोजित विषयासंबंधीं शंका व जिज्ञासा उत्पन्न होईल असें वातावरण निर्माण केलें पाहिजे. एवढ्या-साठीं कांहीं काळ प्रत्यक्ष विषय बाजूला राहिला तरी हरकत नाहीं. शिक्षण हें विद्यार्थ्याच्या जिज्ञासा व शंकांतून निर्माण व्हावें. शिक्षकाच्या बळजबरीच्या व्याख्यानांतून होऊं नये. कारण तें शिक्षणच नव्हे. त्याचा विद्यार्थ्याच्या मनावर अपेक्षित परिणाम होत नाहीं. विषयाहून अवांतर शंका विचारल्या असतांना वा जिज्ञासा निर्माण झाली असतां शिक्षकानें परीक्षेच्या दृष्टीनें नियोजित विषयाचा बाऊ करून विद्यार्थ्याच्या शंका व जिज्ञासा दाबून टाकून सक्तीच्या विषयाचें जूं विद्यार्थ्याच्या मानेवर बसवूं नये. ज्ञानाला सीमा नाहीं. ज्ञान हें हवेप्रमाणें स्वैर आहे. जिज्ञासा ही त्या ज्ञानाची शेपूट आहे. तेव्हां त्याला उगाच कांहीं तरी भीतीनें कृत्रिम अडथळा आणून ज्ञानदेवीच्या शृंगारात्मक विहाराचा विरस करूं नये. हा विरस करण्याइतकें खरा गुरु दुसरें कोणतेंहि मोठें पाप करूं शकत नाहीं.

याकरितां विद्यार्थ्याची जिज्ञासा वाढवून त्याचें शंकानिरसन करणें—नव्हे त्या अधिक वाढविणें यांत शिक्षकानें खंड पाडतां कामा नये. विषयांतर झालें तरी कांहीं बिघडत नाहीं. विद्यार्थ्यास सर्व बाजूंनीं ज्ञान आपोआप मिळेल. शिक्षकानें एकच प्रश्न विचारावा परंतु विद्यार्थ्याच्या मनांत हजारों प्रश्न त्यामुळें निर्माण व्हावेत.

गुरूचे गुण–

शिकविण्याची शैली ही कांहीं लोकांना उपजतच असते. असेच विद्वान् निवडून त्यांना शिक्षक केले पाहिजेत. शिकविण्याची हातोटी नाहीं पण विद्वत्ता मात्र अथांग भरलेली आहे अशांना राजसभेंत वा विद्याक्षेत्रांतच अन्य ठिकाणीं कीं जेथें केवळ विद्वत्तेचीच गरज आहे अशा जागांवर नेमून द्यावें. म्हणजे त्यांच्या विद्वत्तेचें चीज होईल. असे विचारवंत हेच समाजाचे अनभिषिक्त नेते होत. समाजाची उच्चता राखणें, योग्य वळण देणें व समाजस्थितीचें साकल्यानें परंतु बारकाईनें निरीक्षण करून त्याप्रमाणें नवीन सिद्धांत काढून समाजास दिशा देणें हेंच त्यांचें जीवितकार्य होय. अशांच्या गुणांचें चीज केलें नाहीं तर त्या गुणी माणसांचे स्वतःचे, त्यांच्या विद्येचे व समाजाचे नष्टक्षण जवळ आले असें समजावें.

गुरूच्या वरील दोन गुणांहूनहि सर्वांत श्रेष्ठ गुण म्हणजे त्यांचें सद्वृत्त हृदय. या एका गुणामुळें वरील दोन गुणांचा अभाव असला तरीहि तो मनुष्य सर्व समाजाचा गुरु होऊं शकतो. अनुकरण पद्धतींत शिक्षणाचा पाया गुरूचें सद्वर्तन हाच आहे. स्वतः सद्वृत्त राहून लोकांस आपल्यासारखें राहण्यास प्रवृत्त करणें हें त्या गुरूचें आदिकार्य आहे. गुरु स्वतः सद्वृत्त असला म्हणजे वाटेल त्या प्रकारच्या विद्यार्थ्याला वळणावर आणण्यास आशा आहे.

गुरूंना शिकविणारें गुरुविद्यालय–

हे तीन गुण गुरुविद्यालयांत भावी गुरूंना उत्तम प्रकारें शिकविले पाहिजेत. गुरु ही व्यक्ति समाजानें बनवावयाची आहे. गुरु तयार करण्याचें शिक्षण निराळेंच आहे. कोणासहि गुरुचा अधिकार एकदम देणें योग्य नाहीं. गुरुपणाचें एक तंत्र आहे. ती गुरुत्वाची तपश्चर्या एवढी झालीच पाहिजे. पांच वर्षांनंतर गुरुविद्यालयांतील विद्यार्थी गुरु म्हणून कार्य करण्यास पात्र होईल. या पांच वर्षांच्या तपश्चर्येंत त्यानें आपल्या बुद्धीचे व मनाचे कानेकोंपरें घांसून कोंदणांत बसतील असे योग्य केले पाहिजेत. विद्यार्थ्यांशीं वागावें कसें, त्यांना वागवावें कसें त्यांचें, मानसशास्त्र, त्यांचा विषय, तो समजून कसा द्यावयाचा व स्वतःचें व्रत, नियमित सदाचरण आणि विद्यार्थ्यांच्या शंकांचें निरसन करण्यास लागणारें आवश्यक इतर ज्ञान या सर्व गोष्टी गुरुविद्यालयांत शिकविल्या गेल्या पाहिजेत.

गुरूचा चरितार्थ–

गुरूला दर महिन्यास पगार मिळणार नाहीं. त्यानें आपल्या कुटुंबासहित वसतिगृहाच्याच अगदीं लागून एका बिऱ्हाडांत राहावें. उदरनिर्वाहाची योग्य ती व्यवस्था राजसभा करील. त्यानें आपला सर्व काळ अध्ययन व अध्यापन यांत घालवावा. त्यानें शक्यतों आपल्या विद्यार्थ्यांस निसर्गांत राहून शिक्षण द्यावें.

गुरूनें विद्यार्थ्यांना आपल्या पोटच्या मुलांप्रमाणें संभाळलें पाहिजे. त्यांच्या प्रकृतीची, खाण्यापिण्याची, सर्व काळजी गुरूनें पत्करावयाची आहे.

याप्रमाणें गुरूचें कर्तव्य फार कठीण आहे. हें सामान्य माणसास साधावयाचें नाहीं. समाजांतून योग्य अशीं माणसें निवडून राजसभेनें त्यांना गुरुविद्यालयांतून शिक्षण देऊन तयार करून घेतलें पाहिजे.

## स्त्रीशिक्षण

भिन्न शिक्षण कां हवें !–

सहशिक्षणाचा उपयोग समाजधारणेस व्हावा तसा होत नाहीं; उलट झाला तर तोटाच होतो. स्त्रीपुरुषांच्या भिन्न मनोरचनेप्रमाणें व कर्तव्यभिन्नतेप्रमाणें जें वेगळें शिक्षण द्यावयास पाहिजे तें सहशिक्षणांत दिलें जात नाहीं. त्यामुळें आपापलीं कर्तव्यें पार पाडण्यास पोषक व आवश्यक लागणाऱ्या गुणांचें शिक्षण सहशिक्षणांत मिळूं शकत नाहीं. म्हणून स्वकर्तव्यें पार पाडण्यास स्त्रीपुरुष दोघेहि असमर्थ ठरतात. समाजांतील घटकांत स्वकर्तव्याविषयीं अज्ञान पसरूं लागलें म्हणजे समाजाची घडी सुरळीतपणें टिकणें कठीण जातें.

स्त्री–पुरुषांना एकाच तऱ्हेचें शिक्षण देतां येणार नाहीं. समाजांत स्त्रीपुरुषांना एकत्र राहूनच दोन भिन्नभिन्न क्षेत्रांत चतुर्विध पुरुषार्थ साधून आपल्या जन्माचें सार्थक करून घ्यावयाचें असतें. ही कामाची वांटणी निसर्गानेंच दोघांच्या प्रकृतीनुसार केलेली आहे. आणि ती दोघांसहि हितावह आहे. दोनहि क्षेत्रें सारख्याच

प्रतीचीं असून कोणतीहि अपमानास्पद नाहीं. पुरुषाला त्याच्या स्वभावधर्माप्रमाणें आणि नैसर्गिक शरीरानुकूलतेमुळें बाहेर जगाच्या झंजावातांत झगडून पराक्रमानें मिळकत आणणें हें काम करावें लागतें. त्याच्या पुरुषी स्वभावाला अनुसरून घरांतील नाजूक मनाची स्थिरता व शांतता लागणारें व सातत्यानें करावें लागणारें असें मुलांचें संगोपन, स्वयंपाक, व मिळकतीचें संरक्षण व मितव्यय, घरांतील संसाराची व्यवहारचातुर्यानें ठेवावयाची व्यवस्था इ० गोष्टी पुरुषाला जमणार नाहींत. उलट धडाडीचें, शारीरिक कष्टाचें व पुष्कळ वेळेस कठोर मनाचें काम स्त्रीला तिच्या शरीरप्रतिकूलतेमुळें व स्वभावभिन्नतेमुळें करणें शक्य नाहीं. आपत्काळीं कोणाचें काम कोणास करावें लागेल त्याचा नियम नाहीं; अशा वेळीं सामान्य कालांतील भूमिका बदलावयास हवी. एवढ्याकरितां स्त्रीपुरुषांना सर्व प्रकारचें शिक्षण द्यावें हें मान्य आहे. पण आपत्कालाचा अनवाद आणि नियम यांत भेद आहे. आपत्कालीं परिस्थितीस तोंड देतां यावें म्हणून त्याची तयारी करणें निराळें आणि सर्वसामान्य काळांतील नियमित शिक्षणाची दिशाच बदलणें वेगळें. नेसत्या वस्त्रानें पेट घेतला असतां लज्जा दूर ठेवून वस्त्र तत्काळ फेडून टाकणें त्यावेळीं हितावह व सर्वमान्य होईल परंतु केव्हां तरी होणाऱ्या अपघाताच्या भीतीनें बारा महिने, चोवीस तास विवस्त्र राहिलें तर तें कितपत हितावह व मान्य ठरणार आहे ? स्त्रीपुरुषांचें शिक्षण भिन्न असावें हेंच योग्य.

मुलामुलींच्या शीलाला जबाबदार शिक्षणदाते–

सहशिक्षणामुळें मुलांमुलींच्या शीलावर वाईट परिणाम होईल ही भीति शिक्षणदात्यांना कमीपणा आणणारी आहे. भीति उत्पन्न झालीच तर तो शिक्षणदात्यांचा दोष आहे. शिक्षणाचा नाहीं. शिक्षकाच्या शिक्षण देण्याच्या पद्धतीवर व त्याच्या स्वतःच्या वर्तनावर हें सर्व अवलंबून आहे. शिक्षक जर खरोखर योग्य असतील तर सहशिक्षणाचा परिणाम समाजाला हितकारक झाला पाहिजे. परंतु सध्यां हा होत नसेल तर त्याला शिक्षणदातेच जबाबदार धरले पाहिजेत.

स्त्रीजीवनांतील प्रमुख कार्य म्हणजे प्रजोत्पादन, प्रजासंगोपन, कुटुंबव्यवस्था. विद्यार्जन हें आनुषंगिक परंतु आवश्यक आहे. त्याच्या खालोखाल स्त्री म्हटली

म्हणजे तिला कला ही आली पाहिजेच. स्त्रीच्या ह्या कार्यक्षेत्राप्रमाणें तिला शिक्षण देऊन तयार करणें आवश्यक आहे.

महिला विद्यालय–

महिला विद्यालय गांवाच्या बाजूस पण विद्याकुलापेक्षां निराळें असावें. विद्याकुल गांवाबाहेरच असतें. कुलगुरु हा महिलाविद्यालयावर देखरेख करणारा असावा. बाकी सर्व अंतर्गत व्यवस्था स्त्रियांनींच करावी. यांत हेतू आहेत. पहिला हेतु हा कीं अनाथ स्त्रियांच्या आयुष्यास आधार मिळेल. त्यांनीं विद्यालयांत कार्य करावें. अविवाहित किंवा विधवा विदुषींचें चीज होईल. स्त्रियांकरितां करावयाचीं कामें स्त्रियांनींच केलीं तर तीं आत्मीयतेनें पार पडून स्त्रीपुरुषांच्या समाईक व्यवस्थेंत जो घोटाळा होतो तो होणार नाहीं. अविवाहित, विधवा, निराश्रित इ० स्त्रियांना आयुष्यांत विशिष्ट कार्यक्षेत्रानें बांधून गेल्यामुळें व उदरनिर्वाहाची विवंचना दूर झाल्यामुळें वाममार्गास जाणें रुचणार नाहीं. व तशी परिस्थितिहि त्यांच्यावर येणार नाहीं. अशा स्त्रिया समाजांत अनिर्बंध व रिकामें आयुष्य घालवूं लागल्या म्हणजे अनाचारांस प्रारंभ होऊन सामाजिक प्रश्न उत्पन्न होतात. स्त्रियाच सुलभ नसल्या म्हणजे पुरुषांची दृष्टि त्या बाजूस साहजिकपणें कमी जाते. स्त्रियांच्या अंगावर जबाबदारीचीं कामें टाकल्यामुळें त्या कार्यक्षम बनून त्यांची शक्ति समाजाच्या कारणीं लागते. स्त्रीसमाजांत त्या आपोआपच सुधारणा करूं लागतात. त्यांतूनच कर्तृत्ववान् स्त्रिया निपजतात. शिवाय स्त्रियांचें खातें स्वतंत्रपणें त्यांच्याकडे सोपविल्यामुळें त्यांच्यामुळें त्यांच्या बाबतींत पुरुषांकडून होणारा हलगर्जीपणा व अन्याय येथें होणार नाहीं. महिला विद्यालयाचें स्वरूप सर्वस्वी पुरुषांच्या विद्याकुलाप्रमाणेंच राहावें.

लहान मुलींचें शिक्षण–

वयाच्या आठव्या वर्षापर्यंत मुलीस आईनें घरींच शिक्षण दिलें पाहिजे. तें कशा प्रकारचें असावें हें ‘ स्त्री ’ या प्रकरणामध्यें आलेंच आहे. आठव्या वर्षी मुलीला विद्यालयांत घालून तेथें तिच्या प्राथमिक शिक्षणास सुरवात व्हावी. म्हणजे

व्यवहारांत उपयोगीं पडणारें गणित, भाषा, कला इ. प्रकारचें शिक्षण सर्व मुलींस सारखेंच असावें. परंतु यापुढें विद्यार्थिनींचे बारीक बारीक गट पाडून त्यांना विषयाचें उच्च शिक्षण द्यावें. सर्वसामान्य मुलीस म्हणजे विवाह करून संसार थाटावयाचा आहे अशा मुलीला खालील विषय शिकवावेत. व्यवहारापुरतें गणित, भाषा, इतिहास-भूगोल, देशांतील थोर व्यक्तींचीं चरित्रें, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र, कला, स्वयंपाक, बालसंगोपन, गृहव्यवस्था, धार्मिक ज्ञान इत्यादि विषय सखोलतेनें शिकविले गेलेच पाहिजेत. याच्या जोरावर ती आपल्या मुलांस पुढें तयार करणार आहे हें लक्षांत ठेवावें.

स्त्रियांच्या गुणांचा उपयोग—

स्त्रियांना विद्येची लालसा उत्पन्न होऊन शास्त्रीय दृष्टि आली तर वरील शिक्षणाचा हेतु सफल होईल. स्त्रियांच्या अंगीं असे गुण आहेत कीं, त्यांचा समाजास उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं. परंतु याच्या अभावीं समाजाचें किती नुकसान होतें हें ध्यानांत येत नाहीं. ध्यानांत न येण्याचें कारण आहे. स्त्रियांच्या गुणोपयोगामुळें होणारा फायदा हा प्रगतिरूप आहे. त्यामुळें गुणांचा उपयोग करून न घेतल्यास फार तर पुढील प्रगति खुंटेल. नवीन सुधारणा होणार नाहीं. परंतु आहे त्यांत कमी पडत नाहीं. असें प्रत्यक्ष नुकसान झालें नाहीं म्हणजे आहे ती परिस्थिति बरी वाटून त्यांतच समाधान मानून घेण्याची प्रवृत्ति होते. यामुळें आपली साकल्यानें होणारी चिरकालीन प्रगति—संस्कृति खुंटते. हें भावी काळांतील काल्पनिक नुकसान दृष्टीआड होणें अगदीं साहजिक आहे.

प्रगतिरूप फायदा न मिळाल्याचा तोटा—

आमच्या स्त्रियांना शास्त्रीय दृष्टि व ज्ञानलालसा नाहीं म्हणून अत्यंत महत्त्वानें प्रगत होणारें बालमानसशास्त्र व तच्छास्त्रज्ञ स्त्रिया आमच्यांत होऊं शकल्या नाहींत. त्यामुळें समाजाचा तात्कालिक तोटा काय झाला ? कांहींच नाहीं. पण शास्त्रें दडून जाऊन आमच्या स्त्रियांनीं चुलीपुढील बायकी कामेंच करावींत, यापलीकडे त्यांना बुद्धिच नाहीं हें सिद्ध होत नाहीं काय ? जर स्त्रिया तशा निर्बुद्ध नसत्या तर आमच्या समाजानें जगांत केवढी आघाडी मारली असती ? त्याला मुकणें हें

नुकसानच नव्हे काय? ज्या मनुष्यास या काल्पनिक समजल्या जाणाऱ्या नुकसानाची मनाला खंत वाटत नाहीं त्याला प्रगतीची आशाच नको.

स्त्रियांना शास्त्रीय दृष्टि पाहिजे—

घरीं बसल्याबसल्याच स्त्रियांना कितीतरी गोष्टींचें निरीक्षण करतां येईल. शंका उत्पन्न होऊन जिज्ञासा वाढेल व अभ्यासू वृत्तीस चालना मिळेल. परंतु आमच्यांत ठराविक चाकोरींतून सकाळपासून संध्याकाळपर्यंत दिवस घालविण्यापलीकडे इतर गोष्टी करण्याची माहितीच नाहीं.

स्वयंपाकशास्त्रांतच त्यांना कितीतरी प्रगति करतां येण्यासारखी आहे. स्वयंपाक पद्धतींत व पदार्थ यांत सुधारणा करून शास्त्रोक्त आहारपद्धति तयार करतां येणार नाहीं काय? रोजचा आहार हा शास्त्रोक्त होऊं लागला तर समाजाचें आरोग्यदृष्ट्या कितीतरी हित होण्यासारखें आहे. स्त्रियांना शरीरविज्ञानाची, आरोग्यशास्त्राची आणि नित्योपयोगी वनस्पतिशास्त्राची, तसेंच थोडी रसायनशास्त्राची जरूर तीं माहिती असली म्हणजे जिज्ञासेनें स्वयंपाकांत प्रयोग करण्यास सुलभ जाऊन ते शास्त्रोक्त होतील. आमच्या लोकांना कोणता आहार मानवेल तें परक्या हवामानांतील, परक्या वेश-संस्कृतींतील व परक्या वनस्पतीच्या प्रदेशांत राहणाऱ्या पाश्चात्यांनीं ठरविणें कितपत सशास्त्र आहे? आमच्या लोकांच्या संवयी, स्वभाव, पथ्यापथ्य, शरीरप्रकृति, हवामान आणि अन्नोत्पादन हें आमच्याच लोकांस जास्त कळणार. शरीरप्रकृतीला तद्देशीय अन्नच मानवतें. शास्त्रीय अन्न रोजच्या व्यवहारांत उपयोगासाठीं सोयीचें व रुचकर कसें करतां येईल हें स्त्रियांनाच अधिक कळण्यासारखें आहे. आहारविषयक आरोग्याची बाजू आपल्याकडे घेणें हें विदुषी स्त्रियांचें काम आहे. आणि अशा स्त्रिया तयार करणें हें महिला विद्यालयाचें काम आहे. किंबहुना ज्या विदुषी संशोधक म्हणून काम करण्यास तयार असतील त्यांना आवश्यक तीं साधनें देऊन त्यांची विद्यालयाकडूनच व्यवस्था झाली पाहिजे.

स्त्रियांची मौलिकता वाढली पाहिजे—

कलेची व सौंदर्याची प्रगति स्त्रियांकडूनच अपेक्षिणें अधिक योग्य होईल. नवीन

नवीन प्रकारच्या कला शोधून काढणें, जुन्या कलांत सुधारणा करणें हेंच महत्त्वाचें कार्य आहे. पूर्वापार चालत आलेल्या कला आहेत त्याच सारख्या घोटणें प्रगतीला तितकेंसें पोषक नाहीं. अर्थात तेंहि कमी महत्त्वाचें व कमी श्रमाचें कार्य नव्हे हें निःसंशय आहे. परंतु कलोपासनेच्या वरील दोन प्रकारांत पहिला प्रकार तौलनिक-दृष्ट्या केव्हांहि उच्चतर व कौतुकास्पद आहे हें मान्य केलें पाहिजे. महिला-विद्यालयानें ही मौलिकतेची वृत्ति स्त्रियांच्यांत निर्माण करावयास हवी आहे.

स्त्रियांनीं करावयाचा अभ्यास–

स्त्रियांना घरगुती सर्व प्रकारचा व्यवहार करावयाचा असतो. त्यांचा पैशाशीं नित्य संबंध आहे. यास्तव व्यावहारिक गणित स्त्रियांना अवगत असणें आवश्यक आहे. त्यावांचून स्वतःच्या मुलांस पहिले कांहीं दिवस घरींच शिक्षण द्यावयाचें असतें. म्हणूनहि गणिताचें ज्ञान स्त्रियांना पाहिजे. मुलास शिकविण्याकरितां व स्वतःचें ज्ञान वाढविण्याकरितां मातृभाषा पूर्णपणें अवगत असावयास पाहिजे. मातृभाषा म्हणजे भाषाविषय. त्यांत व्याकरण, लेखन, शब्द व्युत्पत्ति इ० गोष्टींचा समावेश होतो. प्रत्येक व्यक्तीला जगांतील चालू घडा-मोडी माहित असणें चांगलें. त्याकरितां व व्यवहारज्ञान म्हणून भूगोल अभ्यासणें अवश्य आहे. आपले पूर्वज, संस्कृति व देश यांसंबंधीं पूर्ण ज्ञान असणें हें तद्देशी-यांचें कर्तव्य आहे. आपल्या देशाचा इतिहास नीट कळण्याकरितां व त्याचें जगाच्या इतिहासांतील स्थान अजमावण्याकरितां जगाच्या इतिहासाची तौलनिक अभ्यासानें तोंडओळख करून घेणें योग्य होईल. आपल्या इतिहासाचें ज्ञान तर स्त्रियांना उत्तम असावयास पाहिजे. कारण स्वतःचीं मुलें स्वाभिमानी व निष्ठावन्त तयार करण्यास त्याची आवश्यकता आहे.

मुलांना वळण लावण्याच्या दृष्टीनें नीतिशाशास्त्राचीं सामान्य तत्त्वें स्त्रियांना अवगत असलीं पाहिजेत. धार्मिक शिक्षण मुलांना दिली पाहिजे. स्त्रियांना पुरुषांपेक्षांहि धर्माचें ज्ञान अधिक असावयास पाहिजे. पुराणांतील वा धार्मिक कथांतील अनेकविध गोष्टी सांगून मुलें बहुश्रुत करतां येतील. त्यांच्या स्मरण-शक्तीला चालना मिळून मनाला वळण लागेल. चौकसपणाचा व वाचनाचा नाद सुरू होईल.

बालसंगोपनाविषयीं पूर्वी बरेंच सांगून झालें आहे, बालसंगोपनाचें अथपासून इतिपर्यंत शास्त्रोक्त शिक्षण स्त्रियांना दिलें नाहीं तर त्या गृहिणीपदास अपात्र ठरतील.

गृहव्यस्थापन हें सुद्धां एक तंत्र आहे. कांहीं स्त्रियांनाच तें जमतें. इतरांच्या घरांतून सुरळीतपणा दिसून येत नाहीं. आल्यागेल्याचें आदरातिथ्य करणें, घरांतील सर्व लहानमोठ्यांची नित्य काळजी घेणें, योग्य ती काटकसर करून द्रव्यसंचय करणें, स्वयंपाक करणें, रोजच्या भोजनांत पद्धति ठेवणें, कुलाचार व इतर शिष्टाचार पाळणें, किरकोळ दुखण्यावर कांहीं औषधोपचार करणें, घरांतील वस्तु स्वच्छ व व्यवस्थित ठेवणें, त्यांची योग्य जागीं मांडणी करून घर सुशोभित करणें, पैशाचा रोजचा जमाखर्च ठेवणें, वडील माणसांशीं व परक्यांशीं वागण्याची पद्धति इ० गोष्टी गृहव्यवस्थापनेंत येतात. त्यांचें शिक्षण स्त्रीला मिळालें नाहीं तर तिचा संसार सुखाचा होईलच असें सांगतां येणार नाहीं. महिलाविद्यालयानें हें शिकविलें पाहिजे.

सौंदर्यलालसा आणि नटण्याची हौस—

कलेप्रमाणेंच सौंदर्याचीहि स्त्रियांकडूनच अधिक अपेक्षा करणें योग्य होईल. किंबहुना सौंदर्य कलेंतच मोडतें. परंतु सौंदर्य असणें व तें निर्माण करणें ही एक कला असून तिचें एक तंत्र आहे हें पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. सौंदर्यलालसा व नटण्याची हौस यांत भेद आहे. सौंदर्योपासक शास्त्राचा वा कलेचा आधार घेत असून त्याची त्या सौंदर्योपासनेंत सात्त्विक फार तर राजस भावना प्रतीत होते. सौंदर्याचा दुरुपयोग करण्याची प्रवृत्ति वा हेतु नसतो. नटण्याच्या हौसेला मोल नाहीं तसें त्याला शास्त्रहि नाहीं. नटण्याच्या मागील हेतु सहसा उदात्त असूं शकत नाहीं. नटण्यांतील अशास्त्रीय पद्धतीनें आणलेलें सौंदर्य (?) मोहपूर्ण हेतूंतून निर्माण झालेलें असतें. अर्थात् त्याचा परिणाम मोहवशतेंत होणार हें निश्चित. मोहवश मनाचें साध्य साधण्यासाठीं नटणें हें एक साधन असतें.

नटण्याची हौस मागासलेल्या वर्गांतून अधिक दिसून येते. सौंदर्याची लालसा सुसंस्कृत लोकांत आढळते. एक प्रकारच्या विशिष्ट अव्यवस्थितपणांत नटण्यानें आपण फार चांगले दिसून आकर्षक होऊं व लोक आपल्याकडे बघूं लागतील ही

कल्पना मनानें असंस्कृत असणाऱ्यांचे मनांत असते; तर व्यवस्थितपणानें आपल्यांत सभ्यता दिसून दृष्टीलाहि चांगलें दिसेल अशी सुसंस्कृताची कल्पना असते. नटण्याचा हेतु सौंदर्यनिर्मिति नसून इष्ट हेतु साध्य करणें वा चार लोकांनीं आपणाकडे बघत बसावें हा असतो. यामुळें नटणाऱ्याला सौंदर्यशास्त्रांतील नियम पाळण्याचें कारण राहत नाहीं. वेशभूषेप्रमाणें आपल्या बोलण्याचालण्यांतहि कृत्रिम विशिष्टपणा आणण्याचा प्रयत्न तो करीत असतो.

सौंदर्यविषयीं उदासीनता–

सौंदर्यदृष्टि फारशी कोणांत दिसून येत नाहीं. क्वचित् कोणास असल्यास ती व्यवहारांत बेताचीच उतरते. सुशिक्षित लोकांत सौंदर्याची कल्पना असली तथापि ती शास्त्रोक्त नसते. खरें सौंदर्य कशानें निर्माण होतें याचे शास्त्रीयनियम फार थोड्यांना माहीत असतात. त्यामुळें बऱ्याचशा लोकांचें पाऊल व्यवस्थितपणा, स्वच्छता व टापटीप यांपलिकडे फार करून पडत नाहीं. त्यांतच ते समाधान मानतात. पण सौंदर्याविषयीं इतकी उत्सुकता त्यांना नसतेहि. त्या बाबतींत ते उदासीन असतात. उलटपक्षीं छानछोकी करून नटणारे लोक आपण जास्तींत जास्त आकर्षक कसे दिसूं याच्या सारख्या धडपडींत असतात. पण त्या अडाणी आणि अधीर लोकांना शास्त्र कोठून येणार ? मनाच्या चंचलतेमुळें जी आकर्षकता आणूं पाहतात त्या आकर्षकतेमुळेंच ते लोक तिरस्करणीय वाटतात. कारण त्यांच्या छानछोकींतून आणि ऐटींतून सौंदर्योपासन प्रतीत न होतां वाईट प्रवृत्तिच व्यक्त होत असते.

सौंदर्य सात्त्विकतेंत आहे–

मूळांत सौंदर्याचा पाया सात्त्विकतेवर आहे. राजस हें त्याचें बाह्य स्वरूप दिसत असलें तरी त्यांत तामसी वृत्तीचा अभाव असतो. साक्षात् ब्रह्माचें वर्णन करतांना " सत्यं शिवं सुन्दरम् " असें केलें आहे. सात्त्विकतेंतच उच्चतम सौंदर्य आहे असें यावरून दिसतें. सुस्वरूप माणसाच्या ठिकाणीं पापवृत्ति नसते या संस्कृतांतील कविकल्पनेमागें हेंच तत्त्व असलें पाहिजे. सत्त्व आणि तम ( प्रचलित अर्थ ) यांचें वैर असल्यानें तामसांत सौंदर्यनिर्मिति होणें हें परस्परविरोधी आहे.

सौंदर्याचा मुख्य हेतु म्हटला म्हणजे आकर्षता निर्माण करून मनाला आल्हाद देणें. सात्त्विक वृत्ति ही कोणालाहि आकर्षक वाटते. मनुष्य स्वतः तामसी असला तरी त्यास सात्त्विक मनुष्य हवासा वाटतो. आणि लोकांनीं सात्त्विक असावें असेंहि—स्वतः तसा नसला तरी—त्यास वाटत असतें. तामसी वृत्ति प्रत्येका-कडून तिरस्कारिली गेली आहे. तामसी मनुष्य भेटला तर त्याबद्दल तिरस्कार वाटून त्यापासून सुटका होण्याची इच्छा प्रत्येकजण करीत असतो. तामसीपणाचा संताप तामसी माणसालाच फार येतो; सात्त्विकाला येत नाहीं. म्हणजे आकर्षकता व मनाल्हाद तामसापेक्षां सात्त्विकतेनेंच अधिक येतो हें निःसंशय आहे. अर्थात् सात्त्विक वृत्तीनें केलेली सौंदर्यपूजा ही स्वीकार्य वाटते व सर्वमान्य होते. तिच्या-बद्दल आकर्षण निर्माण होतें. तामसी वृत्तीच्या भूमिकेवरून केलेली पूजा तिर-स्करणीय वाटेल. मागें वर्णन केलेली सौंदर्यलालसा व नटण्याची हौस यांत हाच फरक आहे. सात्त्विक सौंदर्यामागें उदात्त भावना असून नटण्यामागें छचोर वृत्ति प्रतीत होते.

सौंदर्याची संगति आणि पार्श्वभूमि—

सौंदर्य केवळ प्रत्यक्ष वस्तूंत असण्यापेक्षां ती वस्तु तिच्या शोभिवंत पार्श्व-भूमीनें सुंदर दिसत असते. निव्वळ वस्तु वाईट नाहीं व चांगलीहि नाहीं. साधीच वस्तु पण तिला पार्श्वभूमि ( Background ) व संगति ( Association) अनुरूप मिळाली तर त्यांतच ती वस्तु सुंदर दिसेल. उलटपक्षीं स्वयंभू सुंदर वस्तु अननुरूप पार्श्वभूमीवर विषम संगतींत ठेवली असतां तिचें सौंदर्य वास्तविक जितकें खुलून दिसावयास पाहिजे तितकें दिसत नाहीं. ती वस्तूच लगेच वाईट होते असा त्याचा अर्थ नाहीं. ती वस्तु जर योग्य स्थानीं ठेवली तर जितकें सौंदय निर्माण होईल त्यापेक्षां कितीतरी कमी सौंदर्य अस्थानीं ठेवल्यामुळें निर्माण होतें. आणि यामुळेंच ती वस्तु अशा विषम संगतींत पाहिल्यावरोवर :वस्तूच्या स्वयंभू सौंदर्याला मान्यता देऊनहि मनाचा एक प्रकारचा थोडासा विरस होतो. वस्तु सुंदर असली म्हणजे सौंदर्यशास्त्रास अनुसरून तिचें रूप रेखीव असणार यांत शंका नाहीं. परंतु तिची संगति अनुरूप असल्यास तिच्याविषयीं पाहाणाऱ्याचे मनांत छाप बसून त्याच्या हृदयाचा ठाव घेते. त्याप्रमाणें अस्थानीं पडलेल्या स्वयंभू सुंदर वस्तूचें एकदम होत नाहीं. रूप रेखीव असल्यानें तें बुद्धीला पटतें एवढेंच. टीका कर-

तांना वस्तु सुन्दर आहे हें बुद्धिबलानें पटवून देतां येईल. पण ती वस्तु भावनेची पकड घेणार नाहीं. रूप रेखीव नसल्यास ज्याप्रमाणें असलेली उणीव स्पष्ट करून सांगण्यासारखी असते, त्याप्रमाणें अननुरूप संगतीच्या अभावाविषयीं नेमक्या शब्दांत सांगणें कठीण आहे. कारण पार्श्वभूमि व संगति यांची सजावट नियमबद्ध नाहीं, ती अनिश्चित व विविध आहे. रूपाची रेखीवता बुद्धीला पटते तर भोवतालची सजावट भावनेवर विलक्षण परिणाम करते.

### मनुष्याचें रूपसौंदर्य–

मनुष्याचा चेहरा सौंदर्यशास्त्राला अनुसरून रेखीव असला तरी तें सौंदर्य चटकन् मनांत भरण्यास पार्श्वभूमीची व संगतीची आवश्यकता आहे. पार्श्वभूमि म्हणजे त्याच्या बोलण्याचालण्यावरून चेहऱ्यावरील घटनेवरून दिसून येणारी मनोवृत्ति आणि संगति म्हणजे त्यानें केलेली वेशभूषा. मनुष्य रूपानें रेखीव असला तरी त्याच्या वृत्तीवरून तो क्रूर व नीच मनाचा दिसल्यास पाहणाऱ्याच्या मनाला त्याचें आकर्षण वाटत नाहीं. तो हवासा वाटत नाहीं. मात्र त्याच्या सौंदर्याविषयीं चर्चा सुरू असतां तो सुंदर आहे, असाच जाब दिला जाईल. पण प्रथमदर्शनी पाहतांक्षणींच तो सुंदर मनुष्य मनांत भरत नाहीं व आपलेपणा वाटत नाहीं. संगतीचेंहि असेंच आहे. सुस्वरूप मनुष्यानें अनुरूप असा पोषाख केला नाहीं तर त्याचें रूप उठून दिसणार नाहीं. सौंदर्य कमी होईल, असें नव्हे. परंतु एवढें खरें कीं त्यानें जर अनुरूप पोषाख केला असता तर तेव्हां जें बहारीचें सौंदर्य असतें तें आतां विसंगतीमुळें नष्ट झालें. त्या बहारीच्या सौंदर्याची प्रथमक्षणींच कल्पना येऊन मनाचा विरस झाल्याशिवाय राहात नाहीं.

### गोड स्वभावामुळें दिसणारें गोड रूप–

एखादा मनुष्य रूपानें दिसायला साधारणच असला तरी तो जर अंतःकरणानें थोर असेल, भावनेनें प्रेमळ असेल तर त्याच्या त्या उदात्त व प्रेमळ स्वभावाची छटा तोंडावर उठल्यावांचून राहात नाहीं. त्यावेळीं पाहणाऱ्याचें लक्ष त्याच्या स्वरूपाच्या रेखीवपणापेक्षां तोंडावर दिसणाऱ्या गोड स्वभावाच्या प्रतिबिंबाकडेच अधिक जातें; पाहणाऱ्याच्या मनाला त्याच्याविषयीं आकर्षण निर्माण होतें; तो हवासा

वाटूं लागतो. सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीनें उणीव असलेल्या साधारण स्वरूपाच्या पण गोड स्वभावाच्या चेहऱ्यामुळें पाहणाऱ्याचा विरस होत नाहीं. उलटपक्षीं असलेल्या उणीवा सुंदर पार्श्वभूमीमुळें झांकल्या जाऊन साधारणच असलेलें रूप आकर्षक वाटतें. हें आकर्षण त्याच्या रूपाचाच परिणाम आहे. स्वभाव ही निराळी वस्तु नसून तिच्या सौंदर्याचा तो परिणाम नाहीं. स्वभाव ही रूपाची पार्श्वभूमि आहे हें प्रथम लक्षांत पाहिजे. आणि पुष्कळ वेळां प्रत्यक्ष वस्तूपेक्षां पार्श्वभूमीलाच सौंदर्याचें श्रेय द्यावें लागतें. तरी प्रत्यक्ष वस्तूची ती पार्श्वभूमि आहे हें विसरून चालणार नाहीं. सौंदर्य वस्तूंत नसून अनुरूप संगतींत असतें. सौंदर्य म्हणजे अनुरूप संगति होय. मग त्यांतील श्रेयाचा भाग कोणत्याहि वस्तूकडे कमीअधिक प्रमाणांत येईल.

### सौंदर्याची विपरीत कल्पना–

अनुरूप पार्श्वभूमि व संगति यांच्या अभावीं आपण पुष्कळ वेळां सौंदर्यहानि करीत असतों. ज्याला सौंदर्यदृष्टि आहे किंवा सौंदर्यशास्त्र अवगत आहे त्यानें वरील गोष्टीकडे अवश्य लक्ष द्यावयास हवें. सौंदर्यशास्त्रांतील ढोबळ नियम जाणण्यास विद्वत्ता लागत नाहीं. त्यांची माहिती मिळवून सौंदर्यदृष्टि थोडीशी आली म्हणजे पुरे आहे. परंतु ही साधी गोष्ट नटवेबाजीच्या नादांत लक्षांत येत नाहीं. कारण नटवेबाजी करणाऱ्यास खरी सौंदर्यजिज्ञासा व लालसा मनापासून कधींच नसते. त्याला कोठून तरी स्वतःला मिरवावयाचें असतें किंवा मोहवश मनाचें समाधान करावयाचें असतें. त्याला शास्त्राचा विचार करण्यास कोठें वेळ आहे? पण यामुळेंच सुशिक्षित तरुणतरुणींच्यामध्यें फाजील नटवेपणा येऊन त्यालाच सौंदर्य समजून मिरवीत असतात. पण अशा प्रकारच्या नटण्यामुळें हे लोक सुंदर दिसावयाच्या ऐवजीं वाईटच दिसूं लागून त्यांच्याविषयीं मनांत एक प्रकारचा तिरस्कार उत्पन्न होतो.

### सौंदर्यदृष्टि श्रीमंतीवर अवलंबून नाहीं–

आर्थिक अडचणीमुळें सौंदर्यदृष्टि प्रत्येक ठिकाणीं ठेवितां येत नाहीं, या म्हणण्यांत तितकेसें तथ्य नाहीं. कारण मग श्रीमंत लोकांची सौंदर्यदृष्टि त्यांच्या व्यव-

हारांत प्रतीत व्हावयास पाहिजे. पण पुष्कळ ठिकाणीं या बाबतींत निराशाच अनुभवास येते. पैसा आहे म्हणून महाग वस्तु घेणें यापलिकडे त्यांत अर्थ राहात नाहीं. वस्तु भारी किंमतीची असली तरी ती सौंदर्यानें कितपत भारी आहे तें पाहिलें पाहिजे. आपल्या घरांत त्या वस्तूला कितपत अनुरूप संगति आहे याचा विचार वस्तु विकत घेतेवेळीं होत नाहीं. संगति नसलेल्या त्या वस्तूला अनुरूप अशा दुसऱ्या गोष्टी विकत घेणें रुचत नाहीं. किंबहुना एकाच गटांत ठेवण्याच्या अनेक वस्तु घेतल्यास त्यांत अनुरूप संगतीकडे लक्ष दिलें जाणार नाहींच पण विसंगतीनें सौंदर्यहानि करणाऱ्या वस्तु मात्र खात्रीनें घेतल्या जातील. सांगावयाचें एवढेंच कीं पैसा असला तरी सौंदर्यदृष्टि असतेच असें नाहीं. दुसरें असें कीं, सौंदर्याविषयीं एक कल्पना सामान्य लोकांच्या मनांत असते. अतिशय भारी किंमतीच्या वस्तूंतच सर्व सौंदर्य सांठविलेलें असतें. त्या वस्तु घेण्याची ऐपत नसली म्हणजे सौंदर्यनाश हा ठरलेला ! पण भारी किंमतीच्या वस्तूंतहि विसंगतीनें सौंदर्यहानि तितकीच होत असते, हें समजत नाहीं. आणि पुन्हां ह्या वस्तूहि अव्यवस्थित मांडल्यानें वाईट दिसतात हें निराळेंच.

सौंदर्य साध्यासुध्या वस्तूंनींहि निर्माण करतां येतें. आहेत त्याच व्यवस्थित आणि कलात्मक दृष्टीनें पार्श्वभूमि आणि संगति ह्यांची त्यांतल्यात्यांतच सजावट करून सौंदर्य वाढवितां येतें. वस्तु नुसत्या टापटिपीनें मांडल्यानें सौंदर्य येत नाहीं. त्या वस्तु एका विशिष्ट पद्धतीनेंच मांडल्या तर सुंदर दिसतात. त्याच वस्तु परंतु मांडणी बदलल्याबरोबर सौंदर्य कमी होतें. हें सौंदर्य कमी होणें आणि निर्माण होणें ज्या विशिष्ट पद्धतीवर अवलंबून आहे त्या पद्धति कळल्या म्हणजे सौंदर्यदृष्टि आली. नेमकें हेंच लोकांना माहीत नसतें.

### सौंदर्याचें जीवनांत स्थान–

सौंदर्याचें मंडन करतांना मनुष्याला खाण्यापिण्याची कमतरता नाहीं, जीवनाला आवश्यक गोष्टी मिळूं शकतात, ही स्थिति कल्पनेंत आहे. जीवनाला सौंदर्याची नड नाहीं हें अगदीं खरें. सौंदर्यावांचून जीवन जगणें सहज शक्य आहे. सौंदर्य-लालसेमुळें मात्र जीवनाला थोडासा अडथळा येण्याची कदाचित् शक्यता असेल. मग या अनावश्यक गोष्टींचें बांडगूळ घेऊन जीवनांत नसतीं लफडीं कशाला ? आपलें

सौंदर्य वाढविण्यापेक्षां जगांत पुष्कळ लोक असे आहेत कीं, ते अन्नपाण्यावांचून उपाशी मरत आहेत. त्यांना तुमच्या उरलेल्या शक्तीचा उपयोग करून दिला तर कितीतरी दीनांवर तुमचे अनंत उपकार होतील! हा बुद्धिवाद प्रथम पटत असला तथापि तो वरकरणी आहे. याहिपुढील विचार केला तर हा बुद्धिवाद टिकणार नाहीं. जगांत सुखी व दुःखी असे भेद नेहमींच चालत राहाणार. निराशेचें वातावरण खूपच दिसणार. पण नेहमीं दुःखांचीच काळजी मनुष्य करीत राहील तर सुखाची बाजू विसरून त्याची कधीं प्रगति व्हावयास नको. बहुतेक सर्व जग दुःखानें गांजलेल्या लोकांनींच भरलेलें आहे. दर थोड्या असणाऱ्या सुखी लोकांनीं या दुःखितांची केवळ काळजी करण्याचेंच पत्करलें असतें तर जगाची जी थोडीफार प्रगति झाली असेल तीहि झाली नसती. जग फार अफाट आहे. त्याप्रमाणें दुःखितांची संख्याहि भयंकर आहे. त्या सर्वांना आपण सुखी करूं शकणार नाहीं हें तितकेंच खरें. मग त्या लोकांना आपण कधींहि प्रत्यक्ष सुख देऊं शकणार नाहीं. केवळ फक्त काळजी करून आपलें सुखी जीवन नष्टप्राय करण्यांत तरी काय अर्थ आहे? नुसत्या मोठमोठ्या तोंडच्या गप्पांनीं थोडेंच त्या लोकांचें दुःख नाहींसें होणार आहे! आपल्याजवळ जे लोक असतील ज्यांना आपण खरोखरच मदत करूं शकूं, त्यांना तोंडची वाफ न दवडतां मुकाट्यानें सढळ हातानें जें लागेल तें साहाय्य दिलें पाहिजे. प्रत्येक माणसानें आपणास दिसेल तेवढ्याच दुःखितांचा भार आपल्या शिरावर घेतला म्हणजे ठिकठिकाणचे दुःखित कमी होण्याचा संभव आहे. परंतु प्रत्यक्ष साहाय्य कोणा एकालाहि करावयाचें नाहीं आणि स्वतःची तिजोरी भरगच्च ठेवून साऱ्या जगाला तोंडानें गवसणी घालण्याची मात्र ऐट आणावयाची! अशानें दुःखितांना सुख तर मिळत नाहींच परंतु या संभावित दुर्जनांचा भरणा समाजांत होऊं लागतो. पुन्हां रोजच्या जीवनापलीकडे असणाऱ्या विद्याकलांचा मार्ग बंद होतो तो निराळाच.

सौंदर्य जीवनाला आवश्यक नाहीं म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणें योग्य नव्हे. कांहीं प्रमाणांत अन्न व वस्त्र मिळालें म्हणजे त्यांव्यतिरिक्त जीवनास आवश्यक असणाऱ्या गोष्टींची व्याख्या करणें अवघड आहे. कारण, आवश्यकता नडींतून उत्पन्न होते: आणि नड केव्हां व कां निर्माण होते याला नियम नाहीं. इच्छिलेली वस्तु मिळूं शकली नाहीं म्हणजे त्यावेळीं नड उत्पन्न होते; पण वस्तूची इच्छा होणें याला तरी कोठें नियम आहे? मनुष्याला वाटेल तेव्हां वाटेल त्याची इच्छा होते. त्या त्यावेळीं

ती नड व तिच्यामुळें आवश्यकता उत्पन्न होते. दारू जीवनास आवश्यक नाहीं परंतु दारुड्याला दारू पिण्याची इच्छा झाली म्हणजे ती आवश्यक वस्तु होऊन बसते. पण आवश्यकता असलेल्या वस्तूकरितांच केवळ धडपडणें हा मनुष्याहून कमी प्रतीच्या असणाऱ्या पशूंचा स्वभावधर्म आहे. पोटापुरती शिकार करणें व निवाऱ्यासाठीं गुहा बघून त्यांत राहाणें या पलीकडे पशूंच्या जीवनांत दुसऱ्या कोणच्या गोष्टीची प्रगति झाली आहे? आवश्यक तेवढीच वस्तु मिळवून स्वस्थ बसणें यामुळेंच मनुष्येतर प्राण्यांच्या जीवनांत प्रगति होऊं शकली नाहीं. उलटपक्षीं मनुष्याचा स्वभाव असमाधानी व जीवनावश्यक अनावश्यक वस्तूंचें प्रमाण सतत वाढत चालल्यानें त्याच्या जीवनांत रोज नावीन्य येऊन त्यांतूनच त्याची प्रगति झाली.

रानटी अवस्थेंतून मनुष्य सुधारत कां गेला?--

कोठूनतरी पोटाची भूक शमविणें व शरीराचें थंडीवाऱ्यापासून निवारण करणें याप्रमाणें जरूरीपुरतेंच बघणें हा पशूंचा धर्म आहे. शिकार करून जें मांस मिळेल तें चांगलें करून खावें ही कल्पना पशूंना किंवा अगदीं रानटी लोकांना सुद्धां येत नाहीं. हे लोक थंडीपासून संरक्षण व्हावें म्हणून झाडांचीं ओबडधोबड सालें वापरतील किंवा ऊब यावी अशा साधनांनीं एक ओबडधोबड अंगावर पांघरण्यास येईल असें कातडें तयार करून घेतील. एवढ्यानें थंडीपासून संरक्षण होतें मग यांत आणखी सुधारणा करण्याची आवश्यकता नाहीं. जीवनाला त्याची नड भासत नाहीं. हीच कल्पना रानटी लोकांत असते. परंतु याहून सुधारलेले लोक आहेत त्यांत कांहीं सुधारणा करून अधिक सुबक करतां येईल काय याचा विचार करतात. आहे तें याहून दिसावयाला बरें असावें अशी इच्छा उत्पन्न होते. येथेंच सौंदर्य शास्त्राचा उगम झाला. नुसतेंच कच्चें मांस खाण्यापेक्षां तें शिजवून खाल्ल्यास अधिक बरें लागेल असें नंतर वाटूं लागलें; त्यांतहि आणखी कांहीं वनस्पतिजन्य पदार्थ घातल्यास तें अधिक चविष्ट होईल ही कल्पना आली. नुसतें मांस हें जरी प्रथम मुख्य खाणें असलें तथापि त्याच्या बरोबर दुसऱ्या अनावश्यक गोष्टी तोंडीं लावण्यास म्हणून घेतल्या तर जेवणांत रुचि उत्पन्न होऊन खाल्लेलें अन्न अधिक अंगीं लागतें हें कळून आलें. याप्रमाणेंच मानवी जीवनांतील इतर सर्व वस्तूंचें आहे. केवळ आवश्यक अशा अन्न-

वस्त्राकडे पाहावयाचें असें माणसानें ठरविलें असतें तर आजपर्यंत जगांत ज्या नाना प्रकारच्या विद्या उत्कर्षास आल्या, अनंत कलांनीं जगांत शोभा आणली, आणि या दोन गोष्टींनीं माणसाचें मन सुसंस्कृत झालें, तें झालें नसतें. केवळ पोटाच्या प्रश्नाचा भलताच बागुलबोवा करून मनुष्य आपल्या संस्कृतीची हानि करून घेईल-तो अधिकाधिक रानटी होत जाईल.

अनावश्यकतेंत संस्कृतीचा उगम-

संस्कृतीचें मापन आवश्यकतेव्यतिरिक्त अधिक वस्तु किती आहेत आणि ज्या आवश्यक वस्तु आहेत त्या किती जास्त सुबक व सुखकर आहेत यावरच अवलंबून असतें. रानटी लोक उपाशी कोठें मरतात? ते आपलें जीवन आपापल्यापरीनें चालवितातच कीं नाहीं? त्यांना आवश्यक लागणारें देहावरण आणि अन्न हीं मिळवून त्यांवर सुरक्षितपणें आपला उदरनिर्वाह करतातच कीं! मग त्यांना आपण मागासलेले कां म्हणतों? पण याचें कारण वर सांगितलें तेंच आहे.

सौंदर्यादि कलांचें महत्त्व-

सौंदर्यशास्त्र जीवनास आवश्यक नसलें तथापि मनुष्याच्या संस्कृतीचें मापन करण्याच्या अनेक साधनांपैकीं तें एक महत्त्वाचें साधन होऊन बसलें आहे यांत शंका नाहीं. सौंदर्य जीवनास आवश्यक नसलें तरी सौंदर्यामुळें जीवनांत रमणीयता निर्माण होऊन दुःखाकष्टांचा विसर पडतो. जीवनांत प्रत्यक्ष पुढें पाऊल टाकतांना मागील दुःखांचा विसर पडला आणि चालू मार्ग आल्हाददायक असला तर त्याचा प्रगत होत असतां अत्यंत उपयोग होतो. जीवनांत नवीन उपक्रम करतांना नवीन हुरूप येऊन मन उत्साही व आनंदी राहतें. हे मनाचे खेळ झाले नाहींत आणि नेहमीं कष्टी, काळजीनें गांजलेलें व निराशात्मक चित्त असलें म्हणजे त्या माणसाचें जीवन कसें प्रगत होणार? म्हणजे या दृष्टीनें सौंदर्यसम कलांचें स्थान जीवनांत फार उच्च प्रतीचें आहे असें म्हणावें लागेल.

हें सौंदर्यपूजन पुरुषांपेक्षां स्त्रियाच जास्त भक्तिभावानें करूं शकतील. महिलाविद्यालयांत हा विषय शिकविणें अत्यंत आवश्यक आहे.

स्त्रियांना व्यायामाचें शिक्षग–

स्त्रियांना पुरुषांप्रमाणेंच व्यायाम आणि संरक्षणशिक्षण द्यावयास पाहिजे. पुरुषांच्या विद्यालयांतील व्यायामगृहाप्रमाणेंच स्त्रियांच्या व्यायामगृहाची व्यवस्था पाहिजे. स्त्रियांचे व्यायाम निराळ्या पद्धतीनें तयार करून त्यांचे तक्ते व त्यांवरील तात्त्विक ग्रंथ लिहून तयार करणें आवश्यक आहे. स्त्रियांनीं कोणते व्यायाम करूं नये, त्यापासून होणारे तोटे, कोणत्या वयाला कोणत्या परिस्थितींत कशा प्रकारचे व्यायाम घेतल्यानें शरिरास अपाय न होतां शरीरपोषणास मदत होईल, कोणता आहार कोणत्या परिस्थितींत घ्यावा इ० सर्व माहिती व्यायामगृहांतून मिळावयास पाहिजे. नाहींतर अस्पर्श्य स्त्रीनें घ्यावयाचे व्यायाम, विश्रांति व आहार; गरोदर स्त्रीनें घ्यावयाची काळजी इ० महत्त्वाच्या गोष्टी न कळल्यामुळें स्त्रियांचें शारीरिकदृष्ट्या फार नुकसान होतें.

सांघिक शिक्षण–

शरीरसंगोपनाप्रमाणें संरक्षणशिक्षण न दिलें तर सशक्त स्त्रीलाहि वेळप्रसंगीं शिताफीनें बचाव कसा करावा हें समजणार नाहीं. एकोप्यानें सांघिक कार्य करण्याची वा सर्वांनीं मिळून एकत्र होऊन संरक्षण करण्याची भावना व धारिष्ट्य येणार नाहीं. याकरितां पुरुषांप्रमाणें स्त्रियांना रोज सायंकाळीं एक तास हें संरक्षणाचें सांघिक शिक्षण देऊन समाजनिष्ठेची भावना जागृत करावयास पाहिजे.

याप्रमाणें पुरुषांना आणि स्त्रियांना शिक्षण देऊन सर्वच दृष्टीनें सुसंस्कृत केलें म्हणजे कुटुंबसंस्था निर्वेध चालण्यास हरकत नाहीं. समाजांत परस्परांचे व्यवहार सुरळित चालतील आणि त्याहून म्हणजे विद्याकलांना उत्तेजन मिळेल. शिक्षणांत उद्योगधंद्यांचें शिक्षण दिलें गेल्यामुळें उद्योगधंद्यांत प्रगतीला आशा आहे. विद्याकला आणि उद्योगधंदे यांमुळें संस्कृति भराभर प्रगत होत जाते. त्यांपैकीं विद्याकलांचा विचार आपण या प्रकरणांत केला. आतां राहिलेल्या उद्योगधंद्यांचा परामर्ष पुढील प्रकरणांत घेऊं. उद्योगधंद्यांची उत्पत्ति, आधुनिक कालांतील उद्योगधंद्यांचें वैशिष्ट्य, त्यापासून होणारे जागतिक व सामाजिक प्रश्न आणि उद्योगधंद्यांचा वास्तविक उद्देश व स्वरूप काय असतें याचा आतां विचार करूं.

# उद्योगधंदा व व्यापार

# ६

## व्यापाराचें जागतिक स्वरूप आणि त्याचे प्रश्न

मानवप्राणी जेव्हां प्रथमच समाज करून एकत्र राहूं लागला तेव्हां एकमेकांच्या गरजा भागवून एकमेकांनीं सुखी व्हावें हा क्रम असे. एकंदर समाजाच्या गरजा लक्षांत घेऊन प्रत्येकजण आपापल्यापरीनें यथाशक्ति एक एक ओझें आपल्या शिरावर घेऊं लागला. आपणांस जी वस्तु करतां येईल ती दुसऱ्याला करून देऊन त्यास करतां येण्यासारखी वस्तु असेल ती त्याकडून आपण घ्यावी अशा तऱ्हेनें मनुष्य उद्योगास लागला. एकमेकांनीं एकमेकांची नड दूर करावी हाच मुख्य हेतु त्यांत होता. चलनाचीं साधनें उपलब्ध नव्हतीं त्यावेळीं मनुष्य स्वतःच्या कष्टानें केलेली वस्तु दुसऱ्यास देई आणि त्याबदली त्याची वस्तु आपण घेई. अशी अदलाबदल करून परस्पर एकमेकांनीं एकमेकांची नड भागवावी हाच मूळ हेतु उद्योगांत होता.

### 'परस्पर मोबदल्यां'तून धनांच्या कल्पनेचा उगम—

जसजशी लोकसंख्या वाढूं लागली, कालांतरानें समाजास स्थिरत्व येऊन तो वर्धमान होऊं लागला तसतशा समाजांतील गरजाहि वाढूं लागल्या. पूर्वी नड दूर करण्यास एकट्या माणसाचे घरबसल्या श्रम पुरेसे होत असत. पण आतां

त्या एकट्या माणसाच्या ठिकाणीं कांहीं जणांनीं मिळून एकत्र काम करून जीवनावश्यक वस्तू निर्माण कराव्या अशी परिस्थिति आली. आजपर्यंतच्या अनुभवानेंहि मनुष्याच्या उद्योगांत नवीन नवीन कल्पना येऊन त्यांत सुधारणा होऊं लागली. नुसतीच एकमेकांची गरज भागविण्यापेक्षां त्याच उद्योगांतून स्वतःचा अधिक कांहीं फायदा झाला तर बघावा ही दृष्टि आली. कालांतरानें दुसऱ्याची नड दूर करून स्वतःचीहि दूर करावी, अशा तऱ्हेनें सहकार्यानें व सलोख्यानें समाजजीवन चालूं ठेवावें हा मूळ हेतु नष्ट होऊन आपण दुसऱ्यास वस्तु करून देतां त्याच्या मोबदल्याहून आणखी जास्त नफा घ्यावा ही बुद्धि निर्माण झाली. आणि शेवटीं उद्योग करावयाचा तो दुसऱ्यासाठीं नसून स्वतःच्यासाठींच करावा ही कल्पना दृढमूल झाली. चलनाचें साधन निर्माण झालें तेव्हां त्या उद्योगास धनोत्पादनाचें साधन म्हणून स्वरूप येऊं लागलें. तेव्हांपासूनच त्या उद्योगास 'धंदा' असें म्हणूं लागलों. चलनाची कल्पना समाजांत प्रथम सुरू झाली, ती जीवनाचें साधन म्हणून झाली. तिची वाढ झाली ती साध्य म्हणून झाली. आणि आतां तिचा विलय कोणत्या स्वरूपांत होणार किंबहुना तिचा विलय होणार कीं ती सतत वृद्धिंगत राहणार हें भविष्यत् कालीन इतिहासाकडे उत्सुकतेनें पाहण्यासारखें आहे.

धंद्याचें वाढतें स्वरूप–

क्रमाक्रमानें समाजाच्या अफाट वाढीबरोबर धंद्याचेंहि कार्यक्षेत्र वाढूं लागलें. पूर्वीं जे एकाच प्रदेशावरील एकाच समाजांतील संकुचित भागांत धनोत्पादनाचे अंतर्गत धंदे चालूं होते ते आतां जगांतील निरनिराळ्या भूभागावर वसलेले भिन्न भिन्न समाज एकमेकांत दळणवळणाच्या साहाय्यानें मोठ्या प्रमाणावर धंदे सुरू करूं लागले. एका देशांतच धंद्याचें प्रमाण वाढून एका देशांतील माल दुसऱ्या देशांत जाऊं लागला व त्यांतील माल इकडील देशांत येऊं लागला. तेव्हां मूळच्या धंद्याचें क्षेत्र सर्वच दृष्टीनें मोठें होऊन त्यालाच पुढें व्यापार ही संज्ञा मिळाली. धंदा स्थायिक असून तो फिरता झाला म्हणजे त्याला व्यापाराचें स्वरूप येतें.

जगावर व्यापारी वर्चस्व–

व्यापारांत पैसा मिळतो हें अनेकांच्या अनुभवानें सिद्ध झाल्यामुळें पुढें पुढें

व्यापारास इतकें महत्त्व आलें कीं मानवी महत्त्वाकांक्षांचें ध्येय आणि कर्तृत्वशक्तीचें कार्यक्षेत्र व्यापारच होऊन बसलें. व्यापाराच्या दुर्दम्य इच्छाशक्तींनेंच जगांतील बरींचशीं साम्राज्यें उदयास आलीं, कळसास पोंचलीं तशींच लयालाहि गेलीं ! व्यापारामुळेंच जगांत शतकाशतकाला क्रांत्या होऊं लागल्या. जगाच्या इतिहासाचें सुकाणूं व्यापाराच्याच हातीं येऊन जगांतील भिन्न भिन्न समाजांतील समाजरचनेंत फरक पडून समाजांचें स्वरूपच पालटूं लागलें. हातांतून व्यापार गेला तर राज्यच गेल्यासारखें आहे, अशी स्थिति आली.

व्यापारी वामनाची त्रिपदी–

जी राष्ट्रांची गत तीच लहान स्वरूपांत राष्ट्रांतील व्यक्तींची आहे. जे परिणाम जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांवर व त्यांच्या इतिहासावर व्यापारानें केले तेच परिणाम त्या राष्ट्रांतील व्यक्ती आणि त्यांचें जीवन यांवर झाले. राष्ट्रांचें ध्येय आणि कार्यक्षेत्र व्यापार होऊन बसलें, तर व्यक्तींच्या खासगी जीवनांतहि व्यापारानें मात केली. व्यक्तीच्या व्यवहारांत व्यापारी दृष्टि फैलावत चालली. ज्या क्षेत्रांत व्यापार म्हणजे पैसा नाहीं तें क्षेत्र व्यक्तीच्या जीवनांतून नष्टप्राय झालें. ज्या क्षेत्रांनीं चिकाटी धरली त्यांना स्वत्व सोडून व्यापाराचे गुलाम बनावें लागलें. विद्येसारखें पवित्र आणि उदात्त कार्यक्षेत्र पण त्यांतहि व्यापारानें शिरकाव केला. विद्यादान हा शब्दप्रयोग नष्ट होऊन विद्येचा व्यापार सुरू झाला. इतर बाजारी मालाप्रमाणेंच विद्येचे भाव चढूं उतरूं लागले. बाजारांतील स्पर्धा येथेंहि आली. थोडक्यांत, व्यापारी अर्थशास्त्रांतील सर्व नियम शिक्षणक्षेत्रास तंतोतंत लागूं पडूं लागले. घरगुती व्यक्तीव्यक्तींतील प्रेमांतहि व्यापार लुडबुड करूं लागला. विवाहेच्छु वधुवरांत तर संयुक्तजीवनावश्यक इतर गोष्टी पाहण्याच्याऐवजीं वधूचा आजचा बाजारभाव काय आहे आणि तो पुढें कितपत टिकणार आहे, वधूची केलेली खरेदी नफ्यांत पडणार कीं तोट्यांत ह्याच गोष्टी प्रथम पाहण्यांत येऊं लागल्या. सख्या कुटुंबांतील संसारांतहि व्यापारी आर्थिक लाभाची दृष्टि येण्यास चुकली नाहीं. इतर वेळीं दोन कुटुंबीय प्रेमांत वागतील परंतु जपूनच ! पैशाचा इस्टेटीचा प्रश्न आला कीं जो तो स्वार्थापुढें दुसऱ्यास दूर लोटण्यास कमी करीत नाहीं. व्यापारी वृत्तीमुळेंच कुटुंबांची घडणहि बदलली–ध्येयहि बदललें.

वाढत्या व्यापाराचे वाढते अनिष्ट परिणाम–

यःप्रमाणें मनुष्याच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनांत आमूलाग्र क्रांति होण्याचें कारण चलनी साधनाची वाढ. वस्तुतः जीवन चालण्याकरितां चलन हें मुळांत साधन म्हणून शोधलें गेलें पण शेवटीं चलन चालण्यासाठीं जीवन जगूं लागलें. समाजाच्या अडचणी दूर करणें हा उद्योगधंद्याचा उद्देश समूळ नष्ट होऊन वैयक्तिक धनराशी करून ठेवणें हाच उद्देश व हेंच ध्येय बनलें. तें ध्येय साध्य करण्याकरितां कारखान्यांत तयार केलेली वस्तु समाजास उपयोगी आहे कीं नाहीं वा अपायकारक आहे हें पाहाण्याचें अर्थातच कारण उरलें नाहीं. केलेली वस्तु समाजास उपयोगी पडो वा न पडो, उपकारक ठरो कीं नाशकारक ठरो, स्वतःचें धनोत्पादन होत असलें तर खुशाल त्या वस्तूचें उत्पादन करावें, किंबहुना आपलें वैयक्तिक धनोत्पादन शक्य तितकें अधिक व्हावें म्हणून समाजास अपायकारक होतील अशा थोडक्या खर्चात उत्पादन करतां येणाऱ्या, घाणेरड्या व नकली वस्तू करून त्यांची अतोनात जाहिरात करावी, लोकांना भूल पाडून ती वस्तु खरेदी करण्यास लावावी अशी मालिका सुरू झाली. वाईट व नकली वस्तूंचें उत्पादन करण्यास खर्च कमी येतो. त्याच वस्तूंत मालकाला त्याच्या मनासारखा फायदा होतो. परंतु हा प्रकार कळसास पोचल्यामुळें मूठभर धंदेवाईक गबर झाले, बहुजनसमाज दरिद्री बनला व नकली मालामुळें जीवनाला अपाय करून बसला. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मूठभर धंदेवाईकांचा संसर्गजन्य व्यापारी रोग समाजांत फैलावूं लागला. याप्रमाणें अनिष्टाचे परिणाम चक्रवाढीनें वाढून समाजांत न सुटणारे गंभीर प्रश्न उपस्थित झाले.

स्वैर व्यापाराचा जागतिक प्रश्न–

याच्या मुळाशीं कारण आहे. व्यापारांत सरकारास हात घालतां येत नाहीं ही कल्पना. म्हणजे व्यापाराचें क्षेत्र व त्याचीं साधनें हीं सरकारी निर्बंधांतून मुक्त असलीं पाहिजेत. व्यापाराच्या भरधाव घोड्याला सरकारी लगाम असूं नयेत. या कल्पनांमुळें हा घोडा राज्याच्या सीमा ओलांडून दिग्विजय करूं पाहत आहे व तो विजयी सुद्धां होत आहे. त्यामुळें जागतिक व्यापाराचे नवे प्रश्न उपस्थित होऊं लागले. व्यापारानें निर्माण झालेले मालकी हक्क गाजवणारे मूठभर श्रीमंत व त्यांच्या

हाताखालीं काम करणारे असंख्य मजूर हे दोन वर्ग स्वतःस जागतिक स्वरूप आणूं पाहात आहेत. जागतिक व्यापारामुळें आणखी एक नवीन प्रश्न निर्माण झाला. सीमांकित भूखंडांचें–देशांचें राजकीय वर्चस्व आणि मजुरांचें जागतिक घटनेचें वर्चस्व या दोन सत्तेंत वाद उत्पन्न होणार. यांत कोणताहि एक पक्ष समूळ नष्ट होणें शक्य नाहीं. राजकीय वर्चस्वालाच आपले अधिकार कांहीं कमी करणें शक्य आहे–त्याला ते करावेच लागणार. राजकीय वर्चस्व कमी झालें म्हणजे जागतिक व्यापारी घटनेच्या तद्देशीय प्रतिनिधींचें अर्थातच पारडें जड होणार.

## ‘जागतिक’ घटनेची शक्याशक्यता–

परंतु जागतिक स्वरूपाची ही घटना एकदेशीय राज्यसंस्थेप्रमाणें सुनियंत्रित चालणें शक्य नाहीं. एवढी मोठी घटना निर्माण करण्यास घटकांची संघटना व्यापक ( Extensive ) व भपकेदार असण्यापेक्षां आंतून जोरदार ( Intensive ) पाहिजे. अशी संघटना निर्माण करण्यास आवश्यक असणाऱ्या गोष्टी या जागतिक मजुरांच्या घटनेंत नाहींत. सर्व कार्यकर्त्यांत संपूर्ण मतैक्य असून अंतःकरणाचें सहकार्य पाहिजे. त्यांचें साहचर्य आवश्यक आहे. प्रत्यक्ष कार्य करतांना स्वतःचें व्यक्तिमत्त्व बाजूस ठेवून जागतिक घटनेचे केवळ प्रतिनिधी हीच भावना पाहिजे. परंतु होतें उलट. तत्त्वज्ञान सांगावयाचें जागतिक आणि संघटना करावयाची स्वतःच्या व्यक्तीभोंवतीं. निःस्वार्थीपणा अंतःकरणापासून पाहिजे. नाहीं तर धोरणी ( Deplomatic ) निःस्वार्थी सगळेच असतात. जागतिक घटनेचें एक सूत्र राहूं शकणार नाहीं. खरी जागतिक संघटना अजून झाली नाहीं. जर झाली असेल तर ती भपकेबाज स्वरूपांत आहे. आंतून भरीव नाहीं. ठिकठिकाणीं संप होणें व गिरण्या बंद पडणें किंवा कांहीं भत्ता मिळविणें म्हणजे संघटनाकार्य नव्हे. मजूर अर्धपोटी असतात–गांजलेले असतात. त्यांस कोणीहि दोन भपकेबाज शब्द सांगितले म्हणजे ते भुलतात. नुसते त्यांच्या घरांत जाऊन आपण आलों तरी त्यांना मोठी धन्यता वाटते. तसेंच घरांत जाऊन येणाऱ्यालाहि मोठें शतकृत्य केलें व त्या मजुरास वाटलेली धन्यता पाहून आपण फार मोठें कार्य केलें असें वाटतें. पण जागतिक घटनेच्या मानानें हें कांहींच नव्हे. किंबहुना हें जमेंतहि धरतां येत नाहीं. आजपर्यंत ठिकठिकाणीं स्थानिक संप झाले व भत्ते मिळविले पण त्यांत जागतिक घटनेचें प्रतिनिधित्व कितपत होतें? हें कार्य स्थानिक घटनाहि करूं शकतील. जागतिक संघटनेसाठीं सूत्रचालकाच्या

तालमींत तयार झालेले खंदे वीर पाहिजेत. ज्यानें उठावें त्यानें स्वयंस्फूर्तीनें आपल्या मतानुसार कांहीं काम करावें व त्याला भारदस्त तत्त्वज्ञानानें जागतिक स्वरूप जाहिरातबाजीनें द्यावें अशानें भरीव एकसूत्री संघटना निर्माण होत नाहीं. परंतु हेंच सर्वत्र चाललेलें आहे.

फार मोठ्या संक्रमणावस्थेंत अस्वास्थ्य आहे.-

जागतिक घटनेंत दुसऱ्याहि अडचणी आहेत. जागतिक घटनेची कल्पना व त्याकरितां चालणारा झगडा हा थोडा काळ टिकणारा नव्हे. हें ध्येय आहे. आणि ह्याकरितां करावा लागणारा झगडा हा शतकानुशतकें करावा लागेल. ( तरी सुद्धां ही ध्येयसिद्धि होईल कीं नाहीं याची जबरदस्त शंका आहे. एकराष्ट्रीय राज्यसंस्थेचा विरोधहि तितक्याच प्रतीचा किंबहुना अधिकच राहणार हें निश्चितच. ) म्हणजे हा जो मधला मोठा काळ जातो ती संक्रमणावस्था होय. ( Transitional period ) झगड्याचा संक्रमणकाल फार मोठा झाला म्हणजे दोनहि पक्ष एकमेकांत इतके भांडतात कीं शेवटीं दोघेहि नामोहरम होत असतात. यांत मधच्यामध्यें बिचाऱ्या जनतेला छळ सोसावा लागतो. म्हणजे जगांत नेहमीं अस्वस्थता, झगडे, क्रान्त्या व दुःख यांचा सुळसुळाट होणार.

घटनेचा आर्थिक पाया सदोष आहे.-

दुसरें असें कीं सर्व घटना आर्थिक पायावर आहे. मनुष्य केवळ आर्थिक आयुष्य जगत असतो ही कल्पना चुकीची आहे. पैशाकरितांच फक्त मनुष्य हपापलेला असतो असें नाहीं. आणि पैशानेंच केवळ त्याचें जीवन जगतें असें तर मुळींच नाहीं. मनुष्याचें जीवन अनेक गोष्टींनीं चाललेलें असतें. त्यांतील एक पैसा आहे एवढेंच. समाजांत दर्जा असतो तो केवळ आर्थिक पायावर नसतो. रसातळाला जाऊं पाहाणाऱ्या समाजांत व्यक्तीचा दर्जा आर्थिक पायावर उभारलेला असतो. (Economic Relations-Negative Results from Kalki—Sir Radhakrishnan ). समाजामध्यें व्यक्तींचा संबंध आर्थिक दृष्ट्या लावणें हा कृत्रिमपणा आहे. जगाची विभागणी आर्थिक दृष्ट्या करणें ही तर निसर्गविरुद्ध नियमाची कमाल आहे. समाजाची उभारणी आर्थिक पायावर केली तर समाजांत अस्वास्थ्य जास्त निर्माण होऊन समाजाची उंची कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. जगांतील दारिद्र्य

जगाएवढें व्यापक कार्यक्षेत्र हाती घेऊन कधींच नष्ट होणार नाहीं. कारण त्या कार्याचा अवश्यक पाहिजे असलेला परिणाम सर्वत्र पोंचूं शकणार नाहीं. कार्याची झळ लागेल एवढेंच. पण एवढ्यानें ध्येयसिद्धि अशक्य आहे. सध्या झळ लागते आहे तेवढ्यावरच जागतिक कार्यकर्ते खूष आहेत ! सर्व प्रकारच्या यांत्रिक साधनांनीं जग्यत असलेल्या या जाहिरातबाजीच्या जगांत एका ठिकाणच्या कार्याची झळ सर्वत्र लागावी यांत आश्चर्य नाहीं व त्यांत झालेल्या कार्यासंबंधीं समाधानहि मानून घेण्यास जागा नाहीं. कीर्तिलोलुपतेचें समाधान मात्र मानून घेण्यास वाव आहे.

संघटनेंत समशीलाचा अभाव–

व्यापारावर आधारलेल्या जागतिक घटनेची तिसरी अशक्यता अशी कीं जगांतील सर्व मजुरांनीं एका सूत्रानें गुंफून जावें असें त्यांच्यांत कांहींच साम्य नाहीं. दारिद्र्य हें एकत्र येण्यास समानशील धरतां येणार नाहीं. एका गिरणींतील मजूर एकत्र यावेत याकरितां त्यांच्यांत जें समाजशील आहे, जी सर्वांच्या जीवनाची एकमेकांत गुंतागुंत आहे आणि निगडित स्वरूपांत एकमेकांचीं सुखदुःखें एकमेकांवर अवलंबून आहेत त्यांपैकीं कोणतीहि गोष्ट ‘ जागतिक ’ मजुरांत नाहीं. जरी सर्व मजूर गिरणी-मालकांच्या छळाखालीं दडपून जातात एवढें साम्य असलें तथापि त्यांतून होणारी सुटका वा छळ एकमेकांच्या संबंधांवर अवलंबून नाहीं. त्यांचा दूरान्वयानें जगांतील व्यापाराशीं संबंध जोडणें हा बादरायणी संबंध असून नसलेला संबंध आहे असें दाखविण्यासारखें आहे. मजुरांचे पुढारी म्हणविणारे एकत्र येऊं शकतील पण त्यांचा आणि मजुरांच्या हिताचा फारच थोडा संबंध आहे. प्रयत्न केला तर संबंध जुळविणें कांहीं कठीण नाहीं, पण अशा संबंधाचा परिणाम जीवनांत बदल होण्याच्या दृष्टीनें एकमेकांवर कांहीं होत नाहीं. एकमेकांचें जीवन एकमेकांत गुंतलेले नसल्यानें जो अंतःकरणाचा जिव्हाळा एकमेकांबद्दल वाटावयास हवा व त्यांतून प्रेम निर्माण होऊन त्यागी भरीव संघटना निर्माण व्हावी ती होत नाहीं. संघटना होईल पण सभा–संमेलनें व जाहिराती या भपक्यापलिकडे तिचें स्वरूप राहणार नाहीं. शिवाय जगांतील मजुरांचे धर्म, संस्कृति, परंपरा व वंश यांत कमालीची भिन्नता आहे. वरील गोष्टींना डावलून केवळ आर्थिक कारणाकरितां एक होतील हें निःसंशय अशक्य आहे. जगांतील प्रत्येक संघटना आजपर्यंत केवळ आर्थिक कारणांकरितांच झाली हा अट्टाहास बाजूस ठेवला पाहिजे. कोणत्याहि गोष्टींचा संबंध आर्थिक दृष्ट्या

लावूं लागलों तर तो बादरायण संबंध होईल आणि जगाकडे पाहण्याचा मूळ दृष्टिकोणच चुकीचा असल्यामुळें त्यावरून काढलेले सिद्धान्त फोल ठरतील व आखलेल्या योजनाहि निरुपयोगीच होतील.

मालकमजुरांचा आगंतुक प्रश्न–

जागतिक मजुरांची एकी साधण्यासाठीं जो कार्यक्रम अवलंबतात तोहि घातकच आहे. ज्या गिरणीमालकावर मजुरांचें हित अवलंबून आहे त्याच्याशीं भांडून हक्क मिळविणें यांत ध्येयसिद्धि लाभणें कठीण आहे. बाहेरच्या माणसांनीं येऊन गिरणींतील मजुरांना एकत्रित करावें हें मालकास केव्हांहि खपणार नाहीं. या बाहेरच्या माणसानें गिरणीमालकाजवळ हक्क मागितले तर गिरणीमालकास अधिकच चेव येईल. मनांत जर प्रथमच कांहीं देण्याची इच्छा असली तर तीहि दाबून ठेवून उलट गिरणीमालक अधिकच छळूं लागेल. छळ अधिक होऊं लागला म्हणजे मजूर एकत्र येतील. संप करून मालकास एखादा हक्क देणें भाग पडेल. परंतु यानें मजुरांचें जन्माचें हित साधणार नाहीं. एका हातानें तो एक हक्क देईल आणि दुसऱ्या हातानें अनेक हक्क काढून घेईल. मजुरांचें जीवन सर्वस्वी मालकांच्या हातांत असतें. तो त्यांस वाटेल तो त्रास देऊं शकेल. संप करून एक हक्क मिळविला म्हणजे मालकास उपरति होऊन पुढें मजुरांना चांगलें वागवील अशी अपेक्षा करणें यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं. उलट प्रतिक्रिया अधिकच क्रूर होणार. याचा अर्थ मालक मजूर हा तंटा समाजांत चिरंतन स्वरूपाचा झाला. दुसरे जे बाहेरचे सधन वा मध्यमवर्गीय लोक मध्यें पडतील त्यांचा व मालकांचा वाद माजणार. बरें, हा सर्व तंटा व क्रांत्या करून मिळविलें काय तर मजुरांच्या अखिल जीवनाच्या दृष्टीनें कांहींच नाहीं. हिंदुस्थानांत तरी मालक मजुरांचा तंटा जागतिक स्वरूपांत आणण्याचें कांहींच कारण नाहीं. जगाच्या कोणत्याहि प्रवाहांत हिंदुस्थानचा एकतरी थेंब पडलाच पाहिजे, जणूं कांहीं जगाचा प्रत्येक प्रवाह हा आदर्श असून हिंदुस्थानसारख्या देशानें त्याचें अंधानुगमन करावें अशीच एक विचारपद्धति सध्यां होऊन बसली आहे.

'जागतिक' आणि भारतीय प्रश्न–

ज्यामुळें हा 'जागतिक' प्रश्न निर्माण झाला तो व्यापार विशिष्ट विचारानें वा सद्बुद्धीनें वाढला नाहीं. त्याच्या मुळाशीं प्रत्येकाचा वैयक्तिक स्वार्थ आहे. वैयक्तिक

स्वार्थ फोफावूं लागला म्हणजे तो आटोक्याच्या बाहेर जातो. त्याचा संसर्गानें सर्वत्र प्रसार होऊं लागला म्हणजे ती एक आवश्यक गोष्ट म्हणून गणली जाते. पुन्हां, फोफावून बलिष्ठ झालेल्या लोकांना एकदम दाबून टाकणें कोणत्याहि सत्तेला शक्य नसतें. निदान स्वार्थाच्या उन्मादांत केलेली गोष्ट तरी आवरणें कठीण जातें. पण याच घटनांना निसर्गदत्त घटना समजून त्या हितकारक व आवश्यक मानणें योग्य नाहीं. जागतिक व्यापाराच्या वाढत्या पसाऱ्यानें त्या त्या देशांत तद्देशीय परिस्थिती-नुसार कांहीं आर्थिक वा सामाजिक प्रश्न उद्भवले तर ते सर्व जगाला नियम म्हणून मान्य करतां येतीलच असें नाहीं. आर्थिक पायावर उभारलेली सर्वांवर मात करणारी आधुनिक युरोपीय समाजरचना ही सर्वत्र त्रिकालाबाधित सत्य मानण्याचें कारण नाहीं. ह्या समाजरचनेचें मूळ युरोपांतील अठराव्या शतकांत झालेल्या औद्योगिक क्रांतींत आहे. या व्यापाराच्या विशिष्ट परिस्थितीचा परिणाम असलेल्या समाज-रचनेला सर्वत्र, सर्वकाळ समाजशास्त्रीय मूलतत्त्वांची मान्यता मिळणें शक्य नाहीं. सध्यांचा जागतिक व्यापार कितीहि अनिर्बंध्य असला तरी राष्ट्रांतील व्यापार-नियंत्रण शक्य आहे व त्यायोगें मालक–मजूर तंट्यासारखे प्रश्न सोडणें सुलभ आहे. मालक मजूर तंटा हा कितीहि मोठा असला तथापि तो स्थानिक आणि तात्कालिक आहे. हा तंटा मोडण्यासाठीं आणि मजुरांचें हित साधण्यासाठीं त्या त्या देशांत त्या त्या परिस्थितीनुसार कडक वा सौम्य प्रासंगिक स्वरूपाचे कायदे करून उपाययोजना अमलांत आणली म्हणजे पुरे आहे. मालक–मजुरांचा तंटा किंवा अन्य आर्थिक प्रश्न सर्व जगांतील प्रत्येक देशांत जरी साम्य दर्शवीत आहेत तरी त्यांना तद्देशीय स्वतंत्र उपाय उपयोगी पडेल. सार्वजागतिक एक घटना निरुपयोगी आहे. हिंदुस्थानांतील मालक मजुरांना ही युरोपांतील समाजरचना लावूं पहाणें योग्य होणार नाहीं. हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रकारचा तंटा स्वातंत्र्याशिवाय मिटणें शक्य नाहीं. अर्थातच जागतिक समाजरचनाहि अशक्यच आहे. हिंदुस्थान जर स्वतंत्रच झाला तर हा मालकमजुरांचा तंटा किंवा जमीनदार-कुळांचा तंटा हा स्थानिक आणि तात्कालिक असल्यानें हिंदुस्थानचें स्वतंत्र सरकार तो नष्ट केल्या-शिवाय राहणार नाहीं. तेव्हां सध्यां जगांत प्रचलित असलेला व्यापारविषयक आर्थिक प्रश्न–गिरणीमालक– मजूर वाद व त्यावरील म्हटली जाणारी जागतिक उपाययोजना ही प्रत्येक देशाला निसर्गदत्त आणि अटळ अशी नड नसून मनुष्यानेंच सांघिक स्वार्थानें उभारलेला स्थानिक तात्कालिक व आग्रहानें आवश्यक आणि

हितकारक नसणारा प्रश्न उत्पन्न केला आहे. तेव्हां जगांत पुढें मांडली जाणारी उपाय-योजना ही हिंदुस्थानास आवश्यक आणि हितकारक आहेच असें नाहीं.

जागतिक व्यापारबुद्धीनें जागतिक ऐक्य असाध्य आहे.-

परकीय सरकारच्या राजकीय धोरणानें किंवा अव्यवस्थित राज्यसंस्थेमुळें व्यापार सरकारास अनिर्बंध्य होऊन अवाढव्य वाढूं लागला याचा अर्थ व्यापार करणारे लोक अनिर्बंधित झाले. प्रजा ही राजसभेला जबाबदार पाहिजे. समाजांतील प्रत्येक घटना राजसभेच्या अनुमतीनें होणें समाजाच्या हिताचें आहे. राजसभेला सोडून व्यापारी स्वैर झाले म्हणजे त्यांच्यामुळें समाजास धक्का पोंचतो. त्यांचें अनुकरण समाजांतील इतर वर्ग करतात. आणि सर्व समाज अनियंत्रित व स्वार्थाकरतां स्वैर होऊन वाटेल त्या मार्गानें वाटेल त्या प्रमाणांत धनोत्पादन करूं लागला तर समाजास धडगत नाहीं असें समजावें. राजसभेला न जुमानतां व्यापारी लोक धनोत्पादनाच्या ईर्ष्येनें बाह्य जगाशीं व्यापार करूं लागतात. तेव्हां त्यांचे हितसंबंध, लागेबांधे हे देशाच्या बाहेर अधिक होत जातात. या व्यापाऱ्यांच्या सांघिक व वजनदार प्रयत्नानें देशाच्या एकसूत्रीपणावर आणि संघटनेवर अनिष्ट परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं. देशसीमा ओलांडून बाह्य जगांत प्रवेश केला म्हणजे जीवन जागतिक झालें-जागतिक संबंध-हितसंबंध वाढून जागतिक बंधुभावास उत्तेजन मिळालें असें होत नाहीं. कारण बाह्य जगाशीं आलेला संबंध हा उदात्त, निःस्वार्थ आणि जागतिक जीवनाच्या हेतूनें बुद्धिपुरस्सर आणलेला नसतो. त्या संबंधांत जगाच्या कल्याणापेक्षां स्वतःच्या वाढत्या आर्थिक महत्त्वाकांक्षेला बाह्य-जगांत उत्तम वाव असतो या पलीकडे कोणताहि दुसरा उदात्त विचार मागें नसतो. देशांतील कार्यक्षेत्र हें स्वार्थी महत्त्वाकांक्षेस अपुरें पडत गेलें म्हणजे सीमोल्लंघन करण्याची इच्छा साहजिक होते. अशा प्रकारचे संबंध देशास तर अनिष्टच परंतु जागतिक प्रश्नांत अधिकच गुंतागुंत करून ठेवतात. बाह्यजगाशीं येणारा संबंध हा स्वार्थलोलुपतेनेंच आलेला असतो. त्यांत स्वतःचे स्वार्थ बघण्यापलीकडे जगांतील बांधवांचें दुसरें हित काय बघणार ? व्यापारी सौदा पटला तर सूत नाहीं तर भूत ! म्हणून अशा प्रकारें वाढलेला व्यापार प्रादेशिक वा जागतिक कोणत्याहि प्रकारें कोणालाहि हितकारक होत नाहीं. उलट एका देशांत ही विषमता वाढेल तशीच सर्व जगांत जागतिक स्वरूपांत वाढल्याशिवाय राहणार नाहीं. व्यापाराचा हेतु जर

दुसऱ्याची नड भागविणें हा असेल तर मात्र अगदीं याच्या उलट परिणाम झाल्याविना राहणार नाहीं. पण हें कसें शक्य आहे ? देशांतल्या देशांत संघटित समाजाकडून हें काम होऊं शकेल. असे देशच्या देश या हेतूनें व्यापार करूं लागले म्हणजे देशांदेशांनीं एकमेकांची नड देशघटकांचे करवीं भागविणें कांहीं अशक्य नाहीं. अशा व्यापारानें विषमता तर नाहींच पण जग सुखी झाल्यावांचून राहणार नाहीं.

## ऐतिहासिक घटनांना आर्थिक कारण लावणें इष्ट नाहीं.

### जीवनांत 'आर्थिक कारणा'चा अट्टाहास—

मनुष्याच्या खाजगी व सामाजिक जीवनांत आर्थिक कारण प्रामुख्यानें येऊं लागलें तें अलिकडेच एक–दोन शतकें. या शतकांत घडलेल्या घटनांत आर्थिक कारण शोधण्याचा अट्टाहास एकवेळ शोभेल. परंतु तत्पूर्वींहि वाटेल त्या घटनेला आर्थिक कारण जोडणें सयुक्तिक होणार नाहीं.

मानवानें आपल्या सोयीकरितां वा सुखाकरितां केलेल्या घटनांचें कारण शोधतांना खरी शास्त्रीय दृष्टि जागृत ठेवली पाहिजे.' मनुष्य धडपडतो तो केवळ पैशाकरितांच नाहीं. त्याच्या जीवनाचे आडवे–उभे इतर अनेक धागे असतात हें विसरतां कामा नये.

### 'धनोत्पादना'ची प्रचलित सदोष व्याख्या—

'आर्थिक कारण' पाहण्याचे आधीं त्या शब्दांचा अर्थ काय आहे हें पाहणें अवश्य आहे. 'आर्थिक' म्हणजे केवळ 'धनोत्पादना' विषयीं. हा अर्थ प्रचलित अर्थशास्त्रांत सर्वत्र रूढ आहे. पण धनोत्पादन म्हणजे काय ? प्रचलित अर्थशास्त्रांत धनोत्पादनाची व्याख्या अत्यंत व्यापक असून फाजील धनोत्पादनानें उत्पन्न होणारे आर्थिक प्रश्न आणि घटना यांचीं कारणें सरसकट आणि अतिव्याप्त व्याख्या केलेल्या 'धनोत्पादन' या शब्दामागें लावतात. समाजांतील आर्थिक विषमता याच धनोत्पादनाच्या मुळाशीं आहे असें समजतात. परंतु ज्या सामाजिक घटनांना आणि विषमतेला खरोखरच आर्थिक कारण लागूं पडतें तें आर्थिक कारण वरील धनोत्पादन नाहीं. धनोत्पादनांत भेद केला पाहिजे. हा भेद न केल्यामुळें

आर्थिक पायावर कल्पनेनें उभारलेली समाजरचना आणि सामाजिक घटनांचीं शोधलेली कारणपरंपरा हीं सर्व ढासळून पडतात. यास्तव धनोत्पादनाची व्याख्या सुधारणें आवश्यक आहे. धनोत्पादनांत खालीलप्रमाणें दोन भेद केले पाहिजेत. जीवनावश्यक नडींतून उत्पन्न होणारें धनोत्पादन आणि अतितृष्णेंतून निघणारें धनोत्पादन. या दोन प्रकारच्या धनोत्पादनांत–त्यांच्या परिणामांत जमीन–अस्मानाचा भेद आहे. पहिल्या प्रकारचें धनोत्पादन समाजांत आर्थिक विषमता निर्माण करीत नाहीं. समाजांत कोणत्याहि घटना यामुळें निर्माण होत नाहींत कीं ज्यांना या प्रकारच्या धनोत्पादनाचें आर्थिक कारण लावावें. अतितृष्णेंतून बाहेर पडणारें धनोत्पादन हें मात्र समाजांत प्रथम आर्थिक आणि तदनुषंगानें इतर उलाढाली करतें. आर्थिक विषमतेचें कारण अतितृष्णोत्पन्न धनोत्पादनच होय. म्हणून समाजांतील आर्थिक विषमतेचा आणि अनिष्ट आर्थिक घटनांचा विचार करतांना अतितृष्णोद्भूत धनोत्पादनच प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे. जें *द्रव्यार्जन केवळ अतितृष्णेनें झालेलें आहे किंवा जीवनावश्यक धनोत्पादन होऊन शिवाय आणखी मिळवावें ही तृष्णा असते तें धनोत्पादन आणि त्याकरितां ज्या घटना समाजांत घडून येतात त्यांनाच 'आर्थिक घटना' ही संज्ञा* योग्य ठरेल. धनोत्पादनाची व्याख्या वस्तुतः हीच असावयास पाहिजे. जीवनास अत्यंत आवश्यक असलेलें म्हणजे ज्यावांचून जीवनाचा झगडा पुढें ढकलणें शक्य नाहीं अशा द्रव्यार्जनाला 'धनोत्पादन' ही आर्थिक संज्ञा योग्य वाटत नाहीं.

पैशाहून इतर अनेक गोष्टींची मनुष्याला उणीव भासते–

नाहीं तर रोजच्या जीवनामध्यें अनेक गोष्टी अत्यंत आवश्यक असतात. मग जीवनांतील घटनांमागें त्यांनाहि द्रव्याप्रमाणें कारण म्हणून शेपूट कां लावीत नाहींत ? पुन्हा, रोजच्या जीवनांत पैसा जसा आवश्यक वाटतो व त्या करितां धडपड चालू असते त्याप्रमाणेंच तो जीवनाला साथीदारहि शोधीत असतो. मनुष्यांचा प्रेमळ सहवासहि तितकाच इच्छीत असतो. जो जीवनावश्यक पैसा मिळविला जातो तो पैशाकरितां नाहीं. त्यांतून मनुष्य अनेक गोष्टी साधून घेत असतो. जीवनांत प्रेमळ मनुष्याचें सुख लाभल्यास त्याकरितां आपला पैसा किती खर्च होतो इकडे पाहत नाहीं. सुसंस्कृत मनाचा मनुष्य तर असें म्हणत असतो कीं एक वेळ पैसा कोठेंहि

मिळेल–काम केलें कीं पोटभर भाकरी मिळेल पण जिव्हाळ्याचें मनुष्य असें बाजारांत विकत मिळत नाहीं आणि त्याप्रमाणें तो तसा वागत असतोहि. याचीं प्रत्यक्ष उदाहरणें आपण व्यवहारांत पाहातोंच. पैसा विपूल आहे पण मनुष्य नाहीं म्हणून पैसेवाला दुःखी असतो. उलटपक्षीं पोटापुरतें पैसे मिळवून प्रेमळ मित्रांच्या सहवासांतच एखाद्यास आनंद वाटत असतो. अशा प्रकारचे लोक आज सुद्धां समाजांत वावरत आहेत.

मनुष्य केवळ द्रव्याकरितां त्याग करीत नाही.

केवळ द्रव्यार्जनासाठींच जीवनांत वाटेल त्या घडामोडी घडवून आणण्यास सर्वसामान्य मनुष्य कांहीं निर्जीव यंत्रांचा बनलेला नाहीं. त्याच्या हाडामांसाच्या देहाच्या आंत हृदय म्हणून एक अत्यंत नाजूक भाग जिवंत आहे. आणि त्या हृदयाचें कार्य करण्याकरितां डोक्याच्या भक्कम कवटीमध्यें मेंदू वसलेला आहे. त्या हृदयांतून कांहीं भावना उत्पन्न होत असतात. मनुष्य केवळ वैयक्तिक स्वार्थाला हापापलेला असतोच असें नाहीं. स्वार्थाव्यतीरिक्त त्याच्या हृदयांत इतर कांहीं भावनाहि असूं शकतात. या भावना नसत्या तर ‘त्याग’ हा शब्द शब्दकोशांतून काढावयास पाहिजे होता. मायलेकांचें प्रेम कांहीं तरी आर्थिक कारणानेंच असतें, तरुणतरुणींच्या प्रणयाचें कारणहि आर्थिकच आहे;–देवभोळ्या लोकांनीं देवाकरितां जीवाचें रान केलें, देशाकरितां त्यागी वीरपुरुषांनीं जीवाची होळी करून त्यांत देहाची व संसाराची आहुति दिली–या सर्व घटनांच्या मागें आर्थिक स्वार्थी हेतुच असला पाहिजे असें म्हणणें म्हणजे पूर्वीच सांगितल्याप्रमाणें मनुष्याचा देह निर्जीव यंत्राचाच झाला आहे असें म्हटलें पाहिजे.

दोन्ही स्वार्थच पण भूमिका भिन्न–

वरील सर्व घटनांमागें स्वार्थ आहे यांत शंका नाहीं. हें आम्हांसहि मान्य केलें पाहिजे. पण तें धनात्पादन नव्हे आणि बुखॅरिन् सारखे ऐतिहासिक भौतिकवादाचे (Historical Materialism) अग्रगण्य अर्थवादी ज्या अर्थानें स्वार्थ म्हणतात त्या प्रकारचा स्वार्थ नाहीं. एवढें मात्र तितकेंच खरें, दोन्ही ठिकाणीं स्वार्थाची भूमिका फार भिन्न आहे. एक गोष्ट आठवते. एक राजा शिकारीसाठीं रानांत चालला होता. जातां जातां वाटेंत त्यास एक संन्यासी भेटला. राजा त्या

संन्याशाला म्हणाला, " योगीराज, जगांत एवढें वैभव असून त्याचा त्याग करून इकडे रानांत काय आलांत ? " संन्याशानें उत्तर दिलें, "आपण ब्रह्मासारख्या परमोच्च आनंदाचा त्याग करून आपण या क्षणभंगुर सौख्यांत काय लोळतां ? आतां सांगा, जास्त स्वार्थी कोण ? मी कीं तुम्ही ? " गोष्टींतील तात्पर्यार्थ लक्षांत घेण्यासारखा आहे. ज्या संन्याशाला आपण विरागी म्हणतों तोच सर्वांत जास्त स्वार्थी व सुखलोलुप ठरला. बरोबर हाच भेद समाजांतील व्यक्तींच्या त्यागांत करावयास पाहिजे आहे.

धनपूर्व युगांत धनोत्पादन शक्य नाहीं–

मनुष्याच्या हातून घडणाऱ्या प्रत्येक घटनेला आर्थिक कारण असतें हा सामान्य सिद्धान्त काढतांना मनुष्याच्या प्रथमावस्थेपासूनचा इतिहास आणि त्याचें मानसशास्त्र यांजकडे दुर्लक्ष केलें गेलें असावें. ज्यावेळीं विनिमयाचें साधन आधुनिक युगाप्रमाणें सर्रास वापरण्यांत नव्हतें आणि तें साधन मामुली स्वरूपाचें होतें, त्या काळांत मनुष्याची धडपड धनोत्पादनाकरितां कशी असेल ? आणि आर्थिक दृष्ट्या विचार करितांहि धनाचा अर्थ एक विनिमयाचें साधन किंवा त्यापासून उत्पन्न झालेली 'मालमत्ता' हाच घ्यावयास पाहिजे ( Wealth is that which has exchangeable value ). प्रथमावस्थेंतील मानवानें जमविलेलीं शिकारी हत्यारें व झोपडीचीं साधनें हीं त्याचें व्यापक अर्थानें 'धन' होतील. पण आतांच सांगितलेलें अर्थशास्त्रांतील 'धन' होणार नाहीं. कारण ती झोपडी व हत्यारें हीं जीवनावश्यक असून त्यामुळें इतरांचें नुकसान होत नाहीं व इतर 'आर्थिक' घटना घडत नाहींत. आपल्या नवीन व्याख्येप्रमाणें धनोत्पादन केल्यामुळें आपण अप्रत्यक्षपणें दुसऱ्यावर आक्रमण करीत असतों. तें धन आपलें नसतें व आपल्याला त्याची आवश्यकताहि नसते. हें धन समाजाचें असतें. असो. तर याप्रमाणें प्रथमावस्थेंतील मनुष्याची झोपडी व हत्यारें हीं जशीं 'धन' होऊं शकत नाहींत त्याप्रमाणें त्याकरितां करावी लागणारी धडपडहि 'धना' करितां होऊं शकत नाहीं. ती जीवनाकरितां होते. म्हणजे या पहिल्या युगांत–धन नसलेल्या युगांत धनोत्पादन नाहीं व आर्थिक घटनाहि नाहींत.

'अर्थ'च नव्हता तर 'आर्थिक कारण' कोठून ?–

यापुढील काळ म्हणजे विनिमयाचें साधन निर्माण झालें तेव्हांचा काळ. या

काळांत 'पैसा' हें जीवनाचें साधन म्हणून वापरण्यांत येई. वेद, पाणिनी व महाभारत या काळांत सुवर्णाचें निष्क हें नाणें असे. परंतु त्याचा उपयोग फारच क्वचित् होत असे. मोंगलाईत व शिवाईत होन, मोहरा, पुतळ्या हीं सोन्याचीं व रुपया हें रुप्याचें नाणें प्रचलित असे. त्या काळांत व्यापारहि असे. परंतु व्यापारानें व्यापाराचेंच क्षेत्र व्यापलेलें होतें. इतर जीवनापासून तें अलग होतें–निदान व्यापाराचा त्यावर ताबा चालत नसे. तेव्हांपेक्षां सध्या हिंदुस्थानचा व्यापार वाढलेला असूनहि अधिक दरिद्री आहे याचें कारण टेरी म्हणतो त्याप्रमाणें मोंगलांनीं सोनें-चांदी परदेशीं पाठविण्यास बंदी केली होती. तो आपल्या ग्रंथांत म्हणतो, The Moghul Kings made it a crime not less than capital to export gold and silver" ब्रिटिशांचें धोरण सहेतुकपणें याच्या विरुद्ध असल्यानें आज हिंदुस्थान दरिद्री बनण्यास अनेक कारणांपैकीं तें एक महत्त्वाचें कारण झालें आहे. तें कांहीं असो. साधारणपणें हिंदुस्थानांत पेशवाईपर्यंत व युरोपांत अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील औद्योगिक क्रान्तीपर्यंत फार तर सतराव्या शतकापर्यंत चलनी नाणें केवळ साधन म्हणूनच वापरण्यांत येई. खऱ्या अर्थानें धनोत्पादन, व्यापार व त्यामुळें उद्भवणाऱ्या आर्थिक घटना आणि समाजावर त्यांची पडछाया इ. गोष्टीं जगभर सर्वसामान्यपणें कमींत कमी १८ व्या शतकांत सुरू झाल्या असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. येथपर्यंतच्या मधल्या काळांत 'धन' जरी उत्पन्न झालें होतें तरी तें बाल्यावस्थेंत असल्यामुळें म्हणजे केवळ धनाकरितांच समाजांत तंटे व वाद माजावेत इतक्या विपुलतेनें त्याचा प्रसार न झाल्यामुळें सामान्य लोकांची दृष्टि 'धन' लोलुप नव्हती. धनिकांचीहि दृष्टि धन हें साधन म्हणून वापरण्याची होती. या सर्व कारणांनीं समाजांतील घटनांच्या मागें आर्थिक हेतु असावा हें संभवत नाहीं. हा हेतु असण्यास सामान्य जनतेची दृष्टि 'धन' लोलुप असावी लागते ती नव्हती. चलनी नाण्यांच्या विरलतेमुळें वस्तूंच्या परस्पर मोबदल्यानें जीवनांतील व्यवहार चालविणे फार सुलभ जाई. निव्वळ पैसा हें त्यांचें साध्य नव्हतें. याचें प्रत्यंतर त्याकाळच्या समाजस्थितीशीं आधुनिक समाजस्थितीची तुलना केली असतां सहज कळण्यासारखें आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्या काळांत पैशाअडक्याच्या चोऱ्या, दरवडे, किंवा दोन व्यक्तींतील पैशाकरितां झगडे होत नसत. हें सर्व होत होतें पण त्याचा हेतु 'आर्थिक' नसून बहुधा जीवन जगणें हाच होता. या मधल्या काळांत म्हणजे विनियमाचें साधन नुकतेंच सुरू झालेल्या

काळांत, पर्यायानें घरगुती उद्योगधंद्याच्या काळांत व्यापार असे आणि तो जगभरहि चालत असे. त्यांत धनाढ्य होणाऱ्या थोडयाशा धनिकांनीं वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठीं सामुदायिक रीत्या कांहीं आर्थिक घटना घडवून आणल्या म्हणजे त्याचा अर्थ सर्व जग हें आर्थिक घटनांनींच चाललेलें होतें असा नाहीं. विवाह-संस्थेचा उगम, हिंदूंचा चातुर्वर्ण्य, एकत्र कुटुंब पद्धति किंवा अशाच तऱ्हेच्या इतर धार्मिक संस्था यांना 'आर्थिक कारण' नव्हतें.

आर्थिक घटनांचें युग–

खरें आर्थिक युग सुरू होऊन दोन तीन शतकें झालीं. या युगांत खरें धनोत्पादन सुरू झालें. मनुष्याच्या सामाजिक जीवनांतच काय पण खासगी जीवनांतहि आर्थिक दृष्टि येऊन ज्या ठिकाणीं वास्तविक 'अर्था'चा अर्थाअर्थी संबंध नाहीं आणि तसा आणूंहि नये अशा घटनांना आर्थिक स्वरूप येऊं लागलें. व्यक्तीच्या खासगी जीवनांतच 'अर्थानें' इतका धुमाकूळ घातला तर त्याच्या सामाजिक जीवनांत असें न होणें अपरिहार्य आहे. आज जगांतील प्रत्येक घटना–जागतिक स्वरूपाची, सामाजिक, वैयक्तिक, राजकीय, धार्मिक, कौटुंबिक या सर्व घटनांच्यामागें आर्थिक हेतु उघडपणें वा दडून आहे. सरकार राज्य करतें तें व्यापारी हेतूनें. सामाजिक कार्यकर्ता केलेल्या कार्यांत व्यापारी सौदा बघत असतो. लग्नामध्यें वरपक्ष प्रतिपक्षा-कडून मिळणाऱ्या हुंड्याची आतुरतेनें वाट पहात असतात. भावाभावांचें प्रेम इस्टेटवाला बाप मरेपर्यंत असतें. बापावरील प्रेम 'अर्थ'पूर्ण असतें. शिक्षणाचा भाव बाजारी सौद्याप्रमाणें ठरत असतो. देशभक्तीहि आर्थिक स्वरूपाची असते. सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं समाजांतील प्रत्येक घटनेमागें आर्थिक कारण असतें हा सिद्धांत याच काळांत अगदीं यथायोग्य लागू आहे.

## अबाढव्य व्यापाराचा समाजावरील अनिष्ट परिणाम

अतिस्वार्थांतून स्पर्धा, स्पर्धेतून विषमता–

उद्योगधंद्यांतील दुसऱ्याची नड भागविणें आणि त्याचें फळ म्हणून ज्याची नड भागविली त्यानेंहि स्वेच्छेनें आपल्याला नड असलेला मोबदला देणें हा आपापसां-

तील परस्पर व्यवहार समूळ नष्ट होऊन काय वाटेल तें होवो पण आपला माल खपवून त्याची किंमत भरपूर आली पाहिजे हा निव्वळ एकांगी व स्वार्थी हेतु व्यवहारांत अवतरूं लागला म्हणजे समाजांतील लोकांचें सर्व दृष्टीनें अकल्याण होतें. केवळ धनोत्पादनाचा वैयक्तिक स्वार्थ साधावयाचा असल्यानें व्यापारी माणसास गिऱ्हाईकाच्या सुखदुःखाकडे पाहण्याचें कारण राहत नाहीं. किंबहुना अशातऱ्हेनें दुसऱ्यांच्या मनाचा विचार करणें हा व्यापारशास्त्रांतील मोठा गुन्हाच होऊन बसला आहे. त्यामुळें एक धनिक धनाच्या बळावर अनेक माणसें मजुरीस लावून त्यांच्याकडून थोडक्या किंमतींत भरपूर माल तयार करून घेतो. त्यावर अनेक युक्त्या करून तो खपेल अशातऱ्हेनें त्याची सजावट केलेली असते. त्याचा माल खपूं लागला म्हणजे इतर तत्सम धनिकांना हेवा वाटून स्पर्धेनें वाढत वाढत जाऊन व्यापारांत चढाओढ लागते. अशी चढाओढ मोठ्या व्यापारांतून निर्माण झाली म्हणजे पैसा विषम स्वरूपांत विभागला जातो म्हणजेच थोड्यांना श्रीमंती व अनेकांना दारिद्र्य येतें. अशा तऱ्हेनें समाजांत विषमता निर्माण होऊन हा पहिला अनिष्ट परिणाम उद्भवतो.

स्पर्धेंतून हीन व अपायकारक उत्पादन–

व्यापारी माणसाचें लक्ष आपला माल जास्त कसा खपेल याकडे असतें. त्याकरितां अनेक धडपडी त्याला कराव्या लागतात. माल तयार करण्यास कमींतकमी पैसा खर्च व्हावा आणि त्या थोडक्या पैशानिशीं विक्री ढिगावारी व्हावी ही इच्छा. म्हणून माल तयार करण्यास पैसा कसा कमी खर्च करतां येईल इकडे सर्व एकाग्रता. मजुरांना शक्यतों कमी पगार देणें हें झालेंच पण प्रत्यक्ष व्यापार्य वस्तु थोडक्या किंमतींत व परिश्रमांत ती विकण्याचा अट्टाहास असतो. मग ती वस्तु गुणधर्मानें कशी कां असेना पण यामुळें ती वस्तु खरेदी करणाऱ्या समाजाचें केवढें नुकसान होतें ! वस्तु टिकाऊ नसते. याशिवाय ती खाद्य असल्यास, औषधी असल्यास त्यापासून केवढा तरी धोका पोंचेल ! खाद्य व औषधी वस्तु स्वस्त मिळतात म्हणून लोक घेतात,पण तें अन्न निःसत्त्व किंबहुना क्वचित्प्रसंगीं अपायकारकहि असूं शकतें. याला जबाबदार कोण ? अशा वेळीं स्वच्छंदी, स्वार्थलोलुप व्यापाऱ्यांवर राजसभेचें कडक नियंत्रण असणेंच योग्य नव्हे काय ? व्यापार्य वस्तु राजप्रतिनिधींच्या कडक नजरेखालून गेल्याशिवाय ती कारखान्यांतून बाहेर पडतांच कामा नये.

जाहिरातींचा फाजील फैलाव–

विसाव्या शतकांत व्यापारवाढीमुळें एक नवें शास्त्र उदयास आलें. तें म्हणजे जाहिरातशास्त्र. जाहिरात हें खरोखरच शास्त्र बनलें आहे. त्यानें व्यापारावर अनंत उपकार करून ठेविले असले तरी बिचाऱ्या बहुजनसमाजावर मात्र तितकेच अपकार करून ठेविले आहेत यांत शंका नाहीं. जाहिरात हें आधुनिक व्यापाराच्या हातांतील एक प्रमुख शस्त्र आहे. तें जर काढून घेतलें तर व्यापाराची मोठी केविलवाणी स्थिति होईल. जाहिरातीचा मूळ उगम व्यापाराच्या सोयीसाठीं झाला. आपला उत्तम माल जगास पूर्णपणें माहीत व्हावा–नव्हे आकर्षक व्हावा याकरितां जाहिरातीचा उपयोग होई. लोकांस अज्ञात असलेल्या गोष्टी त्यांच्या नजरेसमोर याव्यात एवढाच जाहिरातीचा हेतु असता तर त्या स्वार्थी व्यापाराप्रमाणेंच इतर लोकांसहि उपकारक झाल्या असत्या. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें व्यापाराचें कार्यक्षेत्र वैयक्तिक स्वार्थ हेंच ठरून गेल्यामुळें आपला माल लोकांच्या डोळ्यांपुढें नाचवून त्यांना भुलवून तो घेण्यास त्यांची मनोवृत्ति तयार करणें हेंच कार्य जाहिरातीचें होऊं लागलें. त्यामुळें माल कसाहि असो त्याची जाहिरात तर इतकी बेमालूम असते कीं ती वाचणाऱ्यास जरूर नसतांहि तो माल केवळ चैनीखातर घेण्यास मोह व्हावा. अडाणी लोक तर जाहिरात म्हणजे साक्षात् सत्यच समजतात. जाहिरातीप्रमाणें तो माल असावयाचाच अशी त्यांची खात्री असते. ही फसवणूक करून आपला वाईट, नकली माल लोकांस घेण्यास लावून स्वतः गबर होणें ह्यापलीकडे जाहिरातींचें दुसरें ध्येय राहिलें नाहीं.

खासगी जीवनांत जाहिरातबाजीचा अनिष्ट परिणाम–

व्यापारीवृत्ति ज्याप्रमाणें जगांतील प्रत्येक व्यक्तीच्या खासगी जीवनांत निखालसपणें व्यवहार करूं लागली त्याचप्रमाणें व्यापाराचें शस्त्र जें जाहिरात तेंहि व्यक्तींच्या खासगी जीवनाचें एक महत्त्वाचें शस्त्र होऊन बसलें. व्यापारांत जाहिरातीचा उपयोग, माल कितीहि वाईट असला तरी त्याला सोनेरी बेगड लावून लोकांना सोन्यासारखा भासविणें आणि त्यावर स्वतःची धनलोलुपता तृप्त करणें याकडे करतात; तर व्यक्तींच्या खासगी जीवनांतहि अगदीं असाच उपयोग होऊं लागला. स्वतःचें व्यक्तिमत्व व कर्तृत्व कितीहि हीन असलें तथापि लोकांना तें उत्कृष्ट प्रकारचें

दाखवून मोठेपणा, पुढारीपणा, धन वा अन्य स्वार्थ्य वस्तु जिंकाव्यात आणि समाजांत उजळ माथ्यानें नाचावें हा तर आधुनिक कालाचा एक विशेषच होऊन बसला आहे. मोठें नसतांना मोठें आहों असें दाखविणें, कार्यकर्ता नसतांना कार्यकर्ता भासविणें, बुद्धिमान् नसतां बुद्धिमानाची नक्कल करणें, योग्यता नसतां योग्यतेचा आव आणणें या धडपडींतच सध्याच्या मनुष्याचें जीवन खर्ची पडत आहे. जीविताचें ध्येय कांहीं करणें हें नसून केल्यासारखें भासविणें हें झालें आहे. थोड्याशा तुटपुंजी सामग्रीवर जाहिरातबाजीच्या जोरानें सध्यांच्या युगांत मनुष्यास पैसा व नांव मिळविण्यास अडचण पडत नाहीं. सर्व सामर्थ्य कर्तृत्व दाखविण्यांत खर्ची पडण्यापेक्षां व्यक्तिमात्त्वाची जाहिरात करण्यांतच जास्त खर्ची पडतें. परंतु याचा परिणाम अनिष्ट होत आहे. समाजांत भपकेबाजपणा व नटवेपणा वाढूं लागला. भरीव कार्यकर्त्यांची उणीव भयंकर भासूं लागली. नादान लोक पुढें आले. जाहिरातीच्या जोरावर नादान लोकांच्या हातांत कर्तृत्वाच्या जागा गेल्यानें समाजाचें ठिकठिकाणीं अतोनात नुकसान होऊं लागलें. कळकळीनें कार्य करणाऱ्या निःस्वार्थी, स्वयंस्फूर्त लोकांच्या श्रमांचें चीज होईनासें होऊन ते मागें पडले. असे योग्य तेच पुरुष मागें पडल्यानें त्यांच्या कर्तृत्वाचा फायदा समाजास मिळेनासा झाला. केलेल्या श्रमाचें चीज नाहीं असें दिसतांच कळकळ असलेल्या कार्यकर्त्यांची संख्या झपाट्यानें घटूं लागली. मनोवृत्तीचा सर्वांत मोठा अधःपात म्हणजे सज्जन मनासहि नाइलाजास्तव म्हणून वा शिष्टाचार म्हणून वा खरोखरच भाविकपणें तसें वाटूं लागलें म्हणून एखादी वाईट गोष्ट करण्यांत मनास कांहींच वाईट वाटूं नये. वाईट गोष्ट जेव्हां वाईट लोकांतच फैलावलेली असते तेव्हां त्यांत आश्चर्य नसतें. व धोकाहि नसतो. परंतु त्याचा फैलाव राजरोसपणें समाजाच्या सुसंस्कृत वर्गात होऊं लागून कालांतरानें त्या वाईट गोष्टीला शिष्टसंमति मिळून ती शिष्टाचार म्हणून गणला जातो. अशी स्थिति आली कीं समाजांतील मूळ सद्‌वृत्तीचाच ऱ्हास झाला असें समजावें. यांत बदल करणें फार कठीण असून फार काळ लावणारें आहे. जाहिरातबाजी सध्यां शिष्टसंमत झाली आहे. बरेचसे शिष्ट लोकहि आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीला स्मरून सांगतात कीं, काळ असा आहे; अशी जाहिरात केल्याशिवाय माणसाचा या जगांत टिकाव लागणार नाहीं.

जाहिरातबाजीचें उदात्तीकरण—

जाहिरातबाजीचें हें राक्षसी स्वरूप बदललें तर समाजाला फार हितकारक

होणार आहे. व्यापार जोंपर्यंत व्यक्तीच्या अमर्याद स्वार्थाचें साधन आहे तोंपर्यंत आर्थिक प्रश्न जगांतून केव्हांहि नष्ट होणार नाहींत. व्यापार हा राजसभेच्या हातीं पाहिजे. त्याचा हेतु लोकांची नड भागविणें हाच पाहिजे. व्यक्तींच्या हातांत स्वैरपणें व्यापार जातां कामा नये. वस्तुतः व्यापारी हा राजसभेचा प्रतिनिधि म्हणून पाहिजे. असें झालें तर वैयक्तिक स्वार्थास जागा राहणार नाहीं. राजसभेच्या हातांत उद्योगधंदा गेला तरी प्रत्यक्ष धंदा करणाऱ्या माणसाच्या कर्तुत्वास योग्य वाव दिला पाहिजे. व्यापारी राजसभेचें निर्जीव यंत्र नसावें. तो मनानें राजसभेस व लोकांना जबाबदार राहून मालाचा पुरवठा करून त्यावर योग्य तीच उपजीविका करणारा समाजाचा सेवक असावा. जाहिरातीचा अर्थ स्वतःची टिमकी वाजविणें हा बदलून प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत अवश्य लागणाऱ्या गोष्टींचें अचावत् यथार्थ ज्ञान करून देणारें एक साधन असा जर झाला तर जगांतील अज्ञानी लोकांचे व सज्ञानी असून बऱ्याच गोष्टी अज्ञात असणाऱ्यांचें पुष्कळ हाल वाचून जीवनांत थोडेंफार सुख मिळेल अशी आशा आहे.

विसाव्या शतकाचा एक विशेष–जाहिरातबाजी–

मनुष्याची वृत्ति कोणतीहि असली जरी असलेल्या बुद्धिमत्तेचा प्रवाह त्यामुळें अडत नाहीं. ज्याप्रमाणें मनोवृत्ति मार्ग करून देईल त्याप्रमाणें तिच्यामागून बुद्धि जाईल. एवढेंच कीं बुद्धीचा मार्ग बदलेल पण ती थोपवून धरली जाणार नाहीं. या बुद्धिमत्तेच्या जोरावर समाजांतील बुद्धिमान लोक समाजाकरितां नवीन नवीन कल्पना काढतात आणि त्या बुद्धीला पटवून देतात. त्या कल्पनांच्या बळावर कीर्ति-लोलुप लोक आपली लोलुपता तृप्त करीत असतात. त्याचें प्रमुख साधन जाहिरात. जाहिरातीसाठीं योग्य तो त्याग करण्याची त्यांची सदैव तयारी असते. थोडा फार त्याग करतात तो जाहिरात चांगली व्हावी म्हणून, कार्य चांगलें व्हावें म्हणून नाहीं. ज्या ठिकाणीं कार्य आहे पण कीर्ति नाहीं अशा ठिकाणीं किती त्याग केला जातो ? त्याग असतो पण तो धोरणानें ( deplomatic ) केलेला असतो. त्या त्यागाच्या मागें स्वार्थ असतो, उदात्त हेतु नसतो. स्वार्थी हेतूनें केलेला त्याग तो त्यागच नव्हे. जहिरात उत्तम झाल्यास कार्याकडे लक्ष देण्याची त्यास आवश्यकता भासत नाहीं. तात्पर्य, जाहिरातबाजीनें घरादारांत–देशाप्रांतांत, खासगी–सार्वजनिकांत सर्वत्र थैमान घातलें आहे. पोकळ जाहिरातबाजी हा विसाव्या शतकाचा विशेष आहे.

व्यापारामुळें जाहिरातींचा भाव चढला. मूळ माल वाईट असला तरी त्यास वरकरणी आकर्षक रूप देऊन तो लोकमान्य होऊं शकतो हें जाहिरातीचें मूळ तत्त्व समाजांतील कोणत्याहि प्रकारच्या व्यवहारांत उपयोगी पडूं लागून त्याचें अर्थातच सर्वत्र स्वागत झालें. प्रत्यक्ष जाहिरातीच्या शस्त्राचा अवलंब सर्वत्र होऊं लागला एवढेंच नव्हे तर त्यांतील मूळ तत्त्व या ना त्या कसल्याहि स्वरूपांत समाजाच्या कोणत्याहि व्यवहारांत कायमचा पाय रोवून बसलें.

या सर्व व्यापारांतील तत्त्वांच्या फैलावाचा परिणाम असा झाला कीं, जणुं मानवी समाजाची उभारणी याच तत्त्वाच्या पायावर आधारलेली आहे. या तत्त्वांचा लोक अवलंब करतात म्हणूनच मनुष्य समाजांत टिकून राहिला आहे. जो मनुष्य या तत्त्वांचा अवलंब न करतां विरुद्ध वागेल त्याचा जगांत टिकाव लागणें शक्य नाहीं. या त्रिकालाबाधित समजल्या जाणाऱ्या सिद्धांताच्या तत्त्वज्ञानाचें सोंग जगांत उजळ माथ्यानें वावरूं लागलें. त्यामुळें खरोखरच एखाद्या सात्त्विक आणि निःस्वार्थी माणसास थोडा तरी त्या सर्वमान्य तत्त्वाचा अवलंब केल्याशिवाय जगांत राहणें अशक्य होऊं लागलें.

पोकळ कार्यपद्धतीचा सशास्त्र अभ्यास–

अशा या अत्यावश्यक ( ! ) विषयावर संशोधन होऊन त्यावर शास्त्र सांगणारे ग्रंथ तयार होऊं लागले. ‘ प्रचार तंत्र ’ ( Propaganda ) हें त्याचेंच उत्पादन आहे. याचा मुख्य पाया मानसशास्त्र आहे. मनुष्याचें मन कोणत्या तऱ्हेनें आकर्षून घेतां येईल हा प्रचारतंत्राचा मूळ गाभा. कार्य भरीव कसें करतां येईल यावर कोणी संशोधन करीत नाहीं. आणि त्याची तशी आवश्यकताहि भासत नाहीं. परंतु या प्रत्यक्ष कार्याच्या तळमळीपेक्षां कार्य होण्याच्या आधींच आपल्या कीर्तीची ध्वजा लोकांच्या डोळ्यासमोर कशी नाचेल याचीच प्रथम तळमळ ! याचेंच जास्त संशोधन ! कार्य कसें करावें हें शास्त्र बनण्याऐवजीं तें झालें नसतांना लोकांच्या डोळ्यांत कसें भरेल हेंच नवीन शास्त्र बनलें ! मनुष्याचें मन कसें आकर्षून घेतां येईल आणि आपली छाप त्याचेवर पडेल या नवोदित शास्त्राचा मानसशास्त्राच्या आधारानें अभ्यास होऊं लागला. कार्य खरोखर भरीव आणि उदात्त असेल तर त्याला कृत्रिम प्रचाराची आवश्यकता काय ? आणि त्याच्या तंत्राची तर मुळींच

जरूर नाहीं. कर्तृत्व उदात्त आणि त्यागी असेल तर तें आपोआप दुसऱ्याच्या डोळ्यांत भरून तो त्याकडे आकर्षिला जातो. विरुद्ध मतप्रणालीचा मनुष्यहि त्या कर्तृत्वाबद्दल सहानुभूति आणि आदर बाळगल्याशिवाय राहणार नाहीं. कार्य परद्वेषाच्या जहाल अमींत निर्माण झालें असेल, सहिष्णुतेची झळ लागलेली नसेल, आणि इतरांना मागें सारून स्वतः एकटेंच पुढें यावें असें वाटत असेल तर मात्र अशा कार्यकर्त्याला ( ! ) प्रचारतंत्र हा एकमेव आधार आहे.

फाजील धनोत्पादक वृत्तींतून शिथिल नीति.–

जाहिरातीची मशाल हातांत घेऊन पोकळ डौलाच्या नगाऱ्यावर स्वतःच्या व्यक्तित्वाची वा मालाची केवळ स्वार्थाकरितां दवंडी पिटविणाऱ्या व्यापारी लोकांच्या मनांत नीति म्हणजे दुसऱ्या माणसाविषयीं सहानुभूतीचा विचार येणें शक्य नसतें. येथें नीतिकल्पनांची पाटी उलटी फिरवून ठेवलेली असते. पण याचा परिणाम सर्वसमाजावर अनिष्ट झाल्यावांचून राहत नाहीं. वरीलप्रमाणें फक्त व्यापारी म्हणजे व्यापक प्रमाणावर धंदा करून अर्थोत्पादन करणाऱ्या लोकांतच हा परिणाम घडतो असें नाहीं तर धंदा करण्यानें धनोत्पादन होतें या आकर्षक कल्पनेनें समाजांतील बरेचसे लोक लहान मोठे धंदे सुरू करतात. व्यापारांतील मूळ धनोत्पादनाचें तत्त्व याच्या आकर्षकतेमुळें प्रत्येक व्यवहारांत उतरूं लागलें. मग वैयक्तिक धनोत्पादनाच्या स्वार्थी नीतीव्यतिरिक्त समाजांत दुसरी कोणती नीति रूढ होऊं शकेल ?

आर्थिक वर्चस्वाची कमाल–

एकदा धनोत्पादनाच्या राक्षसानें व्यक्तीच्या खाजगी जीवनांत आणि त्याबरोबर सामाजिक जीवनांतहि थैमान घालण्यास सुरवात केली म्हणजे त्याचाच पगडा सर्वांवर पडल्यावांचून राहत नाहीं.··समाजांतील व्यक्तींचा दर्जा त्यांच्या धनोत्पादनावर अवलंबून राहूं लागतो. ज्या प्रमाणांत धनोत्पादन अधिक तितका त्याचा दर्जा मोठा ! समाजांत स्थान आणि मान पैशावर मोजलें जाऊं लागलें म्हणजे जो तो पैशाच्याच मागें लागतो. समाजांतील आपलें मूळचें स्थान व पेशा बदलून, कुलपरंपरेचा उद्योग सोडून जो धंदा केल्यानें धनोत्पादन होईल तो धंदा करण्यास सुरवात होते. अशा तऱ्हेनें समाजाची उभारणी आणि धाटणी व्यापारानें घडूं

लागली म्हणजे पूर्वीची समाजांतर्गत रचना बदलून जाते. जातींची विभागणी नवीन धंद्यावर आणि त्याच्या उत्पादनावर आधारली जाते. जुन्या जाती बदलून नवीन जाती पुढें येतात. जुने शिष्टाचार आणि कुलपरंपरा बदलून सर्वत्र नाविन्याची छटा पसरते. मानवीयाच्या कल्पना बदलूं लागतात. विद्या वित्तावर उभी राहूं लागते. प्रेम पैशावर परीक्षिलें जातें. नीतिकल्पना विशुद्ध भावनेंतून उगम पावण्याचे ऐवजीं धनराशींतून उगम पावूं लागतात. अशा तऱ्हेनें समाजांतील प्रत्येक अंग पैशानेंच माखून गेलें म्हणजे तेथें उच्च भावना, नीति, पावित्र्य यांना आश्रय मिळत नाहीं. आणि समाजानें यांना वाळींत टाकणें म्हणजे शरीरानें अवयवांस वाळींत टाकण्यासारखें आहे. यासंबंधीं सर राधाकृष्णन् यांचे विचार मननीय आहेत. ते Kalki या आपल्या पुस्तकांत म्हणतात—

Modern civilisation is in the stage of economic barbarism. It is concerned more with the world and its powers than with the soul and its perfection. It asks us to mark the best of the business in hand, for first and final principles are beyond our men,—page 46.

व्यापार हा बहुधा व्यक्तिशः होत असला तरी त्याचें स्वरूप सामाजिक आहे. व्यापारावर कोणत्याहि प्रकारचा झालेला परिणाम वा घडामोडी या सामाजिक स्वरूपाच्या असतात. व्यक्तिव्यक्तींतून व्यापाराचा उगम असला तरी त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या घडामोडींना वा सामाजिक घटनांना एक व्यक्ति जबाबदार राहूं शकत नाहीं. व्यापारांत सहेतुकपणें कांहीं घडामोडी घडवून आणाव्यात हें एका व्यक्तीला अशक्य आहे. कारण व्यापार हा संपूर्णपणें स्वैर आणि केवळ वैयक्तिक धनोत्पादनाकरितां एकत्र येऊन विस्कळित स्वरूपांत वागणाऱ्या परंतु स्वतःच्या धंद्यावर वाईट परिणाम होऊं नये या भीतीनें कांहीं तत्सामाजिक नियम नाइलाजास्तव पाळणाऱ्या लोकांचा एक समुदाय आहे. जोंपर्यंत धंदा शाबूत असून त्याला धोका नाहीं तोंपर्यंत कोणाच्या नियंत्रणाखालीं वागण्याची त्यांस आवश्यकता भासत नाहीं. मग तेथें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहणार? या केवळ पोटभरू लोकांच्या मनांत गिऱ्हाईकांच्या सहानुभूतीचा विचार कसा येईल? त्यांच्या धंद्याशीं ज्यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं अशा नीतिनियमांना त्या ठिकाणीं प्रवेश मिळेल हें दुरापास्त आहे.

## समाजाची मनोवृत्ति आणि आधुनिक अर्थशास्त्र

### नैसर्गिक 'जड' वृत्ति–

वर सांगितलेल्या अनियंत्रणाच्या जोडीला व्यापारामुळें मनुष्याच्या ऐहिक गरजा भागत असल्यानें त्याच्या मनांतील भौतिक वृत्ति बळावत जाते. नैतिक वा ध्येयवादी वृत्ति आपोआपच लुप्त होते. मनुष्याची वृत्ति जन्मतःच जडवादी असते. मनुष्य हा सुखार्त असल्यामुळें त्याला धीर धरवत नाहीं. जें लवकर मिळेल व प्रत्यक्ष तत्क्षणीं शरीरानुभव येईल त्यावरच विश्वास आणि त्याकडेच ओढा असणें साहजिक आहे. तहानेनें व्याकुळ झालेला एखादा खोटया पण डोळ्यांना प्रत्यक्ष दिसणाऱ्या मृगजळावर विश्वास ठेवून त्याच्या मागें लागेल पण खरोखरच अस्तित्व असणाऱ्या परंतु दृष्टीआड असणाऱ्या वस्तूवर त्याचा विश्वास कधींच बसत नाहीं. तो त्या वस्तूंची आशा–अपेक्षा कधींच करणार नाहीं. उलट जर कोणीं असें सांगितलें तर तें त्याला थोतांड वाटल्यावांचून राहणार नाहीं. हीच स्थिति मनुष्याच्या रोजच्या व्यवहारांत दिसून येतें.

### धन नैसर्गिक 'जड' वृत्तीला कारणीभूत नाहीं पण साधनीभूत आहे–

आधिभौतिक वृत्तीचें बीज जन्मतःच मनुष्याचे अंगीं पेरलेलें असतें. बालपणांतहि त्याचें चांगलेंच प्रत्यंतर येतें. या अंगभूतवृत्तीच्या इच्छातृप्तीचें जर एखादें साधन मिळालें तर तीच फोंफावत जाणें साहजिक आहे. ही वृत्ति उत्पन्न होण्यास कोणतीहि गोष्ट कारणीभूत होत नाहीं. कोणतेंहि भौतिक साधन या वृत्तीला जबाबदार धरतां येत नाहीं. एवढेंच म्हणतां येईल कीं, मुळांत बीजरूपांत असलेली वृत्ति- तिच्या आकांक्षा पूर्ण होऊं लागल्या म्हणजे घातलेल्या खतानें त्या बीजाचें रोपटें होऊन पुढें त्याचा वृक्ष होतो. मनुष्याच्या ऐहिक गरजा जर धन पूर्णपणें भागवू शकतें तर त्याला धनाव्यतिरिक्त इतर गोष्टींचा विचार करण्याचें कारण काय उरलें ? आर्थिक अनुकूलता जडवादी वृत्तीला कारणीभूत होत नाहीं पण ती वृत्ति वृद्धिंगत होण्यास धन हें साधनीभूत होतें यांत शंका नाहीं.

### अध्यात्मवृत्तीचा सहजगत्या लोप–

जड वृत्तीप्रमाणें ध्येयवादित्व किंवा अध्यात्मवृत्ति अंगभूत नसते. तिचें बीज

संस्कारांनीं मुद्दाम मनुष्यांच्या हृत्क्षेत्रावर पेरून त्याची चांगली मशागत करावी लागते. धनामुळें ऐहिक गरजा भागतात त्यामुळें आतां कोणतीहि गरज भागविण्याची राहिली नाहीं असें वाटून मनुष्याची श्रद्धा धनोत्पादनावर बसून जडवादी वृत्ति बळावत जाण्यास साहाय्य मिळतें. मनाची कोणतीहि इच्छा अतृप्त राहिली नाहीं असें वाटण्याचें कारण ती इच्छा ज्या वृत्तींतून उत्पन्न व्हावयाची त्या वृत्तीचा लवलेशहि त्या माणसाचे मनांत नसतो. मग मूळच नाहीं तर कुळ कोठून ? अशा तऱ्हेनें अध्यात्म वृत्तीचा समूळ लोप होतो. जें व्यक्तीच्या बाबतींत तेंच समाजाच्या बाबतींत तितक्याच मोठ्या प्रमाणावर.

समाजाविषयींच्या घटकभावनेचा लोप घातक आहे–

अशा तऱ्हेनें सबंध समाज धनप्रधान झाला म्हणजे वर म्हटल्याप्रमाणें व्यक्तींच्या जडवादी वृत्तीचाहि जोर होतो. जडवादी वृत्ति वृद्धिंगत होऊं लागली म्हणजे अध्यात्मवृत्तीला थारा मिळत नाहीं. व्यापारोत्पन्न धनप्रधान समाजाची जडवादी वृत्ति म्हणजे वैयक्तिक स्वार्थाच्या हेतूनें केलेल्या अतोनात म्हणजेच अयोग्य धनबलावर. याचाच अर्थ समाजांतील बहुजनसमाजाच्या जीवावर स्वतःची सुखलोलुपता तृप्त करणारी वृत्ति. ही वृत्ति बळी तो कान पिळी या तत्त्वावर आधारलेली असते. हें तत्त्व सहकार्यानें एकत्र जीवन घालविण्यास समाजांत फैलावूं लागलें म्हणजे त्या समाजांतील व्यक्ती समाजघटकत्वाची भावना विसरून जातात आणि व्यक्तीच्या फाजील सुखलोलुपतेपलिकडे पर–जीवनाशीं बेफिकीर अशा होतात. समाज जर याप्रमाणें दुसऱ्याला मारून स्वार्थसाधु तत्त्वावर चालूं लागला तर तो समाज सुव्यवस्थित राहोच पण जिवन्त तरी राहूं शकेल कीं नाहीं याची खात्री देतां येणार नाहीं. ( Economic Relations--Negative Results–The future of Civilisation by Radha Krishnan. )

वैयक्तिक हित आणि सामाजिक हित–

जडवादीवृत्तीमुळें असा समाजाचा ऱ्हास होऊं लागला तरी त्याचा दोष जडवादावर येत नाहीं. जडवाद कधींहि असें शिकवत नाहीं. कारण जडवाद तर भौतिकमार्गानें समाजाच्या उन्नतीसाठींच धडपडत असतो. मार्ग भिन्न असला तथापि हेतु तोच. दोष असेल तर तो मार्ग स्वीकारण्यांत आहे. समाजाच्या उन्नतीचा विचार करतांना

त्या समाजांतील व्यक्तींच्या मानसशास्त्रास डावलून भागणार नाहीं आणि सामाजिक मानसशास्त्र तर अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे. सामाजिक नियम करतांना तो नियम एका व्यक्तीच्या तात्कालिक सुखाला व दुःखहरणाला सहायीभूत होत असला तथापि याचाच प्रसार सर्व समाजांत झाला आणि सर्व काळ झाला म्हणजे त्याचा परिणाम मूळ एका व्यक्तीच्या तत्कालीन प्रसंगाचे बाबतींत हितावह वाटला तरी व्यापक समाजिक क्षेत्रांत अमर्याद कालांत तसाच सुखावह होईल ही कल्पना भ्रामक आहे. एखादी गोष्ट एका व्यक्तीच्या बाबतींत सोयिस्कर वाटली तरी ती गोष्ट सामाजिक होतांक्षणींच तिचें स्वरूप पार पालटून जातें. अर्थात परिणामहि अगदीं भिन्न होतो. याकरितां जडवादानुसार आपण व्यक्तीला जें स्वातंत्र्य देतों किंवा त्याचे जे नियम करतों ते व्यक्तीला तत्कालीन परिस्थितींत हितावह वाटतात पण साकल्यानें समाजाच्या दृष्टीनें ते परिणामीं हितकारक होत नाहींत. केवळ वैयक्तिक ऐहिक सुखाकरितांच मनुष्याचें जीवन आहे ही कल्पना एका व्यक्तीला कांहीं काळ सुखावह आहे यांत शंका नाहीं. कल्पनेच्या आकर्षकतेमुळें अर्थातच लोकमान्य झाल्यानें त्या कल्पनेस सामाजिक व्यापक स्वरूप येण्यास वेळ लागत नाहीं आणि हें स्वरूप प्राप्त झालें म्हणजे पूर्वी सांगितल्याप्रमाणें मूळ कल्पनेचेंहि रूप पार पालटून जाऊन त्याचा परिणाम विपरीत होतो. व्यक्तीनें वैयक्तिक सुखाकरितांच झटावें ही मूळ कल्पना एका व्यक्तीचे वेळीं आकर्षक व सुखावह आहे. पण त्याला सामाजिक स्वरूप येऊन त्या कल्पनेचा सर्वत्र प्रसार झाला म्हणजे समाजांतील प्रत्येक व्यक्ति स्वार्थसाधु बनून इतरांची पर्वा न करतां स्वतःची थैली भरण्याच्या मागें लागते. आणि याच वेळीं समाजांत आर्थिक विषमता निर्माण होऊन गुन्ह्यांचें प्रमाण वाढतें. अखेर समाजांत अस्वस्थता निर्माण होते. जडवादांत परहिताची अवहेलना केलेली नसली तथापि स्वहित हें आधारभूत असल्यानें स्वहितांत गर्क झालेल्या मनुष्यास परहिताचें भान राहणें कठीण जातें. कल्पनेच्या मुळांत जरी परहिताकडे दुर्लक्ष झालेलें नसलें तथापि वर सांगितल्याप्रमाणें स्वहित आधारभूत असल्यानें साकल्यानें पाहातां शेवटीं परिणाम अगदीं विपरीत होतो. ध्येय जरी अगम्य असलें तरीहि तें डोळ्यापुढें ठेवण्यांत हा दूरदर्शीपणा असतो !

अध्यात्माची शिकवण परलोकतत्परतेहून परहिततत्पर अधिक आहे—

अध्यात्मवाद्याचें ध्येय जरी सर्वसंगपरित्याग करून योगी होऊन मोक्ष मिळविणें

हें असलें तरी तें वर सांगितल्याप्रमाणें सामान्य जनतेस अगम्य ध्येय आहे. म्हणून त्याला महत्त्व आहे हें विसरतां कामा नये. शिवाय सामान्य लोकांना अगम्य ध्येय सांगावयाचें तें ध्येयाकरितां नसून त्याची सर्व गोम त्या ध्येयाच्या मार्गांत आहे. विशिष्टप्रतीच्या योग्यांस मात्र ध्येय हें प्रत्यक्ष कृतीकरितांच असून तें सुलभ आहे. वस्तुतः ध्येयाचा मार्ग तंतोतंत आचरणें हेंच सामान्य जनांचें ध्येय ! परंतु तेंच ध्येय मानलें तो मार्ग एकनिष्ठेनें आचरला न जातां तो अगम्य समजून सामान्य लोक त्यापासून चार पाऊलें दूरच सरतील ! अगम्य ध्येयावरील अढळ श्रद्धेमुळेंच ध्येयाचा मार्ग निष्ठापूर्वक वापरला जातो. सामान्य लोकांना हें ध्येय कधींहि गांठणें शक्य नसतें. म्हणजेच जगाचा त्याग करून वनांत तपश्चर्या करून योगसाधनानें मोक्ष मिळणें शक्य नसतें. परंतु या ध्येयाच्या एकनिष्ठतेनें मात्र ध्येयाचा सामान्य मार्ग म्हणजे आचार बिनचूक पाळले जातात. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास या सामान्य आचारानें जग सुखानें नांदेल. कारण अध्यात्माच्या शिकवणीची पहिली पायरी म्हणजे स्वार्थ सोडून दुसऱ्याच्या जीवनाकडे प्रथम सहानुभूतिपूर्वक विचार करणें. जग असार आहे, ऐहिक सुखें विष आहेत याचा अर्थ हें सर्व जग वाईट असून येथून शक्य तितक्या लवकर निघून जाणें किंबहुना अशा तऱ्हेनें जगच नाहींसें करून टाकणें हा नसून व्यक्तीनें त्या सुखांच्या नादीं लागून वैय्यक्तिक स्वार्थाचे पायीं निष्कारण इतरांच्या पोटावर पाय आणूं नये आणि प्राणिमात्रांच्या सुखांत, सामाजिक सुखांत विष कालवूं नये. वैयक्तिक स्वार्थावर वासना न राहातां मनांत भूतदया असावी, दिलदारपणा असावा हाच हेतु वरील शिकवणींत आहे. ऐहिक साधनांवरील वैयक्तिक सुखाची इच्छा उडून गेल्यावर समाजांत तंटेबखेडे कोणत्या गोष्टीसाठीं होणार ? स्वतःच्या जीवापेक्षां दुसऱ्याची काळजी प्रथम घेतली तर कोणकोणाशीं भांडण काढीत बसणार ? अशा तऱ्हेनें जगाचा व्यवहार परहिततत्पर होऊन सुखी व्हावा ह्यापलिकडे सामान्य लोकांच्याकरितां दुसरी कोणतीहि शिकवण अध्यात्म देत नाहीं. मोक्षाची शिकवण समाजांत हजारीं एक-दोन व्यक्तींकरतांच आहे.

वाढतें शास्त्रोक्त धनोत्पादन-वाढती विषमता-

व्यापाराची झपाट्यानें वाढ होण्यास इतर अनेक कारणें झालीं असतील पण त्यांतच अर्थशास्त्रांतील प्रगति हें एक कारण आहे हें विसरून चालणार नाहीं. अर्थ-

शास्त्राच्या जागृतीनें व प्रगतीनें व्यापाराचें सहाय घेऊन समाजांत अनेक क्रान्त्या घडवून आणल्या. अर्थशास्त्राची जशी प्रगति होऊं लागली तसें व्यापारासहि शास्त्रोक्त स्वरूप येऊं लागलें. मुळांतच व्यापाराचा हेतु वैयक्तिक धनोत्पादन असल्यानें आणि व्यापाराच्या गाड्यास अर्थशास्त्राचा कुशल सारथी लाभतांक्षणींच जगाच्या धुमधडाक्यांत व्यापाराचा गाडा कुशलतेनें व सूक्ष्मपणें जगावर आक्रमण करूं लागला. व्यापार, म्हणजे वैयक्तिक धनोत्पादन अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीनें होऊं लागलें. लहान भांडवलावर पटीपटीनें कसें धनोत्पादन करावें हें शास्त्रीय पद्धतीनें लोकांस कळूं लागलें. धनोत्पादनाचे नवीन नवीन प्रकार उत्पन्न झाले. बँकांची वाढ, विमा-कंपन्या, एजंसीज्, कायद्याचा सल्ला देणाऱ्या कंपन्या इ. प्रकार वरील विधानाच्या साक्षी आहेत. प्रथमदर्शनीं ह्याप्रकारचें धनोत्पादन सामुदायिक वाटत असतें तथापि त्याचें अंतिम स्वरूप वैयक्तिक आहे. तें वरकरणीं असून वैयक्तिक धनोत्पादन भरमसाट वाढूं लागलें म्हणजे व्यक्तिव्यक्ति म्हणून जरी समाजांत श्रीमंतांची संख्या वाढली तरी याचाच अर्थ बँक व विमाकंपन्या तत्त्वतः सामाजिक सोयीच्या असल्या तरी व्यवहारांत सामाजिक सोयीपेक्षां धनाचें केंद्रीकरण म्हणजेच विषमता निर्माण करतात.

मूठभर लोकांची श्रीमंती म्हणजे बहुजनसमाजाचें दारिद्र्य. श्रीमंतांची संख्या डोळ्यांत भरत नसून त्यांची श्रीमंती डोळ्यांत भरते. अशा तऱ्हेनें वाढलेलें धनोत्पादन–व्यापार समाजाचें भूषण न होतां दूषण होतें. राजसभेला जबाबदार नसलेल्या व्यापाराच्या वाढीमुळें विषमता कळसास पोंचून त्यानुसार समाजांत अस्वस्थता उत्पन्न होते. व्यापारी पेशा स्वार्थी असल्यानें उत्पादित मालाकडे त्याच्या उपयुक्ततेविषयीं व चांगलेपणाविषयीं सहेतुकपणें बेफिकीर असतात. टिकाऊपणांतहि नाजूकच असल्यानें एकाच उपयुक्त वस्तूकरितां बराच पैसा खर्च करावा लागतो. ही स्थिति व्यवहारांतील पुष्कळ गोष्टींची असल्यानें व्यक्तीचा घरखर्च वाजवीपेक्षां जास्त होतो. मिळकत मात्र वाढत नाहीं. अशा तऱ्हेनें नकळत समाजाचा किती तरी पैसा वाया जातो आणि आर्थिक स्थिति बेताचीच असणाऱ्या समाजांतील मोठ्या वर्गाला दारिद्र्याची कळा लागते.

**समाजाची आर्थिक आधारणी घातक होईल.–**

व्यापार आणि अर्थशास्त्र यांचा वर सांगितल्याप्रमाणें पोष्यपोषक संबंध असल्यानें

व्यापाराप्रमाणें अर्थशास्त्राचाहि समाजावर पगडा बसणें साहजिक आहे. आधुनिक युगांत इथून तिथून सर्वत्र व्यापारी धोरणावरच समाजाची आधारणी झाल्यामुळें अर्थशास्त्र समाजांत वेदासमान वाटावें यांत विशेष नाहीं. अर्थशास्त्र हेंच आधुनिक युगाचें समाजशास्त्र होऊं पाहत आहे. जणुं कांहीं अर्थशास्त्राशिवाय समाजाचें पानहि हलणें शक्य नाहीं. परंतु ज्या समाजाचें सारसर्वस्व अर्थशास्त्रांत आहे तो अर्थात् रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाहीं. हें कळूनच कीं काय विसाव्या शतकाच्या द्वितीयार्धातील युरोपीय जग आपल्या समाजांतील रचनेचा आर्थिक पाया आस्ते आस्ते बदलून समाजाची पुनर्घटना करण्याचे प्रयत्न करीत आहे. धनोत्पादनांत अग्रगण्य असलेली अमेरिका आर्थिक पायावर कुटुंबसंस्था उभारूं पाहत होती पण ती अयशस्वी झाली. रोज नवीन विवाह व रोज नवीन घटस्फोट यांमुळें भावी कालावर वाईट परिणाम होणार हें निश्चित. लोकसंख्या प्रथमच भरपूर असल्यानें हा प्रश्न आतांच 'आ' वासून उभा राहणार नाहीं. पण कुटुंबसुख व समाजसुख यांस तो देश पारखा झाला हें निश्चित. एवढी धनसंपन्न अमेरिका असूनहि चोऱ्या व दरवडे यांचें प्रमाणहि त्याचप्रमाणें संपन्न आहे. रशियाची लोकसंख्या अल्प असल्यानें १९४५ च्या महायुद्धानंतर ही जाणीव त्याला जांचवली. युद्धपूर्व स्वैर विवाहपद्धति मोडून कुटुंबसंस्था स्थिरावण्यासाठीं प्रयत्न चालू आहेत. स्त्रियांचें प्रजोत्पादन व बालसंगोपन हें त्यांच्या अर्थोत्पादनापेक्षां महत्त्वाचें आहे हें रशियास पटूं लागलें आहे.

Economic independence with freedom from the ties of marriage and the responsibilities of Motherhood is the ambition of many a young Woman of the growing 'smart set'. Divorces are increasing in numbers and children are pushed back and forth between the parents where only communication with each other are through their solicitors—Kalki—para 19–S. Radha Krishnan.

अर्थशास्त्राचें कार्यक्षेत्र–

अर्थशास्त्रांत प्रगति होते ती व्यावहारिक अडचणीपेक्षां व्यापारी अडचणी भासूं लागल्या म्हणजे जास्त होते. अर्थातच झालेल्या प्रगतीचा उपयोग व्यापाराकडे

लावून घेण्यांत येतो. व्यापार जसजसा वाढूं लागतो तसतशा त्यांतील अडचणी जाणवूं लागतात. आणि मग केवळ त्याकरितां अर्थशास्त्रीय संशोधन सुरू होतें. म्हणजे अर्थशास्त्राची वरीचशी वाढ व्यापाराकरितां झालेली आहे. व्यापारांतहि अर्थशास्त्राचें कार्य काय असतें ? कमींत कमी भांडवलावर जास्तींत जास्त माल कसा उत्पादन करावा आणि कमींत कमी मालावर जास्तींत जास्त फायदा कसा काढावा म्हणजे पर्यायानें किमान भांडवलावर कमाल धनोत्पादन कसें करावें, किमान खर्चांत कमाल सुख कसें मिळवावें आणि वाजवीपेक्षां जास्त असलेलें भांडवल गुंतवून त्यांतून पट-प्रमाणांत पुन्हां धनवृद्धि कशी करावी हाच अर्थशास्त्राचा मुख्यतः हेतु दिसतो. उपयोग करून घ्यावयाचाच झाला तर बहुजनसमाजाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीनें अर्थशास्त्राचा उपयोग केव्हांहि करून घेण्यासारखा आहे. पण तसा उपयोग करून घेणारा पाहिजे. बहुजनसमाजाच्या आर्थिक स्थितीचा विचार केला जातो पण त्याचें पर्यवसान शेवटीं मूठभर धनिकांच्या वा सार्थसाधु आणि संधिसाधु पुढाऱ्याच्या नफ्यांत होतें. निदान बहुजनसमाजाच्या नफ्यांत होत नाहीं हें निश्चित.

अर्थशास्त्राचा ठसका समाजास लागेल–

याप्रमाणें अर्थशास्त्राची व्याप्ति पैसा म्हणजे विनिमयाचें साधन खर्च करण्या-पुरतीच आहे. धनाचा व्यय कसा करावा अर्थातच पर्यायानें सामाजिक धनाचा योग्य विनिमय करणें यापलिकडे अर्थशास्त्राची व्याप्ति जात असेल असें वाटत नाहीं. आणि केवळ धनव्ययावर समाज आधारला जातो असें म्हणतां येत नाहीं. अर्थशास्त्र हा समाज उभा करणारा एक स्तंभ असेल पण तो अनेकांपैकीं एक आहे हें विसरून चालणार नाहीं. सर्व स्तंभांचा विचार करतां अर्थशास्त्राच्या एका स्तंभावर समाजाचा किती भार पडतो हें पाहण्यासारखें आहे. केवळ आर्थिक तत्त्वावरच समाज आधारलेला आहे असें नाहीं. समाजाच्या गरजा आणि तृष्णा अनेक प्रकारच्या असतात. त्या सर्वच्यासर्व गरजा शमविण्याचें काम अर्थशास्त्राला करतां येण्यासारखें नाहीं. तें त्याच्या अवाक्याबाहेरचें आहे. आणि जर लहानतोंडीं मोठा घास अर्थशास्त्र घेईल तर त्याचा ठसका समाजाला लागल्यावांचून राहणार नाहीं.

अर्थशास्त्राची मर्यादा–

अर्थशास्त्राला स्वतःचें स्वतंत्र असें ध्येय नाहीं. दोन भौतिक साधनांत थोडक्या

खर्चांत जास्त सुख कोण व कसें देईल हेंच लहान वा मोठ्या प्रमाणांत अर्थशास्त्र सांगतें. अगदीं थोडक्यांत व व्यावहारिक शब्दांत पण व्यापक अर्थानें सांगावयाचें झाल्यास अर्थशास्त्र काटकसर कशी करावी हें शिकवितें. वैयक्तिक वा सार्वजनिक संसाराचा गाडा हांकतांना काटकसरीच्या शास्त्रीय लगामाची फार आवश्यकता आहे. तरीपण त्या शास्त्राची एक विशिष्ट मर्यादा आहे, तेवढीच त्याची संकुचित व्याप्ति आहे. ही काटकसर करतांना किंवा थोडक्यांत अधिक सुख देणारें साधन स्वीकार-तांना या साधनाचा अर्थशास्त्रास इतर दृष्टीनें विचार करण्याचें कारण राहत नाहीं. तें साधन नैतिक दृष्ट्या कितपत योग्यतेचें आहे हें तें पाहत नाहीं–युक्तायुक्ततेचा विचार करीत नाहीं. कोणत्याच मानवी देहाला हें पूरक वा पोषक नाहीं. कांहीं झालें तरी मानवी जीवनांत काटकसरीला स्वतंत्र व महत्त्वाचें स्थान नाहीं. काट-कसर ही सापेक्ष आहे. मानवी महत्त्वाकांक्षेप्रमाणें वा त्याच्या ठरलेल्या ध्येयाप्रमाणें काटकसरीनें वागावयास पाहिजे. जीवनाचें ध्येय गांठण्यासाठीं–मार्ग सोपा जावा म्हणून काटकसर आहे. काटकसरीकरितां काटकसर कधींच नसते. व्यक्तीच्या पद-वीला तीमुळें धोका पोंचत असेल तर काटकसर आणि तिचें शास्त्र हीं कोलमडून पडलीं पाहिजेत. ( It is the only duty of Economics to describe and it is Ethics who prescribes. ) अर्थशास्त्राची येथेंच मर्यादा संपते. परंतु सध्यां याच्या उलट प्रकार आढळतो. अर्थशास्त्र हें जीवनाचें साधन म्हणून जाऊन साध्य झालें आहे. येनकेनप्रकारेण थोडक्या पैशांत आणि काटकसरीनें धनराशी सांठवून ठेवणें हें एकच ध्येय प्रत्येकापुढें आहे.

## ‘व्यापारी’ विवेचनाचा निष्कर्ष

### अर्थशास्त्राची लंगडी बाजू–

एकंदर जीविताचा विचार केला असतां अर्थशास्त्र हें वस्तुतः अपूर्ण वाटतें. त्याची पूर्तता इतर अनेक जीवनबंध असलेल्या शास्त्रांच्या साहाय्यानें होईल. अर्थ-शास्त्र अपूर्ण या दृष्टीनें कीं तें अभ्यासानें तत्त्वतः पूर्ण होत असलें तथापि प्रत्यक्ष व्यवहारांत त्याचा उपयोग करतांना केवळ त्या शास्त्राच्या तत्त्वज्ञानावर विसंबून राहतां येत नाहीं. नीत्यादि इतर शास्त्रांची सल्लामसलत घेतल्याशिवाय अर्थशास्त्रास पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. आणि जर तसें केलें नाहीं, तर एका पायानें लंगडें

असलेलें हें शास्त्र स्वतःबरोबरच समाजासहि खालीं पाडण्याचा दाट संभव असतो. अर्थशास्त्रांत कितीहि प्रगति झाली तरी तें समाजाच्या दृष्टीनें नीत्यादि इतर शास्त्रांच्या अभावीं तें अपूर्णच होणार. अर्थशास्त्राची पूर्तता त्याच्या स्वतःच्या अंतर्गत प्रगती-पेक्षां बाह्य साहाय्यावर अधिक अवलंबून आहे. अर्थशास्त्र धनव्यवस्थेव्यतिरिक्त इतर तत्त्वांचा विचार लक्षांत घेत नाहीं. धनोत्पादनासाठीं जें आपण साधून घेतों त्यामुळें समाजावर किती प्रकारांनीं चांगला व वाईट परिणाम होतो हें अर्थशास्त्राच्या गांवींहि नसतें. किंबहुना तो प्रांत आपला नाहीं असेंच तें ठांसून सांगत असतें. कोणतें साधन स्वीकारावयाचें आणि त्याचा परिणाम काय होईल इकडे त्यास लक्ष द्यावयाचें नसतें. तें साधन आर्थिक दृष्ट्या कितपत फायद्यांत पडेल एवढेंच आपलें काम असें तें समजत असतें. त्या अत्यावश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यामुळेंच समाजांत विषमता, दारिद्र्य आणि अन्याय अनन्वितपणें सुरू झाले. अर्थशास्त्र अपूर्ण व लंगडें आहे असें म्हणतों तें येथें. त्यास जर नीतिशास्त्राची जोड असती, निदान त्यानें आपली पायरी संभाळली असती तर समाजांत आर्थिक प्रश्न कशाला उत्पन्न झाले असते ?

वैयक्तिक तत्त्व आणि सामाजिक तत्त्व–

आर्थिक समृद्धतेनें माणसाच्या सर्व गरजा भागविल्या जातात. आणि त्या गरजा भागविणें, म्हणजेच जीवन सुखकर करण्यासाठीं तर माणसाची सर्व धडपड. तेव्हां आयुष्यांत प्रथम आर्थिक समृद्धि करणें हेंच माणसाचें आद्य कर्तव्य ठरतें असें अर्थवाद्यांचें म्हणणें असतें. अशातऱ्हेनें व्यक्तीच्या आयुष्यांत ज्या 'अर्था'स प्रथम प्राधान्य आहे आणि ज्याच्याकरितांच ती व्यक्ति आपलें सर्व आयुष्य खर्च करून धडपडत असते त्या अत्यावश्यक 'अर्था' वरच व्यक्तीव्यक्तींनीं बनलेला समाज उभा राहणार हें उघड आहे. त्याच अर्थशास्त्रावर समाजाची रचना–घटना तयार होणार. प्रथमदर्शनीं हा तर्कवाद बुद्धीला पटण्यासारखा असाच आहे. परंतु पूर्वींच सांगितल्याप्रमाणें जें एका व्यक्तीच्या बाबतींत कांहीं काळ हितावह असतें तें सबंध समाजाच्या बाबतींत चिरकालाचा विचार केला असतां त्या व्यापक क्षेत्रांत हितावह होईल हें विधान धोक्याचें आहे.

जेव्हां आपण एका व्यक्तीचा विचार करतों तेव्हां एखाद्या तत्त्वाचें स्वरूप अतिशय संकुचित असून त्यांत बाहेरील नवीन गोष्टींच्या मिश्रणानें व त्या वाता-

वरणानें तें स्वरूप गुंतागुंतीचें न होतां अत्यंत साधें राहतें. शिवाय त्या तत्त्वाचें आयुष्यहि व्यक्तीच्या आयुष्याप्रमाणें क्षणभंगुर असतें. ह्याप्रमाणें सर्व दृष्टींनीं बालरूप असलेलें तत्त्व सौम्य असल्यानें तें तेवढयाच संकुचित क्षेत्रांत हितावह ठरून बहुधा निरुपद्रवी असतें. परंतु हें बालरूप असतें. ह्याची आपणांस विस्मृति पडते. आणि एका व्यक्तीला तें हितावह वाटतें, म्हणून व्यक्तीव्यक्तींनींच बनलेल्या समाजास सर्व काळीं हितावह होईल अशा युक्तिवादानें आपण तें तत्त्व समाजास लागूं करूं पाहातों. व्यक्तिगत तत्त्व समाजास लागूं केलें म्हणजे त्याचें पहिलें कोंवळें व सौम्य बालरूप नष्ट होऊन त्याचा मोठा वृक्ष होतो, एकांगी साधेपणा लयाला जाऊन अनेक गोष्टींच्या संघर्षणानें त्यांत गुंतागुंत उत्पन्न होते. मूळची सौम्यता नाश पावून त्यास उग्रता प्राप्त होते. किंबहुना पहिलें हितकारी लहान रूप पालटून एकदम निराळेंच रूप धारण करतें. आणि त्याप्रमाणें त्याचे परिणामहि बदलून त्यांना क्रूरत्व येतें.

धनोत्पादनाचें वैयक्तिक आणि सामाजिक स्वरूप–

व्यक्तीच्या जीवनांत केवळ वैयक्तिक धनार्जन आणि त्याकरितांच सर्व जीवाची धडपड हें विधान जसें तर्कशुद्ध तसेंच व्यवहारांतहि कोणाला पटण्यासारखें असें आहे. किंबहुना हा सिद्धांत बालवयापासूनच मनुष्याच्या मनांत बिंबला गेलेला असतो व म्हणून हा सिद्धांत निसर्गसिद्ध वाटल्यास त्यांत नवल नाहीं. परंतु हें तत्त्व प्रत्यक्षांत सर्रासपणें सामाजिक स्वरूपांत जेव्हां अंमल गाजवूं लागतें त्यावेळीं वर सांगितल्याप्रमाणें तें आपलें रूप बदलून टाकतें. सबंध समाजाहून भिन्न असा एखादा मनुष्य वरील तत्त्वांप्रमाणें आचरण करूं लागला म्हणजे केवळ वैयक्तिक स्वार्थहेतूनें धनोत्पादन करूं लागला, त्या धनोत्पादनाकरितांच रक्ताचें पाणी करून कष्ट करूं लागला आणि समाजांत व्यवहार करतांनाहि धनोत्पादन हा एकमेव महामंत्र जपूं लागला तर तो मनुष्य श्रीमंत होईल, व्यवहाराला अगदीं चोख असल्यानें दुसऱ्याकडून बुडण्याचा प्रसंग येणार नाहीं, त्याचें कुटुंब दारिद्र्याभावीं द्रव्यापुरतें सुखी होईल. जवळ पैसा आहे म्हणून चार लोकहि मित्र म्हणून त्याच्याभोंवतीं गोळा होतील त्याचप्रमाणें पैसा आहे म्हणूनच त्यास समाजांत वरकरणी कां होईना पण मान मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. तात्पर्य काय तर त्याचें ऐहिक जीवन सुखी झालें–धनोत्पादनाचें तत्त्व व्यवहारांत आचरल्यामुळें मनुष्य अशा-त्हेनें सुखी होतो हा यावरून सिद्धांत निघाला.

समाजांत एखादीच व्यक्ति अशी असली तर त्या तत्त्वाचा परिणाम समाजावर प्रभावी तर नाहींच परंतु हा एक बिंदु सबंध समाजसागरांत इतका बेमालूमपणें मिळून जातो कीं, त्याचा लवलेशहि कोठें दिसत नाहीं. अर्थातच या बीजरूपांत असलेल्या तत्त्वाचा त्याचा मोठेपणीं होणारा दुष्परिणाम कोणाच्याच ध्यानांत येण्या-सारखा नाहीं—त्याची कल्पनाहि नसणार. उलटपक्षीं त्या तत्त्वाचें गोंडस बालरूप पाहून सर्व लोक त्याकडे साहजिकपणें आकर्षिले जातात. मग त्याचा सर्वत्र प्रसार होण्यास वेळ लागत नाहीं.

धनोत्पादनाचा हव्यास आणि तदुत्पन्न अनिष्ट परिणाम—

अशा तऱ्हेनें या वैयक्तिक तत्त्वांना सामाजिक स्वरूप येऊं लागलें कीं समाजांत अस्वस्था निर्माण होते. समाजांतील प्रत्येक व्यक्ति धनोत्पादनाचें स्वार्थी धोरण पुढें ठेवून प्रत्येक व्यवहार करूं लागली तर त्या एका व्यक्तीचें धनोत्पादन होतें पण त्यामुळें इतर अनेकांचें दुःखोत्पादन सुरू होतें. पूर्वीच सांगितल्याप्रमाणें धनोत्पा-दनाच्या मागें लागलेला मनुष्य दुसऱ्याच्या हिताहिताचा विचार करीत नाहीं. रोगी तपासणारा वैद्य पैशाकडे बघून रोगाला औषध देतो, दोघांचीं भांडणें तोडून दोघांना वास्तविक जवळ करणाऱ्या वकिलाची खव्याकरितां भांडणारीं दोन मांजरें आणि त्यांचा न्याय देणारा माकड याहूनहि कांहीं निराळी स्थिति होत नाहीं. औषधांचे निर्माते औषधाच्या किंमतीप्रमाणें औषधाला गुण देतात. विद्यार्थ्यास मिळणारी गुरूची विद्या त्यानें दिलेल्या वर्गणीवर अवलंबून असते. ह्याप्रमाणें समाजांतील अनेक पेशांचे लोक धनोत्पादनामागें लागून अनंत समाजघटकांचें अनंत प्रकारांनीं नुकसान करीत असतात. हा झाला अगदीं प्रत्यक्ष परिणाम. पण अप्रत्यक्ष असून जबरी असे परिणाम अजून किती तरी आहेत ! व्यापारांतच काय परंतु ज्या ठिकाणीं सेवाधर्म असून कांहीं उदात्त लोककार्य करावयाचें असतें त्याहि ठिकाणीं ही धनोत्पादनाची वृत्ति प्रवेश केल्यावांचून रहात नाहीं. वरील वृत्तीमुळें मानवी मनांतील उच्च तत्त्वांचा लोप होतो. जीं तत्त्वें टिकून राहतात त्यांचें नुसतें नांवच जिवन्त राहून आंतून हाच व्यापार चाललेला असतो. सच्चेपणा, प्रामाणिकपणा दुसऱ्याकरितां कांहीं करण्याची इच्छा इ. सात्त्विक वृत्ती नष्टप्राय होतात आणि मग प्रत्येक व्यक्तीच स्वार्थामागें लागलेली आणि हें सामाजिक म्हणून सर्वमान्य झालेलें. तेव्हां जो तो आपापला स्वार्थ साधण्यासाठीं जो आड

येईल त्याचा नाश करून जास्त आधाशीपणास पुरेसा वाव मिळेनासा झाला म्हणजे बिचाऱ्या इतरेजनांवर त्याची गदा येते. त्यांना पिळून स्वतः गबर होतो. कारखान्यांची आणि इतर व्यापाराची वाढ हें त्याचेंच द्योतक आहे. अशा तऱ्हेनें एकावर दुसरा अन्यायानें मात करूं लायला म्हणजे समाजांत विषमता निर्माण होऊन अनेक आर्थिक प्रश्न उपस्थित होतात. समाजाचा मूळ पाया आर्थिक तत्त्व हाच राहतो. समाजाची आधारणी यावरच असली म्हणजे खऱ्या गुणाचें चीज न होऊन ते लुप्त होतात. नादान लोक पुढें येतात. गुणी माणसें नष्ट झालीं म्हणजे समाजांतील अनेक पेशांचीं कार्यें बंद पडतात. सार्वजनिक काम करण्यास–मग तें नोकरीचें असो वा स्वयंसेवक वृत्तीचें असो–गुणी माणसेंच लागतात. जर हीं कामें नादान माणसांच्या हातांत गेलीं तर समाजाचा ऱ्हास होईल. अशा माणसांना स्वार्था-पलिकडे दिसत नाहीं. कार्य करतांना आपुलकी राहत नाहीं. मग सामाजिक कार्यें यशस्वी कशीं होणार ? वैयक्तिक सुखाच्या अभिलाषानें बेपर्वाई वृत्ति बळावत जाते, सजाजघटकत्त्वाची जाणीव राहत नाहीं.

### व्यापार म्हणजे श्रमाचा योग्य मोबदला–

स्वार्थामुळें हें सर्व होतें म्हणून सर्वांनीं स्वार्थ सोडून साधू व्हावें असा याचा अर्थ नाहीं. येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, जीवन चालवीत असतां मनांत अतिरिक्त स्वार्थबुद्धि असूं नये. पोटाकरितां जरी काम केलें तरी त्यांत वृत्तीनें स्वार्थी राहूं नये. केलेल्या योग्य श्रमाचा आपण जीवनाकरितां योग्य तोच मोबदला घेत आहोंत आणि तो घ्यावा असा आत्मविश्वास पाहिजे. आपण समाजांत राहतों ते एकटे नाहीं. आपल्याबरोबर दुसरीं माणसें असतात. तींहि आपल्या जीवनाचाच एक भाग आहे. त्यांच्यावांचून आपलें जीवन अपुरें राहणार आहे. आपण जरी स्वार्थ साधला तरी त्यास या लोकांच्यामुळेंच किंमत येत असते. रानांत आपण एकठे असलों तर स्वार्थ या शब्दाला अर्थच राहणार नाहीं. इतके आपण समाजांत बांधले गेलों आहोंत. अशा समाजांत तडजोड करून एकमेकांत सह्यत्वानें भागवून घेणें हेंच केव्हांहि इष्ट आहे. आपलें पोट भरल्यावर दुसऱ्याचें भरलें कीं नाहीं याचा विचार करणें आवश्यक आहे. आपण ज्याचा मोबदला घेणार तें काम यथायोग्य झालें कीं नाहीं याचा विचार करणें समाजघटकाचें कर्तव्य आहे. उद्योगधंदा ही समाजाची सेवा आहे. तिच्याबद्दल आपला चरितार्थ चालविण्याकरितां समाजाकडून आपण

मोबदला घेतों. उद्योगधंदा हें धनोत्पादनाचें साधन न समजतां केवळ केलेल्या श्रमाचें योग्य फळ आहे ही भावना पाहिजे 'धनोत्पादन' हा शब्दच कोशांतून काढून टाकावा लागला पाहिजे. ही विचारसरणी आतां युरोपांत सुद्धां निर्माण होऊं पहात आहे. History and Progress या मार्विननें संपादिलेल्या निबंधसंग्रहांत Progress in Industry या निबंधांत तो म्हणतो,

"It can only be overcome by recognition of both sides that industry is in essence not a matter of contract and bargaining at all- but of mutual interdependence and community service.

व्यापाराचा उदात्त उद्देश-मानवता-

व्यापाराची वाढ झाली असली तरी त्यांत प्रगति झालेली नाहीं. किंबहुना असें सुद्धां म्हणतां येईल कीं अशाच तऱ्हेनें झालेली व्यापाराची वाढ म्हणजे व्यापाराची ती अधोगति आहे. व्यापाराचें ध्येय दुसऱ्यांस पिळून अनेकांना भिकेस लावून गबर होणें आणि अशाच लोकांची संख्या वाढविणें हें नाहीं. हा उद्देशहि नाहीं. व्यापारानें समाजांतील परस्पर अडचणी परस्परांनीं भागविणें-या उद्योगधंद्याच्या निमित्तानें माणसानें एकत्र येऊन आपलें समष्टि जीवन सहकार्यानें घालविण्याची संधि साधणें हाच व्यापाराचा उद्देश आणि याची सफलता. हेंच व्यापाराचें ध्येय पाहिजे आहे. केवळ यंत्रसामग्री भरमसाट वाढवून त्याच्यावर गरीब विचारे मजूर जितके जास्त पिळतां येतील तितकी व्यापाराची प्रगति अधिक हीच व्याख्या सध्यां रूढ आणि सर्वमान्य होत आहे. परंतु या प्रगतींत कोणती मानव्यता प्रकट झाली आहे? यानें किती लोकांचें, किती प्रकारचें, किती काळ सुख वाढलें आहे? विल्यम मॉरिसच्या खालीं दिलेल्या उताऱ्यांतून वरील विधानाला दुजोराच मिळत आहे.

"Fellowship is life and lack of fellowship is death." पुढें मार्विन म्हणतो, "Our study of the workman, then, is not complete when we have seen him with his tools : we must see him also with his workmates. We must see industry not simply as process of production but as a form of association........."

याप्रमाणें जर व्यापारक्षेत्रांत क्रांति घडून आली तर समाजाची संस्कृति पुष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांतून समाजघटकांच्या मनोवृत्तीची उच्चता सिद्ध होईल. समाजाचें उच्च ध्येय प्रतीत होईल. संस्कृतीच्या मूल्यमापनाचें आणि एक साधन म्हणजे कला. कला जीवनाला जितकी अनावश्यक वाटते तितकी संस्कृतीला आवश्यक आहे. ती कला म्हणजे काय, तिचें आपण रसग्रहण कां करितों, तिचें जीवनांत स्थान काय इत्यादि विवेचन पुढील प्रकरणांत पाहूं.

... ... ...
... ... ...
... ... ...
नों. दि. ...

# मनोरंजनाचीं कांहीं साधनें

७

## मनोरंजनाची मानसिक पार्श्वभूमि

जीवनाची व्याख्या कोणी कशीहि करो पण जीवन हें भावनामय आहे हें अमान्य करतां येणार नाहीं. फार तर एवढेंच म्हणतां येईल कीं कोणाचें जीवन भावनाप्रधान असेल तर कोणाच्या जीवनांत भावना लेशरूपानेंच असेल. एखाद्या जीवनांत आत्यंतिक भावनाविष्कार असेल तर एखादें जीवन आपली भावना दडून ठेवूं शकत असेल—ती अत्यंत संयमित असेल. किंबहुना असेंहि असण्याचा संभव आहे कीं एखाद्या मनुष्याचा भावनाविष्कार प्रकर्षानें असेल पण त्याची जाणीव त्याला यत्किंचितहि नसेल, आणि आपण भावनाशून्य आहोंत असाहि त्यास आत्मविश्वास असेल. कांहींहि असो, यांपैकीं वा याहूनहि भिन्न प्रकारानें भावना मनुष्याचे जीवनांत राहूं शकते; किंबहुना त्यामुळें जीवन पुरें होतें. अशा घटनांच्या मागें दडून कां होईना ही 'भावना' नांवाची वस्तु आधाराला नसेल तर त्या घटना सिद्धीस जाणार नाहींत. म्हणजेच पर्यायानें जीवन पुरें होणार नाहीं. पत्रावळ सर्व बाजूंनी पुरी झाली तरी मागें निदान फाटक्या पानाचा आधार दिल्यावांचून ती खरी पूर्ण होत नाहीं. जीवनाच्या पत्रावळींत भावनेला निदानपक्षीं या फाटक्या पानाच्या आधाराचें स्थान आहे यांत शंका नाहीं.

आनंदभेदः 'बरें वाटणें' व 'आल्हाद होणें'-

मनुष्य मनोरंजन करतो म्हणजे या सर्व प्रकारच्या भावनांचें प्रतिबिंब तयार करून वा जेथें नैसर्गिकपणें प्रतिबिंब आढळेल त्यांकडे पाहत बसून आनंद लुटीत बसतो. शोकपूर्ण रंजन करण्यांत वरून जरी त्याला वाईट वाटत असलें तथापि आंतून सहानुभूतीची, समानशीलतेची जाणीव होऊन त्याच्या मनाला आनंद होत असतो. मनाला आल्हाद होणें आणि ''मनाला बरें वाटणें' हे दोनहि जरी आनंद असले तरी ते एक नव्हेत. त्यांच्यांत भेद आहे. दोहोंचे जन्मदाते एक नाहींत. परंतु मनाच्या आनंदी स्थितींत मनाची कांहीं विशिष्ट प्रकारची जणुं एकच अशी अवस्था असल्यामुळें, ते दोनहि प्रकारचे आनंद सख्या भावाप्रमाणें वाटतात. वस्तुतः 'आल्हादा'चा जन्म सुखसाधनेच्या पोटीं झाला असून 'बरें वाटणें' या मनःस्थितीचा जन्म दुःखाच्या पोटीं झालेला आहे. साधनसुखोत्पन्न आनंद हा सामान्य मनःस्थितींतून वरील विशेष मनःस्थितींत रमविणारा आहे. शोकमूलक आनंद किंवा दुःखोत्पन्न आनंद हा नेहमींच्या सामान्य स्थितींतून खालील पातळींत गेलेल्या मनाला पूर्ववत् आणणारा आनंद आहे. (या ठिकाणीं मनाच्या तीन अवस्थांच्या तीन पातळ्या कल्पिल्या आहेत. त्या पातळींच्या सीमादर्शक तीन रेषा आहेत. मनाची सामान्य अवस्था दर्शविणारी 'समरेषा.' मनुष्य ज्यावेळीं दुःखांत असतो त्यावेळीं तो ही 'सामान्य स्थिति' सोडून—'समरेषा' ओलांडून खालील पातळींत असलेल्या दुःखावस्थेंत पदार्पण करतो. यावेळीं तो 'नीचरेषे'वर उभा असतो असें म्हणूं. मनास कोणत्याहि सुखामुळें आनंद झाला असतां तो 'सामान्यावस्था' सोडून 'समरेषा' ओलांडून वरील पातळींत असलेल्या 'आल्हादावस्थेंत' प्रवेश करतो. म्हणजे तो 'उच्चरेषेवर' उभा असतो.) याहिवेळीं दोन प्रकारचे आनंद भोगण्याचा बराच संभव येतो. पहिला म्हणजे 'नीचरेषें'तून समरेषेंत येण्याचा जो आनंद मिळतो तो आणि आल्हादोत्पन्न आनंदहि तेथें मिळूं शकतो. मनुष्य 'सामान्य अवस्थें'त असतां त्यास कांहीं कांहीं सुखें मिळूं शकत नाहींत. तीं मिळण्यासाठीं त्यास केव्हां केव्हां दुःखेंच भोगावीं लागतात. अशा दुःखांत असतांना 'सामान्यावस्थें'त अनुभवास न येणारें असें जीवास जीव देणारें मित्रत्व, प्रेमळपणा, मित्राच्या अमूप आणि सक्रिय सहानुभूति यांचा लाभ येथेंच होतो. हा लाभ मनाच्या 'सामान्यावस्थें'त मनुष्यास मिळत नाहीं. म्हणून

‘ समरेषे ’वरून ‘ उच्चरेषे ’वर नेणारा हा लाभ पहिल्या प्रकारचा म्हणजे ‘ आल्हादोत्पन्न ’ असतो.

मनोभावनांचा आविष्कार–

मनुष्यास आपल्या भावनेचें कोठें तरी कसें तरी प्रतिबिंब पाहण्याची उत्सुकता असते. व तें पाहण्यानें त्यास आनंद होत असतो. सुख, दुःख यांना कोणत्या ना कोणत्या तऱ्हेनें बाहेर पडण्याची अनिवार इच्छा असतें. आपणांस मिळालेलें सुख दुसऱ्यास केव्हां सांगेन असें होतें. त्या सुखाविषयीं दुसऱ्यानें आपणाजवळ सारखें बोलत राहावें, असें त्यास वाटत असतें. असें केल्यानें त्याचा आनंद द्विगुणित होतो. दुःखाचेंहि तसेंच आहे. स्वतःस दुःखाची आठवण झाल्यानें दुःख अधिकच वाढत जातें. परंतु त्याचविषयीं दुसऱ्यानें आपल्याशीं बोलत राहिलें म्हणजे त्यामुळें आपणास जास्त वाईट वाटतें हें खरें. परंतु दुसरा आपल्याशीं इतका समरस होतो हें पाहून वर सांगितल्याप्रमाणें दोन प्रकारचे आनंद आपण उपभोगीत असतों. एवढेंच काय पण रागाचेंहि असेंच आहे. आपल्या रागाचा आविष्कार करण्यास जागा मिळाली नाहीं तर तो फार असह्य होतो. आपला राग कोणावर तरी काढावासा वाटतो. म्हणजेच आपलें मन हलकें होऊन पूर्ववत् होतें.

जीवनाच्या प्रतिबिंबांतून सौंदर्योत्पत्ति–

भावनेचें पर्यायानें जीवनाचें प्रतिबिंब जितक्या उत्कटतेनें प्रतीत होईल तितक्या प्रमाणांत त्या वस्तूचें सौंदर्य हृदयांत खिळून राहातें. किंबहुना सौंदर्याचें प्रमाण यावरच ठरलेलें असावें. मूळ सौंदर्याची कल्पनाच या प्रतिबिंबांतून निघाली असावी. एखादी वस्तु सुंदर दिसते म्हणजे ती मनाला एक प्रकारचा आल्हाद देते. याचाच अर्थ मन त्या वस्तूंत रमतें. मनाचें रंजन केव्हां होतें हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. त्या सुंदर म्हटल्या जाणाऱ्या वस्तूंत जीवनाच्या कोठल्या तरी काना कोपऱ्याचें प्रतिबिंब प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें उमटत असलें पाहिजे. त्या वस्तूच्या सौंदर्यांतून ज्या भावना प्रतीत होतात त्यांच्याशीं मनुष्याच्या भावनांचें साम्य असलें पाहिजे.

भावना व्यक्त करण्यास मनुष्य लाजतो—

सर्वसाधारणपणें मनुष्य आपल्या भावनेचा आविष्कार मनमोकळेपणानें करण्यास लाजत असतो. शिष्टाचार म्हणून म्हणा किंवा ' हें करणें पोरकटपणाचें आहे ' अशा पोक्त समजुतीनें म्हणा मनांत कांहीं वाटलें तरी तें झांकून ठेवून चार लोकांत वरें दिसेल; व्यक्त करण्यास संकोच वाटणार नाहीं, इतकीच विचारमिश्रित, संयमित शिष्टस्वरूपांतील भावना तो व्यक्त करीत असतो. उदा० एखादी आवडीची वस्तु मिळाल्यास लहान मुलाप्रमाणें मोठा मनुष्य आनंदानें नाचावयास लागणार नाहीं, किंवा जो भेटेल त्यास, नव्हे प्रत्येकाकडे जाऊन तें सारखें सांगत बसणार नाहीं. त्या वस्तूचेंहि लहान मूल करील त्याप्रमाणें त्याला हाताळून त्याचे लाड करणार नाहीं. तो फक्त एवढेंच करील कीं, तोंडावर स्मित आणील, जवळ कोणी असेल त्यास आनंदानें सांगेल, आणि पुन्हां कांहीं वेळानें त्या वस्तूकडे त्याचें लक्ष सुद्धां जाणार नाहीं. दुःखाच्या बाबतींतहि असेंच आहे. मनांतल्या मनांत आलेली भावना दाबून टाकील, राग मात्र कांहींना आवरत नाहीं. प्रेम व्यक्त करण्याच्या बाबतींतहि मनुष्य त्यांतल्या त्यांत पुरुष पुष्कळच संयम राखीत असतो. या प्रेमाच्याच भावनेचें आविष्करण करण्यास मनुष्य लाजत असतो. प्रेम म्हणजे फक्त स्त्रीपुरुषांचें नव्हे, प्रेमाच्या सर्व शाखा यांत समाविष्ट होतात.

अतृप्त भावनांचें पूर्णाविष्कृत स्वरूप—

अशा तऱ्हेनें शिष्टाचार म्हणून म्हणा किंवा कांहीं अन्य कारणानें म्हणा मनुष्य हा आपल्या भावनेचा आविष्कार करण्यास लाज वाटून आपल्या भावना दडवून ठेवीत असतो. हें झालें जेव्हां तो जीवनांत प्रत्यक्ष अनुभव घेतो त्यावेळीं; परंतु हें जें सर्व त्याच्याकडून होत असतें तें मनापासून नसून केवळ लोकाचाराकरितां मनाविरुद्ध करीत असतो. आंतून मात्र त्या भावना दडलेल्या असल्या तरी जळजळीत असतात. म्हणूनच त्याच्या भावना ज्या ठिकाणीं प्रतिबिंबित झालेल्या दिसतात त्या ठिकाणीं त्या माणसाचें मन रमतें—ती वस्तु वा तें दृश्य त्याच्या हृदयांत जाऊन भिडतें. ज्या प्रकारची भावना मनांत अधिक दाबली गेलेली असेल त्या भावनेचें प्रतिबिंब दाखविणाऱ्या सुंदर वस्तूकडे त्याचें लक्ष खिळून राहतें. सर्व माणसांना सर्व प्रकारच्या सुंदर वस्तू सारख्या प्रमाणांत हृदयंगम वाटत नाहींत याचें हेंच कारण

आहे. मनुष्य प्रत्यक्ष व्यवहारांत भावनेला बंधनें घालतो. म्हणून हे अतृप्त राहिलेले भावनाविष्कार ज्या वस्तूंत वा दृश्यांत पूर्णपणें उतरले असतील त्या वस्तूचे ठिकाणीं त्या पूर्ण आविष्कृत झालेल्या भावना पाहून त्याच्या हृदयांत सह–अनुभूतीचा प्रत्यय येतो. हृदयांत उसळलेली भावनांची लाट दाबून ती नष्ट करणें हें अनैसर्गिक आहे. उसळलेली लाट तशीच अगदीं उंच जाऊन नंतर ती विरून त्याचे जलतुषार परत हृदयसागरांत विलीन व्हावेत हाच खरा भावनांचा गुणधर्म आहे. परंतु त्यांस वाव न मिळाल्यामुळें ज्या ठिकाणीं हा पूर्णाविष्कार झाला नसेल त्या ठिकाणीं तो मनुष्य साक्षात् स्वतःच्या अतृप्त भावनांचें पूर्णाविष्कृत स्वरूप अनुभवतो. या अनुभवांत अर्थात्‌च त्याला एक प्रकारचें सुख मिळत असतें आणि प्रत्यक्ष भावनाविष्काराच्या समाधानापेक्षां या प्रतिबिंबित सुखांत मनुष्य अधिक रममाण होत असतो.

## मनोरंजन जीवनाच्या प्रतिबिंबांत आहे.

### कलेंत जीवनांश प्रतीत झाला पाहिजे–

याप्रमाणें कलेचें सारसर्वस्व प्रतिबिंबित जीवनांत आहे. निरनिराळ्या कलांतून निरनिराळ्या भावना वा जीवनांश नानाप्रकारांनीं व्यक्त होत असतात. जितक्या प्रमाणांत जीवनांश त्यांत उतरला असेल तितक्या प्रमाणांत ती कला हृद्य वाटते. समजा, एक सुंदर देखाव्याचें दृश्य आहे. सूर्यास्ताची वेळ आहे; पश्चिमा लाल ढगांनीं भरून गेली आहे. सूर्यहि लाल व मोठा झाला आहे. त्याच्याखालीं एक तलाव आहे. त्यांत वरील आकाशाचें रंगीत सुंदर प्रतिबिंब पडलें आहे. कांठावरचीं हिरवीं बारकीं झुडपेंहि पाण्यांत दिसत आहेत. तळ्याच्या पलीकडील कांठावर एक माडाचें मध्येंच झाड आहे आणि आकाशाची लाली सर्वत्र पसरून सर्व सृष्टि तांबूस दिसत आहे; इ० इ०. हें दृश्य सौंदर्यशास्त्रदृष्टचा सुंदर असेल; पाहिल्याबरोबर सुंदर नाहीं असें म्हणवणार नाहीं; परंतु हृदयांत खोल जाऊन तेथें मन खिळून राहाणार नाहीं. किंवा तें पाहून गेल्यावर तें दृश्य मनांत बराच वेळ रेंगाळत राहाणार नाहीं; कीं एखादी भावना मनांत जागृत होऊन मनास हुरहुर लागणार नाहीं. पण त्याच दृश्यांत एखादी शरिराचें धनुष्य झालेली म्हातारी

डोक्यावर टोपली घेऊन कांठी टेकीत टेकीत हळू हळू घराकडे परत चालली आहे, किंवा जवळच एक चिमणी आपल्या पिलांच्या चोंचींत आणलेला घांस भरवीत आहे, किंवा एखादी गाय आपल्या वासरास पाजीत आहे असें दाखविलें तर लगेंच तें चित्र भावनेची पकड घेतल्यावांचून राहाणार नाहीं. मनाला कसली तरी हुरहुर लागून राहील.

आनंद अनुभवांतल्यापेक्षां त्याच्या प्रतिबिंबांत आहे–

मनुष्याचें मनोरंजन होतें म्हणजे काय हें आपण पाहिलें. पूर्वीं सांगितल्या-प्रमाणें सामान्यावस्थेंतून दोन प्रकारच्या मनःस्थितींत मनुष्य गेला म्हणजे मनोरंजन झालें असें म्हणतों. सामान्य मनःस्थितींतून 'उच्चरेषेंत' नेणारा 'आल्हाद' झाला पाहिजे किंवा 'समरेषेंतून' नीचरेषेंत गेलेल्याला 'समरेषेंत' आणणारी म्हणजे मनास 'बरें वाटणें' यांतील मनःस्थिति तरी आली पाहिजे. या दोन अवस्थांचें कारण जीवनांशाचें वा भावनेचें प्रतिबिंब. या प्रतिबिंबामुळेंच मनाचीं स्थित्यंतरें होत असतां पर्यायानें रंजन होतें. परंतु ज्याचें हें प्रतिबिंब आहे तो प्रत्यक्ष अनुभव मात्र मनास तितका रंजविणारा असतोच असें नाहीं. तो अनुभव मनास दुःख देणारा आहे. एखादा प्राणघातक अपघात पाहात असतां आपल्याला आनंद होणार नाहीं. परंतु त्या अपघाताचें सुन्दर चित्र किंवा काव्यांतील वर्णन एवढेंच काय पण त्याची कोणी जर हुबेहूब नक्कल केली तर ती सुद्धां पाहून मनाचें रंजन झाल्याविना राहणार नाहीं. मनुष्य अनेक हालअपेष्टा सोशीत असतो. त्या सोसतांना त्याचा जीव कासावीस होऊन मन उद्विग्न असतें. पण एकदां तो काळ संपून दिवस चांगले आले म्हणजे त्याच हालअपेष्टांचें दुसऱ्यास वर्णन करून सांगतांना त्यास स्वतःस किती आनंद होत असतो! हे दुःखद अनुभव तर राहोतच पण प्रत्यक्ष आनंददायक अनुभव घेतांना सुद्धां त्यांच्या प्रतिबिंबापेक्षां कमी होत असतो. प्रत्यक्ष प्रणयलीला करणाऱ्या प्रेमी जोडप्यास जितका आनंद होणार नाहीं त्याहून शतपटीनें त्या लीलांचें वर्णन वाचणारा, ऐकणारा वा मनोराज्य करणारा त्यांत रममाण होत असतो. आपल्या अत्यंत आवडीच्या पक्वानांची आठवण झाल्यानें तोंडाला पाणी सुटतें आणि मनाची तें खाण्याकरितां अधीरता वाढत जाते; ती स्थिति पक्वान्न प्रत्यक्ष खात

असतां होत नाहीं. आपण सुंदर सुंदर वस्त्रालंकारांनीं सजावें अशी इच्छा उत्पन्न झाली असतां त्या मनोराज्यांत मन जितकें रमून जातें तितकें प्रत्यक्ष सजल्यावर कांहीं वाटत नाहीं.

सौंदर्यांतून सर्वजीवन-दर्शन–

सांगण्याचें कारण एवढेंच कीं, मनुष्यास मूळ अनुभवापासून आनंद न मिळतां त्याच्या प्रतिबिंबांतून आनंदोत्पत्ति होत असते. मग तें प्रतिबिंब कोणत्याहि रूपानें प्रतीत होवो. हीं मनोरंजन करणारीं प्रतिबिंबें निर्माण करण्याचें किंवा निसर्गांतच लुप्त असलेलीं तीं उकलून पाहाण्याचें व दाखविण्याचें शास्त्र म्हणजे कला आणि सौंदर्य. या कलासौंदर्याच्या शास्त्रीय चमत्कारानें मनुष्य स्वतःचें गतकालीन जीवन अंशाअंशानें स्मरणरूपांत पाहूं शकतो. सद्यःस्थिति नीट उलगडून सर्व कानेकोपरे मोकळे करून साकल्यानें सत्यस्वरुपांत तिचें दर्शन घेतो. भविष्यत् कालांत झांकलेलीं माणकें पाहून जीवनांत आशायुक्त उत्साह घेतो, त्याच-प्रमाणें माणकांच्या शेजारींच पुढील मार्गांत आडवे येणारे आणि आतां दडून बसलेले दगडधोंडे निरखून घेऊन त्यांची दक्षता बाळगतो. तीनहि काळांतील विविध जीवनांचीं प्रतिबिंबें पाहिल्यानें सदसद्विवेकबुद्धीला चालना मिळते. आपण चालत असलेला मार्ग धोक्याचा आहे कीं हिताचा आहे याचें ज्ञान होतें. हिता-हिताची फारकत करतां येते. सारांश जीवनाचा सीधा मार्ग हुडकून काढण्याची दिव्य दृष्टि येतें. सर्व धडे मनुष्याला सहजगत्या जातां जातां, मन रमवीत रमवीत मिळत असतात. किंबहुना ते धडे प्रत्यक्ष घेत असतां ‘ आपण धडे शिकत आहों ’ याची त्याला जाणीवहि नसते. आणि त्या आनंदाच्या तंद्रींत असेंहि म्हणतो कीं, “ तें दुष्टाचार्यांचें गहन तत्त्वज्ञान आम्हांस मुळींच नको. ही कलाच बरी. यानें मन किती समाधानी होते, किती विश्रांति मिळते ! केवळ आनंदाकरितांच ही कला असली पाहिजे. ” परंतु त्या सौंदर्यभोगाच्या तंद्रींतच ते गहन तत्त्वज्ञानाचे धडे त्याच्या मेंदूंत त्या माणसाला नकळत मुकाटयानें जाऊन बसतात, आणि कालांतरानें प्रसंग ओढवला म्हणजे ते बाहेर येऊन मेंदूंतून हृदयांत शिरतात आणि मनुष्यास स्मरण होऊन त्याची सदसद्विवेकबुद्धि जागृत होते.

सुंदरतेच्या रूपांत जीवनाचा वाटाड्या–

कला-सौंदर्याचा विलास आनंदाकरितां. आनंद म्हणजे मनोरंजन आणि मनोरंजन याचा अर्थ दडलेल्या व दाबून टाकलेल्या भावनांचें पूर्णाविष्कृत प्रतिबिंब. मनुष्याच्या भावना ही हवेंतील बिनबुडाची वस्तु नव्हे. जीवनांतील प्रसंगावर मनांत होणारें एक प्रकारचें वादळ वा त्यावेळचीं विशिष्ट मनःस्थिति म्हणजे पर्यायानें भावनांचें प्रतिबिंब हे जीवनांश. हे असे जीवनांश निरनिराळ्या कलेंतून वा सौंदर्यातून चित्रपटाप्रमाणें एकामागें एक असें डोळ्यांपुढून जाऊं लागले आणि तेहि विविधतेंत म्हणजे एकट्या व्यक्तीच्या एकांगी जीवनाच्या चाकोरींतून जात असतां सारखी नवी नवी दृष्टि मिळत जाते. विचारांत विशालता येते. अन्य जनांचे अनुभव मार्गदर्शक होतात. या दृष्टीनें सौंदर्यपूजन प्रत्येकानें करावयास हवें आहे. वरील सर्व तत्त्वज्ञान आचरणांत आणलें जातें याचें सर्व श्रेय कलेला आहे. पण तें तत्त्वज्ञान कला म्हणून आचाररूपानें बाहेर पडतें. कलेचें कार्य एवढें महत्त्वाचें आहे! कला म्हणजे खुषमष्करीण नव्हे किंवा पैसे घेऊन नाच करून क्षणभर हसविणारी स्वार्थी, निर्लज्ज, ओठावर विकतचें कृत्रिम हास्य आणणारी प्रेमहीन हृदयाची नायकीण नव्हे. तिचें श्रेष्ठ मातेचें पवित्र स्थान आहे. ‘काउ, काउ, चिउ चिऊ!’ करून घास भरविणारी ती एक आई आहे. घास भरवितांना आपण जेवीत आहोंत याची जाणीव त्या लहान मुलाला होऊं नये, खेळतच आहोंत हीं दृढ श्रद्धा बिंबवून दिली पाहिजे. कला म्हणून स्वीकारणें आणि तत्त्वज्ञान म्हणून पचविणें हा कलेचा विशेष आहे. उंच डोंगर चढत असावें, बरीच चढण चढल्यावर थकवा येऊन वाटेमध्यें कांहीं वेळ विश्रांति घ्यावी आणि एकदां चौफेर नजर फिरवावी. भोंवतालच्या सृष्टिसौंदर्यानें श्रम-परिहार होऊन मनाला उल्हास वाटावा. पूर्ण विश्रांतीच्या वेळीं आनंदोन्मत्त मनःस्थितींतच मागें नजर टाकून तेथील उंचावरून दिसणाऱ्या सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेत आपण कसें चढत आलों, वाट कशी होती, धैर्यानें आणि चिकाटीनें इतकी मजल कशी मारली याचा उत्साहपूर्ण आढावा घ्यावा आणि मागील अनुभवांवरून पुढील मार्गांत घ्यावयाची दक्षता लक्षांत यावी. ही सिंहावलोकनाची दृष्टि फिरवून आपण ज्या ठिकाणीं बसलों आहोंत त्याचे भोंवतालीं असलेल्या वातावरणाचें निरीक्षण करून आपण कोणत्या स्थानावर बसलों आहोंत तें पाहावें. त्या भोंवतालच्या वातावरणांत आपण बसलेली जागा कितपत

खुलून दिसते हें पाहावें, तीच नजर त्यावरच्या वातावरणांत खिळून राहावी. पर्वताचें शिखर कोठें आहे, त्याचा अजून शिल्लक राहिलेला मार्ग कसा आहे, तेथील अडचणी काय असतील, रमणीय स्थळें काय असतील, त्यांत आपलें धैर्य आणि उत्साह कसा टिकेल. या सचिंत उत्साहांत सृष्टिसौंदर्याशीं समरस होतां होतां श्रमपरिहार व्हावा. सौंदर्योपासनेचें कार्य याहून भिन्न नाहीं. आपण प्रत्यक्ष व्यवहारांत जेव्हां जेव्हां सुंदरतेचा सुंदर म्हणून उपयोग करीत असतों तेव्हां तेव्हां, ज्या अर्थी हें सुंदर आहे आणि तें हृदयांत जाऊन भिडतें त्याअर्थी त्यांत कांहीं तरी मानवीजीवनाचा धागातंतू असल्याशिवाय राहाणार नाहीं. त्यांत जें हें जीवन भरलेलें असतें त्याचाच मनुष्याचे मनावर अप्रत्यक्षपणें परिणाम होत असतो. त्यांतूनच तो नकळत धडे घेत असतो. वरीच चढण चढून झाल्यावर विश्रांतीचे वेळीं कोणीहि तत्त्वज्ञानाचें व्याख्यान ऐकून घेणार नाहीं. त्यास तें असह्य होईल. परंतु आपण येथवर आलों कसें, पुढें जावयाचें कसें, कोणती सावधगिरी बाळगायाची इ. गोष्टी दुसऱ्यानें त्याचवेळीं शिकविल्या म्हणजे त्रासदायक होतात. त्याच गोष्टी तो स्वतः मनोरंजन करतां करतांच आत्मसात् करीत असतो. सौंदर्योपभोग घेत असतां हेंच होत असतें. निदान सौंदर्योपभोग अशा तऱ्हेनें व्हावा.

## मनोरंजनाचीं कांहीं साधनें

### ( नाट्यसंस्था )

नाट्यरंगेचा बहुरूपी उगम–

मनोरंजनाच्या साधनांमध्यें नाटयसंस्था ही पुरातन असून तिचें स्थानहि त्या प्रांतांत महत्त्वाचें आहे. नाट्याचा मूळ उगम कसा झाला हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे. संस्कृत ‘ नाटय ’ या शब्दाची व्युत्पत्ति ‘ नट् ’ या ‘ नाचणें ’ या अर्थाच्या धातूपासून आहे. त्यावरून आणि ऋग्वेदापासून तों ब्राह्मणें व पाणिनीच्या अष्टाध्यायी कालापर्यंत नाटय म्हणजे पठण, नर्तन व गायन, असेंच नाटकाच्या प्राथमिक अवस्थेंत संबोधिलें जात होतें. ‘ड्रामा’ या इंग्रजी शब्दाचा मूलार्थ ‘ क्रिया ’ असा आहे. ॲरिस्टॉटलनें नाटयाची व्याख्या मनुष्यांच्या

क्रियांचें, भावांचें व आयुष्यांचें ध्येयात्मक प्रदर्शन अशी केली आहे. याप्रमाणें ग्रीक नाटयशास्त्राचा मूळ उगम अनुकरणबुद्धीपासूनच झाला असावा हें उघड आहे. ज्ञानकोशकारांच्या मतें, ' नाटयाचा अगदीं व्यापक अशा जागतिक दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येतें कीं प्राचीन भारतीय नाटय हेंच फार पूर्वी म्हणजे ज्यावेळीं युरोपीय राष्ट्रांतील लोक रानटी स्थितींत नागडे उघडे फिरत होते त्याकाळीं उद्‌भूत झालें. ऋग्वेदांत संवादरूपानें आलेलीं बरीच आख्यानें आहेत. हेच मूलभूत उल्लेख भारतीय नाटयाचें प्राचीनत्व सिद्ध करतात.' प्राचीन पाश्चात्य नाटय प्रथम स्वतंत्रपणें ईजिप्तमध्यें उद्‌भूत होऊन ग्रीक व रोमन सांस्कृतिक वर्चस्वाचे काळीं फारच उदयास आलें.

ग्रीसमध्यें शोकान्तक नाटकांचा इतिहास देतांना क्रूसिअस या ग्रीक ग्रंथकारानें म्हटलें आहे, " शोकान्तक नाटकाचा मूळ उगम, दिवंगत झालेल्या थोर व कर्तृत्ववान् अशा व्यक्तींच्या अंत्यविधीच्या वेळीं त्यांच्या आत्म्यांना पूर्ण शांतता मिळावी व त्यांच्याबद्दल आदर प्रदर्शित केला जावा म्हणून म्हटल्या जाणाऱ्या शोकगीतांतूनच दिसून येतो. "

भारतीय नाटयाचा पौराणिक जन्म भरताचार्यांच्या नाटयशास्त्रांत दिला आहे. भारतीय नाटय हें प्रत्यक्ष ब्रम्हदेवापासून अवतीर्ण झालें आहे असें म्हटलें आहे, 'जो क्रीडानियक होईल, म्हणजे ज्यांत कांहीं तरी श्रवणीय, तसेंच दर्शनीय होईल किंवा जो पांचव्या वेदाप्रमाणें होऊन सर्व वर्णांतील लोकांस सारखाच उपयोगी पडेल, अशा तऱ्हेचा शास्त्रग्रंथ उत्पन्न करण्याविषयीं प्रथम सर्व देवांनीं ब्रह्मदेवाची प्रार्थना केली, तेव्हां ब्रह्मदेवानें ऋग्वेदांतील पाठयभाग, सामवेदांतील गीतभाग, यजुर्वेदांतील अभिनय भाग व अथर्ववेदांतील रसांचा भाग घेऊन एक मानवांच्या करितां नवीन वेद उत्पन्न केला.' या दंतकथेवरून जरी नाटयाची शास्त्रीय उपपत्ति तितकीशी लागत नसली तरी भारतीय नाटयाचें प्राचीनत्व सिद्ध होतें. नाटयाचा उगम ऋग्वेदांत आहे हें निश्चित होतें.

नाटयोत्पत्तीची मानसशास्त्रीय मीमांसा–

एकंदरींत नाटयाची उपपत्ति ऐतिहासिक दृष्टया अशी लागते. नाटयकला उत्क्रान्तीनें प्रगत होत आली. प्रत्यक्ष उगमांत नाटयाचा अवशेष फारच थोडा

सांपडतो. प्रथम गायन, नर्तन व पाठ्य यांसच नाट्य अशी संज्ञा असे. नाट्यांतील प्रमुख भाग ‘ अभिनय ’ मागाहून आला. परंतु ॲरिस्टॉटलच्या मतें असलेलें नाट्य म्हणजे आयुष्याचें प्रदर्शन ही कल्पना मानवास केव्हां सुचली ? ती सुचण्याचें कारण काय ? याला कांहीं मानसशास्त्रीय मीमांसा लावतां येईल काय ?

नाट्याचा उगम म्हणून ज्याला आपण म्हणतों तो केवळ गंगेच्या गंगोत्री-गोमुखी या स्थानांप्रमाणें आहे. गंगेचा उगम त्याहिपलिकडे असून त्याचाहि नक्की पत्ता लागला नाहीं. यमुनेच्या उगमाप्रमाणें ‘हा उगम’ म्हणून एकच बोट दाखवितां येत नाहीं. गंगेचा मूळ नक्की उगम कोणता हेंच ठरविणें दुरापास्त झालें आहे. नाट्य-गंगेचेंहि असेंच आहे. नाट्यगंगेच्या उगमाचा मूळ जलकण कोणता व कोठें होता, केव्हां उगम पावला हें सागतां यावयाचें नाहीं. कारण नाट्यगंगेचे अनंत जलकण पृथ्वीवर इतस्ततः प्रथमच विखुरलेले होते. ते एकत्र केव्हां व कसे आले हें शोधण्याचा भगिरथ प्रयत्न निष्फळ ठरेल. नाट्य म्हणजे प्रतिजीवन. जीवनाचें प्रतिबिंब. जगांत ज्यावेळेस मानवी जीवन प्रथम सुरू झालें त्याच वेळीं या नाट्यसंस्थेचा उगम झाला असावा. विकृत वा कोणत्या तरी स्वरूपांत आपल्या रोजच्या जीवनाचें प्रतिबिंब मनुष्यानें प्रथम स्वप्नांतून पाहिलें. दिवसा जे व्यवहार आपण करतों त्यांतल्या कांहीं गमती, कांहीं कांहीं तर विचित्र स्वरूपांत स्वप्नांत दिसूं लागल्या. दिवसा घडलेल्या प्रसंगाचें पुनर्दर्शन होऊन जणुं कांहीं आपण जागतेपणींच आहोंत अशा समजुतीनें मनुष्य स्वप्नांत रडतो, हंसतो आणि रागाच्या भरांत मनास येईल तें करीत सुटतो. या स्वप्नांतून आपद्ग्रस्त माणसाला सहानुभूति मिळते. आनंदी माणसाचा आनंदोत्सव लोक साजरा करतात. अपूर्ण राहिलेल्या इच्छा पूर्ण होतात. एवढेंच काय, कधीं कधीं काय करावें हें सुचेनासें झालें म्हणजे त्याचें उत्तरहि स्वप्नांतून मिळतें. दाबून टाकलेल्या भावनांना उकळी फुटूं लागते. हें सर्व पाहतां पाहतां माणसाला नाट्याची कल्पना आली असावी. वरील उत्पत्ति जर गृहीत धरली तर पुरातन माणसांना नाट्य म्हणजे काय याची संपूर्ण कल्पना आलेली असावी. पण ती प्रत्यक्षांत कशी उतरवावी हें मात्र कळलेलें नसावें. म्हणून अगदीं पूर्वीचीं नाटकें कलादृष्ट्या किती तरी अपूर्ण व असमाधानकारक होतीं. कालांतरानें अनुभव जसजसे येऊं लागले, मनुष्याच्या राहणीबरोबर मन हें सुधारूं लागलें तेव्हां नाट्यकलेंत आपोआपच आस्ते आस्ते प्रगति होत गेली. ही अंशाअंशानें होत गेलेली प्रगति वरील विधानाला कांहींशी पोषकच ठरेल.

नाट्याचा वास्तवतेकडे कल—

नाट्यांतील इतर कलात्मक सुधारणांबरोबर दिवसेंदिवस नाटक हें वास्तवतेकडे जास्त झुकूं लागलें आहे. पूर्वी काल्पनिक रम्यतेची विशेष आवड होती. नाटकांत जितकी अलौकिकता अधिक तितकें नाटक अधिक सुरस. यामुळें पूर्वी सामाजिक नाटकें फार करून होत नसत. किंबहुना तशीं करूं नयेत असाच जणुं दंडक होता. विषय सामाजिक असला, हेतु सामाजिक, प्रचलित विषयाचा असला तथापि तो देवादिकांच्या द्वारें वा पुराण–इतिहासाच्या एखाद्या गोष्टींचा आधार घेऊन त्यांतून इच्छित विषय ध्वनिरूपानें प्रतिपादन केला जात असे. परंतु कालमानाप्रमाणें या अद्‌भुतरम्य कथानकावरून लोकांचा विश्वास उडूं लागला. बुद्धिवादावर मदार बसूं लागली. पुन्हां, सामाजिक प्रश्नांच्या गंभीर स्वरूपाची जाणीव होऊं लागली त्यामुळें वास्तववादी सामाजिक नाटकांचा उदय होऊं लागला.

नाटककाराचें दुटप्पी धोरण—

वास्तववादानें प्रवेश केल्याबरोबर नाट्यवाङ्मय अनिर्बंध झालें. मनसोक्त मजा मारावयास मोकाट मैदान मिळालें. वास्तववादामुळें आणखी एक प्रश्न उभारला गेला. वास्तववाद म्हणजे काय? असलेली वस्तुस्थिति जशीच्या तशीच मांडणें. पण त्याचा हेतु काय? समाजांतील दोष जनतेपुढें मांडून लोकांना त्याची जाणीव व्हावी आणि ते सुधारावेत म्हणून, कीं केवळ लोकांना करमणूक म्हणून? येनकेनप्रकारेण लोकांची केवळ करमणूक करणें हा उद्देश निदान सांगतांना तरी बोलून दाखवितां येत नाहीं. बहुजनसमाजास दिसत नसलेले दोष दाखवून ते नष्ट व्हावेत हाच उदात्त हेतु केव्हांहि बोलून दाखविणार. कारण तात्त्विक दृष्ट्या तोच पाहिजे असतो. वास्तववादाचें समर्थन करतांना एक उत्तम पळवाट मिळते. नाटकांतून वास्तववाद आणणें म्हणजे वस्तुस्थिति मांडणें याचे दोन अर्थ होतात. समाजांत हे असे दोष आहेत ते नसावेत हा उदात्त विचार त्याठिकाणीं अध्याहृत असतो. येथें याचा उद्देश असा आहे, याचा अर्थ असा घ्यावयाचा हें अध्याहृत असलेलें तत्त्वज्ञान बहुजनसमाजास आकलन करतां येण्यासारखें नसतें. नाटकांत रंगवून दाखविलेले दोष त्याच स्वरूपांत लोक पाहात असतात. ते मात्र बुद्धिसुलभ असून ते दोष जसेच्या तसे प्रेक्षकांच्या

डोक्यांत उतरत असतात आणि याच दोषांचा फैलाव समाजांत होतो. तेंच नाटक लोकप्रिय होतें. या ठिकाणीं नाटककाराचे आंतील व बाहेरील दोनहि उद्देश सफल झाले. नाटक लोकप्रिय करणें हा आंतील उद्देश सफल होऊन वास्तवाचें दर्शन देऊन समाजांतील दोष उघडे करून दाखविले हा बाहेरील उदात्त हेतु सिद्धीस गेला, परंतु असें दुटप्पी धोरण निदान समाजास तरी उपयोगी पडत नाहींत.

## वर्णनापेक्षां त्याची पार्श्वभूमि व त्याचा झोक याला महत्त्व आहे–

वरील उदात्त हेतु साध्य होत नाहीं याचें कारण वास्तवता नव्हे. नाटकांतील केवळ वर्णन प्रेक्षकांच्या मनावर योग्य तो परिणाम करीत नाहीं. त्या वर्णनाचा झोक कोठें आहे, त्याचा हेतु काय आणि त्याची पार्श्वभूमि काय यावरच प्रेक्षकांच्या मनावर होणारा बराबाईट परिणाम अवलंबून असतो. त्या वर्णनाचा झोक ज्या बाजूला कलत असेल त्याप्रमाणें मनुष्याच्या मनावर परिणाम होत असतो. मग तें वर्णन कसलेंहि असो त्याच्या विरुद्ध सुद्धां मनावर परिणाम झाल्याविना राहत नाहीं. केवळ वर्णन हेंच जर परिणामकारी असेल तर आमच्या जुन्या पुराणांतून व इतर धर्मग्रंथांतून उत्तान शृंगाराचींहि वर्णनें आहेत. परंतु तेथें भक्तिरसच निर्माण होतो आणि आधुनिक कादंबऱ्यांचीं वर्णनें वाचून उत्तान शृंगारानें मन भारावून जातें तें कां? पूर्वीचीं धार्मिक पुराणेंच कशाला? आधुनिक वाङ्मयांतूनहि हाच भेद आढळेल. प्रत्येक लेखकाची मनोवृत्ति भिन्न असते. त्याप्रमाणें त्याचें लेखनहि तदनुसार असतें. कथानकाचा कल एका विशिष्ट केंद्राला ओढून धरलेला असतो. त्या केंद्रित वस्तूला सजावट म्हणून इतर वर्णनें रंगविलेलीं असतात. त्या वर्णनांचा हेतु वर्णन खुलविण्याकरितां नसून कथानक रंगविण्याकडे असतो, वाचकांचें लक्ष वर्णनाकडून कथानकाकडे जावें हा असतो.

## नाटककाराचा हेतु स्पष्ट पाहिजे–

वास्तवतेच्या निमिषानें समाजांतील गर्हणीय गोष्टी विशद करून दाखवितात. प्रेक्षकानें त्याचा अर्थ काय घ्यावयाचा हा बोध होत नाहीं. 'नरो वा कुंजरो वा' असें म्हणून कानावर हात ठेवून नाटककार मोकळे होतात. परंतु नाटकांत दाखविलेला प्रसंग अनुकरणीय आहे कीं गर्हणीय आहे हें प्रथमतःच स्पष्ट केलें पाहिजे

आणि त्याच अनुरोधानें सबंध कथावस्तूचें सूत्र हललें पाहिजे. म्हणजे मग त्या नाटकाला विशिष्ट उद्देश येईल, कथानकाची प्रवृत्ति बहुजनसमाजाला स्पष्ट होईल. नाटकांतील अवाच्यासवा केलेल्या वर्णनांचा आणि देखाव्यांचा अर्थ योग्य तऱ्हेनें प्रेक्षकांच्या मनांत उतरेल. काय आहे आणि काय असावें याचा निर्णय होईल. ज्या नाटकांतून प्रेक्षकाला हा निवाडा करतां येत नाहीं त्या नाटकांत लेखकानें 'नरो वा कुंजरो वा' पळवाट काढली आहे हें निश्चित समजावें. समाजांतील रंगविलेले दोष नाटकांत पाहात असतां त्या दोषाविष्कारांत प्रेक्षक रममाण न होतां त्याला दोषांचा तिरस्कार आला पाहिजे. हा तिरस्कार वा ही रमणीयता निर्माण करणें सर्वस्वीं नाटककाराच्या हातांत असतें. प्रेक्षक हा नाटककाराच्या हातांतील केवळ बाहुलें आहे. प्रेक्षक स्वतःची बुद्धिमत्ता तेथें चालवीत नाहीं. तो नाटककाराच्या 'हो' ला 'हो' करीत असतो. नाटककारानें मात्र 'हो' स्पष्ट म्हटलें पाहिजे आणि तसें जर म्हटलें नाहीं तर मग प्रेक्षक स्वतः वाटेल त्याप्रमाणें त्यांतून अर्थ काढीत असतो.

### प्रेक्षकांवर नायकाचा परिणाम विशेष होतो—

प्रत्येक कथानकामध्यें नायक वा नायिका असते. त्या नायकाकरितां लेखक कथानक लिहीत असतो. त्या नायकाबद्दल लेखकाला कांहीं तरी सांगावयाचें असतें. हा नायक अशी एक व्यक्ति असते कीं जिची बाजू लेखक प्रेक्षकांपुढें मांडीत असतो. त्या व्यक्तीबद्दल लेखकाला एक प्रकारचा आपलेपणा, सहानुभूति वाटत असून तिचें समर्थन तो करीत असतो. किंवा कौतुक सांगत असतो. त्या व्यक्तीमुळेंच नाटकाला एक विशिष्ट उद्दिष्ट आहे असें वाटत असतें, तिच्यामुळेंच नाटक एका चाकोरींतून जात असतें, आणि तिच्याचकरितां प्रेक्षक उत्सुकतेनें एकाग्रपूर्ण रममाण होत असतात. या नायकाची जी मनोवृत्ति दाखविली असेल, त्याच्या ज्या आवडीनिवडी असतील, त्याची जीं मतें असतील त्या सर्वांचा परिणाम प्रेक्षकांच्या मनावर होत असतो. त्या नायकाच्या मनोभूमिकेवर प्रेक्षकांची मनोभूमिका अवलंबून असते. इतर पात्रांना स्वतंत्र महत्त्व नसतें. त्यांच्या आचारविचारांकडे प्रेक्षक लक्ष देत नाहींत.

क्वचित प्रसंगीं नायकाव्यतिरिक्त दुसरीहि एक व्यक्ति असूं शकते. ती नायकाची

कैवारी असून प्रत्येक ठिकाणीं नायकाकरितां खटपट करून किंवा त्याची प्रतिस्पर्धी असून कथानकांत प्रगति करीत असते. असें पात्र—' उपनायक ' म्हणून आपण त्याला संबोधूं—प्रेक्षकांच्या मनाचें आकर्षकण घेत असतें.

वास्तववाद आणि ध्येयवाद यांचें चित्रीकरण–

नाटक जर उदात्त हेतूनें लिहिलेलें असेल तर समाजांतील वास्तवता म्हणजे वस्तुस्थितींत ' काय आहे ' हें इतर पात्रांकडून सांगितलें जाईल. वास्तविक ' काय असावें ' किंवा आहे तें योग्य वा अयोग्य हें नायकाकडून वा उपनायका-कडून दाखविलें जाईल. अशी कथावस्तूची योजना केल्यास समाजाचें यथार्थ-दर्शन होऊन नायकाद्वारें त्याची योग्यायोग्यता दर्शविली जाईल. तें केवळ तत्त्व-ज्ञान होणार नाहीं कीं कल्पनेची भरारी वाटणार नाहीं. कांहीं तरी लोकविलक्षण, अपार्थिव, मानवाच्या शक्तीच्या बाहेर असें कांहीं अद्‌भुत वाटणार नाहीं. समाजास ज्याची आवश्यकता आहे आणि जें व्हावयास पाहिजे आहे तें अगदीं साधें, थोडयाशा प्रयत्नांनीं सहजसुलभ मानवी कार्यशक्तीच्या क्षेत्रांतच पडणारें आहे त्याची जाणीव जनतेस येईल. वरील योजनेनें नायकेतर पात्रांचीं रसभरित केलेलीं वर्णनें प्रेक्षकांच्या मनावर वर्णनानुसारी परिणाम घडवूं शकणार नाहींत. नायकाची भूमिका मनांत बिंबून इतर पात्रांच्या विरोधाभासानें नायकाच्या भूमिकेची पार्श्वभूमि उठावदार व चटकदार होईल. वास्तववादी म्हणविणाऱ्या नाटककारांच्या लेखनांत बरेंच वेळां नेमकें याच्या उलट होतें. समाजांतील दोषांचा पुतळा हा त्यांचा नायक असतो. ' काय असावें ' हें कमी प्रतीच्या पात्रांकडून दर्शविलें जातें. आणि विनोद म्हणून उच्च तत्त्वांची त्यांकडून टिंगल केली जाते. अशा प्रकारच्या नाटकांतून काय घ्यावयाचें तें प्रेक्षक बरोबर जाणीत असतात ! असें केल्यानें नाटकांत वास्तववाद पाहिजे असतो तो येतो; शिवाय आतांच सांगितल्या-प्रमाणें उच्च तत्त्वांचें प्रदर्शन केल्यामुळें वरकरणी असणारा उदात्त हेतु सिद्धीस जाऊन नाटक लोकप्रिय होतें.

नाटककार समाजाचा द्रष्टा पाहिजे–

पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें नाटक हें एक मनोरंजनाचें साधन असून मनाचें रंजन

करीत असतां त्यांतून जीवनाला धडा मिळेल या दृष्टीनें काहीं नवीन गोष्टी शिकण्यास मिळाल्या तर त्यांचा उपयोग केव्हांहि जास्त होतो. नाटक लिहितांना ही गोष्ट ध्यानांत पाहिजे. नाटक लिहिते वेळीं नाटककाराची भूमिका श्रेष्ठ पाहिजे. सामान्य लोकांपेक्षां स्वतःस कांहीं जास्त कळतें, दृष्टि सर्वभेदक आहे, द्रष्टा आहे अशी स्वतःची व्यक्तिमत्ता पाहिजे. समाजांत वस्तुस्थिति काय आहे, दोषवारणार्थ उपाय काय योजावेत याचें सम्यकज्ञान होऊन पुन्हां तें जनतेच्या अभिरुचीस पटून आपलें उद्दिष्ट साध्य व्हावें ही कला अवगत असणें अवश्य आहे. नुसत्या समाजशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग नाहीं. त्यास दोहोंची आवश्यकता आहे. सध्यां समाजशास्त्र्यांस नाटककलेंत अंग नाहीं आणि लेखनाची कला असणारे समाजशास्त्रज्ञ असतातच असें नाहीं. समाजाचा अभ्यास करून आपल्या समाजांतील गुंतागुंतीचे सामाजिक प्रश्न जनतेपुढे सोडविण्यास उभे करून त्यांत आपलेंहि मतप्रतिपादन असावें हें थोर नाटककाराचें कर्तव्य आहे.

रुचिहीन बहुजनसमाज—

सामान्य जनतेला स्वतंत्र अभिरुचि नसते असें म्हणावें लागतें. उच्च प्रतीच्या अभिरुचीच्या मागें मनोविकासाची कल्पना आहे. हीन मनोवृत्ति दर्शविणाऱ्या उच्छृंखलपणाला तेथें थारा नाहीं. बहुजनसमाज उच्च अभिरुचीला पारखा आहे. लोकांच्या आवडीनिवडी निर्माण होतात त्या वर सांगितल्याप्रमाणें मनोबलावर होत नाहींत. समाजांत जे नवीन प्रवाह सुरू असतात त्यांवरच बहुधा सामान्य लोकांची आवडनिवड तयार होत असते. प्रचलित प्रवाहांना आगापिच्छा कांहीं नसतो. ते कोठेंहि आणि कसेहि उगम पावतात. आणि नवीन उगम पावले म्हणजे जुने कालाच्या कपाटांत विरून जातात. त्या प्रवाहांना उद्देश नसतो, ध्येयहि नसतें, तशीच वैचारिक भूमिका नसते. कुठले तरी अलबतेगलबते लोक, विवेकहीन, केवळ कीर्तिलोलुप व नादान असूनहि केवळ थोडयाशा कलेच्या आणि जाहिरातबाजीच्या जोरावरच नवीनच टूम काढीत असतात. जनतेला योग्यायोग्यतेचा विचार नसतो. जें जाहिरातींत भडक रंगविलेलें आहे, लोकांच्या दाढीला हात लावून प्रसिद्धि आणि अनुकूल अभिप्राय मिळविलेलें आहे आणि यामुळें ज्याचा समाजांत एक नवीन प्रवाह सुरू झाला आहे, अशावर

लोक भाळतात. तो प्रवाह समाजाचा तात्कालिक नायक ठरतो आणि त्या प्रवाहाचें अनुकरण करण्यांत समाज आपणास धन्य मानून घेत असतो. लोकांच्या आवडीनिवडीचा एक उगम या प्रवाहांतून आहे.

लोकप्रियतेच्या मागें लागलेले लेखक वरील प्रकारच्या प्रवाहांच्या आधारें, लोकांची रुचि ओळखून नवीन उपप्रवाह सुरू करून स्वतःचें लेखन लोकप्रिय करीत असतात. यांतूनहि लोकांची आवड निर्माण होत असते.

मनोरंजनांतून जीवनाला दिशा--

खरें शिक्षण मनोरंजनांतूनच द्यावयाचें असतें. म्हणजे मनोरंजन हें शिक्षणच व्हावयास पाहिजे. अर्थात मनोरंजनाच्या साधनांना समाजांत फार मानाचें व महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें पाहिजे. कारण मनोरंजनांतून कांहीं तरी चांगलें वाईट तत्त्व निर्माण होत असतें. ह्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें, कळत वा नकळत परंतु निश्चयानें मनावर कांहीं तरी परिणाम घडत असतो. मनोरंजनाच्या साधनप्रवृत्तीनुसार रंजनानंतर मनुष्याच्या मनाची विशिष्ट ठेवण घडत जाते. साधनप्रवृत्तिप्रमाणें मनाची प्रवृत्ति तयार होत जाते आणि तेच संस्कार पुन्हां पुन्हां घडत गेले म्हणजे पर्यायानें माणसाचा आचार त्या प्रमाणांत सुरू होतो. मनोरंजनांत शिक्षणाचा हेतु असो वा नसो त्यांतून वरीलप्रमाणें व्यक्तिमत्त्व निर्माण होतेंच होतें. प्रत्यक्ष तात्त्विक शिक्षणापेक्षां मनोरंजनांतील तत्त्वें चटकन् अंगवळणी पडतात. नाटक हें एक मनोरंजनाचें प्रमुख साधन या दृष्टीनें नाटकांकडे विशेषानें लक्ष देणें आवश्यक आहे.

नाटककाराची अभिरुचि प्रेक्षकावलंबी नको--

नाट्यलेखक, नट आणि प्रेक्षक या तिघांवर नाट्यसंस्थेचा उत्कर्षापकर्ष अवलंबून आहे. या तिघांची आपसांत सहसा कधीं फारकत होत नाहीं. यांतील भोग्या प्रेक्षक आहे. प्रेक्षकांना खुलविण्याकरितां नाट्यलेखक तत्पर असतोच. लेखकाच्या आणि प्रेक्षकाच्या मनाचा कल लक्षांत घेऊन नट आपली कामगिरी बजावीत असतो. असे हे प्रेक्षकांना बांधले राहिले आहेत. कारण लेखकांचें आणि नटांचें जीवन प्रेक्षकांवर आधारलेलें आहे, त्यांना डावलून चालावयाचें नाहीं.

अशा तऱ्हेनें नाट्यसंस्थेचें जीवन बहुजनसमाजाच्या हातीं गेलें म्हणजे नाटकांत कांहीं काळ तेजी आल्यासारखी वाटेल पण ती आळवावरील पाण्याप्रमाणें आहे. बहुजनसमाजाच्या आवडीप्रमाणें नाटक असतें म्हणून त्या नाटकास कांहीं पैसा मिळेल हें खरें आहे; परंतु त्या नाटकांची विदग्धता नष्ट होईल. त्यांना तात्कालिक स्वरूप येईल. आणि त्यांची प्रत उच्च ठरणार नाहीं. कांहीं विशिष्ट काळानंतर तीं नाटकें कवडी किंमतीचीं ठरतील. कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें लोकांची आवडनिवड हें मनोविकासाचें फळ नाहीं. त्यांच्या आवडीला वैचारिक उच्च भूमिका नाहीं. अभ्यासाचें पाठबळहि नाहीं. जन्मतःच उच्च प्रतीची अभिरुचि असते म्हणावें तर तेंहि धाडस करतां येत नाहीं. अपवाद म्हणून समाजांत जर कांहीं थोर व्यक्ती निघाल्या तर त्यांच्या अभिरुचीस ह्या बाजारांत काडीचीहि किंमत मिळत नाहीं. म्हणून प्रेक्षकांना म्हणजे बहुजनसमाजास भोंग्या करून त्याभोंवतीं नाटककारानें नाचावें हें नाट्यसंस्थेच्या आणि समाजाच्या दृष्टीनें हितावह नाहीं.

समाजाचा धूर्त धनुर्धारी–

समाजाच्या धनुर्धाऱ्यानें नाटकांचे बाण हातांत घेऊन नटांना सारथी करून समाजाच्या रणांगणावर आपला नाट्यरथ भरधांव सोडला पाहिजे. नटसारथी धनुर्धारी आणि समाज यांना समोरासमोर नेऊन पोंचवील. यांचीं दृष्टादृष्ट घालून देईल. धनुर्धाऱ्यानें मात्र आपलें लेखनशर जनतेच्या नेमकें हृदयांत मारलें पाहिजे. शत्रू कोठें आहे व त्याला कोणतें अस्त्र उपयोगी पडेल हें रणांगणाचा अभ्यास करून धनुर्धाऱ्यानें ठरविलें पाहिजे. आणि नंतर तें अस्त्र सारथ्याच्या मदतीनें शत्रूवर नेम धरून सोडावयास हवें. शत्रूच्या भुलकावणीस धूर्त धनुर्धाऱ्यानें भीक घालतां कामा नये.

नाटककाराचे गुण–

नाटककार केवळ लेखनकुशल असून उपयोगी नाहीं. एखादा सैनिक कितीहि युद्धकुशल असला तरी तो सेनापति होऊं शकणार नाहीं. सेनापतीस वैयक्तिक शौर्याव्यतिरिक्त दुसरेहि अनेक गुण असावे लागतात. नाटककाराची भूमिका

कुशल सेनापतीप्रमाणें आहे. त्याच्या अंगीं वैयक्तिक कौशल्य तर हवेंच. पुन्हां, अभ्यास, धोरण आणि समाजाची जबाबदारी इतक्या गोष्टी नाटककाराच्या अंगीं असाव्या लागतात. नाटककारामध्यें अभ्यास दिसून येतो, पण तो समाजांत 'काय आहे' याचा असतो. 'काय असावें' आणि तें 'कसें आणावें' याचा अभ्यास दिसून येत नाहीं. त्यास धोरण असतें. परंतु आपलें नाटक लोकप्रिय करण्यापुरतेंच तें असतें. समाजास गोड गोड बोलून, न दुखवितां कसें वळणावर आणावें हें नसतें. समाजाची जबाबदारी हा अत्यावश्यक गुण तर बहुधा आतां समूळ नष्ट होत चालला असें वाटतें. नाटककार भाषाशैलीचा अभ्यास करतो, नाट्य-तंत्राचा करतो पण समाजांतील दोषनिवारणाचा अभ्यास करण्याची त्याला तित-कीशी आवश्यकता भासत नाहीं. नाटककार समाजशास्त्रज्ञ असावा, मानसशास्त्रज्ञ असावा, लेखनकुशल असावा, पण त्यापूर्वी तो जर ध्येयवादी असेल तर वरील सर्व गुण दुधांत साखर पडल्याप्रमाणें गोड वाटतील.

### गंगाजल पोंचविणारा समाजाचा पंड्या–

नाटककारानंतर नाट्यसंस्थेंतील महत्त्वाचा घटक म्हणजे नट. नाटककाराच्या कल्पनांना मूर्तस्वरूप देणारा, त्याच्या कल्पना सत्यसृष्टींत शक्य आहेत हें सिद्ध करून देणारा मध्यस्थी म्हणजे हा नट आहे. नाटककार आणि समाज यांना सांधणारा हा दुवा आहे. नट म्हणजे साक्षात् समाजाचें प्रतिबिंब. तो नाट्यकाराचे गंगाजळ प्रेक्षकांच्या हृदयाहृदयांत नेऊन सोडणारा आणि त्यांना पावित्र्य आणून देणारा पंड्या आहे. लोकांचीं हृदयें शुद्ध करणारा हा पंड्याहि त्याच योग्यतेचा पाहिजे. समाजांत नाटककारास जो मान; त्याच्या अगदीं खालोखाल नटाला मान मिळाला पाहिजे.

### नटांचें समाजांत स्थान–

ज्यांच्या कलेमुळें आपण मोठ्या हौसेनें नाटक पहात असतों, श्रमलेल्या जीवास घटकाभर विसांवा देऊन त्याची करमणूक करतों, आणि या करमणुकींतूनहि जे आपणांस आपल्या जीवनाचें साकल्यानें दर्शन देऊन प्रसंगीं नवी दृष्टीहि देऊं शक-तात, ज्यांच्यामुळें आपणांस हें सर्व लाभूं शकतें त्या नटांना समाजानें तुच्छ लेखणें म्हणजे त्यानें आपल्या हीन, कृतघ्न मनोवृत्तीचें प्रदर्शन करण्यासारखें आहे. नटांनीहि

आपण समाजाकरितां एवढें कार्य करीत आहांत आणि त्याबद्दल समाजानें आपला योग्य तो मान ठेवून मोबदला द्यावा अशी वस्तुस्थिति असतांना आपला मान थोर व्यक्तिमत्वानें आपणच राखावा हें योग्य नाहीं काय? नाटकांत काम करणें ही कल्पना मुळांतच हीन प्रतीची समजली जात असे. त्यामुळें कुलीन लोक नाटकांत काम करण्यास धजेनात. अर्थातच हलक्या जातीच्या लोकांचा भरणा अधिक होऊं लागला. कालांतरानें लोक सुधारले तेव्हां कुलीन नट पुढें सरसावूं लागले. मुळांत सर्व भरणा हलक्या कुळांतील लोकांचा. त्यामुळें एकटाच नवीन आलेला कुलीन त्या लोकांत समरस होऊन जाणें अपरिहार्य झालें. होतां होतां हलक्या कुळांतील लोक कमी कमी होऊन कुलीन व पुढें सुशिक्षित लोकहि नाटकमंडळांतून अधिक प्रमाणांत शिरूं लागले. परंतु ते एकेक आल्यामुळें पूर्वीच्या लोकांच्या संसर्गानें तत्सम होण्यास त्यांना वेळ लागला नाहीं. आतां तर अशी स्थिति झाली आहे कीं, प्रथम सालस असलेला मनुष्य नाटकचित्रपटांतून गेल्यावर त्याचा पहिला सालसपणा पार नष्ट होऊन जातो! नाटकचित्रपटांतून आतां एखादाच सालस मनुष्य जेमतेम औषधाला मिळूं शकेल.

अभिनयासाठीं अभ्यासाची आवश्यकता–

अभिनयास अभ्यास आवश्यक आहे हें कोणी सहसा लक्षांतच घेत नाहीं. नाटक करतेवेळीं हावभाव करून जें मारून नेतां येईल तें खरें. या ठिकाणीं अभ्यास याचा अर्थ खोल घेतला पाहिजे. एखाद्या पात्राचे अंगविक्षेप व शैली घटविणें म्हणजे खरा अभ्यास होत नाहीं. तें पात्र चौबाजूंनीं निरखून पाहून त्याच्या स्वभावविशेषांशीं, मनोवृत्तीशीं समरस झालें पाहिजे. त्या पात्राचें जें व्यक्तिमत्व तें आत्मसात् करावयास हवें. त्याकरितां त्याची राहणी, बोलणी हीं साधावयास हवीं. हें साध्य होईपर्यंत तेवढा काळ आपण स्वतःस विसरून जाणें अत्यावश्यक आहे. शोकप्रसंगाला डोळ्यांतून अश्रू गळणें, आनंदाचे वेळीं चेहऱ्यावर तो खुलून दिसणें आणि संतापानें लाल होणें या सर्व गोष्टींना मनावर ताबा पाहिजे. मनःशक्तीवर त्या गोष्टींची साधना अवलंबून आहे. ही मनःशक्ति साध्य होण्याकरितां आत्मबल वाढविलें पाहिजे. आत्मबल उदात्त चारित्र्यानेंच शक्य आहे. उच्च अभिनय चेहऱ्यावर त्या भावनेची छटा आणून केवळ तेवढ्यानेंच प्रेक्षकांच्या हृदयांत कालवाकालव करणें यांत आहे.

केवळ जोराजोरानें ओरडून व हातवारे करून वेळ मारून नेणें याला खरा रसिक मान देणार नाहीं. अशा प्रकारचा अभिनय खालच्या वर्गांतील लोकांना प्रिय असतो.

अभिनयाचीं अंगें–

अभिनयामध्यें मुख्य दोन गोष्टी : एक भावनाविष्कार आणि दुसरी अंगविक्षेप. अभिनयाचा आत्मा भावनाविष्कार आणि त्याचें प्रावरण अंगविक्षेप. किंबहुना अंगविक्षेप ही भावनाविष्काराची सांवली आहे. भावनाविष्कार मुखावर दिसूं लागला म्हणजेच अंतःकरणांत ती भावना उत्पन्न झाली म्हणजे अंगविक्षेप त्या भावने-मागोमाग आपोआप चालत येतात. तें मुद्दाम आणावे लागत नाहींत. ज्या ठिकाणीं अंतःकरणांत भावनाच नाहीं, त्या ठिकाणीं अंगविक्षेप सहजासहजीं तदनुसार होत नाहींत; म्हणून ठराविक भावनांच्या ठराविक अंगविक्षेपांचा अभ्यास म्हणजे घटविणें करावें लागतें. आणि मग साहजिकपणेंच तें कृत्रिम होतें. हाच कृत्रिम अभिनय आज बहुतेक सर्वत्र प्रचारांत आहे.

पौराणिक नाटकांत भावनोत्कटता हवी–

पौराणिक नाटकें करणें वा चित्रपट करणें नटांना कठीण जातें याचें कारण हेंच. पौराणिक कथानकांतून भावनेची उत्कटता फार उच्च प्रतीची आहे. त्यांतील स्वभाव-रेखाटन गुणांच्या कळसास पोंचलेलें आहे; त्यांच्या भूमिका करण्यास कृत्रिम पद्धतीचा अभिनय निकामी ठरतो. पण भावनाविष्कारानें अभिनय सहसा कोणास करतांच येत नाहीं. कारण त्या प्रकारचें व्यक्तिमत्व नटांतून नष्टप्राय होत चाललें असल्यामुळें त्या कथानकांत वर्णन केलेल्या पात्रांशीं भावनेनें समरस होतां येत नाहीं. मग केवळ हातवारे करूनच वेळ मारून न्यावी लागते. कथानकांतील पात्रांच्या तोंडीं घातलेलीं वाक्यें हीं भावनोत्कटतेंतून बाहेर पडलेलीं असतात. परंतु ती भावनोत्कटता ह्या नटांच्या अंगीं नसल्यामुळें केवळ तीं वाक्येंच तो म्हणून टाकतो. त्यामुळें तर तो अभिनय अधिकच कृत्रिम होतो. आणि हृदयांत बिंबण्याऐवजीं हास्यास्पद होऊं शकतो. सीतेची भूमिका करण्यास तसें पातिव्रत्य आणि पावित्र्य नटीच्या अंगीं असलें पाहिजे. म्हणजे अशा स्त्रीला पतिवियोगाचें दुःख काय होतें याची बरोबर कल्पना येईल. एकनिष्ठ पतिव्रतेला हें केवळ वर्णन वाचतांनाच हळहळ

लागेल. या वियोगाची कल्पना येऊनच ती बेचैन झाल्यावांचून राहणार नाहीं. मग प्रत्यक्ष स्वतः सीता समजून तिचा अभिनय करतांना तर ती आकांत मांडील यांत नवल काय? अशा वेळीं कृत्रिम अभिनयाची आवश्यकताच नाहीं. अंगविक्षेप आपोआप निसर्गनियमानें होत असतात. परंतु हें झालें पतिव्रतेचें. जिला पति म्हणजे काय आणि त्याचें व्रत म्हणजे काय ह्याचा पत्ता नाहीं ती अशा अभिनयानें प्रेक्षकांचीं हृदयें हलवून काय सोडणार? तिला पतिवियोगाची कल्पनाच कशी येणार?

भूमिकेशीं समरसता–

उदात्त पात्राची भूमिका करण्यास उदात्त चारित्र्याचा नट पाहिजे. तरच ती भूमिका सर्वोत्कृष्ट साधेल, व त्या नटाला त्या पात्राशीं समरस होतां येईल. हें काम वाटेल त्यास साधावयाचें नाहीं. म्हणजे दुष्टाची भूमिका करण्यासाठीं नटहि तसाच पाहिजे असा याचा अर्थ होतो. मीं लहानपणीं पाहिलेल्या राम-लीलेंतील एक आठवण होते. ती नटांना बोधप्रद होईल असें खात्रीनें वाटतें. ती रामलीला–मंडळी रामायण करून दाखवीत असे. तिचा मालक हा रामाचा निःसीम भक्त होता. खेळ करतांना स्वतः आपण रामाची भूमिका न करतां ती आपल्या धाकट्या भावास करण्यास देई. आणि स्वतःस रामाच्या हातून मरण यावें ही त्या भक्ताची भाविक इच्छा. एवढ्याकरितां तो स्वतः रावणाची भूमिका करीत असे. आणि ती भूमिका उत्तम प्रकारें वठत असे. यांतून नटांनीं काय घ्यावयाचें तें निराळें सांगावयास हवें असें नाहीं.

नटाचें चारित्र्य–

नटांची नट म्हणून मानलीं जाणारी श्रेष्ठता त्यांच्या मनोबलावर म्हणजे पर्यायानें त्यांच्या चारित्र्यावर अवलंबून आहे. नटांचें नांव काढतांच मनांत आदरभाव उत्पन्न व्हावा अशी त्याची वास्तविक योग्यता आहे. कारण त्याचें कार्यहि तितकेंच महत्त्वाचें आहे. परंतु असें होत नाहीं. याचें कारण आपल्या महत्त्वपूर्ण कार्याची स्वतः नटाला जाणीव नसते. आणि जनतेला तर नसतेच नसते. उलटपक्षीं नटाचा धंदा म्हणजे खुष्मस्कऱ्याचा धंदा. हा धंदाच हीन

अशी समजूत आहे. आणि कांहीं वेळां तर नटांचें नांव काढतांच सर्व व्यसनें मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभीं राहतात.

नाट्यसंस्थेंतील दुराचार—

नाटयसंस्थेचा उत्कर्ष व्हावयाचा असेल आणि ती चिरंतन टिकावयाची असेल तर वरील आक्षेप दूर करणें अवश्य आहे. नाटकमंडळींतील विशिष्ट वातावरण वरील दोषांस जबाबदार आहे. माणसें एकत्र जमलीं आणि त्यांच्यावर कोणी अधिकारी पुरुष नसला किंवा स्वतः भाविक उच्च विचार प्रेरणेनें भारलेले नसले तर नैसर्गिकपणेंच मनुष्याच्या आंतील मनाला मोकळेपणा मिळून तें थोडें स्वैर होतें. ह्याला आळा घालण्यास कोणतेंहि साधन नसल्यास हा स्वैरपणा बळावत जाऊन अखेर त्याचें स्वैराचारांतहि रूपांतर होतें. या मनुष्यस्वभावाला जोड म्हणून पडद्यामागील वातावरण एका पायावर तयार असतेंच. मुळांत मंडळीचा नायकच सदाचाराची दिक्कत बाळगणारा नसला म्हणजे इतरांस अनुकूल परिस्थिति आपोआपच मिळते.

स्त्रिया आणि कला—

नाट्यमंडळांत स्त्रियाहि नटी असल्या आणि वरीलप्रमाणें पुरुष नट असले म्हणजे नाट्यसंस्था ही दुराचाराचें माहेरघर बनेल यांत आश्चर्य नाहीं. कलेच्या दृष्टीनें स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच करणें योग्य होईल. परंतु स्त्रियांमुळें कलेचें कलेवर होतें याला काय करणार? स्त्रियांमुळें नाट्यांत कलात्मकता वाढेल पण विशिष्ट परिस्थितींतच. हा नियम सर्वत्र लागूं नाहीं. मागें ज्याप्रकारचे नट हवेत म्हणून सांगितलें ते नट असतील तरच खरी कला वाढेल; नाहीं तर तें फार धोक्याचें आहे. एकंदरींत कलेला ' स्त्रीची सवत साहत नाहीं,' असें दिसतें. परंतु नटपतीनें जर तोल सांभाळून भलेपणा दाखविला आणि पक्षपात केला नाहीं तर ह्या दोनहि सवती एकत्र नांदावयास काय हरकत आहे ? उलटपक्षीं तो गंगायमुनांचा सुरेख संगम होईल.

निसर्गतःच पुरुषास स्त्रीकडे व स्त्रीला पुरुषाकडे आकर्षण असतें. परंतु उच्च संस्कारांनीं, अधिकाऱ्याच्या नजरेखालीं वा स्वतःच्या मनोबलानें त्या आकर्षणाचा जोर केव्हांहि कमी करतां येतो. जेथें कसलेंच बंधन नाहीं, उलट अनुकूल

परिस्थिति आहे अशा ठिकाणीं मनुष्याचें नैसर्गिक मन मोकाट सुटणें साहजिक आहे. मनाला एकच ओढ लागली म्हणजे सारासार तोल राहत नसतो. असा तोल सुटला म्हणजे प्रिय वस्तूचें प्रिय साधण्यांत मनुष्य आपलें सर्वस्व खर्च करतो. मग त्यामुळें इतर गोष्टींवर कांहीं का परिणाम होवो त्याच्याकडे त्याचें लक्ष जात नाहीं. नाटकांतून स्त्रियांमुळें कला बिघडूं शकते ती अशी. आणि हा रोग सर्वत्र हमखास जडतो. सुधारणेचा पोकळ डोलारा उभारून त्याच्या छायेखालीं कृष्णकृत्यें घडून येणें हा जणूं नियमच होऊन बसला आहे. सुधारणेची शीतल छाया उष्ण प्रकृतीच्या कृष्णकृत्यांना मानवते असें दिसतें.

स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीं करणें–

तात्त्विक दृष्टया नटींमुळें नाटयकला पूर्ण होईल. नाटकांतील वर्णन हृदयंगामी करावयाचें असल्यास स्त्रियांची भूमिका स्त्रियांना जितकी समरस होऊन भावपूर्ण करतां येईल तितकी पुरुषांना करतां यावयाची नाहीं. ज्या व्यक्तीची भूमिका करावयाची त्या व्यक्तीचीं सुखदुःखें अंतःकरणानें जाणतां आलीं पाहिजेत. त्या व्यक्तीच्या भावना हृदयानें जाणतां आल्या पाहिजेत. तरच त्याच्याशीं समरस होतां येईल, आणि भूमिका हुबेहूब साधेल. तज्जातीय स्त्रियांनाच त्या जाणून घेणें शक्य आहे. परंतु हें झालें नाटक प्रेक्षकांच्या हृदयांत उतरवावें कसें याकरितां. नटाचें कौशल्यच पहावयाचें असेल, त्यालाच अधिक महत्त्व द्यावयाचें असेल तर स्त्री-पुरुषांनीं एकमेकांच्या भूमिका करणें हें केव्हांहि कौतुकास्पद ठरेल. स्त्रियांनीं स्त्रीभूमिका करण्यांत कांहीं नवल नाहीं आणि तितकें कौतुकहि करण्यासारखें त्यांत नाहीं. मग तो अभिनय कितीही हृद्य झाला तरी तेंच.

तत्त्व आणि व्यवहार–

तात्त्विक दृष्टया कांहींहि असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत तें कोणत्या स्वरूपांत आणि कोणत्या प्रमाणांत उतरेल हें पाहिलेंच पाहिजे. जेव्हां केवळ तात्त्विक भूमिकेवरून तत्त्वाचाच पुरस्कार केला जातो तेव्हां त्या पुरस्काराच्या मागें तें तत्त्व जसेंच्यातसें प्रत्यक्ष व्यवहारांत उतरलें आहे, आणि त्याचे योग्य परिणाम घडत आहेत, ही मनोभूमिका असते. या गृहित पण अव्याहृत भूमिकेवरूनच मनुष्य

एखाद्या तत्त्वाचें मंडन करीत असतो. परंतु एखाद्या सामाजिक तत्त्वाचें प्रत्यक्षांत उतरविण्याच्या हेतूनें प्रतिपादन करीत असतां तें तत्त्व ज्या लोकांच्यामुळें सत्य-सृष्टींत अवतरणार त्या लोकांचें निरीक्षण करून, अभ्यास करून तें तत्त्व अंमलांत आणण्याची त्यांची कितपत कुवत आहे तें पाहणें श्रेयस्कर ठरेल.

तत्त्व व्यवहारांत आचरू पाहणाऱ्या लोकांच्या व्यक्तिमत्तेवर त्या तत्त्वाचें स्वरूप व परिणाम अवलंबून आहेत. स्त्रियांनीं स्त्रियांच्या भूमिका कराव्यात हें तत्त्व व्यवहारांत उतरवितांना त्याचें पूर्णपणें विडंबन झाल्यावांचून राहिलें नाहीं. हें तत्त्व म्हणून चांगलें परंतु तें आचरणांत आणावयाचें झाल्यास नटांमध्यें आमूलाग्र फरक होणें अवश्य आहे.

नाट्यकलेचा अध:पात कां होतो—

नाटककार आणि नट यांच्या कर्तृत्वाचें स्थान म्हणजे नाट्यमंदिर. नाट्य-मंदिराच्या अभावीं नाटकांचीं कुचंबणा होईल. नाट्याच्या उत्कर्षासाठीं वर ज्या आव-श्यक गोष्टी सांगितल्या त्यामध्यें नाट्यमंदिर ही एक महत्त्वाची बाब आहे. सध्यां नाटकें मागें पडावयास हीच मोठी अडचण आहे. आर्थिकदृष्ट्या कुचंबणा होते. पगार—भाडें खर्च जाऊन हातांत उत्पन्न येत नाहीं. आणि नटांचा व त्यांच्या घरच्यांचा निर्वाह त्यावरच असल्यानें धंदा म्हणून नाटकें पुढें चालविणें कठीण जातें. त्यामुळें असलेल्या मंडळ्यांना जोम येत नाहीं. आणि नवीन उत्पन्न होणाऱ्यांना उत्तेजन मिळत नाहीं. ज्यांच्या हातांत पैसा आहे त्या बहुतेकांना नाट्याभिरुचि बेताचीच असते. त्यांतून ज्या थोड्यांना असते ते व्यापारांत घातलेल्या भांडव-लाप्रमाणेंच नाटकमंडळीस आश्रय म्हणून दिलेल्या पैशाकडे पाहात असतात. केवळ कलाप्रियता आणि त्याकरितां लागणारा त्याग आणि उदात्त हेतु यांनीं प्रेरित झालेला बहुतेक कोणी नसतोच; एखादा हरीचा लाल निघालाच तर त्याला बाकीच्या समाजाकडून मागें खेंचलें जातें. नाट्यकलेच्या अध:पातास व्यावहारिक कारण सांगावयाचें झाल्यास नाटक हा केवळ पोटभरू धंदा होऊन बसला.

पण नुसते असे शेरे मारून चालणार नाहीं. वर सांगितलेली स्थिति कितीहि हीन असली तरी तो दोष परिस्थितिचा आहे. परिस्थित्यनुसार माणसास वागणें क्रमप्राप्त आहे. नाटकवाले कितीहि अक्षम्य अपराधांचे धनी असले तरी

त्याचा दोष त्या लोकांना मुळींच नाहीं. सर्व समाजच दुष्प्रवृत्तींचा झाल्यावर त्या समाजांत जीवन जगवावयाचें असल्यास दुष्प्रवृत्तीचाच अवलंब करणें हा सर्वसामान्य जनतेस एकमेव उपाय आहे. नाहीं तर त्यांना उपाशी मरावें लागेल. याकरितां त्या लोकांवर ताशेरे न झोडतां आलेल्या परिस्थितींतून मार्ग कसा काढावा याचें काम विचारवंत समाजनेत्यांकडे आहे. आणि ते जर जनतेच्या प्रवाहाबरोबर आपणहि वाहात गेले तर स्वतः पाप केल्याचा दोष आणि समाजास तसें करावयास लावल्याचा दोष असे दोन्ही दोष त्याच्या पदरांत पडतील. कांहीहि असो; नाटकांना सद्यःस्थितींतून वर काढण्याकरितां एक तडजोड काढणें आवश्यक आहे.

यावर उपाय–

नाटक मंडळी कोणाच्या मालकीची असूं नये. मालक आला कीं, त्याबरोबरच नफा-तोटा आला. नाटक हें एक सार्वजनिक कार्य आहे असें समजून ती संस्था निघाली पाहिजे. सर्व नागरिकांची वर्गणी त्यांत सामील व्हावयास पाहिजे. चार प्रतिष्ठित नागरिकांची कार्यकारिणी समिति नेमावी. त्यांची निवडणूक व ती सुद्धां मुदतीची असावी. म्हणजे अधिकारांचा आणि नफेबाजीचा बागुलबोवा नको. सर्व नागरिकांची वर्गणी घेतल्यामुळें सर्वांचे हितसंबंध मंडळीशीं जोडले गेले. नाटक-मंडळी आपली आहे, आपल्याच लोकांची आहे असें वाटूं लागेल. चैनीकरितां नाटक पाहावयाचें आणि पाहून झाल्यावर त्या नाटकवाल्यांना शिव्या देऊन त्यांची हीन म्हणून अवहेलना करावी असला लब्धप्रतिष्ठितांचा प्रतिष्ठित गलिच्छपणा बंद होईल. या कार्यकारिणीनें आपल्या खर्चानें नाटकगृहें बांधावींत. खेळाचें भाडें मामुली स्वरुपांत असावें. गांवोगांव अशी मंडळी स्थापन व्हावी. परगांवच्या आलेल्या मंडळीची सर्व व्यवस्था स्थानिक मंडळीनें पाहिली पाहिजे. नाटक मंडळीचें गांवोगांव दळणवळण असावें. जमलेल्या वर्गणींतून आणि खेळाच्या पैशांतून नाटकगृहाचा सर्व खर्च व नटांचा पगार भागण्यास हरकत पडणार नाहीं. नाटक करणाऱ्यांवर पैशाचा भार पडेनासा झाला म्हणजे केवळ लोकप्रियता आणि आर्थिक नफ्याच्या नादीं लागून ग्राम्य नाटकांचा होणारा फैलाव थोपविला जाईल; अभिजात नाटकांचा उदय होईल.

ही रंगभूमीची व्यवस्था झाली पण कलावंत नटांचा प्रश्न अजून भिजत राहील.

केवळ निसर्गावरच अवलंबून राहिलें म्हणजे मानवी प्रयत्नांना आशास्थानच नको. प्रगतीचा मागमूसहि मिळणार नाहीं. ईश्वराच्या कृपेनें एखादा नट केव्हां तरी जन्मास येऊन रंगभूमी शोभवील अशी वाट पाहाण्यांत अर्थ नाहीं. यास मानवी प्रगति म्हणतां येणार नाहीं. कारण मग होणाऱ्या सर्व घटनांना निसर्ग जबाबदार राहील. त्यांत मनुष्याला श्रेय नाहीं, तशी त्याची सुधारणाहि होणार नाहीं. म्हणून निसर्गदत्त समजल्या जाणाऱ्या या कलांचें योग्य शिक्षण मिळालें पाहिजे. नाट्यपाठशाळा सुरू करून त्यांतून नाट्यकलेसंबंधीचें सर्व प्रकारचें शिक्षण द्यावयास हवें आहे. या पाठशाळांचा खर्च राजसभेनें भागविला पाहिजे. अशा तऱ्हेनें नाट्यशास्त्राचा पाया बसेल आणि अशी शिक्षणाची व गुरूची परंपरा अव्याहत चालूं राहील, तरच नाट्यकला चिरंतनस्वरूप होण्याचा संभव आहे.

## बोलपट

नाटकें मागें पडावयास बोलपट हेंहि एक प्रमुख कारण आहे. बोलपट धन-सुलभ असल्यामुळें आणि नाटकांची प्रथमच आर्थिक कुचंबणा होत असल्यामुळें धंदेवाईकांचा ओढा बोलपटांकडे जाणें अगदीं साहजिकच आहे.

### बोलपटाची छाप कां—

व्यापारानें गजबजलेल्या व म्हणून वेळ कमी असलेल्या बहुजनसमाजास ६।६, ८।८ तासांच्या नाटकांपेक्षां दोन तासांचा बोलपट थोडक्या पैशांत सर्वच दृष्टींनीं किफायत-शीर पडतो. पुन्हां, बोलपटांतून यंत्राच्या साहाय्यानें असें अद्‌भूतरम्य प्रसंग दाख-वितां येतात कीं तें नाटकांतून शक्य नसतें, त्यामुळेंहि बोलपट लोकप्रिय झाले. आधुनिक काळांत कामकऱ्यांची संख्या वाढली. थोडक्या वेळांत श्रमलेल्या जीवाची करमणूक बोलपटांमुळें त्यांना करतां येऊं लागली. बोलपट नटनटींनाहि पगार भरपूर मिळूं लागल्यामुळें नटनटींचा भरणा यांतच होणें अपरिहार्य होतें. बोलपटां-तील भरमसाट पगारानें त्या नटनटींचा जणुं कांहीं एक निराळा वर्गच निर्माण झाला. द्रव्याच्या विपुलतेमुळें त्यांनीं स्वतःचा भाव वाढवून घेतला. आणि समाजानेंहि त्यांना भलतेंच महत्त्व देऊन ठेविलें. नाटकापेक्षां बोलपटांतून व्यक्तींची जाहिरात

फार उत्तम प्रकारें होऊं लागली त्यामुळें नटनटींना प्रसिद्धी व लोकप्रियता कल्पनेबाहेर मिळाली. इतकी कीं, एखाद्या राष्ट्रीय पुढाऱ्यालाहि इतका मोठा मान मिळत नसेल, लोकांना इतकी उत्सुकता वाटत नसेल. तात्पर्य, बोलपटांनीं त्यांजविषयीं केवळ पैशाच्या जोरावर सर्व समाजावर आपली विलक्षण पकड बसविली !

वास्तविक पाहतां नाटकांप्रमाणें किंबहुना त्याहूनहि बोलपटांना सामाजिक दृष्ट्या फार महत्त्व आहे. समाजास शिक्षण देणें बोलपटांच्या द्वारें अत्यंत सोयीचें व कमी खर्चाचें आहे. शिक्षणसंस्थांतून बोलपटाचा प्रसार व्हावयास पाहिजे तितका झाला नाहीं. खेडेगांवांतून तर लोकशिक्षण वाटेल तितकें उत्तम प्रकारें देतां येईल. नाटकांत हें साधावयाचें नाहीं.

दिग्दर्शकाच्या हातांतलीं नट-नटींचीं बाहुलीं—

नट—नटींच्या बाबतींत नाटकाविषयीं लिहितांना जें सांगितलें तेंच येथेंहि लागू आहे. नटींच्यामुळें कला बिघडते, नव्हे नाश पावते, याचें प्रत्यंतर बोलपटसंस्थांतून वाटेल तेवढें पाहावयास मिळत असतें. नटनटींना श्रेय देणें न देणें सर्वस्वी दिग्दर्शकांच्या हातीं असतें. त्यांना वाटल्यास सूड उगवितां येतो. वाटल्यास एखाद्याचें वा एखादीचें भलतेंच महत्त्व वाढवितां येतें. यांमुळें चांगल्या नटनटींना अभिनयास वाव मिळत नाहीं. आणि त्या दिग्दर्शकास जे जे वश होतील त्यांना मात्र स्वर्ग दोन बोटें राहातो. या नादानपणामुळेंच अनेक बोलपट वाईट निघाले आणि जे चांगले व्हावयाचे ते झाले नाहींत. त्यामुळेंच कांहीं बोलपटसंस्था उत्कर्षास यावयाच्या त्या आल्या नाहींत, उत्कर्षास येऊन टिकावयाच्या त्या टिकल्या नाहींत, नवीन निर्माण व्हावयाच्या त्या निर्माण झाल्या नाहींत. बोलपटसंस्था पुष्कळ नवीन निर्माण झाल्या हें खरें परंतु त्या श्रेय देणाऱ्या नाहींत. त्यांना बोलपटसंस्था व्यायल्या असें म्हणतां येणार नाहीं. एकांतून अनेक निर्माण झाल्या त्या व्यायल्या नसून एकाचेच अनेक तुकडे तुकडे झाले. आर्थिक स्वार्थ आणि नटींच्यावरून परस्परांत मत्सर यांच्या अतिरेकाचा परिणाम होऊन बोलपटसंस्थांची नैतिक दृष्ट्या तर आहेच पण व्यावहारिक दृष्ट्याहि छकलें छकलें उडालीं. बोलपटसंस्था नवीन निर्माण झाल्या त्या उत्तेजनांतून नव्हे, पहिल्या संस्थेंतील भांडणांतून, द्वेषांतून. एकीनें दुसरीला उत्तेजन द्यावें

आणि तीं नवीन निर्माण व्हावी अशी आदर्शभूत संस्था एकहि नाहीं. या दुष्ट बुद्धीनेंच उत्तम उत्तम बोलपटांचें मातेरें झालें आहे. आणि अभिजात नटनटींना मागें खेचलें आहे. उत्तम अभिनय चेहऱ्यावर तो भाव उमटून दाखविणें यांत आहे. आणि या भावछटा दाखविण्यासाठीं वेळ लागतो. पटाचें छायालेखन चालू असतां दिग्दर्शकाला सूड उगविण्याचा असेल तर दिग्दर्शक पटपत्रिका फुकट जाते या सबबीवर तसा अभिनय करूं देत नाहीं. हातवारे करण्यास वेळ लागत नाहीं. हाच अभिनय तो करून घेतो. ज्या ठिकाणीं एखादी नटी उत्कृष्ट भावछटा दाखवून अभिनय करते, त्यावेळीं मत्सरानें तो पटभाग कापून टाकण्यांत येतो. अथवा प्रेक्षकांत कळेल न कळेल तोंच संपवून टाकण्यांत येतो. गायिका उत्तम असली तरीं तिला संधि न देतां पार्श्वभूमीवर दुसरीलाच संगीत म्हणावयास लावावयाचें. एकंदर चित्रपटाचें चित्रीकरण करतांना त्या नटांना धाडसाचीं, जीवावरचीं कामें करावयास सांगावयाचीं. ते बिचारे आपलें काम उत्तम व्हावें, बोलपट चांगला निघावा या भावनेनें जिवाची काळजी सोडून धाडसें करतात. पण शेवटीं दिग्दर्शक तो पटभाग कापून टाकतो, किंवा पटामध्यें तितकें श्रेय त्यास देत नाहीं. नटी नायिकेच्या योग्यतेची असली तरी तिला संधि न देतां एखाद्या हीन नटीला पण जी त्याला वश आहे तिला मुद्दाम संधि द्यावयाची. छायालेखनाच्या वेळीं ज्या बाजूनें चेहरा वाईट दिसेल असेंच छायाचित्र घ्यावयाचें. आपणास वश नसणाऱ्यांची प्रसिद्धि न करतां प्रियजनांचीच अतोनात प्रसिद्धि द्यावयाची. या सर्व गोष्टींमुळें चांगल्या नट-नटी आपोआप खट्टू होतात; आणि नादान लोक पुढें येऊन बोलपटांचा चुथडा करतात.

वरील दुर्गुणांच्या अभावीं, ज्या चित्रपटसंस्था उत्कर्ष पावून लगेच थंड झाल्या त्यांचा उत्कर्ष दीर्घायुषी झाला असता, ज्या संस्था अंधकारांत दडून राहिल्या आहेत त्या नांवारूपास आल्या असत्या, ज्या मुळींच जन्म पावल्या नाहींत त्या जन्मास येऊन कर्तृत्वशाली झाल्या असत्या. जातिवंत कलावंताच्या कलेचें योग्य चीज झालें असतें, कलेला सोन्याचा कळस दिसला असता, आणि अखेरीस हे चित्रपट समाजाचे मार्गदर्शक बनून समाजाची उंची कांहीं अंशानें तरी खास वाढली असती.

# वाङ्मय

### दोन मनें–

मनुष्याचें मन दोन प्रकारच्या रूपांनीं वावरत असतें. एक गंभीर आणि दुसरें खेळकर. त्याच मनांतून उत्पन्न होणाऱ्या वाङ्मयाचेंहि दोन प्रकार आहेत. एक गंभीर म्हणजे तात्त्विक व दुसरा खेळकर म्हणजे ललित. लेखनांतून ध्वनित होणारी भावना वा विचार हें लेखकाच्या मनाचें प्रतिबिंब असून त्यांत वर्णन केलेली परिस्थिति तत्कालीन समाजाचें प्रतिबिंब आहे. कांहीं औषधें मधांतून द्यावयाचीं असतात; तर कांहीं औषधें तशींच कडू घेतलीं तर गुण येतो; नाहीं तर त्या औषधाचा कांहीं उपयोग नाहीं. वाङ्मयाचें सुद्धां तसेंच आहे. ललितवाङ्मय मधांतून घ्यावयाचें आहे आणि तात्त्विक हें कडू औषध आहे. दोन्हीच्या योग्यतेंत कांहीं फरक असला तरी उपययुक्तता सारखीच आहे.

### वाङ्मयाचा आरंभ–

वाङ्मयाचा उगम लेखनकलेच्या शोधापूर्वी म्हणजे मानवप्राणि जेव्हां चांगला बोलूं लागला पण त्याहूनहि त्याचें मन खेळकर, विनोदी आणि भावविकसित झालें, बुद्धि प्रखर झाली तेव्हांपासून झाला. हें त्याच्या ‘ वाङ्मय ’ या नांवावरून दिसून येतें. ‘ वाङ्मय ’ म्हणजे ‘ वाणीमय ’. पूर्वी वाङ्मय‘लेखन’ होत नसे. वाङ्मय‘कथन’ होत असे. नाहींतर हें नांव पडण्याचें कारण नव्हतें. आपण आतां जें कागदावर लिहितों त्याच निमिषानें तें मुखानें सांगत असावेत असें दिसतें. मनुष्य जेव्हां एखाद्या पाहिलेल्या सुंदर देखाव्याचें, अनुभवलेल्या गमतीचें, पराक्रमाचें, शौर्याचें वा दुःखाचें वर्णन करून दुसऱ्यास सांगूं लागला, तेव्हां वाङ्मयाचा जन्म झाला. स्वप्नांची आठवण होऊन ती रंगवून सांगूं लागला तेव्हां अद्‌भुतरम्य वाङ्मयाची कल्पना आली असावी. भावनेच्या भरांत येऊन दुःखानें वा आनंदानें नाचूं बागडूं लागला आणि तोंडून आपोआप कांहीं तालावर शब्द येऊं लागले, तेव्हां काव्याचा उगम कशावरून झाला नसेल? मार्ग चुकलेल्या छोटया मुलांस उपदेश करतांना, दुःखितांचें सांत्वन करतांना या जेवून

खाऊन सहज पडल्या पडल्या आपल्या मागील जीवनाचा चित्रपट डोळ्यांपुढें येऊन आणि भोंवतालच्या निसर्गाकडे पाहून मानवी आयुष्याविषयीं डोक्यांत विचारांचा गोंधळ माजला असतां, विश्वाच्या एवढ्या फाकट पसाऱ्याकडे पाहून आश्चर्यचकित होत असतां मनांत जेव्हां विचारांचें काहूर माजूं लागलें तेव्हां तात्त्विक वाङ्मयाचा जन्म कशावरून झाला नसेल ? शास्त्रीय वाङ्मयाचा उगमहि असाच रोजच्या अनुभवांत असावा. घरें बांधीत असतां, स्वयंपाक करीत असतां, हत्यारें तयार करीत असतां, इ० अनंत अनुभवांवरून व त्यावरील होत असलेल्या वैचारिक आणि व्यावहारिक प्रगतींतूनच शास्त्रें जन्मास आलीं असावींत.

वाङ्मयाची प्रगति–

वाङ्मयाचा उगम कशांतूनहि होवो प्रथम वैयक्तिक वा सामाजिक घडामोडींचें प्रतिबिंब म्हणूनच वाङ्मयाचा जन्म झाला हें खरें. प्रथम वाङ्मयास निश्चित लेखन नसें; तें सार्वजनिक असे. कालांतरानें लेखनकलेचा शोध लागल्यानंतर त्या वाङ्मयास व्यवस्थित स्वरूप आलें. त्याचें निश्चित तंत्र बनलें. शास्त्रीय वाङ्मय अधिक शास्त्रशुद्ध आणि तात्त्विक वाङ्मय अधिक तर्कशुद्ध होऊं लागलें. वाङ्मयाचें एकदां तंत्र बसून त्याला निश्चित स्वरूप आल्यावर त्यांत प्रकार वाढले तसे वाङ्मयलेखकहि निर्माण झाले. पुढें मुद्रणकला निघाल्यावर तर बहुजनसमाजांत वाङ्मयाचा प्रसार अतोनात झाला. लोकांस वाङ्मय म्हणजे काय याची कल्पना आली. त्याची चटकहि लागली. पण ती वाचनाची, रसग्रहणाची होती. याहि पुढील काळांत वाङ्मयाचा प्रसार वाचकांत तर झालाच पण वाङ्मयलेखकहि अतिशय वाढले. त्याबरोबर वाङ्मयाचे प्रकार वाढले, लेखनकलेंत सुधारणा झाल्या, सुशिक्षित बहुजनसमाजावर वाङ्मयाचा पगडा बसला. आतां केवळ वाङ्मय हें समाजाचें प्रतिबिंब राहिलें नसून दोन आरसे एकमेकांसमोर ठेवावेत आणि परस्परांचीं प्रतिबिंबें एकमेकांत दिसावींत तशी स्थिति झाली.

वाङ्मयाचें समाजावरील वाढतें वर्चस्व–

प्राचीन कालांत वाङ्मयाचे प्रकार फार नव्हते; वाङ्मयाचे लेखक फार नव्हते आणि वाङ्मयाचा व्यापहि बेताचाच होता, त्यामुळें वाङ्मयाचा पगडा बहुजनसमाजावर बसलेला नव्हता. किंबहुना पुष्कळांना तर वाङ्मयाची तोंडओळखहि

नसेल. पुन्हां, लेखकाच्या प्रवृत्तींत आतांच्यापेक्षां फार भेद होता. लेखकांचें प्रमाण समाजांत दुर्लक्षणीय लहान असल्यामुळें आणि वाङ्मयाचा पोंचहि कांहीं विशिष्ट अल्पसंख्य वर्गापुरताच असल्यामुळें आणि असलेले विषयच वाचकांना पुरेसे होत असल्यामुळें लेखकांना नवीन शक्कली काढण्याची आवश्यकता भासली नव्हती. प्रमाणाल्पतेमुळें समाजांत महत्त्वहि कमी म्हणून लेखकांचीं वर्णनें समाजावर परिणामकारक होऊं शकलीं नाहींत. समाजानें त्यांचें अनुकरण केलें नाहीं. उलटपक्षीं लेखकास मात्र समाजाचें हुबेहुब चित्र रंगविणें भाग होतें. परंतु हा काल आतां राहिला नाहीं. समाजाच्या चालीरीतींचीं वर्णनें कथानकांतून करावींत आणि एवढ्यावरच थांबावें. ही कुचंबणा लेखकांना असह्य होते. ते ह्याच्याहि पुढें जातात. आपल्या कल्पनाशक्तीच्या बळावर कथानकांतून नवीन नवीन पद्धति राहणी व आचारविचार वर्णन करावेत आणि त्यांचें अनुकरण समाजानें करावें ही आतांची परिस्थिति आहे. वाङ्मय इतकें वाढूं लागलें आहे कीं, तें समाजक्षेत्राची सीमा ओलांडून पलीकडे जाऊं लागलें आहे. समाजांतील वस्तुस्थितीच्या एका धाग्यावर तें खुशाल आकाशांत रममाण होतें. तो धागा मात्र त्यांना आवश्यक वाटतो. समाजांतील विषय व त्यांचीं वर्णनें पुरेनाशीं झालीं आहेत. तेच ते विषय परंतु नवीन आकर्षकपद्धतीनें खुलवून वर्णनें करावीं लागतात. लेखकास कल्पनाशक्तीला ताण देऊन कांहीं तरी नाविन्य आणावें लागतें. त्यावांचून वाचकांची तृषा शांत होत नाहीं. अर्थातच आपण कधीं न अनुभवलेलीं वर्णनें कथानकांतून आढळलीं म्हणजे त्याचें अनुकरण करावेंसें वाटतें. आणि शेवटीं वाङ्मयांत जें जें नवीन असेल तें सुशिक्षित समाजांत अवतरलेंच म्हणून समजा. सुशिक्षिताकडून अशिक्षिताकडे हा प्रवाह वाहण्यास कांहीं अडचण पडत नाहीं. अशा तऱ्हेनें समाज हाहि तत्कालीन वाङ्मयाचें प्रतिबिंब असलेला दिसून येतो.

#### वाङ्मय व समाज यांचा परस्परसंबंध–

या परिस्थितीमुळें वाङ्मय समाजाला वळण देतें कीं समाज वाङ्मयाला वळण देतो यापैकीं निश्चित एक कांहीं एक सांगतां येत नाहीं. दोनहि एकमेकांस वाट दाखवीत असतात. समाजांतील आकर्षक वस्तुस्थितीची वाङ्मयावर छाप पडते. आणि वाङ्मयांतील मनोहर वर्णनांची समाजावर पडते. समाजास वाईट

वळण लावण्यास अनेक कारणें असतील परंतु त्यांत वाङ्मय हें आधुनिक काळांतील एक प्रमुख कारण आहे. आणि वाङ्मयच बिघडण्याचें कारण वाङ्मयास स्वतंत्र कार्यक्षेत्र आणि ध्येय उरलें नाहीं. लेखकांचा स्वतंत्र दर्जा नष्ट होत चालला. वाङ्मयरूपी माकडाला जाहिरातीचा डमरू वाजवून लोकांपुढें नाचायला लावावें अशा तऱ्हेनें लोकांची केवळ करमणूक करून पैपैसा मिळेल तो वेंचून त्यावर उपजीविका करावी या व्यतिरिक्त सामान्य वाङ्मय भक्तांना कोणतें उच्च कार्यक्षेत्र राहिलें आहे ? खुषमस्करी करून पोटभरू धंदा झाल्यामुळें अर्थात्‌च लोकांना आवडेल तसा नाच करून दाखविणें भाग आहे. पुन्हां कलेचा पोकळ डमरू चाळींत दुमदुमत राहतो तो निराळाच. बिघडलेल्या समाजाची अभिरुचि ही काय प्रतीची असणार हें निराळें सांगावयास नको. अशा तऱ्हेनें वाङ्मयामुळें समाज व समाजामुळें वाङ्मय असें विघडत असतें. या चक्राची सुरुवात कोठें होतें आणि संपतें कोठें हें कळणें दुरापास्त आहे.

वाङ्मयाकडून समाज सुधारण्याची जर अपेक्षा करावयाची असेल तर वाङ्मयांत आत्मचरित्रें आणि चरित्रें ह्यांची निपज जोरांत झाली पाहिजे. चरित्रें पुष्कळ होणें ह्याचा अर्थ समाजहि सुधारावयास लागला असा होतो. जितकीं चरित्रें अधिक तितके थोर पुरुष अधिक. त्याचीं उदाहरणें समाजापुढें आलीं म्हणजे प्रत्यक्ष अनुभवांनीं दिलेले धडे समाज पढत जातात. कोरड्या काल्पनिक तत्त्वज्ञानापेक्षां वा गोष्टींपेक्षां ज्यांनीं स्वतःच्या कर्तृत्वावर नांव मिळविलें—त्या आपल्यासारख्याच रोज वावरणाऱ्या व्यक्तींच्या अनुभवांनीं समाजावर केव्हांहि जास्त चांगला परिणाम होईल.

आत्मचरित्रें—

प्राचीन काळांत आत्मचरित्रें औषधालाहि मिळणें कठीण. उलट चरित्रें मात्र भरपूर. पण त्यांना चरित्रें म्हणण्यापेक्षां स्तुतिस्तोत्रेंच म्हणणें अधिक शोभेल असें वाटतें. कांहींशी ह्याच्या उलट स्थिति सध्यां आहे. हल्लीं चरित्रांतून पूर्वींच्याइतकी स्तुति केलेली आढळत नाहीं. परंतु आत्मचरित्रांतून मात्र पूर्वी जेथें थोर व्यक्तींचा स्वतःबद्दलचा शब्द ऐकूं येणें कठीण तेथें आज आत्मचरित्रकार आत्मस्तवनाखेरीज इतर विषयांचें वर्णन करणार नाहीं. परंतु ह्या

जाहिरातवाजीच्या आधुनिक काळांत आत्मचरित्रांचा असा प्रसार व्हावा हें योग्यच आहे. आत्मचरित्रांची प्रथा ही अशी असली तरी त्यांत बऱ्याच थोर व्यक्तींनीं भाग घेतल्यामुळें त्यांच्या पुण्याईनें या प्रथेस महत्त्व प्राप्त झालें आहे. आणि यापुढेंहि येनकेनप्रकारेण प्रसिद्धि मिळवूं पहाणाऱ्या नादान समाजघटकांपेक्षां जर थोर समाजघटकांनीं त्यांत प्रामुख्यानें भाग घेतला तर मराठी वाङ्मयांत आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारास उच्च स्थान प्राप्त होईल ह्यांत शंका नाहीं. शिवाय आत्मचरित्र ही फार महत्त्वाची वाव आहे हेंहि कळून येईल.

चरित्रांतील मानसशास्त्र–

आत्मचरित्राच्या वावतींत लोकांना अजून मानसशास्त्रीय दृष्टि आली नाहीं याचें आश्चर्य वाटतें. वास्तविक आत्मचरित्रें हें मानसशास्त्राचें एक मोठें साधन आहे. मानसशास्त्रज्ञांना त्यांचा फार उपयोग होईल. परंतु तसा होत नाहीं याचें कारण लेखकाचा म्हणजेच सर्वसाधारण मनुष्याचा स्वभाव. मनुष्यास आत्मनिरीक्षण योग्य तऱ्हेनें करतां येत नाहीं. तो कोठें स्वतःची स्तुतिच जास्त करील किंवा फाजील नम्रतेनें आपला स्वभाव व गुण झांकून ठेवील. अशा तऱ्हेनें वस्तुस्थितीशीं आत्मचरित्रांची फारकत होऊन तें लेखन वाचावयास बरें पण मानसशास्त्रीय दृष्ट्या बरेंचसें निरुपयोगी होतें. आत्मचरित्रें व चरित्रें लिहिण्याचा उद्देश थोरांचें घरगुती जीवन सामान्य लोकांस माहीत होऊन भावी थोर विभूतींस तें मार्गदर्शक व्हावें हाच असावा. परंतु हाच उद्देश मानसशास्त्रीय दृष्टीनें चरित्रें लिहिण्यानें फार मोठ्या प्रमाणांत आणि अधिक सफल होईल असा विश्वास वाटतो. मनुष्याचें मन म्हणजे काय, त्यांत कांहीं सद्‌गुण असल्यास त्यांची वाढ कशी करावयाची, दुर्गुण असल्यास त्यांच्या जन्मतः प्रवृत्तींचें ( Instincts ) उदात्तीकरण करून तें सन्मार्गाला कसें लावायचें, मनाच्या कोणत्या प्रकाराला नेमकें कोणतें खाद्य हवें, इत्यादी गोष्टी ज्यांनीं आपलें जीवन सुधारलें आहे—थोर पदवीस नेलें आहे अशा अनेक व्यक्तींच्या स्वभावाच्या अभ्यासानें सहज जाणतां येतील. मग समाजामध्यें थोर विभूति निर्माण होण्यास आणि सामान्य जनतेचें जीवन उच्चतर करण्यास फक्त इच्छा आणि कार्य या दोन शक्तींचीच वाण राहील. सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतून हेंच चालतें. ह्याकरितां आत्मचरित्रकारानें आपला स्वभाव वालपणापासून आजतागायतचें सर्व जीवन प्रामाणिकपणें दुर्गुणावरण

वाळून, स्तुतीची अपेक्षा–अभिलाषा न धरतां किंवा विनयानें सद्गुण न झाकतां, कोणत्या प्रकारचा पूर्वग्रह न धरतां यथासांग वर्णिलें पाहिजे. आपली लहानपणापासूनचीं सर्व स्वप्नें, मित्रमंडळ, चांगल्या वाईट सर्व संवयी आवडीनिवडी, बालपणाचें खेळ, मनाचा कल, प्रकृति, स्वभावाचे कानेकोपरे, अनुकूल वा प्रतिकूल परिस्थिति, इ. सर्व गोष्टी फार बारकाईनें व निरपेक्ष बुद्धीनें नमूद करणें आवश्यक आहेत. नेमकें हेंच चरित्रलेखकांच्या बाबतींत कमी पडतें. अशा शास्त्रीय चिकित्सक दृष्टीनें चरित्र लिहिण्यास कोणाहि सामान्य व्यक्तीचें चरित्र वा आत्मचरित्र हें मानसशास्त्रज्ञांना निश्चित उपयोगी पडेल. मनुष्यस्वभाव हा एक भव्य प्रासाद आहे. बाहेरून पाहिलें तर फक्त समोरील भागच दिसतो. पाठीमागील भाग झांकला जातो. एखादा त्याचा अतिशय निकटवर्ती असेल तर फार तर आंतील कांहीं दालनें दिसतील एवढेंच. त्या प्रत्यक्ष व्यक्तीलाहि सर्व प्रासाद आंतून बाहेरून एकदम साकल्यानें दिसत नाहीं. एखाद्या व्यक्तीचा खरोखरचा स्वभाव कसा आहे, त्याचें स्वरूप काय हें ओळखणें फार कठीण आहे. ह्याला एकच मार्ग. त्या मनःप्रासादाच्या सर्व भिंती पारदर्शक केल्या पाहिजेत. याचा अर्थ त्या व्यक्तीला निरनिराळ्या तऱ्हेनें ओळखणाऱ्या सर्व स्नेह्यांनीं त्याच्याविषयींचें आपलें खरें मत व अनुभव दिले पाहिजेत. त्या प्रत्यक्ष व्यक्तीनेंहि प्रांजलपणें स्वतःच्या दृष्टीनें आपला स्वभाव व्यक्त केला पाहिजे परंतु हा नसता उपद्व्याप करतो कोण ? ज्यांना मानसशास्त्राचें महत्त्व पटलें नाहीं ते तर तिकडे ढुंकूनसुद्धां पाहणार नाहींत.

अशा तऱ्हेनें नाटक, चित्रपट व वाङ्मय हीं मनोरंजनाचीं उच्च साधनें आहेत. उच्च म्हणण्याचें कारण, त्यांमुळें कलाविलास होऊन मनुष्याचें जीवन उच्च वातावरणांत रममाण होतें. याशिवाय कांहीं ग्रामीण साधनें आहेत. तमाशा, फड, नाच, इ० मुळें करमणूक होते; पण मन उच्च वातावरणांत रममाण होतेंच असें नाहीं. त्यांत ग्राम्यतेचेंहि मिश्रण असतें व कलाविलासहि बेताचाच असतो. आतांपर्यंत आपण समाजाच्या बऱ्याच अंगांचा विचार केला आणि समाजस्वास्थ्याकरितां संस्कृत्युत्तेजनासाठीं त्या दृष्टीनें विहंगमावलोकन केलें. तथापि या सर्व समाजांगांचें अधिष्ठान नीति असल्याशिवाय हें सर्व विवेचन फोल आहे. नीति हें समाजनियंत्रणाचें अत्यंत महत्त्वाचें साधन आहे. त्याचाच आतां विचार करूं.

# नीति

८

## समाजाची नैतिक पार्श्वभूमि

समाजाचें स्वास्थ्य सर्वस्वीं समाजनियंत्रणावर अवलंबून आहे. समाजनियंत्रणाचा ज्या प्रमाणांत प्रभाव असेल त्या प्रमाणांत समाजांत स्वास्थ्य नांदत असतें. समाज-नियंत्रणाची गुरुकिल्ली अजून कोणास तंतोतंत मिळालेली नाहीं असें आधुनिक जगांतील समाजांतील परिस्थिति न्याहाळतांना दिसून येतें. यावरून जगांत होत असलेल्या विद्येची प्रगति आणि समाजनियंत्रण यांत आत्यंतिक भेद आहे असें दिसतें. म्हणजे समाजनियंत्रण मानवी सुधारणेवर अवलंबून नाहीं कीं काय ?

### समाजाची प्रगति आणि समाजाचें स्वास्थ्य यांत भेद कां ?–

समाजनियंत्रण हें समाजजीवनांतील एक स्वतंत्र प्रकरण आहे. समाजाच्या इतर प्रगतीसह समाजनियंत्रणशास्त्रांतहि प्रगति होत गेली पाहिजे. तसा स्वतंत्र प्रयत्न झाला नाहीं कीं समाजनियंत्रण मागें पडतें. समाजनियंत्रण मागें पडलें म्हणजे विद्या आणि स्वास्थ्य यांत भेद दिसूं लागतो. अर्थात् सुधारलेल्या समाजांत स्वास्थ्य दिसून येत नाहीं. व्यवहारासाठीं तात्कालिक उपाय योजिले जातात परंतु ते केवळ व्यावहारिक असतात. त्यांत शास्त्रीयता आणि शाश्वतता बेताचीच असते. कारण समाजनियंत्रणाचा स्वतंत्र प्रयत्न त्यांत नसतो. समाजांत व्यावहारिक अडवणूक

होऊं नये एवढाच त्यांत उद्देश असतो. निदान परतंत्र राष्ट्रांत तरी अशी परिस्थिति असते. तथापि यूरोपांतील व अमेरिकेंतील सुधारलेल्या व स्वतंत्र राष्ट्रांतूनहि समाज-स्वास्थ्य बऱ्हंशीं नांदत आहे असें विधान करतां येत नाहीं. अर्थात् त्या राष्ट्रांतहि वरीलप्रमाणेंच परिस्थिति असावी.

समाजनियंत्रणाची सदोष पद्धति–

प्रचलित समाजनियंत्रणाचें स्वरूप मुख्यत्वेंकरून शारीरिक तात्कालिक असून त्यांत सूडाची भावना आधिक्यानें प्रतीत होते. अशा तऱ्हेचें नियंत्रण हें समाजाचें कात्रणच होईल. कायदा व त्यावरील शिक्षा समाजास घातक नसल्या तथापि त्या अयशस्वी ठरल्या आहेत हें सर्व समाजांतील वाढत्या गुन्हेगार वृत्तीवरून स्पष्ट होण्यासारखें आहे. आधुनिक समाजांतून समाजनियंत्रणाचेविषयीं जी प्रगति होत आहे ती या कायद्याविषयीं जास्त आहे. कायद्याचें शास्त्र बळावत आहे त्याप्रमाणें त्यावरील शिक्षाहि बळावत आहेत. त्यांतून आरोपीच्या दुष्कृत्यपरावर्तनापेक्षां, पश्चात्तापापेक्षां त्याच्यावरील सूडाची भावनाच स्पष्ट होते. परंतु समाजनियंत्रणाचें मानसशास्त्र मात्र अजून बरेंचसें अंधकारांत आहे.

कायदा आणि नीति–

कायद्यानें मन सुसंस्कृत होत नाहीं. सुसंस्कृत मनाच्या अभावीं समाजस्वास्थ्य अशक्य आहे. नीतिशास्त्र हें एकच साधन समाजास सुसंस्कृत करण्यास पात्र आहे. तत्त्वज्ञानांत नीतिशास्त्राला आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीनें अधिक महत्त्व आहे. त्याप्रमाणें समाजशास्त्रांत समाजनियंत्रणाचें प्रभावी साधन म्हणून नीतिशास्त्राला महत्व आहे. या दोन्ही दृष्टीनें नीतिशास्त्राला समाजांत फार उच्च स्थान आहे.

समाजनियंत्रणाचें साधन म्हणून नीतिशास्त्राचा ऐहिक दृष्ट्या विचार केला तरी वैयक्तिक दृष्ट्या आत्मिक उन्नतीचें साधन म्हणून त्याकडे लक्ष देणें अवश्य आहे. किंबहुना आत्मिक उन्नतीच्या तत्त्वावर आधारलेल्या नीतिशास्त्राचाच सामाजिक दृष्ट्या समाजनियंत्रणास अधिक उपयोग होतो. ऐहिक आणि आत्मिक ह्या दोन गोष्टी परस्परविरुद्ध असल्यानें आणि नीतिशास्त्र दोन्ही एकदम साधूं पाहत असल्यानें मनुष्याचें जीवन कात्रींत सांपडल्यासारखें झालें आहे.

## नीतीची तात्त्विक पार्श्वभूमि

तत्त्वज्ञान हें मनुष्यनिर्मित आहे. जीवन हें निसर्गनिर्मित आहे. तत्त्वज्ञानाचा जन्म व मानवाचा जीवनेतिहास असें दर्शवितो कीं, जीवन हें निसर्गनिर्मित असलें, तरी निसर्ग जीवनाला सर्वस्वी साहाय्यभूत होत नाहीं. किंबहुना निसर्गच पुष्कळ वेळां जीवनाच्या मार्गांत धोंडे पसरून ठेवतो! त्याकरितां अनेक साधनें निसर्ग योजीत असतो. मनुष्य सर्वस्वीं निसर्गाच्या आहारीं गेला, तर त्याचें जीवन यशस्वी होत नाहीं. उलटपक्षीं यश मिळूं लागल्यास त्यास निसर्ग मध्येंच अडथळा निर्माण करीत असतो. ह्या अनेक वर्षांच्या अनुभवानंतर निसर्गाला शह देण्याकरितां मनुष्यानें तत्त्वज्ञानाला जन्म दिला.

### कात्रींत सांपडलेलें मनुष्यजीवन–

निसर्ग आणि तत्त्वज्ञान ह्यांच्या अशा तऱ्हेनें परस्पर शह देण्यामुळें बिचारें मानवी जीवन कात्रींत सांपडल्याप्रमाणें जखडून गेलें आहे. तत्त्वज्ञानाप्रमाणें आचरण करावें, तर नैसर्गिक मनोवृत्तींची त्याला मान्यता नसते. केवळ नैसर्गिक मनोवृत्तींना मार्ग मोकळा करून द्यावा, तर तें तत्त्वज्ञानाला व लोकाचाराला संमत नसल्यामुळें मानसिक अस्वस्थता निर्माण होऊन, बहुतेक वेळां तें अहितकारक ठरतें. ह्याप्रमाणें निसर्गनिष्ठ भावना व तत्त्वनिष्ठ भावना ह्यांचा संग्राम सतत चालू आहे. निर्भेळ नैसर्गिक भावना आणि शुद्ध तात्त्विक भावना किंवा तत्त्वज्ञानाचें आवरण घातलेली तात्त्विक भावना असा भेद करून नैसर्गिक भावना पुष्कळ वेळां व्यक्तिहिताला व समाजसुखाला जीवनापासून दूर करतात, असा सामान्य अनुभव आल्यानें त्यांना अनीतीच्या वर्गांत घालण्यांत आलें. तात्त्विक भावना वरील प्रकारच्या नैसर्गिक भावनांना आळा घालून जीवनसुखांत भर घालूं शकतात; म्हणून त्यांना ‘नीति’ ही संज्ञा मिळाली. ही ‘नीति’ हितावह असली, तथापि आचरण सुलभ नसल्यानें ती सामान्य जनांना अशक्य कोटींतील गोष्ट होऊन बसली. ह्यामुळें असा प्रश्न उद्‌भवतो कीं, तत्त्वज्ञान हें व्यवहारावर म्हणजे जीवनावर अधिष्ठित असावें कीं केवळ बुद्धिमत्तेच्या बळावर सिद्ध केलेलें जीवन निरपेक्ष आणि ‘तत्त्वाकरितांच तत्त्व’ असें स्वयंभू तत्त्वज्ञान मान्य करावें?

नवीन नीति–

हें स्वयंभू तत्त्वज्ञान जीवनांत कितपत उतरणें शक्य आहे? सामान्य व्यक्तीला अवघड असें तत्त्वज्ञान आचरण्याची सक्ति केली—विकल्प ठेवला नाहीं—तर समाजांत अनीतीच जास्त फैलावेल. तेव्हां स्वयंभू तत्त्वज्ञान व्यवहार्य वाटत नाहीं. केवळ जीवनावर तत्त्वज्ञान आधारलेलें असावें असें प्रतिपादन केलें, तरीहि शेवटीं परिणाम वरीलप्रमाणेंच होणार! मग सर्वांच्याच जीवनांत नड उत्पन्न करणारी ‘अनीति’ ‘नीति’ होऊं शकेल. मनुष्य ही एक स्वतंत्र जाति असल्या-मुळें सर्व मानवांच्या बऱ्याचशा व्यावहारिक अडचणी व भावना समशील असणार, ह्यांत शंका नाहीं. तथापि व्यावहारिक अडचणी उत्पन्न करणाऱ्या भावना शुद्ध नैसर्गिक आहेत. नैसर्गिक भावनांचे आविष्कार म्हणजे आचार नैतिक मानूं लागलों तर वर सांगिल्याप्रमाणें निसर्गानें निर्माण केलेले धडे आहेत. मग व्यक्ति-हिताचा आणि समाजसुखाचा लाभ कसा होणार? आणि जीवनांत प्रगति कशी होणार!

स्वयंभू तत्त्वज्ञान सामान्य बहुजनसमाजांत यत्किंचितहि उतरणें शक्य नाहीं, हें आपण आतांच पाहिलें. फार तर लाखांत एक असलेल्या योग्याला तें आचरण सुलभ असेल. तेव्हां जीवनाधिष्ठित तत्त्वज्ञानाचाहि हातभार असणें अवश्य आहे. ह्या संधि करतांना तत्त्वनिष्ठ भावना व निसर्गनिष्ठ भावना ह्याची सांगड घातली पाहिजे. ह्या तत्त्व-निसर्ग-सन्धि सर्वमान्य झाला, तरच त्यांतून निष्पन्न होणाऱ्या नव्या नीतीला कांहीं अर्थ राहूं शकेल.

परिसीमांचें पुनरावलोकन–

नाहीं तर एखादी नड प्रखरतेनें जाणवणाऱ्या समाजवर्गानें तद्विषयक एखादा आचार नैतिक म्हणून मानला, तर दुसऱ्या वर्गाला त्या विषयावांचून नडत नसल्या-मुळें त्यानें तो आचार अनैतिक म्हणून पहिल्या वर्गाला हिणवावें. सध्यां सर्वत्र हेंच दिसून येत आहे. समाजांतील सामान्यतः अज्ञ, तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ ह्यांच्यांत एकवाक्यता नाहीं. तत्त्वज्ञांनीं तात्त्विक चर्चा करून एखादा आचार नीतिबाह्य ठर-वावा. समाजांतील प्रतिष्ठित वर्गाला त्या आचाराची आवश्यकता वाटत नसल्यानें त्यानें त्या ‘अनीती’ला मान्यता द्यावी आणि त्याच्या उलट स्थिति असलेल्य

सामान्य जनतेला तो आचार अपरिहार्य वाटत असल्यानें प्रतिष्ठितांच्या 'अनीती'ला झुगारून तिनें त्या आचाराचें पालन करावें. आणि ती विचारी सामान्य जनता अनीतिमान म्हणून तुच्छ लेखली जावी! कांहीं वेळां शास्त्रज्ञ सामान्य जनतेची अपरिहार्य बाजू उचलून धरतात. परंतु त्यांना प्रत्येक वेळीं प्रतिष्ठित समजला गेलेला बहुजन-समाज संमति देतोच असें नाहीं. सर्वमान्य तडजोड कोणींच व केव्हांहि केली नाहीं आणि सहज झाली ती सर्वमान्य होण्यासारखी झाली नाहीं. एका संस्कृतीच्या व परंपरेच्या समाजांत अशा सर्वमान्य तात्त्विक संधीची आवश्यकता असते. तसा संधि झालेला नसला, म्हणजे कांहीं लोकांची नैतिक कुचंबणा होते, तर कांहींना विनाकारण प्रतिष्ठितपणा प्राप्त होतो. नैतिक कुचंबणा होणें, हें त्या व्यक्तीप्रमाणेंच समाजालाहि हितावह नसतें. त्या त्या काळच्या समाजशास्त्रज्ञांनीं कालमानाप्रमाणें नीति-अनीतीच्या परिसीमांचें पुनरावलोकन करून त्या निश्चित करावयास पाहिजे आहेत.

## व्यसन आणि व्यसनी–

समाजांत नैतिक कुचंबणा अधिक प्रमाणांत होऊं लागली, म्हणजे व्यसनी लोकांचा वर्ग सर्व दृष्टींनीं वाढत जातो. अपरिहार्य, निर्भेळ व नैसर्गिक मनोवृत्ति आचरणांत उतरते तेव्हां तिला तत्त्वज्ञानाच्या भाषेंत अनीति असें म्हणतों. व्यवहाराच्या अर्थात् तत्त्वज्ञानाचा लगाम घातलेल्या नैसर्गिक मनोभावनेच्या भाषेंत 'व्यसन' संज्ञा देतों. वास्तविक व्यसन म्हणजे कोणत्याहि आचाराचा अतिरेक म्हणावयास पाहिजे. आसक्ति असणाऱ्या कोणत्याहि गोष्टींची अतिरिक्त पुनरावृत्ति हेंच खरें व्यसन. मग ती गोष्ट सद्वृत्तिपुरस्कृत असो वा दुर्वृत्तिपुरस्कृत असो. युक्तायुक्ततेचा प्रश्न निराळा आहे. अतिरिक्त आचाराचें मूळ एकच; आणि तें म्हणजे मोहाकुल मन. अतिशय दुर्व्यसनी मनुष्य आणि सत्कार्याची आवड असलेला मनुष्य हे दोघे मानसशास्त्रीय दृष्ट्या एकाच वर्गांत पडतील. सदाचरणी मनुष्याच्या मनावर चांगले संस्कार झाले व त्या उलट दुसऱ्याला वाईट संस्कार मिळाले, हें एकच कारण दोघांच्या आचारभिन्नतेला आहे. ह्याच्या अभावीं त्या दोघांची वृत्ति त्या त्या अनुक्रमानें बीजरूपांतच राहिली असती.

सात्त्विक संग्राम–

व्यसन आणि व्यसनी किंवा समाजांतील सर्वमान्य अशा निश्चित नैतिक कल्पना हे प्रश्न जरी क्षणभर बाजूस ठेवले, तथापि वैयक्तिक दृष्ट्या प्रत्येकाला रोजच्या व्यवहारांत आपल्या मनाशीं वरीलप्रमाणें तत्त्वज्ञानाविषयीं शंका निर्माण होऊन त्याच्यापुढें अर्जुनाप्रमाणेंच स्वत:पुरताच पेंचप्रसंग दत्त म्हणून उभा असतो. निसर्गनिष्ठ मनोवृत्तीचा मोह एका गोष्टीकडे ओढतो तर तत्त्वनिष्ठ मन ' असें करणें योग्य नव्हे, हें नैतिक नाहीं ' असें म्हणून मोहाकृष्ट मनोवृत्तीचा पाय मागें ओढीत असतें. अशा प्रकारच्या व्यक्तीच्याच अंतःकरणाची ही स्थिति होत असते. अशा प्रकारच्या मनुष्यांची निसर्गनिष्ठ प्रवृत्ति प्रबळ असून, मनावर त्याविरुद्ध तात्त्विक आणि सात्त्विक संस्कार होत गेल्यामुळें नैसर्गिक प्रवृत्तींना सर्रास मार्ग मोकळा करून देणें त्याच्या तत्त्वज्ञानाचें आवरण घातलेल्या ' सुसंस्कृत ' मनाला रुचत नसतें.

नैसर्गिक जन्मतः प्रवृत्ति प्रबळ असून, मनावर सत्प्रवृत्तसंस्कार झाले नाहींत अशा व्यक्तींच्या मनांत हा ' सात्त्विक संग्राम ' उद्भवत नाहीं. आपल्या नैसर्गिक मोहानुवर्ति मनाला आळा घालणारें ' तात्त्विक मन ' तयार झालेलें नसतें. ह्याच्या-विरुद्ध स्थितीहि असूं शकते. तथापि अशा मनःस्थितीचे लोक अतिशय मित-प्रमाणांत असतात. जणू कांहीं ह्या लोकांची नैसर्गिक मनोवृत्ति मुळांतच सत्प्रवृत्त असते ! सदाचाराचाच त्यांना मोह पडत असतो ! वर्तनाची वाईट बाजू त्यांना सुचतच नसते ! अशा प्रकारच्या लोकांचें स्वभावबीजच उच्च प्रतीचें असून, त्यावर संस्कारहि त्याला अनुकूल असेच झालेले असतात; तथापि त्याचा प्रश्न समाजाच्या दृष्टीनें येथें विचारांत घेण्यासारखा नाहीं.

समन्वयाची अवश्यकता–

तत्त्वज्ञान स्वयंभु कीं जीवनाधिष्ठित, हा प्रश्न निर्माण करणारें मन अक्षरशः साधुसंताचें नसलें, तरी मानवतेची चाड असलेल्या, उच्च वातावरणांत वावरणाऱ्या आणि थोर सांस्कृतिक परंपरेची लज्जत ओळखणाऱ्या सुखवस्तु व्यक्तीचें तें असतें. मनामध्यें तात्त्विक संग्राम सारखे सुरू असले, आणि कोणताच निर्णय पूर्णपणें घेतां

आला नाहीं, म्हणजे प्रत्यक्ष आकर्ष्य क्षणभर दृष्टीआड जाऊन, वर सांगितलेल्या बुद्धिप्रधान मनुष्याच्या मनांत तत्त्वज्ञान थैमान घालणें शक्य आहे. ईश्वरी तत्त्व स्वयंभू आहे. तें मनुष्याच्या जीवनाची अनुकूलता वा प्रतिकूलता पाहात नाहीं. मनुष्याच्या अडीअडचणी लक्षांत घेऊन ईश्वरी तत्त्व मनुष्याला सुकर होत नाहीं वा आपण स्वतः त्याच्याजवळ जात नाहीं. कोणत्याहि स्थितींत मनुष्यालाच त्या तत्त्वाजवळ गेलें पाहिजे. ज्याला हें शक्य नसेल त्यानें खुशाल त्या तत्त्वापासून दूर राहावें. ह्याचाच अर्थ ईश्वरी तत्त्व हें जीवनावर अधिष्ठित नाहीं. त्या तत्त्वांत मनुष्याच्या जीवनाला सोईस्कर आहे म्हणून कोणताहि कमीजास्त बदल व्हावयाचा नाहीं. त्या तत्त्वाचा मनुष्याच्या जीवनाशीं कोणताहि सापेक्ष· संबंध नाहीं. आतांपर्यंत ज्याला स्वयंभू तत्त्वज्ञान म्हणून संबोधलें, तें अशा प्रकारचें आहे.

एक वेळ इतकें उच्च तत्त्वज्ञान गांठण्यास मनाची धाव जाऊं शकेल; परंतु प्रत्यक्ष आचरण फार मंद गतीनें चालतें. त्याच्या मार्गांत विघ्नेंहि बरींच असतात. अर्थातच अशी प्रवृत्ति होते कीं, तत्त्वज्ञान जर मनुष्यानेंच स्वतःकरितां निर्माण केलें आहे, तर तें कोणाच्याहि कक्षेंत न येण्याइतकें दूर ठेवण्यांत काय अर्थ आहे? जर मनुष्यप्राण्याला त्या तत्त्वज्ञानाचा उपयोग करून घेतां येत नसेल, तर त्याचें अस्तित्व तरी कशासाठीं! ईश्वरी तत्त्व मानवी जीवनातीत आहे, त्याप्रमाणें त्याची कल्पनाहि जीवनातीतच आहे. मनुष्यप्राणी जगांत नसता, तरीहि ईश्वरी तत्त्वांचें अस्तित्व कायम असतें! परंतु तत्त्वज्ञानाचें तसें नाहीं. तत्त्वज्ञानाचा जन्मदाताच मनुष्य आहे; आणि तोसुद्धां प्रथमच सांगितल्याप्रमाणें सहेतुक. तेव्हां जन्म दिलेल्या ह्या अपत्याच्या जीवाचें सार्थक झालेंच पाहिजे.

मानवानें मानवाशीं वागण्याचें तत्त्व हें संपूर्णतः जीवनाधिष्ठित तत्त्वज्ञान होईल. पूर्ण जीवनाधिष्ठित तत्त्वज्ञानाचा परिणाम हितावह होत नाहीं, हें आपण मागें पाहिलेंच आहे. मानवाचा ईश्वराशीं संबंध जोडणारें तत्त्वज्ञान हें स्वयंभू आहे. स्वयंभू तत्त्वज्ञानाचा परिणाम जीवनाधिष्ठित तत्त्वज्ञानावर होतो. हा परिणाम जास्त प्रमाणांत होऊं लागला, म्हणजे सामान्य जनतेला तें असह्य होतें. तात्पर्य, ऐहिकार्थाकरितां परमार्थ आणि परमार्थाकरितां ऐहिकार्थ, असा परस्पर सापेक्ष संबंध ठेवला पाहिजे. जीवनाधिष्ठित तत्त्वज्ञानाला स्वयंभू तत्वज्ञानाची मुरड देऊन दोहोंचा संगम अनुभवनीय होईल.

नीतीचा उगम–

प्रथमावस्थेंत मानवप्राणी प्रथम वसाहत करून एकत्र राहूं लागला तेव्हां तो सहवास निर्विघ्न व सुखकर होण्यास त्यांना कांहीं विशिष्ट तऱ्हेनें वागावें लागलें. एकाचें दुसऱ्यावर अतिक्रमण होऊं नये आणि त्यांतून उत्पन्न होणारा सहवासांतील मोठा अडथळा यांना शह बसावा म्हणून प्रत्येकजण आपले अधिकार व अधिकार्य वस्तु दोघांच्या संमतीनें निश्चित करून घेऊं लागला. आपल्याच वस्तूचा उपभोग व आपल्याच अधिकाराचा उपयोग आपल्याकडून होत आहे याची प्रत्येकजण खबरदारी घेत असे. आपला अधिकार निर्विघ्न राहण्यासाठीं समजुतदार मनुष्य शेजाऱ्याच्या अधिकारावर आपल्याकडून अतिक्रमण केलें जाणार नाहीं याची काळजी घेई. त्याला आपण पीडा दिली नाहीं म्हणजे तोहि आपणांस पीडा देणार नाहीं हाहि विचार त्याच्या मुळाशीं असतो.

कायदा आणि नीति–

अशा तऱ्हेनें दोन व्यक्ति एकत्र राहूं लागल्या तेव्हां एकमेकांना एकमेकांपासून उपद्रव न पोंचतां दोघांचेंहि जीवन सुकर जावें म्हणून आपला अधिकार व अधिकार्य वस्तु यांची निश्चिति होऊं लागली म्हणजे तेथें नियमांचा जन्म होतो. त्या नियमांना दोघेजण स्वखुषीनें बांधून घेऊन त्याप्रमाणें त्यांचें पालन करतात तेव्हां त्यास नीतिनियमांचें स्वरूप प्राप्त होतें. परंतु ते नियम विशिष्ट तिऱ्हाइताकडून घातले गेले म्हणजे त्यांतील प्रत्येक नियम ह्या दोघां शेजाऱ्यांस सारखे मान्य होतीलच असें नाहीं. यामुळें व तिऱ्हाइतानें दिलें म्हणून त्या नियमांबद्दल त्या दोघांस आस्था वाटत नाहीं. ते पाळण्यांत सक्तीचा थोडासा भाग असतो. म्हणून कांहीं वेळेस त्यांचें उल्लंघन होण्याचा दोघां शेजाऱ्यां-कडून बराच संभव असतो. आणि या उल्लंघनाला त्या तिऱ्हाइतानें शासन ठेवलें असतें. हें शासन तिऱ्हाइताकडून होणारें असतें हें महत्त्वाचें आहे. अशा वेळीं त्याच नियमांना कायद्याचें स्वरूप येतें. नीतिनियम हे स्वतः दोघांच्या संमतीनें केवळ त्यांच्याच हिताकरितां बंधनकारक म्हणून घालत असतात. त्यामुळें त्याबद्दल त्या दोघांना एक प्रकारची आपुलकी व आस्था वाटत असते. त्यांत तिऱ्हाइताचा हात नसतां स्वतःच मनावर बंधन घातल्याकारणानें ते नियम आदरानें

निःशंकपणें पाळले जातात. क्वचित् चुकीनें त्यांचें उल्लंघन झालेंच तर त्याचें शासन तो स्वतःच करून घेतो. कायदा आणि नीतिनियम यांत हा महत्त्वाचा फरक आहे. नीतिनियमच मनुष्यांवर नियंत्रण अधिक घालूं शकतो व समाज त्यामुळें सुखी होतो. ज्या समाजांत नीतिनियम रसातळाला जाऊन कायद्या-कोर्टाचें प्रस्थ वाढत जातें, तो समाज मनुष्य म्हणून जगण्यास अपात्र आहे. सक्तीच्या चाबकानें जनावरेंसुद्धां कायदेभंग करीत नाहींत. कायदे नष्ट होऊन सर्व समाज नीति-नियमांवर चालूं लागणें हें त्याच्या आदर्श स्थितीचें लक्षण समजलें पाहिजे. आमच्या धर्मांत श्रद्धेवर आधारलेल्या नीतिनियमांचा सुळसुळाट आहे याचें कारण हेंच आहे.

## दारिद्र्यांतून अनीति कीं अनीतींतून दारिद्र्य–

सामाजिक नीतीप्रमाणें आत्मिक नीतीचें पालन समाजांतील जास्तींत जास्त व्यक्तींकडून होणें आवश्यक आहे. नीतीला झुगारून लावणारे व आर्थिक विषमतेचा राक्षस पुढें उभा करणारे या विधानाला जोराचा विरोध केल्यावांचून राहणार नाहींत. ते अशा विधानाकडे पाहून हंसूं लागतील. ज्यांना दिवसभर मजुरी करूनहि रोज अर्धपोटीं राहावें लागतें, नेसावयास धड वस्त्र नाहीं, रोगांनीं पोरांच्या शरीरांत घर केलेलें अशा स्थितींत भांडवलवाले पाशवी वृत्तीनें त्या मजुरांस छळाच्या चरकांतून पिळवटून काढतात. आणि तुम्ही त्या मजुरांना नीतीच्या गप्पा काय सांगतां ? अशा स्थितींत त्यांनीं चोरी करूं नये तर काय करावें ? ह्याच विचाऱ्यांना अनीतिमान म्हणून तुम्ही लब्धप्रतिष्ठित भांडवल-वाले तिरस्कारानें दूर लोटणार काय ? हेंच जर नीति करीत असेल तर धिक्कार असो त्या उच्च नीतितत्त्वांना ! असें म्हणून ते अनीतीचें कारण दरिद्रता हें शोधतात. पण हा उथळ बुद्धीचा खळखळाट आहे. वास्तविक अनीतीचें कारण केवळ दारिद्र्य नसून दारिद्र्याचें कारण बरेचवेळां अनीति आहे, हें त्यांनीं नीट समजावून घ्यावयास पाहिजे. त्या मजुरांस असा छळ कां सोसावा लागतो ? त्यांना दारिद्र्यांत कां खितपत पडावें लागतें ? याचा विचार प्रथम केला पाहिजे. भौतिक-वादी याचें उत्तर ' विषमता ' म्हणून ठोकून देतील. पण ही विषमता तरी समाजांत कशी आली ? कांहीं विशिष्ट समाजरचनेमुळें म्हणजे भांडवलशाहीमुळें. तरी ही भांडवलशाही कां निर्माण व्हावी ? याला आर्थिक व ऐतिहासिक कारण कांहींहि असलें तरी

नैतिक दृष्ट्या खालीलप्रमाणें कारण देतां येईल. जेव्हा भांडवलशाही प्रथम निर्माण होऊं पाहत होती त्यावेळेस जगांतील आधिभौतिक घडामोडींनीं भांडवल जमविण्यास सुलभ झालेल्या घटना यांचा परिणाम भांडवलदार होऊं पाहणाऱ्या लोकांवर झाला; त्यांची पैशाविषयींची आसक्ति बळावली. या विकाराला भोंवतालची परिस्थिति पूर्णपणें अनुकूल होती. त्याचा फायदा मोहवश झालेल्या भांडवलदाराच्या मनानें पुरेपूर घेतला. मनांत बळावत असलेली पैशाची हांव, स्वार्थबुद्धि आणि तिच्या मागोमाग धांवत येणारी भौतिक परिस्थिति यामुळें त्याचें मन पैशाच्या आनंदाच्या भरांत इतकें बेभान झालें कीं यामुळें आपण एकटें श्रीमंत होऊन पुष्कळांच्या पोटावर पाय देतों, ही भावना समूळ नष्ट झाली. मोहानें धुंद झालेल्या वेडयाला दुसऱ्याच्या जीवनाकडे सहानुभूतिपूर्वक पाहण्यास कोठून बुद्धि येणार ? म्हणून तर भौतिक परिस्थितीपेक्षां आपलें नैतिक बळ अधिक शक्तिमान करावें लागतें. या गुणाच्या अभावीं ज्याला परिस्थिति अनुकूल मिळाली त्यानें त्याचा फायदा घेऊन भांडवलशाही स्थापन केली. म्हणजे विषमता निर्माण होण्यास भांडवलदारांची नैतिक दुर्बलता कारण झाली. म्हणून नैतिक बळ वाढविणें आवश्यक आहे. अनीतीच्या नांवानें जेव्हां आमची ओरड असते तेव्हां ती मजुरांच्या विरुद्ध नसून त्यांच्या अनीतीचा सहानुभूतिपूर्वक विचार करून त्यांना अनीतीचा रस्ता दाखविणाऱ्या अनीतिमान भांडवलदारांच्या विरुद्ध ओरड असते हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

हिंदुस्थान आणि युरोप–

विषमतेला अनीतिच कारण होते याला एक उत्तम दाखला देतां येईल. समाजवादी जेव्हां हिंदुस्थानांतील समाजाविषयीं बोलतात तेव्हां युरोपांतील आजपर्यंतचा इतिहास देऊन त्यांजकडे भांडवलशाही कशी निर्माण झाली हें सांगतात. युरोपांतील कारण देऊन परिणाम हिंदुस्थानांतील दाखवितात याचें मोठें आश्चर्य वाटतें. आज युरोपांत व हिंदुस्थानांत दोनहिकडे विषमता आहे. पण दोघांचींहि कारणें फार भिन्न आहेत. हिंदुस्थानांतील आतांची विषमता ही आधुनिक कालांत म्हणजे युरोपीयांच्या आगमनानंतरची आहे. त्यापूर्वीं हा विषमतेचा वणवा इतका पेटलेला नव्हता. परकीयांच्या आगमनानें हिंदुस्थानच्या समाजरचनेंत एकदम फरक पडला. घरगुती धंदे व शेती जाऊन विषमतेस जोपासणारी कारखानदारी आम्हीं युरोपांतून उचलली.

तेव्हांपासून व त्यामुळेंच हिंदुस्थानांत विषमता बोकाळली. यालाहि आदिकारण म्हणजे परकीयांच्या आगमनानें आम्हीं आमच्या धर्म व संस्कृतीस पार विसरलों. परकीयांची प्रत्येक गोष्ट चांगली म्हणून आम्हीं त्यांचें अंधानुकरण केलें. त्यांतच आमची नीतिमत्ता लयास गेली हें सांगणें नकोच. ही अनीतिप्रियता आमच्या विषमतेस कारणीभूत झाली. हिंदुस्थानांत फार प्राचीन काळीं मोठा व्यापार चालत असे, जगभर चालत असे. किती तरी व्यापार्य वस्तू आमच्याकडे निर्माण होत. मोठमोठीं साम्राज्यें झालीं. पैशा-द्रव्याच्या अनंत उलाढाली केल्या. पण नीतिमत्ता जागरूक असल्यानें दुसऱ्याला पिळवटून आपण शिरजोर व्हावें ही युरोपीय आसुरी भावना आमच्यांत त्या काळीं प्रबळावलेली नव्हती. आमच्या ह्या नीतिमत्तेला कारण आमच्या धर्माची शिकवण तशी सात्त्विक होती—लोक समजतात तशी निवृत्तिपरहि नव्हती. नाहीं तर वर सांगितलेल्या उलाढाली आमच्या हातून झाल्या नसत्या. उलटपक्षीं युरोपीय लोक नीतिमत्तेनें प्रथमपासून दुर्बळ दिसतात. कारण रोमन-ग्रीक साम्राज्यापासून त्यांचा इतिहास पाहिला म्हणजे रोमांचकारी, क्रूर स्वार्थी वृत्ति त्याचें प्रत्यंतर देते. अशा नीतींत कचरणाऱ्या लोकांत मात्र आधिभौतिक अनुकूल घडामोडींनीं विषमता बळावत जावी हें अगदीं स्वाभाविक आहे. प्राचीन युरोपांतील स्वार्थी क्रूरपणा आमच्या प्राचीन भारतांत दिसून येत नाहीं. प्राचीन युरोपीयांचा रानटी टोळ्यांशीं संबंध आला तसा आर्यांचाहि आला. पण दोघांच्या इतिहासांत केवढा जमीनअस्मानाचा फरक! हा कसा पडला? त्यांच्याप्रमाणें आम्हींहि व्यापार करून खूप पैसा मिळवला, आमच्याकडे तर सोन्याचा धर निघत होता म्हणतात. पण त्यांच्याप्रमाणें आमच्यांत एवढी विषमता कां नव्हती? त्यांच्याप्रमाणें आम्हींहि साम्राज्यें उभारलीं पण त्यांच्याप्रमाणें आमच्या साम्राज्यांत कोणाचा छळ कां झाला नाहीं? त्यांच्याप्रमाणें आमच्यांतहि-धर्म, धर्मपंथ व धर्मगुरु होते मग त्यांच्याकडेच लोकांस, धर्मछळाला कंटाळून नवीन वसाहती स्थापन कराव्या कां लागल्या? आणि आमच्यांत नवीन लोक कां सामावू लागले? नीतिमत्तेचें सामर्थ्य म्हणतात तें हेंच. मनुष्याच्या ऱ्हासाला त्याची धर्मसंस्था कारणीभूत होत नाहीं, पैसा कारणीभूत होत नाहीं, कीं कोणतीहि भौतिक घटना होत नाहीं, एकच ती म्हणजे अनीति!

दरिद्री आणि श्रीमंत–

सामाजिक विषमतेला वा दारिद्र्याला सर्वसाधरण कारण अनीति एवढें सांगितल्यावर त्याकडे वैयक्तिक दृष्टीनें पाहूं. व्यक्तीला तिच्या दारिद्र्यामुळें तंतोतंत नीति पाळतां येत नाहीं हें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे. म्हणून दरिद्र्यांकरितां नीतिबंध थोडे सैल करून देणें भाग पडतें. परंतु अनीतीचें कारण एकमेव दारिद्र्य हेंच असून दारिद्र्य नष्ट झाल्याशिवाय तें संपणार नाहीं. म्हणून प्रथम नीतीच्या मागें न लागतां संसारास पुरेलसें द्रव्य मिळेल याकरितां प्रथम धडपडलें पाहिजे. हें म्हणणें सर्वस्वी चूक आहे. दारिद्र्यामुळें जरी नीति कांहीं अंशीं बिघडत असली तरी ती पैशामुळेंच सुधारेल अतएव प्रथम पैशाच्यामागें लागा या म्हणण्यांतून नीति–अनीति ही अंतःकरणांत नसून भौतिक साधनांत आहे असा अर्थ निघतो.

मनुष्याची नीतिमत्ता बलवत्तर नसली म्हणजे आधिभौतिक घटनांनीं त्याच्या नैतिक दृष्ट्या दुर्बळ असलेल्या मनावर परिणाम होणें अपरिहार्य आहे. पण हा परिणाम नैतिक बळ कमी पडतें म्हणूनच होतो हें विसरतां कामा नये. जर दारिद्र्य हेंच अनीतीचें एकमेव कारण असेल तर जे श्रीमंत आहेत त्यांच्यांत नीतिबंध सैल कां सुटावें ? चोरी केल्यावर चोर म्हणून शिक्का मारला म्हणजेच अनीति कां ? ज्यांची चोरी पचली जाते व समाजांत उजळ माथ्यानें प्रतिष्ठित म्हणून मिरवतात त्यांची चोरी ही चोरी होत नाहीं काय ? चोरी म्हणजे काय ? चोर म्हटल्या जाणाऱ्यानें विशिष्ट मार्गानें चोरलेला माल म्हणजेच चोरी काय ? शिष्ट वेशानें सभ्यतेच्या नांवाखालीं शेतकऱ्यांस वा अन्य गोरगरीबांस कायद्याच्या कैचींत न सांपडतां लुबाडणें यास चोरी वा दरोडा नाहीं का म्हणतां येणार ? मोठमोठ्या हुद्यावरील नोकरदार पैसे खातात ती चोरी होत नाहीं काय ? अनीतीचें कारण दारिद्र्य; तर मग या हुद्देदाराला कसलें दारिद्र्य आहे ? ५०० रु. चा नोकरदार पैसे खाऊन वा अन्य मार्गानें १००० रु. मिळकतीची हांव धरून त्याप्रमाणें ती पुरी करून दाखवितो याला अनीति दारिद्र्यांतून जन्म घेते असें म्हणणें कितपत शोभेल ? सारांश, नीति–अनीति ही माणसाच्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे. अर्धपोटी राहणाऱ्या भिकाऱ्यास पोटभर अन्न मिळविण्यासाठीं अनीति पत्करावी लागते तर पैसेवाल्याला आपली श्रीमंती टिकविण्याकरितां व अतिलोभी मनाचें समाधान करण्याकरितां वाममार्गानें जाणें भाग पडतें. म्हणजे मनुष्याची तृष्णा ही कधीं

संपावयाची नाहीं. यास्तव इथूनतिथून सर्वत्र अनीतीच पसरणार! दरिद्र्यापेक्षां श्रीमंतांतच पुष्कळ वेळां अनीति अधिक दिसून येते. कारण त्यांना अनीतीला अनुकूल असें द्रव्यसहाय्य भरपूर असतें.

दरिद्र्याची व्यसनाधीन मनोवृत्ति–

दरिद्र्याचा संसार हा खालच्या वर्गासमवेत चालत असल्यानें व दरिद्री म्हणून सुसंस्कृत मध्यमवर्गीय त्यांना तिरस्कारीत असल्यानें दरिद्र्याच्या मनावर संस्कार फार कमी होतात. उलटपक्षीं हलक्या मनोव्यापारांचा परिणाम, त्यांच्याच सहवासांत असल्यानें जास्त होतो. म्हणून दरिद्री लोकांची मनोवृत्ति नेहमीं नीच प्रवृत्तीकडे अधिक झुकलेली दिसते. त्यांना जितकी अन्नाची टंचाई जाणवते, तितकीच व्यसनसाधनांची टंचाई जाणवते. व्यसनसाधनांपासून समाधान मिळालें नसल्यास मिळालेला पै-पैसा हा व्यसनांत प्रथम खर्च होतो. पोटाला अन्न मिळत नाहीं म्हणून कींव येऊन जर तुम्ही त्यांना कांहीं पैसे दिलेत तर त्याचें जेवण करून खाण्याच्याऐवजीं निदान त्यांतील निम्मी रक्कम ही दारू पिण्यांत खर्च करतात. व्यसनाधीन असंस्कृत मनाला पोटाच्या आगीपेक्षां स्त्री व मद्य यांची आग अधिक जाणवते. मोलमजुरी करणाऱ्या दरिद्र्याला तर असंस्कृतपणामुळें व व्यसनाधीनतेमुळें आपलें भावी सुखदुःख याची मुळींच कल्पना नसते. त्याला जास्त पैसे मिळाले तर तो ते पुढील अडचणींकरितां जपून ठेवण्याऐवजीं दारूतच खर्च करील.

ही अशी दरिद्री लोकांची मनोवृत्ति असल्यानें त्यांना केवळ पैशाचें साहाय्य न देतां त्यांचा हा जाचक अडाणीपणा प्रथम नष्ट करून त्यांस सुसंस्कृत बनविलें पाहिजे. म्हणजे केलेल्या साहाय्याचें व त्यास मिळणाऱ्या आर्थिक अनुकूलतेचें योग्य तें चीज होईल.

## प्रचलित नीतिकल्पनांची योग्यायोग्यता

नीति विरुद्ध अनीति–

आतांपर्यंत आपण नीतीचें तात्त्विक विवेचन केलें. पण जेव्हां नीति-अनीतीचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हां कोणती नीति व कोणती अनीति हें समजणें फार कठीण

जातें. वास्तविक नीति-अनीतींत फरक करणें तितकें कठीण नाहीं. गोम आहे ती 'नीति' या शब्दाच्या अर्थात आहे. तीच पुष्कळांना उमगत नाहीं.

## नीति आणि नैतिक आचार–

नीति आणि नीतीचा आचार ह्यांचा गोंधळ होतो. आचारालाच लोक नीति समजतात. अशा चुकीच्या समजुतीनें नीतीच्या वादाचें अवडंबर माजतें. आचाराला नीति समजणें म्हणजे मनुष्याच्या पोषाखालाच मनुष्य म्हणण्यासारखें आहे. पोषाख बदलला कीं मनुष्य जसा बदलत नाहीं, तसाच आचार पालटला म्हणजे नीति बदलत नाहीं. आचार हा नीतीचा बाह्य पोषाख आहे. आचाराचा पोषाख बदलला तरी तो जोंपर्यंत नीतिपुरुषानें घातला आहे तोंपर्यंत तो आचार नैतिकच व तो पुरुष म्हणजे नीति तीच. हेतु नैतिक असल्यावर आचार बदलल्यानें नीति बदलत नाहीं. . .

आचारांनाच सर्वस्व नीति समजूं लागलों म्हणजे नीतीची सुसंगति कधींच लागावयाची नाहीं. एक आचार एका देशांत नैतिक होतो तर तोच आचार दुसऱ्या देशांत अनैतिक होतो. काळामध्यें अंतर पडलें म्हणजेहि हीच गोष्ट होते. ह्याच्या उलट दोन परस्परविरोधी आचार दोन देशांत नैतिक म्हणून मानले जातात. ह्या सर्वांचें कारण आचारामागील नीतीची कल्पना बदलते हेंच होय.

## सामान्य नीतितत्त्वें आणि व्यावहारिक अडचणी–

व्यवहारांत नीति-अनीतीचा प्रश्न फार वेळां उद्भवतो. पुष्कळ वेळां असे प्रसंग येतात कीं, धर्मानें तर ती अनीति सांगितलेली असते. पण प्रत्यक्ष प्रसंग आला तर तो नीति सांगतो. ह्यावेळीं गुरुस्थानीं कोणास मानावयाचें? भगवद्गीतेंत ह्याच प्रश्नाचा ऊहापोह केला आहे. नीतीचा अर्थ समजून न घेतां बाह्य आचारांना फाजील महत्त्व दिलें म्हणजे तेथें सदसद्विवेकबुद्धीचा कितीहि खल केला तरी नीतीचा वाद संपणार नाहीं. व्यवहारांत अशा वेळीं कोणतींहि नीतितत्त्वें उपयोगी पडत नाहींत. कोणताहि संत योग्य वाटत नाहीं. त्यांनीं दिलेल्या सल्ल्याला विरोधी बाजूहि तितकीच जोराची असूं शकते. म्हणून अशा आणीबाणीच्या प्रसंगीं कोणाचाहि सल्ला घेणें उपयुक्त होणार नाहीं.

मग हा प्रश्न समाधानकारक सोडवावयाचा तरी कसा? नीति आणि आचार ह्यांत फरक केला पाहिजे. नीति हें एक उदात्त तत्त्व असतें. आचार हें त्या तत्त्वाचें साधन आहे. त्या तत्त्वाची फलप्राप्ति करण्याकरितां जें साधन ज्यावेळीं उपयोगी पडेल तें वापरणें भाग आहे. थंडीच्या दिवसांत पातळ कपडा निरुपयोगी होतो; तो टाकून दिलाच पाहिजे. उलट उन्हाळ्यांत गरम कपड्याचा सोस वाईट आहे. शरीराला बाधा होऊं नये हें मुख्य तत्त्व आहे. त्याच्या सिद्धी-करितां देशकालपरत्वें जो कपडा घालणें इष्ट आहे तोच घातला पाहिजे. कपड्यां-नाच स्वतंत्र महत्त्व देऊन शरीराची हानि करून घेण्यांत काय अर्थ!

सामाजिक स्वास्थ्य व आत्मिक उन्नति साधण्यासाठीं समाजनेते कांहीं तत्त्वें घालून देतात. त्याच्या साधनेकरितां कांहीं आचार पाळणें आवश्यक आहे. हे आचार म्हणजे कांहीं तें मुख्य तत्त्व नव्हे. आचारांतून नीतितत्त्व प्रतीत होत असलें तरी आचाराला साक्षात् नीति समजणें असमंजसपणाचें आहे. आचार कर-तांना किंवा त्याकडे पाहतांना त्याच्यामागें काय तत्त्व आहे, काय हेतु आहे, आणि काय परिणाम होईल हें पाहिलें पाहिजे. सत्य बोलणें हें तत्त्व आहे पण तें बोल-ण्याच्यामागें दुसऱ्याचें अहित करण्याचा हेतु असेल तर तें सत्यव्रत अनीतीचें होईल. पण एक चूक झाली. सत्य बोलणें हें मुख्य तत्त्व--ध्येय नव्हे. तें समाजस्वास्थ्य व आत्मिक उन्नति साधण्याचें साधन आहे. ह्या सिद्धीकरितां केव्हां केव्हां खोटें बोलणेंहि भाग पडेल तरी ती नीतिच होईल. बव्हंशीं सत्यानें काम भागतें. खोटें बोलण्याचे प्रसंग कमी येतात. व खोटें बोलण्यानें बहुधा वाईट परिणाम होत असतात. म्हणून सत्य बोलावें असें ढोबळ नीतितत्त्व--नव्हे आचार घालून दिला इतकेंच.

आत्मोन्नति करून समाजास स्वास्थ्य मिळवून द्यावयाचें असेल तर ह्याला अनुकूल असें उदात्त तत्त्व जीवनापुढें ठेवणें आवश्यक आहे. आत्मोन्नति करून समाजस्वास्थ्य साधणें हेंच ध्येय आपल्या जीवनाचें ठेवलें पाहिजे. हें ध्येय म्हणजे सर्वांत मुख्य असें तत्व. ह्याच्याचकरितां आपलें जीवन व जीवनविषयक व्यवहार खर्ची घालावयाचे. ह्या तत्त्वसिद्धीकरितां ज्या गोष्टी करणें भाग आहेत त्या केल्याच पाहिजेत. जीवनांतील सर्व व्यवहार हा त्या तत्त्वाकरितां; तें तत्त्व व्यव-हाराकरितां नाहीं. ही खूणगांठ प्रथम आपल्या मनाशीं बांधून घ्यावयास पाहिजे आहे. ह्या तत्त्वाला बाध येईल असा व्यवहार ही अनीति समजली पाहिजे.

आचारांचें आगंतुक पावित्र्य आणि विशुद्ध नीति–

वरील तत्त्वसिद्धीकरितां आपल्या जीवनास विशिष्ट वळण लावणें आवश्यक आहे. हेतुपूर्व जीवन नियमित करूनच तत्त्वसिद्धि करून घेतां येईल. जीवनाचा मार्ग निश्चित नसला, ध्येयनिष्ठेचा अभाव असला आणि खुशालचेंडू वृत्ति मनांत धरली म्हणजे तें जीवन स्वैर स्वरूपाचें होतें. अशा वाऱ्याप्रमाणें सैरावैरा धावणाऱ्या जीवनांत ध्येयसिद्धि होणें दुरापास्त वाटतें. असें जीवन वाऱ्यावर उडून जातें. म्हणजे त्या जीवनाचें सार्थक होत नाहीं. डोळ्यासमोर ध्येय ठेवून त्याला अनुसरून जीवन एका चाकोरींतून जाणें इष्ट आहे. त्याकरितां जीवनांत उच्च तत्त्व ठेवणें आवश्यक वाटतें. अशा जीवनाला कांहीं नियम व आचार हे आग्रहानें पाळावे लागतात. ह्या तत्त्वानुसारी आचारांना व नियमांना (मनावर घातलेल्या नियंत्रणाला) नीति म्हणावयाची असते. अधिक स्पष्ट करावयाचें झाल्यास त्यास नीति न म्हणतां नीतीचे आचार म्हणावेत. अशा आाचारांस म्हणजे पर्यायानें ध्येयास बाध येईल असें वर्तन वा विचार हे अनैतिक समजले पाहिजेत.

नीति म्हणजे तत्त्वानुसारी मनोभावना. मनांत ध्येय ठेवून त्याच्या सिद्धीकरितां आचार केला जातो. तो आचार करतेवेळीं मनांत जी भावना असेल त्या भावनेला नीति म्हणावयाचें. तत्त्वाला साधक व पोषक अशी जी भावना ती नीति, आणि ह्या भावनेंतून म्हणजेच पर्यायानें ध्येयसिद्धीकरितां जो आचार केला जाईल तो नैतिकच समजला पाहिजे. मग तो आचार कसाहि असो. आचाराकडे लक्ष देण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण केवळ आचार घेतला तर त्याला स्वतंत्र अर्थच नाहीं. आचारांना जें महत्त्व किंवा अर्थ आला असेल तर तो त्या मागील मनोभूमिकेमुळें--भावनेमुळें व त्याप्रमाणें त्याच्या परिणामामुळें आला आहे. एकच आचार अनेक वर्षें नैतिक म्हणून उपयोगांत येऊं लागला म्हणजे कालांतरानें त्यामागील मनोभूमिकेचा लोप होऊन रूढीनें त्या आचारालाच स्वतंत्र पावित्र्य येत असतें. हेंच आगंतुक पावित्र्य नीति–अनीतीचें भांडण लावून देतें. आमच्या धर्मांत विविध काळांत भिन्न भिन्न आचार सांगणाऱ्या स्मृति झाल्या, त्याचें कारण हेंच आहे. एकच आचार प्रत्येक वेळीं ध्येयास पोषक होईल असें नाहीं.

आचारांचें सापेक्षत्व–

हें मर्म न कळल्यामुळें पुष्कळ लोकांना नीति कोणती व अनीति कोणती तें समजत नाहीं. पुष्कळ वेळां असें होतें कीं वरून दिसायला एखादा आचार अनैतिक वाटतो तो याचें कारण आतांच सांगितल्याप्रमाणें त्यास रूढीनें आगंतुक पावित्र्य आणून दिलें असतें. परंतु त्या आचारामागील भूमिकाहि कांहीं वेळेस उदात्त असूं शकते. अशा वेळीं ही उदात्त भूमिका कोणाच्या लक्षांत येत नाहीं. आणि मग तो आचार करणाऱ्याला लोक दोष देतात. महाभारतांतून वा रामायणांतून अशा पुष्कळ गोष्टी आहेत. त्यावद्दल लोक मोठमोठया ऋषींस व देवतांस दोष देतात. महाभारतकाळीं विवाहसंस्था स्थिरावलेली नव्हती. आर्योंची लोकसंख्याहि बेताचीच होती. अशा वेळीं कुलक्षय होत असतां एखाद्या ऋषीनें स्त्रीस अनैतिक संबंधाचा सल्ला दिला तर तो केव्हांहि नैतिकच आहे. कारण त्यामागील भावना ही स्वार्थी मोहाची नसून समाजोन्नतीची उदात्त भावना आहे. आणि असें त्या त्या ठिकाणीं स्पष्टपणें उच्च भूमिकेवरून म्हटलेलेंहि आहे. त्याचीच लोक उलट टिंगल करतात. सध्या युरपांतहि संख्यावाढीसाठीं असे कृत्रिम प्रयत्न केले जात आहेत. आधुनिक युगांतील पापी दृष्टीनें पाहणाऱ्या माणसाला सात्त्विक वृत्तीनेंहि स्त्रीपुरुषसंबंध येऊं शकतो याची कल्पना कशी येणार? तो नीच दृष्टीनेंच त्याकडे पाहून उच्च तत्त्वाच्या नांवाखालीं त्यांनीं आपली आसुरी तृषा भागविली असेंच बेजबाबदारपणें ठोकून देणार. वेश्येला पतिव्रतेची किंमत कळणें कठीण आहे. आफ्रिकेंतील घोर युद्धांत वेश्या काय कर्तृत्व करूं शकतात हें निदर्शनास आलेंच आहे. कुटुंबाचें व समाजाचें अहित बघणाऱ्या पतिव्रतेपेक्षां नाइलाज म्हणून धंदा पत्करलेल्या पण त्याचा फायदा घेऊन त्यांतहि मनोभावें प्रसंगीं समाजहित साधणाऱ्या वेश्येला आणि मनोभावें सात्त्विक अंतःकरणानें पुरुषसेवा करणाऱ्या एखाद्या पिंगलेला अधिक पवित्र मानिली पाहिजे. श्रीकृष्णाच्या बाबतींतहि असें बरेंच वेळां झालें आहे. वरवर पाहिलें असतां त्याचे उपदेश व आचार हे अनैतिक वाटतात. पण त्या मागील हेतु व भावना लक्षांत घेतली असतां त्यांची सुसंगति लागल्यांवाचून राहणार नाहीं.

ह्याच्या उलट असा प्रश्न उद्भवतो कीं सत्य बोलणें, अहिंसा, मातृभक्ति हीं सर्व उदात्त आहेत ना? ती नीति आहे ना? पण त्याच्या मुळाशीं कधीं वाईट वासना व

परिणामी दुष्ट अशी स्थिति नसते का? गाय आपल्या पुढून पळून गेली आहे, मागून खाटीक येऊन आपणांस तिच्याविषयीं विचारीत आहे अशावेळीं सत्य बोलणें हें पाप कीं पुण्य —म्हणजे नीति की अनीति? समाजाच्या प्राणांचा प्रश्न आला असतां मातेस सोडून समाजासाठीं धांवत जाणें म्हणजे आपणांस प्रिय असलेल्या एका व्यक्तीकरितां आपल्या समाजांतील अनंत लोकांचा नाश न करणें--ही नीति कीं अनीति? एका स्त्रीवर मवाली सुरा दाखवून बलात्कार करीत आहे अशावेळीं त्या मवाल्याला अहिंसा म्हणून जीवदान देणें कितपत नीतीचें होईल? सारांश, ज्याप्रमाणें वाईट दिसणाऱ्या आचारांतून चांगली भावना व हेतु असूं शकतात त्याप्रमाणें चांगल्या दिसणाऱ्या आचारांतहि दुष्ट भावना व हेतु असूं शकतात. हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण सत्य सांगण्यांत एखाद्या निरपराध्याचा जीव घेण्याचा हेतु असूं शकेल. एका दुष्टाची अहिंसा करण्यांत अनेक दुष्टांचा नाश करण्याचीहि भावना मनांत असण्याचा संभव आहे. म्हणून, नीतीचे आचार हे नीतिशास्त्रवेत्ते ढोबळ मानानें घालून देत असतात. त्यांचा अर्थ शब्दांचा कीस काढून आपणांस पाहिजे तसा घेण्यापेक्षां तो आचार सांगण्यांत मूळ हेतु काय असतो तें प्रथम पाहिलें पाहिजे. शब्दाचा अर्थ शब्दकोशांतून काढावयाचा नसून ज्यामुळें त्या शब्दाला व्यवहारांत महत्त्व येतें त्या त्याच्यामागें दडून बसलेल्या भावनेंतून काढला पाहिजे.

कांहीं आचार असे असतात कीं साधारणतः कोणत्याहि काळांत व कोणत्याहि देशांत ते सामान्यतः हितकारक ठरतात. उलट त्यांचें पालन न केल्यामुळें नव्याण्णव टक्के अहित होण्याचा संभव असतो. असे आचार नीतिशास्त्रवेत्ते सर्वसामान्य तत्त्व म्हणून सांगून टाकतात. शास्त्रांत प्रत्येक बारीक मारीक व्यवहार स्पष्ट करणें कठीण आहे. शास्त्राच्या उलट व्यवहाराचें आहे. शास्त्र हें शक्य तितकें नियमित व विशिष्ट चौकटींत बसावयाचें असतें, तरच शास्त्र म्हणतां येईल. व्यवहाराची गोष्ट फार निराळी आहे. कोणत्याहि व्यवहाराला नियम सांगणें अशक्य आहे. व्यवहार हा संपूर्णपणें स्वैर वृत्तीचा आहे. शास्त्राला बंधन थोडें जरी सैल झालें तरी मानवत नाहीं. त्यामुळें व्यवहाराचें फार तर वर्गीकरण करून त्या वर्गांना विशिष्ट नियम स्थूल मानानें सांगतां येतील. तरी ते वर्ग केव्हांहि निश्चित नसतात. अगदीं शास्त्रीय पद्धतीनें व्यवहाराचें वर्गीकरण करणेंच शक्य नाहीं. त्या त्याच्या चमत्कारिक गुणधर्मामुळें शास्त्राला व्यवहारापुढें नमतें घ्यावें लागतें. ही गोष्ट ध्यानीं आली म्हणजे नीतिशास्त्रानें सांगितलेला नियम त्या त्या मानानें व्यवहारांत

कसा लवचीक करावा लागतो हें कळणें कठीण नाहीं. ह्यास्तव एकादा नियम सांगण्यांत नीतिकारांचा उद्देश काय आहे ! ह्याच्याहि पुढें जाऊन एकंदर नीतिशास्त्राचा उद्देश काय हा ध्यानीं आणावा. ज्या आचारानें मानसिक अधोगति वा समाज अस्वास्थ्य निर्माण होईल असा आचार करणें हें नीतिविरुद्ध मानिलें पाहिजे. नीतिशास्त्राचा उद्देश तरी ह्यापेक्षां निराळा काय असणार ? आचार हें नीतीचें साधन आहे हें विसरतां कामा नये. आचार नीतीकरतां असून नीति आचाराकरितां नाहीं. आंतील नीतितत्त्व बिघडलें तर वाईट वाटावयास पाहिजे. आचार भिन्न झाला म्हणून आकाशपाताळ एक करण्याचें कारण नाहीं.

नीतीचें साधन जें आचार कीं ज्यांना स्वतंत्र महत्त्व व अस्तित्व नाहीं अशा आचारांनाच प्रत्यक्ष थोर नीति समजून भौतिकवादी नीतीचा आव्हेर करतात. आचार हे अस्थिर असतात हें विसाव्या शतकानें नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. फरक एवढाच कीं आम्ही त्यांना 'आचार' म्हणतों आणि भौतिकवादी 'नीति' म्हणून संबोधितात. ह्या त्यांच्या चुकीच्या विधानामुळें नीति ही त्या त्या काळांत सारखी बदलत राहते. म्हणून तिला विशेष महत्त्व देण्याचें कारण नाहीं. अशीहि ते वचनबाजी करून खऱ्या नीतीला झिडकारून देतात.

## समाजाचें नीतिशास्त्र

### नीतीचें पृथक्करण—

नीतिनियम दोन प्रकारचे असतात. त्यांतील प्राथमिक प्रकार म्हणजे दोन शेजारी एकमेकांपासून उपद्रव होऊं नये म्हणून जे नियम घालतात त्याला 'संरक्षक नीति' म्हणावें. ह्या नियमांचें एकमेकांनीं एकमेकांवर आक्रमण करूं नये एवढेंच कार्य असतें. पण याहिपुढें जाऊन त्या दोघांची मैत्री जमली म्हणजे ती मैत्री दृढतर करण्याकरितां व आपला सहवास अधिकाधिक सुखकर होण्यासाठीं स्वतः स्वतःवरच फक्त जे नियम घालून घेतो त्याला 'मित्र नीति' म्हणूं. ह्या नियमांचें क्षेत्र त्या त्या व्यक्तीपुरतेंच असतें. यावेळीं त्याची दृष्टि उच्च भूमिकेवरून पाहत असते. आपलें रक्षण झाल्यावर आपल्या मित्रास कसें सुख

मिळेल व आपलें त्याच्याशीं सख्य कसें वाढत जाईल हेंच साधण्याचें कार्य या नियमांचें असतें.

आतांपर्यंत ज्या नीतीचें विवेचन केलें ती सामाजिक स्वरूपाची होती. समाजाशीं व्यवहार करतांना समाजांत निरुपद्रवता निर्माण होऊन स्वास्थ्य लाभूं देणें हें त्या सामाजिक नीतीचें प्रमुख कार्य होतें. आतां समाजाच्या उत्कर्षाप्रमाणें व्यक्तीच्या उत्कर्षासाठीं—आत्मिक उत्कर्षासाठीं जे नियम असतात त्यांना आत्मिक नीति म्हणूं.

आत्मिक नीति–

आत्मिक नीति ही सुद्धां उच्च भूमिकेवरून पाहिलें असतां, सामाजिक नीतीचाच एक भाग आहे. कारण व्यक्ति आणि समाज हे प्रथमदर्शनीं भिन्न दिसत असले तरी अंतर्यामीं ते इतके निगडित स्वरूपाचे आहेत कीं कांहीं विशिष्ट मर्यादेनंतर दोघांचे हितसंबंध व उत्कर्ष हा एकाच मार्गानें जात असतो. पुष्कळ वेळां जें हित वा अहित समाजाचें तेंच व्यक्तीचें व जें व्यक्तीचें तेंच समाजाचें ठरत असतें. व्यक्तिव्यक्तींनींच समाज बनत असतो. त्याचें नातें मायलेंकरांच्या नात्याप्रमाणें आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्ति ही नैतिकदृष्ट्या थोर झाली तर समाज सुसंघटित होतो. उलट त्या व्यक्तीचें नैतिक बळ खालावत चाललें म्हणजे समाजांत अंदाधुंदी माजून तो समाज नष्टप्राय होण्याचीं चिह्नें दिसतात. थोड्या व्यक्ति जरी जगद्वन्द्य झाल्या तरी त्या सर्व समाजास भूषणावह होतात. समाजाची सर्वसाधारण पातळी कांहीं प्रमाणांत उच्च असल्याशिवाय त्यांत थोर विभूति निपजणें दुरापास्त आहे.

दोनहि शेजारी बरेच दिवस सख्यत्वानें राहूं लागले म्हणजे मनोवृत्ति जरा व्यापक बनते. आपल्या अधिकारांचें रक्षण व त्यांच्या पालनांत अडथळा येऊं नये म्हणून दुसऱ्यांच्या अधिकारांचें मर्यादित स्वरूपांत रक्षण करणें ही स्वार्थी दृष्टि जाते. मनुष्यांत बराच काळ मित्रत्वानें आयुष्य घालविल्यावर आपल्याप्रमाणेंच दुसऱ्याला सुखदुःखें असतात याची त्याला सहानुभूतिपूर्वक जाणीव उत्पन्न होते. आणि मग स्वतः त्रास व नुकसान सोसूनहि दुसऱ्याला सुख कसें मिळेल

व दुःख कसें कमी करतां येईल इकडे त्यांची धडपड सुरू होते. या कार्यासाठींहि आपल्या मनावर आणखी बंधनें घालून नवीन नियम करतो.

## आत्मिक नीतीची आवश्यकता–

अशा प्रकारें समाजांतील दुर्दैवी वैयक्तिक जीवन पाहूं गेलें असतां आत्मिक उन्नतीची लालसा उत्पन्न करणें किती आवश्यक आहे हें कळून येईल.

आत्मिक नीतीचें कार्यक्षेत्र संपूर्णतया एकाच व्यक्तीपुरतें असतें. आणि त्याचें प्रत्यक्ष कार्यहि वैयक्तिकच असतें. सामाजिक नीतीमुळें ज्याप्रमाणें माणसांमाणसांतील संबंध सलोख्याचे राहून सामाजिक जीवन सुखदायक होतें त्याप्रमाणेंच आत्मिक नीतीनें आपलें मन व शरीर यांच्या व्यवहाराचें नियमन करून वैयक्तिक जीवन उदात्त केलें जातें. आत्मिक नीतीच्या योगानें वैयक्तिक जीवन उदात्त झालें म्हणजे रानटी मनाच्या व्यापारांना आळा बसतो. आत्मिक नीतीचा उगम मागें सांगितल्याप्रमाणें सामाजिक नीतींतून झाल्याकारणानें सामाजिक जीवनहि सुकर करण्यास मदत होते.

## आत्मिक नीतीची भूमिका–

आत्मिक नीतीकडे पाहतांना आपली दृष्टि जरा निराळी ठेवणें इष्ट आहे. सामान्य भूमिकेवरून ह्या नीतीचें महत्त्व कळणें कठीण आहे. बोलूनचालून हा सर्व भाग सात्त्विकतेचा आहे. आणि सात्त्विकता ही केव्हांही सामान्य माणसास खालच्या भूमिकेवरून समजणें शक्य नाहीं. कारण सात्त्विकतेचा विजय हा तत्काळ दृश्य स्वरूपांत मिळण्यासारखा नसून तो कालांतरानें मिळणारा आध्यात्मिक व चिरंतन विजय असतो. सुख हें उच्च मानसिक अवस्थेंत असून बाह्य भौतिक साधनांवर नाहीं या पायावर त्या विजयाची कल्पना आधारलेली असते. इतका सुसंस्कृतपणा व गंभीरपणा सामान्य व्यवहारी माणसास असणें कठीण आहे. म्हणून आत्मिक नीतीचें विवेचन करतांना ज्यांची वर सांगितल्याप्रमाणें मनाची सिद्धता झालेली असेल त्यांनींच इकडे विशेष लक्ष दिल्यास उपयोग होईल. भौतिकवाद्यांना हें सर्व थोतांड वाटणें स्वाभाविक आहे. मुळींच पोहावयास येत नसले-

त्याची एकदम भर पुरांत उडी मारल्यानें जी अवस्था होईल तीच भौतिकवाद्यांची येथें होण्याचा संभव आहे.

आत्मिक नीतीचें स्वरूप–

आत्मिक नीति म्हणजे स्वतःच्या आत्म्याची उन्नति करून देणारीं मनाल घातलेलीं विशिष्ट बंधनें नीति होय. हीं बंधनें पाळीत असतां प्रयत्न सफल केव्हां झाले व विफल केव्हां झाले हें जर नीट समजलें नाहीं तर त्यांनीं तीवरील आपली श्रद्धा नष्ट होण्याचा पुष्कळच संभव आहे. आणि आत्मिक नीति हें थोतांड असून मनुष्याच्या प्रगतीस अडथळा आणण्यास प्रामुख्यानें कारणीभूत होते ही उलटी श्रद्धा मनांत ठाम वसते. आत्मिक नीति लोकप्रिय न होण्याचें व तिला अनंत शत्रू उत्पन्न होण्याचें हेंच एक कारण आहे. आत्मिक सुख शारीरिक सुखापासून फार निराळें आहे. ज्यांत शरीराला सुख वाटतें त्यांतच मनालाहि सुख वाटेल असें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. तसेंच मनाला वाटणारें सुख देहाला वाटेलच असें नाहीं. आत्मिक नीतिमत्तेचा पुरुष शरीरसुखापेक्षां मानसिक सुखाकडे विशेष पाहतो. शरीरसुख मिळालें तरी शक्य तों तो मनुष्य तें सुख टाळण्याचा प्रयत्न करतो. कारण शरीरसुखानें पुष्कळ वेळां मानसिक ऱ्हास तसाच दैहिक ऱ्हास होण्याचा संभव असतो. अशा माणसाची दृष्टि वर्तमानकाळापेक्षां भविष्यकाळांत अधिक संचार करते; क्षणकतेपेक्षां चिरत्वांत अधिक रममाण होते. दैहिक सुखांत आणखी एक तोटा आहे. ह्या सुखाच्या लालसेनें स्वार्थी बुद्धि बळावून दुसऱ्यावर अतिक्रमण करण्याची ईर्षा जोरांत उत्पन्न होते. ह्याचा अतिरेक झाला म्हणजे समाजांत गुन्हेगारी, गरिबांची छळणूक इ० अनिष्ट प्रकार वाढीस लागतात. मानसिक सुखाचा अगदीं याच्या उलट प्रकार आहे. ह्या सुखाची लालसा जितकी वाढेल तितका मनुष्य निःस्वार्थी, उदात्त वृत्तीचा, निरुपद्रवी व सुसंस्कृत बनत जातो. कारण मानसिक सुख हें आत्मलक्षी (subjective) असतें. त्यामध्यें आपलें मनच आपल्या ताब्यांत आणावयाचें असतें. मनाची विशालता व समाधानता वाढवावयाची असते. ह्याकरितां त्याला स्वार्थी वस्तुनिष्ठ (odjcctive) सुखांतून मन काढावें लागतें. दुसऱ्याच्या सुखाकडे व दुःखाकडे सहानुभूति दाखवावी लागते. त्याशिवाय मनाला शांति लाभून तें सुसंस्कृत होत नाहीं. सर्व तंटयाचें मूळ वस्तुनिष्ठता! तीच मनांतून घालविलीं

तर तंटे होण्याचें कारण काय ? शिवाय परोपकारासाठीं स्वतःचा देह खर्ची घालणें हाच तर मानसिक सुखाचा पाया आहे. ही परोपकारबुद्धि वाढत चालली म्हणजे नवीन तंटे होण्याचें बाजूलाच राहिलें पण जुने असलेले तंटे मिटून समाजांत छळानें पीडित झालेली व्यक्ति राहणें शक्य नाहीं.

विजय आत्मिक कीं भौतिक ?–

तेव्हां आत्मिक नीतीच्या प्रयत्नांची सफलता व निष्फलता ठरवितांना आपल्याला मिळालेला विजय वा सुख हें कोणत्या प्रकारचें आहे हें समजलें पाहिजे. प्रयत्नांचा शेवट जर मानसिक समाधानांत झाला व तात्कालिक नसून कालांतरानें कां होईना पण चिरंतन स्वरूपाचा असला तर तो आत्मिक विजयच म्हटला पाहिजे. मग त्यांतून उपलब्ध होणारीं भौतिक साधनें जरी प्रतिकूल असलीं तरी चालतील. केवळ जड वस्तु हस्तगत करणें हा जरी विजय असला तरी तो तात्पुरता आहे. आत्मिक स्वरूपाचा विजय हा केव्हांहि चिरंतन व उच्च प्रतीचा असतो. वस्तुनिष्ठ पराजयानें शत्रूला जितकें लांछनास्पद वाटणार नाहीं त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक लांछनास्पद आत्मिक पराभवानें त्यास वाटतें. इतिहासामध्यें बऱ्याचशा युद्धांना अपमानानें, ह्या आत्मिक पराभवाच्या चिडेनें चेतना दिली आहे. एकादी आपली वस्तु शत्रूनें पळविली तर ती पराक्रमानें परत मिळवितां येईल पण एकदां झालेला अपमान भरून काढणें दुरापास्त आहे. गुलामांना गुलामगिरींतच अभिमान वाटावा ह्यापेक्षां आणखी काय आत्मिक अधःपात त्यांचा व्हावयाचा आहे.

आत्मिक सामर्थ्य–

आत्मिक नीतीचा हेतु आत्मिक सामर्थ्य वाढावें हा आहे. हें सामर्थ्य सात्विक गुणानें साध्य होत असतें. ह्या नीतीचे नियम स्वतःकरितां पाळावयाचे असतात. दुसरा मनुष्य काय करतो इकडे पाहण्याची त्यास आवश्यकता नाहीं. दुसऱ्या माणसानें वाटेल तें वर्तन केलें तरी तीमुळें स्वतःच्या आत्मिक नीतीचा भंग करणें योग्य होणार नाहीं. जो मनुष्य दुसऱ्यांच्या वागणुकीकडे पाहून स्वतःच्या नीतिअनीतीच्या उच्चतेचें मापन करतो त्याला कधींच आत्मिक सामर्थ्य वाढवितां येणार नाहीं. कारण दुसरीं माणसें हीं श्रेष्ठ आत्मिक नीतीला अनुसरतात असें नाहीं. किंबहुना तीं व्यवहाराच्या नांवानें बरींच अनैतिक कृत्यें करीत असतात. त्यांच्या नादीं आपण लागलों

म्हणजे आपलें तर हित होत नाहींच पण व्यवहारोत्पन्न तंट्यांना अधिक उत्तेजन मिळतें. 'त्यानें केलें म्हणून मला तसें प्रतिकृत्य करणें भाग पडलें' असें म्हणणें ही सात्त्विकता नाहीं. हा तामसी गुण आहे. तमोवृत्ति सर्व तंट्यांचें मूळ आहे. विरोध नष्ट होऊन इष्ट वस्तूची प्राप्ति व्हावी म्हणून लोक तमोगुणाचा स्वीकार करतात पण त्यानें विरोध वर्धमान होतो. मूळ हेतु साध्य होत नाहीं. सत्त्वगुणाचा परिणाम ह्याचे विरुद्ध होतो. सत्त्वगुणानें विरोध निवारण होऊन इष्ट वस्तु दोघांसहि सख्यत्वानें प्राप्त होते. शिवाय कोणत्याहि माणसाला रागानें एकदम चिडून आपण जें बोलतों त्यापेक्षां गोडीनें हळुवारपणें सांगितलेलें जास्त पटतें. तें बुद्धि व अंतःकरण या दोघांनाहि पटतें. पुष्कळ वेळां भावनेनें जीं महत्त्वाचीं कार्यें पार पाडलीं जातात तीं बुद्धीच्याकडून कधींहि होत नाहींत. पुष्कळ ठिकाणीं भावनेपुढें बुद्धि निकामी ठरते. म्हणून व्यवहारांत दोन हात करण्याचा प्रसंग आणण्यापेक्षां त्याच्या अंतःकरणालाच हात घालणें अधिक श्रेयस्कर आहे. परंतु हें सर्व व्यवहारी सामान्य माणसांशींच वागतांना लागू आहे. अत्याचारी, क्रूर असुरांकरितां निराळे नियम असतात.

आत्मिक नीति आणि औपचारिक शिष्टाचार–

आत्मिक नीतीच्या भक्तानें दुसरी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. त्याची नीति ही लोकांत शिष्टाचारासाठीं नसून स्वतः एकट्याकरितांच आहे. हें ध्यानांत ठेवून नीतीचें आचरण करावयास हवें आहे. एकादा आचार चार शिष्टांस संमत असेल, त्याला कायद्याचीहि मान्यता असेल आणि प्रथमदर्शनीं प्रसंगासहि उचित वाटेल. परंतु तो केवळ लौकिकांत अमान्य नाहीं म्हणून नैतिक आहे असें नाहीं. त्यावेळीं आपल्या मनाला साशंकता वाटत असेल, स्वतःच्या अंतःकरणास पटत नसूनहि पण 'चार लोकांस संमत आहे ना? मग कांहीं भीति नाहीं.' असें म्हणून त्याचा गैरफायदा घेणें हें आत्मिक नीतीचा घात करणारें आहे. पुष्कळ वेळां असें होतें कीं, आपलें मन मोहास बळी पडून तें एकादें कृत्य करण्यास आपल्याला प्रवृत्त करतें पण तें वाईट असल्यानें आपलेंच पण सात्त्विक मन 'तें करूं नकोस, तें अनैतिक आहे' अशी साक्ष देत असतें. ह्या विरोधामुळें मनांत दोन भावांचें द्वन्द्व सुरू होतें. जोंपर्यंत सात्त्विक मनानें विकारी मनावर पूर्ण ताबा मिळविला नाहीं तोंपर्यंत आपलें मन दुसऱ्या कोणाचा तरी आधार शोधूं लागतें. अशा प्रसंगीं कांहीं वेळेला चार शिष्ट त्या कृत्याला मनमोकळेपणानें संमति देतात. त्यांत त्यांस कांहींच

गैर दिसत नाहीं. पण त्यांची दृष्टि ह्याच्या आत्मिक नीतीपर्यंत पोंचलेली नसते. ते सामान्य शिष्टाचाराचीच नीति ओळखीत असतात. तेव्हां त्यांच्या दृष्टीनें तें कृत्य गैर नसणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु आपण आपली नैतिक उच्चता ओळखली पाहिजे. मोहवश मनाला बळी पडून लोकांच्या पडत्या फळाची आज्ञा उचलणें आत्मिक नीतीला शोभत नाहीं. तें कृत्य जरी लौकिकदृष्ट्या योग्य असलें तरी आपल्या मनाची जोंपर्यंत संपूर्णपणें खात्री नाहीं, उलट त्याच्या अयोग्यतेचीच खात्री आहे तोंपर्यंत तसें करणें, येथें निश्चितपणें अनीति होईल. कारण तें कृत्य करण्यांत त्याची स्वतःची मनोभूमिका–भावना सात्त्विक नव्हती. तें कृत्य सद्भावनेंतून उत्पन्न झालेलें नाहीं.

ह्या ठिकाणीं आत्मिक नीतीचें आणखी सूक्ष्म विवेचन करूं. वर सांगितल्याप्रमाणें स्वतःच्या सात्त्विक भावनेलाच पटत असलेलें कृत्य हें नैतिक होय. पण आतां ह्याच्याहि पुढें जाऊं. तें कृत्य आपल्या सात्त्विक भावनेस पटतें म्हणूनच केवळ केलेलें असेल तर नैतिक होईल इतकेंच. म्हणजे आपण आत्मिक नीतीच्या शब्दांच्या कचाट्यांतून सुटूं. पण तेवढ्यानें त्याचें आत्मिक बल वाढणार नाहीं. अशा कृत्यांनीं त्याची आत्मिक नीतिमत्ता श्रेष्ठ, असें म्हणतां येणार नाहीं. लोकांच्या दृष्टीनें केव्हांहि तो किती तरी उच्च प्रतीचा आहे. परंतु आत्मिक नीति ही लोकांच्या नीतीशीं ताडून पाहावयाची नसते. नाहीं तर आत्मिक बलाची श्रेष्ठता कधींच वृद्धिंगत होणार नाहीं. लोकांच्या दृष्टीनें आपण श्रेष्ठ आहोंत एवढ्यावरच त्याचें मन समाधान पावेल.

स्वयंस्फूर्त सात्त्विक भावना

आपण जेव्हां एकादे वेळेस नैतिक आचरण करण्यास उद्युक्त होतों तें कां होतों ह्याचा विचार केला पाहिजे. आणि ह्यावरच आपली श्रेष्ठता अवलंबून राहणार. अंतःकरणांतून सहज स्फूर्त, कशाचेंहि दडपण नाहीं, आणि मनाच्या एकन् एक कप्प्यांतून सर्वांचा मनोभावें एकच सूर अनुकूल निघाला असता, आणि त्याबद्दल आपल्याला ठाम आत्मविश्वास असून चार लोकांची त्याला संमति नाहीं, ( किंबहुना विरोधहि असेल कांहीं वेळेस ) अशा स्थितींत जें नैतिक आचरण आपल्या हातून सात्त्विक उच्च भावनेनें घडतें त्यालाच आत्मिक दृष्ट्या सर्वश्रेष्ठ आचरण व नीति म्हणतां येईल.

भावनाशील मन विरुद्ध सदसद्विवेकबुद्धि–

नैतिक आचरण करतांना उच्च नीतितत्त्वांचीं भीड पडेल वा आपल्या उपास्य देवतेच्या भीतीनें किंवा आपली चार लोकांत नालस्ती होईल अशा भीतीनें तें कृत्य करण्यास उद्युक्त झालों तर तें आचरण नैतिक दृष्टया कितीहि थोर असलें तरी आत्मिक बळ अजून लंगडें पडतें असेंच म्हटलें पाहिजे. नैतिक दृष्टया थोर आचरणाला महत्त्व नाहीं. तें करतांना मन किती स्वयंभू, थोर होतें यावर त्या कृत्याच्या थोरवीचें मापन होणार. बौद्धिक मनांत पुष्कळ खल करून जें सदसद्विवेकबुद्धीनें ठरविलें म्हणून आचरिलें तेंहि कृत्य थोर नव्हे. कारण ह्या बुद्धीचा चाललेला खलच सांगतो कीं ही स्फूर्ति अंतःकरणांतून निघाली नाहीं व निघाली असल्यास तिला ती पटली नाहीं म्हणून तें काम बुद्धीवर गेलें. तें कृत्य करण्याविषयीं त्याचें मन द्विधा आहे. म्हणजे अंतःकरण अजून कोतें आहे. बुद्धीनें तर सर्वच जग चाललें आहे पण तेवढ्यानें तें आत्मिक उच्चता पावलेलें नाहीं. आत्मिक नीतीचे आचार व विचार रोमरोमांत भिनलेले पाहिजेत. अगदीं सहजपणें आत्मिक विचारानें मन उत्स्फूर्त असलें पाहिजे. मनाचा सहजस्फूर्त आविष्कार मनाची जात दर्शवीत असतो. आत्मिक नीति इतकी आत्मसात् झाली पाहिजे.

मनोविकारांचें उदात्तीकरण–

मनुष्याचें अंतःकरण व सदसद्विवेक बुद्धि ह्यांचें जेव्हां तादात्म्य पावेल, दोघांचें एकच शरीर, कार्यहि एकच, दोन अगदीं अभिन्न–एकरूप होतील तेव्हांच तो मनुष्य आत्मिक उच्चतेस पोंचला असें समजावें. एकाला पटत नाहीं म्हणून ती फिर्याद दुसऱ्याकडे गेली असें अंतःकरण व बुद्धि ह्यांचें होतां कामा नये. एकानें अमान्य केलेला निर्णय दुसऱ्यास मान्य होतां कामा नये. विकारी मन ही वस्तूच मनुष्यांत राहूं नये. मोहाला वश होणारें मन सात्त्विक हृदयाला संपूर्णपणें शरण गेलें पाहिजे. सात्त्विक हृदयाला पटलेली गोष्ट–तिचाच मोह माणसाला झाला पाहिजे. मनांतील विचार व मोह हीं सात्त्विक हृदयाचें हृदय बनलीं पाहिजेत. मनुष्य जें सात्त्विक नैतिक आचरण करतो तें त्याला सदसद्विवेकबुद्धीशीं वाद घालून करण्याचा प्रसंग येऊं नये. मोह उत्पन्न करणाऱ्या मनाला त्या नैतिक आचरणाचाच मोह झाला पाहिजे. जो विकार अनैतिक गोष्टींच्या बाबतींत मनुष्याला होतो तसा नैतिक कृत्यांचा मनाला प्रबळ विकार झाला पाहिजे. म्हणजे व्यवहारी भाषेंत ज्याला आपण मनोविकार

प्रबळ आहेत म्हणतों तीच अवस्था सात्त्विक आचरणांचे बाबतींत झाली पाहिजे. सारांश, व्यवहारांत संबोधिल्या जाणाऱ्या मनोविकाराचें पूर्णपणें उदात्तीकरण झालें पाहिजे. असा अनावर मोह नैतिक कृत्यांचा होऊं लागला म्हणजे तो मनुष्य नैतिक उच्चता पावला असें म्हटलें पाहिजे.

मनाला कोणत्याहि प्रकारचें बंधन वा दडपण नाहीं, मनाविरुद्ध सद्सद्विवेक बुद्धीचा यत्किंचितहि उपयोग करण्याची आवश्यकता भासत नाहीं, म्हणजेच मन व ती बुद्धि तादात्म्य पावलीं आहेत. आणि मनाला सर्व प्रकारची संपूर्णपणें मोकळीक आहे, अशा सहजस्फूर्त स्थितींत जें नैतिक आचरण घडतें तें त्या मनाची आत्यंतिक सात्त्विक थोरवी दर्शवितें.

आतांपर्यंत समाजाच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा विचार केला. नीति या समाज-नियंत्रणाच्या प्रमुख शास्त्राचें विवेचन झालें. त्यावरून समाजांतील व्यक्तींचे व्यवहार निर्विघ्नपणें परस्परांस पोषक होण्यासाठीं व्यक्तींचें मन नैतिक झालें पाहिजे हें सिद्ध होतें. एवढ्या सर्व चर्चेवरून समाजाचें वास्तविक स्वरूप कसें असावें याविषयीं अस्पष्ट तरी रूपरेषा आली असावी. याप्रमाणें एकाद्या नवीन समाजाचा जन्म झाल्यास त्याचें पुढलें पाऊल हें नेहमींच निश्चितपणें सुसूत्र रूपांत ध्येयमार्गावर पडणार यांत शंका वाटत नाहीं. तथापि अशा तऱ्हेची पूर्वयोजना असंस्कृत, बुद्धिपुरस्सर समाजरचना नसलेल्या परंतु हजारों वर्षांपूर्वीपासून चालत आलेल्या जगाकडे व आपल्या समाजाकडे विहंगमावलोकनाची दृष्टि फेकून भारतीय संस्कृतीचें जगांत स्थान काय त्याचा आतां शेवटीं विचार करूं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

# पाश्चात्य प्रगति आणि भारतीय संस्कृति

१

## फळी फुटलेलें शूर सैन्य आणि सरांतील मणी फोडणारा बलवान मारुति

जगाचें पुढलें पाऊल कोठें पडतें आहे तें पाहतांना मागील पाऊलें कोठें व कशीं पडत आलीं याचें सिंहावलोकन करणें सोईचें पडेल. जगाच्या गतीला 'प्रगति' न म्हणतां 'पुढलें पाऊल' म्हणणेंच योग्य. ओसाड जंगलांत एकादें कोकरूं चुकावें आणि कावरेंबावरें होऊन एकदां या बाजूस तर एकदां त्या बाजूस अशीं बावरलेल्या नजरेनें पावलें टाकीत पुढें जावें; पण आपण कोठें जात आहोंत ह्याचा त्यास पत्ता नसावा. कोठें जावयाचें आहे त्याचा अंधुक अंधुक आराखडा मनःपटलावर असावा पण तोहि अशा स्थितींत हळूहळू नष्ट होत जावा ! अगदीं हीच स्थिति मनुष्य-प्राण्याची या जगांत होत आली आहे. मनुष्य जगांत धडपडत आहे त्या मानानें त्याला यश येत आहे. परंतु तें यश, ती प्रगति एकंदर मानवी जीवनाकडे साकल्यानें पाहतां फोलच ठरत आहे. मानव रोज नवीन नवीन मार्ग काढीत आहे. परंतु कांहीं काळानें तो चुकीचा ठरतो. येथपर्यंत चालण्याचे श्रम फुकटच. कारण त्या कोंकराला असें खूप हिंडून शेवटीं जेथें जावयाचें त्याचा शोध किती लागला ? तें स्थान किती

जवळ आलें? शिवाय जेथें जावयाचें त्याचा सुगावा तरी काय लागला? म्हणजे एकंदरींत पाहतां त्या कोंकराला जसें खूप हिंडून शेवटीं जेथें जावयाचें त्याविषयीं पहिल्याइतकेंच अज्ञान तद्वतच मनुष्याचें होत आहे. मनुष्य धडपड खूप करीत आहे. त्यांत त्याची बुद्धिमत्ता प्रखरतेनें जाणवत आहे. त्याची शक्तीहि मनुष्येतर प्राण्यांना–नव्हे निसर्गाला सुद्धां हात दाखविण्यास कमी करीत नाहीं. इतकी ती प्रबळ होत आहे. आणि या सर्व झगड्यांतून सर्व जगांत आपलें श्रेष्ठत्व त्यानें दाखवून दिलें आहे. परंतु हें सर्व तौलनिक दृष्ट्या मानवेतर जगांत जे हीन दर्जाचे अनंत प्राणी आहेत त्यांच्यावरच मनुष्यानें मात केली आहे. मनुष्याच्या तोडीचा असा जगामध्यें मुळांतच एकहि प्राणि नव्हता. आणि जेव्हां अशी स्थिति फार पुरातन काळांत होती आणि याची त्यास जाणीव झाली त्याबरोबर त्यानें आपलें वैशिष्ट्य दाखविण्यास सुरुवातच केली. मनुष्याच्या तोडीला तोड अशी जगामध्यें सजीव शक्ति नाहीं. निर्जीव निसर्ग मात्र आहे. परंतु त्याच्याशीं मोठ्या धीरानें, शौर्यानें मनुष्य लढत आहे.

मानवी प्रयत्नास निश्चित ध्येय नाहीं–

मानवाचा झगडा कितीहि कौतुकास्पद असला, अभिमानास्पद असला आणि थोर पदवीस चढविणारा वाटला तरी त्या झगड्यांत एकसूत्रीपणा नाहीं. एक मूळ तत्त्वज्ञान नाहीं. परिस्थितीप्रमाणें ध्येयहि बदलत जातें. 'मागील अंकावरून पुढें चालू' असा एकसंधी ओघ ह्या झगड्याला आहे असें निश्चितपणें म्हणतां येत नाहीं. काल इतकी धडपड केली; त्याचें यश इतकें मिळालें; आज त्याच्यापुढें पाऊल; अशी स्थिति आहे असें दिसत नाहीं. झगड्यांत एकवाक्यता नाहीं; एक मार्ग नाहीं; एक वळण नाहीं; एक सूत्र नाहीं; आणि एक भावहि नाहीं. एखादा नायक आपल्या शौर्याच्या जोरावर पुढें चाल करून जातो; बाकीचे सैनिक त्याच्याकडे धांव घेत सुटतात; विजयाची अशा दिसते न दिसते तोंच दुसरा एकादा नायक मध्येंच येऊन नवीन ठिकाणीं नवीन अधारानें चाल करूं लागतो. कांहीं सैनिक त्याचे अनुयायी बनतात. परंतु अशा तऱ्हेनें एकंदर सैन्य दुभंगलें जाऊन पहिल्या नायकास जो आशावाद मिळतो तो नष्ट होऊन नवीन आलेल्या नायकाला त्याच्या पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. पहिला नायक परत मागें येतो. अशाच तऱ्हेनें अनेक नायक

निर्माण होऊन सैन्याचीं छकलें होतात. आणि अखेर एवढें गाजविलेलें शौर्य वायांच !

ध्येयहीन प्रयत्न निरर्थक आहे.–

केवळ प्रयत्नवाद हेंच जर यश म्हणावयाचें असेल आणि अयशस्वी पराकाष्ठेचा यत्न ह्यांतच जर साफल्य समजावयाचें असेल तर मनुष्यप्राण्यानें ध्येय गांठलें असेंच म्हणावयास पाहिजे. पण वस्तुस्थिति तर अगदीं उलट आहे ! एकाद्या निष्क्रिय प्राण्यास त्याला कार्यक्षम करण्याकरितां प्रयत्नवादाचीं स्तोत्रें गाऊन पराकाष्ठेचा यत्न यांतच ध्येय साठविलेलें आहे हा आशावाद म्हणून ठीक आहे. केवळ उत्तेजन देणारें तत्त्वज्ञान यापलिकडे त्याची वस्तुस्थितींत किंमत नाहीं. तो प्राणी सक्रिय होईपर्यंतच या तत्त्वाचें आयुष्य आहे. तीच त्याची सीमान्त रेषा. निष्क्रियाला सक्रिय करण्यापुरतेंच त्याला महत्त्व आहे. पण एकदां तो सक्रिय बनला म्हणजे त्याची मनोवृत्ति याहि वरच्या पातळींत जावयास पाहिजे आहे. एकदां प्रयत्न सुरू केल्यावर तो ध्येयानुरूप कसा होईल इकडेच लक्ष द्यावयास पाहिजे. ध्येयाची चाकोरी ओलांडून मोकाट मैदानांत सैरावैरा धांवत सुटलेल्या प्रयत्नवादाला अर्थ नाहीं. त्याला रिकाम्या न्हाव्याचा उपद्व्याप म्हणतां येईल. ध्येयामुळेंच प्रयत्नाला अस्तित्व आहे. सौभाग्यवतीला कुंकवाच्या टिळ्याचें जें महत्त्व तेंच प्रयत्नाला ध्येयाच्या टिळ्याचें महत्त्व आहे.

प्रयत्न अतोनात झाला असेल, त्या प्रयत्नांतून इतर उपफळें मिळालीं असतील, परंतु त्यांतच गुंगून जातां कामा नये. मुळांतील ध्येय किती नजीक आलें किंबहुना त्याचा सुगावा तरी किती लागला याचा विचार होणें अत्यावश्यक आहे. प्रयत्न वायां गेले म्हणतों तें ध्येयप्राप्तीच्या दृष्टीनें, खर्चीं गेलेल्या शक्तीच्या दृष्टीनें नव्हे.

प्रयत्न केवळ औत्सुक्योद्भव आहे.–

मनुष्यानें एवढे केलेले प्रयत्न त्या प्रमाणांत यश देत नाहींत किंबहुना माघार घेऊन दुसऱ्या बाजूनें हल्ला करावा लागतो याचें कारण मनुष्याला अजून ध्येय-बिंदूचें स्थान नेमकें कोठें आहे व त्यावर कोठून मारा करावयाचा ह्याचा पत्ता लागलेला नाहीं. एकादें लहान मूल चौकसबुद्धीनें उत्सुकतापूर्वक हजारों गोष्टींबद्दल माहिती विचारतें त्यामुळें त्याचें सामान्य व्यवहारज्ञान वाढूं शकतें पण

कोणत्याहि एका विद्येचा निष्ठापूर्वक, ध्येय ठेवून, सखोल अभ्यास त्याच्याकडून होत नाहीं. आणि शेवटीं एकहि विद्या तो हस्तगत करूं शकत नाहीं. तद्वतच मनुष्य-प्राण्याचें झालें आहे. निसर्गांतील अनेक गोष्टींविषयीं उत्सुकता निर्माण झाली आणि तिचेंच समाधान त्यानें करून घेतलें. हें करतां करतां त्यास कांहीं नवीन गोष्टी अचानक साध्य झाल्या एवढेंच. परंतु या सर्व निसर्गाचा गाभा कशांत आहे हें ओळखून त्या दृष्टीनें एकमार्गी सुसूत्र प्रयत्न झाले नाहींत.

वस्तुजातांतील सार अजून कळलें नाहीं.—

मारुतीनें मोत्यांच्या सरांतील प्रत्येक मणि फोडून पाहिला परंतु त्यांत त्याला कोठेंच राम आढळला नाहीं. त्याचे प्रयत्न फुकट गेले. कारण रामाचें अधिष्ठान कोठें आहे म्हणजेच त्या मण्याचें सार कोठें आहे हें त्यानें प्रथम ताडलें नव्हतें. मण्यांत वाटणारा राम शेवटीं त्याच्याच हृदयांत सांपडला. मनुष्यप्राणी मारुतीचीच चूक आजपर्यंत करीत आला आहे. त्यानें जगांतील प्रत्येक वस्तु उकलून, छेदून, निरखून पाहिली. वस्तूचें पंचेंद्रियांना ज्ञान होणार नाहीं इतके सूक्ष्म अणू छेदून पाहिले पण कांहीं नाहीं ! त्या वस्तूचें सार कशांत आहे हें त्यास अजून कळलें नाहीं. तें सार आर्यांच्या तत्त्वज्ञानानें मात्र ओळखलें.

## प्रगति, प्रयत्न आणि बदल

प्रगति म्हणजे काय ?—

'प्रगति' हा शब्द मी वापरीत नाहीं. परंतु प्रचारांत हाच शब्द आहे. प्रगति झाली असें म्हणणारे येथें चुकतात. अंतिम साध्य ( Goal ) असलेला, एकाच विशिष्ट मार्गानें जाणारा असा जो मनुष्यानें इच्छापुरःसर केलेला आणि सावकाशपणें सदोदित पुढें पुढें निश्चितपणें सरकणारा जो प्रयत्न त्या प्रयत्नाच्या पुरोगतीला प्रगति म्हणतां येईल. आजपर्यंतच्या जगाचा आढावा काढला तर जगामध्यें चाललेला कोणताहि प्रयत्न वरील सदरांत बसूं शकत नाहीं. हा मानवाचा प्रयत्न आहे पण तो त्यानेंच केलेला असें सर्व बाबतींत म्हणतां येणार नाहीं. बरेंचसें श्रेय निसर्गाला आणि काळालाच दिलें पाहिजे. बऱ्याचशा गोष्टी अशा आहेत कीं, केवळ निसर्गांत परिस्थिति तशा प्रकारची निर्माण झाली म्हणून मनुष्यास तशाच प्रकारें राहावें

लागेल. पुन्हा, मनुष्य हा सजीव आणि जाणता प्राणी असल्यानें निसर्ग नियमानुसार एक सृष्ट पदार्थ म्हणून त्याची कोणत्याहि परिस्थितींत वाढ होत राहणारच. एखाद्या लहान मुलास त्याचें नीट संगोपन न करतांहि सृष्टिनियमाप्रमाणें तें वाढत जाईल. यांत नवल नाहीं आणि त्याचें श्रेय त्याच्याकडे वा त्याच्या पालकाकडे जात नाहीं. परंतु या नैसर्गिक वाढींत त्या मुलाला संगोपन करून—नियमित आचार व विचार यांचा योग्य खुराक दिल्यास तें मूल कसें दिसेल ? ह्याचें श्रेय मात्र सर्वस्वीं मानवालाच देणें प्राप्त आहे. दुसरें असें कीं मानवाचें पुरातन काळापासून आजपर्यंत कोणतें एक ध्येय मानलें गेलें आहे ? एका युगांतील कार्याचा दुसऱ्या युगाच्या कार्याला पत्ता नाहीं. प्रत्येय युगांत प्रत्येक देश आपल्या स्वतःशीं निगडित असलेल्या नडींना महत्त्व देऊन ध्येय व त्यानुसार कार्यपद्धति ठरवीत असतो. शास्त्रज्ञ लोक जरा यांहून भिन्न असत. ते कार्यपद्धतीच्या आहारीं तितकेसे न जातां केवळ निसर्गाविषयीं वाटणारें कुतूहल त्यांच्या विद्येस कारणीभूत झालें. बहुधा सर्व शास्त्रज्ञ स्वतंत्र रीतीनें आपल्या वैयक्तिक औत्सुक्याचें समाधान विद्याभ्यास व संशोधन करून करीत असत. या बुद्धिमान लोकांच्या वैयक्तिक प्रयत्नांना इतरेजनांनीं कौतुक करून सामाजिक स्वरूप दिलें आहे.

दोन मानवी ध्येयें—

परंतु मानवाची आजपर्यंत एक-ध्येय अशी भावना नव्हती आणि नाहींहि ध्येयाचें दोन प्रकार करतां येतील. एक निसर्गाचें गूढ उकलणें आणि दुसरें मानवी जीवन सुखी करणें.

निसर्गाचें गूढ उकलण्याविषयीं कांहीं प्रयत्न झाला. परंतु शेवटीं हातीं कांहींच लागलें नाहीं. त्यांतून जो प्रयत्न झाला तो कुतूहलजन्य होता. सोद्दिष्ट, सध्येय नव्हता. ‘ ध्येय ’ म्हणतांना एकंदर मानवजातीच्या दृष्टीनें ‘ अंतिम-ध्येयच ’ अभिप्रेत आहे. लहान लहान तात्कालिक ध्येयें असतातच. त्यांवांचून विद्या पुढें जाणेंच शक्य नाहीं. प्रगति विद्येची झाली, मानवी जीविताची झाली असें त्यावरून म्हणतां येणार नाहीं.

प्रगति नव्हे, बदल.—

मानवी जीवन अधिक सुखी केलें गेलें; पण मानवाची नैतिक प्रगति झाली असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. बदल झाला आहे हें निश्चित. पण बदल म्हणजे प्रगति

नव्हे. जीवनसाधनें समृद्ध झालीं पण त्यामुळें जीवन समृद्ध झालें नाहीं. दोन ध्रुव हातांत हात घालण्याइतके जवळ आले पण दोन मानवी मनांतील दोन ध्रुवांचें अंतर आणि परकेपणा नाहींसा झाला नाहीं. क्षेत्रफळानें जगाची व्याप्ति वाढली आणि घरगुती व्यवहाराइतका निकटचा दाट व्यवहार होऊं लागला पण तेवढ्यानें जगाचें एक घरगुती जीवन झालें नाहीं. वाढत्या जीवनसाधनांसह मनुष्याचें निर्जीव वस्तू-वरील प्रेम वाढलें, परंतु मनुष्याचा मनुष्याविषयीं द्वेष कमी झाला नाहीं. राष्ट्रें उदयास येऊन आत्यंतिक राष्ट्रीय त्यागाचा पाया रोवला गेला पण त्यानें व्यक्तीव्यक्तींचा वैयक्तिक स्वार्थ नष्ट झाला नाहीं. अनेक विश्वव्यापी तत्त्वज्ञानांनीं डोकें वर काढलें पण विश्वव्यापी मनोवृत्ति आणि आचार ह्यांचा मागमूसहि दिसत नाहीं. बुद्धिमत्तेच्या बळावर साऱ्या ब्रह्मांडाची व्याप्ति वाढली पण वैयक्तिक खासगी मन संकुचितच राहिलें.

मनुष्य आणि मनुष्येतर—

मनुष्यानें हरएक प्रयत्न करून आपल्या रानटी जीवनांत पुष्कळच सुधारणा घडवून आणली ह्यांत शंका नाहीं. यांतच मानवानें मानवता राखली आहे. मुंग्या वारूळ सुंदर बांधतात पण लाखों वर्षांपूर्वी त्यांनीं जें वारूळ बांधलें त्यांत अजून कांहींच सुधारणा नाहीं. पक्षी आपलें घरटें अतिशय कुशलतेनें बांधतो पण त्यांत इतक्या वर्षांत त्यानें काय फरक केला आहे ? कोकिळेचा आवाज कर्णमधुर असतो पण इतर प्राण्यांप्रमाणें ओरडण्यापलिकडे तिनें आपल्या आवाजाचा काय उपयोग करून घेतला आहे ? हरीण बागडतें सुंदर, परंतु त्यांतून आपल्याला सुंदर नाच बसवितां येईल असें त्यास कधीं वाटलें नाहीं. सारांश, निसर्गानें एकदां जन्मतांना दिलेल्या साधनसामग्रीपलिकडे आपलें जीवन अधिक सुखकर करण्याची इच्छा व बुद्धि त्या प्राण्यांना होत नाहीं. ह्यांतच मनुष्य आणि मनुष्येतर ह्यांत भेद आहे. साधन चांगलें आहे कीं वाईट आहे यावर श्रेष्ठता ठरत नसून, आहे तेंच अधिक चांगलें कसें केलें यावर ठरत असतो. प्रथम मनुष्यापेक्षां पक्षीच सुंदर घरटें बांधीत परंतु मनुष्यानें बुद्धिमत्तेनें त्यांत सुधारणा करून सुंदर घरें बांधलीं. पक्षी जात्याच सुबक घरें बांधतात यांत पक्ष्यांना श्रेय नाहीं; तें निसर्गाला आहे. स्वतःच्या कर्तबगारीनें पुढें टाकलेलें पाऊलच स्वतःस श्रेय देणारें आहे. कच्चें मांस व नरभक्षण करण्यापासून तों उत्तम पक्वान्नें होईपर्यंत, पशूंचें चामडें व झाडांचीं सालें तशींच्या-तशींच लज्जारक्षणापुरतीं पांघरण्यास घेण्यापासून तों कलापूर्ण व भरपूर विविध

प्रकारच्या वस्त्रप्रावरणापर्यंत,झाडांच्या सावलींत वा गुहेच्या आधारानें उन्हाळा-पावसाळा काढण्यापासून तों उष्णतानिर्बंधित ( air conditioned ) भव्य प्रासादापर्यंत, आणि अन्नपाण्याकरितां रानोमाळ वणवण भटकण्यापासून तों सुसंघटित समाज करून शहरें वसविण्यापर्यंत मनुष्यानें आपल्या बुद्धिमत्तेनें आणि कर्तृत्वशक्तीनें एवढी सुधारणा घडवून आणली, आणि जीवनांत स्वारस्य निर्माण करून सृष्टींत आपलें वैशिष्टय जाणवून दिलें.

मानवाकडे जाणारें श्रेय-

अगदीं प्रथमावस्थेंतून सर्व जीवनावश्यक साधनें उपलब्ध करीपर्यंतचें हें श्रेय मनुष्य-प्राण्यासच द्यावयास हवें. निसर्गानें दिलेल्या मदतीचा योग्य उपयोग करून त्याच्या साहाय्यानें जीवनाचा गाडा सरळ मार्गाला लावला. हा केवळ जीवनाचा झगडा चालला होता. याच्यापुढील जीवनसाधनें वा इतर सुधारणा झाल्याशा वाटल्या त्यावरील झगड्याच्या अतीत क्षेत्रांत जन्म पावल्या. दैनंदिन जीवनाच्या व्यवहारांतील निगडित स्वरूपाच्या अडचणी भागूं लागल्या तेव्हां साहजिकच मनुष्याची बुद्धि व मन हीं व्यवहाराच्या बाहेरील वातावरणांत संचार करूं लागलीं. बुद्धीला सवड मिळतांच बाहेरील निसर्गातील गोष्टींविषयीं त्याच्या मनांत कुतूहल उत्पन्न झालें. त्या उत्सुक मनाचें समाधान करण्यांतूनच विद्यांचा जन्म झाला. त्या विद्यांचे प्रयोग करतां करतां कांहीं नवीन गोष्टी आढळून आल्या. ह्यांतच जीवनानाला सहाय्यभूत होणाऱ्या शास्त्रीय शोधांचे उगम आहेत आणि त्यांतूनच आधुनिक जीवनसाधनें वर आलीं. परंतु हीं जातां जातां सहज मिळालेलीं उपफळें होत. वाटेंत मिळालेल्या फुलांतच रमून न जातां तीं फुलें-(वास न घेतां)-विद्यामंदिरांतच पोंचविलीं पाहिजेत. ध्येय ( Destination ) तें मंदिर आहे.

प्रगतीची दिशाभूल-

आधुनिक युग संस्कृतीच्या कळसास पोंचलें आहे असें जें अभिमानानें आजचें जग सांगत आहे त्याचें कारण वाटेंत मिळालेलीं फुलें-साधनें. या साधन-फुलांनीं ह्या लोकांच्या म्हणण्याप्रमाणें जीवन सुखी केलें म्हणून, यामुळेंच हीं साधन-फुलें साध्य वाटलें. हें 'साध्य' गांठतांक्षणींच आपण प्रगत झाल्याचा लोकांना भ्रास होऊं लागला, संस्कृतीचें शिखर गांठलें, निसर्गावर मात केली, मानव हा प्राणि 'पूर्ण'

झाला, जगदारंभापासून आजपर्यंत कोणीं केलें नाहीं असें सुधारणेचें दिव्य आम्हीं करून दाखविलें असेंच वाटूं लागलें.

प्रगति कां नाहीं ?–

परंतु ही दिशाभूल होत आहे. संस्कृतीच्या मनोऱ्याचा मूळ पायाच चुकला. दुरून दिसणाऱ्या झाडाच्या शेंड्यालाच पर्वताचें शिखर म्हणूं लागलों. यांत्रिक सुधारणेनें जीवनांत फरक झाला. पहिल्या जीवनांत फरक झाला त्या आनंदाच्या भरांत ती सुधारणा भासूं लागली. परंतु असाच कांहीं काळ गेल्यावर ही सुधारणा नव्हे हें ज्याचें त्यालाच कळून चुकेल. यांत्रिक शोधांनीं मिळणारें सुख हें संकुचित, क्षणिक आणि तात्कालिक आहे. म्हणूनच तें डोळ्यांत भरतें व महत्त्वाचें वाटतें आणि तितकीच त्याची आवश्यकताहि जाणवते. पण ह्या निगडित स्वरूपाच्या सुखानें भारून जाणारें मन जरा बाजूस ठेविलें व सबंध जीवनाचा सर्व मानवांच्या दृष्टीनें साकल्यानें विहंगमावलोकनात्मक पोक्त विचार करून उंचावर उभे राहून दूरवर दृष्टि फेकली तर त्या दृष्टीला काय दिसेल ? एकंदरीनें मनुष्याच्या जीवनांत फरक झालेला दिसतो, परंतु तें सुधारलें असें म्हणतां येत नाहीं. कारण फार थोड्यांचें जीवन सुखी झालेलें आहे. सुखानें आपल्या सुकाणूची दिशा बदलली एवढेंच. प्रमाणांत फरक झालेला नाहीं. सूड उगविण्याच्या रीती बदलल्या, सुधारलेल्या मार्गांनीं चोऱ्या व दरोडे होऊं लागले, सत्ताधीश नवीन पद्धतीनें छळूं लागले, पैसा मिळविण्याचे धंदे नवीन आले, भोंदूपणाचे मार्ग भिन्न झाले, पण मुळांतील मानवी स्वभावांत फरक म्हणजे सुधारणा झाली नाहीं. स्वभावाविष्करणाचे मार्ग बदलले असतील पण स्वभाव बदलला नाहीं. रोगांवर नवीन नवीन उपाय निघाले असतील पण नवीन नवीन रोग निर्माण व्हावयाचें थांबलें नाहीं. संरक्षणाचीं साधनें सुधारलीं असतील, त्याबरोबरच संरक्ष्याचे शत्रूहि सुधारले. यांत्रिक साधनें वाढलीं पण त्याबरोबर जीवनांतील जीवन्तपणा जाऊन तेंहि यांत्रिक झालें. यांत्रिक शोध लावून शोध लावणारा एकटा शास्त्रज्ञच हुशार ठरला. पण तेवढ्यानें बाकीचें जग निर्बुद्ध केलें. इतरांनीं आपली बुद्धि शास्त्रज्ञाकडे गहाण टाकली. आधुनिक शोधांनीं व्यक्तीचें तात्कालिक सुख कांहीं अंशीं वाढलें पण समाज मात्र स्वसुखाला पारखा झाला !

एकंदरींत, जीवन पूर्ण सुखी करण्याच्या बाबतींत मनुष्य मागें पडला. पण विद्याकलांच्या बाबतींतहि तो पुढें गेला नाहीं. मानवाची गति एकसारखी चालू

आहे, स्तंभित नाहीं. हें खरें पण ती प्रगतीच म्हणतां येणार नाहीं. एका मोठ्या मैदानांत भरधांव घोड्यानें फेऱ्यावर फेऱ्या माराव्यात पण त्याची गति पुढें जाऊं नये तशीच मानवाची स्थिति आहे.

## आधुनिक पाश्चात्य भौतिक शास्त्रांच्या प्रगतीला मागें खेंचणारें प्राचीन भारतीय योगशास्त्र

बालरूप पाश्चात्य संस्कृति–

आमची प्रगति झाली, संस्कृतीच्या कळसास पोंचलों हें म्हणणें बहुंशीं पाश्चात्य लोकांचेंच आहे. त्यांच्या दृष्टीनें तें बरोबर असेल. पण तें युरोपपुरतेंच. युरोपची प्रगति झाली एवढेंच त्यांनीं म्हणावें. तें सुद्धां भौतिक शास्त्रापुरतेंच. जगाला गवसणी घालण्याचें भयंकर धारिष्ट्य त्यांनीं करूं नयें हें त्यांच्या हिताचें आहे. युरोपची प्रगति किंबहुना युरोपांत माणसें राहतात हें जगाला कळलें त्याला कांहीं फार शतकें होऊन गेलीं नाहींत. कित्येक शतकें ते रांगतच होते. नंतर हिंदुस्थानकडून पांगुळ-गाडा घेऊन त्याच्या साहाय्यानें ते थोडथोडे चालूं लागले. युरोप सध्यां बालवयांत आहे. त्याला अनुसरून त्याचा चाललेला अवखळपणा, अल्लडपणा भारतीय संस्कृतीनें पोक्तपणें पाहून त्याचें कौतुक करावें. आणि झालेल्या चुका पोटांत घ्याव्यात हें भारतीय संस्कृतीच्या मोठेपणाला साजेसेंच आहे.

दोन उंच शिखरें–

आज युरोपीय विद्या एका शिखरावर असेल तर पूर्वीं भारतीय विद्या दुसऱ्या शिखरावर होती. पण दोघांची उंची तितकीच. अधिक असेल तर कांकणभर भारतीयांचीच असेल. जगाच्या गूढत्वाचा पत्ता कोठें लागेल, मानवी जीवन साकल्यानें म्हणजे सामाजिक दृष्ट्या कसें सुखी होईल हें युरोपपेक्षां आणि युरोपच्या पूर्वीं किती तरी वर्षें आर्यऋषींनीं अध्यात्माच्या मार्गानें जाणलें होतें. आधुनिक युगांत अनेक शास्त्रांची वाढ झाली असेल, नवीन शास्त्रें निर्माण झालीं असतील पण भारतीयांच्या योगशास्त्रासारखें शास्त्र अजून त्यांच्या हाताला लागलें नाहीं !

योगशास्त्र मागें कां पडलें ?–

योगशास्त्र ही केवळ पोपटपंची नव्हे. त्यांत प्रत्यक्ष आचार आहे. म्हणून तें

मागें पडलें, त्याचा बाऊ वाटूं लागला. अर्थात् थोतांड बनून तें उपेक्षणीय होऊन गेलें. परंतु जो योगशास्त्राचा अभ्यास करील त्याला असें कळून येईल कीं योगशास्त्र हें थोतांड किंवा चेटूक, जादूटोणा नसून पदार्थविज्ञान, रसायन यांसारखेंच तें एक मानवी शास्त्र आहे. रसायनांतील गमतीदार प्रयोगांना आपण शास्त्रीय शोध म्हणूं शकतों, पदार्थविज्ञानांतील बहारदार शोधांवर आपली श्रद्धा बसूं शकते. मग योगशास्त्रावरील सिद्धान्त आपण थोतांड कसें म्हणतों ? कारण त्याचा कोणीं अभ्यासच केलेला नाहीं. अभ्यास केलेले आहेत ते या वादापासून अलिप्त राहतात.

योगशास्त्राचा पाया मानसिक शक्ति आहे.–

मानसिक शक्तीच्या आधारें योगाची सिद्धि मिळवावयाची असते. जगाचें खरें स्वरूप अन्तःसृष्टींत आहे. जगांतील प्रत्येक वस्तूचें सूक्ष्म तत्त्व एकच आहे. त्या एकापासूनच हीं निरनिराळीं रूपें होतात. समुद्र आणि त्याचा बिंदू यांचे जे संबंध तेच सूक्ष्मसृष्टि आणि जडवस्तु यांचे आहेत. ( राजयोग–स्वामी विवेकानंद ) 'पाणी या एकाच तत्त्वाचें समुद्र आणि त्याचा बिंदु झालेले असतात; पण वरून दिसणारे जड देह आणि रूप निराळें असतें. जगांतील प्रत्येक वस्तु जर अशी असेल आणि सूक्ष्म देह आणि जड देह यांचा संबंध जर इतका निकटचा असेल तर एका वस्तूचें सूक्ष्म रूप जाणलें असतां दुसऱ्या इतरांचें सूक्ष्म रूप कळण्यास काय अवघड आहे ? मानवी देहाचेंहि असेंच पृथक्करण करितां येईल. या देहांतहि सूक्ष्मरूप वास करीत आहे. त्याचें अवलोकन केलें म्हणजे सगळया सृष्टींत भरून असलेल्या सूक्ष्म रूपाचेंच आकलन आपणांस झालें म्हणजे सर्व सृष्टीचें गूढच आपल्या हातीं आलें. आपल्या देहांतील सूक्ष्म देहाचें ज्ञान करून घेण्यासाठीं मन हेंच एक साधन आहे. बाह्य वस्तूहि आपण शेवटीं मनानेंच जाणीत असतों. बाह्य वस्तूचा पहिला आघात आपल्या बाह्येंद्रियावर होतो. त्याचा प्रत्याघात त्याच्या ज्ञानतंतूच्या गोलकांवर होऊन ते गोलक मनाशीं संलग्न असतात. त्यामुळें मनाला तत्काळ ती बातमी लागते. पण मनाचें जर तिकडे लक्ष नसलें तर इंद्रियावर झालेला आघात तसाच मागें जातो. आणि आपल्याला त्याचें ज्ञान होत नाहीं. हा अनुभव आपणांस रोज व्यवहारांत येतच असतो. बाह्य वस्तूची जाणीव होण्याकरितां बाह्येंद्रियाची जरुरी आहे. तशी अन्तःसृष्टीची–सूक्ष्मरूपाची जाणीव व्हावयास आंतरेंद्रियाची एकाग्रता अवश्य आहे. मनाची एकाग्रता–केंद्रीकरण ह्या एकाच

आंतर-सृष्टीवर केलें म्हणजे त्यावर प्रखर प्रकाश पडतो व आपणास त्याचें ज्ञान होतें. हा केवळ केंद्रीकरणाचा प्रभाव आहे. सूर्याचे किरण एका जाड भिंगावर अतिशय केंद्रित केले म्हणजे भिंगाखालीं असलेल्या वस्तूवर त्याचा काय परिणाम होतो? विद्युच्छक्ति केंद्रित केल्यावर ती काय प्रभाव गाजवूं शकते? मनाच्या शक्तीचें केंद्रीकरण केल्यावर तें काय परिणाम करूं शकणार नाहीं? हा साधा निसर्ग-सिद्धान्त आहे. ज्याप्रमाणें आपल्या स्थूल देहांत दुसरा सूक्ष्म देह आहे त्याच-प्रमाणें दृश्य जगाच्या अंतर्गत असें सूक्ष्म व अदृश्य जग हें कारणरूप असून स्थूल वा अदृश्य जग हें कारणरूप आहे. त्याचप्रमाणें या जगांत दृश्यमान होणाऱ्या जड-वस्तूंच्या शक्तीच्या पाठीमागें सूक्ष्मशक्तीहि आहे व यांपैकीं सूक्ष्मशक्ति कारणरूप आणि जड अथवा दृश्यशक्ति कार्यरूप आहे.' (राजयोग–स्वामी विवेकानंद.) म्हणून सुक्ष्म–अदृश्य जगाचा निग्रह करतां आला म्हणजे जड व दृश्य जग ताब्यांत यावयास उशीर नाहीं.

भौतिक शास्त्रांचा उद्देश एक मूलतत्त्व शोधून काढण्याचाच आहे. भौतिक शास्त्रज्ञ जडाकडून सूक्ष्माकडे गेले पण योगशास्त्र्यांनीं एकदम आंतःसृष्टीलाच हात घालून सूक्ष्माचें ज्ञान करून घेतलें.

देहावरील जडेंद्रियें हीं खरीं कार्यकारी इंद्रियें नसून मेंदूंत असणारे गोलक (Centres) हींच खरीं इंद्रियें होत आणि हे गोलक व मेंदू एकाच पदार्थाचे तयार झालेले आहेत. हा सिद्धान्त आजच्या भौतिक शास्त्रज्ञांना जो सापडला तोच हजारों वर्षांपूर्वी आंतःसृष्टीचा अभ्यास करून सांख्यशास्त्र्यांनीं लावून ठेविला आहे.

मानसिक शक्तीचा अभ्यास–

असो. एकंदरींत सर्व विश्वाच्या गाभ्याची किल्ली आपल्या मनांत आहे हें तत्व आपण ओळखलें. किल्ली चालूं करण्यास म्हणजे मन तत्कार्यक्षम करण्यास मनाला विशिष्ट प्रकारांनीं वळविलें पाहिजे. त्याकरितां खालील आठ प्रकाराचे अभ्यास योगांत सांगितले आहेत. यम–अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह म्हणजे कोणाकडून कांहीं देणगी न घेणें, नियम–सुचित्ता, तृप्ति, मनोनिग्रह, अभ्यास आणि स्वकृत ईशार्पण करणें, आसन–विशेष रीतीनें हस्तपादादि अवयव निरोधून बसण्याची पद्धति. प्राणायाम–प्राणवायूंचे नियम. प्रत्याहार–इंद्रियनिवृत्ति. म्हणजे बाह्य जगा-

पासून नेत्रकर्णादि इंद्रियें परत फिरवणें. धारणा-एकाच जागीं मनाची स्थापना करणें. ध्यान–चिंतन करणें. समाधि–बाह्य जगाची पूर्ण विस्मृति.

मनाची केंद्रीकरण शक्ति वाढविण्यासाठीं मनाला बंधनें घालून मनाचे धर्म आपल्या ताब्यांत ठेवणें अवश्य आहे. याकरितां यम–नियमांचा अभ्यास सांगितला आहे. मन कमविणें हा यांत उद्देश आहे.

आसन–मनाची एकाग्रता साधण्यासाठीं बसण्याची पद्धति सोईस्कर पाहिजे. ज्यानें त्यानें आपल्याला रुचेल त्याप्रमाणें बैठक ठरवावी. मात्र यासंबंधीं खालील मूलतत्त्वें लक्षांत ठेवावींत. योगाच्या अभ्यासास सुरवात केली म्हणजे आपणांस असा अनुभव येईल कीं आपल्या शरीरांत एक प्रकारची घडामोड सारखी सुरू आहे. ज्ञानतंतू आपलें चैतन्यवाहक कार्य करितांना एक गोलक सोडून दुसऱ्यांत व तेथून तिसऱ्यांत प्रवास करीत असल्याचें आढळून येईल. शरीरावर निरनिराळ्या जागीं कंप सुटल्याचा प्रत्यय येईल. हे कंप विशेषतः पाठीच्या कण्यांतून उत्पन्न होत असतात. यासाठीं पाठीचा कणा सरळ व ताठ पाहिजे. छाति, मान व मस्तक हीं सरळ रेषेंत राहतील अशी योजना केली पाहिजे. कमरेच्या वरील भागाचें सारें वजन फांसळ्यावर राहील अशा रीतीनें ताठ बसलें म्हणजे पाठीचा कणा सरळ राहून कोणताही त्रास न होतां बराच वेळ सहज बसतां येईल.

मनःशक्तीचा अनुभव–

अशा तऱ्हेनें कांहीं दिवस अभ्यास केला म्हणजे आपल्याला खालील अनुभव यावयास लागतील. कांहीं महिन्यानंतर दुसऱ्याच्या मनांतील विचार आपणांस कळूं शकतील. एकतानता लावली तर लांबवर चाललेलीं बोलणीं स्पष्टपणें ऐकूं येऊं लागतील. केवळ मानसिक चिंतनानें मन नासाग्रावर लावलें असतां प्रत्यक्ष सृष्टींतील फुलावांचून वा सुवासिक पदार्थावांचून अनेक प्रकारचे सुवास येऊं लागतील. जड सृष्टि ही सूक्ष्मसृष्टीचें केवळ दृश्य वा स्पष्ट स्वरूप आहे या सिद्धांताची ही पहिली प्रतिति आहे. (राजयोग–स्वामी विवेकानंद)

सूक्ष्मज्ञानाचें साधन प्राणायाम–

प्राणायाम म्हणजे श्वासोच्छ्वासाचें नियमन करणें. मनाचें नियमन आणि श्वासोच्छ्वासाचें नियमन यांचा फार निकटचा संबंध आहे. श्वासोच्छ्वास हें चालक चक्र

असून इतर इंद्रियांची गति त्यावर अवलंबून आहे. श्वासोच्छ्वासाचें नियमन केलें म्हणजे इतर इंद्रियेंहि आपण होऊन नियमबद्ध होतात. श्वासोच्छ्वासानें ज्ञानतंतू आपल्या ताब्यांत येतील. ज्ञानतंतूंमुळें विचारावर अधिकार येईल. विचार स्वाधीन झाल्यावर प्राण हस्तगत होणें कठीण नाहीं. प्राण हे अत्यंत सूक्ष्म असून श्वासोच्छ्वास त्याचें प्रत्यक्ष वा जड रूप आहे. श्वासोच्छ्वासानें प्राणवायू शरीरांतील पेशीपेशीला मिळूं शकतो. त्यामुळेंच पेशी चेतनामय होते. श्वासोच्छ्वास नियमित होऊन प्रमाणांत मिळूं लागला तर ज्ञानतंतूंना चेतना विशेष प्रकारची मिळेल यांत संशय नाहीं. ही शक्ति प्राप्त झाली म्हणजे सूक्ष्माचें ज्ञान होतें.

अध्यात्म व आधिभौतिक शास्त्रांचा शेवटीं सिद्धान्त एकच !–

'यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यद् ज्ञातव्यमवशिष्यते ।' असें काय आहे हा प्रश्न प्रथम श्रुतींनीं उपस्थित केला. जें एक जाणलें असतां सर्व कांहीं जाणलें जातें तें एक शोधून काढण्याच्या खटपटीस सर्व आर्यशास्त्री लागले. जगांतील अनंत वस्तूंचें ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचें म्हटलें तर तें सर्वथैव अशक्य आहे. प्रत्येक वस्तूचें ज्ञान क्रमशः प्राप्त करून घेणें शक्य नाहीं. अनंतत्वानें दिसणाऱ्या विश्वाच्या मागें एकत्व आहे. जगांतील दृश्यमान होणाऱ्या शक्तीचे अनेक प्रकार जेथें एकवटून एकजीव होतात ती मूलशक्ति–प्राण–ती आपणांस हस्तगत केली पाहिजे. आधुनिक भौतिक शास्त्रज्ञ जडाचा पृथक्करणात्मक अभ्यास करतां करतां शेवटीं सर्व विश्वांत भरलेल्या सूक्ष्म तरंगावरच येऊं पाहतात. प्रो. एडिंग्टनहि असेंच प्रतिपादन करतात. "We shall conceive each primordial element as a vibratory ebb and flow of an underlying energy, or activity." ( page 53 to 56–Science and the Modern World—by A. N. Whitehead ). पण हें हिंदु तत्त्वज्ञानाला नवीन नाहीं. " ...आकाशतत्त्वावरील हे सूक्ष्म तरंग पाहतां येण्याइतकी दिव्य दृष्टि आपणांस प्राप्त झाली तर विश्वांतील प्रत्येक पदार्थ केवळ सूक्ष्म तरंगरूप आहे असें आपल्या प्रत्येक अनुभवास येईल. " (राजयोग पृ. ५०–स्वामी विवेकानंद) भौतिकशास्त्राच्या योगानें हे तरंग ओळखतां येतील. पण त्यावरील ताबा मिळवितां येणार नाहीं. तो ताबा प्राणायामानेंच मिळेल. प्राणांवर सत्ता चालूं लागली म्हणजे आपल्या हृदयांतील बलवान प्राणाचे तरंग दुसऱ्या आजूबाजूच्या हृदयांत प्रवेश करून त्यावर परिणाम करूं शकतात.

## प्राणशक्ति

### नियमित श्वासोच्छ्वासानें शरीरांत विद्युत् प्रवाह–

परमाणूंची गति एकाच दिशेनें होऊं लागली तर तेथें विद्युत् निर्माण होते. लोखंडाच्या परमाणूंची दिशा सारखी केल्यास त्या लोखंडास लोहचुंबकाची शक्ति निर्माण होते. खोलींतील वातावरणाच्या परमाणूंची गति एकाच दिशेनें केली तर ती खोली एक विद्युत्पादक यंत्र बनून जाईल. श्वासोच्छ्वासाच्या क्रियेचें नियमन करणारा गोलक (centre) स्पर्शवाहक आणि आज्ञावाहक तंतूचेंहि नियमन करीत असतो. श्वासोच्छ्वास नियमित अंतरानें करूं लागलों म्हणजे शरीरांतील परमाणूंस एकाच दिशेनें गति सुरू झाली म्हणजे शरीरांत विद्युत् प्रवाह सुरू होतो. हा विजेचा प्रवाह ज्ञानतंतूवर वाहत असल्यामुळें त्यांत स्पर्शवाहक आणि आज्ञावाहक असे भिन्न गुणधर्म निर्माण होतात. मृत शरीरांतील ज्ञानतंतु काढून त्यावर विजेचा प्रवाह सुरू केला तर त्याच्या दोन टोकांत परस्परविरुद्ध दोन गुणधर्म निर्माण होतात हें इंद्रियविज्ञानशास्त्रानें सिद्ध केलें आहे. देहांत जीव असतां त्यांत परस्पर गुणधर्मांचे ज्ञानतंतू कोठून आले ? यावरून नियमित श्वासोच्छ्वासानें परमाणूंची सारखी गति झाल्यामुळें आपलें शरीर हें एक विद्युत्पादक यंत्र (battery) तयार होतें असें सिद्ध होतें. श्वासोच्छ्वासाच्या नियमनानें देहांतील परमाणूंस समांतर गति प्राप्त होऊन मेंदूंतील त्यांच्या गोलकांवर आपणांस ताबा मिळवितां येतो व श्वासोच्छ्वास गोलकाच्या (Respiratory centre) साह्यानें इतर गोलक ताब्यांत आणण्यास कठीण जाणार नाहींत.

या सर्व गोलकांचें प्राणायामानें नियमन झालें म्हणजे मूलाधार चक्रांतील (sacral plexus) निद्रित असलेली कुंडलिनी नांवाची शक्ति जागृत होऊं लागते. कुंडलिनी जागृत झाली म्हणजे ती सुषुम्ना नांवाच्या पोकळींत प्रवेश करते. यालाच चित्ताकाश म्हणतात. येथून ती पुढें मेंदूत प्रवेश करते. याला चिदाकाश म्हणतात. येथें मनाचें मनपण नष्ट होऊन तें कल्पनेचा त्याग करतें. जड विजेसंबंधीं जें ज्ञान आजमितीस आहे तें या योगज्ञानाशीं ताडून पाहतां बरेंच कोतें पडतें. विद्युत्प्रवाह इकडून तिकडे पाठविण्यास आपणांस तारेची जरूरी लागते. पण योगी हें काम हजार वर्षांपूर्वींपासून तारेशिवाय करीत आहे. विद्युत्प्रवाहाच्या गतीला तारेची आवश्यकता आहे असें नाहीं.

जागृत कुंडलिनी–

कुंडलिनी जों जों वर जाऊं लागते तों तों एकामागून एक सर्व गोलक तिच्या प्रचंड आघातानें खडबडून जागे होतात. हा परिणाम कल्पनातीत आहे. इंद्रियद्वारा होणाऱ्या आघाताची कल्पना कितीहि विशाल केली तरी हा परिणाम जाणणें तिच्या आटोक्यांत येणार नाहीं. सर्व आघात व प्रत्याघात यांची वासलात जेथून लागते त्या मध्यवर्ती ठिकाणांत म्हणजे मेंदूंतहि कुंडलिनी शक्ति जाऊन पोंचली म्हणजे तिच्या आघातास सर्व मेंदूंतून प्रत्याघात होतो व त्यावेळीं ज्ञानरवि मध्यान्हीं आल्यामुळें सर्वत्र प्रकाशच प्रकाश होऊन जातो. 'कोऽहम्' म्हणून भटकणारा योगी आतां 'सोऽहम्' म्हणून शान्ति घेतो. सर्व सूक्ष्म आणि जड विश्वाचें त्याला आकलन होऊं लागतें.

योग्याचें कार्यक्षेत्र आणि सामान्य जनतेचें ध्येय.–

याप्रमाणें हें योगशास्त्र हजारों वर्षांपूर्वी आर्य तत्त्वज्ञानानें शोधून काढलें. प्रत्यक्ष आचार शोधून त्याची सिद्धि मिळविली. विश्वाचें गूढ उकलून पाहिलें. स्वतःबरोबर समाजालाहि वळण देऊन समाजाची सामान्य उंची वाढविली. योगशास्त्राचीं कडक तत्त्वें, नियम व आचार हे निवृत्तीपर योग्यांसाठीं असले तरी तेंच ध्येय म्हणून अर्थात् प्रत्यक्ष आचारांत त्याचे सैल नियम हे सामान्य व्यक्तींसाठीं आहेत. सात्त्विक वृत्ति, सत्य, अहिंसा, श्रद्धा इ. गुण हे योग्यांच्या फार खालच्या पायऱ्या आहेत. पण त्या सामान्य लोकांकरितांच आहेत आणि त्याप्रमाणें हिंदु त्यांचें पालन करीत आले म्हणून जगांतील कोणत्याहि समाजापेक्षां हिंदुसमाज मूळांत वृत्तीनें धर्मशील, सत्त्वशील, सहिष्णु आहे. जगांतील कोणत्याहि समाजापेक्षां हिंदुसमाजांत संत आणि थोर व्यक्ति अधिक आणि अधिक योग्यतेचे होऊन गेले. दिवसानुदिवस हिंदु मनावरील संस्कृतीची पकड सैल होत चालली आहे त्यामुळें साधुसंतांचें अधिकाधिक प्रमाण पुढेंहि असेंच राहील असें म्हणण्यास मन एकदम धजत नाहीं.

## *पाश्चात्यांच्या शास्त्रीय प्रगतींत समाजाचें अस्वास्थ्य तर भारतीयांच्या विद्येंत समाजस्वास्थ्य.*

विद्येंत वाढ झाली पण समाजांतील अस्वास्थ्य कायम आहे.–

या दिव्य आणि अद्वितीय शास्त्राचा मागमूसहि पाश्चात्यांना आजपर्यंत नव्हता !

तथापि योगशास्त्र हें प्राचीन हिंदुशास्त्रांतील अनेक अंगांपैकीं एक अंग झालें. याशिवाय अशीं कितीतरी अनेक शास्त्रें आहेत कीं ज्याबद्दल भारतीयांना अभिमान वाटावा आणि पाश्चात्यांना ‘ विसाव्या शतकांत जगाची प्रगति झाली ’ असे शब्द केव्हांहि उच्चारतां येऊं नयेत. आधुनिक युगांत पाश्चात्यांची प्रगति त्यांच्या दृष्टीनें कितीहि झाली असली तरीसुद्धां भारतीयांशीं तुलना केली असतां तिचें कौतुक करावें असें कोणास वाटणार नाहीं. युरोपचा इतिहास ज्या काळापासून सुरू झाला तेव्हांपासून आतांपर्यंत झालेली प्रगति त्या मानानें कांहींच नव्हे. गेल्या शें–पन्नास वर्षांतच प्रगतीची गति वेगांतच दिसते. पण ही सुद्धां एकांगी आहे. विद्या वाढली यांत संशय नाहीं. पण जीवनाची व्यापकता वाढली नाहीं. वैयक्तिक शोध लागले पण समाजजीवन नैतिक दृष्ट्या सुखी व स्वास्थ्यपूर्ण झालें नाहीं. वैयक्तिक तात्कालिक सुखसाधनें वाढणें याचा अर्थ समाज सुखी झाला असा होत नाहीं. समाजांतील कोडीं अद्यापिही सुटूं शकलीं नाहींत. नवीन यांत्रिक व सामाजिक सुधारणेबरोबर (?) नवीन सामाजिक प्रश्न उपस्थित झाले. समाजस्वास्थ्याचीं तत्त्वें अजून मूळ धरूं शकत नाहींत. कोणतेंहि सामाजिक तत्त्वज्ञान स्थिरावत नाहीं. प्रतिष्ठितांचा भोंदूपणा नष्ट होत नाहीं. चोऱ्यामाऱ्यांचे सभ्य प्रकार फोंफावतच आहेत. पैसा आहे, सुशिक्षितपणा आहे, विद्या आहे, यांत्रिक सुखसाधनें आहेत परंतु समाजस्वास्थ्य आहे असें आधुनिक संस्कृतीच्या कैवाऱ्यांना तरी विनधोकपणें म्हणतां येईल काय ?

प्राचीन भारतीय विद्या–

हजारों वर्षांपूर्वी जी भारतीय संस्कृति प्रगत झालेली होती तिची वाढ किती शतकांतील होती ? आर्यांचा इतिहास जगास प्रथम माहीत झाला त्याच प्रथम काळांत ऋग्वेदासारखा अद्वितीय ग्रंथ लिहिला गेला ! ऋग्वेदासारखा अजून एकहि ग्रंथ जगांत झाला नाहीं आणि पुढेंहि होईल कीं नाहीं याची शंकाच आहे. ज्या काळांत आर्यांनीं आपली पहिली वसाहत हिंदुस्थानांत केली म्हणजे ज्यावेळीं इतर देश रानटी अवस्थेंत होते त्याच वेळीं आर्यांना कपडे विणणें, शेती करणें, गुरें पाळणें व इतर जीवनावश्यक गोष्टी माहीत होत्या. ऋग्वेदानंतर दिव्यामृतासारखे उपनिषद् ग्रंथ लगेच पुढील काळांत अवतरले ! ऋग्वेद व उपनिषदांवरील टीका प्रसिद्ध झाल्या. सर्वांत आश्चर्य म्हणजे ह्या ग्रंथलेखनाच्या व तात्त्विक चर्चेच्या गहन विषयांत गार्गी, मैत्रेयी यांसारख्या स्त्रियांनींहि भाग घेतला

होता. या स्त्रियांवरून त्या काळचा स्त्रीसमाज कळून येण्यासारखा आहे. हा काळ ख्रिस्तापूर्वी सुमारें दोन–तीन हजार वर्षांपूर्वीचा तरी असावा. याच काळांत पाणिनीचें व्याकरण, वैद्यकी चरकसंहिता, गणित, ज्योतिष, तत्त्वज्ञान, ललितवाङ्मय इत्यादि विद्या आणि इतर कला भरभराटीस आल्या.

प्राचीन भारतीय विद्येचें मातृत्व–

विद्येचें पुनरुज्जीवन १६ व्या शतकांत होऊन ग्रीसमधील प्राचीन विद्या युरोपांत गेल्या व त्याच पुढें फोफावल्या. ग्रीसला युरोपच्या संस्कृतीचा जनक म्हणतात तसें असेल तर भरतखंड पितामह म्हटला पाहिजे. कारण ग्रीसच्या संस्कृतीचा उगम बव्हंशीं भरत खंडांतून झालेला आहे.

युरोपमध्यें वैद्यकाला प्रथमच शास्त्रीय स्वरूप देणाऱ्या हिपॉक्रेटिसला युरोपांत 'father of Medicine' म्हणतात. परंतु त्याचा Materia Medica त्यानें हिंदुस्थानांतूनच घेतलेला होता. "It is to the Hindoos", says Dr. Wise, "we owe the first system of medicine."—Dr. Royles' essay.

रोमनकॅथॉलिक चर्च, त्याची धर्मसंस्था आणि संस्कार यांचें बौद्धांशीं बरेंच साम्य आहे. बुद्ध हा ख्रिस्त पूर्व होता आणि ख्रिस्ती मिशनरी हिंदुस्थान व तिबेट यांतून प्रवास करून गेलेले होते. येशू ज्या पंथांत होता त्याचे कांहीं लोक हिंदुस्थानांत येऊन हिंदु तत्त्वज्ञान शिकून गेले. ( गीतारहस्य लो. टिळक )

"The Hindoos evolved laws and services and systems of religion from their own ideas; the Greeks travelled and learnt, and soon carried their civilisation and arts to a high state of perfection." ( History of Ancient India—Ramesh C. Dutta page 455 ).

ग्रीक विद्या व कला ह्यांचें मूळ हिंदुस्थानांत आहे. ग्रीकांनीं त्यांतूनच पुढें वाढ केली. आधुनिक युरोपीय संस्कृति ग्रीसनें फैलावली पण तिचा उगम भारतीय संस्कृतींत आहे.

"The Greeks were an active people, and were by their very position fitted to spread early civilisation all

around them ; they founded Greek colonies and spread Greek culture over southern Europe and Western asia...... much of this culture originated elsewhere. The Hindoos were passive and Home loving, thoughtful contemplative, and were peculiarly fitted to develop great ideas, to think out new discoveries, and to invent new sciences and departments of knowledge." ( R. C. Datta page 457 ).

सुमारें बावीस शतकांमागें अलेक्झांडर यास आपल्या पदरीं भारतीय वैद्य ठेवणें भाग पडलें होतें. हिंदूंना रसायनशास्त्र परकें नव्हतें. ते रासायनिक क्रिया उत्तम प्रकारें करूं शकत. Rock salt, Borax, Salt petre and Sulphate of Soda ते तयार करीत होते. Alum चा उपयोग माहीत असून तें कच्छ मधून पैदा करीत. Sal ammonia हि माहीत होता. अलकली आणि ॲसिड हिंदू तयार करीत असत. पुढें तें अरबांनीं शिकून घेतलें. म्यूरिऍटिक ॲसिड हिंदूंची तयार करण्याची पद्धति डॉ. रॉइलनें आपल्या निबंधांत दिली आहे. ( Dr. Royle's Essay page 43 ) Oxides of copper, iron, tin, zinc and lead; sulphurates of iron, copper, antimony, mercury, arsenic ; sulphates of copper, zinc, iron ; di-acetate of copper and carbonates of lead and iron हीं सर्व रसायनें हिंदूंच्या परिचयाचीं होतीं. "Though the ancient Greeks and Romans used many metallic substances as external applications, it is generally supposed that the Arabs were first to prescribe them internally. ......—But in the works of Charaka, Sushrut, to which, as has been proved, the earliest of the Arabs had access, we find numerous metallic substances directed to be given internally."

( Dr. Royle's Essay page 45. )

कणाद हा वैज्ञानिकविद्येचा ऋषि आहे. त्याचा वैशेषिक दर्शन हा पदार्थविज्ञानावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. विसाव्या शतकांत युरोपनें शोधलेली Atomic Theory ख्रिस्तापूर्वी सुमारें सात आठ शतकें कणादानें त्याच्या कल्पनेप्रमाणें विशद केलेली होती.

ध्वनि ही हवा नसून आकाशतत्त्वावर घडणारा कांहीं विशिष्ट परिणाम आहे हें कणाद् आणि कपिल यांना माहीत होतें.

भारतीयांची राज्यपद्धति आणि समाजस्वास्थ्य मेग्यास्थेनीसनें आपल्या प्रवासवर्णनांत केलेल्या वर्णनावरून चांगली प्रत्ययास येते. खालील उताऱ्यांत दिलेल्या लहान सहान गोष्टींवरूनच तत्कालीन समाजस्वास्थ्य आणि संस्कृतीची उच्चता कळणार आहे. समाजस्वास्थ्य हें वैयक्तिक आणि तात्कालिक सुखाहून निराळें आहे. व्यक्तीला सुख मिळालें कीं समाज सुखी होतोच असें नाहीं. किंबहुना व्यक्ति–सुख हें पुष्कळ वेळां समाजसुखाच्या आड येतें. आधुनिक युरोपांत व्यक्तिसुख कांहीं प्रमाणांत वाढलेलें असेल पण समाजसुख वाढलें आहे असें सांगतां येणार नाहीं. संस्कृतीची उच्चता समाजसुखावरच आधारावयाची असते.

"They live happily even though being simple in their manners and frugal. They never drink wine except at sacrifices. Their beverage is a liquor composed from rice instead of Barley, and their food principally a rice pottage. The simplicity of their laws and their contrasts is proved by the fact that they seldom go to law. They have no suits about pledges and deposits nor do they require either seals or witnesses but make their deposits and confide in each other. Their houses and property they generally leave unguarded. These things indicate that they possess sober sense. ...... Truth and virtue they hold alike in esteem. Hence they accord no special privileges to the old unless they possess superior wisdom. ...... They did not even use aliens as slaves, and much less a countryman of their own."

—MEGASTHENES.

हाच मेगॅस्थेनीस जगांत पुन्हां अवतरला आणि जगभर प्रवास करून त्यानें तें वर्णन लिहिलें तर त्याला याच उताऱ्यांत फक्त उलट अर्थाचे शब्द वापरावे लागतील. ह्यांतच दोन संस्कृतींतील अंतर स्पष्ट होत आहे.

वरील सर्व उताऱ्यांवरून व दाखल्यांवरून असें दिसतें कीं, आजच्या जगाच्या विद्या व कला यांचें मूळ भारतीय संस्कृतींत आहे. या दृष्टीनें भरतभूमि ही आधुनिक

शास्त्रांची जननी आहे. पुरातनतत्त्वामुळेंहि भारतीय संस्कृतीला फार महत्त्व आहे. परंतु हें पाश्चात्यांना मान्य करितांना त्यांची जीभ जरा जड होते. इतक्या महत्त्वाची, उच्च आणि प्राचीन ह्यामुळें जगताची जननी असलेली जगांत दुसरी संस्कृति नाहीं. परंतु पाश्चात्य इतिहासांतून त्या भारतीय संस्कृतीचा ओझरता उल्लेखच मात्र केलेला आढळतो!

## विद्येंत आम्हीं मागें नाहीं, आमचा तत्त्वशोधनाचा मार्ग भिन्न आहे.—

आतांपर्यंत आपण प्राचीन भारतीय संस्कृतीचें विहंगमावलोकन केलें त्यांतून एक गोष्ट दृष्टींत आल्यावांचून राहत नाहीं. आधुनिक शास्त्रें हीं जास्त प्रायोगिक आहेत. मानसशास्त्रासारखें वस्तुतः केवळ तात्त्विक स्वरूपाचें शास्त्रहि प्रायोगिक होऊं पाहत आहे. याच्या उलट प्राचीन शास्त्रें हीं तात्त्विक जास्त. कणादाचें वैशेषिक दर्शन प्रायोगिकापेक्षां तात्त्विकच आहे. आमच्याकडे शास्त्र व विद्या यांत प्रगति उत्तम झालेली होती. लोक बुद्धिमान होते. असें असूनहि आधुनिक व प्राचीन शास्त्रज्ञान तात्त्विक व प्रायोगिक हा भेद जाणवतो! या भेदाचें कारण दोन संस्कृतींच्या भिन्नतेंत आहे. भारतीय संस्कृति आत्मनिष्ठ ( subjective ) तर युरोपीय संस्कृति वस्तुनिष्ठ ( objective ) त्यामुळें भारतीय शास्त्रज्ञाची मदार स्वतःच्या बुद्धिमत्तेंतून निघणाऱ्या तर्कशुद्ध विचारसरणीवर तर युरोपीय शास्त्रज्ञ वस्तूच्या अनुभूतीवर विश्वास ठेवणारा. आलेल्या अनुभूतीवर त्याची तत्त्वप्रणाली तयार होत जाते. याशिवाय दुसरा एक महत्त्वाचा भेद आहे. मागें सांगितल्याप्रमाणें भारतीय शास्त्रज्ञ सूक्ष्मांतून मूलतत्त्वाकडे जातात तर युरोपीय शास्त्रज्ञ जडाकडून सूक्ष्मांत जाऊं पाहतात. भारतीय शास्त्रज्ञ जड गौण समजतात तर युरोपीय जडावरच शास्त्रांचा पाया उभारतात. या कारणांमुळेंच आमच्याकडे भौतिकशास्त्रांचा अभ्यास होऊनहि भौतिक साधनें सुधारलीं नाहींत व भौतिक जीवनांत आम्हीं मागें पडल्यासारखें वाटतें. विद्येच्या आभ्यासाचे मार्ग भिन्न त्यामुळें व्यावहारिक जीवनांतहि फार अंतर पडलें. हा दोन जीवनांतला भेदच युरोपीय संस्कृतीचा अकारण डिंडिमा वाजण्यास कारणीभूत होत आहे. परंतु त्यामुळें आम्हीं अज्ञानांधकारांत गढून गेलों आहोंत असा अर्थ होत नाहीं. युरोपीयांचा हा ‘जडमार्ग’च सर्वश्रेष्ठ असें सिद्ध झालेलें नाहीं. आणि तें होऊंहि शकत नाहीं. किंबहुना उलट मात्र सिद्ध होण्याची वेळ येत आहे असें दिसतें. विद्येच्या जडमार्गानें समाजांत जड

वृत्ति उत्पन्न होते. त्याला अनुकूल अशीं जड भौतिक साधनेंहि नवीन नवीन उपलब्ध होत आहेत. त्यांचा अनिष्ट परिणाम जगावर किती मानवसंहारक व संस्कृति विनाशक होत आहे हें निराळें सांगणें नकोच. प्राचीन भारतीयांच्या विद्येच्या 'सूक्ष्ममार्गा'नें विद्येंत प्रगति होत नाहीं असें कोणाहि युरोपीयाला म्हणतां येणार नाहीं शिवाय वर दर्शविल्याप्रमाणें समाजस्वास्थ लाभण्यास मदत होते. विद्येच्या 'जडमार्गा'नें सहज लाभलेलीं भौतिक सुख व संहारक साधनें म्हणजे संस्कृतीच्या प्रगतीचें एकमेव द्योतक नव्हे. वास्तविक विद्येचा 'जड मार्ग' 'स्थूल' आहे. जडमार्ग्यांना' 'सूक्ष्मांत' प्रवेश करण्याचें सामर्थ्य नाहीं. हें 'सूक्ष्म' समजणें महाकठीण काम आहे. मग तें समजून त्याकडून मूलतत्त्वाकडे जाणें तर त्याहून दुरापास्त! अर्थात 'सूक्ष्मार्गी'च अधिक श्रेष्ठ ठरतात. हें श्रेष्ठत्व आतां युरोपीयन शास्त्रज्ञांना समजूं लागलें आहे असें दिसतें. किंबहुना 'जड मार्ग' हा मर्यादित असून त्याची मर्यादा आतां संपुष्टांत आलेली दिसते. कारण आधुनिक युरोपांत जों जों शास्त्रांत प्रगति होत आहे तों तों त्यांतील प्रायोगिकता कमी कमी होऊन तीं तात्त्विक बनत जात आहे. आणि कांहीं वर्षांनीं असाहि एक काळ येईल कीं, त्यावेळीं प्रयोग आणि प्रायोगिक साधनांची आवश्यकता नष्ट होऊन तीं शास्त्रें अधिक सूक्ष्म झालेलीं आहेत. ही सूक्ष्मता हळूहळू अधिकाधिक येत आहे. याचा अर्थ शास्त्रज्ञाचें लक्ष्य पूर्वीं स्थूल वस्तु असे. तिची छाननी करतां करतां शास्त्र इतकें पुढें गेलें कीं त्या ढोबळ दिसणाऱ्या वस्तूच्या अत्यंत सूक्ष्म कणांत शास्त्रज्ञ प्रवेश करूं लागला. त्याच्या अफाट बुद्धीला तें अत्यंत सूक्ष्म स्थानहि पुरेनासें होईना. तेव्हां तो कण फोडून त्यांतून दोन विद्युत् कण शोधून काढले. त्या विद्युत्कणांनाहि छेदून त्यांच्या पुढें किती तरी "पटींनीं सूक्ष्म असणाऱ्या ईथर आणि त्यांतील स्पंदनांपर्यंत आजमितीच्या शास्त्रज्ञाची मजल गेली आहे. ( Science and the Modern World. Page 53-56 ) याहून सूक्ष्मातिसूक्ष्माकडे जाणाऱ्या उद्यांच्या शास्त्रज्ञाचें लक्ष्य काय असेल ? सारांश मूळांत स्थूल जडवस्तूंत निघणारा युरोपचा भौतिकशास्त्रज्ञ सूक्ष्मातिसूक्ष्मांतून जातां जातां शेवटीं मूलतत्त्व अनंतांत प्रवेश करतो कीं काय याची शंका येऊं लागते. मग ते भौतिक कसले ? त्या वेळीं भौतिकाची व्याख्याच बदलावी लागेल. परंतु ही शास्त्रज्ञाची अवस्था किती शतकांनीं येणार आहे ? या दृष्टीनें युरोपीय शास्त्रज्ञ आमच्या प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांपेक्षां चार पांच हजारवर्षांनीं मागें आहेत असेंच म्हणावें लागेल.

## उपसंहार

समाजाचें स्वास्थ व्यक्तींच्या गुणांवर अवलंबून आहे. व्यक्तींचे गुण हे त्यांच्या स्वभावांत सांठविले आहेत. कायद्यानें त्यांच्या स्वभावांत मूलतः फरक पडत नाहीं. एवढेंच नव्हे तर कायद्यानें गुन्हे कमी होत नाहींत हें जगाचा वर्तमानकालीन ताजा इतिहास प्रतिज्ञेवर सांगत आहे. गुन्ह्यांना प्रतिबंध बसावा आणि समाजांत शांतता नांदावी एवढ्यासाठीं सुधारणेच्या आघाडीवर असलेल्या विसाव्या शतकानें कायद्यांत शास्त्रीयता आणून प्रगति केली; तथापि गुन्ह्यांतहि सुधारणा होऊन ते झपाट्यानें प्रगतिपथावर आहेत हेंच दिसून येत आहे. कायदेशीर गुन्ह्यांचें म्हणजे कायद्यांत न सांपडणाऱ्या गुन्ह्यांचें प्रमाण वाढूं लागलें. कायद्याप्रमाणें शिक्षेस अपात्र असलेली परंतु समाजघटकांत अस्वास्थ्य निर्माण करणारी गुन्हेगाराची मनोवृत्ति सपाट्यानें फैलावत आहे. त्यापेक्षां या कायदेयुगापूर्वींच्या जगाचें सिंहावलोकन केलें असतां त्या काळांत कायद्याभावीं सुद्धां समाजांत अधिक स्वास्थ्य होतें व गुन्ह्यांचें प्रमाणहि कमी होतें. तात्पर्य, समाजनियंत्रणास कायदा हा निरुपयोगी ठरतो. आणि जोपर्यंत कायदेभंगाचें शासन केवळ शारीरिक असून सूडाच्या स्वरूपाचें आहे तोंपर्यंत जुने गुन्हेगार नष्ट होणार नाहींत आणि नवीन गुन्हेगार होण्याचें बंद राहणार नाहीं.

अर्थात् समाजनियंत्रणास कायद्याशिवाय इतर गोष्टीकडे लक्ष देणें इष्ट आहे. कायद्यानें मनुष्याच्या शरीरावर तात्कालिक परिणाम होतो. त्यामुळें एकदां शिक्षा

भोगल्यावर परत गुन्हे करण्यास मोकळीक होते. आणि असे अनेक वेळां शिक्षा झालेले गुन्हेगार कमी नाहींत. म्हणजे गुन्ह्याचें मूळ मानसिक धरणेंच योग्य होईल. मानसिक उपचारानें मनावर परिणाम होत असून तो आस्तेंआस्तें पण निश्चित कायम स्वरूपाचा होतो म्हणून गुन्हे बंद होण्यासाठी मानसिक उपचारच करणें योग्य.

तथापि गुन्ह्यांची व्याख्या करणें कठीण आहे. गुन्ह्यांत भेद पाडावे लागतील. त्याप्रमाणें त्यांच्या उपचारांतहि भेद करणें अवश्य आहे. हा भेद सध्यां दुर्लक्षित आहे. त्यामुळें कायद्यांतून निसटण्यास पळवाट मिळते. नैतिक गुन्ह्यांनाहि नैतिक स्वरूपाचे उपचार करावे लागतील. हे मानसिक उपचार म्हणजे धार्मिक वा लोकाचारप्रणीत नैतिक बंधनें होत. तथापि नुसत्या कायदेशीर वा नैतिक निर्बंधांवर समाज नियंत्रित होऊन स्वास्थ्य लाभणें शक्य नाहीं. त्या बंधनांच्या सीमा निश्चित करावयास पाहीजेत. त्यांची नैतिक पार्श्वभूमि जनतेस कळणें इष्ट आहे. पार्श्वभूमीशिवाय केवळ असंख्य बंधनांना अर्थ राहणार नाहीं. त्यांची तात्त्विक भूमिका प्रथम सिद्ध केली पाहिजे. व्यक्तींच्या व्यवहारांत नियमितपणा राहावा म्हणून समाजाचें वर्गीकरण करणें इष्ट आहे. समाजांत वर्गोपवर्ग पडतांक्षणींच व्यवहारांत नियमबद्धता येते. त्यामुळें कितीतरी बंधनें न सांगतां व्यक्तीस कळूं लागतात. समाजाचें वर्गीकरण करतांना समाजांतील प्रमुख व अत्यावश्य अशा ढोबळ कार्यक्षेत्रांना सीमा घालणें इष्ट आहे. त्यांचें वर्गीकरण असें : संस्कृतीची जोपासना करणारे ब्राह्मण, परचक्रापासून रक्षण करणारे क्षत्रिय, समाजांत संपत्ति आणणारे वैश्य आणि सेवा करणारे शूद्र. याप्रमाणें वर्गीकरण केल्यास व्यक्तीवरील निर्बंध आपल्या ठरलेल्या कार्यक्षेत्रामुळें नियमित होतात. हें चातुर्वर्ण्यिक वर्गीकरण आधुनिक कालांत शक्य आहे किंवा नाहीं याविषयीं विद्वानांत वाद आहे आणि त्याची आवश्यकता आज कोणासहि दिसत आहे. तथापि या चार क्षेत्रांतील परस्परांचे व्यवहार नियमित करणें इष्ट व शक्य आहे यांत शंका नाहीं.

या वर्णांच्या उपवर्गांतील कुटुंबावस्थेंत मनुष्य सुसंस्कृत होत असतो. नैतिक बंधनांची तात्त्विक भूमिका कुटुंबांत व विद्यालयांत समजून देत असतो. त्यांतच प्रत्येक स्त्रीपुरुषाचीं कर्तव्यें अभिप्रेत आहेत. उद्योगधंद्यांचा उदात्त हेतु जर व्यापाऱ्यांस कळला तर तद्द्वारां होणाऱ्या समाजांतील हानीला आळा बसेल. प्रचलित

मनोरंजनाच्या साधनांचें उदात्तीकरण झाल्यास कलेची प्रगति होऊन समाजांतील सात्त्विक वृत्तीला पुष्टि मिळेल.

समाजांतील या सर्व प्रकाराच्या व्यवहारांचें अधिष्ठान नीति असेल तर समाज-नियंत्रण अत्यंत सुलभ होऊन समाजस्वास्थ्य लाभल्याशिवाय राहणार नाहीं.

जगाचें व समाजाचें पुढलें पाऊल कुठें पडत आहे याचा पत्ता लागत नाहीं. मागल्या पावलावरून पुढल्या पावलाचा अदमास काढतां येण्यासारखा नाहीं. आधुनिक संस्कृतीचें मूल्य व श्रेष्ठत्व यांचें मापन करणें सोपें नाहीं. आधुनिक संस्कृतींत प्रयत्न आहे पण त्यांत सुसूत्रता नाहीं. वेग आहे पण त्याला दिशा नाहीं. आकार आहे पण रूप नाहीं. गति आहे पण प्रगति नाहीं. जागतिक संस्कृति आणि विशिष्ट समाजसंस्कृति असा भेद करणें आतां इष्ट नाहीं. आधुनिक संस्कृति हेंच नांव समर्पक वाटतें. संस्कृति व्यापक वाटते तथापि ती स्वार्थी आहे. 'आधुनिक संस्कृति' या नांवावरून संस्कृतीचें एकत्व सिद्ध होतें तथापि त्यांत पावलोपावलीं भिन्नता दृष्टीस पडते. जणूं कांहीं ती जगन्नियन्त्या परमेश्वराप्रमाणें एक असून अनेक-रूपी दिसते व ती एकत्वाचा आभास उत्पन्न करीत असल्याचें वाटतें.

आधुनिक मानव समाज त्याच्या भवितव्याविषयीं उत्सुकता निर्माण करतो. अर्थात हिंदुसमाजहि त्यांत समाविष्ट होतो. आमचा समाज बराचसा आमच्या राजकीय परिस्थितीवर अवलंबून आहे. आधुनिक युगांत धार्मिक प्रवृत्ति लुप्तप्राय होऊन राजकीय पगडा समाजावर बसत असल्यानें भारतीय राज्यकर्त्यांच्या समाज-संस्कृतीवर भारतीयसमाज अवलंबून आहे. युरोपियन राज्यकर्त्यांच्या कारकीर्दीत भारतीय समाजाला युरोपीय समाजाचें रूप आलें आहे. भविष्यत् कालांत भारतीय राज्यकर्त्यांच्या छत्राखालील समाजाचें स्वरूप आतांच सांगणें कठीण आहे. कारण भावी भारतीय राज्यकर्त्यांत एक विशिष्ट संस्कृतिदर्शक समाज नसणार हें निर्विवाद दिसत आहे. मुसलमान राज्यकर्ते आल्यास महंमदी समाजाचें भारतवर्षांत वर्चस्व गाजेल यांत शंका नाहीं. हिंदु राज्यकर्ते आले तर मात्र वर सांगितलेली आधुनिक संस्कृतीच वरचढ होईल असें वाटतें. सर्वपंथीय शासनपद्धति आल्यास तेंच होईल. भारतीय समाज स्वतंत्र झाला याचा अर्थ केवळ राजकीय वर्चस्व झुगारून दिलें. तथापि सांस्कृतिक वर्चस्व व त्यामुळें समाजाचें स्वरूपहि युरोपीय राहणार यांत संदेह

नाहीं. ही स्थिति स्वातंत्र्योत्तर कालांत निदान २०–२५ वर्षें तरी राहील. त्यानंतरच्या काळांत मात्र, प्रयत्न झाल्यास, आमच्या पारतंत्र्याचें पारणें फिटून आमच्या विशिष्टपूर्ण राष्ट्राचा व समाजाचा पुनरपि नव्या रूपांत उदय होईल अशी आशा व्यक्त करून वाचकांची तूर्त रजा घेतों.

## निष्कर्ष

मानवी प्रगतीविषयीं निष्कर्ष काढतांना प्रगति शब्द विशेष लक्षांत ठेवला पाहिजे. सहेतुक, सध्येय आणि सुसूत्र पुरोगामी प्रयत्नाला प्रगति म्हणावयास पाहिजे. या दृष्टीनें वरील व्याख्येनें एकहि अट प्रचलित ‘मानवी प्रगति’ पुरी करूं शकत नाहीं. आधिभौतिक शास्त्रांत प्रगति झाली यांत शंका नाहीं. पण आधिभौतिक-शास्त्रांची प्रगति म्हणजे मानवाची सर्वांगीण प्रगति नव्हे. उलटपक्षीं ही शास्त्रीय प्रगतीच मानवाच्या कांहीं अंशीं प्रतिगतीला कारणीभूत झाली आहे. मानवाची प्रगति म्हणजे मानवी समाजाची प्रगति. परंतु आधुनिक मानव अल्पांशांत जीवनांत प्रगत झाल्यासारखा वाटतो तथापि मानवी समाज प्रतिगतीच दर्शवितो. प्रगति समाजस्वास्थ्यांत म्हणजे सर्व मानवांच्या संघटित उन्नतींत आहे. या प्रगतींत नैतिक प्रगतीला शिरोभागींचें स्थान अभिप्रेत आहे. कारण समाजस्वास्थ्य, अवघ्या मानव-समाजाचें स्वास्थ्य त्यावर अवलंबून आहे. परंतु आधुनिक काळांत वस्तुस्थिति विपरित आहे. आधुनिक युगांत प्रगति झाली ती साधनांत झाली. साधकांत झाली नाहीं. प्रगतीचा प्रश्न उपस्थित होतो ती साधनाविषयीं नाहीं साधकाविषयीं; साधकाची–म्हणजे मानवाची प्रगति झाली किंवा नाहीं हा प्रश्न आहे. घर सुंदर बांधून तयार झालें म्हणजे मालकाच्या रूपांत सौंदर्य येत नाहीं. त्याच्या कुरूपतेंत यत्किंचितहि फरक पडण्याचें कारण नाहीं. फार तर त्यानें अभिमानानें ‘आपलें घर’ म्हणून पाहावें. आधुनिक सुखसोयींनीं मानवाचें घर–जग सुंदर झालें आहे. पण त्यांत राहणारा पूर्वींचाच मानव कायम आहे. तो सुंदर झाला नाहीं. पूर्वींचें स्वरूप कायम आहे.

पाश्चात्य संस्कृति आधिभौतिक आहे, भारतीय संस्कृति आध्यात्मिक आहे. त्याप्रमाणें दोहोंचे ज्ञानमार्गहि भिन्न आहेत. पाश्चात्य जड विच्छेदून सूक्ष्माकडे जातात. भारतीय शास्त्रज्ञ सूक्ष्मांतून निघून जडाचें ‘करतलामलकवत्’ आलोकन

करून अनंतत्वाचा शोध करतात. कोणता मार्ग श्रेष्ठ हें प्रथम ठरवावयास हवें. आधिभौतिकाच्या प्रगतीमार्गें समाजाचें अस्वास्थ्य अंधपणें चालत आलें. अध्यात्माच्या प्रगतींत समाजस्वास्थ्य स्पष्ट होत आहे. वरील विवेचनानें विसाव्या शतकांत मागसलेले कोण आणि सुधारलेले कोण हा प्रश्न नव्यानें सोडवावा लागेल. समाजांतर्गत प्रश्न या दृष्टीनें सोडविण्याची आवश्यकता आहे. सर राधाकृष्णन् यांच्या शब्दांत हेच विचार अधिक परिणामकारक वाटतील :

" Civilisation is within ourselves, in our moral conceptions, religious ideas, and social outlook. We cannot call ourselves civilized simply because we use the steamship and the railways, the telephone and the typewriter. A monkey trained to ride a bicycle, drink a glass, and smoke a pipe is still a monkey. Technical efficiency has little to do with moral development. Though achievements in exact science and mechanical organisation of Ancient India or Greec or Medieval Italy are immensely inferior to ours, it cannot be denied that they had truer perception of spiritual values and the art of life".

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नं. दि.
वाचनालय

REFBK-0006618